।।श्रीशंकर।।

# जीवनसाधना

(श्रीमद्भगवद्गीतेच्या अठराव्या अध्यायावर केलेले विवेचन)

अनन्त दामोदर आठवले
(स्वामी वरदानंद भारती)

श्रीराधादामोदर प्रतिष्ठान, पुणे.

**प्रकाशक :**
अध्यक्ष, श्रीराधादामोदर प्रतिष्ठान
'प्रतीक' ४०३/१ शनिवार पेठ,
मेहुणपुरा, पुणे ४११०३०.
दूरध्वनी ०२०-२४४९२४९७

■

© **सर्वाधिकार सुरक्षित**

■

**पंचमावृत्ती :**
तुकारामबीज
फाल्गुन वद्य २ शके १९३७
२५ मार्च २०१६

■

**अक्षररचना व मुद्रणस्थळ :**
पु. स. सहस्रबुद्धे
बालोद्यान प्रेस
१३५८ अ, शुक्रवार पेठ,
पुणे ४११ ००२

■

**मूल्य १७५ रुपये**

।। श्रीशंकर ।।

# पाचव्या आवृत्तीच्या निमित्ताने

प.पू. स्वामी वरदानंद भारती यांच्या **'जीवनसाधना'** या ग्रंथाच्या मौलिकतेमुळे पाचवी आवृत्ती प्रकाशित होत आहे. या ग्रंथाचे प्रकाशन करताना श्रीराधादामोदर प्रतिष्ठानला अतिशय आनंद होत आहे.

जीवनसाधना ग्रंथामध्ये भगवद्गीतेच्या १८ व्या अध्यायावर प.पू. स्वामीजींनी सोप्या-सरळ भाषेत समाजप्रबोधक विवरण नि:संदिग्धपणे केले आहे. त्यांच्या वाङ्मयाला व्यासंगाचा, सव्यसाची बुद्धिमत्तेचा व परतत्त्वाचा स्पर्श असल्याने हे भाष्य प्रबोधनात्मक असले तरी रोचक झाले आहे. अठरावा अध्याय म्हणजे 'एकाध्यायी गीताच!' हा अध्याय भगवद्गीता ज्ञानमंदिराचा कलशाध्याय म्हणून ओळखला जातो.

या अध्यायावरील भाष्याला 'जीवनसाधना' हे शीर्षक अत्यंत समर्पक ठरते. कारण भगवद्गीतेतील सर्व तत्त्वबोध येथे साररूपाने ग्रथित झाला आहे. प.पू. स्वामीजींचे संपूर्ण वाङ्मय अध्यात्मिक साधनेला मार्गदर्शनपर आहे. साधनामार्गावर साधकाची वाटचाल आयुष्यभर एखाद्या व्रताच्या निष्ठेने होते, व्हावी अशी अपेक्षा असते, म्हणून 'जीवनसाधना'. प.पू. स्वामीजींचे हे भाष्य म्हणजे साधनमार्गासाठी वस्तुपाठच आहे. त्याचे स्वरूप 'आधी केले मग सांगितले' असल्याने अधिक महत्त्वाचे व अमूल्य ठरते.

प.पू. स्वामीजींच्या विवरणाची मार्मिकता व उत्तुंगता या ग्रंथात ठायी ठायी प्रत्ययाला येते. वानगीदाखल :

(१) 'माणसाचे रक्षण बुद्धियोगामुळेच होत असते. गुराखी जसा हातामध्ये दंडुका घेऊन गुराढोरांना राखतो तसे काही देव माणसाच्या संबंधात वागत नाही. देव माणसाला बुद्धी देतो आणि त्या बुद्धीच्या बळावर मनुष्य योग्यायोग्य जाणून घेऊन जे करणे श्रेयस्कर आहे ते नेमकेपणाने करतो'. (पृ. २२८)

(२) नीतिमत्तेचे अधिष्ठान असेल तरच संपत्ती ही श्री ठरते, लक्ष्मी ठरते.

वरचढपणा हा विजय ठरतो, यशस्वी ठरतो. आणि वैभव किंवा ऐश्वर्य भूषणभूत होते, सन्मानाला प्राप्त होते. असे असले तरच त्यात संतोष, समाधान, उल्हास, आनंद यांचा वास राहतो, नाहीतर तो केवळ देखावा होतो. त्यांचा तो वरवरचा डौलही फार काळ टिकत नाही. उलट अप्रतिष्ठा वाट्याला येते. म्हणून संपत्ती, विजय आणि ऐश्वर्य यांना, चिरंतनमूल्य असलेल्या नीतिमत्तेचे अधिष्ठान असावे लागते. (पृष्ठ २८९-२९०)

आज 'परेषु मैत्री-स्वजनेषु वैरम्' हे जे घडत आहे त्याचे दुःख पू. अप्पांना होते व ते त्यांच्या विवेचनातून व्यक्त झालेले आहे. या दृष्टीने संजयाच्या पूर्णोद्गारावरील (श्लोक ७८) स्वामीजींचे विवेचन मुळातून वाचण्यासारखे आहे.

वै. श्री. कल्याण शेटे यांनी कृष्णार्जुनाचे 'करिष्ये वचनं तव' काढलेले चित्र या वेळी मुखपृष्ठावर घेतले आहे. त्यांचे स्मरण करून कृतज्ञता व्यक्त करीत आहोत.

कु. गार्गीताई देशपांडे यांचे या ग्रंथाचे रसग्रहण **मार्मिक 'जीवनसाधना'** नावाने येथे ग्रथित केले आहे.

बालोद्यान प्रेसने या ग्रंथाची छपाई आपल्या अपेक्षेप्रमाणे सुबकरित्या आणि वेळेवर करून दिल्याबद्दल त्यांचे आभारी आहोत.

विज्ञाननिष्ठतेचे अधिष्ठान लाभलेला, गंभीर चिंतनाने परिप्लुत असलेला हा ग्रंथ साधकासाठी जीवन-पाथेयच आहे.

**अध्यक्ष**
**श्रीराधादामोदर प्रतिष्ठान, पुणे**

## ।। श्रीशंकर ।।

## द्वितीयावृत्तीचे प्रकाशकीय

संपूर्ण मानववंशाला मार्गदर्शन करण्याचे सामर्थ्य असलेला ग्रंथ श्रीमद्भगवद्गीता! त्यातही सारे गीतासार एकत्र मिळणारा अध्याय अठरावा. आणि महाभागवत संतश्रेष्ठ श्री ज्ञानोबारायांच्या मौलिक टीकेचे साह्य घेत त्यावर केलेली प्राचार्य श्री. अनंतराव आठवले यांची प्रवचने-एक मौलिक विचार धन- 'जीवन साधना'! संत श्रीज्ञानेश्वरांनी या अध्यायाला 'कलशाध्याय' म्हटले आहे. जर्मन तत्त्वज्ञ श्री. शॉपेन हॉवर उननिषदांसंबंधी म्हणतो की ती मला जीवनभर शांती देत आहेतच पण मृत्यूनंतरही ती शांती देतील. अशी ही उपनिषदेच गीतेचे उगमस्थान आहेत. यामुळे उपनिषदांचे सार असलेल्या गीतेच्या आणि गीतेचे सार असलेल्या गीतेच्या १८व्या अध्यायात मन:शांती देणारे रहस्य उलगडून दाखवले गेले आहे असे म्हटले तर त्याबद्दल दुमत होणार नाही. परमोच्च मानवी गुण नि समाज व्यवस्था व त्याचे स्वास्थ्य यांचा अत्यंत मौलिक मेळ गीतेने घातलेला आहे. विषय अर्थात गहन, गंभीर पण जीवनोपयोगी आहे.

प्राचार्य श्री. अनंतराव आठवले - आता स्वामी वरदानंद भारती यांची ही १८व्या अध्यायावरील प्रवचने आहेत. ते एक थोर तत्त्वचिंतक आहेत. आपल्या प्राचीन परंपरेचे ते एक व्यासंगी अभ्यासक आहेत. त्यांची महाभारतावरील आक्षेपांच्या खंडनाकरिता झालेली व्याख्याने महाराष्ट्राला चांगली ज्ञात आहेत. हिंदू-अध्यात्म, हिंदू-तत्त्वज्ञान आणि हिंदू-जीवनपद्धती यांचा त्यांनी सखोल अभ्यास केलेला आहे. संकुचित पोथी-प्रामाण्यातून त्यांचे विचार जन्मले नसून त्यांच्या स्वयंप्रज्ञेतून, चिंतनातून ते जन्माला आले आहेत; हे त्यांच्या सर्वच वैचारिक वाङ्मयातून सहज प्रत्ययाला येते. त्यांच्या या गंभीर चिंतनाला विज्ञाननिष्ठतेचे अधिष्ठान असल्याने त्यांची ती प्रांजल प्रवचने आकर्षक आणि मार्गदर्शक ठरतात. साधी सरळभाषा नि नि:संदिग्ध प्रतिपादन यामुळे समाजधारणेला ती पोषकच होतात.

अशी ही जीवनरसाने रसरसलेली प्रवचने गेली १०-११ वर्षे दुर्मिळ झाली होती. अनेक जाणत्या वाचकांकडून या ग्रंथाची मागणीही होत होती. तिची पूर्तता आता या द्वितीयावृत्तीच्या रूपाने होत आहे.

सांगली येथील सुप्रसिद्ध चित्रकार श्री. कल्याण शेटे यांनी रेखाटलेले 'करिष्ये वचनं तव' हे श्रीकृष्णार्जुनांचे चित्र पूर्वीप्रमाणेच या आवृत्तीत दिले आहे. हे चित्र छापून देणारे 'बालोद्यान प्रेस' चे श्री उत्तमराव सहस्त्रबुद्धे आणि चित्रकार श्री. शेटे या दोघांच्या सहकार्याबद्दल प्रतिष्ठान आभारी आहे. मुद्रणाचे उत्तरदायित्व समर्थपणे पूर्ण करणारे श्री. गुर्जरबंधू व आयुर्विद्या मुद्रणालय याचे कर्मचारी यांचेही प्रतिष्ठान आभारी आहे. वाचकांच्या मौलिक सहकार्याची कृतज्ञता व्यक्त करून हे प्रकाशकीय पूर्ण करतो.

**अध्यक्ष**

**श्रीराधादामोदर प्रतिष्ठान, पुणे**

# मार्मिक ‘जीवनसाधना’

साधना म्हटले की शुचिर्भूत होऊन, मृगाजिनावर बसून, लक्ष लागो वा न लागो समोर ठेवलेल्या आलंबनावर मन एकाग्र करण्यासाठी स्वीकारलेली यांत्रिक प्रक्रियाच डोळ्यांसमोर उभी राहते; आणि मग ती करणाराला, उगीचच आपण काही विशेष करतो व पाहणाराला, आपण काही विशेष पाहतो असे वाटत राहते. त्यात काही तथ्य नसतेच असे नाही; पण वरील हे सर्व न करणाराही कधी कधी प्रत्यक्षात साधना करीत असतो.

परमेश्वरकृपेने मिळालेला माणसाचा जन्म चांगल्या रीतीने व्यतीत करणे, शास्त्रशुद्ध रीतीने घालविणे, हित-अहिताचा विचार करून घालविणे, चांगल्या-वाईटाचा विचार करून व्यतीत करणे हीही महत्त्वाची साधनाच असते.

महाभारतामध्ये धर्म हा प्रवृत्ति-निवृत्ती लक्षणांनी युक्त असतो असे म्हटले आहे. धर्माचरण हीही साधनाच आहे.

‘जीवन-साधना’ हा ग्रंथ ह्या सर्व दृष्टींनी मार्गदर्शक ग्रंथ आहे. जीवन हीच साधना आणि ‘जीव’ न - शिव आहे ची साधना हे दोनही विषय या ग्रंथात समाविष्ट आहेत.

ग्रंथ म्हणजे शब्द, शब्द आणि शब्दच असतात; पण या ग्रंथातील प्रत्येक शब्द हा अनुभवाच्या मुशीतून उजळून निघालेला आहे. त्यामुळे त्या शब्दाला विलक्षण तेज प्राप्त झाले आहे. शब्दाला केवळ बुद्धीची धार नसून हृदयकमलातील कोमलता प्राप्त झाल्याने वाचकाचे मन सहजच खेचून घेतले जाते. तेजाने बुद्धी दिपून जाते. रचनाकौशल्याच्या आल्हादाने मन डोलू लागते. वाचक लीलया जीवन-साधनेच्या विषयांमध्ये दंग होऊन जातो.

श्री ज्ञानेश्वरमहाराजांनी अठरावा अध्याय हा एकाध्यायी गीता आहे असे म्हटले आहे. याचा प्रत्यय ‘जीवन-साधना’ ग्रंथ वाचल्याने पदोपदी येतो. अठराव्या अध्यायात आलेले समदर्शित्व इतर ठिकाणी कसे व कोणत्या संदर्भात आले आहे, ज्ञान्याची लक्षणे वेगळ्या शब्दात अठराव्या अध्यायात

पुन्हा कशी आलेली आहेत, याचे तर स्पष्टीकरण सविस्तरपणे या ग्रंथात आहेच; पण Reading between the lines हे तत्त्व कसे अवलंबावे, तेही अठराव्या अध्यायातील काही श्लोकांच्या संदर्भात स्पष्टपणे सांगितले आहे.

त्रिविधा कर्मचोदना - कर्माची त्रिविध प्रेरणा सांगताना 'ज्ञानं कर्मं च कर्ता च' असे भगवंतांनी का म्हटले आहे ते १९ व्या श्लोकाच्या विवेचनात प. पू. ती. अप्पांनी अत्यंत तर्कशुद्धरीतीने स्पष्ट केले आहे. आधी ज्ञान का आधी ज्ञाता, असा प्रश्न उपस्थित झाला तर वरवर विचार करता आधी ज्ञाता मग ज्ञान असा क्रम योग्य वाटतो. पण त्रिपुटीच्या पातळीवर जिला ज्ञान होते ती व्यक्ती जरी ज्ञान होण्याच्या घटनेपूर्वी अस्तित्वात असली तरी तिला अजून ज्ञातेपण आलेले नसते. ज्ञातेपण ज्ञान झाल्यावर येते, म्हणून आधी ज्ञान आणि मग ज्ञाता असा क्रम योग्य ठरतो. स्त्रीत्व आधी असले तरी मातृत्व मात्र अपत्यजन्माच्या नंतर येते, तसेच हे आहे.

'न द्वेष्ट्यकुशलं कर्म' (श्लोक १०) या संदर्भात उदाहरण सांगताना, चितेतून बाहेर आलेला प्रेताचा हात तोडणाऱ्या लो. टिळकांची गोष्ट सांगून त्यासंबंधी वाचकाला छिन्नसंशय करण्याचा उद्देश निश्चितच सफल झालेला दिसतो.

४२-४३-४४ व्या श्लोकात 'स्वभावजं कर्म' असा शब्द भगवंतांनी वापरला आहे. त्याचा उद्देश स्पष्ट करताना प. पू. ती. अप्पा म्हणतात- ''प्रवृत्ती तशी असणे आणि वर्तन त्याप्रमाणे करणे या दोनही गोष्टी 'स्वभावजं' शब्दाने गृहीत आहेत. प्रवृत्ती आणि वर्तन एकरूप असेल तरच कृती प्रामाणिक राहते. दंभाला वाव राहत नाही.''

क्षत्रियाच्या लक्षणात धृती या गुणाचे वर्णन करताना पेशवाईच्या काळातील एका सरदाराच्या धैर्याचे वर्णन करणारी आलेली गोष्ट पाहून लोकमान्य टिळकांच्या 'उत्तर ध्रुवावर जाता आले नाही तरी दृष्टी उत्तर ध्रुवाकडे असली तर प्रगतीची आशा तरी करता येते' या वाक्याची आठवण येते व नकळतपणे आपण त्या धैर्यशील आदर्शाचा विचार करू लागतो.

व्यवहारातील कामे करताना काय किंवा परमार्थाची साधना करताना काय 'यथासांग ते कर्म काही घडेना' असेच घडत राहते आणि कार्यकर्ता वा साधक निराशेने खचून जाण्याची शक्यता असते. 'सहजं कर्म कौन्तेय सदोषमपि न त्यजेत्' या भगवंतानी अर्जुनाला दिलेल्या आदेशाचे प. पू. ती.

अप्पांनी सांगितलेले मर्म पाहिले म्हणजे कार्यकर्त्याला वा साधकाला आपल्या कार्यातून कधीही निराशा न येता तो पहिल्या उत्साहाने कार्यात वा साधनेत सतत राहू शकेल याची खात्री पटते.

'जीवन-साधना' या ग्रंथात 'जीवन' ची 'जीवो ब्रह्मैव'' ची साधना सांगितली आहे, असे आरंभी म्हटले आहे, त्याचा प्रत्यय ५० ते ५७ या श्लोकांवरील विवेचन पाहिले म्हणजे वाचकांस येईल. साधनेच्या समीकरणाने सांगितलेला क्रमयोग हाही वास्तव आहे. प्रत्यक्ष आहे. अनुभवाच्या मुशीतून आलेल्या शब्दांचे तेजच येथे प्रकट झाले आहे.

हृदयकमलातील भावनेची कोमलता ६४, ६५, ६६ या श्लोकांच्या विवरणात ओसंडून वाहते आहे. त्याचे वर्णन करण्यास शब्द तोटकेच पडणार! वाचकांनी त्याचा आस्वाद स्वत:च अनुभवावा.

गीता कोणाला सांगू नये, हे सांगताना भगवंतांनी 'न च मां य: अभ्यसूयति' असे म्हटले आहे. त्यावरील श्री शंकराचार्यांचे भाष्य पाहिले म्हणजे अलीकडील विद्वानांची अहंकारोत्पन्न असूया किती प्राचीन आहे हे जाणवते कारण असूयेमुळे तपादि गुण मातिमोल ठरतात. अर्थात हा विषय ती. अप्पांच्याच विवेचनाने स्पष्ट होतो.

'यत्र योगेश्वर: कृष्णो' यावरील भाष्य पाहिले की, धार्मिक दृष्टिकोण असलेल्या, पारमार्थिक विचाराने आत्मतृप्त झालेल्या, भक्तीच्या ओलाव्याने अंत:करण परिपूरित झालेल्या ती. अप्पांच्या अंत:करणातील देशभक्ती, देशद्रोह्यांचा नादानपणा जेव्हा परखडपणे प्रकट करते तेव्हा कोणाही वाचकाच्या मनात त्वेष उत्पन्न झाल्याशिवाय राहणार नाही व त्यांनीच म्हटल्याप्रमाणे कार्यकर्त्यांची निष्क्रियताही संपुष्टात येऊन समाजाचा उद्धार होण्यास निश्चितच मदत होईल. पण त्यासाठी 'जीवन-साधना' या ग्रंथाचे अंगोपांगासह परिशीलन केले पाहिजे, तदनुसार आचरणही झाले पाहिजे.

प. पू. ती. अप्पांच्या ऋणांचा भार भूषणाने मिरवून ग्रंथ आणि वाचकवर्ग यांतील अंतर दूर करते.

विनीत,<br>
गार्गी देशपांडे

।। श्रीशंकर ।।

# जीवनसाधना

**(श्रीमद्भगवद्गीता : अध्याय अठरावा)**

**योऽन्त:प्रविश्य मम वाचमिमां प्रसुप्तां सञ्जीवयत्यखिल शक्तिधरस्वधाम्ना ।**
**अन्यांश्चहस्तचरणश्रवणत्वगादीन् प्राणान्नमो भगवते पुरुषाय तुभ्यम् ।।**

**पार्थाय प्रतिबोधितां भगवता नारायणेन स्वयम्**
**व्यासेन ग्रथितां पुराणमुनिना मध्येमहाभारतम् ।**
**अद्वैतामृतवर्षिणीं भगवतीमष्टादशाध्यायिनीम्**
**अम्ब! त्वामनुसंदधामि भगवद्गीते भवद्वेषिणीम् ।।**

**औन्नत्यं भजते हिमाद्रिरिव या गंगेव या पावनी**
**आलिंगन्मरणं निधाय हृदये यां देशभक्ता मुदा ।**
**स्फूर्तिस्थानतया व्यलोकि नितरां या लोकमान्यादिभि:**
**शश्वत् प्रेरणदायिनी भवतु सा गीताख्यसंजीवनी ।।**

**प्रपन्न पारिजाताय तोत्त्रवेत्रैकपाणये ।**
**ज्ञानमुद्राय कृष्णाय गीतामृतदुहे नम: ।।**

**वंशीविभूषितकरान्नवनीरदाभात् पीताम्बरादरुणबिम्बफलाधरोष्ठात् ।**
**पूर्णेन्दुसुंदरमुखादरविन्दनेत्रात् कृष्णात्परं किमपि तत्त्वमहं न जाने ।।**

*।। पुंडलीक वरदा हरि विठ्ठल ।। श्रीसद्गुरु ज्ञानेश्वर तुकाराम महाराज की जय ।।*
*जय जय रघुवीर समर्थ ।।*

या पुरुषोत्तममासाच्या निमित्ताने आपण श्रीमद्भगवद्गीतेच्या अठराव्या अध्यायाचा यथाशक्ती विचार करणार आहोत.

श्रीज्ञानेश्वरमहाराज या अठराव्या अध्यायाचे महत्त्व गाताना, *''अठरावा अध्यायो नोहे । हे एकाध्यायी गीताचि आहे ।''* असे म्हणतात

(ज्ञाने. १८-८४) इतकेच नव्हे तर, *''जी गीतारत्नप्रासादाचा । कळसु अर्थचिंतामणीचा । सर्व गीतादर्शनाचा । पाढाउ जो ।। लोकी तरी आथी ऐसे । जे दुरोनि कळसु दिसे । आणि भेटीचि आतवसे । देवतेचिये ।। तैसेचि येथहि आहे । जे एकेचि येणे अध्याये । आघवाचि दृष्ट होये । गीतागमु हा ।। मी कळसु याचिकारणे । अठरावा अध्यायो म्हणे । उवाइला बादरायणे । गीताप्रसादा ।।* (ज्ञाने.१८/३० ते ३३)'' असाही अठराव्या अध्यायाचा गौरव श्रीसद्गुरूज्ञानदेवांनी केला आहे, तो अगदी यथार्थ आहे, यात शंका घेण्याचे कारण नाही. गीतेचे सगळे तात्पर्य, सारे सार या अध्यायातून स्पष्टपणे व्यक्त झाले आहे. मानवाच्या वैयक्तिक वा सामाजिक जीवनासाठी जे जे आवश्यक, चारी पुरुषार्थांच्या प्राप्तीच्या दृष्टीने साधन म्हणून जे जे महत्त्वाचे ते सर्व भगवद्गीतेने उद्बोधक रीतीने प्रतिपादिले आहे, तो सर्व उपदेश या अठराव्या अध्यायात सूत्ररूपाने पुन्हा एकदा प्रगट झाला आहे. त्यातील भाव प्रगट करण्याचा प्रयत्न मी माझ्या अल्पमतीप्रमाणे करतो. आपण सावधान चित्ताने ते सर्व परिसावे अशी विनम्र आग्रहाची विनंती आहे.

अध्यायाचा आरंभ अर्जुनाच्या प्रश्नाने होतो आहे. अर्जुन विचारतो-

**अर्जुन उवाच**

**संन्यासस्य महाबाहो तत्वमिच्छामि वेदितुम् ।**
**त्यागस्य च हृषीकेश पृथक्केशिनिषूदन ।।१।।**

हे केशिनिषूदना! महाबाहो! हृषीकेशा! श्रीकृष्णा! संन्यासाचे आणि त्यागाचे तत्त्व कसे आहे, स्वरूप काय आहे ते नीटपणे जाणून घेण्याची माझी इच्छा आहे.

उण्या-अधिक भेदाने जवळजवळ याच अर्थाचा प्रश्न अर्जुनाने श्रीकृष्णाला दोन-तीन वेळा तरी विचारला आहे. संन्यास आणि त्याग याचे स्वरूप निश्चितपणे जाणल्यावाचून, त्याला अनुसरून यथाशक्ती पण प्रामाणिकपणे आचरण केल्यावाचून मानवी जीवनाला उदात्ततेचा स्पर्शसुद्धा होणार नाही. जीवनाच्या उन्नतीचे, विकासाचे वा प्रगतीचे मुख्य अधिष्ठान त्याग-संन्यासाच्या योग्य जाणिवेतच आहे. कुणी सामाजिक कार्यकर्ता असो वा मोक्षमार्गी परमार्थी साधक असो, त्याने ही गोष्ट योग्य रीतीने जाणून

घेतलीच पाहिजे. अर्जुनाच्या प्रश्नाचे इतके महत्त्व आहे.

अर्जुनाच्या या प्रश्न विचारण्यात त्याची नम्रताही एकप्रकारे व्यक्त झाली आहे. संन्यासाचे आणि त्यागाचे स्वरूप जाणून घेण्याची माझी इच्छा आहे, अशी भाषा तो वापरतो, त्यांचे स्वरूप स्पष्ट करून सांग असे म्हणत नाही. विश्वरूपदर्शनानंतर अर्जुनाच्या अंत:करणातील सद्भावाला विनयाचे, आर्जवाचे, निरहंकारीपणाचे एक मनोहारी रूप प्राप्त झाले आहे. शिष्यभावाची जवळिक अधिक कोमल झाली आहे. शंका विचारताना तो संकोच करीत नाही. गुरूजवळ असा संकोच करणे हा परमार्थसाधनेच्या दृष्टीने, शिष्याच्या स्वहिताच्या दृष्टीने मोठाच अपराध आहे. त्यात शिष्याचीच हानी आहे. शंका उत्पन्न झाली तर विचारताना संकोचावे कशासाठी? प्रश्न अगदीच पोरकटपणाचा वाटला किंवा जिज्ञासूच्या गृहीत धरलेल्या पात्रतेच्या दृष्टीने त्याला न शोभेसा वाटला तर उत्तर देणारा ''तुला एवढे कसे कळत नाही'' असे म्हणेल वा अधिक फटकळपणे ''एवढी साधी गोष्ट लक्षात न येण्याइतका तू मूर्ख कसा?'' असे फटकारील. पण खऱ्या जिज्ञासूने या संभवनीय अवहेलनेला भीता कामा नये. चांगला गुरू उत्तेजन देण्यासाठी कदाचित फटकारीलही, पण प्रश्नाचे उत्तर देईल किंवा उत्तर शोधून काढण्याचा मार्ग दाखवील. जिज्ञासा हीच ज्ञानाच्या प्राप्तीचे अत्यंत महत्त्वाचे साधन आहे, हे खऱ्या विद्वानाला चांगले ठाऊक असते. अर्जुन प्रामाणिक जिज्ञासू आहे. त्याला संकोच नाही. अहंकारातून उत्पन्न झालेले भयही नाही. भगवान् आदर्श गुरू आहेत. त्यांना जिज्ञासूने योग्य प्रश्न मार्मिकपणे विचारले तर त्याचे कौतुकच वाटते, आणि अशा व्यक्तीशी आवडीने बोलावे अशी इच्छा त्यांच्याही अंत:करणात उत्कटतेने आहे. ''पै अर्जुना आम्हाहि वाडेकोडे । अखंड बोलो आवडे । परी काय कीजे न जोडे । पुसते ऐसे ।। (ज्ञाने. १५/४४८)'' या ओवीत श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी ही वस्तुस्थिती चांगल्या प्रकारे व्यक्त केली आहे. खरोखरीच अर्जुनासारखा श्रोता आणि श्रीकृष्णासारखा वक्ता यांची जोडी जमणे हा एक अत्यंत दुर्मिळ असा योग आहे.

या प्रश्नाच्या श्लोकात अर्जुनाने कृष्णाला उद्देशून तीन संबोधने उपयोजिली आहेत. महाबाहो– ज्याचे बाहू (हात) लांब आणि बलिष्ठ आहेत, म्हणजे जो अतिशय पराक्रमी, कार्यक्षम असा आहे, सर्वसमर्थ आहे. हृषीकेश– हृषीक

म्हणजे इंद्रिय, ईश म्हणजे धनी, स्वामी, सत्ताधारी. इंद्रियांवर ज्याची सत्ता आहे, इंद्रियांच्या जो स्वाधीन नाही, इंद्रिये ज्याला चाळवू शकत नाहीत असा संयमी म्हणजे हृषीकेश. केशिनिषूदन– केशी नावाच्या राक्षसाला ठार मारणारा. यावरून व्यवहारामध्ये प्राप्त कर्तव्य म्हणून वरवर हिंसक वाटणारे, दुष्टवधाचे कर्मही ज्याने विहिताचरणच मानले आहे असा श्रीकृष्ण. अर्जुनाने त्याग आणि संन्यासासंबंधीचा केवळ आध्यात्मिक, पारमार्थिक वा पारलौकिकदृष्ट्या महत्त्वाचा वाटणारा प्रश्न कोण्या संन्यासी मठपतीला विचारला नसून पूर्णपणे संयमी असूनही दुष्टांचा संहार करण्यासाठी पराक्रम करणाऱ्या श्रीकृष्णाला विचारला आहे. या तीनही विशेषणांनी संबोधिले जावे अशी योग्यता असणाराच वस्तुतः त्याग आणि संन्यास यांच्या स्वरूपाचे मर्म उलगडून दाखविण्याचा अधिकारी असू शकतो. अर्जुनाच्या भाग्याने त्याला असा श्रेष्ठ, अधिकाराने संपन्न उपदेशक लाभला.

अर्जुनाचा शिष्यभाव उत्कट आहे, त्याचे श्रवण– बरे वाटते, वेळ चांगला जातो, काहीतरी धर्मविषयक कानावर पडल्याने पुण्य लागते – या जातीचे उथळ नाही. त्याची जिज्ञासा तीव्र आहे. त्याला जाणून घ्यायचे आहे, ते आचरणात आणण्यासाठी. ‘नळी फुंकिली सोनारे । इकडून तिकडे गेले वारे ।’ अशी त्याची स्थिती नाही. तेव्हा भगवान् श्रीकृष्णासारख्या अत्यंत, श्रेष्ठ, संयमी, पराक्रमी अशा पुरुषोत्तमालाही अर्जुनाशी बोलावयास मिळते याचा अत्यंत आनंद आहे. त्याच्या नाना प्रकारच्या शंकांची उत्तरे देण्याचा उत्साहही त्यांना आहे.

अर्जुनाने विचारलेली शंका फार महत्त्वाची आहे. त्याग आणि संन्यास या गोष्टी परमार्थाचा पाया आहेत. यातील काही थोड्यातरी प्रमाणात साधलेल्या असल्यावाचून उन्नतीच्या मार्गावर पाऊल पडणे शक्य नाही. बालवर्गातही गुणाने न जाऊ इच्छिणाऱ्या मुलाच्या वृत्तीचे काही लोक असतात. त्यांच्यासाठी परमार्थ अगदी सोपा करून सांगणारी काही वचनेही असतात. पण ती तेवढीच महत्त्वाची मानून कधी चालत नाही. जन्मभर बालवर्गातच राहतो हे जसे चालणार नाही, चालत नाही, तसेच परमार्थाच्या वाटचालीचेही समजले पाहिजे. शक्ती उणी–अधिक असेल, परिस्थिती अनुकूल वा प्रतिकूल असेल त्याप्रमाणे चालण्याचा वेग त्वरेचा वा संथ, मंद असा असू शकेल. पण प्रत्येक

वेळी पाउले पुढे पुढे पडत राहिलीच पाहिजेत. अशी प्रगती होत राहावयाची तर त्यासाठी ज्या प्रकारच्या ज्ञानाची आवश्यकता आहे त्यात त्याग आणि संन्यास यांच्या स्वरूपासंबंधीच्या ज्ञानाला अत्यंत महत्त्व आहे. अर्जुनाने विचारलेल्या प्रश्नांपैकी गीतेतला हा शेवटचाच प्रश्न आहे. या प्रश्नाचे उत्तर भगवंतांनी सर्व अंगांनी आणि विस्ताराने दिलेले आहे. त्याचा परिणाम म्हणून मुळातच महापराक्रमी असलेला अर्जुन नि:शंक मनाने आणि निष्ठायुक्त वृत्तीने *''करिष्ये वचनं तव''* अशी प्रतिज्ञा करून कर्तव्याचरणासाठी ठामपणे उभा राहिला आहे. या संवादातील बोध आपल्या जीवनाला योग्य ते वळण देण्यास समर्थ आहे, पण त्यासाठी हा बोध श्रवण, मनन-निदिध्यासन या क्रमाने आचरणात परिणत झाला पाहिजे.

अर्जुनाने जिज्ञासा प्रगट करताच भगवान् म्हणाले - सांगतो, ऐक.

**श्री भगवान् उवाच**

**काम्यानां कर्मणां न्यासं संन्यासं कवयो विदुः ।**
**सर्वकर्मफलत्यागं प्राहुस्त्यागं विचक्षणाः ।।२।।**

काहीतरी मिळविण्याची इच्छा-कामना ठेवून जे कर्म केले जाते त्याचा त्याग करणे म्हणजे संन्यास, असे विद्वान लोक मानतात. आणि सर्व प्रकारच्या कर्मापासून स्वाभाविकपणे निर्माण होणाऱ्या फळाचा त्याग करणे याला विचक्षण लोक, पंडितजन, त्याग असे म्हणतात.

माणसाला कराव्या लागणाऱ्या कर्मांचे स्वाभाविक, नित्य, नैमित्तिक आणि काम्य असे चार प्रकार आहेत. यांतील श्वासोच्छ्वास करणे, खाणे, पिणे, बसणे, चालणे, उठणे, झोप घेणे, इत्यादी इत्यादी देहधारणेसाठी कराव्या लागणाऱ्या क्रियांना स्वाभाविक कर्म असे म्हणतात. आरोग्यशास्त्रदृष्ट्या त्याच्याही योग्यायोग्यपणाचा विचार करावा लागतो. गीतेच्या सहाव्या अध्यायात त्यासंबंधीचा थोडासा विचार आला आहे. देहधारी व्यक्तीला कर्माचा संपूर्ण त्याग करणे कधीही शक्य नसते, असेही पुढे याच अध्यायातील अकराव्या श्लोकात सांगितले आहे. या स्वाभाविक कर्माचा त्याग संभवत नाही. आणि त्यातून सहजपणे निर्माण होणाऱ्या फलांचा त्याग करावा किंवा करू नये असेही आवर्जून सांगण्याचा प्रसंग बहुधा येत नाही. नित्य, नैमित्तिक

आणि काम्य कर्मे हीच साधारणपणे चर्चेचा विषय होत असतात.

नित्यादी तीनहि कर्मांचा विचार केवळ धार्मिक दृष्टीने पूर्वी केला गेला आहे. व्यावहारिक दृष्टीनेही केल्या जाणाऱ्या कृत्यांची अशी तीन प्रकारे विभागणी करणे शक्य आहे. समजूत पटण्यासाठी थोडी उपयुक्तही आहे, कारण नित्यादी कर्मामागील धार्मिक अधिष्ठानाचा जवळजवळ लोप होत आला आहे.

स्नानसंध्या, देवपूजा, पोथीपाठ, स्तोत्रे म्हणणे, प्रार्थना करणे इत्यादींना नित्यकर्म असे म्हणतात. ही कर्मे केल्यामुळे विशेष पुण्य लाभते असे नसले तरी न केल्याचे पाप मात्र निश्चयाने लागते, अशी आपली पारंपरिक धारणा आहे. घरकाम करणे, कार्यालयात जाणे, आपापले उद्योग-व्यवसाय करणे, वृत्तपत्रे वाचणे, नभोवाणी-दूरदर्शन यांवरून दिल्या जाणाऱ्या वार्ता ऐकणे-पाहणे, हे आधुनिक नित्यकर्म. नित्यकर्म म्हणजे काय ते समजावे म्हणून यांचा उल्लेख केला आहे. पापपुण्याच्या दृष्टीने मात्र यांचा विचार करण्याचे कारण नाही.

नैमित्तिक कर्मामधे कुळधर्मकुळाचाराप्रमाणे केली जाणारी वटसावित्री, हरतालिका, गौरी-गणपती, निरनिराळी नवरात्रे, श्रावणी, श्राद्ध-पक्ष, तीर्थयात्रा, इत्यादी इत्यादी धार्मिक कृत्ये यांचा समावेश होतो. खेळांच्या स्पर्धा, संमेलने, सभा-परिषदा, शीतल स्थलांचे निवास, निसर्गदर्शनासाठी वा ज्ञानवर्धनासाठी केलेले प्रवास ही अलीकडची रूढ नैमित्तिक कृत्ये.

स्वार्थलाभासाठी, कामनापूर्तीसाठी, विशिष्ट उद्देशाने केल्या जाणाऱ्या कृत्यांना काम्य कर्मे म्हणतात. नवसासाठी केली जाणारी पूजा-हवनादी कृत्ये देवदर्शने-यात्रा इत्यादींचा समावेश या काम्यकर्मात होतो. वरिष्ठांना संतुष्ट राखण्यासाठी वा उद्योगधंद्याच्या वाढीसाठी दिल्या जाणाऱ्या भेटी, प्रसिद्धी-प्रचारासाठी केल्या जाणाऱ्या गोष्टी, लौकिकासाठी केले जाणारे दानधर्म ही आधुनिक काम्यकर्मे. विशिष्ट हेतू नसला तरी पुण्य लाभावे, देवता प्रसन्न व्हावी, संकटे येऊ नयेत, मनोरथ सिद्धीस जावेत म्हणून जी काही कृत्ये केली जातात तीही काम्यकर्मेच समजावीत; निषिद्धकर्मे असाही कर्माचा चवथा प्रकार आहे. पातकांचा समावेश यात होतो. पण येथे आपणास त्यासंबंधीचा विचार कर्तव्य नाही. अशा सर्व प्रकारच्या स्थूल-सूक्ष्म काम्यकर्मांचा त्याग

म्हणजे संन्यास, असे कवींचे-विद्वानांचे मत आहे असे भगवान् म्हणतात.

कवी शब्दाचा मूळ अर्थ क्रांतदर्शी बुद्धिमान, विद्वान, घटनांचा वा त्यांच्या परिणामांचा जवळ-दूर, अंतर्बाह्य असा सर्वांगीण विचार करू शकणारा असा आहे. कवी शब्द प्रतिष्ठेचा सन्माननीय असा आहे. वेदांनी आणि शास्त्रांनी परमेश्वराला उद्देशून हा कवी शब्द अनेक वेळा वापरला आहे. येथील कवी हा शब्दजुळारी साहित्यिक नाही. नवकवी तर नाहीच नाही.

त्यागाचे लक्षण सांगताना भगवान् म्हणतात – सर्व प्रकारच्या कर्मापासून जी फले निर्माण होतात त्यांचा त्याग करणे, त्या फलांच्याविषयी यत्किंचितही अपेक्षा न ठेवणे म्हणजे त्याग

वस्तुत: संन्यास आणि त्याग हे शब्द तत्त्वत: समानार्थकच आहेत. ''निश्चयं श्रुणु मे तत्र त्यागे भरतसत्तम ।'' ''नियतस्य तु संन्यास: कर्मणो नोपपद्यते । मोहात् तस्य परित्याग: तामस: परिकीर्तित: ।।'' ''अनिष्टमिष्टं मिश्रं च त्रिविध कर्मण: फलम् । भवत्यत्यागिनां प्रेत्य न तु संन्यासिनां क्वचित् ।।'' इत्यादी वचनांवरून त्याग आणि संन्यास हे शब्द तत्त्वत: समानार्थकच आहेत असे भगवंतानीही मानल्याचे दिसून येते. वेगळेपणा वाटतो तो वरवरचा आहे. कर्मेच न करणे म्हणजे संन्यास आणि केवळ फलाची अभिलाषा न ठेवणे म्हणजे त्याग असे म्हटले असते तर दोन शब्दांच्या अर्थामधे काही अंतर आहे असे मानता आले असते, पण येथे संन्यास शब्दाची व्याख्या करताना सर्व प्रकारच्या कर्मांचा त्याग सांगितला नसून केवळ काम्यकर्मांचा तेवढा त्याग सांगितला आहे.

आपण करतो त्यातील ९०-९५ टक्के खऱ्या अर्थाने काम्यकर्मेच असतात. उदात्त भावनेने, खऱ्या श्रद्धेने, कर्तव्यनिष्ठेने केल्या जाणाऱ्या कर्मांची संख्या फारच थोडी असल्याने सर्व कर्मांच्या त्यागालाही संन्यास म्हणणे शोभणारेच आहे. कर्मे तर करायची पण फलाची आकांक्षा मात्र मुळीच ठेवायची नाही ही गोष्ट अत्यंत अवघड आहे. ज्याची वृत्ती श्रेष्ठ पतिव्रतेच्या मनोवृत्तीप्रमाणे असते, त्यालाच हे शक्य आहे. पतीच्या सुखात माझे सुख अशी जिची दृढनिष्ठा असते ती पतिव्रता. माझ्या सुखाकरिता पती असे जी मानते ती जारिणी. संसार करताना पतीकडून काही सुख मिळाले तर ते पतिव्रतेला काही नको असते वा कडू लागते असे मुळीच नाही. पण सुख मिळणार असेल तरच

संसार करीन अशी कल्पनाही तिच्या मनात येत नाही. ती पतीची सर्व प्रकारे सेवा करण्यातच सुख, संतोष, समाधान मानीत असते. सद्भक्त, सच्छिष्य, स्वामीनिष्ठ सेवक यांची मनोभूमिकाही याच जातीची असते. पण असे क्वचित आढळते. इतरत्र जमवून घेणे, कुरकुरणे, आदळआपट करणे, वा अगतिक होऊन सोसणे याच वृत्तीचा प्रभाव दिसून येतो. सर्वकर्मफलत्याग किती कठीण आहे हे यावरून लक्षात येईल.

आपण करतो त्या कृत्याचे सर्वांनी निदान कौतुक तरी करावे एवढी तरी अपेक्षा कार्यकर्त्याची असतेच असते. तसे झाले नाही, पुष्कळांनी कौतुक करून दोघातिघांनी जरी दोषदृष्टीने पाहिले, अवहेलना केली तरी कार्यकर्त्याला मनस्ताप होतो. हा कार्यकर्ता तसा लोभी नसतो. त्याला खाण्या-लेण्याची, मिरविण्याची आवड नसते. अप्रामाणिकही नसतो. तरी कौतुक व्हावे ही अपेक्षा अंत:करणात कोठेतरी खोलवर दडून असतेच. तीही फलाकांक्षाच आहे. इतर फलांच्या अपेक्षेने सभ्य, सौम्य अशी वाटली तरी साधनेच्या मार्गावर वाटचाल करताना तीही अडथळाच आणते. प्रगती मंदावण्यास इतकेच नव्हे, तर खुंटविण्यासही कारणीभूत होऊ शकते.

सर्वकर्मफलत्याग असा अत्यंत अवघड असल्याने कर्मे तर करायची पण फळाची अपेक्षा मात्र ठेवायची नाही हे दु:साध्य असल्याने कर्मेच टाकावीत अशी एक विचारधारा काही लोक स्वीकारतात. तिचा उल्लेख भगवान् या त्यागाच्या संदर्भात करीत आहेत.

**त्याज्यं दोषवदित्येके कर्म प्राहुर्मनीषिण: ।**
**यज्ञदानतप: कर्म न त्याज्यमिति चापरे ।।३।।**

काही विचारवंत ''कर्म'' हे सर्वदा दोषयुक्तच असल्याने कोणतेही कर्म त्याज्यच मानावे असे म्हणतात. तर दुसरे काही कोणत्याही परिस्थितीत यज्ञ-दान आणि तप ही कर्मे त्याज्य मानू नयेत असे म्हणतात.

मनीषी म्हणजे चांगले, सज्जन, विद्वान्, स्वाभिमानी, विचारवंत असे लोक. ते म्हणतात की, कोणतेही कर्म दोषयुक्त असल्याने ते न करणे हेच चांगले. दोषावाचून कर्म घडणे कधी शक्यच नाही. गीतेनेही ''सर्वारंभा हि दोषेण धूमेनाग्निरिवावृता:'' असेच आरंभाचे म्हणजे कृतीचे वर्णन केले आहे.

कोणतेही दोष नाहीत असे जगतामध्ये काही सापडत नाही म्हणून गीतेनेही भक्त (१२/१६) आणि गुणातीत (१४/२५) या श्रेष्ठ व्यक्तींच्या वर्णनात ''सर्वारंभपरित्यागी'' असे लक्षण आवर्जून सांगितले आहे. कर्म हे दोषाने युक्त असल्याने कशाला करायचे? ते टाकूनच द्यावे! अजगरवृत्तीने राहावे असे काही लोक म्हणतात. तर काही दुसरे विचारवंत म्हणतात की कर्म तेवढे सगळे कितीही दोषयुक्त असले तरी कोणत्याही माणसाने, कोणत्याही परीस्थितीत यज्ञ, दान आणि तप या कृत्यांचा कधीही कंटाळा करता कामा नये. ही तीनही कर्मे प्रत्येकाने आचरणात आणलीच पाहिजेत.

कर्माचा पूर्णपणे त्याग करावा किंवा यज्ञ-दान-तप ही कर्मे कधी टाकू नयेत असे विद्वान म्हणविणाऱ्या व्यक्तींनीच सांगितलेले दोन पर्याय पुढे आल्यानंतर जिज्ञासूचा, साधकाचा गोंधळ उडणे अगदी स्वाभाविक आहे. आणि ज्यांची निष्ठा किंवा भावना तेवढी दृढ नाही, तितकी प्रामाणिक नाही, ते उपजतच अवगत असलेल्या सवडशास्त्राप्रमाणे स्वत:ला हवा तो सोईचा अर्थ त्यातून काढतील अशीही शक्यता आहे. तसे घडले तर ते श्रेयस्कर नाही, हितावह नाही. हे जाणून मातेच्या वात्सल्याने ज्यांचे अंत:करण भरलेले आहे, असे परमदयाळू भगवान् सर्वांच्या हितासाठी निश्चयाने निर्णय देताना म्हणतात-

**निश्चयं श्रुणु मे तत्र त्यागे भरतसत्तम ।**
**त्यागो हि पुरुषव्याघ्र त्रिविध: संप्रकीर्तित: ।।४।।**
**यज्ञदानतप: कर्म न त्याज्यं कार्यमेव तत् ।**
**यज्ञो दानं तपश्चैव पावनानि मनीषिणाम् ।।५।।**

हे भरतकुलातील श्रेष्ठ अशा वीरपुरुषा! अर्जुना! या त्यागाच्या संदर्भात तुला निश्चयाने माझा निर्णय सांगतो तो ऐक. न करणे, टाकून देणे किंवा त्याग यामागची भूमिका तीन प्रकारची असते. तरीसुद्धा यज्ञ, दान आणि तप ही कर्मे केलीच पाहिजेत, त्यांचा कधीही त्याग करता कामा नये. यज्ञ, दान आणि तप यांच्या आचरणाने विद्वान, स्वाभिमानी पुरुषही पावन होतात, पवित्र होतात.

येथे अर्जुनाला दिलेली दोन्ही विशेषणे महत्त्वाची आहेत. चांगले सांगितले तर ते पटण्यासाठी बुद्धीवर सुसंस्कार झालेले असावे लागतात.

चांगल्या कुळात हे सहजपणे घडते. नाहीतर हिताचे सांगितलेले स्वीकारतानाही बुद्धी आडदांडपणाने वागते, विकारांना विचार मानते, तर्कटे रचून विधानांना नाना प्रकारचे फाटे फोडते. कुलीनतेच्यामुळे बुद्धी शुद्ध असण्याचा संभव अधिक असतो. म्हणून भगवान् अर्जुनाला भरतसत्तम या विशेषणाने संबोधत आहेत. तसेच जे बृद्धीला पटले ते आचरणात आणण्यासाठी माणसाच्या ठिकाणी सामर्थ्य आणि निग्रहीपणा असावा लागतो. ते गुण अर्जुनाला दिलेल्या पुरुषव्याघ्र या विशेषणातून व्यक्त होतात. सांगितले तर पटते आणि पटलेले आचरणात आणले जाते, असे दिसले तरच सांगणारालाही बोलण्याचा कंटाळा येत नाही. ''अर्जुना तू परिससि । परिसोनि अनुष्ठिसी । मग आम्हासीच वानी कायसी । सांगावयाची ।।'' (ज्ञाने. ५/१६९) असे वक्त्याच्या मनोवृत्तीचे स्पष्टीकरण श्रीज्ञानोबारायांनी भगवंतांच्या मुखातून केले आहे.

यज्ञ, दान, तप या तीन प्रकारच्या कर्मांचा त्याग कधी करता येत नाही, तसा त्याग कधी करता कामा नये. या तीनही कर्मांमागच्या संकल्पना नीट समजून घेतल्या पाहिजेत. यज्ञ म्हणजे विशिष्ट पद्धतीने अग्नीमध्ये आहुतिद्रव्य टाकणे एवढाच ढोबळ अर्थ नाही. यज्ञ ही संकल्पना फार व्यापक आणि उदात्त आहे. गीतेनेच यज्ञाला कामधेनूची उपमा दिली आहे. (३/१०) आणि यज्ञ हे परब्रह्माचेही अधिष्ठान असल्याचे सांगितले आहे. (३/१५) या यज्ञाला श्रीज्ञानेश्वर महाराजांनी स्वधर्माच्या रूपात वर्णिले आहे. ''स्वधर्मु जो बाप्पा । तोचि नित्ययज्ञु जाण पा । म्हणौनि वर्तता तेथ पापा । संचारु नाही ।।'' (ज्ञाने.३/८१) गीतेच्या चौथ्या अध्यायात तर द्रव्ययज्ञ, तपोयज्ञ, योगयज्ञ, स्वाध्याययज्ञ, ज्ञानयज्ञ, उग्रव्रतरूपी यज्ञ अशा अनेक प्रकारच्या यज्ञांचे वर्णन आले आहे. (४/२८) दहाव्या अध्यायात सर्वजनसुलभ असा जपयज्ञही सांगितला आहे. (१०/२५) एवंच, भावना प्रामाणिक असेल तर सर्वांची सोय होईल, असे औदार्य या यज्ञकल्पनेत आहे.

खरोखरीच भारतीय संस्कृतीइतकी सर्वसमावेशक आणि उदार अशी संस्कृती जगाच्या पाठीवर दुसरी नाही. तिने सगळ्यांची सोय पाहिली आहे. शक्यतेप्रमाणे सर्व उपलब्ध करून दिले आहे, की ज्यामुळे साधकाला कोणतीही अडचण उरू नये. ग्राहकांच्या सोयीसाठी जणू अनंत वस्तूंचे भांडार उघडले आहे. योग्य भाव द्यावा आणि पाहिजे ते घ्यावे. अमुक एका प्रकारानेच

यज्ञ केला पाहिजे असा कर्मठपणा कोठेही नाही. यज्ञाचा प्रकार निवडण्याचे स्वातंत्र्य आहे आणि सर्व प्रकार सारखेच श्रेयस्कर आहेत. प्रकार निवडताना मोकळिक असली तरी स्वीकारलेल्या यज्ञप्रकाराचे अनुष्ठान मात्र शास्त्राची मर्यादा राखूनच केले पाहिजे, अन्यथा ते कृत्य आसुरी ठरेल. (गीता ६/१७) किंवा या यज्ञकर्मामागे काही श्रद्धा असेलच तर ती तामस असेल. काहीही असले तरी ते अनिष्टच!

यज्ञ म्हणून स्वधर्मालाही मान्यता असल्यानंतर कोणालाही अवघड वाटण्याचे कारण नाही. कारण केवळ स्वधर्माचरणानेही मनुष्याला सर्व प्रकारचे कल्याण साधून देणे सहज शक्य आहे. मग इतर काही करण्याची आवश्यकता नाही. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात ''तुम्ही व्रते नियमु न करावे । शरीराते न पीडावे । दुऱ्ही केही न वचावे । तीर्थासी गा ।। योगादिके साधने । साकांक्ष आराधने । मंत्र यंत्र विधाने । झणी करा ।। देवतांतरा न भजावे । हे सर्वथा काही न करावे । तुम्ही स्वधर्मयज्ञी यजावे । अनायासे ।।'' (ज्ञाने. ३/८९ ते ९१). मात्र हे स्वधर्माचरण कसे असावे, कोणत्या योग्यतेचे असावे ते सांगताना श्रीज्ञानोबाराय लिहितात ''अहेतुके चित्ते । अनुष्ठा पा ययाते । पतिव्रता पतीते । जियापरी ।।'' (ज्ञाने. ३/९२). तेव्हा वर्णाश्रमाप्रमाणे आलेला, आवडीने स्वीकारलेला वा परिस्थितीवशात् पत्करलेला कोणताहि उद्योग-व्यवसाय हा स्वधर्म होऊ शकतो आणि त्याचे स्वरूप जितके निरूपद्रवी, जितके प्रामाणिक, त्यामागचा हेतू वा उद्देश जितका उदात्त त्याप्रमाणात उद्योगव्यवसायरूपी हा स्वधर्मच यज्ञाच्या श्रेष्ठ पातळीपर्यंत पोचू शकतो. माणसाचे कोणतेही सत्कर्म यज्ञ होऊ शकते. तेव्हा अशा यज्ञाचा कधी त्याग करू नये असे भगवंत सांगतात.

दुसरे महत्त्वाचे कर्म दान. दान म्हणजे आपल्या अधिकाराचे आपल्याजवळ जे आहे ते आपण होऊन चांगल्या कामाकरिता, चांगल्या भावनेने दुसऱ्याला देणे. ही दाने अनेक प्रकारची संभवतात. वैयक्तिक अनुकूलता आणि भोवतीची परिस्थिती यांना अनुसरून या दानाचे स्वरूप विविध प्रकारचे असू शकते, होऊ शकते. आपल्याकडे गृहस्थाला जे पूर्त म्हणून सांगितलेले आहे, ते दानाचेच एक प्रकारे सामाजिक स्वरूप आहे. भुकेल्याला अन्न देणे, दीनाला वस्त्र वा निवारा देणे, रुग्णालये चालविणे, विद्यालयांची स्थापना करणे, झाडे लावणे, विहिरी खोदणे इत्यादी गोष्टी पूर्तात समाविष्ट होतात. आजच्या भाषेत ही मोठी

समाजकार्ये आहेत.

मनुष्य आपल्या श्रमाने, बुद्धिमत्तेने, कौशल्याने संपत्ती मिळवतो, आवश्यकतेपोटी तिचा संग्रहही करतो, पण ती केवळ माझ्या एकट्याच्या फार तर माझ्या कुटुंबाच्या उपभोगासाठी आहे, असे मानून खरेच तसा वागत असेल, तर त्याचे ते उपभोगणे पापरूप आहे, मृत्युरूप आहे, असे शास्त्र म्हणते. मी माझ्या कष्टाने मिळविले असले तरी त्यावर सगळ्या समाजाचा, राष्ट्राचा एवढेच नव्हे, तर जीवमात्राचा अधिकार आहे याची जाणीव प्रत्येकाने ठेवली पाहिजे. दान देणे हा मनुष्याचा धर्म आहे, ते त्याचे कर्तव्य आहे, हे कुणीही विसरता कामा नये. परंतु येथेही लोक नाना प्रकाराने लबाडीने वागतात.

एका याचकाने एका धनिकाकडे सहाय्य मागितले. त्याने पाच रुपये उचलून दिले. याचक म्हणाला – अहो, तुम्ही लक्षाधीश! आणि पाचच रुपये काय देता? आपण दोघे एकाच परमेश्वराची लेकरे म्हणजे भाऊ भाऊ आहोत. भावाभावाच्या वाटणीप्रमाणे जे योग्य ते मला द्याल की नाही? श्रीमंत मोठा चतुर. तो हसला आणि म्हणाला – ठीक आहे. आण ते पाच रुपये परत. याचकाला वाटले, आपल्या बोलण्यामुळे प्रभावित होऊन हा आता बरेच अधिक द्रव्य देईल. त्याने मोठ्या आशेने पाच रुपये परत केले. ते घेऊन श्रीमंत आत गेला आणि परत येऊन त्याने एक पैसा याचकाच्या हातावर टिकवला, याचकाला आश्चर्य वाटले. तो खिन्न झाला आणि रागावलाही आणि म्हणाला – मघाशी सहज म्हणून पाच रुपये दिलेत. आणि आता लक्षाधीश असून वाटणी म्हणून एक नया पैसा देता? श्रीमंत शांतपणे म्हणाला – परमेश्वराची लेकरे म्हणून भाऊ भाऊ समजायला आपण दोघे थोडेच आहोत? सगळी माणसे परमेश्वराचीच लेकरे आहेत. त्यामुळे ते माझे भाऊच आहेत. जगाचा विचार सोडून आपले राष्ट्र हिंदुस्थान विचारात घेतले तरी त्याची लोकसंख्या सत्तर कोटीच्या आसपास आहे. त्या सगळ्यांना माझे लाख रुपये वाटणी म्हणून द्यायचे तर तुला एक नया पैसा दिला तो सुद्धा पुष्कळच असे समजून चालू लाग. दोघेही लबाड. गाठ पडली ठका ठका तसे हे झाले. दानाच्या संबंधात उभयपक्षी अशी लबाडी असता कामा नये. देणाराने आपल्या सामर्थ्यानुरूप दिले पाहिजे आणि घेणाराने मिळेल त्यात संतोष मानला पाहिजे. निदान

देणाऱ्याने तरी हा विचार आवर्जून केला पाहिजे. देताना देश-काल-पात्राचा विचार करावा, ते करणे योग्यच आहे. पण जे द्यायचे ते आपल्या संपत्तीच्या प्रमाणात सुसंगत असले पाहिजे. दानाचा मोठा आकडा, देणाऱ्याच्या संपत्तीचा विचार करता अगदी लहानही असू शकतो, तर एखाद्या सामान्य व्यक्तीने दिलेला रुपया-दोन रुपयेही लाख मोलाचे असू शकतात. दान देताना हा विचार केला पाहिजे. कारण दान हे माणसाचे एक आवश्यक कर्म आहे. उपनिषदातून या दानाची महती नाना प्रकाराने गायिलेली आहे.

दात्याची - दान देणाऱ्या व्यक्तीची - परिस्थिती कशीही असली तरी द्यायचे दान कसे, केवढे असते ते श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी एके ठिकाणी अत्यंत मार्मिकपणे उल्लेखिले आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात - ''घरी दिसे सांकड । देहीचि आयती रोड । परी दानी जया होड । सुरतरुसी ।।''(ज्ञाने.१३/२१०) ''अंगभोगाकडे । पाहता कृपणु आवडे । एरवी धर्माविषयी थोडे । बहु न म्हणे ।।'' (ज्ञाने. १३/२०९) त्या व्यक्तीच्या घरातील परिस्थिती पाहिली तर ओढगस्तीची दिसते, घरात आवश्यक त्या वस्तूचीही टंचाई आहे असे जाणवते, शरीरकाठीही काटकुळीच असते, पण दान देताना मात्र तो जणू कल्पवृक्षाशी स्पर्धा करीत आहे असे वाटते. स्वतःच्या उपभोगाच्या संदर्भात पाहता तो कृपण असावा असे वाटते, पण धार्मिक गोष्टीत द्रव्य वेचताना तो थोडीही काटकसर करीत नाही. पण तो आपले हे दातृत्व प्रगटमात्र करीत नाही. म्हणजे दानशूरता मिरवीत नाही. दानाच्या संबंधात हे सर्व नीटपणे विचारात घेतले पाहिजे.

ध्येयाच्या सिद्धीसाठी, कर्तव्याच्या पूर्तीसाठी वा कल्याणाच्या प्राप्तीसाठी अशा चांगल्या कामासाठी कराव्या लागणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या कष्टांना समाधानाने तत्पर असणे म्हणजे तप.

शरीराचे, मनाचे, वाचेचे, असे हे कष्ट आपण नित्याच्या व्यवहारातही अनेक प्रकाराने सोसत असतो. अगतिकपणे सोसत असतो. पण ते कष्ट तपाच्या योग्यतेवर चढत नाहीत कारण त्यात सर्व वेळी आदर्श ध्येयवाद असा बहुधा नसतो. उदात्त ध्येयवादाने प्रेरित होऊन करायचे कोणतेही काम करीत असताना स्वसुखाचा विचार न करणे, उत्पन्न होणाऱ्या अडचणींना वा विरोधांना निर्भयपणे तोंड देणे, सुखासीनता सोडणे ही सर्व तपाचीच लक्षणे आहेत. ऋषीमुनींनी

आत्मप्राप्तीसाठी आणि देवांनी वा असुरांनी इच्छितवरांच्या प्राप्तीसाठी उग्र तपश्चर्या केल्याच्या कथा आपण पुराणातून ऐकतो. धर्मशास्त्रातूनही काही व्रते उल्लेखिली आहेत. ती तपाच्या स्वरूपाचीही असतात. शरीराला, मनाला चांगले वळण लावण्यासाठी उण्या-अधिक प्रमाणात प्रत्येक पातळीवर तपाचा विचार करावाच लागतो. स्वातंत्र्यप्राप्तीच्या प्रयत्नात देशभक्तांनी सोसलेले भयंकर कारावास हे अलीकडच्या काळातील उग्र तपाचरण म्हणून ओळखता येतील. सृष्टीचे गूढ उकलण्यासाठी प्रयत्नशील असलेला संशोधक, शास्त्रज्ञ हाही एक प्रकारे तपच करत असतो. निष्ठावंत सेवकाची स्वामीसेवा हीही तपाचे स्वरूप घेऊ शकते.

अशा रीतीने यज्ञ-दान-तप या तीनही सत्कर्मांचा मानवी जीवनाशी नित्याचा संबंध आहे; तो तसा असला, ठेवला तरच मानवी जीवनाला यथार्थता प्राप्त होईल. तसे नसेल तर ते जीवन पशूचे वा त्याहीपेक्षा नीच प्रकारचे ठरेल. यामुळेच यज्ञ-दान-तपानी जीवन पवित्र होते असे भगवंताने म्हटले आहे. आणि त्यामुळेच यज्ञ-दान-तपाचा त्याग कुणीही कोणत्याही प्रकाराने करू नये असे आवर्जून सांगितले आहे.

यज्ञ, दान, तप ही तीनही कर्मे अगदी वेगवेगळी आहेत असे म्हणता येणार नाही. ती बरीचशी परस्परावलंबी आहेत. कोणत्याही एकाबरोबर उरलेली दोन यावयाचीच. म्हणूनही त्यांचा उल्लेख संयुक्तपणे केला जातो आणि या यज्ञ-दान-तपाच्या स्वीकारामुळे स्वभावत:च शरीराची वा अंत:करणाची शुद्धताही साधली जाते, राखली जाते. आपण ज्या जगात जगतो तेथे शरीराला वा अंत:करणाला मलीनता येणे स्वाभाविक आहे. ते मालिन्य दूर करण्यासाठी मात्र प्रयत्नशील असावे लागते. यज्ञ-दान-तप ही त्याची साधने आहेत. घर कितीही चांगले बांधलेले असले तरी तेथे केर-कचरा गोळा होतो. निदान धूळ तरी साचतेच. घराची स्वच्छता प्रयत्नपूर्वक ठेवावी लागते. त्यासाठी नित्य दक्ष असावे लागते. हात त्यासाठी तत्पर असावे लागतात. यज्ञ-दान-तपाच्या संदर्भात तसेच समजले पाहिजे. थोर-पुरुष कितीही श्रेष्ठ असले तरी शरीर धारण करीत असतात तोवर उपासना सोडीत नाहीत. मी पूर्ण झालो असे सहसा म्हणत नाहीत. कारण पूर्ण झालो असे वाटण्यातच अपूर्णता आहे असे शास्त्र सांगते. त्यामुळे थोर व्यक्ती अधिकारी असूनही यज्ञ-दान-तप आचरीत

असतात. तेव्हा सामान्यांनी त्यांचा त्याग करणे उचित नाही हे उघडच आहे. यज्ञ-दान-तपाचा स्वीकार करीत असताना मात्र मनुष्याने एक महत्त्वाची दक्षता घेतलीच पाहिजे. तिचाच उल्लेख भगवान् पुढील श्लोकात करीत आहेत.

**एतान्यपि तु कर्माणि सङ्गं त्यक्त्वा फलानि च ।**
**कर्तव्यानीति मे पार्थ निश्चितं मतमुत्तमम् ।।६।।**

हे अर्जुना! ही कर्मे सुद्धा आसक्ती आणि फलप्राप्तीची अपेक्षा यांचा त्याग करून (कर्तव्य भावनेने) करावीत असे माझे निश्चित मत आहे. आणि हाच विचार उत्तम आहे. (यात शंका नाही).

यज्ञ, दान, तप ही कर्मे करावी लागतात. कोणत्या ना कोणत्या स्वरूपात उण्या-अधिक प्रमाणात केलीही जातात, पण या कर्मांना त्यांचा खरा अर्थ कशाने प्राप्त होतो? ती कशाच्या योगाने श्रेष्ठ ठरतात? कोणत्या भूमिकेमुळे या कर्मांना उत्तमत्व प्राप्त होते, ते भगवंत प्रगट करीत आहेत. यज्ञ-दान-तप ही कर्मेसुद्धा आसक्तीने करू नयेत. त्यातून काही फल मिळावे, काही लाभ व्हावा अशी अपेक्षा ठेवू नये.

सत्कर्मेसुद्धा छांदिष्टपणाने करू नयेत. स्वच्छता असणे चांगले, स्वच्छता ठेवावी हे खरे, पण त्याचे वेड असणे हे काही चांगले नाही. स्वच्छता, नीटनेटकेपणा, टापटीप, याविषयी दक्षता असणे भूषणावहच आहे, पण अंगणही बैठकी-इतकेच स्वच्छ असणे आवश्यक मानणे योग्य आहे काय, याचा विचार करावाच लागेल. काही लोकांना अंथरुणावर घालायची चादरही प्रतिदिनी इस्त्री केलेली, परीटघडीचीच पाहिजे असते. अंगावरच्या कपड्यांना निदान बाहेर जाताना तरी इस्त्री पाहिजे असे म्हणणे ठीक आहे. पण चादरीला इस्त्री कशाकरिता? आणि अशी इस्त्री नसेल तर ती मंडळी अस्वस्थ होतात. लेकुरवाळ्या गृहिणीची वस्त्रे किती स्वच्छ आणि नीटनेटकी राहू शकतील? क्वचित् ती अस्वच्छ असणे हेही भूषणास्पद ठरू शकते, ''धन्यास्तदङ्गरजसा मलिनी भवन्ति ।'' आई बाहेर निघालेली पाहून अंगणात खेळत असलेले तीन-चार वर्षांचे तिचे लेकरू मलाही ने म्हणून तिला एकदम बिलगले आणि इस्त्रीची पांढरी साडी मळली-चुरगळली म्हणून त्या माऊलीने त्या इवल्याशा पोराला त्याने कळवळून आक्रोश करावा इतके बडवले. स्वच्छतेविषयीची

आसक्ती कोणत्या थराला नेते याचे हे मी स्वतः पाहिलेले उदाहरण आहे. काही कर्मठ माणसे अशी असतात. त्यांचे व्रत-नियम इतरांना उच्छाद वाटेल इतक्या दुराग्रहाचे असतात. खाण्यासाठी हातसडीचे तांदूळ आणि गाईचे तूपच पाहिजे असा आग्रह असणाऱ्या एका आचार्याची टवाळी एका नाटककाराने आपल्या नाटकात केली आहे.

सत्कर्माचाही दुराग्रह नसावा. असंच पाहिजे, इतकंच पाहिजे या आग्रहालाही मर्यादा असावी. मीच करीन, मी केले तरच होईल असा अहंकारही सत्कर्माच्या मुळाशी नसावा. सेवकाने सेवेसाठी सर्वदा सिद्ध असावे, पण सेवा ही लादायची नसते हे लक्षात ठेवलेच पाहिजे, नाहीतर तो उद्धटपणा ठरेल. ज्यांच्याजवळ यज्ञ-दान-तप ही कर्मे आवडीने करण्याची वृत्ती आहे, तशी अनुकूल परिस्थितीही आहे, त्यांनी आपल्या आचरणाने इतर कोणाला त्याचा उच्छाद होणार नाही आणि ती कामे आपल्या शक्तीबाहेरची ठरणार नाहीत एवढी दक्षता घेतलीच पाहिजे.

श्रीमत् भागवताने ''न तद्दानं प्रशंसन्ति येन वृतिर्विपद्यते ।'' असेही एक विधान दानाच्या संदर्भात केले आहे. माणसाचे जीवनच दुर्धर व्हावे, दुःसह व्हावे अशी परिस्थिती दानातून होता कामा नये. ज्या दानामुळे बायका-मुले उपाशी मरायची त्या दानाचे काय कौतुक? कारण हे परिणाम दानाच्या आसक्तीचे आहेत. अत्यंत उदात्त आचरणामुळे येणारी आपत्ती वरवर सारखी दिसली तरी त्या दोन्हींचे मूल्य सारखे नाही, एक नाही. ''दोन्ही दिसती सारखी, वर्म जाणे तो पारखी ।।''

लोकांना कीव येऊन त्यांनी अधिक भीक घालावी म्हणून हात-पाय वाळवून घेणारे भिकारी असतात. ते अगदी हाडकुळे दिसतात. अगदी अस्थिपंजर होतात.

भगवान् शंकराच्या प्राप्तीसाठी उग्र तपश्चर्या करणाऱ्या पार्वतीने सामान्य आहार तर सोडाच पण झाडावरून आपोआप गळून पडलेली पाने खाऊन कशीबशी देहधारणा करण्याचेही टाकले. त्यामुळे ती सख्यांनी कळवळावे इतकी कृश झाली.

आता त्या लोभी भिकाऱ्याची कृशता आणि निष्ठावंत तपस्विनी असलेल्या पार्वतीची कृशता, कृशता म्हणून सारखीच दिसली तरी त्यांची योग्यता कुणी

एका मापाने मोजील काय? भिकाऱ्याची कृशता आसक्तीतून निर्माण झालेली आहे, तर देवी पार्वतीची कृशता ही तिच्या अंत:करणातील उदात्ततेचा वंदनीय आविष्कार आहे. हात-पाय बारीक आणि निरुपयोगी होण्यासाठी भिकाऱ्यानेही काही कमी त्रास, कमी वेदना सहन केलेल्या नसतात, त्यालाही वरवरच्या अर्थाने एक प्रकारे तपच म्हणता येईल. पण हे तप गीतेच्या १७व्या अध्यायात सांगितल्याप्रमाणे आसुरी किंवा तामस आहे. (गी.१७/५, ६, १९)

युधिष्ठिराला आपल्या सत्यवादित्वाचा मोठा अभिमान होता. द्रोणवधाचे वेळी या खरे बोलण्याविषयीच्या आसक्तीच्या संदर्भातच श्रीकृष्णाने त्याला फटकारले आहे. कृष्ण युधिष्ठिराला म्हणाले-

*''सत्य बोलणे हा मम बाणा । या गर्वे नाशिसी प्रजांना ।*
*कीर्ती व्हावी स्वार्थ न का हा । युधिष्ठिरा त्यज या दुर्मोहा ।।''*

द्रोण अन्यायाने लढतो आहे. अधर्माने अस्त्रांचा दुरुपयोग करतो आहे. तुझ्या सैन्याचा सर्वनाश होण्याची वेळ ओढवली आहे, तेव्हा द्रोणाचे बळ नाहीसे करणे आवश्यक आहे. त्यासाठी त्याला ''अश्वत्थामा मेला'' म्हणून सांग. सत्यवादित्वाच्या उन्मादात ते सांगणे टाळू नकोस. युधिष्ठिराने या प्रसंगी कृष्णाचे ऐकले. निरुपायाने ऐकले. आणि सत्यवादित्वाच्या आसक्तीने ''नरो वा कुंजरो वा'' म्हणण्याचे सवडशास्त्र शोधले. त्याचा अधर चालणारा रथ या आत्मवंचनेमुळे पृथ्वीवर टेकला. महाभारताच्या वादिराज नावाच्या टीकाकाराने हे स्पष्ट केले आहे. ''कृष्णवाक्ये अश्रद्धाकरणं व्याज:'' कृष्णाचे सांगणे जसेच्या तसे न ऐकता युधिष्ठिराने आपल्या कल्पनेने सत्यरक्षणासाठी दोन्ही डगरींवर हात ठेवण्याचा हा प्रयत्न केला. त्यामुळे त्याला दोष लागला. आसक्ती काय घडविते त्याचे हे उदाहरण लक्षात ठेवण्यासारखे आहे. कोणत्याही गोष्टीची आसक्ती काय कामाची? चांगले असले म्हणून काय झाले? चांगल्याचीही आसक्ती असता कामा नये. दूध हे पूर्णान्न आहे. पृथ्वीवरचे ते अमृतच आहे. पण त्याचेही अजीर्ण होता कामा नये. आसक्ती का नसावी त्याकरता मी हे सांगत आहे.

आसक्तीच्या मुळाशी सुद्धा कोणत्या ना कोणत्या स्वरूपाची फल लाभण्याची आकांक्षा असतेच. म्हणून फलाकांक्षा सोडली तर आसक्ती सुटण्यासही सहाय्य होते. दोन्ही परस्परावलंबी आहेत. म्हणून दोन्हींचा त्याग

करणे अपरिहार्य आहे. आसक्तीमुळे फलाकांक्षा राहते, तर फलाकांक्षेमुळे आसक्ती वाढते. त्यामुळे यज्ञादी सत्कर्माच्या चांगुलपणाला, श्रेष्ठतेला बाध येतो. यज्ञादी कर्मे केवळ कर्तव्यभावनेने करावीत. आणि कर्तव्य हे कधी सुटत नाही, कधी सोडू नये. म्हणून भगवान् म्हणतात–

**नियतस्य तु संन्यास: कर्मणो नोपपद्यते ।**
**मोहात्तस्य परित्यागस्तामस: परिकीर्तित: ।।७।।**

जी कर्मे नियत म्हणून सांगितली आहेत, विहित आहेत, केलीच पाहिजेत अशा स्वरूपाची आहेत, त्यांचा त्याग करणे केव्हाही योग्य नसते. कोणत्यातरी मोहाने अशी नियत (विहित) कर्मे टाकणे हे तामस गुणाचे लक्षण आहे. या स्वरूपाच्या त्यागाला तामसत्याग म्हणतात.

त्याग करणे, टाकणे हे तीन प्रकारचे असते. त्यातील तामस स्वरूपाच्या त्यागाचे वर्णन भगवंत येथे करीत आहेत. माणसे काम करायचे सोडतात, जे करावयास पाहिजे ते करीत नाहीत; यामागे बहुधा कोणत्या ना कोणत्या स्वरूपाचा मोह असतो. मग जे नियत कर्म आहे, ते माणसामाणसागणिक वा माणसांच्या लहान-मोठ्या गटाप्रमाणे वेगवेगळे असू शकते. तसेच त्यात परिस्थितिभेदाने उणे-अधिक अंतरही राहू शकते. नियत कर्म ठरण्यामागेही विविध प्रकारची कारणे असू शकतात. शास्त्राने, धर्माने, कुलपरंपरेने, देशभेदाने, रूढीने, आवडीने, प्रकृती-प्रवृत्तीप्रमाणे किंवा परिस्थितीने कर्मांना नियतता येत असते. कर्तव्याचे स्वरूप प्राप्त होत असते. कर्मे नियत होण्यामागे, निश्चित ठरण्यामागे धर्मशास्त्राचे प्रामाण्य सध्या फारसे उरलेले नाही. हिताच्या आणि आवश्यक असलेल्या शास्त्रीय परंपराही आज खंडित झाल्या आहेत. वर्णाश्रमधर्माप्रमाणे, शास्त्रोक्त स्वधर्माप्रमाणे जे नियत असावयास हवे ते तसे राहिलेले नाही. शास्त्रोक्त स्वधर्माचरण आचरणात आणले तर उत्तमच; त्यामुळे अनेक प्रश्न सहजपणाने सुटतील, पण दुर्दैवाने तसे राहिले नसले तरी आहे त्या देशकालपरिस्थितीत शास्त्रसंतोष राखून नियतकर्माचे आचरण करणे शक्य आहे.

माणसाला जगण्यासाठी म्हणून नाना प्रकारचे उद्योग करावे लागतात. फार फार पूर्वी ते वर्णधर्माप्रमाणे होते. आज कोणीही काहीही उद्योग करतो. ठीक

आहे. पण जो उद्योग करतो त्यासंबंधीचे नीतिनियम तो योग्य रीतीने पाळतो की नाही हे विचारात घेणे म्हणजेच नियतकर्माचा त्याग न करणे आहे. शेती-व्यापार-चाकरी, निर्माणी (कारखाने) चालवणे, ललित कलांतील कौशल्य, वाङ्मयनिर्मिती, समाजसेवेची कामे, वैद्यकी, शिल्प यांसारखे व्यवसाय, पुढारीपणा अशा अनेक प्रकारच्या उद्योगांत माणसे गढलेली आहेत. स्त्रियाही आता केवळ गृहिणी राहू इच्छित नाहीत.

वर्णधर्म जसे मोडकळीला आले आहेत, तशी आश्रमव्यवस्थाही विस्कळित झालेली आहे. वानप्रस्थ आणि संन्यास यांना केव्हाच संन्यास मिळालेला आहे! ब्रह्मचर्य आणि गृहस्थ हे दोन आश्रम टिकून आहेत. पण त्यांचे स्वरूप योग्य त्या पातळीवर राहिलेले नाही. लग्न होईपर्यंत ब्रह्मचर्य आणि लग्न झाले की गृहस्थ एवढेच या आश्रमाचे स्वरूप राहिले आहे. ब्रह्मचर्याश्रमाचे नियम होते. आजचे विद्यार्थी-जीवन त्यापासून फार दूर गेले आहे. पत्नी आहे, मुलेबाळे आहेत, घरात राहतो म्हणूनच केवळ गृहस्थ म्हणायचे, पण ज्याच्यामुळे घराला घरपणा येतो, गृहस्थ गृहस्थ ठरतो ते काही फारसे उरलेले नाही. गृहस्थाच्या घरात देवकार्ये, पितृकार्ये, विद्वानांची-गुरुजनांची पूजा, अतिथिसत्कार अशी कृत्ये वरचेवर घडली पाहिजेत. पतिपत्नीमधे सामंजस्य पाहिजे. मुले खेळकर, निरोगी आणि मोठी असतील, तर विनीत पाहिजेत. पण असे किती ठिकाणी आढळते?

तेव्हा आता आदर्शांकडे जाण्यात प्रयत्नशील राहून जे देशकालपरिस्थितीने वाट्यास आले आहे, तत्संबंधीची कर्तव्ये प्रामाणिकपणे पार पाडली पाहिजेत. तुम्ही जो व्यवसाय करीत असाल तो दक्षतेने, प्रामाणिकपणे केला पाहिजे. त्या त्या व्यवसायाचे ज्ञान अद्ययावत् असले पाहिजे, आणि कौशल्यही इतरांनी वाखाणावे अशा योग्यतेचे दिसले पाहिजे. आळस दूर ठेवला, प्रयत्नाची कास सोडली नाही, कष्टाला कंटाळले नाही, सदा सावध राहिले, धोरण नीट राखले म्हणजे उद्योग-व्यवसाय चांगला केला, कर्तव्यबुध्दीने केला असे म्हणता येईल. स्वाध्याय हे मनुष्यमात्राचे कर्तव्य आहे, संबंधित व्यवसायातील नित्य नवे ज्ञान त्याने अभ्यासपूर्वक मिळवले पाहिजे. पण फार थोडे हे लक्षात घेतात. इतर कसेतरी धकवून नेतात. इतरांचे तर राहू द्या, पण कीर्तने-प्रवचने करणारे वा शिक्षक-प्राध्यापकही बहुधा स्वाध्यायशून्य झालेले आहेत. ''कधी एकदा

वाचियले ते पुन: पुन्हा चघळित राही'' अशी त्यांची स्थिती झालेली आहे. हा नियत कर्मांचा त्यागच आहे.

स्वयंपाक करण्याचे वाट्यास आल्यावर तो वेळेवर केला पाहिजे आणि तो हितकर-रुचकर असला पाहिजे, हे पाहावयास नको का? खा मेल्यांनो! असे प्रगट वा मनात म्हणून स्वयंपाक कसातरी केला आणि अन्न जेवणारापुढे आदळले तर जे नियत तेच चुकले असेच म्हणावे लागेल. लग्न केले, आता बायकोला सांभाळलेच पाहिजे. तिला संतुष्ट ठेवले पाहिजे. ती राहील की नाही हे तिच्या स्वभावावर अवलंबून राहील. पण नवऱ्याने तसा विवेकपूर्ण प्रयत्न करणे आवश्यक आहे. तुम्ही एकदा नोकरी पत्करलीत की मग वेळेवर उपस्थित राहणे, काम पूर्ण वेळ आणि मन लावून करणे, नम्रतेने वागणे या गोष्टी अपरिहार्य समजल्या पाहिजेत. जे काही काम करता ते उत्कृष्टपणाच्या कसोटीला उतरले पाहिजे. ''योग: कर्मसु कौशलम'' या व्याख्येप्रमाणे योग्य रीतीने केलेले नियतकर्मही योगसाधना ठरू शकते. कोकणात एका सुगृहिणीचे सारवणे मी पाहिले आहे. ते सारवणेही रांगोळीसारखे रम्याकृतीचे सुरेख होते.

मी जीवनापुरते पाहतो. वेदान्ताच्या शास्त्रप्रक्रिया वा सिद्धांताच्या वरच्या गोष्टी मलाच कळत नाहीत, तर मी तुम्हांस काय सांगणार? पण ज्या व्यवहारात आपण नांदतो, जे जीवन आपण जगतो, तेथे कुशल आणि प्रामाणिक असणे हे कर्तव्य आहे; तीही साधना आहे. व्यापारी आहे, तो व्यापारात-मालात फसवीत नाही, भाव योग्यतो सांगतो. शिक्षक आहे, तो विषयांचा नीट अभ्यास करून चांगले शिकवितो. जोवर मला जगायचे आहे तोवर माझे आरोग्य चांगले राहील, या दृष्टीने तो स्वत:चे आहार-विहार सांभाळतो; देवाधर्माची उपेक्षा करीत नाही. हे सर्व नियत कर्मच आहे. मुलेबाळे लहान आहेत तेव्हा बापाने त्यांचे पोषण, रक्षण, शिक्षण योग्य रीतीने होईल अशी दक्षता घेतलीच पाहिजे. पण ती शिकली, मोठी झाली, मिळवतीही झाली, आता पितृत्वाचा तोरा न मिरविता त्यांना मित्र म्हणून वागवले पाहिजे. असे नसणे हा नियताचा त्यागच आहे.

आपण नीट विचार करीत नाही, विवेक करीत नाही. आसक्ती आपल्या मनातून जात नाही. म्हणून वस्तुत: साधे सरळ असलेले नियतकर्म घोटाळ्याचे, गुंतागुंतीचे वाटते. प्रवृत्ती ही जशी नियत असते तशी निवृत्तीही नियतच असते.

गृहस्थाश्रम जितका स्वाभाविक आणि नियत आहे, तितकाच त्यानंतरचा वानप्रस्थ आणि संन्यासही नियत मानला पाहिजे. परिस्थितिवशात् प्रत्यक्ष संन्यास दीक्षा घ्या वा घेऊ नका, पण त्या प्रकारची वृत्ती, अंत:करणाची धारणा ठेवली नाही, तर नाना प्रकारच्या दु:खाला वा मानहानीला तोंड द्यावे लागेल. तात्पर्य, जे नियत त्याचा त्याग करता येत नाही. तसे केले तर ते घातक ठरते.

हे जे नियत आहे ते प्रत्येक वेळी स्वत:च्या इच्छेनेच ठरते असे मात्र नाही. अगदी सध्याच्या परिस्थितीतही नियत काय ते ठरविण्याचे स्वातंत्र्य माणसाला पुरेसे आहे असे म्हणता येणार नाही. आपण आपला शिक्षणक्रम, उद्योगधंदा वा जीवनसाथी आपल्या इच्छेने आपल्याला पाहिजे तसा निवडू शकत नाही. यातील जो वाट्याला येईल तोच स्वीकारावा लागतो. आणि मग अभ्यास करणे, नीतिमर्यादा सांभाळणे आणि एकनिष्ठ राहणे हे संभाळावेच लागते. दुसरी गती असत नाही. हे जसे, तसेच ज्या बापाच्या पोटी तुम्ही जन्माला आलात, ज्या कुळात तुम्ही जन्माला आलात, ज्या धर्मात, ज्या देशात तुमचा जन्म झाला त्यानेही तुमचे नियत कर्म ठरत असते. या संदर्भात एक आक्षेप उपस्थित होणे शक्य आहे. तसा तो एका सन्माननीय व्यक्तीने उपस्थित केलाही आहे. मुसलमानांचे तुष्टीकरण करण्याकरिता गांधीजींसारख्या थोर व्यक्तीने त्याचा लाभ घेतलाही आहे. १९२१ च्या आगेमागे झालेल्या मोपल्यांच्या बंडात मोपला मुसलमानांनी हिंदूंच्यावर अनन्वित असे क्रूर अत्याचार केले. सहस्रावधी हिंदूंना बळाने बाटविण्यात आले. स्त्रियांवर बलात्कार झाले. बालकांची हत्या झाली. हिंदूंच्या प्रेतांनी विहिरी भरून गेल्या. पण हे इतके सर्व होऊनही गांधीजींनी मोपल्यांना दोष दिला नाही. उलट त्यांना 'धर्मभीरूवीर' म्हणून संबोधिले. 'ते आपल्या धर्माच्या आदेशाचे पालन करीत आहेत.' असेही अहिंसेचा पराकाष्ठेचा आग्रह धरणाऱ्या या नेत्याने म्हटले. रावणानेही म्हटले होते म्हणे, की ''राक्षसाणां अयं धर्म: परदाराभिमर्षणम्'' पण हे रामचंद्रासमोर म्हणाला असता तर रामचंद्र निश्चितच म्हणाले असते की, ''तदाऽस्माकं भवेद्धर्म: रक्षकुल विनाशनम् ।।'' आणि या धर्माचे पालन त्यांनी कृतीनेच केले.'

नियतकर्म म्हणजे आपल्या इच्छेने हवा तसा वागेन म्हणणे हे स्वातंत्र्याचा

दुरुपयोग करणे आहे. स्वीकारलेल्या वा स्वीकाराव्या लागलेल्या प्रत्येक कर्तव्यात काही भाग अनुकूल आणि प्रतिकूल, सुखावह वा दुःखदायक, प्रिय किंवा अप्रिय असा असतोच. पण तरी ते सगळे निभावून न्यावे लागते. मग जे कर्तव्य म्हणून ठरले, तेही सोय व अडचण यांचा विचार न करता पार पाडण्यास शिकलेच पाहिजे. जे कर्तव्य ते टाळण्यात कोठेतरी स्वार्थ असतो, अहंकार असतो, अज्ञान असते. जे आवडीचे आहे ते करताना माणसाला कंटाळा येत नाही. कष्ट वाटत नाहीत. मुलांना खेळण्याचा कंटाळा येत नाही, पण अभ्यास नको वाटतो. गप्पा मारताना, पत्ते, बुद्धिबळ-सोंगट्या खेळताना किती वेळ वाया जातो त्याचे भान नसते. पण गीतारहस्यासारखा ग्रंथ तास-अर्धातासही वाचवत नाही.

''स्नानसंध्या ध्यानधारणा ईशभक्तिला वेळ नसे । घंटाघंटा सावरि नेकटॉय केस डोइचे विंचरितसे ।।'' असे आमच्या ती. दादांनी एके ठिकाणी म्हटले आहे. हे असे वागण्याची जी माणसाची प्रवृत्ती आहे, तिला योग्य वळण लावण्यास अटीतटीचे प्रयत्न केले पाहिजेत तरच हित साधेल. निष्ठेच्या अभ्यासाने, सातत्याच्या प्रयत्नाने हे साधू शकते.

यातून पळवाट काढण्यासाठी ''माणसाचा जो स्वभाव आहे तो पालटता येत नाही'' असे एक विधान केले जाते. तसे एक सुभाषित आहे. ''यः स्वभावो हि यस्यास्ते स नित्यं दुरतिक्रमः । श्वा यदि क्रीयते राजा स किं नाश्नात्युपानहम् ।।'' हत्तीच्या सोंडेत माळ देऊन राजा निवडण्याची पद्धती एका देशात होती. सोंडेतील माळ कुत्र्याच्या गळ्यात पडल्याने कुत्र्याला राजसिंहासनावर बसविले. प्रधानजी राजदर्शनाला आले. पादत्राणे काढून राजाला अभिवादन करण्यासाठी ते वाकले. कुत्र्याने त्यांच्या पाठीवरून उडी मारली आणि त्यांचा जोडा तोंडात धरून ते बाहेर पळाले. स्वभाव पालटता येत नाही यासाठी ही लोककथा सांगितली जाते. विधान काहीसे खरे आहे. पण पूर्णपणे यथार्थ नाही. जन्मस्वभावाने कुणी सात्त्विक, राजस, तामस असेल, पण प्रयत्नाने वृत्तीवर नियंत्रण ठेवून राजस-तामसालाही हळूहळू सुधारता येते. कितीही प्रयत्न केला तरी राजस राजसी आणि तामस तामसी असा जसाच्या तसाच राहणार असेल, तर उपदेश देणाऱ्या, बोध करणाऱ्या, विधिनिषेध सांगणाऱ्या व्यक्तीचे वा ग्रंथाचे प्रयोजनच नष्ट होते. मग गीता-

गाथा–ज्ञानेश्वरी–दासबोध या ग्रंथांना महत्त्व राहिलेच नसते. वाघसिंहाना, हत्ती–घोड्यांना, कुत्र्यांना जर शिकवता येते, तर माणसावर चांगले संस्कार होणार नाहीत असे कसे म्हणता येईल?

मनुष्याच्या संबंधात तर योग्य कृती केली तर नराचा नारायणही होऊ शकतो असे मानले जाते. वळण लावताना, शिकवताना, संस्कार करताना त्या त्या व्यक्तीची प्रकृती–प्रवृत्ती–परिस्थिती विचारात घ्यावी लागते हे कितीही खरे असले तरी योग्य त्या पद्धतीचा अवलंब करून उन्नती, प्रगती, सुधारणा घडवून आणता येते हे त्याहूनही खरे आहे. केशभूषा, वेशभूषा, खाण्यापिण्याचे पदार्थ, वागण्यातील पद्धती यांच्या विषयातील आवडीनिवडी संस्काराने कशाही पालटू शकतात, तर प्रयत्नाने स्वभावात योग्य तो पालट का घडवून आणता येणार नाही? संगतीने जसा मनुष्य बिघडतो, तसा सुधारूही शकतो. प्रयत्नाचे सातत्य वाढवावे लागेल. उणा–अधिक वेळ लागेल; पण सुधारण्याची प्रामाणिक इच्छा असेल तर सुधारणा होईल हे निश्चित. तेव्हा जे कर्तव्य आहे त्याचा त्याग करू नये, ही जाणीव निर्माण होणे आणि तिला उत्कट निष्ठेचे स्वरूप येणे हे शक्य आहे. गीतेसारख्या सद्ग्रंथांच्या श्रवणाचा तोच तर लाभ आहे.

शिकविल्याशिवाय येत नाही, सांगितल्याशिवाय कळत नाही हे केवळ माणसाचेच वैशिष्ट्य आहे. इतर प्राणिवर्गात त्यांची सर्व कामे नैसर्गिक प्रवृत्तीने आणि सहजपणे होतात. माणसाला मात्र स्वत:च्या हिताचे काय ते गुरूच्या, शास्त्राच्या माध्यमातून जाणून घ्यावे लागते. संत आणि शास्त्रे हे काम वात्सल्याने निरलसपणे करीत असतात. पोरे आपल्या पोटाला खातात, पण त्याचा उच्छाद मात्र आईला असतो. साम–दाम–दंड–भेदाचे सगळे प्रयोग आईला बालकावर करावे लागतात. गीतेसारखे ग्रंथ आणि श्रीज्ञानेश्वर महाराजांसारखे संत हे त्याच वृत्तीचे आहेत. विनोबा गीतेला माउली म्हणतात. श्रीज्ञानेश्वर महाराज तर माउली म्हणूनच ओळखले जातात.

चांगले संस्कार जितक्या लवकर होतील तितके अधिक लाभदायक ठरतात. तारुण्याच्या उंबरठ्यावरच गीतेची–श्रीमद्‌भगवद्‌गीतेची भेट झाली पाहिजे. तरुणपण जसजसे ओसरत जाते तसतसे सुधारण्याची शक्यताही उणावत जाते. ज्याला लढायचे आहे, उत्साहाने आयुष्य जगायचे आहे, दीर्घकालाचे

भावी जीवन सुखस्वास्थ्याने संपन्न करायचे आहे, त्याच्यासाठी गीता आहे. पण खेदाची गोष्ट अशी की ही जाणीव तरुणपणी सहसा होत नाही. मग मुळीच नसण्यापेक्षा उशीर बरा म्हणून समाधान मानायचे इतकेच. गीता–ज्ञानेश्वरी–दासबोध हे अध्यात्माचे ग्रंथ आहेत खरे, पण सुखी–संपन्न जीवनासाठी त्यांचा काय उपयोग? असा प्रश्न विचारणे खुळेपणाचे आहे. उद्योगधंदा, व्यापार–व्यवसाय कोणताही असला तरी प्रत्येकाला स्वत:चे आरोग्य चांगले असावेच लागते, चांगले राखावेच लागते. तीच स्थिती मानवी जीवनात अध्यात्माची आहे. अध्यात्म हे मानवतेचे आरोग्य आहे. मानवी जीवनाला यथार्थता आणायची असेल तर अध्यात्माचा अवलंब केलाच पाहिजे. नियतकर्माचा त्याग न करणे ही अध्यात्मप्राप्तीची अत्यंत महत्वाची साधना आहे. तिची उपेक्षा करणे हे तामसवृत्तीचे आहे. तामसीवृत्तीचे लोक चांगले काय ते आधी जाणून घेतच नाहीत. दुर्वर्तनाचे दुष्परिणाम दिसू लागले तरी सावध होत नाहीत. क्वचित् चांगले काय ते ऐकले तरी ते आचरणात आणण्याचा थोडाही प्रयत्न ते करीत नाहीत. काही लोक चांगले काय ते जाणून घेऊ इच्छितात आणि त्या दृष्टीने आरंभही करतात. पण त्यांचा धीर टिकत नाही.

**दु:खमित्येव यत्कर्म कायक्लेशभयात्यजेत् ।**
**स कृत्वा राजसं त्यागं नैव त्यागफलं लभेत् ।।८।।**

काम करताना शरीराला कष्ट होतात या भयाने दु:खदायक म्हणून कर्माचा त्याग करणे या त्यागाला राजस त्याग म्हणतात. त्यागाचे (निवृत्तीचे, नैष्कर्म्याचे) फल अशा त्यागाने लाभत नाही.

तामस त्यागात कर्तव्याची नीट ओळख होत नाही. ती व्हावी असे वाटत नाही किंवा कुणी करून देऊ लागला तर त्याचे सांगणे पटत नाही. अशा रीतीने आळस, अज्ञान वा अविश्वास ही मोह उत्पन्न करणारी कारणे तामस त्यागाला कारणीभूत होतात.

राजस त्यागाचे स्वरूप यापेक्षा थोडे वेगळे आहे. येथे कर्तव्याचे महत्त्व मुळीच लक्षात येत नाही असे नाही. योग्य काय? काय केले पाहिजे? कर्तव्य कोणते? हे उमगते. त्या दृष्टीने कामाचा आरंभही केला जातो. पण त्या कामात कोणत्या ना कोणत्या तरी प्रकारचे कष्ट जाणवू लागले, काही अडचणी आल्या

की, ते काम करणेच सोडले जाते. राजस त्यागी असा आरंभशूर असतो. त्याचा धीर फार वेळ टिकत नाही. त्याचा उत्साह लवकरच ओसरतो. राजस त्यागी हितापेक्षा सुखाला, श्रेयापेक्षा प्रेयाला महत्व देतो. तो अधीर असतो, उतावळा असतो. त्याला कष्ट करणे, ताण सोसणे, वाट पाहणे मानवत नाही. खरोखरीच, मुळीच दु:खदायक नाही, असे कर्म अद्यापि जन्माला आलेले नाही. सुगंधी कोमल फुलांचा वास घेणे यात काय दु:खदायक आहे? असा प्रश्न कोणी या संदर्भात विचारील. फुलांचा वास घेणे हे सहज, साधे-सोपे आणि केवळ सुखाचेच आहे, यात शंका नाही. पण अशी सुगंधी फुले मिळवणे वा मिळणे हे सहज सोपे आहे काय? नीट विचार केला तर याचे उत्तर 'नाही' असे आहे. सुगंधी फुले एकतर उद्यानात जाऊन तोडून आणली पाहिजेत वा माळ्याकडे जाऊन द्रव्य वेचून विकत तरी आणली पाहिजेत. ती आणून देणारा सेवक सांभाळला पाहिजे किंवा आपण होऊन कोणी आदराने, पूज्य बुद्धीने सुगंधी फुले अर्पण करील अशी प्रतिष्ठा मिळवलेली असली पाहिजे. यातील एकही कष्टावाचून साधणारे नाही. फूल हुंगण्याचे उदाहरण देणे हेही खरे म्हणजे तिरकसपणाचे आहे. कारण फुलांचा सुगंध घेणे हे काही कर्तव्य नाही, आवश्यक नाही. अपरिहार्य तर नाहीच नाही.

प्रत्येक उपयुक्त कर्माची सवय लावून घ्यावी लागते. सवय लावून घेणे हे आरंभी कष्टाचेच असते. पुढे पुढे उपयुक्तता पटू लागते आणि त्यामुळे वा सवयीने अंगवळणी पडल्यामुळे दु:खाचा भाग उणावत जातो किंवा नाहीसा होत जातो.

देहधारणेसाठी वा विलासासाठी केली जाणारी कर्मे आरंभी तरी कष्टदायक असतातच असतात. जे श्रद्धावंत आहेत त्यांना धार्मिक कृत्यातही हाच अनुभव येतो. केर काढताना नाकातोंडात धूळ जाते. भाजी चिरताना बोट कापते. निदान अंगठ्याला चिरा तरी पडतातच. कांदा रुचकर खरा, पण चिरताना नाकाडोळ्यातून पाणी काढतो. डोळे जळजळताततही. स्वयंपाक करताना हाताला चटका बसला नाही असे सहसा होत नाही. यज्ञात आहुती देताना डोळ्याला धूर लागतोच. स्वाध्यायशिबिर उत्तरकाशीला असले तर थंडीला तोंड द्यावे लागते. मराठवाड्यात गोरट्याला ठरविले तर उन्हाळा सोसावा लागतो. प्रसूतीच्या वेदना सहन केल्यावाचून पुत्रवतीपणाचे सुख भोगता येत

नाही. शेती चांगली पिकवायची तर घाम गाळावा लागतो. उद्योगधंदा यशस्वी करायचा तर रात्रीचा दिवस करून राबावे लागते. हिमालयाचा निसर्ग रमणीय खरा, पण त्या प्रवासासाठी तेथील वातावरणाचा लहरीपणा, उरावरचे चढ, पायात गोळे आणणारा उतार, निवाऱ्याची अनिश्चितता हे सर्व गृहीत धरून प्रवास करावा लागतो. ''दुरून डोंगर साजिरे'' असेच बहुधा सर्व चांगल्या कामाचे असते. त्या दिशेने हालचाल सुरू केली की मग एकेक अडचण लक्षात येऊ लागते. कष्ट वाढू लागतात. ''कुठून या भानगडीत पडलो'' असा पश्चात्ताप होतो. ''बरी होते घरी, कुठून आठवली पंढरी'' असे म्हणण्याचा प्रसंग येतो. मग माणसे कामे अर्धवट सोडून देतात. पुन्हा हे संकट ओढवून घेणार नाही अशी प्रतिज्ञा करतात. असे जो म्हणतो, त्याप्रमाणे वागतो ते रजोगुणाच्या प्रभावामुळे.

कायक्लेश-भयाने कर्मे टाकणे हे केवळ स्थूल-शरीराच्या कष्टापुरतेच मर्यादित समजण्याचे कारण नाही. सूक्ष्म असलेल्या मनाच्या पातळीवरचे दुःख हेही कर्तव्यविन्मुख करण्यास कारणीभूत होत असते. सेवाभावी असलेल्या स्वयंसेवकावर, सामाजिक कार्यकर्त्यावर, धार्मिक उत्सव-महोत्सवात राबणाऱ्या भाविकांवर मनस्ताप सोसण्याचे प्रसंग काही थोडे येत नाहीत! अपेक्षित ते कौतुक होत नाही; इतकेच नाही, तर उपेक्षा, तुच्छता, असहकार्य, आरोप, निंदा, छळवाद अशा क्लेश देणाऱ्या गोष्टी उण्या-अधिक प्रमाणात त्याच्याही वाट्याला येतात. असे झाले म्हणजे तो ''नको हे काम'' म्हणून मागे सरतो. कर्तव्य या प्रकाराने टाळणे हे रजोगुणाचेच लक्षण आहे. अशा अर्धवटपणाला त्यागाचे म्हणजे नैष्कर्म्याचे फल कधी मिळत नाही. सत्कर्मामुळे लाभणारे पुण्यही लाभत नाही. तोवर केलेले बहुधा सगळे वाया जाते. हे मधेच सोडलेले कर्म निष्ठेच्या अभावाचे द्योतक आहे. अशक्यता, अशक्तता ही कारणे काही त्यागाला नसतात. हिताचे आहे, श्रेयस्कर आहे तर ते सोयीचे आणि सुखाचेही असले पाहिजे असे माणसाने गृहीत धरलेले असते. तसे वास्तवात आढळत नाही. आणि मग कर्माचा त्याग घडतो. कारण वृत्तीत तप नसते. तप म्हणजे सोसणे. अगदी बारीकसारीक गोष्टीतही माणसाला ते साधत नाही. पुराणातून उल्लेखिलेल्या ऋषीमुनींच्या उग्र तपाच्या गोष्टी तर आपण विचारातही घेऊ शकणार नाही. पण शरीराला पडणारे कष्ट, मनाला वाटणारा

त्रास हा निदान ठराविक मर्यादेपर्यंत तरी सहन करण्याची सिद्धता असावीच लागते. म्हणूनच श्रीसमर्थांनी ''देहेदु:ख ते सूख मानीत जावे'' असे आवर्जून सांगितले आहे. साधकाने तरी शरीराला होणारे कष्ट, मनाला येणारा उबग सोसावयास शिकलेच पाहिजे. नाहीतर त्याची प्रगती होण्याची शक्यताच नाही. अगदी जीवन-मरणाचा प्रश्न उभा राहील तेव्हा काय करावे? या प्रश्नाचे स्वरूप अगदी वेगळे आहे. तशी परिस्थितीही फार क्वचित् उभी राहते. आपण भितो, कंटाळतो आणि पळपुटेपणा करतो. या गोष्टी काही मृत्यूचे भय निर्माण करणाऱ्या नसतात. त्यामानाने अगदीच किरकोळ असतात. पण त्यासाठी आपला आवश्यक तेवढाही धीर टिकत नाही.

कष्ट सोसल्यामुळे, उबग न येण्यामुळे धीर टिकवून ठेवल्यामुळे माणसाचे सामर्थ्य वस्तुत: वाढत असते. उदा:-व्यायाम करण्यामुळे माणसाच्या शरीरातील शक्ती, कार्यक्षमता वाढत असते; उणावत नाही. वास्तविक शरीराची प्रत्येक हालचाल ही त्या त्या प्रमाणात शरीराची झीज करणारी असते. व्यायामात तर या हालचाली अधिक प्रमाणात होतात आणि वेगाने कराव्या लागतात. त्यामुळे स्नायूंना ताण, कष्ट होतात. श्वास वाढतो, दम लागतो. हालचालीने झीज होते हे शास्त्र सांगून जर कोणी हातपाय मुळीच न हालविता स्वस्थ बसून राहिला तर चालेल का? व्यायामाला आरंभ केला की अंग दुखू लागते. आणि हे दुखणे दोनचार दिवस तरी टिकते. असे अंग दुखू लागताच व्यायाम सोडला तर शरीर सशक्त कसे व्हायचे? तेव्हा शरीराला कष्ट होतात वा मन उबगते या कारणांनी कधीही कर्माचा त्याग करू नये. शरीर काय किंवा मन काय हे साधन आहे. ते तुमचे सेवक आहेत. त्याला योग्य त्या प्रमाणात राबविलेच पाहिजे.

एखाद्या गोष्टीचा आरंभ केला की मग ती गोष्ट तडीला नेलीच पाहिजे. किरकोळ अडचणींना भिऊन मधेच थांबणे हे काही शहाणपणाचे नाही. ''रत्नैर्महार्हैस्तुतुषर्न देवा: । न भेजिरे भीमविषेण भीतिम् ।। सुधां विना न प्रययुर्विराम । न निश्चितर्थात् । विरमन्ति धीरा: ।।''

अमृत प्राप्त व्हावे म्हणून देवांनी समुद्राचे मंथन करण्याचे अवघड काम आरंभिले. या मंथनातून कौस्तुभासारखी रत्ने निर्माण झाली. पण देव त्याच्या लोभात पडून थांबले नाहीत किंवा हलाहलासारखे भयंकर विष निर्माण झाले तरी त्याच्या भीतीने त्यानी मंथन करण्याचे सोडले नाही. अमृत प्राप्त होईपर्यंत

त्यांनी सतत प्रयत्न केले. तसा धीरपुरुष आपल्या निश्चयापासून कधी ढळत नाही. सिद्धी प्राप्त होईपर्यंत प्रयत्नाला न कंटाळणे हे फार महत्त्वाचे आहे, हे माणूस लक्षात घेत नाही. शरीराला ताप होतो, मनाला व्यथा होतात असे वाटले की तो प्रयत्न सोडून देतो. कर्तव्य टाळतो. त्याला निवृत्तीचे खरे समाधान कधी लाभत नाही. मग माणसाने कसे वागले पाहिजे? आदर्श कोणता ठेवला पाहिजे ते भगवान् पुढील श्लोकांत स्पष्ट करीत आहेत.

**कार्यमित्येव यत्कर्म नियतं क्रियतेऽर्जुन ।**
**सङ्गं त्यक्त्वा फलं चैव स त्यागः सात्त्विकोमतः ।।९।।**

जे नियत कर्म (विहित-ठरलेले) केवळ करणे आवश्यक याच भावनेने केले जाते, पण त्या कर्माविषयी आसक्ती ठेवली जात नाही आणि कर्मापासून काही फल लाभावे अशी अपेक्षाही धरली जात नाही त्या वेळी अर्जुना! हा त्याग सात्त्विक मानला जातो.

मागे ६व्या श्लोकात आसक्ती आणि फलाकांक्षा सोडण्यासंबंधीचा विषय येऊन गेलेला आहे. निराळ्या प्रकाराने तोच विषय येथे स्पष्ट केला जात आहे. करायचे ते नियत आहे, निश्चित आहे, केलेच पाहिजे असे आहे, तेव्हा ते साक्षेपाने केले पाहिजे. शेंडी तुटो की पारंबी तुटो अशा निग्रहाने केले पाहिजे. पण असा आग्रह हा आसक्ती निर्माण करतो किंवा आसक्ती असली तरच असा आग्रह धरला जातो. आणि या आसक्तीमुळेच फळ मिळाले पाहिजे अशी अपेक्षा निर्माण होते. वस्तुतः खरी आसक्ती फलाविषयीच असते. पदवी, पैसा, प्रतिष्ठा काही न करता कोणाला मिळत असेल तर ते सगळ्यांनाच हवे असते. पण शास्त्र सांगते-कर्म तर केलेच पाहिजे, परंतु त्याच्याविषयी कोणतीही आसक्ती अंतःकरणात असता कामा नये. कर्माचे कधी व्यसन होणे योग्य नाही. केले नाही तर करमत नाही, अस्वस्थ वाटते, असे स्वरूप कर्माला येता कामा नये. काही चांगली प्रतिष्ठित माणसे मी पाहिली आहेत. त्यांच्याकडे आदराने येणाऱ्या लोकांची संख्या पुष्कळ. लोकसंग्रह मोठा. कीर्तने-प्रवचने-पूजापाठ, उत्सव-महोत्सव यांत त्यांचे वर्षाचे सगळे दिवस बांधलेले असत. त्यांचे संचारक्षेत्रही विस्तृत होते. पण त्यांचेकडे कोणी आले नाही, एखादा नियोजित कार्यक्रम नाही असे झाले म्हणजे ते अस्वस्थ होत. खिन्न होत.

सत्कर्माचीही कशी आसक्ती असते ते यावरून लक्षात येईल. फलाकांक्षेसंबंधी विचार थोडा वेगळ्या प्रकाराने केला पाहिजे. फार खोल जाऊन विचार करणे वा शास्त्रीय पद्धतीने विवेचन करणे सध्या आवश्यक नाही आणि ते मला साधणारेही नाही. फलाकांक्षा नको म्हटले म्हणजे काही अवघड गोष्ट करण्यास सांगितली असे वाटते. समजावे म्हणून सांगतो–पूर्वीही मी अनेक वेळा हे सांगितले आहे. फलाकांक्षा नसणे म्हणजे खेळाडूपणाने वागणे. (स्पोर्टस्मन् स्पिरिट). खेळात भाग घेणाऱ्या सगळ्यांचाच विजय होतो असा खेळ अद्यापि तरी कोणी निर्माण केलेला नाही. खेळ म्हटला की त्यात कोणाचा तरी विजय आणि कोणाचा तरी पराजय व्हावयाचा हे निश्चित. तसे झाले तरच खेळामध्ये आनंद येतो. खेळ आपल्या सर्व कौशल्यानिशी खेळला पाहिजे. पण पराजय झाला तरी तो संतोषाने स्वीकारला पाहिजे. पराभूत खेळाडू विजयी खेळाडूंचे अभिनंदन करतो, त्याच्याशी हस्तांदोलन करतो हे आपण पाहतोच. हेच मनापासून असणे, प्रामाणिक असणे म्हणजेच ''फलाकांक्षा नसणे'' आहे.

प्रेमाच्या क्षेत्रातही ''वस्ल में मजा नही, इंतजार में है ।'' असे म्हणतात. मीलनापेक्षा प्रतीक्षेतच खरा आनंद आहे असे मानले जाते. हे कळणे कठीण आहे. पण ज्यांना अनुभव आहे ते प्रेमी असे मानतात ही मात्र वस्तुस्थिती आहे. भगवान् गोकुळात होते तोपर्यंत सगळ्या गौळणींचे त्यांच्यावर आत्यंतिक प्रेम होते. भगवान् गोकुळातून निघून गेले. पुन्हा कधी गोकुळात परतले नाहीत पण तरीसुद्धा गोपींचे श्रीकृष्णाविषयीचे प्रेम कणभरही उणावले नाही. नवरा दागिने करतो की नाही, नव्या नव्या साड्या घेतो की नाही, यावर काही कुलसतीचे प्रेम अवलंबून असत नाही. हे फलाकांक्षा नसणेच आहे. माणसे चांगल्या फलाचीही अपेक्षा सोडतात. आहे ती स्थिती पत्करतात. पण ते अल्पसंतुष्टपणामुळे नसते. ते असते कायक्लेशभयात्. उचित ते कर्म निष्ठेने करीत राहून आसक्तीच्या आणि फलाच्या आकांक्षेचा त्याग करणे हा खरा सात्त्विक त्याग आहे. खेदाची गोष्ट अशी आहे की, असे सात्त्विक वृत्तीचे लोक विरळे आहेत. आपण बहुधा राजस वृत्तीने राहतो. कधी कधी तामसातही शिरतो. सत्त्वगुण मुळीच नसतो असे नाही. पण प्रभाव असतो तो रज–तमाचा. एकदा जे हिताचे ठरले, आवश्यक ठरले ते मग निष्ठेने, सातत्याने, करीत राहिले पाहिजे. त्याकरिता होणारे कष्ट, मनस्ताप, दीर्घकाल करावे

लागणारे यत्न या कशाचाही कंटाळा करून चालणार नाही. कधी होणार, कधी मिळणार या विचाराने घायकुतीला येता कामा नये. कोणासवे तुलनाही करता कामा नये. त्याला किती लवकर मिळाले, त्याला किती पुष्कळ मिळाले, त्याला किती चांगले मिळाले! मलाच का तसे लाभत नाही? या विचाराने निराशा येऊ देता कामा नये. सामान्य नियम सांगता येतो, पण फलाची कधी निश्चिती देता येत नाही. प्रमाण ठरविता येत नाही. शेती, व्यापार, उद्योग आणि नोकरी हे सर्वच व्यवसाय जीवनाला आधार म्हणून केले जात असले, तरी त्यांचे स्वरूप कधी सारखे असत नाही. शेती अगदी अनिश्चित, व्यापार-उद्योगधंद्यात विलक्षण चढ-उतार, नोकरीत वरिष्ठांचे मन सांभाळणे, मिळकत-प्रगती यांना मर्यादा, स्थानांतरणाची चिंता यांना तोंड देत मार्गक्रमण करावे लागते. आणि आपण तसे अगतिकपणे करतोही. हेच जेव्हा मोकळ्या मनाने घडते, समाधानाने घडते, कर्तव्यनिष्ठेच्या भावनेने घडते तेव्हा हा व्यवहारच अध्यात्माच्या पायरीवर पोहोचू शकतो.

कुलशीलवती स्त्री ज्याच्याशी लग्न लागले त्याच्यासवे सामान्यत: सुखाने नांदते. किरकोळ कुरकुरी चालतात, पण त्यामुळेही संसाराला रंगत येते असे म्हणतात. तिला आपल्या नवऱ्याचे जे उत्पन्न त्यातच भागवावे लागते. दुसरीच्या नवऱ्याला-अगदी सख्ख्या बहिणीच्या नवऱ्याला-किती मिळते याचा विचार करण्यात काय अर्थ आहे? आणि जर तसा विचार करीत राहिले तर काय होईल? आपल्या नवऱ्याला जास्त मिळावे, त्याने जास्त मिळवावे असे वाटणे ठीक आहे; तसे म्हणावेही. पण इतके घरात आणाल तरच बरे! नाहीतर....पुढचे मी सांगत नाही; असे सहसा कोणी म्हणत नाही. अजूनतरी आपल्या देशात प्रतिशत ८०-८५ स्त्रिया याच वृत्तीच्या आहेत. हे असे असणे जाणिवेने असो, नेणिवेने असो, परिस्थितीच्या दडपणाने असो, नैसर्गिक प्रवृत्तीने असो, की संस्कृतीच्या पुण्याईने असो, पण ते आहे म्हणून संसार चालले आहेत. घरे उभी आहेत. समाजधारणेचा मूल घटक असलेली कुटुंबसंस्था टिकून आहे. हे एक प्रकारे फलाची आसक्ती नसणेच आहे. ही जी कुलस्त्रीची वृत्ती आहे तीच जेव्हा जाणीवपूर्वक साधकाची वृत्ती बनते तेव्हा परमार्थमार्गावरची प्रगती निश्चित होते. आई मुलाचे करते, प्रेमाने करते, पोर गुटगुटीत, खेळकर, निरोगी असले तरी करते. किरकिरे-दुबळे

असले तरी करते. खेळकर-निरोगी मुलाचे थोडे करावे लागते. दुबळ्या व किरकिऱ्या मुलाचे अधिक करावे लागते. पण असेच अधिक करावे लागावे असे ती म्हणत नाही. हेच ''सङ्गत्यक्त्वा'' आसक्ती टाकणे आहे. तसेच ज्या वेळी लहान मुलाकरिता आई कष्ट उपसत असते, तेव्हा तरी म्हातारपणी या मुलाने मला सांभाळावे अशी अपेक्षाही तिच्या मनात नसते. हेच 'फलं त्यक्त्वा' फलाची आसक्ती नसणे आहे. आई जे करते ते मुलावर प्रेम असते म्हणून करते. तिला मुलाकरिता कराव्या लागणाऱ्या कष्टांची आसक्ती नसते. कंटाळाही नसतो. फलाची अपेक्षाही त्या वेळी नसतेच नसते. (पुढे म्हातारपणी कदाचित उत्पन्न होत असेल) हा सात्त्विक त्यागच आहे.

मी माझा एक वेगळा अनुभव आपल्याला सांगतो. १९७२ मध्ये दुष्काळ पडला होता. चांगले चांगले शेतकरी खडी फोडायला गेले होते. (दुष्काळी कामात रस्ते नवे करणे, वा सुधारणे आणि त्यासाठी खडी फोडण्यावर माणसे नेमणे हाच प्रमुख उपाय शासनाला सुचतो. पाऊस जर पडला तर केलेला वा सुधारलेला रस्ता शोधूनही सापडत नाही असे त्या कामाचे स्वरूप असते. पण असो.) एके ठिकाणी एका खडी फोडणाराने मला पुढे येऊन नमस्कार केला. कुठेतरी कीर्तन-प्रवचनात त्याने मला पाहिले असावे. तुम्ही हेच काम करता का असे मी त्या माणसाला बोलण्याच्या ओघात विचारले. तो म्हणाला- ''नाही. माझी शेती आहे. पण सगळी कोरडवाहू आहे. पाऊस नाही, काही पिकले नाही. पोराबाळांच्या तोंडी काही पडावे म्हणून मी या कामावर आलो. इथे बरे मिळते.'' ''मग शेती सोडून हेच काम करणार का? कारण शेती भरवशाची नसते.'' हे ऐकताच ते शेतकरी गृहस्थ गहिवरून म्हणाले- ''दादा, असे कसे म्हणता? ती काळी आई आहे. तिची सेवा केलीच पाहिजे. कधी कधी रागावते म्हणून काय झाले?'' नियत कर्माविषयी अशी भावना असली पाहिजे. मंदी आली तरी व्यापार-उद्योग निष्ठेने चालू ठेवावा लागतो. शरीर आरोग्यसंपन्न राहत नसले तरी जगण्याकरिता प्रयत्न केलेच जातात. हे सर्व फलत्यागच आहेत. कर्माचे फळ टाकावे हे सांगण्यातच कर्माचे म्हणून काही फल असते, आणि ते मिळणारही असते हे गृहीतच धरलेले आहे. नाहीतर 'टाकावे' या शब्दाला अर्थच राहिला नसता. त्यागाचे फळ मिळाले तरच मी कर्म करीन. यातील हा ''तरच'' काय तो घातक आहे. हा तरच

असण्यावर किंवा नसण्यावर राजसपणा वा सात्त्विकता अवलंबून आहे. म्हणून भगवान् सांगतात – आसक्ती किंवा फलाकांक्षा टाकून कर्म करणे हीच खरी विरक्ती आहे, त्याग आहे, संन्यास आहे. त्याग आणि संन्यास शब्द वेगळे असले तरी दोन्हीत तत्त्वत: काही अंतर नाही. वरवर थोडा भेद दिसतो. तो व्यक्तिविशेषाप्रमाणे, प्रकृतिविशेषाप्रमाणे सोपा वा अवघड वाटतो, वा तसे सांगितले जाते. पण मुळात दोन्ही एकरूपच आहेत. पाचव्या अध्यायात सांगितलेल्या सांख्ययोगासारखे वा संन्यासयोगासारखे हे प्रकरण आहे. साधक दशेच्या प्राथमिक अवस्थेत प्रकृतिभेदाने दोन्हीमध्ये थोडी सोय वा अडचण वाटत असली, तरी प्रगतीच्या अंतिम अवस्थेत त्यात काहीच अंतर उरत नाही. काम्य कर्माचा त्याग म्हणजे संन्यास. आणि सर्व कर्माविषयीचा फलत्याग म्हणजे त्याग. हे वर्णन खोलविचाराने पाहिले म्हणजे एकरूपच असल्याचे प्रत्ययास येईल. फल नको म्हणता तर कर्म टाकीन, कर्म करा म्हणता तर फळही सोडणार नाही; अशी माणसाची वृत्ती असल्याचे विनोबाजींनी सांगितले आहे. म्हणून तर शाश्वत कल्याणाचा मार्ग सांगताना भगवंतांनी सांगितले, कर्तव्यकर्म, नियतकर्म तर केलेच पाहिजे. पण कर्माविषयीची आसक्ती व फळाविषयीची अभिलाषा मात्र टाकली पाहिजे. या उपदेशाप्रमाणे हीच परमार्थाची साधना आहे. टाकीन तर कर्मासकट टाकीन, घेईन तर फलासकट घेईन, या वृत्तीने वागणे तर संसार–व्यवहारामधे सर्वत्र दिसते आहेच.

कर्माची नियतता वा कर्तव्यरूपता मात्र स्वत:च्या इच्छेने, सोयीने वा आवडीनिवडीने ठरत नसते. तेथे बहुधा शास्त्राचा, परिस्थितीचा वा सुखदु:खापेक्षा हिताचा आणि अहिताचा विचार करावा लागतो. शास्त्राला प्रमाण मानावे लागते. मग ते आरोग्यशास्त्र असो की अध्यात्मशास्त्र असो. माझ्या कल्पनेप्रमाणे दोनही शास्त्रांचे नियत तत्त्वत: सारखेच आहेत. अध्यात्मशास्त्र दूरचे, पण आरोग्यशास्त्र तरी प्रत्येकाला जवळचे आहे ना! अशा स्थितीत माझे आरोग्य चांगले राहायचे असेल तर आहारविहाराच्या दृष्टीने माझ्याच आवडीनिवडी, सवयी प्रमाण मानाव्यात असे म्हटले तर चालेल काय? सुखासीनता, स्वादलोलुपता माणसाला हवी वाटते. पण ते आरोग्याच्या मात्र विरोधी असते. कर्तव्यकर्म किंवा नियतकर्म ठरविण्यासाठी स्वत:चे स्वत:ला प्रमाण मानता येत नाही हे याच उद्देशाने सांगितलेले आहे. त्यामुळे एकच अवस्था वा स्थिती वा गुण

सापेक्ष संबंधाने अनुकूल किंवा प्रतिकूल ठरू शकतात. ''अलंकरोतिहि जरा राजाऽमात्यभिष्क यतीन् । विडम्बयतिपण्यस्त्री मल्लगायकसेवकान् ।।'' असे एक सुभाषित आहे. याचा अर्थ असा–म्हातारपण, हे राजा, अमात्य वा मंत्री, वैद्य आणि संन्यासी यांची योग्यता वाढवते. त्यामुळे त्यांना भूषणभूत ठरते. पण तेच म्हातारपण वेश्या, मल्ल (पहिलवान) गायक आणि सेवक यांची विटंबना करणारे ठरते. दीर्घकालीन अनुभवामुळे मंत्री, वैद्य यांची उपयुक्तता वाढत असल्यामुळे वार्धक्य त्यांना शोभते. पण खप्पड झालेल्या वेश्येचे मूल्य शून्य होते. खेळाडू तर पस्तीस–चाळिशीतच निवृत्त होतात. सेवकाला निवृत्त करावे लागते. म्हाताऱ्या झालेल्या गायकाच्या गळ्यातून स्वरविलास न उमटता खोकलाच बाहेर पडत असतो. (तोही गोड लागतो असे म्हणणारे काही छंदिष्ट असतातच.) पण सापेक्ष संबंधाने एकाच गुणाचे वा अवस्थेचे चांगले–वाईटपण कसे पालटते हे यावरून लक्षात येईल. ''असंतुष्टाः द्विजा नष्टाः संतुष्टाश्च महीभुजाः । सलज्जा गणिका नष्टा निर्लज्जा कुलयोषिता ।।'' असाही एक संस्कृत श्लोक आहे. ब्राम्हणाने संतुष्ट असावे आणि राजा असंतुष्ट असावा. अलीकडे मात्र नेमके उलटे झालेले आहे. अध्यापक वेतनवाढीसाठी कामकऱ्याप्रमाणे उपद्रव देणाऱ्या चळवळी संघटितपणे करतात. आणि राज्यकर्ते आम्ही किती विकासयोजना यशस्वीरीत्या पार पाडल्या ते दिखाऊ गणिते मांडून सांगत असतात. कर्तव्यकर्म वा नियतकर्म भिन्न असू शकते. या संदर्भात मी हे सांगतो आहे. ''सर्वेऽत्र सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः ।।'' हे ध्येय जर आचरणात आणायचे असेल तर माझ्या सुखाला मुरड घालावीच लागेल. माझ्या स्वार्थाची मर्यादा ठरवावीच लागेल. अन्यथा अस्वास्थ्य, संघर्ष याविना दुसरे काहीही वाट्यास येणार नाही. अगदी कुटुंबातही मुलाकरिता आईबापांनी, जाणती झाल्यावर आईबापांकरिता मुलांनी, सदाकरिता बायकोसाठी नवऱ्याने आणि नवऱ्यासाठी बायकोने स्वतःच्या सुखकल्पना नियंत्रित ठेवल्या तरच जीवन सुखी, स्वस्थ, प्रसन्न राहू शकेल. अन्यथा शोक–संताप यांचेच साम्राज्य राहील. वैयक्तिक सुखकल्पनांना मर्यादित ठेवणे म्हणजेच ''सङ्गं त्यक्त्वा फलं चैव'' आहे. कर्माविषयीच्या आसक्तीचा त्याग करावा म्हणजे काय करावे हे स्पष्ट करताना भगवान् सांगतात की–

**न द्वेष्ट्यकुशलं कर्म कुशले नानुषज्जते ।**
**त्यागी सत्वसमाविष्टो मेधावी छिन्नसंशयः ।।१०।।**

जो बुद्धिमान आहे, संशयरहित झाला आहे, जो सत्त्वगुणात वाढला आहे वा सत्त्वगुण ज्याच्या ठिकाणी पुष्कळ आहे आणि त्यामुळे खरा त्याग काय हे नीट कळलेले असल्यामुळे तसा वागतो आहे, असा मनुष्य वाईट कर्माचा द्वेष करीत नाही वा चांगल्या कर्मात गुंतूनही राहत नाही.

आदर्श पुरुषाच्या ठिकाणी कोणकोणती लक्षणे असावीत, त्याचे वर्णन गीतेने अनेक ठिकाणी केले आहे. या श्लोकातही आदर्श पुरुषाचीच लक्षणे सांगितली आहेत.

**मेधावी–** बुद्धिमान्. ज्याला विषयाची समज चांगली आहे, नीटपणे ज्याच्या लक्षात राहते, योग्यायोग्याचा विवेक जो उत्तम रीतीने करू शकतो, ज्याला वेळेवर आणि योग्य प्रकारे सुचते, ज्याचा विचार सर्वांगीण असतो तो मेधावी. परमार्थासाठीही बुद्धी तीक्ष्ण असावी लागते. ''येरागबाळ्याचे'' काही ते काम नाही. आपण मात्र शहाण्या आणि बुद्धिमान् माणसानी संसार करावा आणि बावळ्यांनी परमार्थास लागावे असे सोईकरता गृहीत धरले आहे.

ती. दादांच्याकडे एकदा एक गृहस्थ आले. त्यांच्यासवे १७-१८ वर्षांचा एक मुलगा होता. ते म्हणाले– महाराज, ''हा मुलगा तुमच्या सेवेत ठेवावा अशी माझी फार इच्छा आहे. नाही म्हणू नका.'' आमचे दादा पोलिस खात्यात होते. त्यांना माणसांची चांगली पारख होती. दादा म्हणाले– ''तुम्हांला मुले किती?'' ''चार. हा तिसरा आहे.'' ''ती काय करतात?'' ''थोरला मिळवता आहे. दुसरा स्थापत्य महाविद्यालयात (इंजिनिअरिंग कॉलेज) शेवटच्या वर्षाला आहे. धाकटाही फार बुद्धिमान् आहे. नववीत आहे. वर्गात नेहमी पहिला असतो.'' ''आणि हा?'' ''याचीच तर चिंता वाटते. सातवीलाच चार-पाच वेळा नापास झाला. धाकटा भाऊ पुढे गेला, तरी याला काही नाही. शिकवणी ठेवली तरी उपयोग झाला नाही. अभ्यासात मन लागत नाही म्हणतो. इतरही काही काम शिकत नाही. पूर्वी रागावले तर रडत होता. अलीकडे उलट उत्तरे द्यायला लागला आहे.'' ती. दादा ताडकन् म्हणाले– ''वांड वा मोकाट गुरे सांभाळण्यासाठी मी कोंडवाडा उघडला आहे असे समजताय, का पांजरपोळा

चालवतो असं तुम्हांला वाटतंय? शहाणी पोरं तुमच्या घरी. आणि मूर्खांना, आळशांना मी सांभाळू?'' ते गृहस्थ निमूटपणे निघून गेले. ज्याला प्रपंच चांगला करता येत नाही, तो परमार्थात यशस्वी होईल हे गृहीत धरणे अगदी चुकीचे आहे. संसार करण्यासाठी बुध्दी लागते हे खरे; पण त्याहून थोडी अधिकच चांगली बुध्दी परमार्थासाठी लागते हे त्याहून खरे. परमार्थात भोळा चालतो, पण बावळा चालत नाही. आपण निर्बुद्धाला, बावळ्याला भोळा समजत असतो. भोळा निर्बुद्ध असत नाही. चांगला बुद्धिमान् असू शकतो. पण तो सरळ असतो. कपट करीत नाही. त्याच्याजवळ छक्केपंजे नसतात इतकेच. आपण धूर्ताला शहाणा आणि सरळ माणसाला बुद्धिहीन म्हणण्याची चूक करीत असतो. कित्येक वेळा सामान्य माणसाच्या लक्षात ज्या गोष्टी चटकन येतात, त्याही गोष्टी अत्यंत बुद्धिमान असलेल्या व्यक्तीच्याही लक्षात येत नाहीत असे आढळते. पण तो त्यांच्या एकमार्गीपणाचा परिणाम असतो. अत्यंत श्रेष्ठ शास्त्रज्ञांच्या, संशोधकांच्या जीवनात अशा घटना अनेक वेळा घडलेल्या आहेत. त्यामुळे विनोदही निर्माण होतो. पण तो थट्टेचा वा टिंगल-टवाळीचा, उपहासाचा विषय होत नाही. निदान होऊ तरी नये. या संदर्भात मी ऐकलेल्या दोन गोष्टी तुम्हांस सांगतो.

अत्यंत महत्त्वाचा 'सापेक्षता-सिद्धांत' ज्यांनी विज्ञानक्षेत्रात प्रस्थापित केला, ते आइनस्टीन फार थोर शास्त्रज्ञ होते. ते नोबेलपारितोषिक विजेते होते. त्यांच्याकडे एकदा उंच उंच माळ्यावर जाण्यासाठी सोयीचा असलेल्या पाळण्याचा (लिफ्ट्चा) विक्रेता आला.

वरच्या माळ्यावर जाण्यासाठी अशा पाळण्याची कशी आवश्यकता असते, सात-आठ इंच उंचीची एखादी पायरी चढण्याने हृदयावर किती ताण येतो इत्यादी त्याने अत्यंत मधुर भाषेत सांगितले. या शास्त्रज्ञाला ते पटले. आईनस्टीन म्हणाले- ठीक आहे. माझा सचिव दुपारी येईल. तुम्ही त्यानंतर येऊन एका लहान पाळण्याची मागणी नोंदवून घेऊन जा. निजसचिव आल्यानंतर त्याने त्याला तसे सांगितले. निजसचिव म्हणाला- स्वामी! (सर) आपणाला याची काय आवश्यकता आहे? आपले घर बैठे आणि कौलारू आहे. आईनस्टीन हसून म्हणाले- अरे हो की! माझ्या हे लक्षातच आले नाही.

सर्वदा आपल्याच विचारात गढलेला एक जर्मन प्राध्यापक संध्याकाळी

थोड्या उशिरा स्वत:च्या घरी आला. त्याने दार ठोठावले. नवऱ्याकडे कुणी आले असेल या कल्पनेने बायकोने आतून नवरा घरी नसल्याचे सांगितले. हे प्राध्यापक ''ठीक आहे, मी पुन्हा येइन'' असे म्हणून परत फिरले. पुन्हाही तसेच झाले की काय कोणास ठाऊक!

असे थोर शास्त्रज्ञ, विद्वान आपल्या चिंतनात गढलेले असले की अगदी साध्या लहानसहान गोष्टीही त्यांच्या कशा लक्षात येत नाहीत हे दिसून येते. पण यावरून त्यांच्या बुद्धिमत्तेविषयी शंका घेणे चूक आहे. तो अपराध ठरेल. असो. अशा पुष्कळ कथा सांगता येतील. परमार्थाला बुद्धीची अधिक आवश्यकता आहे हे लक्षात येण्यासाठी मी हे सांगतो आहे. ''दृश्यते त्वग्र्यया बुद्ध्या सूक्ष्मया सूक्ष्मदर्शिभि:' असे उपनिषदांनी म्हटले आहे ते फार महत्त्वाचे आहे.

**छिन्नसंशय–** ज्याच्या मनातील शंकाकुशंका पार नाहीशा झालेल्या आहेत, काय आहे, कसे आहे हे सर्व ज्याला स्पष्टपणे कळले आहे, ज्याचे विचार निश्चित झाले आहेत, निष्ठा दृढावली आहे तो. शंका–कुशंकांनी ज्याचे अंत:करण गोंधळलेले राहते, त्याचा साध्य–साधनाविषयीचा गोंधळ कधीही संपत नाही. त्यामुळे त्याचा कोणताही एक निश्चय धड होत नाही आणि त्याचे हातून काहीही नीट घडत नाही. शांति–समाधान त्याच्यापासून कोसो दूर राहते.

**सत्त्वसमाविष्ट–** सत्त्वगुणाचे मुख्य लक्षण प्रकाशक असणे असे आहे. दिसणे, कळणे, उमजणे, यथार्थज्ञान होणे हे सर्व सत्त्वाच्या प्रकाशकतेमुळेच घडत असते. असा हा सत्त्वगुण ज्याच्या ठिकाणी आहे किंवा जो सत्त्वगुणांत योग्य रीतीने राहतो, तो सत्त्वसमाविष्ट. सत्त्वसमाविष्ट पुरुषाचे इंद्रियांवर नियंत्रण असते. अंत:करण शुद्ध असते. बुद्धी योग्य निर्णय घेते. कारण सत्त्वाच्या प्रभावाने काय, कसे आहे हे त्याला नीटपणे उमगते. आणि त्यामुळेच काय, किती, कुठे, कसे, केव्हा करावे, हेही त्यास योग्य रीतीने जाणता येते. असे सगळे कळणे, करणे ज्याचे ''सम'' म्हणजे चांगले, योग्य, जसे असावयास हवे तसे अर्थात् हिताच्या दृष्टीने झाले, तो सत्त्वसमाविष्ट म्हणजेच सात्त्विक.

काही लोक मात्र जो रागावत नाही, कुणाच्या अध्यात–मध्यात नसतो अशा मिळमिळीतपणे वागणाऱ्या मेंगळ्याला सात्त्विक समजत असतात. लोकांनी आपल्या सोईने, समजुतीने हे ठरविले आहे. एखादा सज्जन तापला, रागावला,

कठोर बोलला म्हणजे हे भाबडे भाविक म्हणणार–अहो तुम्ही सात्त्विक ना! साधू ना! असे कसे कठोर बोलता! रागावता! तुमच्या साधुत्वाला हे शोभत नाही. तुम्ही असे करता कामा नये, वागता कामा नये. सत्पुरुष म्हटला की तो मऊ, विळविळीत, बुळबुळीत, गुळगुळीत अगदी दूधभात–भेंड्याची भाजी असा असला पाहिजे असे लोकांनी गृहीत धरले आहे. पण तो अपसमजच आहे. सत्त्व हे प्रकाशक असल्याने ते सज्जनाच्या वृत्तीला आणि कृतीला जेथे जसे असावयास पाहिजे तेथे तसे नेमकेपणाने ठेवते. मग असा हा संतसज्जन प्रसंगी मेणाहून मऊ होईल, तर कधी आवश्यकता पडल्यास वज्राच्याही ठिकऱ्या ठिकऱ्या करू शकेल असा कठीण होईल. नेसलेली एकुलती एक लंगोटी सहजपणे देऊन टाकील इतका उदार असतानाही नाठाळाच्या डोक्यात काठी घालण्यास मागे–पुढे पाहणार नाही. सगळा चांगला असताना (आघवेची गोड) कृतीमधे असे अंतर वा अलीकडच्या लाडक्या शब्दात अशी विषमता का दिसते? याचे उत्तर संतांनीच दिले आहे. ''जया पुरे कोड त्याचेपरी'' तो सत्त्वसमाविष्ट असल्यामुळेच, सात्त्विक असल्यामुळेच हे असे घडू शकते.

असा मेधावी, छिन्नसंशय, सत्त्वसमाविष्ट असलेला माणूसच मागच्या ९व्या श्लोकात सांगितल्याप्रमाणे सात्त्विक त्यागाने युक्त असा त्यागी असतो, होऊ शकतो. आणि मग तो ''न द्वेष्ट्यकुशलं कर्म'' वाईट दिसणाऱ्या कर्माचा द्वेष न करणारा, तशी कर्मे न टाळणारा आणि ''कुशले नानुषज्जते'' चांगल्या वाटणाऱ्या कर्मात न गुंतणारा असा वागू शकतो.

हे असे वागणे अत्यंत महत्त्वाचे आहे. तसे असावेच लागते. पण ते फार कठीणही आहे. कारण त्यासाठी त्यागी, सत्त्वसमाविष्ट, मेधावी, छिन्नसंशय असावे लागते. ही सगळी लक्षणे परस्परावलंबी म्हणजेच परस्परांवर अवलंबून असलेली आणि परस्परोपकारक म्हणजे एकमेकांना सहाय्य करणारी अशी आहेत. यातील एखादे लक्षण माणसाच्या ठिकाणी असेल तर सतताभ्यासाने, प्रयत्नाने, प्रयासाने इतरही साध्य करून घेणे, मिळविणे शक्य आहे. हे परिश्रम आपण करीत नाही आणि त्यामुळे आपण वाईट दिसणाऱ्या, नको वाटणाऱ्या, कंटाळा आणणाऱ्या, शरीराला कष्ट देणाऱ्या कामांचा द्वेष करतो, तिटकारा करतो. उलट चांगले वाटणाऱ्या, सुखावह असलेल्या सत्तासंपत्ती, सन्मान मिळवून देणाऱ्या कामामध्ये गुंतून राहतो. अशीच कामे करण्याचा आपणांस

उत्साह वाटत असतो. हे अर्थातच योग्य नाही. कसे असावे, कसे वागले पाहिजे त्याचा आदर्श गीतेने सांगितला आहे.

बाहेरची परिस्थिती सगळीच्या सगळी आणि सर्व वेळी कधीही सारखी नसते. ती काही अनुकूल असेल तर काही प्रतिकूल असेल. कधी सुखावह असेल तर कधी क्लेशदायक ठरेल. बाह्य परिस्थितीला, दुसऱ्याला अनुकूल करून घेणे, पाहिजे तसे वळण लावणे हे अत्यंत दुर्घट आहे. परिस्थिती सुधारता येत नाही. सुधारायचे असते ते आपले आपण. आपले आपण सुधारण्याकरिताच वरील गुण प्राप्त करून घ्यावे लागतात. म्हणजे कोणत्याही परिस्थितीत नि:शंक झालेल्या त्या बुद्धिमान सात्त्विकाला योग्य तो निर्णय त्वरित आणि ठामपणे घेता येतो. (क्विक, फर्म बट् राइट् डिसिजन). मग त्या निर्णयाचे बाह्य स्वरूप वरवर पाहता चांगले किंवा वाईट कसेही असेल, प्रसंग जसा असेल त्याप्रमाणे वागावे लागेल. वागलेच पाहिजे. पण माणसे प्रसंगाकडे पाहत नाहीत. सोईचे काय ते पाहतात. लग्नकार्यामध्ये, उत्सव-महोत्सवामध्ये अनेक प्रकारची कामे करावी लागतात. उष्टी काढणे, शेण लावणे हे तसे अकुशल कर्म आहे. कारण खरकट्यात हात घालणे आणि शेणाला स्पर्श करणे या गोष्टी काही चांगल्या म्हणता येणार नाहीत. पण या घाणीला स्पर्श केल्याशिवाय उष्टी काढता येणे शक्य नाही. त्याचा कंटाळा केला तर चालेल का? म्हणजे अकुशल कर्मही करावे लागते. कामसूपणाचे प्रदर्शन करणारे, पुढे पुढे करणारे लोक अशी कामे नेमकी टाळतात. पानसुपारीच्या वेळी फुलांचे गुच्छ देताना, पेढे वाटताना, फुलेल लावताना मात्र त्यांचा उत्साह ओसंडून वाहतो. म्हणजेच कुशल कामामध्ये गुंतून राहणे आहे. सगळेच पान-सुपारी वाटण्यामध्ये गुंतून राहिले तर समारंभ चांगला होईल का? कोणीतरी पायाचा दगड झाल्याशिवाय मंदिरावर शिखर कसे उभारता येइल? मातीत गाडून घेणे ही काही तशी चांगली गोष्ट नाही. कारावास, छळ, फटके या काय नवसाने मागून घ्याव्यात अशा चांगल्या गोष्टी आहेत का? पण देशभक्तांनी त्या आनंदाने स्वीकारल्या. हेच ''न द्वेष्ट्य कुशलं कर्म'' आहे.

एका अंत्यसंस्काराचे वेळी प्रेताचा हात जळत्या चितेतून बाहेर आला. प्रेत नीट ठेवलेले नसावे. आता काय करावे म्हणून लोक गोंधळले. लोकमान्य टिळक तेथे होते. ते पुढे झाले; त्यांनी तो हात तोडला आणि चितेत टाकून

दिला. प्रेताचा हात तोडणे ही काही चांगली गोष्ट नाही. एक प्रकारे ही विटंबनाच आहे. इतर कोणी पुढे झाले नाही ते याच कल्पनेने. पण लोकमान्य हे मेधावी, छिन्नसंशय, खरे स्थितप्रज्ञ. ते या घोळात पडले नाहीत. यावरून ''न द्वेष्ट्यकुशलं कर्म'' कसे असते ते लक्षात येईल.

छत्रपती शिवाजीमहाराजांच्या जीवनातही असे अनेक प्रसंग आहेत. अफजलखानासारख्या क्रूरकर्म्याला त्यांनी फसवून जावळीच्या अरण्यात येण्यास भाग पाडले. तेवढ्यासाठी दूताच्या द्वारा त्याच्याशी नम्रतेचे गोडगोड बोलणे केले. भेटीच्या वेळी पहिला वार छत्रपतींनीच केला. मधुर-मोहक बोलण्याने फसविणे, आपणच प्रथम वार करणे ह्या गोष्टी सरळपणाच्या, सौजन्याच्या विरोधीच आहेत. पण शिवरायांनी त्या नि:शंकपणे केल्या. विजापूरकरांचे अनेक किल्ले त्यांनी जिंकले. मोंगलांचे सुरत हे संपन्न नगर लुटले, आणि त्यानंतर झाल्या अपराधाची क्षमायाचना करणारी पत्रे आदिलशहाला आणि औरंगजेबास पाठविली. पण जिंकलेले गड वा लूट परत केली नाही. यात लाचारी आणि कपट दिसते. पण शिवरायांनी ते केले. खरोखरीच थोर, श्रेष्ठ, वंदनीय, आदर्शभूत असलेल्या व्यक्तींच्या जीवनात असे प्रसंग आढळतात. त्या त्या वेळी ते छिन्नसंशय झालेले मेधावी पुरुष सत्त्वसमाविष्ट होऊन एखादे अकुशल कर्म जरी कर्तव्य म्हणून पुढे आले तरी त्या त्या प्रसंगी विवेकाने त्यालाही सामोरे जातात. कोणाला काय वाटेल या कल्पनेने माघार घेत नाहीत.

अकुशल कर्माचा जसा द्वेष करू नये, तसे कर्म कुशल आहे, चांगले दिसते, आवडते म्हणून त्यात गुंतूनही राहू नये; असे आवडते कर्म सतत करावयास मिळावे, असेही म्हणू नये. लहान लेकराचे बोबडे बोल, त्याचे रांगणे यामुळे आई अतिशय सुखावते. त्याला हृदयाशी धरण्यात, त्याचे मुके घेण्यात, त्याला कुरवाळण्यात ती मोहरून जाते. पण त्यासाठी मूल असे बोबडे, रांगतेच राहावे असे काही ती म्हणत नाही. ''कुशले नानुषज्जते'' हे लक्षात येण्यासाठी हे उदाहरण पुरेसे आहे.

येथेही कुशल आणि अकुशल या शब्दांचे अर्थ मात्र संदर्भानुसार सावधपणे केले पाहिजेत. कुशल शब्दाने येथे आपण समजतो त्या अर्थाने कौशल्य अभिप्रेत नाही. कौशल्याने कर्म करणारा तो कुशल हा अर्थ काही येथे घेता येत नाही. अनुकूल असणारी, बरी दिसणारी, सुखावह वाटणारी, शरीराला

कष्ट न देणारी, उबग न आणणारी, प्रतिष्ठा मिळवून देणारी अशी कामे येथे कुशल शब्दाने अभिप्रेत आहेत. याच्या उलट जे, ते अकुशल शब्दाने जाणावे. कुशलाचा भाव तो कौशल, कौशल्य. कर्मामधे कौशल्य असणे म्हणजे योग. ''योग: कर्मसु कौशलम्.'' (गीता. २/५०) या गीतेच्या सांगण्याप्रमाणे कर्म अकुशल असताना कसे करावे? कौशल्यरहित कर्म त्याज्यच मानले पाहिजे की नाही? अशी शंका येऊ नये म्हणून कुशल शब्दाचा येथील अर्थ स्पष्ट केला.

समोर आलेले कर्म करावे की करू नये अशी द्विधा मन:स्थिती उत्पन्न होण्याचा प्रसंग अनेक वेळा येतो. त्या वेळी बुद्धिमान सात्त्विक व्यक्ती कसे वागते ते भगवंतांनी या श्लोकात सांगितले आहे. कर्माची अपरिहार्यता भगवान् पुढच्या श्लोकात सांगत आहेत.

**न हि देहभृता शक्यं त्यक्तुं कर्माण्यशेषत: ।**
**यस्तु कर्मफलत्यागी स त्यागीत्यभिधीयते ।।११।।**

देह धारण करणाऱ्या म्हणजेच जिवंत असलेल्या व्यक्तीला कोणतेही कर्म कधीही करणार नाही, (असे म्हणून त्याप्रमाणे वागणे) हे मुळीच शक्य होणारे नाही, म्हणून (कर्मे करीत राहून) कर्मापासून उत्पन्न होणाऱ्या कर्माच्या फलांचा जो त्याग करतो तोच त्यागी म्हणविला जातो.

कर्माचा जो त्याग करतो तो काही त्यागी नव्हे. कर्माच्या फलांचा जो त्याग करतो तो त्यागी, फलत्यागी. सामान्यपणे मनुष्य असे म्हणत नाही वा तसा वागतही नाही. कर्माचे फळ टाकायचे तर कर्मही टाकीन. वा कर्म करायचे तर त्याचे फळही घेईन. कर्म न करता फळ मिळाले तर ते फारच चांगले अशी माणसाची वृत्ती असते. एखाद्या मुलाला विचारा की तुला परीक्षेला न बसताही अधिकृत पदवी मिळाली तर चालेल ना? पदवी आणि त्याची उच्च श्रेणी अलीकडे विकत मिळते असे म्हणतात. आणि ती तशी घेणारे मंत्रीही आहेत असे मी ऐकले आहे. अलीकडे मनुष्याला निष्काम कर्मयोग मान्य झालेला आहे तो केवळ कुटुंबनियोजनापुरता. चुकलो. कुटुंबकल्याणापुरता. (गौरवास्पद नावे दिली म्हणजे भागले असे माणसाने गृहीत धरलेले आहे. असो.)

कर्म करीन तर त्याचे फळही घेईन असे म्हणणे निदान प्रकृतीला धरून प्रामाणिकपणाचे तरी आहे. पण मनुष्यस्वभाव इथेच थांबत नाही. त्याचा स्वार्थ इतका मर्यादित राहत नाही. आसक्तीने त्याच्या स्वार्थाला ''पुण्यस्य फलमिच्छन्ति पुण्यं नेच्छन्ति मानवा: । न पाप फलमिच्छन्ति पापं कुर्वन्ति यत्नत: ।।'' असे विकृत स्वरूप बहुधा येते. पुण्यामुळे मिळणारी फळे त्याला हवी असतात. पण पुण्याचरणाचे कष्ट मात्र त्याला नको वाटतात. उलट शरीराला किंवा मनाला सुखावह वाटते म्हणून तो विविध प्रकारची पातके वा वाईट गोष्टी प्रयत्नपूर्वक करीत असतो. ही तर सरळ सरळ विकृती आहे. सगळी अनर्थ परंपरा निर्माण होते आणि वाढत जाते ती या विकृतीमुळेच. माणसाने आपल्या प्रकृतीतच एकवेळ राहणे चालेल, पण तेवढ्यावरच तो संतुष्ट राहिला तर या प्रकृतीत विकृती केव्हा शिरेल हे कळणार नाही. म्हणून संस्कृतीकडे ओढ असली पाहिजे. संस्कृतीचे आदर्श काय हे जाणून घेतले पाहिजेत. आणि त्या दिशेने प्रगती होईल असा थोडा तरी प्रयत्न केला पाहिजे. तरच प्रकृती, प्रकृती म्हणून टिकून राहील. नाहीतर खाली घसरण्याचा धोका वाढल्यावाचून राहणार नाही.

कर्तव्य म्हणून आवश्यक असेल ते प्रत्येक कर्म निष्ठेने करावे पण त्याच्या फलाविषयी मात्र पूर्णपणे निरिच्छ राहावे हा आदर्श, माणसाला सुसंस्कृत करण्यासाठीच गीतेने सांगितला आहे. सुगृहिणीच्या वर्तनात याचे स्वरूप सांसारिक पातळीवरही पाहावयास मिळते. ती कुलीन साध्वी अत्यंत स्वादिष्ट असा स्वयंपाक करते. विशेषप्रसंगी अधिकच कौशल्याने करते. तिच्या हाताचा स्पर्श जणू अमृताचा असतो. जेवणारे चवीने जेवतात. मागे-पुढे पाहत नाहीत. गृहिणी मोकळ्या मनाने वाढते. हात आखडीत नाही. ''तेथ सुगरिणी आणि उदारे । रसज्ञ आणि जेवणारे । मिळती मग अवतरे । हातु जैसा ।।'' (ज्ञाने. १३/११४९) असे वर्णन वेगळ्या संदर्भात श्रीज्ञानेश्वर महाराजांनीही केले आहे. पदार्थ आवडीने खाल्ले जात आहेत हे पाहूनच तिला आनंद होतो. केव्हातरी अशी वेळ येते की पदार्थ संपून जातो. ती सुगरण जेव्हा जेवावयास बसते तेव्हा साधी भात-आमटीच तिच्याकरिता उरलेली असते. पण तेव्हा तिला थोडेही वाईट वाटत नाही. उलट आपण केलेले पदार्थ समाधानाने खाल्ले, याचाच तिला विशेष संतोष वाटत असतो. हा कर्मफलत्यागच आहे. वृत्तीचे हे स्वरूप

सार्वत्रिक झाले, सर्वच कर्तव्य कर्माच्या स्वरूपात प्रत्ययास आले, की तोच माणूस त्यागी म्हणण्यास पात्र होतो. सुगृहिणीने कदाचित् वेदान्तशास्त्रावरची पुस्तके वाचलेलीही नसतात. क्वचित गीतेचा अर्थही तिला कळत नसतो. पण या अंशाने तरी गीता तिच्या वृत्तीत मुरलेली असते. वर्तनातून प्रगट होत असते. खरे तर वेदान्त घरीच समजतो. अवतीभोवती घडणाऱ्या प्रसंगांतून उमलत असतो. उमगत असतो. तशी दृष्टी मात्र पाहिजे. केवळ ग्रंथांच्या अध्ययनातून समजलेला वेदान्त फारच अवघड असतो, अवजड असतो. क्लिष्ट पारिभाषिक शब्दांनी आणि गुंतागुंतीच्या प्रक्रियांनी बोजड झालेला असतो. तो प्रयत्नाने जिभेवर खेळवता येतो आणि प्रभावी प्रवचनकार म्हणून नावलौकिकही मिळवता येतो. पण एवढेच होते. मला काशीला जाऊन वेदान्त विषयाचे अध्ययन करून शास्त्री किंवा आचार्य होण्याची इच्छा होती; निदान तत्त्वज्ञान विषय घेऊन विद्यापीठाची विद्यानिष्णात (एम.ए) ही पदवी तरी मिळवावी असे वाटत होते. पण ती. दादांनी यातील काही न करू देता प्रत्यक्षपर (प्रॅक्टिकल) भारतीय विद्या म्हणून आयुर्वेदाचा अभ्यासक्रम स्वीकारण्यास सांगितले. तेव्हा थोडे वाईट वाटले. पण आता वाटते, जे झाले ते बरे झाले. संस्कृत थोडे बरे येत असले, तर वेदान्ताचे मूळ ग्रंथ समजण्यास फारसे अवघड वाटत नाही. पण त्यावरील भाष्ये, वार्तिके, टीका, उपटीका वाचताना मात्र, खडा चढ चढताना प्राण कंठाशी यावेत तसे होते. चांगले चांगले शास्त्री, पंडित काही टीका आपल्यालाही नीट उलगडत नाहीत असे स्पष्टपणे मान्य करतात.

वेदान्त आचरण्यासाठी अभ्यासावयाचा असेल तर त्याकरिता गाथा, ज्ञानेश्वरी, दासबोध हे ग्रंथ पुरेसे आहेत. तत्त्वज्ञानाने जे आदर्श-वर्तनाचे स्वरूप सांगितले आहे, ते काही अंशाने तरी सरळ, सज्जन व्यक्तींच्या जीवनात संसारात असतानाही कधी कधी काही काही क्षेत्रांत प्रत्ययास येते. जो सद्भाव आदर्शाकडे नेणारा असतो तो बीजरूपाने बहुधा सर्व मनुष्यमात्राच्या हृदयात नांदत असतो. सुसंस्काराने, निष्ठेने, योग्य साधनेने त्या बीजातून सिद्धीचा महावृक्ष निर्माण होऊ शकतो. असे असते म्हणून तर तत्त्वज्ञानाचे ग्रंथ सार्थकी लागू शकतात.

मनुष्याच्या अंत:करणात चांगल्या-वाईटाचे, गुणदोषाचे एक चमत्कारिक मिश्रण नांदत असते. सद्ग्रंथाच्या वाचन-मननाने आणि संसारात अनुभवास

येणाऱ्या नानाविध घटनांच्या विवेकाने केलेल्या मूल्यमापनाने माणसाला चांगल्याचे चांगले आणि वाईटाचे वाईट म्हणून ज्ञान योग्य रीतीने होऊ शकते. आणि मग विवेकाने, सातत्याच्या प्रयत्नाने, सत्संगाने तो आपले दोष उणावू शकतो. साक्षेप असेल त्या प्रमाणात यशही मिळवू शकतो. 'असाल तेथून पुढती' जाण्याची वृत्ती मात्र विचारपूर्वक जोपासली पाहिजे. पण हे घडावे त्या प्रमाणात घडत नाही.

मनुष्य कीर्तने-प्रवचने ऐकतो. त्याला त्या वेळेपुरते बरेही वाटते. पण तेथून उठला की जे ऐकले त्याचे चिंतन केले पाहिजे, त्या मापाने आपले वागणे पारखून घेतले पाहिजे, हा विचार काही त्याच्या अंत:करणात राहत नाही. एरवी वागताना साध्या साध्या गोष्टीतही त्याचा अहंकार, त्याच्या मानापमानाच्या कल्पना, त्याचे क्षुद्र स्वार्थ, त्यामुळे निर्माण झालेले रागद्वेष आणि यामुळे घडणारे नको ते वर्तन यथापूर्व राहत असते. असे का केलेस? असे का वागलास? असे विचारले तर तो माणूस म्हणतो- ''आम्ही आपली साधी संसारी माणसे. आम्ही कुठे ज्ञानेश्वर-तुकाराम लागून गेलो आहोत. संसारात असेच वागावे लागते.'' काही ना काहीतरी कर्म करावे लागते हे खरेच आहे. पण ''मी करतो ते योग्य'' वाटणे हा अहंकारी अपसमज आहे. देह आहे तोपर्यंत कर्म सुटत नाही हे खरेच आहे. प्रश्न निर्माण होतो वा केला जातो तो केवळ कर्तव्य कर्माच्या संदर्भात. जेवावे की नाही, श्वासोच्छ्वास करावा की नाही, पोटाची खळगी भरण्यासाठी काही ना काही उद्योग करावा की नाही, हा प्रश्न काही कुणी उपस्थित करीत नाही. पण संध्या करणे, देवपूजा करणे, नामस्मरण करणे, दानधर्म करणे, परोपकाराची कृत्ये करणे, समाजासाठी, देशासाठी, धर्मासाठी सेवाभावाने काही त्याग करणे, पावित्र्य राखणे इत्यादी गोष्टी का कराव्यात? हाच प्रश्न बहुतेकवेळी विचारला जातो. खरे तर आरोग्य राखायचे असल्यास खाणे, बसणे, झोपणे यालाही काही नियंत्रणे असावी लागतात, क्वचित् अप्रिय असली तरी ती स्वीकारणे अपरिहार्य होते. कर्तव्य न वाटणाऱ्या कर्माच्या संबंधातही अशी बंधने विचारात घ्यावी लागतात; तर जी खरी कर्तव्ये आहेत त्यांना काही नियम नाहीत असे कसे होईल? ती आपल्या इच्छेने स्वैरपणाने पाहिजे तशी करून वा टाळून कसे चालेल? शास्त्रे कर्तव्यासंबंधीचेच नियम सांगत असतात. गीतेने येथे तेच केले

आहे. कर्म न करणाराला गीता त्यागी म्हणत नाही. कर्म योग्य रीतीने करून त्यातून उत्पन्न होणारे जे फल, त्याच्याविषयीची आसक्ती सोडणाराला गीता येथे त्यागी म्हणते.

काहीच कर्मे करीत नाही हे जसे शक्य नाही, तसे सगळीच कर्मे करीन म्हणणेही शक्य नसते. हाच नियम कर्तव्यालाही लागू होतो. कर्तव्याचे चांगले-वाईटपण वा श्रेष्ठ-कनिष्ठपण त्याच्या बाह्यस्वरूपावर फारसे अवलंबून नसते. अशा कर्माचे मूल्य कोणत्या परिस्थितीत ते घडले आणि करणाराची त्यामागची भावना, हेतू वा उद्देश काय आहे यावरून ठरत असते.

कर्मफलाच्या आसक्तीचा त्याग ज्याने केला तो त्यागी. मग भले कोणतेही कर्म करीत असो, त्यामुळे त्याच्या त्यागीपणाला काही बाध येत नाही. कदाचित् अडाणी, का घडले ते न कळल्यामुळे उथळपणाने वा खवट माणूस मत्सराने, दुष्टपणाने कर्माच्या बाह्यरूपाकडे बघून त्या त्यागी माणसाची निंदाही करील, पण त्यामुळे त्या त्यागी पुरुषाच्या थोरवीला वा कर्तव्य म्हणून त्याने केलेल्या कर्माच्या श्रेष्ठतेला कोणताही बाध येत नाही.

पार्वतीच्या उग्र तपश्चर्येने प्रसन्न होऊन भगवान् शंकरांनी पार्वतीचा पत्नी म्हणून स्वीकार करण्याचे मान्य केले. या होकारामुळे पार्वतीचा आनंद गगनात मावेना. पण त्या कुलीन युवतीने लगेच शंकरासह प्रयाण केले नाही. तिने आपल्या पित्याकडे म्हणजे हिमालयाकडे शंकरांनी मागाणी घालावी असे सुचविले. तिच्या या मर्यादशीलतेमुळे भगवान् अधिकच प्रसन्न झाले आणि त्यांनी सप्तर्षींना पाचारण करून स्वत:च्या वतीने हिमालयाकडे मागणी घालण्यासाठी पाठविण्याचे ठरविले. भगवान् शंकर म्हणजे संयम, त्याग, तपश्चर्या, धगधगीत वैराग्य यांचे साकारलेले रूप. त्यांनी विवाहाला कर्तव्य समजून पार्वतीला मागणी घालावी, याचे कोणालाही आश्चर्य वाटणे स्वाभाविक आहे. ते जणू लक्षात घेऊन भगवान् शंकर म्हणाले ''विदितं वो यथास्वार्था: न मे कश्चित् प्रवृत्तय: । ननु मूर्तिभि: अष्टाभि: इत्थ भूतोऽस्मि सूचित: ।।''

''ऋषींनो! पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश, चंद्र, सूर्य आणि यज्ञ करणारा यजमान या आठ रूपांनी असणारा मी स्वार्थासाठी काही करीन अशी शंकाही कुणी घेऊ नये. देवांना संकटातून मुक्त करण्यासाठी माझ्या

प्राप्तीसाठी उग्र तपश्चर्या करणाऱ्या पार्वतीशी मी विवाह करण्याचे ठरविले आहे. तुम्ही हिमालयाकडे जाऊन माझ्यासाठी पार्वतीची मागणी घाला.'' पुढे हे लग्न झाले. भगवान् शंकरांनी वैवाहिक जीवनाचा उपभोग अत्यंत रसिकतेने घेतला. महाकवी कालिदासाने थोडेसे मर्यादातिक्रमण करून या शृंगाराचे सुंदर वर्णन केलेले आहे. त्यामुळे भगवान् शंकरांचे माहात्म्य काही उणावत नाही. चवीकरता जेवू नये, पण चवीने जेवता आले पाहिजे. कारण त्याविना कर्माला उत्कृष्टता येत नाही. श्रीविठ्ठलपंतांनी संन्यास घेतल्यानंतरही गुरूच्या आज्ञेवरून संसारात पुन्हा पदार्पण केले. याला आपण स्वार्थ म्हणणार का? विठ्ठलपंतांनी जर हा त्याग केला नसता तर आम्हाला श्रीज्ञानेश्वरमहाराजांसारख्या अवतारी पुरुषाचा लाभ झाला असता का? श्रीविठ्ठलपंतांची ही कृती ''न द्वेष्टि अकुशलं कर्म'' या वर्गातलीच आहे. विठ्ठलपंतांच्या दृष्टीने संसारात परत येणे हे अकुशल कर्मच होते. पण त्यांनी ते केले. अत्यंत श्रेष्ठ, मानवजातीला अखंड भूषणभूत असलेल्या अलौकिक अवतारी व्यक्तींचा लाभ त्यामुळे जगताला झाला, मानवतेचे भाग्य उजळले. तेव्हा जी कर्तव्यकर्मे आहेत, जी वाट्याला आलेली आहेत, ती केलीच पाहिजेत. उत्तम रीतीने केली पाहिजेत. न कुरकुरता केली पाहिजेत. धैर्य आणि उत्साह राखून केली पाहिजेत. फलासक्ती असलेला सर्वसामान्य माणूस ज्या उत्साहाने कर्मे करील तोच उत्साह कर्मे करताना फलासक्ती नसलेल्या व्यक्तीच्या ठिकाणीही दिसला पाहिजे. (गीता ३/२५) ''देखे फळाचिया आशा । आचरे कामुकु जैसा। कर्मी भरू होआवा तैसा । निराशाहि ।।'' असे श्रीज्ञानेश्वरमहाराजही म्हणतात. (ज्ञाने.३/१६९) असा जो वागतो त्यालाच त्यागी असे म्हणतात.

कर्मफलाचा त्याग करायचा पण कर्माचा त्याग करायचा नाही, असे म्हटले की काही लोक उगीचच शंका विचारतात. त्या योग्य नसतात. त्या क्वचित वाकुडपणानेही विचारलेल्या असतात. कर्मालाही काही अनुक्रम असतो, धोरण असते, पद्धती असते. ते सर्व लक्षात घ्यावेच लागते. स्वयंपाक करायचा म्हटले की अन्न चांगले शिजलेले असले पाहिजे. ते आरोग्याला हितकर असले पाहिजे. स्वादिष्टही असले पाहिजे. शिजवण्याच्या कृतीच्या दृष्टीने चांगले शिजणे आणि स्वादिष्ट असणे ही तरी फलेच आहेत ना! मग फलाकांक्षा सोडा म्हणता म्हणजे काय? असा प्रश्न बहुधा दुष्टपणाने, क्वचित् अज्ञानानेही

विचारला जातो. स्वयंपाकाचे फळ खाणे हे आहे. केलेला स्वयंपाक मी एकटाच खाईन म्हणणे, कोणाला न देणे, क्वचित् कोणी वाटेकरी झाल्यास खेद मानणे, स्वत:ला उरले नाही तर हळहळणे, तडफडणे ही खरी स्वयंपाकाची फलाकांक्षा. ती सोडली पाहिजे. खेळायचे तर आपले सर्व कौशल्य पणाला लावूनच खेळले पाहिजे. पण विजयाकरिता खेळीन, विजय होणार असला तरच खेळेन. मग त्याकरिता उत्तेजक औषधे घेईन असे म्हणणे वा पराभव होताच मत्सराने जळफळणे हे काही खेळाडूपणाचे लक्षण नाही. खेळात ही वृत्ती शोभत नाही. तशी वृत्ती असेल तर तो धंदा होईल, खेळ राहणार नाही. कर्माच्या फलाचा त्याग म्हणजे काय हे लक्षात यावे म्हणून मी हे सांगत आहे.

कर्माच्या फलाचा उपभोग घेण्याचा आग्रह न धरता त्याविषयी आसक्ती न ठेवता कर्तव्यकर्म प्रामाणिकपणे करीत राहणे हे त्यागाचे लक्षण.

कर्मफलाचा त्याग करा असे म्हटल्यानंतर कर्माची फळे तरी कोणती, कशी असतात? हे जाणून घेणे आवश्यक होते. आणि मग त्यांच्या त्यागाविषयीचा योग्य तो निर्णय घेता येतो. हे लक्षात आणून देण्यासाठी भगवान् पुढील श्लोकात सांगत आहेत.

**अनिष्टमिष्टं मिश्रं च त्रिविधं कर्मण: फलम् ।**
**भवत्यत्यागिनां प्रेत्य न तु संन्यासिनां क्वचित् ।।१२।।**

इष्ट–हवे वाटणारे, हितकर; अनिष्ट–दु:खदायक, हानिकर; आणि मिश्र सुखदु:खाची वा लाभहानीची उण्या–अधिक प्रमाणात मिश्रणे असलेले असे कर्माचे फल तीन प्रकारचे असते. या तीनही प्रकारच्या कर्माचा भोग जो आसक्त आहे त्याच्या वाट्याला येतो. जो त्यागी म्हणजे संन्यासी आहे त्याला कर्माचे कोणतेच फल भोगावे लागत नाही.

संन्यास आणि त्याग हे दोन्ही शब्द एकाच अर्थाचे आहेत. हा भाव या श्लोकातून स्पष्टपणे व्यक्त झाला आहे. असो.

मनुष्याच्या हातून घडणारी प्रत्येक कृती ही कोणत्या ना कोणत्या तरी प्रकारच्या फलामध्ये परिणत होणे हाच नियम आहे. फळ कदाचित् व्यक्त असेल कदाचित अव्यक्त असेल, कृतीचे परिणाम लगेच दिसतील, कदाचित् त्यासाठी दीर्घकालही लागेल, पण कृती म्हटले की तिचे, कर्म म्हटले की

त्याचे काही ना काही फल असणारच. अर्थातच जसे कर्म तसे त्याचे फल. हा नियमही वरील नियमाच्या आधारे गृहीत धरावा लागतो. आणि यामुळेच करावे की करू नये यासंबंधीचा निर्णय करणे सोपे जाते.

कर्माची फले तीन प्रकारची असतात. म्हणून कर्मेही तीन प्रकारची असणे स्वाभाविक आहे. ज्या कर्माचे फल चांगले असते ते कर्मही चांगले असते. ते पुण्य म्हणून ओळखले जाते. ज्याचे फल वाईट त्याचे कर्मही वाईट. त्यालाच आपण पाप म्हणतो. आणि काही कर्मे चांगल्या-वाईटाचे मिश्रण अशीही असतात. क्वचित एकाच कर्मात ही मिसळ असते. क्वचित लगोलग केलेल्या दोन कर्मांचे फल संमिश्र स्वरूपात निर्माण होऊ शकते. अशा कर्माविषयी किंवा कर्मफलाविषयी ज्याच्या अंत:करणात आसक्ती असते, त्याला हे वा ते असे कर्मफल भोगावेच लागते. या संदर्भात पाप-पुण्य ही संकल्पनाच नैसर्गिक नाही, कृत्रिम आहे, मनुष्यकृत आहे, असा बुद्धिवाद केला जातो. ही मंडळी निर्बंधाच्या (कायद्याच्या) विषयी असे का म्हणत नाहीत ते लक्षात येत नाही. निर्बंध तर पूर्णपणे मनुष्यकृत आहेत. मग ते पाळणे किंवा मोडणे हा अपराध का ठरावा?

पापपुण्यादी कर्माचा संबंध इहलोकाप्रमाणे परलोकाशी आणि पुनर्जन्माशीही जोडलेला असल्यामुळे या मनुष्यकृत संकल्पना परलोकाशी संबंधित का असाव्यात? असाही प्रश्न विचारला जातो. पाप-पुण्य हे मनुष्याने कल्पिलेले आहे. परलोक काही तसा नाही. मग त्यांचा परस्परसंबंध काय? असाही तर्क केला जातो. येथे यावर उत्तर म्हणून एवढेच सांगणे शक्य आहे की, विशिष्ट कर्मांना पाप किंवा पुण्य हे नाव देणे हे केवळ मनुष्यकल्पित आहे असे गृहीत धरले तरी ती कृत्ये करावयास लावण्याच्या मागच्या प्रेरणा आहेत त्या मात्र कामक्रोध या विकारातून किंवा औदार्य, संयम या सद्‌गुणातून निर्माण झालेल्या असतात. म्हणून त्यांची वाईट वा चांगली फळेही माणसास भोगावी लागतात.

पाप-पुण्यासंबंधीचा सविस्तर विचार ''मना पापसंकल्प सोडोनि द्यावा'' या श्लोकावरील विवरणात मनोबोध या ग्रंथात आलेला आहे.

चांगल्याचे चांगलेपण आणि वाईटाचे वाईटपण माणसाला कधी उमगतच नाही असे सहसा होत नाही. पण रागद्वेषादी कारणांनी तो बरी-वाईट कृत्ये

करीत असतो आणि त्याचे बरे-वाईट परिणामही घडत असतात. वाईट कृत्यांमुळे दु:ख वाट्यास येणे, नरकयातना भोगणे, पशुपक्ष्यादी नीच योनीत जन्मास येणे अशा प्रकारची वाईट फळे भोगावी लागतात. चांगल्या कर्मामुळे, पुण्यामुळे सुख मिळणे, स्वर्ग लाभणे, देवत्व प्राप्त होणे अशी चांगली फळे अनुभवास येतात. चांगल्या-वाईटाच्या वा पाप-पुण्याच्या मिश्रणाने मनुष्यजन्म येतो असे शास्त्र सांगते. पापपुण्य प्रमाणत: सारखे झाले म्हणजे मनुष्यजन्म येतो असे मानले जाते ते योग्य नाही. कारण तसे असते तर प्रारब्धामुळे लाभणारी सुखदु:खे तरी सगळ्या माणसात सारखीच दिसली असती. तसे दिसत नाही हे उघड आहे.

मनुष्यजन्माचे एक वैशिष्ट्य प्रत्येकाने लक्षात ठेवणे आवश्यक आहे. मनुष्य भोगात परतंत्र असला तरी कर्मात स्वतंत्र आहे. ब्रह्माचा शोध घेण्याचे बुद्धिसामर्थ्य त्याचे ठिकाणी ईश्वराने ठेवलेले आहे. म्हणूनच त्याला कार्यामागचे कारण शोधण्याची जिज्ञासा स्वभावत:च असते. विज्ञानक्षेत्रातील सर्व प्रगती या जिज्ञासेमुळे आणि तिच्यायोगानेच केलेल्या सातत्याच्या प्रयत्नामुळे झालेली आहे. कार्यामागील कारणाचा शोध हा भौतिकाच्या दिशेने जातो तेव्हा त्यातून संशोधक आणि शास्त्रज्ञ निर्माण होतात. त्या ज्ञानाच्या बळावर सुखसोयी देणारी वा वाढविणारी साधने प्राप्त करून घेता येतात. कार्यकारणामागचा हा शोध जेव्हा अध्यात्माच्या दिशेने वाटचाल करतो तेव्हा संत-सत्पुरुष निर्माण होतात. आणि त्यांच्या उपदेशानुरूप केलेल्या वर्तनाने शांती, समाधान, प्रसन्नता यांचा लाभ होतो. यात काही विकृती निर्माण झाल्यास भौतिकात शोषण, अस्वास्थ्य, संघर्ष यांची निर्मिती होते. आणि अध्यात्मात वंचना, दंभ, अकर्मण्यता, अश्रद्धा यांची वाढ होते.

मनुष्य निसर्गत:, स्वभावत: वाईट नाही. या जन्मीच्या वा प्राक्तनकर्माच्या संस्कारामुळे तो वाईट होतो, स्खलनशील होतो. त्याचे मनही मुळात सत्त्वगुणी आहे. रजोगुण, तमोगुण हे तसे उपरे आहेत. पण जन्मोजन्मींच्या संस्काराने ते स्वभावत: असल्यासारखे वाटतात. संतांनीही सारी मनुष्यजात स्वभावत: भजनशील असल्याचे सांगितले आहे. माणसाने त्याला लाभलेल्या बुध्दीचा उपयोग करून चांगल्या-वाईटाचा निर्णय केला पाहिजे. आणि वाईटाकडून चांगल्याकडे, चांगल्याकडून अधिक चांगल्याकडे शरीर-मन-बुद्धीने सतत

प्रगत होत राहिले पाहिजे. त्या दृष्टीने सातत्याने प्रयत्नशील राहणे हीच साधना आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या योग्यतेचे महात्मे वगळले तर प्रत्येक माणसाच्या ठिकाणी उण्या-अधिक प्रमाणात काही चांगले, काही वाईट असे असतेच. काही गुण दैवी संपत्तीचे, काही गुण आसुरी संपत्तीचे. याला अपवाद नसतो म्हटले तरी चालेल. म्हणून तर उपनिषदातील थोर ऋषींनी ''यानि अस्माकं सुचरितानि तानि त्वयोपास्यानि नो इतराणि'' असे अगदी स्पष्टपणे आपल्या अनुयायांना सांगितले आहे. गुरू म्हणून आमच्यातील वाईट गोष्टीचे, आमच्या दुर्गुणांचे अनुकरण करू नका. जे चांगले असेल त्याचाच स्वीकार करा. त्यातच कल्याण आहे. असे हे थोरांचे सांगणे आहे. पण माणूस ते फारसे लक्षात ठेवीत नाही. चांगल्या श्रेष्ठ व्यक्तीच्या ठिकाणी एखादा दोष आढळताच त्याच्याविषयी अनादराची भावना बाळगली जाते. ''हा कशाचा मोठा?'' असे म्हणून तिरस्काराने त्याला टाळले जाते किंवा ''ते अमके-तमके मोठे आहेत, लोकांमध्ये त्यांना प्रतिष्ठा आहे, तेही असे करतात. आम्ही तेच केले तर दोषी म्हणून आमची निंदा का करता?'' असेही विचारले जाते. माझा एक मित्र होता. निर्व्यसनी होता. पुष्कळ वर्षांनी आमची भेट झाली, तेव्हा त्याला धूम्रपान करताना पाहिले. मी त्याला विचारले- ''अरे, हे व्यसन तुला केव्हा लागले?'' तो म्हणाला- ''माझे वडील गेले. त्यांना हे व्यसन होते. त्यांची आठवण म्हणून मी हे पत्करले. '' मी म्हणालो- ''अरे, तुझे वडील नियमाने संध्या, पूजा, वैश्वदेव करीत. त्यावाचून जेवीत नसत. दासबोधाचे दोन समास तरी प्रतिदिनी वाचीत. वडिलांची स्मृती राहावी म्हणून त्यांतले काही करतोस का?'' तो नाही म्हणाला. कारण हा साम्यवादी. साम्यवादात वडिलांची आठवण ठेवणे तरी कसे बसते कोणास ठाऊक?

माणसाचे हे असे असते म्हणून स्वाध्याय-प्रवचनाने गीतेसारखे ग्रंथ जाणून घ्यावे लागतात.

कर्माचे बरे-वाईट फळ भोगावे लागू नये म्हणून तर गीता त्यागाचा, संन्यासाचा स्वीकार करावा असे आवर्जून सांगत आहे. निष्काम कर्मयोग हेही या त्याग-संन्यासाचेच स्वरूप आहे. कोणतेही प्राप्त कर्म-आसक्ती न धरतां, फलाकांक्षा न ठेवता केले म्हणजे त्याचा लेप लागत नाही. हा सिद्धांतच या श्लोकात निराळ्या शब्दात सांगितला आहे.

वर वर पाहता प्राप्तकर्म, कर्तव्यकर्म, विहितकर्म, नियतकर्म हे इष्ट–अनिष्ट–मिश्र अशा स्वरूपाचे असू शकते. अवस्थाभेदाने बाह्यरूपांत बघताना इष्टाचे अनिष्ट, शुद्धाचे मिश्र किंवा याउलटही वाटू शकते.

श्रीभीष्माचार्य आणि भगवान् श्रीकृष्ण यांच्या चरित्रातील अनेक घटना या दृष्टीने विचारात घेण्यासारख्या आहेत.

भगवान् श्रीकृष्ण तर ईश्वराचे पूर्णावतार. तेव्हा त्यांच्या जीवनाचा विचार करणे हे मानवाच्या बुद्धिमत्तेला पेलणे जरा अवघडच. पण विषय लक्षात येण्याच्या दृष्टीने काही गोष्टींचा उल्लेख करतो. गोपगोपींचे कृष्णावर विलक्षण प्रेम. कृष्णप्रेमाने गोपी कृष्णासाठी वेड्या होत. उलट भगवानही त्यांच्या विरहाने विव्हल होत असत. गोपगोपींच्या प्रतिमांची ते आराध्यदैवत समजून पूजा करीत असे वर्णन परंपरेत केलेले आढळते. पण गोकुळातून एकदा बाहेर पडलेले भगवान् श्रीकृष्ण पुन्हा गोकुळात गेलेले नाहीत. जिवलगांना न भेटणे हे कर्म तसे अनिष्टच समजले पाहिजे.

मी हातात शस्त्र धरणार नाही, अशी श्रीकृष्णाची प्रतिज्ञा होती. शाल्वाच्या वधानंतर त्याने ती केलेली होती. त्यानंतर महाभारतीय युद्ध झाले. प्रतिज्ञापालनासाठी श्रीकृष्णाने अर्जुनाचे केवळ सारथ्य पत्करले. शस्त्रधारी होऊन युद्धात प्रत्यक्ष भाग घेतला नाही. असे असताना भीष्माचार्यांच्या शरवर्षावाने जेव्हा अर्जुन घायाळ होऊन मूर्च्छित झाला, तेव्हा अर्जुनाच्या मूर्च्छेने व्याकूळ झालेले भगवान् क्रोधाविष्ट होऊन सुदर्शन चक्र घेऊन भीष्मावर धावले. भगवंताचे ते भक्तवत्सल दिव्य रूप पाहून भीष्मांचे अंत:करण भक्तिभावाने उचंबळून आले. या प्रसंगाचे यथार्थ वर्णन श्री. वामन पंडितांनी उत्कृष्ट रीतीने केले आहे.

''असा येता देखे रथ निकट तो श्यामल हरी ।
तदा गांगेयाच्या उठति हृदयी प्रेमलहरी ।।
शराते चापाते त्यजुन वदला गद्गद् रवे ।
जगन्नाथे केले मज सकल लोकात बरवे ।।''

भीष्म म्हणाले – भगवन् ! तुझ्या हातून मरण येत आहे. तेव्हा हे माझे परमभाग्य आहे. या कृपाप्रसादाने माझे जन्मोजन्मीचे पुण्य सार्थकी लागत

आहे.'' तेवढ्यात अर्जुन सावध झाला. हातात चक्र घेऊन कृष्णाचे भीष्मांवर चालून जाणे त्याने पाहिले. त्याचेही अंत:करण गहिवरले. तो पुढे झाला. त्याने कृष्णास अडविले. आणि म्हणाला – हे तुझे कृत्य ''भूषण तुज परि दूषण आम्हां । हो मागे हो मेघ:श्यामा ।।'' कृष्णाने आपली प्रतिज्ञा मोडावी म्हणजे प्रतिज्ञाभंग करावा ही गोष्ट साधारणदृष्टीने अयोग्य म्हणजे अनिष्टच आहे.

प्रतिज्ञाभंग हे पाप आहे, असे धर्मशास्त्राने सांगितले आहे. उदा. एखादी व्यक्ती प्रायोपवेशणाचा निश्चय करून उपोषणास बसली आणि त्याने ते व्रत मोडले, मृत्यू होईपर्यंत त्याने तो निश्चय टिकवला नाही, तर त्यास पाप लागते असे स्मृतिवचन आहे. मरण टळले हे इष्ट. पण प्रतिज्ञा मोडली, निश्चय सोडला हे अनिष्ट. हे एक प्रकारे मिश्रकर्म झाले.

द्रोणाचार्य–वधप्रसंगी युधिष्ठिर 'नरो वा कुंजरो वा' म्हणाला तेही एक प्रकारे मिश्रकर्मच म्हणता येईल.

पांडवांचा पक्ष न्यायाचा आहे. पांडव सरळ, सज्जन आहेत, सदाचरणी आहेत. त्यांच्या सद्गुणामुळे भीष्माचार्यांचे त्यांच्यावर अलोट प्रेम आहे, तरी हस्तिनापूरच्या सिंहासनाच्या रक्षणाशी प्रतिज्ञेने बांधलेले असल्यामुळे भीष्माचार्य दुर्योधनाच्या पक्षाने पांडवांशी युद्ध करण्यास उभे आहेत. तेही एक प्रकारे अनिष्ट कर्मच आहे.

रामायणातील वालीवध, शंबूकवध, सीतात्याग ही श्रीरामाची कृत्ये, बिभीषणाने आपल्या भावाचा, रावणाचा पक्ष सोडून शत्रुपक्षास, श्रीरामास मिळणे ही कृत्येही वरवर पाहता अनुचित म्हणजे अनिष्ट वाटणारीच आहेत. श्रीशिवाजीमहाराजांचे सुरत लुटणे, अफझलखानास फसवून जावळीत आणणे व त्यास ठार मारणे हे राजकारणही अशोभनीय म्हणजे अनिष्ट वाटणारेच आहे.

परंतु या अनिष्टकर्मामुळे श्रीरामचंद्र, श्रीकृष्ण, भीष्माचार्य, छत्रपती शिवराय यांच्या थोरवीस थोडाही बाध आलेला नाही. आजही बहुजनसमाजाच्या अंत:करणांत नांदणारा त्यांच्याविषयीचा भक्तिभाव, प्रेमादर तसाच उज्ज्वल आहे. विलक्षण आत्मीयतेने विलोभनीय झालेला आहे.

निष्काम भावनेने कर्तव्यकर्म करणाराला अनिष्ट कर्माचाही कसा लेप लागत नाही ते यावरून सिद्ध होते.

अनिष्ट आणि मिश्र अशा कर्माच्या फलाचा त्याग का करावा ते काहीसे

लक्षात येते. पण इष्ट अशा कर्माच्या सुखदायक फलाचा त्याग का करावा, असे वाटणे शक्य आहे. हा विषय थोडा समजून घेतला पाहिजे. इष्ट अशा कर्माची फले सुखदायक असतात हे खरेच. सहजपणे वाट्यास आलेले असे सुख नाकारलेच पाहिजे असे नाही. तसा आग्रह धरणे हेही एक प्रकारे अयोग्यच आहे असेही म्हणता येईल. परंतु साधकदशेत या विषयाचा विचार थोडा वेगळ्या रीतीने केला पाहिजे. अनुकूलता असल्यामुळे सुख हवेहवेसे वाटते, बरे वाटते, समाधान लाभते. त्यामुळे प्रसन्नताही मिळते. पण या सर्व गोष्टी अनुकूलतेमुळेच त्यांच्याविषयीची आसक्ती वाढविण्यासही सहाय्यभूत होतात. आणि तसे झाले की कर्तव्य हे केवळ कर्तव्य राहत नाही, तर ते कामनापूर्तीसाठी केलेल्या कर्माच्या पातळीवर उतरते. यासाठीच सत्त्वगुणाला भगवंतांनी ''सुखसंगेन बध्नाति'' असे म्हटले आहे. सावध राहावे लागते ते या बंधक होणाऱ्या आसक्तीपासून. न्याय्य मार्गाने मिळणाऱ्या सुखाचाही मोह होऊ शकतो. आणि हा मोह केवळ सुखाच्या मोहात परिणत होऊन कळत-नकळत न्याय्य मार्गापासून दूर नेतो. आणि तसे झाले की अनाचारात केव्हा येऊन पोचलो हे माणसाला कळत नाही. ''जयाची जीवे घेती विवसी । तेचि जडोनि ठाके जीवेसि । चुकविता ते गिवसी । तया ते चि ।।'' (ज्ञाने. ३/२३७) असे होते म्हणून इष्ट कर्माच्या फलापासूनही दूर राहावे लागते.

संपूर्णपणे निष्काम भावनेने कर्म केले आणि कर्माच्या फळाविषयी कोणतीही आसक्ती ठेवली नाही म्हणजे तो माणूस संसारातून मुक्त होतो. त्याचे पापही संपते आणि पुण्यही संपते. कोणत्याही बऱ्या-वाईट कर्माचा त्याला लेप लागत नाही. तो त्यागी, संन्यासी किंवा मुक्त होतो. जीवन्मुक्त होतो. पण हे सर्व तो करीत असलेल्या कर्मावर आणि त्यामागील हेतूवर अवलंबून असते. कर्म हे असे अत्यंत महत्त्वाचे असल्याने भगवान् कर्माचे स्वरूप लक्षात आणून देत आहेत. ते म्हणतात-

**पञ्चैतानि महाबाहो कारणानि निबोध मे ।**
**सांख्ये कृतान्ते प्रोक्तानि सिद्धये सर्वकर्मणाम् ।।१३।।**

कोणतेही कर्म तडीस जाण्यासाठी वेदान्तशास्त्राने त्याची पाच कारणे सांगितलेली आहेत. हे पराक्रमी अर्जुना, ती कोणती ते सांगतो, ते नीट जाणून घे.

मनुष्याच्या हातून जे काही कृत्य घडते त्याच्या मागे पाच प्रकारची कारणे असतात. कर्म चांगले-वाईट, श्रेष्ठ-कनिष्ठ कसेही असले तरी त्या प्रत्येकामागे हे पाच प्रकार कारण म्हणून असायचेच.

या श्लोकातील ''सांख्ये '' म्हणजे सांख्यशास्त्रात म्हणजेच वेदान्तशास्त्रात, तत्त्वज्ञानात. ''कृतान्ते'' शब्दाच्या अर्थाविषयी मात्र बरेच मतभेद आहेत. ''कृतान्त'' शब्दाने कुणी कर्माची परिणती, कुणी निश्चयात्मकता इत्यादी इत्यादी अर्थ केले आहेत. मला ''कृतयुगाचे शेवटी'' असा अर्थ ''कृतान्ते'' शब्दाचा करावासा वाटतो.

कृतयुगात सर्वच माणसे सदाचरणी आणि परिपूर्ण आदर्श जीवन जगणारी अशी होती. सर्वच धर्माचरणाने वागत असत. त्यामुळे आचाराला वळण लावणारे शास्त्र त्यांना सांगण्याची आवश्यकताच नव्हती. धर्म हा माणसाचा आहार-निद्रे-प्रमाणेच नैसर्गिक स्वभाव आहे, अशी आपली धारणा आहे. ती कृतयुगामध्ये आपल्या सर्व आंगोपांगासह तेजस्वीपणे नांदत होती. कृतयुगाच्या शेवटी जडपणा, आळस, संग्रह, लोभ असे विकार क्रमाक्रमाने वाढत गेले. आणि मग माणसाचे वर्तन नियंत्रित करण्यासाठी चांगले-वाईट, योग्यायोग्य, हितकर-अहितकर यांची ओळख पटविणाऱ्या शास्त्राची आवश्यकता उत्पन्न झाली. अर्थातच माणसाच्या हातून घडणाऱ्या कृत्याचे यथातथ्य विश्लेषण करून त्यांचे मूल्यमापन करण्याचा प्रसंग आला. कृत्य कसे घडते, कसे सिद्धीला जाते ते विवेचिले गेले. हे तत्त्वच भगवान् पुढील श्लोकात स्पष्ट करीत आहेत.

**अधिष्ठानं तथा कर्ता करणं च पृथग्विधम् ।**
**विविधाश्च पृथक् चेष्टा दैवं चैवात्र पञ्चमम् ।।१४।।**

अधिष्ठान म्हणजे कर्म ज्या ठिकाणी घडायचे ते क्षेत्र, कर्ता म्हणजे कर्म करणारा, करण म्हणजे कर्म करण्यासाठी लागणारी साधने, आणि चेष्टा म्हणजे कर्म करण्यासाठी कराव्या लागणाऱ्या हालचाली. या चार गोष्टी कर्म करण्यासाठी लागतात. याच्या बळावर कर्म सिद्ध व्हायचे असते. त्यात यश येण्यासाठी दैव अनुकूल असावे लागते.

कर्माची उत्पत्ती, कर्माची सिद्धी यासंबंधीचे हे, पाच प्रकारची कारणे

सांगणारे ज्ञान अत्यंत महत्त्वाचे आहे, हे श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी अत्यंत रसाळपणे सूचित केले आहे. अर्जुना! ही महत्वाची गोष्ट समजून घेण्यासाठी तुला इतर कोणाकडे जाण्याचे कष्ट घेण्याचे कारण काय? चिद्रत्न, चैतन्यघन, मूर्तिमंत ज्ञानस्वरूप असा जो मी तो तुझ्या अगदी हातात सापडल्यासारखा आहे. ''आणि मुखांतरी आइकीजे । तैसे कायसे हे ओझे । मी चिद्रत्न तुझे । असता हाती ।।'' (ज्ञाने.१८/२८२) असे वर्णन श्रीज्ञानोबाराय करतात.

खरोखरीच हा विषय फार महत्त्वाचा आहे. मनुष्य म्हटला की त्याने या विषयाचे ज्ञान प्राप्त करून घेऊन त्यावर चांगले चिंतन केले पाहिजे. कर्म आणि कर्माचा फलभोग यांतून माणसाची कधी सुटका होत नाही. त्यामुळे प्रत्येक क्षेत्रामध्ये हे ज्ञान माणसाच्या जीवनभर उपयोगी पडणारे आहे. प्रपंच करा, परमार्थ करा किंवा समाजसेवा करा, जे काही कराल ते उत्कृष्ट व्हावे असे वाटत असेल तर कर्मामागच्या या पाचही कारणांचा विचार योग्य रीतीने केला असलाच पाहिजे.

भाष्यकारांनी हा सर्व श्लोक केवळ अध्यात्मपर लावला आहे. अधिष्ठान म्हणजे शरीर, कर्ता म्हणजे जीव, करण म्हणजे इंद्रिये, चेष्टा म्हणजे प्राणादांचे व्यापार आणि दैव म्हणजे इंद्रियांचे नियंत्रण करणाऱ्या देवता. वाणीची देवता अग्नी, डोळ्याची देवता सूर्य, हाताची देवता इंद्र इत्यादी. दैवाचा अर्थ अदृष्ट, भाग्य, सर्वान्तर्यामी परमात्मा असाही केला गेला आहे. तत्त्वत: हा अर्थच योग्य आहे. अत्यंत श्रेष्ठ पातळीवरच्या साधकाच्या दृष्टीने तो उपयुक्तही आहे. पण ''ज्याचे ऐहिक धड नाही!'' अशा पायरीवरच्या आपणासाठी या श्लोकाचा थोडा वेगळ्या रीतीने विचार करणे उपयोगी पडेल. जीवनधारणेच्या दृष्टीने सर्वांत श्रेष्ठ उद्योग असलेल्या शेती या व्यवसायाच्या उदाहरणाने आपण हे पाच प्रकार जाणून घेण्याचा प्रयत्न करू.

शेत हे येथे अधिष्ठान, कार्यक्षेत्र. जे पीक घ्यायचे त्या दृष्टीने भूमी अनुकूल असली पाहिजे. करण म्हणजे शेतीला लागणारी साधने– नांगर, वखर, बैलजोडी इत्यादी. विविध चेष्टा म्हणजे नांगरणे, पेरणे, तण काढणे इत्यादी. कर्ता म्हणजे स्वत: शेतकरी. कर्मासाठी आवश्यक असलेल्या या चार गोष्टी माणसाच्या हातातल्या आहेत. ओसाड माळरानासारखे नापीक क्षेत्रही दीर्घकालीन कुशल प्रयत्नाने फळाफुलाने, धान्यादींनी समृद्ध करता

येते. शेतीसाठी लागणारी नाना प्रकारची साधने योग्य रीतीने जमवता येतात. ही साधने वापरण्याचे, कुशलतेने वापरण्याचे तंत्रज्ञानही अवगत करून घ्यावे लागते. आणि त्यासाठी स्वत: कर्ता कष्टाला न कंटाळणारा, प्रयत्नशील, धीराचा, दक्ष आणि हालचालीचे चांगले कौशल्य असणारा असावा लागतो. इतर तीन कारणांतले दोष कर्ता नाहीसे करू शकतो. म्हणून कर्ता अधिक महत्त्वाचा. कर्ता महोद्यमी असल्यास साधने नसली तर मिळविणे, असली तर अधिक चांगली करणे हे साधू शकते. पाचवे दैव. ते मात्र माणसाच्या हातातले नाही. शेतीच्या दृष्टीने विचार केल्यास दैव हे पावसासारखे आहे. शेतीसाठी आवश्यक ती सर्व दक्षता घेऊन, परिश्रम करूनही वातावरण जर अनुकूल राहिले नाही, पाऊस जर योग्य वेळी आणि पुरेसा पडला नाही, तर पीक हाती लागत नाही. तेव्हा दैव हे पाचवे कारणही मानावेच लागते. तर्क(टी) बुद्धीच्या बळावर दैव नाकारण्याचा कितीही प्रयत्न केला तरीही त्याचा प्रभाव असतो. अनेक वेळा ते होत्याचे नव्हते करण्याइतके समर्थ ठरते, हे नाकारण्यात अर्थ नाही. दैवाचे अस्तित्व मान्य केल्यामुळे माणूस हा दैववादी, निष्क्रिय होतो; ''असेल माझा हरी तर देईल खाटल्यावरी'' असे म्हणू लागतो. म्हणून प्रयत्नशीलतेला बळ मिळण्याच्या दृष्टीने दैव नाकारणेच चांगले असा युक्तिवादही केला जातो. यात थोडेसे तथ्य आहे हे खरे, पण अस्तित्वात असलेली गोष्ट, सत्य, जे काही आहे ते केवळ सोईसाठी नाकारणे हे काही खऱ्या अर्थाने शहाणपणाचे नाही.

दैवाचे स्वरूप नीट जाणून घेतले तर दैववादी निष्क्रिय होणे, आळशी होणे शक्यच नाही. उलट तो निराश न होता अधिक प्रयत्नशील होऊ शकेल. दैववादी मनुष्य निष्क्रिय होण्याची जशी शक्यता असते, तसा अपयश आले तर प्रयत्नवादी निराशेने पार उद्ध्वस्त होतो असेही घडू शकते. प्रयत्न कितीही योग्य रीतीने केलेले असले, तरी यशाची शाश्वती देता येत नाही. त्यामुळे हताश होण्याचा प्रसंग ओढवतो. दैवाचे स्वरूप यथार्थतेने जाणून घेतले तर हा धोका टळतो.

दैव, प्रारब्ध किंवा अदृष्ट हे काही केवळ योगायोग नव्हे, तो काही अपघात नव्हे. ती यदृच्छाही नव्हे. पूर्वी कधी तरी केलेले, माणसाच्या हातून घडलेले कर्म पुढे दैव म्हणून प्रगट होत असते. ''पूर्वजन्मकृतं कर्म

दैवमित्यभिधीयते'' असे एक शास्त्रवचन आहे. त्यावरून हे लक्षात येईल. दैव हा प्रत्येक वेळी पूर्वजन्मकृतकर्माचा परिपाक असतो असे समजण्याचे कारण नाही. ''अत्युत्कटै: पापपुण्यै: इहैव फलमश्नुते'' असेही एक शास्त्रवचन आहे. दैवाचे परिणाम प्रत्यक्ष भोगण्याचा जेव्हा प्रसंग येतो त्यावेळी त्यावर जरी माणसाचे नियंत्रण नसले तरी दैव हा पूर्वी केलेल्या कृत्यांचा परिणाम असल्याने कृत्ये करताना सावधपणा बाळगून, सर्वदा चांगलीच कर्म करीन असा निश्चय करून दुर्दैवाचे प्रसंग ओढवणार नाहीत अशी व्यवस्था करणे शक्य आहे. तसेच ''बली पुरुषकारोहि दैवमप्यतिवर्तते'' असेहि एक सुभाषित प्रसिद्ध आहे. तदनुसार दैवाचे अस्तित्त्व मान्य करूनही प्रयत्नाला प्रोत्साहन मिळू शकते. हे काहीसे रोग, त्याची कारणे आणि त्यावरील उपचार यांसारखेच आहे. माणूस आरोग्याचे नियम पाळीत नाही. त्यामुळे त्याची प्रतिकारशक्ती उणावते. त्यामुळे रोग होतो. मग तो त्यावर औषधोपचार करतो. रोगाचे बळ कमी असले तर योग्य औषधोपचाराने गुण येतो. रोग असाध्य असला तर सर्व प्रकारचे उपचार वाया जातात. व्याधी बरा होणारा नाही अशी कल्पना असली तरी माणूस त्यावरील उपचार बहुधा कधी थांबवीत नाही. तीच गोष्ट दैव आणि प्रयत्न यांच्यासंबंधात ध्यानात ठेवली पाहिजे.

दैव अनुकूल आहे की प्रतिकूल आहे, ते बलवान आहे की दुर्बल आहे, हे मनुष्याला कधी समजणारे नाही. तेव्हा ते जसे असेल तसे असो, असे म्हणून आपल्या स्वाधीन असलेल्या अधिष्ठानादी चार गोष्टी साक्षेपाने अवलंबिल्या पाहिजेत. यासाठीच पूर्ण आस्तिक असलेल्या संतांनाही ''असाध्य ते साध्य करिता सायास । कारण अभ्यास तुका म्हणे ।।'' अशी प्रयत्नाची महती अनेक ठिकाणी गायिलेली आहे. एक संस्कृत सुभाषितही त्या दृष्टीने बोधप्रद आहे. ''सुखस्य दु:खस्य न कोऽपि दाता । परो ददाती कुबुद्धिरेषा ।। अहं करोमीति वृथाभिमान: । स्वकर्मसूत्र: ग्रथितोहि लोक: ।।'' सुखदु:ख इत्यादी सगळेकाही माणसाच्या कर्मावर अवलंबून असते. दुसऱ्या कोणामुळे तरी चांगले किंवा वाईट वाट्यास येते असे मानणे ही दुर्बुध्दी आहे, ते अज्ञान आहे, तो अपसमज आहे. 'केले म्हणून काय झाले? त्याचे भोग मी टाळू शकेन, मला तेवढे सामर्थ्य आहे, ' असे म्हणून कसेही वागणे हे उद्धट अहंकाराचे लक्षण आहे; असा या सुभाषिताचा अर्थ आहे. कोणाच्या आशीर्वादाने चांगले होते वा कोणाच्या

शापाने बिघडते यात काही अर्थ असलाच तर तो फार फार मर्यादित आहे. आशीर्वादाने चांगले होण्यासाठीही काही पुण्यसंचय गाठीला असावा लागतो. आणि शापाने वाईट होते त्यामागेही स्वत:चे काही दोषच कारणीभूत असतात. म्हणजेच स्वकर्माचे सूत्र तेथेही उपलब्ध असतेच. म्हणून माणसाने जेवढे काही आपल्या हातात आहे, उन्नती-प्रगती-विकासाच्या दृष्टीने वाटचाल करण्याच्या दृष्टीने जे काही आवश्यक आहे त्याचे ज्ञान मिळवून, साधने गोळा करून आपली असेल ती शक्ती पणाला लावली पाहिजे. साक्षेप ठेवला पाहिजे. धीर सुटू देता कामा नये. अखंड सावधान राहिले पाहिजे.

दैव मान्य असलेल्या आपल्या परंपरेतसुद्धा मनुष्याला आदेश दिला आहे तो प्रयत्नशीलतेचाच. ''उद्योगिनं पुरुषसिंहमुपैति लक्ष्मी: । दैवेन देयमिति कापुरुषा वदन्ति । दैवं निहत्य कुरुपौरुषमात्मशक्त्या । यत्ने कृते यदि न सिध्यति कोऽत्र दोष: ।।'' पराक्रमाने उद्योग करणाऱ्या पुरुषाला यश प्राप्त होत असते. दैवावर अवलंबून राहणे भ्याडपणाचे आहे. आपले प्रयत्न दैवाच्या वरचढ होतील असे असले पाहिजेत. प्रयत्न करूनही सिद्धी मिळाली नाही तर तो काही कोणाचा दोष नाही. अर्थातच योग्य ते प्रयत्न न करणे हा दोष आहे, मोठा अपराध आहे. श्रीज्ञानेश्वरमाउलीही ''म्हणोनि अभ्यासासी काही । सर्वथा दुष्कर नाही ।'' (ज्ञाने. १२/११३) अशीच अभ्यासाची म्हणजे प्रयत्नाची महती गातात. समर्थ रामदास स्वामीही ''केल्याने होत आहे रे । आधी केलेचि पाहिजे । यत्न तो देव जाणावा । अंतरी धरितां बरे ।।'' असाच आदेश आवर्जून देतात.

तात्पर्य, कर्म सिद्धीस जाण्यासाठी दैव हे पाचवे कारण असले तरी आपल्या स्वाधीन असलेली आधीची चार कारणे योग्य त्या रीतीने विचारपूर्वक अवलंबिली पाहिजेत. कारण कोणत्याही कर्माच्या मागे हीच पाचही कारणे निश्चयाने असतात. हेच भगवान् पुढील श्लोकात सांगत आहेत. ''द्विर्बद्धं सुबद्धं भवति ।'' दोन गाठी दिल्या की घट्टपणा येतो. हीच भूमिका पुन्हा एकदा सांगण्यामागची असावी.

**शरीरवाङ्मनोभिर्यत्कर्म प्रारभते नर: ।**
**न्यायं वा विपरितं वा पञ्चैते तस्य हेतव: ।।१५।।**

मनुष्य शरीराने, वाचेने वा मनाने जे जे काही कर्म करतो ते न्यायाचे असो वा त्याचे उलट असो; त्याच्या मागे हीच अधिष्ठानादी पाच कारणे असतात.

शरीराने कर्माला आवश्यक ती हालचाल होते. वाचेने मनुष्य बोलतो. त्यात निंदा-स्तुती, सत्य-असत्य, उचित-अनुचित यांचा समावेश होतो. मनाने नाना प्रकारचे संकल्प-विकल्प केले जातात. अशा रीतीने या सर्व कायिक, वाचिक, मानसिक कर्माच्या पाठीमागे मागील श्लोकात सांगितलेल्या **अधिष्ठान, कर्ता, करण** म्हणजे हत्यारे, साधने, **चेष्टा** म्हणजे योग्य त्या हालचाली आणि **दैव** हीच पाच कारणे असतात. श्रीज्ञानेश्वर महाराजांनी या श्लोकावरील भाष्यात ''हेतू'' चा अर्थ उद्दिष्ट असा केला असावा असे वाटते. पण त्या विवेचनाचे मर्म माझ्या नीटसे लक्षात आले नाही. असो.

अधिष्ठान म्हणजे क्षेत्र चांगले निवडावे. यात उद्योग, व्यवसाय, संप्रदाय यांचा विचार करावा. आधी शास्त्रदृष्टी विचारात घ्यावी आणि मग अनुकूलता, प्रतिकूलता वा आवड किती आहे, कशी आहे ते पाहावे. कर्ता म्हणजे आपण स्वत:. यात ज्ञान, धैर्य, निष्ठा आणि प्रयत्नशीलता हे गुण विचारात घ्यावेत. साधने योग्य त्या प्रतीची आणि विविध प्रकारची अशी असावीत. ती नीटनेटकी आणि कार्यक्षम असावीत. चेष्टा म्हणजे हालचाली. ज्या अधिष्ठानावर जे कर्म करायचे आहे, ते करण्यासाठी आवश्यक त्या साधनांचा उपयोग योग्य त्या रीतीने, कौशल्याने करणे. हे सर्व जिथे ज्यासाठी असावयास पाहिजे तिथे त्यासाठी तसे यथायोग्य रीतीने असले म्हणजे जे कर्म करायचे ते (कर्म) चांगल्या रीतीने सिद्धीस जाऊ शकते. दैव प्रत्येक वेळी प्रतिकूलच असेल असे गृहीत धरायचे कारण नाही. ते तटस्थही असू शकते आणि अनुकूलही असू शकते. अनुकूल किंवा प्रतिकूल दैवाचे बलाबल असेल त्याप्रमाणे कर्माचे यशापयश उणे-अधिक होऊ शकते. म्हणून मनुष्याने दैवाचा विचार फलापुरता करावा. यश मिळाले तर दैव अनुकूल होते, मिळाले नाही तर दैव प्रतिकूल होते असे समजावे. असे मानण्यामुळे यशाने अहंकार बळावत नाही आणि मनुष्य अपयशाने हताश होत नाही.

अधिष्ठानादी चार गोष्टी स्वाधीनच्या असल्या तरी त्याच्या बळावर करायचे कर्म कोणते असावे, हे ठरविण्याचे स्वातंत्र्य माणसाला आहे. त्या बळावर तो, योग्य कृती करावी, चांगले असेल त्याप्रमाणे वागावे, अन्याय्य,

वाईट असेल ते टाळावे, हा निर्णय घेऊ शकतो. माणसाचे मोठेपण त्याच्या या योग्य निर्णयावरच ठरायचे असते.

देवी सीतेच्या चरित्रातील एक प्रसंग या दृष्टीने लक्षात येण्यासारखा आहे.

दंडकारण्यातून सीतेला पळवून आणून रावणाने तिला अशोकवनात डांबून ठेवले होते. तिने वश व्हावे म्हणून तो अनेक प्रकारे तिचा छळ करीत होता. सीतेचा शोध घेण्याकरिता लंकेत आलेल्या मारुतीची आणि सीतेची भेट झाली. सीतेची अवस्था पाहून मारुतीचे अंत:करण कळवळून आले. सीतेला नमस्कार करून मारुतराय म्हणाले– ''मातुश्री! आपली ही दशा पाहवत नाही. आपण माझ्या खांद्यावर बसा. मी आपणांस एका उड्डाणात श्रीरामचंद्रांचे जवळ नेऊन पोहोचवितो.'' खरे म्हणजे ही संधी फार चांगली होती. पण महापतिव्रता सीतेने, क्षत्रियकुलाला भूषणभूत असलेल्या त्या धरणीमातेच्या कन्येने, ही संधी नाकारली. ती गंभीरपणे म्हणाली– ''मारुती! तुझ्या सामर्थ्यावर माझा विश्वास आहे, पण मी अशी येणार नाही. कोण्याही परपुरुषाच्या शरीराला मी स्वत:च्या इच्छेने कधी स्पर्श केला नाही. रावणाने मला उचलून आणले ते माझ्या इच्छेविरुद्ध, बळाने. त्या वेळी मी अनाथ आणि आगतिक असल्याने माझे काही चालले नाही. आताचा प्रसंग वेगळा आहे. मी माझ्या इच्छेने निर्णय घेऊ शकते. तेव्हा तू म्हणतोस त्या पद्धतीने मी येणार नाही. दुसरे असे की रावणाने मला पळवून आणले. या नीच अपराधाची कठोर शिक्षा त्याला मिळालीच पाहिजे. रामचंद्रांनी स्वपराक्रमाने रावणाचा नाश करून मला येथून घेऊन गेले पाहिजे. तसे होणे रामचंद्राला भूषणभूत आहे.'' सीतेची थोरवी असा योग्य निर्णय घेण्यातच आहे. सर्वसाधारण व्यक्तीच्या अपेक्षेने सीतेचे हे उदात्त वर्तन हिमालयाच्या अत्युच्च शिखराची उंची गाठणारे आहे. सीतेच्या उज्ज्वल चारित्र्याची महत्ता युगायुगातूनही प्रेमादराने गायिली जाते. मनुष्यमात्राची जीवने प्रभावित होतात. मनुष्याला प्राप्त असलेले कर्मातील स्वातंत्र्य त्याला केवढ्या उच्च पदावर पोचवू शकते ते यावरून स्पष्ट होईल.

मनुष्याला कर्मात स्वातंत्र्य आहे, तर मग दैवाचे महत्त्व काय? आणि ''बुद्धि: कर्मानुसारिणी'' असे म्हणतात त्याचा अर्थ काय समजावा? असाही एक प्रश्न या संदर्भात अनेकांच्या मनात उपस्थित होतो. हा विषयही समजून घेण्याचा प्रयत्न करणे उपयुक्त आहे. दैवाचे महत्त्व काय? कर्म आणि दैव

यांत प्राधान्य कोणाला? या विषयाचा थोडासा विचार यापूर्वी आपण केला आहे. शेतीच्या उदाहरणाने, रोगाच्या उदाहरणाने हे काहीसे समजण्यासारखे आहे. उदाहरणे संपूर्णपणे जशीच्या तशी लागू पडत नाहीत हे खरे. पण विषय समजण्याच्या दृष्टीने त्यांचा पुष्कळ प्रमाणात उपयोग होऊ शकतो. प्रत्येक कर्म सफल झालेच असते तर कर्माचे प्राधान्य निर्विवाद सिद्ध करता आले असते. पण तसे कधी होत नाही. म्हणून दैवाचे अस्तित्व मान्य करावेच लागते. दैव तटस्थ, अनुकूल, प्रतिकूल अशा तीन प्रकारांत राहते. परिणामाच्या दृष्टीने दैवाचे बलाबलही महत्त्वाचे ठरते. तटस्थ हे प्रतिकूल नसल्यामुळे अनुकूलातच समाविष्ट करावे असेही म्हणता येईल. पण कर्माला कर्म म्हणून स्वत:चे काही मूल्य आहे हे लक्षात येणार नाही. पाणी संथ आहे, प्रवाह अनुकूल दिशेने आहे, प्रवाह प्रतिकूल दिशेने आहे, प्रवाहाचा वेग किती आहे, पोहणाराची शक्ती केवढी आहे, याचे जसे, कुठे जायचे आहे त्या स्थलाच्या दृष्टीने महत्त्व आहे, तसेच कर्माच्या दृष्टीने दैवाचे होते. सुखाने पोचण्यापासून बुडून मरण्यापर्यंत सगळे प्रकार संभवतात. पण दैव हे अज्ञात असते आणि अज्ञातच राहणारे असते, त्याचे ज्ञान केवळ फलाच्या वेळीच व्हायचे असते. आरंभी ते कधीही व्यक्त होत नाही. म्हणून आहे तेवढ्या कर्मस्वातंत्र्याचा लाभ घेऊन मनुष्याने प्रयत्नवादीच राहिले पाहिजे. तरच 'असे कर' आणि 'असे करू नकोस' सांगणारे वा चांगल्या-वाईटाचा विवेक शिकवणारे शास्त्रग्रंथ उपयुक्त ठरतील. मनुष्याला कर्मस्वातंत्र्य थोडेही नसेल तर श्रुति, स्मृति, पुराणे किंवा दासबोध, गाथा, ज्ञानेश्वरी इतकेच नव्हे, तर निरनिराळ्या प्रकारच्या शिक्षणसंस्था आणि सर्व प्रकारचे अध्ययन-अध्यापन हे सारे व्यर्थ ठरले असते. पण ते तसे नाही हे आपण सर्वच चांगल्या प्रकारे अनुभवितो. यावरून माणसाला काही प्रमाणात तरी कर्मामध्ये स्वातंत्र्य आहे ही गोष्ट सिद्ध होते.

कर्म करणे वा न करणे आपल्या इच्छेवर अवलंबून आहे. इच्छेनुसार आपण कृती करू शकतो. मग ''बुद्धिः कर्मानुसारिणी'' म्हणजे काय? याचे उत्तर थोडक्यात द्यायचे तर आधीच्या कर्माचे संस्कार बुद्धीवर होतात. आणि मग त्या संस्कारानुरूप इच्छा होते हे लक्षात घेतले पाहिजे. जेवणाचे उदाहरण कुठेही सांगण्यासारखे आणि सर्वांच्या अनुभवाचे. आज एखाद्याला चिवडा खाण्याची इच्छा झाली. ही का झाली? आणि ती योग्य का अयोग्य, याचा

जरा बारकाव्याने विचार केला म्हणजे ''बुद्धिः कर्मानुसारिणी'' कर्मानुरूप बुद्धी होते हा विषय समजून घेण्यास सहाय्य होईल. ज्याने चिवडा कधी पाहिला नाही, खाल्ला नाही किंवा चिवड्याविषयी ऐकलेही नाही त्याला चिवडा कितीही खमंग स्वादिष्ट असला तरी तो खावा अशी इच्छा होत नाही. पुढे आला तरी खाल्ला पाहिजे असे वाटत नाही. पण तोच पूर्वी कधी खाल्ला असेल, आवडला असेल तर चिवडा खावा अशी इच्छा होईल आणि चिवडा मिळवून खाल्ला जाईल. कारण चिवड्याची चव जिभेने घेतली आहे आणि ती चव जिभेला रुचली आहे. जिभेला ते आकर्षण निर्माण झाले आहे. त्याचे संस्कार बुद्धीवर आहेत. म्हणून वरचेवर चिवडा खाण्याची इच्छा होणे स्वाभाविक आहे. ''बुद्धिः कर्मानुसारिणी'' ती हीच. रजोगुण-तमोगुणाच्या रूपाने हे संस्कार या जन्माप्रमाणेच जन्मोजन्मीचेही असू शकतात आणि त्यातून राजस-तामस स्वरूपाच्या इच्छा निर्माण होतात. पण कर्माच्या स्वातंत्र्याला येथेही वाव असू शकतो. वरील उदाहरणच पुढे चालवून असे म्हणता येईल की, चिवडा खाण्याची इच्छा झाली, पण आरोग्यशास्त्राचे ज्ञान आहे, त्या वेळी तो मनुष्य विचार करील की लागोपाठ ३-४ दिवस चिवडा खाणे चांगले नाही. आज पोट ठीक नाही. आज तरी चिवडा नको. पोट दुखत असताना कोणी चिवडा पुढे आणून ठेवला, तरी सुज्ञ मनुष्य चिवडा खाणार नाही. पण चिवड्याच्या खमंगपणाचे फारच वर्णन ऐकले, मित्रमंडळींनी आग्रह केला तर एखाद-दुसरा घास घेऊन तो थांबेल. त्या वेळी एक मन म्हणेल एखादा दिवस आणखीन पोट दुखेल. चिवडा फारच चांगला आहे खा, त्या वेळी दुसरे मन म्हणेल, चिवड्याच्या लोभाने, पोटदुखीचा त्रास आणखी एक-दोन दिवस वाढविणे शहाणपणाचे नाही. तरी खाऊ नकोस. इच्छा निर्माण झाली तरी कर्मस्वातंत्र्याला अवसर कसा असतो याकरिता हे उदाहरण दिले.

माणसाला कर्मस्वातंत्र्य असू शकते, म्हणूनच अत्यंत प्रिय असलेल्या महापतिव्रतेचा, सीतेचा प्रभु रामचंद्राने लोकरंजनासाठी त्याग केला. त्यामुळे रामचंद्राच्या अंत:करणाला ज्या वेदना झाल्या, त्या केवळ रामचंद्र म्हणूनच सहन करू शकले. असो. कर्म आणि दैव किंवा प्रयत्न आणि दैव यांच्या तारतम्याचा वाद, श्रेष्ठ-कनिष्ठतेचा वाद हा न मिटणारा वाद आहे. उभयपक्षाने सांगता येण्यासारखे पुष्कळ आहे. पण योगवासिष्ठासारखा वेदान्तविषयावरील

श्रेष्ठ ग्रंथ प्रयत्नालाच महत्त्व देतो हे लक्षात घेण्यासारखे आहे.

दैवाचा विचार करताना कर्माच्या संचित, क्रियमाण आणि प्रारब्ध या तीन प्रकारांपैकी प्रारब्ध म्हणजे दैव असे म्हणता येते. आणि ते अटळ असते हे लक्षात ठेवले पाहिजे. भक्तीच्या आणि ज्ञानाच्या क्षेत्रात काही वचनांच्या आधारे ज्ञान्याला प्रारब्ध नसते वा भक्ताच्या प्रारब्धाचा नाश होतो अशा अर्थाची वचने आढळतात. ती तत्त्वज्ञानाच्या परमोच्च दृष्टीने यथार्थ असतात. आणि ज्ञानी भक्ताची अंतर्मुखता लक्षात घेतली म्हणजे त्याच्या अनुभवाच्या दृष्टीने वास्तव ठरतात. पण व्यवहाराच्या पातळीवर प्रारब्ध कोणाला टळत नाही, या विचारात बाध येण्याचे कारण नाही. अनेक थोरा-मोठ्यांचे इतिहास आणि संतमहात्म्यांची, भगवद्‌भक्तांची चरित्रे नीटपणे विचारात घेतली म्हणजे हे समजेल. सज्जनांवर आपत्ती कोसळतात आणि दुर्जनांना सुखविलासाचा लाभ होतो अशी उदाहरणे भूतकालातही पुष्कळ होती, वर्तमानकालातही आढळून येतात, आणि भविष्यकालही याला अपवाद ठरणार नाही. ''दैवं चैवात्र पंचमम्'' असे म्हणावे लागते ते यामुळेच. दैवावर आपले नियंत्रण नसते आणि प्रयत्न आपल्या हातात असतात म्हणून माणसाने यथाशक्ती, यथामती प्रयत्नांचीच कास धरली पाहिजे. मग तुमचे क्षेत्र व्यवहाराचे असो की परमार्थाचे असो. परमार्थात तर अधिक प्रयत्नवादी असले पाहिजे, अशीच सर्व संतमहात्म्यांची शिकवण आहे. असो.

शरीर, वाणी, मन यांच्याद्वारा केल्या जाणाऱ्या कर्मासाठी अधिष्ठानादी पाच कारणांचा विचार केला पाहिजे, हा विषय आपण समजून घेत आहोत. यात शरीराने होणाऱ्या कर्मासाठी पाचही कारणे कशी उपयुक्त होतात ते आपण पाहिले. पण वाणीने आणि मनाने होणाऱ्या या कर्मासाठी या पाचांचा - सगळ्यांचा उपयोग आहे काय? विशेषत: करण म्हणजे साधने, या वाणी, मनाच्या कर्मासाठी आवश्यक कशी? अशी एक लहानशी शंका येते. त्याचे उत्तर असे की मी वाणीने बोलतो. मनाने विचार करतो म्हणून ''मी'' हा येथे कर्ता हे उघड आहे. ज्या विषयावर मी बोलत असेन वा ज्या विषयावर मी चिंतन करत असेन ते वाणी-मनाच्या कर्माचे अधिष्ठान. विचार करण्यासाठी मनावर झालेले संस्कार व स्मृती यांचे सहाय्य होत असते. म्हणून ते संस्कार व स्मृती हे मनाचे करण. माझे म्हणणे पटवून देण्यासाठी मी जी जी उदाहरणे

सांगतो किंवा थोरांची वचने उद्धृत करतो किंवा स्थूलपणे बोलायचे झाले म्हणजे वर्णाचे अर्थात् शब्दाचे माध्यम स्वीकारतो, त्यासाठी कंठ, जीभ, तालु, दात, ओठ या अवयवांचे सहाय्य घेतो ही सर्व वाणीची करणेच आहेत. मनाच्या दृष्टीने विवेक आणि वाणीच्या दृष्टीने वक्तृत्व यांचा समावेश ''चेष्टा'' या कारणात करावा. योग्य वेळी योग्य ते सुचणे आणि जे सुचले ते परिणामत: योग्य ठरणे हे मनाचे दैव आणि श्रोता प्रभावित होणे हे वाणीचे दैव.

कोणत्याही कर्माच्या निर्मितीसाठी आवश्यक असलेली अधिष्ठानादी पाच कारणे सांगून होताच बुद्धीला एक मोठा धक्का देणारा विचार भगवान् पुढील श्लोकात सांगत आहेत.

**तत्रैवं सति कर्तारमात्मानं केवलं तु यः ।**
**पश्यत्यकृतबुद्धित्वान्न स पश्यति दुर्मतिः ।।१६।।**

असे असताना जर कुणी अविचाराने उपाधिरहित केवल असे असलेल्या आत्म्याला कर्ता मानीत असेल तर (असे मानणे ही दुर्बुद्धी आहे) त्या खुळ्याला काही समजत नाही असे मानले पाहिजे.

कर्माच्या निर्मितीसाठी अधिष्ठानादी पाच कारणे सांगितली आहेत. असे असताना जो कोणी आत्म्याला कर्ता मानतो तो चूक करतो, त्याला काही समजत नाही. तो अकृतबुद्धी आहे, दुर्मती आहे असे भगवान् म्हणतात.

अकृतबुद्धी म्हणजे ज्याने काही विचार केलेला नाही. जो विवेक करीत नाही, ज्याने कशाचा अभ्यास केलेला नाही, ज्याच्या अनुभवाचे क्षेत्र अत्यंत संकुचित आहे, ज्याने कशाकरिताही कष्ट घेतले नाहीत, तप केलेले नाही, ज्याने चांगले ऐकलेले नाही, पुष्कळ वाचलेले नाही, जे वाचले ऐकले त्याचे चिंतन-मनन केलेले नाही, निदिध्यासन कशाला म्हणतात हे ज्याला ठाऊकही नाही, असा जो कोणी तो अकृतबुद्धी. कारण त्याच्या बुद्धीवर चांगले संस्कार झालेले नसतात. त्यामुळे बुद्धी तेजस्वी होत नाही. आणि तिचे विवेक सामर्थ्य वाढत नाही. हे असे व्हावे म्हणून जो काही प्रयत्नही करीत नाही तो अकृतबुद्धी.

अगदी वेडे किंवा बावळे असलेले दुर्दैवी लोक सोडून द्या, पण इतर प्रत्येक माणसाला उण्या-अधिक प्रमाणात बुद्धीचा लाभ झालेला असतोच. पण या बुद्धीचे सामर्थ्य वाढविण्यासाठी शिक्षण, सत्संगती, सद्ग्रंथांचे वाचन

इत्यादींच्या द्वारा बुद्धीचे सामर्थ्य वाढवावे लागते. योग्य व्यायामाने जसे शरीराचे सामर्थ्य वाढते तसेच हे आहे.

कोणताही विषय चांगला समजणे, समजलेला विषय लक्षात राहणे, योग्यायोग्याचा निर्णय घेणे, सावधपणा बाळगणे हे बुद्धीचे सामर्थ्य चांगले वाढलेले असले म्हणजे मग ऐकण्याचा, वाचनाचा, अनुभवाचा, संतसमागमाचा चांगला लाभ करून घेता येतो. सत्य काय ते नेमके उमगते. निष्ठा दृढ राहते, आणि कसे वागावे ते कळते. अर्थातच मग तसे आचरणही घडते. पण या दृष्टीने आपली प्रगती व्हावी म्हणून कोणी जाणीवपूर्वक प्रयत्न करीत नाही. सहजासहजी जे घडेल, वयोमानाने जे जे उमगेल तेवढ्याच बळावर माणूस आपले व्यवहार कसेतरी सांभाळीत राहतो.

वैचारिक आक्रमणांचा आघात झालेला नव्हता, नाना प्रकारची प्रलोभने भोवती पसरलेली नव्हती, जीवन सामान्यतः एकमार्गी होते, तेव्हा बुद्धी सुसंस्कृत होण्यासाठी विशेष काही प्रयत्न केले नाहीत तरी भागत होते. कारण परंपरा मोडण्याचा उठवळ उद्योग विशेषसा घडत नव्हता. परंतु अलीकडे ही परिस्थिती पालटलेली आहे. बुद्धिवादाच्या नावाखाली आपल्या परंपरेत मान्य म्हणून स्वीकारलेल्या प्रत्येक गोष्टीच्या संबंधात प्रश्नांचे आणि संशयाचे काहूर माजविण्यात येत आहे. आणि त्यामुळे बुद्धी सुसंस्कृत राहील वा सुसंस्कृत होईल अशी स्थिती उरलेली नाही. काहीतरी वेगळे, काहीतरी नवीन करणे वा मानणे याचेच आकर्षण निर्माण झालेले आहे.

एका साहित्यिकाने असे म्हटले आहे की विसाव्या वर्षी तुम्ही साम्यवादी विचाराचे नसलात आणि चाळीसाव्या वर्षी तुम्ही साम्यवादी विचाराचे राहिलात तर तुमच्या बुद्धीत काही दोष आहे असे निश्चित समजा. हे काय प्रकरण आहे? साम्यवादी विचार योग्य असेल, सत्य असेल, हितकर असेल तर तो चाळीसाव्या वर्षी पटेनासा होतो असे का घडावे? आणि तो तसा नसेल म्हणजे असत्य असेल, अहितकर असेल तर विसाव्या वर्षी तरी तो का पटावा ? विसाव्या वर्षी बुध्दी अप्रगल्भ असते आणि चाळीसाव्या वर्षी ती प्रगल्भ होते कारण वीस वर्षांच्या अनुभवाचा परिणाम म्हणून तसे घडून येते, असे म्हणायचे आहे काय? तसे असेल तर बुद्धी अप्रगल्भ असणे हा गुण मानता येईल का? विसाव्या वर्षी साम्यवाद न पटणे हा दोष कसा? बुद्धीची अप्रगल्भता ही

केवळ वयावर आणि दीर्घकालावरच अवलंबून राहावी का? तेव्हा हे म्हणणेच अयोग्य आहे. खरे तर बुद्धिमत्ता जी काही आहे तिचा व्हायचा तो विकास अगदी बालपणीच पूर्ण झालेला असतो. पुढे शिक्षणादींनी, अभ्यासाने जे काही व्हायचे असते ते संस्काराच्या स्वरूपाचे असते. रत्नाला पैलू पाडण्यासारखे हे प्रकरण आहे. क्वचित् वयामुळे ते आपोआप घडत असेल, पण ते इष्ट नाही म्हणून तर ''कौमारं आचरेत् प्राज्ञः धर्मान् भागवतानिह'' असे आपले शास्त्र सांगते. तेथे कुमारही प्राज्ञ आहे, असतो, असू शकतो हे गृहीत धरलेले आहे. म्हणून तर त्याने कसे वागावे हे सांगितले आहे. तरुणपणी बुद्धिमत्ता कमी असते असे नसते, तर तारुण्याच्या उन्मादात मोहाला बळी पडण्याची प्रवृत्ती अधिक होते. दुष्परिणाम होतात ते या मोहाचे. श्रवण, वाचन, मनन, परंपरेला मान देण्याची नम्रता इत्यादीने या मोहातून सुटणे तरुणपणीही शक्य आहे. तेव्हा बुद्धी सुसंस्कृत होईल असा प्रयत्न आवर्जून केला पाहिजे. त्यामुळे सत्य काय ते उमगते.

सत्य काय ते न उमगल्यामुळेच अशा अकृतबुद्धीलाच दुर्मती, दुर्बुद्धी, दुष्टबुद्धी म्हणण्याचा प्रसंग येतो, कारण त्यामुळे हित दुरावते, हानी होते. अध:पात होऊ शकतो. सत्य समजून घेण्यासाठी बुद्धी सुसंस्कृतही असावी लागते आणि श्रद्धावानही असावी लागते. म्हणूनच गीतेने ''श्रद्धावान् लभते ज्ञानम्'' असे म्हटले आहे.

अलीकडे बुद्धिवादाने श्रद्धा हाच थट्टेचा आणि टवाळीचा विषय बनविलेला आहे. आणि परंपरेत असलेल्या व परंपरेतून आलेल्या प्रत्येक गोष्टीभोवती संशयाचे काहूर माजविले आहे. एखादी गोष्ट पारखून घ्यावीशी वाटणे आणि तशी ती घेणे यात काही दोष नाही. मग केवळ परंपराच तेवढी पारखून घ्यावी आणि संशय निर्माण करणारा तथाकथित बुद्धिवाद पारखून घेऊ नये असे तरी का घडावे? परंपरेविरूद्ध संशय उत्पन्न करणारा तर्क योग्य म्हणून जसाच्या तसा स्वीकारणे ही तरी श्रद्धाच नाही काय? ही अशी श्रद्धा तेवढी योग्य असे म्हणता येणार नाही. सत्याजवळ पोचायचे तर श्रद्धा आणि तर्क या दोन पावलांनीच वाटचाल केली पाहिजे. बुद्धी जी सुसंसकृत होते ती सर्व श्रवण-वाचन-मनन-श्रद्धा-तर्काच्या बळावर पारखून घेतल्यानेच. हीच कृतबुद्धी. अशी ज्याची नसते तो अकृतबुद्धी. मळक्या आरशावर प्रतिबिंब जसे

उमटत नाही तसे अकृतबुद्धीला सत्य उमगत नाही.

आत्मा अकर्ता आहे हे जाणणे, हे सत्य. त्याच्यावर कर्तृत्व लादणे ही चूक आहे. तो अज्ञानाचा, मोहाचा, अहंकाराचा परिणाम आहे. आपण ज्याला ''मी मी'' समजतो ते वस्तुत: आत्मस्वरूप आहे. आत्म्यालाच आपण कधी सोईने तर कधी अज्ञानादीने 'मी' असे समजत असतो. व्यवहाराच्या दृष्टीने ते उपयुक्तही ठरते. पण ते तत्त्वत: तसेच मानणे योग्य नसते. म्हणून तिसऱ्या अध्यायात भगवंतांनी ''प्रकृते: क्रियमाणानि गुणै: कर्माणि सर्वश: । अहंकार विमूढात्मा कर्ताहमिति मन्यते ।।'' असे म्हटले आहे. तेथे अंहकार विमूढात्मा म्हटले; येथे अकृतबुद्धी म्हटले, दुर्मति म्हटले. शब्दार्थ थोडे वेगळे असले तरी भाव तोच आहे.

अधिष्ठानामध्ये जो कर्माचा कर्ता सांगितला आहे, तो जीव आहे. तो महत्त्वाचा पण पूर्णपणे स्वतंत्र नाही. पाचापैकी एक आहे. कर्माच्या निष्पत्तीसाठी त्याला इतर चारांचे सहकार्य असावे लागते. हा जीव अहंकाराने स्वत:कडे कर्तृत्व घेतो, जो वास्तविक प्रकृतीचा प्रभाव असतो कारण जीवाचा जीवपणा मन-बुद्धी-अहंकारामुळे प्रत्ययास येत असतो. मन-बद्धी-अहंकार यांची उपाधी नसेल तर जीवाच्या ठायी असलेले चैतन्य हे शुद्ध आत्मरूपच आहे. आत्मा केवल आहे, म्हणजेच निर्गुण आहे, निरुपाधिक आहे, शुद्ध आहे अर्थातच निरंजन आहे, अलिप्त आहे. आत्मा असा असल्याने कर्माचे कर्तृत्व त्याला लागू शकत नाही. हे समजावे म्हणून एक उदाहरण सांगतो.

एखाद्या वेड्याने मनुष्याची हत्या केली तर त्याला मनुष्यवधाच्या अपराधाखाली दोषी ठरविण्यात येत नाही. म्हणजे कृती घडली तरी कर्तृत्व नाही असेच मानले जाते. एखादा अधिकारी-शासकीय अधिकारी अत्यंत भ्रष्टाचारी असतो. तो शासकीय अधिकारी असतो म्हणूनच भ्रष्टाचार करू शकतो. काही राजकीय शासन, राजकीय सत्ता त्याचे ठिकाणी नसेल तर त्याला भ्रष्टाचार करता येणार नाही. पण म्हणून कोणी शासनाला, राजसत्तेला, त्या त्या प्रकरणात भ्रष्ट मानीत नाही. भ्रष्टाचार सिद्ध झाला तर तो त्या व्यक्तीचा अपराध समजला जातो. त्या व्यक्तीला शिक्षा होते. आत्म्याचे अकर्तृत्व लक्षात येण्याच्या दृष्टीने या उदाहरणाचा उपयोग होईल. आत्म्याच्या सत्तेने सर्व काही होते म्हणणे निराळे आणि आत्माच सर्व काही करतो म्हणणे

निराळे. क्रिया घडतात त्या आत्म्याच्या चैतन्य शक्तीने हे खरे, पण त्यामुळे आत्म्याला कर्तृत्व चिकटवणे योग्य नाही. जिवंत माणसालाच रोग होतात म्हणून जिवंतपणा हे रोगाचे कारण आहे, असे म्हणता येत नाही. अयोग्य आहारविहार हे रोगाचे कारण असते तसेच आत्म्याकडे कर्माचे कर्तृत्व जाऊ शकत नाही. आणि त्यामुळेच कर्माचे दोषही आत्म्याला लागत नाहीत. ते कसे ते श्रीभगवान् पुढील श्लोकात सांगत आहेत.

**यस्य नाहंकृतो भावो बुद्धिर्यस्य न लिप्यते ।**
**हत्वापि स इमाँल्लोकान्न हन्ति न निबध्यते ।।१७।।**

ज्याच्या ठिकाणी अहंकाराचा भाव नाही आणि ज्याची बुद्धी कर्माविषयीच्या आसक्तीने लिप्त झालेली नसते; त्याच्या हातून सर्व लोकांची हत्या घडली तरी त्याला, त्याने हत्या केली असे म्हणता येत नाही, किंवा त्या हत्येचे पापही त्याला बाधत नाही.

वरवर पाहता या श्लोकाच्या अर्थामुळे हत्येला, हिंसाचाराला प्रोत्साहन मिळते असे वाटेल, पण तसे वाटणे योग्य नाही. श्लोकाचे उद्दिष्ट नीट समजून घेतले म्हणजेच हे कळेल. उदाहरणावरून गोष्ट चांगली लक्षात येते म्हणून व्यवहारात घडणाऱ्या काही घटनाच आपल्यापुढे ठेवतो.

शस्त्रवैद्य (सर्जन) जो आहे, तो रोग्याच्या शरीरातून अनेक प्रकारे रक्तस्राव घडवून आणीत असतो. हातपाय तोडून टाकतो. कित्येक वेळा शस्त्रकर्माचा परिणाम म्हणून मृत्यूही घडतो. शस्त्रकर्म केले नसते तर रोगी काही अधिक दिवस जगला असता असे म्हटले जाते. कोणाला घायाळ करणे हा सुद्धा अपराध आहे. पण शस्त्रवैद्याला कोणी त्या अपराधाखाली दोषी ठरवीत नाही.

हीच गोष्ट न्यायाधीशाची. हत्यारा आपल्या आयुष्यात एखाद-दुसऱ्या व्यक्तीला ठार करीत असेल तर न्यायाधीश आपल्या सेवा कालात चार-पाच किंवा अधिकही लोकांना मृत्युदंड देत असेल. हत्या करणे वा मृत्युदंड देणे या दोनही गोष्टीत माणूस मरतो हे सारखेच आहे. पण हत्यारा तिरस्कारार्ह आणि अपराधी मानला जातो, तर न्यायाधीशाला समाजाचा हितचिंतक आणि गौरवास्पद मानले जाते. म्हणजे कृती घडूनही शस्त्रवैद्य किंवा न्यायाधीश ''न हन्ति न निबध्यते'' याच कोटीत येतात.

कोणत्याही कर्माच्या दृष्टीने कृतीपेक्षा भूमिकेचे महत्त्व लक्षात घ्यावे लागते. हत्या करण्यामागे द्वेष, चीड, संताप, स्वार्थ, लोभ हे अहंकारातून निर्माण होणारे भाव कार्यकारी असतात. न्यायाधीश मृत्युदंड देतो किंवा शस्त्रवैद्य रक्तस्राव करतो तेव्हा त्याच्या मनात चीड-संतापादी कोणतेही विकार नसतात. उलट न्यायाधीशाला समाजाचे स्वास्थ्य टिकवायचे असते. त्यासाठी धाक बसवून दुष्टावा नियंत्रित करायचा असतो तर, शस्त्रवैद्याला रोग्याला आरोग्य मिळवून द्यायाचे असते. म्हणून कृतीचे सारखेपण असतानाही त्यांना दोषी न मानता आदरणीय मानले जाते. त्यामुळे या श्लोकाचा अर्थ दांभिकपणे करून अनाचाराला त्या योगाने प्रेरणा मिळते असे म्हणता येणार नाही.

ज्याच्या अंत:करणात अहंकार नाही आणि ज्याला कशाचीही आसक्ती नाही असा थोर पुरुष कोणत्याही अगदी लहानशाही संहाराला उगीचच्या उगीच प्रवृत्त होणार नाही. संहार हा ज्या वेळी अपरिहार्य कर्तव्य म्हणून ठरेल त्या वेळी तो माघारही घेणार नाही. जगाच्या पाठीवर जे संहार व्यापक प्रमाणात घडले आहेत असे दिसते, त्यामागे कोणाचा ना कोणाचा तरी उद्दाम अहंकार कारणीभूत आहे असेच आढळते. चेंगीझखान किंवा भारताच्या वाट्यास आलेले अनेक मुसलमान आक्रमक किंवा अलीकडच्या काळातील स्टॅलीन, हिटलर, माओ यांसारखे गाजलेले नेते यांनी केलेले संहार हे काही अपरिहार्य कर्तव्यात मोडणारे नाहीत. त्यांतील काहींनी राष्ट्रसंवर्धनाचे फसवे कारण आपल्या कृत्याला ढालीसारखे वापरले असले, तरी त्यांच्या मनातील सत्तालालसा हीच या क्रूर कर्मामागे उभी होती, हे आता त्यांचेच उत्तराधिकारी ओरडून सांगू लागलेले आहेत.

सत्य-अहिंसेच्या भोंगळ तत्त्वज्ञानाला हत्या या शब्दाचेच वावडे असल्याने ते काय वाटेल ते म्हणोत आणि साधनशुचितेचा दांभिक आग्रह धरोत, पण अपरिहार्य कर्तव्य म्हणून हिंसाही आवश्यक ठरते यात शंका नाही. अफजलखानासारखा दुष्ट-क्रूरकर्मा सत्ताधारी ज्या वेळी स्वराज्यावर आक्रमण करतो त्या वेळी श्रीशिवरायांना त्याला कोणत्याही पद्धतीने ठार मारणे हेच आवश्यक असते. अपरिहार्य होते. ''न हन्ति न निबध्यते'' हे विधान छत्रपती शिवाजी महाराजांच्या कृतीतून स्पष्ट होण्यासारखे आहे. त्यामुळेच अभिमानाने गौरवावा असा इतिहास महाराष्ट्रात घडला आणि भावी पिढ्यांसाठी आदर्शही

ठरला. उलट शस्त्रकर्म करताना रक्तस्राव होतो म्हणून ती हिंसा ठरते या धारणेने बुद्धाने जीवकासारख्या त्या काळच्या अत्यंत कुशल वैद्याला कोणतेही शस्त्रकर्म करू नकोस, तीही हिंसाच आहे असे सांगितले. त्यामुळे अनेक शस्त्रसाध्य रोगी मृत्यू पावले असतील आणि वैद्यकाची एक शाखा अप्रगत राहिल्याने जी राष्ट्रीय हानी झाली असेल ती वेगळीच.

अहिंसेचा उल्लेख गीतेने एक श्रेष्ठ गुण म्हणून १३व्या अध्यायातील दैवी संपत्तीत केला आहे. आणि तरी गीता ''मामनुस्मर युध्य च'' असे म्हणते, हे लक्षात ठेवले पाहिजे. 'मामनुस्मर' म्हणण्यामध्येच अहंकार नसणे आणि बुद्धी आसक्तिरहित ठेवणे ही स्थिती सुचविली जाते. निदान तसे होण्यास भगवंताच्या स्मरणाचे सहाय्य तरी होतेच होते.

अहंकार आणि आसक्ती यांच्यामुळेच सर्व प्रकारच्या वाईटाचा, दुष्कृतीचा वा पापाचा आरंभ होत असतो. आपण मात्र पुष्कळ वेळा अहंकार आणि आसक्तीमुळेच कर्मांना प्रेरणा मिळत असल्याने व्यवहारात तरी ते भाव सांभाळलेच पाहिजेत असे मानीत असतो. इतकेच नव्हे, तर थोरांच्या जीवनातही ते तसेच असल्याचे सिद्ध करण्याच्या प्रयत्नात असतो. ''अमृतातेहि पैजा जिंके । अैसी अक्षरे रसिके मेळवीन ।।'' असे उद्‌गार श्रीज्ञानेश्वरमहाराज काढतात आणि ''तोवरी तोवरी टिळे माळा भूषण । जव तुक्याचे दर्शन झाले नाही ।।'' असे श्रीतुकाराम महाराजांनी म्हटले आहे. हा त्यांचा अहंकार नाही काय? असे म्हणणारे लोक आहेत. ''माझ्या मनाला एक गोष्ट नेहमी खटकते ती म्हणजे परमेश्वराचा अहंकार.'' असे विधान गीतेच्या संदर्भात श्रीकृष्णाला उद्देशून करणारेही विद्वान आहेत. आमच्या ती. दादांनीही त्यांना गोदाकाठी भेटलेल्या योग्याला अहंकाराच्या संदर्भात असाच प्रश्न विचारला होता. त्या वेळी त्या योग्याने दिलेले उत्तर मी माझ्या ''संतकवि श्रीदासगणू महाराज : चरित्र आणि काव्यविवेचन'' या ग्रंथात उद्‌धृत केले आहे. (पृ.१५६) तो संवाद थोडक्यात असा– ती. दादा म्हणाले– महाराज, अशा तऱ्हेचा अभिमान नसेल, तर सामान्यांच्या हातून कामच होणार नाही. अमुक एक गोष्ट मी करीन असा अभिमान नसेल तर कार्याला प्रेरणा कोणती? योगिराज म्हणाले– व्यवहारी दृष्टीने तुझे म्हणणे ठीक आहे. परंतु तुझ्या ठिकाणी अशी भावना कशी चालेल? ''जै जगा धाकुटे होईजे । तै जवळीक माझी ।।'' ही ओवी

तुला ठाऊक नाही काय? तू असे का म्हणाला नाहीस, की पहा! ईश्वराची सत्ता केवढी अगाध आहे! त्याने आपल्या एका जीवाकरिता मला बिनपैशाचा स्वयंपाकी केले! काम झाले असते आणि अहंकाराचा डागही लागला नसता. हा संवाद पुरेसा बोधप्रद आहे.

''अहं ब्रह्मास्मि'' या महावाक्याचा अर्थहि वस्तुत: 'ब्रह्म आहे मी नाही; मी हे ब्रह्माचेच रूप आहे' असा करावा लागतो, नाहीतर तो सोऽहंभावहि परमार्थ मार्गातील अटकाव, अडथळा ठरू शकतो. 'रहिमन गली है साँकरी दूजो ना ठहराहि । आपु अहै तो हरि नही, हरि तो आपुन नाही ।।' किंवा 'पिया चाहे प्रेमरस राखा चाहे मान । एक म्यान मे दो खड्ग देखा सुना न कान ।।' अशी संतांची हिन्दीतील वचने आहेत. ईश्वराचे प्रेम मिळण्यासाठीही अहंकाररहित व्हावे लागते, हाच भाव या वचनातून प्रगट होतो. त्याच्या सुखासाठी मी की माझ्या सुखासाठी तो या सूक्ष्म वाटणाऱ्या भेदामुळेही ते प्रेम पतिव्रतेचे की जारिणीचे हे ठरवायचे असते. तेव्हा कर्माच्या पाठीमागची प्रेरणा ही अहंकाराची किंवा आसक्तीची नसली की मग ते कर्म वरवर कसेही दिसत असले तरी बाधा आणणारे ठरत नाही. म्हणजे त्या कर्माचा लेप लागत नाही. ते कर्म, करणाराला बाधू शकत नाही. सगळी कर्मे करूनही तो अलिप्त राहतो, मोकळा राहतो. आता कोणतेहि कर्म, कर्म म्हणून घडते कसे? का घडते? ते भगवान् पुढील श्लोकात स्पष्ट करीत आहेत.

**ज्ञानं ज्ञेयं परिज्ञाता त्रिविधा कर्म चोदना**
**करणं कर्म कर्तेति त्रिविधः कर्म संग्रहः ।।१८।।**

जाणणे, जाणून घेण्याची गोष्ट आणि जाणून घेणारा याप्रमाणे तीन गोष्टी कर्माला प्रेरणा देणाऱ्या आहेत. तसेच कृती करणारा, जी करायची आहे ती क्रिया आणि कृतीला आवश्यक ती साधने ह्या तीन गोष्टी कर्माच्या निर्मितीला आवश्यक असतात.

ज्ञानादी तीन गोष्टींनी कर्म करावेसे वाटते. आणि प्रत्यक्ष कर्म करताना करणादी तीन गोष्टी उपयुक्त ठरतात. आपणांस याचे स्पष्ट ज्ञान नसले तरी प्रत्यक्ष व्यवहारात वागताना गोष्टी या क्रमानेच घडत असतात. आपल्या कृत्यांचे नीट विश्लेषण करून पाहिले म्हणजे हे लक्षात येईल.

समजा खेडेगावातला एक श्रीमंत शेतकरी पाटील पुण्या-मुंबईसारख्या मोठ्या नगरात आपल्या एका जुन्या मित्राच्या घरी आला. मित्राच्या घरी त्याने अनेक वस्तू पाहिल्या. दूरदर्शन संच, शीतक (फ्रीज), धुण्याचे यंत्र इत्यादी. त्याने या वस्तू पाहिल्या म्हणजे त्या वस्तू त्याच्या ज्ञेय झाल्या. जाणून घेण्याचे विषय झाल्या. हे काय आहे? यांचा उपयोग काय? अशी कुतूहलाची भावना या पाटलाला झाली आणि त्याच्या मित्राने त्याला ती प्रत्येक वस्तू काय आहे आणि तिचा उपयोग काय होतो हे समजावून सांगितले. हे समजावून सांगणे 'ज्ञान' झाले. वस्तूची ओळख झाली आणि उपयोग समजला. यामुळे हा पाटील आता ज्ञाता झाला. घरचा चांगला संपन्न शेतकरी होता. त्यामुळे त्याला या वस्तू आपल्याही घरी असाव्यात, या उपयोगी आहेत, सुखाच्या आहेत, सोय वाढविणाऱ्या आहेत असे वाटले. आणि त्याने त्या घेण्याचे ठरविले. घेण्याचे ठरविणे हीच प्रेरणा. आता यामुळे या वस्तू घेणे हे कर्म निर्माण होते आणि हा पाटील त्याचा कर्ता होतो. मग रुपये घेणे, दुकानात जाणे, त्या वस्तू घरी आणणे हे सर्व करण. ज्ञेय, ज्ञाता, ज्ञान नसेल तर पुढचे कर्म कधी उत्पन्नच होणार नाही.

केवळ वस्तू समोर येऊनही भागत नाही. कारण त्यामुळे ती वस्तू ज्याला दिसते, तो केवळ पाहणारा ठरेल, द्रष्टा ठरेल. त्यामुळेच त्या वस्तू संबंधी घ्यावे, मिळवावे अशी इच्छा होणार नाही. वस्तू काय आहे? कशी आहे? तिचा उपयोग काय? हे सर्व समजले म्हणजे ज्ञान झाले. आता पाहणारा हा जाणणारा झाला. द्रष्टा ज्ञाता झाला. तेव्हा ज्ञाता-ज्ञेय-ज्ञानापूर्वीही द्रष्टा-दृश्य-दर्शन असावे लागते. पण एवढ्याच पातळीवर थांबणे हे अडाणीपणाचेही ठरू शकते. केवळ तेवढ्यामुळेच कोणत्याही प्रकारच्या प्रगती-उन्नती-विकासाला वाव राहत नाही. मग ते केवळ पशूचे जीवन ठरू शकते. मनुष्यामध्ये भोळाभाबडा ऋष्यशृंग ठरतो.

ऋष्यशृंग हा रामायणकालीन विभांडक या थोर ऋषींचा विद्वान पुत्र. वय चोवीस-पंचवीस. तारुण्याचा भर, यौवनाची कांती, बुद्धिमत्तेचे तेज हे सर्व काही त्याच्याजवळ होते. पण बापाने आपल्या या मुलाला तो सात्त्विक राहावा, धार्मिक राहावा म्हणून सर्व लौकिक व्यवहारापासून कटाक्षाने दूर ठेवले होते. घारीच्या सावधपणाने त्याने या आपल्या लेकराला सांभाळले

होते, वाढविले होते.

महाराजा दशरथ निपुत्रिक असल्याने त्याला पुत्रकामेष्टी यज्ञ करायचा होता. त्यासाठी शुद्ध ब्रह्मचारी असलेल्या तपस्वी पुरुषाची अध्वर्यू म्हणून आवश्यकता होती. ऋष्यशृंग तसा होता. पण तो यावा कसा? त्याला आणणार कोण? हा मोठा प्रश्न होता. अप्सरा अशा कामी कुशल; म्हणून त्यांची नियुक्ती ऋष्यशृंगाला आणण्याच्या कामावर करण्यात आली. त्याप्रमाणे चार-पाच जणी मिळून ऋष्यशृंगाच्या आश्रमात आल्या. ऋष्यशृंगाने कोणी वेगळ्या संप्रदायाचे ऋषी म्हणून त्यांचे स्वागत केले. कारण त्याने स्त्री म्हणून कोणी पाहिलीच नव्हती. त्यामुळे अप्सरा त्याला सहज फसवू शकल्या. अप्सरांच्या नृत्य-गायनाचा ऋष्यशृंगावर काही परिणाम झाला नाही. कारण तो विषय त्याला पूर्णपणे अपरिचित होता. त्याला ते नृत्यगीत म्हणजे प्रार्थनायुक्त काही तंत्रसाधना आहे असेच वाटले. तारुण्यातील त्याचे हे शैशव पाहून अप्सरा आश्चर्यचकित झाल्या. ऋष्यशृंगाने त्यांना विचारले- तुमचा आश्रम कुठे आहे? तुमचा संप्रदाय कोणता? तुमची वल्कले मोठी छान आहेत. ती कुठे सापडतात? तुमचे नाव काय? अप्सरांनी त्याला आपला परिचय करून दिला. त्या म्हणाल्या-

''गलांड ऋषी आमुची जगप्रसिद्ध नामाभिधा । आम्ही निबिड काननी वसत जाण नाही कदा ।। मृगाजिन बसावया तुजप्रति आम्हा मंच तो । उभा तुजपुढे हरि आमुचिया पुढे काम तो ।।'' -(श्रीदासगणुकृत रामजन्माख्यान) त्यांनी त्याला आपण खातो त्या लाडू, करंज्या, कडबोळी, कंदमुळे म्हणून दिली. ऋष्यशृंगाला ती मिष्टान्ने अर्थातच अत्यंत स्वादिष्ट लागली. त्याने कुतूहलाने विचारले ही इतकी चांगली चव असलेली कंदमुळे कोणत्या मातीत पिकतात? अप्सरांनी त्याच्यापुढे कस्तुरी केली. खा, प्या, सुख भोगा हे आमचे तत्त्वज्ञान आहे असेही अप्सरांनी त्याला समजाविले. ऋष्यशृंग त्या नावीन्याला आणि राजस सुखाला तत्संबंधीच्या अज्ञानामुळे भाळला आणि अप्सरांच्यासवे अयोध्येत आला. त्या नगरीचे वैभव पाहून तो गांगरला असणार. पण वसिष्ठांनी त्याला नीट समजावून सांगितले. पुढे दशरथाचा यज्ञ निर्विघ्नपणे पार पडला. द्रष्ट्याचा ज्ञाता व्हावा लागतो हे लक्षात येण्यासाठी ही पुराणकथा मी आपणांस थोड्या विनोदी पद्धतीने सांगितली.

ऋष्यशृंगाला जसे वाढविले तसे वाढविणे हा काही आदर्श होऊ शकत नाही. अगदी प्राथमिक अवस्थेत अशा पद्धतीचा थोडा उपयोग होतो पण सगळे शिक्षणच या प्रकारचे असणे हे अयोग्य आहे. चांगले, चांगले का, हे सांगितले पाहिजे; आणि वाईट, वाईट का, हेही समजावून दिले पाहिजे. चांगले वागणे हे सुद्धा जर जाणीवपूर्वक नसेल, तर प्रगतीची अपेक्षा करता येणार नाही. तेव्हा ज्ञाता, ज्ञेय, ज्ञान ही त्रिपुटी योग्य रीतीने आणि व्यापक क्षेत्रात अवलंबिलीच पाहिजे. ज्ञाता, ज्ञेय, ज्ञान या त्रिपुटीने कर्माला प्रेरणा मिळते हे खरे, पण त्या वेळी मात्र अत्यंत सावध राहणे आवश्यक आहे. कारण चांगले-वाईट, श्रेष्ठ-कनिष्ठ, योग्य-अयोग्य, हितकर-अहितकर हे भेद जितक्या प्रमाणात कर्माशी संबद्ध आहेत, तितक्या प्रमाणात ते तसे ज्ञेय-ज्ञान-ज्ञात्याशी नाहीत. दक्षता ठेवली पाहिजे ती यामुळेच. चूक होण्याचा आणि दोष घडण्याचा संभव असतो तो येथेच.

ज्ञेयाचे ज्ञान होताच ज्ञात्याच्या ठिकाणी ज्ञेयासंबंधी हवे-नकोची, राग-द्वेषाची भावना निर्माण होते. आणि ती प्रत्येक वेळी यथार्थ असते असे नाही. सुंदराचे सौंदर्य उमगणे, जे सुंदर आहे ते सुंदर दिसणे वा वाटणे आणि सुंदराला सुंदर म्हणणे हे योग्यच आहे. असे असलेही पाहिजे. पण सुंदराचे सौंदर्य लक्षात येताच ते मला प्राप्त व्हावे, ते माझे असावे, असे जे वाटते ते मात्र योग्य नसते. तीच गोष्ट कुरूपाच्याही संदर्भात. कुरूपाविषयी द्वेष किंवा तिरस्कार निर्माण होणे हे क्वचितच चांगले ठरणारे असते. माणसाच्या मनाला विकृती येते, कृती अयोग्य घडतात, ते या हवे-नकोच्या अयोग्य जाणिवेने. म्हणून कर्माला प्रेरणा मिळून त्यांतून कर्ता-कर्म-करण निर्माण होण्यापूर्वी प्रत्येक माणसाने सावध राहिले पाहिजे. शास्त्रदृष्टीने योग्यायोग्याचा विचार केला पाहिजे. स्वतःच्या वाटण्यावर भरवसणे हे अहितकर ठरण्याची शक्यता फार, हे ध्यानात घेतले पाहिजे. संदेह निर्माण झाला, तर आपल्या अंतःकरणाच्या प्रवृत्तीला प्रमाण मानावे. ''सतां हि संदेहपदेषु वस्तुषु प्रमाणमन्तःकरणप्रवृत्तयः ।'' असे कालिदासाने म्हटले आहे, हे खरे; पण ही अंतःकरणप्रवृती सज्जनाची असली पाहिजे, असेही त्यांनी म्हटले आहे, हे दुर्लक्षून चालणार नाही. म्हणून सर्वसाधारण माणसाने तरी ''तस्मात् शास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्य व्यवस्थितौ'' 'करावे की करू नये याचा निर्णय शास्त्राच्या आधारावरच घ्यावा' या गीतावचनाप्रमाणे वागावे

किंवा शास्त्र पाहण्याची आणि समजण्याची असमर्थता असेल तर ''महाजनो येन गत: स पन्थ:'' या न्यायाने थोर थोर लोकांच्या वर्तनाचे अनुकरण करावे. अन्यथा नाना प्रकारच्या आपत्ती ओढवून घेण्याचा प्रसंग येतो. कर्ता–कर्म–करण या विषयात सावध राहावे म्हटले आहे ते यासाठीच.

ज्ञाता–ज्ञेय–ज्ञान या त्रिपुटीने कर्माला प्रेरणा दिली नाही, ती त्रिपुटी जर तटस्थ राहिली, अलिप्त राहिली तर विलक्षण आनंद निर्माण करते. आपण नाटक, चित्रपट पाहतो किंवा नाना प्रकारच्या ललित कथा वाचतो. त्यांत नवरसांचा आविष्कार होत असतो. आपण रसिकतेने त्या त्या रसांचा आस्वाद घेऊन सुखावतो. शृंगार, हास्य, वीर हे रस आल्हाददायक असतात यात शंकाच नाही. पण करुण, भयानक–बीभत्स हे रसही आकर्षण निर्माण करतात. करुण रसामुळे डोळ्यांतून अश्रू वाहतात. तरी तशी नाटके वा चित्रपट पुन्हा पुन्हा पाहिले जातात. कारण आपण या रसाचे आविष्कार पाहताना वा वाचताना पुष्कळसे तटस्थ असतो, अलिप्त असतो. आणि त्यामुळेच रसास्वाद घेऊ शकतो. हीच वृत्ती जर खऱ्या अर्थाने निर्माण झाली तर जगतातील घटनाही त्याला रंगभूमीवरील रसाविष्कारासारख्याच वाटतील आणि त्याच्या अंत:करणाच्या प्रसन्नतेला कधीही बाधा येणार नाही. ती व्यक्ती अंतरंगात सर्वदा आनंदमयच राहते. म्हणून शक्यतोवर ज्ञात्याच्या पातळीवरच थांबण्याचा प्रयत्न केला पाहिजे. तसे जर ठेवले नाही, तर ज्ञाता कर्त्याच्या दशेला उतरतो आणि ही स्थिती काही आदर्श नाही.

या संदर्भात श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी केलेले वर्णन फार मार्मिक आहे. ''तेथ रागी प्रतिमल्लाचा । गोसावी सर्व दळाचा । रथु सांडूनि पायाचा । होय जैसा ।। तैसे ज्ञातेपणे जे असे । ते ये कर्ता ऐसिये दशे । जेविते बैसले जैसे । रंधन करू।।' (ज्ञाने. १८/४९०–९१) सर्व सैन्याचा मार्गदर्शक असलेला सेनापती समोर आलेल्या शत्रूच्या विषयीच्या द्वेषाने रथाचा त्याग करून पायउतार होऊन त्याच्या अंगावर धावून जाईल तर त्याचे सैन्य पराभूत होईल. पानिपतच्या युद्धात असेच झाले. विश्वासरावला गोळी लागलेली पाहताच सेनापती सदाशिवरावभाऊ त्वेषाने भानरहित झाले. आणि हत्तीवरून खाली उतरून हातातील पट्ट्यानिशी अबदालीच्या सैन्यात घुसले. त्यामुळे विजयाचे पारडे उलट दिशेने झुकले, आणि मराठ्यांच्या सैन्याची धूळधाण

झाली. म्हणून ज्ञानाने कर्माला प्रेरणा मिळाली तरी ज्ञात्याने कर्ता होण्यापूर्वी फार फार विवेक केला पाहिजे.

या प्रकरणात होणाऱ्या चुका मुख्यत: कशामुळे होतात आणि त्यांचे योग्य स्वरूप कळले तर योग्य रीतीने वागणे कसे शक्य होते, हे लक्षात आणून देण्यासाठी भगवान् पुढील श्लोकात सांगत आहेत.

**ज्ञानं कर्म च कर्ता च त्रिधैव गुणभेदत: ।**
**प्रोच्यते गुणसंख्याने यथावच्छृणु तान्यपि ।।१९।।**

ज्ञान, कर्म आणि कर्ता यात गुणांमुळे (सत्त्व, रज, तम) प्रत्येकी तीन प्रकार होतात. त्या गुणांसंबंधी शास्त्रात सांगितल्याप्रमाणे मी तुला सविस्तर सांगतो ते तू जसेच्या तसे ऐक. (समजून घे.)

भगवान् कर्मासंबंधीचे तत्त्वज्ञान विवरून सांगत आहेत. कर्माला प्रेरणा कशामुळे मिळते ते सांगितले आणि कर्म घडून येण्यामध्ये कोणाकोणाचा भाग असतो तेही सांगितले. आता कर्माला प्रेरणा देण्यात महत्त्वाचे जे ज्ञान त्या ज्ञानाच्या अनुरोधाने घडणारे कर्म आणि ते घडविणारा कर्ता यांच्या स्वरूपात सत्त्व-रज-तम या तीन गुणांनी योग्यतेचे अंतर पडत असल्याने निर्माण होणारे जे परिणाम आहेत तेही वेगवेगळ्या स्वरूपाचे होतात. त्यामुळे मग चांगले-वाईट, योग्यायोग्य, उत्तम-मध्यम-कनिष्ठ इत्यादी भेद पडतात. जीवनाच्या दृष्टीने ते जाणून घेणे महत्त्वाचे असते.

वस्तुत: मागच्या श्लोकात ज्ञेय-ज्ञान-ज्ञाता आणि कर्म-करण-कर्ता असे सहा प्रकार कर्माशी संबद्ध असतात असे सांगितले आहे. येथे मात्र गुणांच्या दृष्टीने पडणाऱ्या भेदांचे वर्णन करताना ज्ञान, कर्म आणि कर्ता या तिघांचाच उल्लेख केला आहे. ज्ञेय, ज्ञाता आणि करण या तीन गोष्टींसंबंधी येथे वा पुढेही काही सांगितलेले नाही. त्यांना वगळले आहे. याचे कारण असे असावे की, ज्ञेय तटस्थ आणि करण परतंत्र असते, त्यामुळे त्यात काही तारतम्य दाखविता येणे शक्य असले तरी ते महत्त्वाचे नाही. ज्ञान कसे असावे वा व्हावे हेही खरे म्हणजे ज्ञात्याच्या प्रकृतीवर, स्वभावावर, त्याच्या ठिकाणी असलेल्या गुणदोषांवर अवलंबून आहे. ज्ञाता असणारी वा होणारी जी व्यक्ती आहे तिच्या अंत:करणाचे स्वरूप जसे असेल, इंद्रियांची शक्ती

जशी असेल त्याला अनुरूप ज्ञान होईल आणि मग त्या ज्ञानात योग्यायोग्यादी, सत्यासत्यादी प्रकार पडतील. तेव्हा येथे ज्ञानाच्या ऐवजी ज्ञात्याचे वर्णन असावयास पाहिजे असे वाटणे शक्य आहे. पण भगवंतांनी मात्र ज्ञात्यासंबंधी न सांगता ज्ञानासंबंधीच सांगितले आहे. त्याचे कारण तांत्रिक असावे. पण ते महत्त्वाचे आहे. आधी ज्ञान का आधी ज्ञाता असा प्रश्न उपस्थित झाला तर वरवर विचार करता ज्ञाता आधी, मग ज्ञान असा क्रम योग्य वाटतो. पण सूक्ष्म विचाराने शोधून पाहिले म्हणजे या वाटण्यातील चूक लक्षात येऊ शकते.

ज्या पातळीवर आपण ज्ञेय-ज्ञान-ज्ञात्याचा विचार करीत आहोत, त्या त्रिपुटीच्या पातळीवर जिला ज्ञान होते ती व्यक्ती जरी ज्ञान होण्याच्या घटनेपूर्वी अस्तित्वात असली तरी तिला अजून ज्ञातेपण आलेले नसते. ज्ञातेपण ज्ञान झाल्यानंतर येते. म्हणून आधी ज्ञान आणि मग ज्ञाता हाच क्रम योग्य ठरतो. स्त्रीत्व आधी असले तरी मातृत्व मात्र अपत्यजन्मानंतर यावयाचे असते, तसेच हे आहे. म्हणून भगवंतांनी येथे ज्ञानासंबंधी सांगितले आहे. हा बारकावा लक्षात घेण्यासारखा आहे. ज्ञान सांगितले की ज्ञात्याचे स्वरूप आपोआप समजते हे गृहीत धरून फार विस्तार टाळण्यासाठीही ही पद्धती स्वीकारली असावी.

प्रत्यक्ष व्यवहार कर्त्यावर अवलंबून असतो आणि परिणाम कर्माच्या दृष्टीने प्रत्ययास येतो. असे असल्यामुळे व्यवहारात कर्म आणि कर्ता दोन्हीही समजून घेणे आवश्यक असते. ज्ञाता जसा प्रत्यक्षपणे कर्ता होतो, तसे ज्ञान काही प्रत्यक्षपणे कर्म होत नाही. ते फार फार तर करण होईल. असे असल्याने या ठिकाणी ज्ञान, कर्म आणि कर्ता या तिघांसंबंधीच विचार केला आहे.

सत्त्व-रज-तम या प्रकृतिसिद्धगुणांमुळे ज्ञान, कर्म आणि कर्ता यांच्या स्वरूपामधे अंतर पडत जाते. सत्त्वगुणांनी युक्त असलेल्या माणसाला होणारे ज्ञान आणि रजोगुणी-तमोगुणी माणसाला होणारे ज्ञान यांच्या स्वरूपात भेद असतो. वस्तू किंवा घटना जरी एकच असली तरी तिच्याकडे पाहण्याच्या वा जाणून घेण्याच्या दिशा निरनिराळ्या संभवतात. मनुष्याच्या प्रकृतीवर, आवडीनिवडीवर, संस्कारावर, विचारांवर, परिस्थितीवर, इंद्रियांच्या शक्तीवर हे पाहणे-समजणे अवलंबून असते. यांचा परिणाम प्रत्येकी वेगळा वा एकत्रितही होऊ शकतो. मग वस्तू जशी आहे तशी न कळता तिचे स्वरूप काही वेगळेच

प्रत्ययास येते. या वेगळेपणातही पुन्हा भिन्नता असू शकते. सारांश, सत्त्वामुळे होणारे ज्ञान यथार्थ असते. ज्ञानाची अयथार्थता रज-तमामुळे निर्माण होते.

सत्त्व-रज-तम या तीन गुणांचे प्रमाण सर्वदा, सर्वत्र उणे-अधिक असते. हे तीनही गुण प्रकृतीचे आहेत. ते जेव्हा पूर्णपणे समान अवस्थेत असतात तेव्हा सृष्टीला अस्तित्व नसते. तिचा लय असतो. या तीन गुणांमध्ये प्रमाणत: उणे-अधिक होऊ लागले की सृष्टी निर्माण होऊ लागते. सृष्टी अस्तित्वात आहे तोपर्यंत गुणांची विषमता टिकून राहते. गुणांची विषमता टिकून राहते तोवरच सृष्टीला अस्तित्व असते असेच वस्तुत: म्हटले पाहिजे. गुणांमध्ये समता येऊ लागली की प्रलयाकडे वाटचाल होऊ लागते. बुद्धिमंत म्हणविणाऱ्या समतावाद्यांनी ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. समता म्हणजे प्रलय आहे. विषमतेत सृष्टी नांदते त्यामुळे सर्व काळच्या, सर्व प्रकारच्या व्यवहाराचे अधिष्ठान विषमता हेच आहे. हे लक्षात न घेता हे संपूर्ण क्रांतिवादी ऊठ-सूट समतेचा जयघोष करीत असतात. जगामध्ये कुठेही समता नाही. असण्याची शक्यता नाही. समता मागे कधी नव्हती. आज अस्तित्वात नाही. पुढे कधी येण्याची शक्यता नाही. जेव्हा कधी समता येईल तेव्हा प्रलय झालेला असेल. व्यवहारात साम्य आणण्याचा घोष ज्यांनी केला, त्या साम्यवाद्यांनीच सर्वांत जास्त हिंसा केली आहे. आणि त्यांची ही हिंसक वृत्ती अजूनही उणावलेली नाही. तेव्हा त्यांच्यावर किती विश्वास ठेवावा हे विचारवंतांनीच ठरवावे. तत्त्वज्ञानाच्या पातळीवर समतेचा विचार करता येतो. आणि ही समता गीतेने अनेक वेळा, अनेक प्रकाराने स्वीकारली आहे, व स्वीकारण्यास सांगितले आहे. 'पंडिता: समदर्शिन:', 'समत्वं योग उच्यते' 'निर्दोषं हि समं ब्रह्म', 'सम: शत्रौ च मित्रे च', 'सुखदु:खे समे कृत्वा', 'समबुद्धिर्विशिष्यते' इत्यादी अनेक ठिकाणी गीतेने समतेचा पुरस्कार केला आहे. तेव्हा समता ही गोष्ट भारतीय तत्त्वज्ञानाला नवीन नाही. पण व्यवहाराच्या पातळीवर विचार करताना गीतेने तीन गुण विचारात घेतले आहेत. त्यांच्या परिणामाची श्रेष्ठ-कनिष्ठता सांगितली आहे. दैवी संपत्ती आणि आसुरी संपत्ती यांचे वर्णन केले आहे. सज्जनांचे संरक्षण आणि दुर्जनांचा विनाश पुरस्कारिला आहे. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र या चार वर्णांना मान्यता दिली आहे. तेव्हा विषमतेचा स्वीकार न करता समाज-व्यवस्था लावताच येणार नाही हे लक्षात घ्यावेच लागेल. आणि इतर

कोणत्याही व्यवस्थेपेक्षा भारतीय समाज-व्यवस्था ही अधिक चांगली आहे, हे मान्य करावे लागेल. पुढे सत्त्व-रज-तमाचे प्रकरण विस्ताराने येणार आहे म्हणून मी हा प्रपंच केला.

कोणती विषमता अपरिहार्य म्हणून स्वीकार्य, विषमता बाधक न होण्यासाठी काय करावे, विषमता नियंत्रित कशी ठेवावी? या सर्व गोष्टींचा विचार समाजव्यवस्थेच्या दृष्टीने करावा लागतो. आणि हेही काम भारतीय तत्त्वज्ञानाने योग्य प्रकारे केले आहे, त्याचा थोडासा ऊहापोह याच अध्यायात येणार आहे.

ज्ञान-कर्म-कर्त्याच्या संबंधात सत्त्वादी गुणांचा विचार याही दृष्टीने महत्वाचा आहे. कारण कोणतेही वैयक्तिक वा सामाजिक जीवन ज्ञान-कर्म-कर्त्याच्या स्वरूपाप्रमाणे सुखी किंवा दु:खी, प्रगत किंवा अप्रगत इत्यादी ठरायचे असते. या कारणाकरिताच भगवान् म्हणतात- अर्जुना! तू हा विषय योग्य रीतीने ऐक. 'यथावच्छृणु'. यथावत् हा शब्द 'यथावत् प्रोच्यते' आणि म्हणून 'यथावच्छृणु' असा दोन्हीकडे घेणे शक्य आहे; आणि तसा तो घेतलाहि पाहिजे. सांगणाराने यथावत् सांगितले पाहिजे आणि ऐकणाराने ते यथावत् ऐकले पाहिजे.

शब्द ऐकू येतात ते बहुधा यथावतच ऐकू येतात. तेव्हा 'यथावच्छृणु' म्हणण्यात फारसे स्वारस्य नाही. सांगण्यातला आशय, भाव, अर्थ यथावत् समजणे महत्त्वाचे आहे. अर्जुन हा अधिकारी श्रोता असल्याने ते तसेच झाले आहे. पण ऐकताना सावधानता राखली पाहिजे, म्हणून भगवान् आवर्जून सूचना देत आहेत. भगवान् श्रीकृष्ण तर अधिकारी वक्ते आहेतच. ते आता ज्ञानाचे स्वरूप विशद करून सांगत आहेत.

**सर्वभूतेषु येनैकं भावमव्ययमीक्षते ।**
**अविभक्तं विभक्तेषु तज्ज्ञानं विद्धि सात्त्विकम् ।।२०।।**

वेगळ्या वेगळ्या दिसणाऱ्या सर्व भूतजाताच्या ठिकाणी एकच, कोणताही भेद नसलेले, अविनाशी वा अविकारी तत्त्व नांदत असते. असे आकलन ज्या ज्ञानामुळे होते, ते सात्त्विक ज्ञान आहे, असे समज.

जितक्या म्हणून वस्तू आहेत, जितके पदार्थ आहेत, ज्या ज्या काही

कल्पना–भावना–धारणा आहेत, त्या सर्वांना भूत अशी संज्ञा दिली जाते. जे जे काही निर्माण झाले आहे ते सर्व भूत. अर्थातच यात पंचमहाभूतेही येतात. मन–बुद्धी–अहंकाराचाही यात समावेश होतो. सर्व प्रकारचे स्थावर आणि जंगमही यातच येते. या सर्वांच्या ठिकाणी जी विविधता प्रत्ययाला येते, ती वरवरची आहे, मायिक आहे. व्यवहाराच्या पातळीवर काही एका प्रमाणात ही विविधता उपयुक्त असू शकते, पण तत्त्वत: या विविधतेतील आकाराला, नामभेदाला वा गुणभेदाला काही अर्थ नाही. हे ज्याला समजते, उमगते तो सात्त्विक. ते त्याचे ज्ञान सात्त्विक. सर्वांच्या ठिकाणी एकपणाने राहणारे हे जे तत्त्व, ते अव्यय आहे, अविकारी आहे. नाश न पावणारे आहे. न पालटणारे आहे. असे ओळखणे हेही त्या सात्त्विक ज्ञानाचेच रूप आहे. सरी, गोठ, तोडे, पाटल्या, बांगड्या, करगोटा, अंगठी, जोडवी, गोफ, चंद्रहार इत्यादी दागिने स्थानभेदाने वेगवेगळे वाटले तरी त्या सर्वांच्या ठिकाणी सोने एकपणानेच राहते. चूल, रांजण, बोळके, परळ, वीट यात मातीच असते. अलीकडच्या रसायनशास्त्रात प्रसिद्ध असलेली मूलतत्त्वे म्हणून ओळखली जाणारी द्रव्ये धन–ऋण विद्युत्–कणांचेच आविष्कार असतात. ''एक गहू आणि प्रकार बहू'' ही म्हण या दृष्टीने विचारात घेण्यासारखी आहे. दिसणाऱ्या, भासणाऱ्या विविधतेमागची ही जी एकतेची धारणा आहे ती जर सर्वांनी लक्षात घेतली, तर निर्माण होणारे अनेक प्रकारचे संघर्ष उत्पन्नच होणार नाहीत. सृष्टीमध्ये जी विविधता आहे, ती व्यवहाराच्या पातळीवर उपयुक्तही आहे. पण आपण ही उपयुक्तता आवश्यकतेच्या मर्यादेत राखतो का? का तेथेही विलास, प्रतिष्ठा, सन्मान यांचा विचार करतो? पण माणसाच्या मनाला लागलेली सवय मोठी विचित्र आहे. ते एकतेत कंटाळते; विविधतेत सुखावते. आवश्यकतेच्या कसोटीवर उपयुक्तता आणि उपयुक्ततेच्या कसोटीवर विविधता पारखून घ्यायचे ठरविले, तर विविधतेचे क्षेत्र संकुचित होत जाते आणि शेवटी एकतेत लीन होते. ध्वनी, प्रकाश, चुंबकत्व, विद्युत्, गुरुत्वाकर्षण हे सर्व एकाच शक्तीचे आविष्कार आहेत, असे कुणा आधुनिक शास्त्रज्ञाने म्हटलेले मी वाचले आहे. एकच वीज निरनिराळ्या तंत्रयंत्रांच्या द्वारा निरनिराळ्या प्रकारांनी उपयुक्त ठरत असली तरी ती स्वत:चे ठिकाणी एकरूपच असते. अनेकातील एकतेचा हा विचार ज्याला उमगतो तो संयमी, समाधानी, प्रसन्न राहू शकतो.

विविधता त्याला मोहित करू शकत नाही. ऐश्वर्य त्याला त्याच्या निष्ठेपासून ढळवू शकत नाही.

विविधतेतील एकता प्रत्ययास येण्यासाठी विविधता नष्ट करावी लागते असे मात्र नाही. एकरूपतेवाचून जो एकता समजू शकत नाही, त्याला अडाणी समजले पाहिजे. अद्वैत तत्त्वज्ञानाने स्वीकारलेल्या प्रातिभासिक, व्यावहारिक आणि पारमार्थिक या त्रिविध सत्ताभेदाने अनेकातील एकतेचा अनुभव कसा घेता येतो ते दाखवून दिले आहे. या तत्त्वज्ञानाचा म्हणजेच सात्त्विक ज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव घेतल्यामुळेच साधक संतपदावर पोचू शकतो. त्यागी, संयमी, सत्पुरुषांचे ज्ञान अनेकात एकत्व पाहणारे, भेदात अभेद ओळखणारे, वैषम्यात साम्य अनुभविणारे असे सात्त्विक असते. आपली सामान्यांची ज्ञाने कशी असतात ते भगवान् पुढील श्लोकात सांगत आहेत.

**पृथक्त्वेन तु यज्ज्ञानं नानाभावान्पृथग्विधान् ।**
**वेत्ति सर्वेषु भूतेषु तज्ज्ञानं विद्धि राजसम् ।।२१।।**

भूतमात्राच्या ठिकाणी, वस्तुजाताच्या ठिकाणी दिसून येणारी विविधता यामुळे तशी नाना प्रकारचीच आहे, एकमेकांपेक्षा वेगळीच आहे, असे जाणवते ते ज्ञान राजस आहे, रजोगुणी आहे असे समजावे.

व्यवहाराच्या पातळीवर विविधता असावी, असते. त्या विविधतेचा उपयोगही करून घेता येतो. पण या विविधतेचेच आकर्षण निर्माण झाले की मग त्यातून व्यक्तीचे वा समाजाचे स्वास्थ्य हिरावले जाण्याची शक्यता निर्माण होते. जपावे लागते ते या आकर्षणाला. वस्त्राची आवश्यकता आहे हे निश्चित. पण काठ, पदर, रंग, पोत, यांच्या भिन्नतेमुळे निर्माण झालेले आकर्षण वस्त्राला नुसते वस्त्र राहू देत नाही, तर ऐश्वर्याचे प्रतीक ठरविते आणि मग त्यातून तुलना, श्रेष्ठ-कनिष्ठता, मत्सर असे भाव निर्माण होतात आणि मग समाधानाला चूड लागते. सद्गुणापेक्षा फॅशन हेच प्रतिष्ठेचे अधिष्ठान बनते. फॅशन हा रजोगुणाचा मूर्तिमंत आविष्कार समजला पाहिजे. सामान्यांपेक्षा आपण कुणी वेगळे आहोत हे दाखविण्याचा अहंकार फॅशनच्या मुळाशी असतो. मग ती फॅशन हितकर-अहितकराचाही विचार करीत नाही. इस्त्री लवकर मोडत नाही, सुरकुती पडत नाही हा गुण टेरिलीनसारख्या कृत्रिम धाग्यांच्या वस्त्रात असतो. पण हे कापड

आरोग्याच्या दृष्टीने चांगले नाही असे आरोग्यशास्त्र ओरडून सांगते. पण फॅशनने खुळावलेले लोक ते लक्षात घेत नाहीत. स्वत:च्या हौसेपायी आया, आपल्या लहान मुलांनाही झुळझुळीत दिसणाऱ्या कृत्रिमधाग्यांच्या घातक कपड्यांनीच नटवित असतात. विविधतेचे आकर्षण किती घातक ठरते ते यावरून लक्षात येईल. वस्त्रे, भांडी, उपस्कर (फर्निचर) यांचा सोस असणारी माणसे आपले बिऱ्हाड दीड खोलीचे आहे; कधीकधी तर दीड खणाच्या खोलीचे आहे हे लक्षात घेत नाहीत, अक्षरश: जाता-येताना आट्यापाट्याचा खेळ खेळावा लागतो तरी घोटाळा होतोच. वस्त्रतरी फाटते नाहीतर कपाट तरी अंगावर येते. विविधता जशीच्यातशी वास्तव मानण्याचेच हे परिणाम आहेत. आपण मात्र या विविधतेच्या आकर्षणाला रसिकता, ऐश्वर्य, श्रीमंती अशी नावे देऊन त्यांचा लोभ धरण्यात भूषण समजत असतो. एक संस्कृत सुभाषित या दृष्टीने लक्षात ठेवण्यासारखे आहे. ''वयमिह परितुष्टा वल्कलै: त्वं दुकूलै: । सम इह परितोषो निर्विशेषो विशेष: ।। स तु भवति दरिद्रो यस्य तृष्णा विशाला । मनसि च परितुष्टे कोऽर्थवान् को दरिद्र: ।।''

भिक्षाटन वृत्तीने राहणारा एक सात्त्विक पांथस्थ एका श्रीमंताच्या घरी अतिथी म्हणून सहज आला. श्रीमंत सोनसळी पीतांबर नेसून जेवणासाठी भोजनगृहाकडे निघाले होते. गळ्यात कंठा, हातात पौची, बोटात अंगठ्या असा श्रीमंतांचा थाट होता. त्यांनी अंगणात प्रवेश करीत असलेल्या पांथस्थाला पाहिले. जेवणाचे वेळी सहजपणे आलेल्या अतिथीचा आनंद मानण्याऐवजी पहारेकऱ्याने पांथस्थाला हटकले नाही याचाच राग त्यांना आला. अतिथी अगदी साध्या वेषात होता. पंचावजा तोटके धोतर तो नेसला होता आणि तसाच एक पंचा अंगावर पांघरला होता. श्रीमंत वृत्तीने अति कृपण. श्रीमंत बहुधा असेच असतात. कुणीही श्रीमंत आपल्या श्रीमंतीच्या प्रमाणात बहुधा दानधर्म करताना दिसत नाहीत. कदाचित असे कृपण असतात म्हणूनच श्रीमंत होतात. श्रीमंतांनी त्या पांथस्थाचे स्वागत न करता त्याला झिडकारले. पांथस्थ लाचार नव्हता, दीन नव्हता, व्रती होता, तपी होता. तो थोडासा हासून श्रीमंतांना ताठ मानेने म्हणाला - ''गृहस्थधर्माला न शोभेलसे वागण्याचा हा मद तुमचे ठिकाणी कसा आला? भारी पितांबर नेसलात म्हणून? माझा पंचा तुम्हांला त्यामुळेच तुच्छ वाटला का? पितांबर नेसून अधिक काय साधलंत?

लज्जारक्षण तर पंचानेही होते. मी तेवढ्यावर संतुष्ट आहे. तुम्हांला मात्र पितांबर असल्याविना संतोष वाटत नाही. खरे तर ज्याची हाव अधिक त्यालाच दरिद्री समजले पाहिजे. जो संतुष्ट आहे त्याच्या दृष्टीने कुणी दरिद्रीही नाही आणि कुणी श्रीमंतही नाही चाललो मी!''

विविधतेला श्रीमंती आणि ऐश्वर्य समजण्याचा हा परिणाम आहे. हा रजोगुणाचा प्रभाव आहे. हा रजोगुणच माणसाला समाधानी, उदार, परोपकारी राहू देत नाही. तो त्याला उद्योगशील करतो, पण त्याची हावही वाढवितो. स्वार्थापुढे त्याला इतर काही दिसत नाही, असेही होते. त्याची वृत्ती नेहमी वखवखलेली राहते. तो अस्वस्थ राहतो. संतोष, शांती, इत्यादी गुण त्याच्यापासून दूरच राहतात. आपण सर्वसामान्य माणसे या रजोगुणाच्या प्रभावाखालीच वावरत असतो. म्हणून आपले ज्ञानही विविधतेचे आकर्षण निर्माण करणारे असे राजस असते. हे मी दरिद्र्याने दरिद्रीच राहावे यासाठी सांगत नाही, तर श्रीमंतांनी श्रीमंतीची ऐट सोडून परोपकारी, समाजसेवी व्हावे या भावनेने सांगत आहे. भगवान् पुढील श्लोकात तामस ज्ञानाचे वर्णन करीत आहेत.

**यत्तु कृत्स्नवदेकस्मिन्कार्ये सक्तमहैतुकम् ।**
**अतत्त्वार्थवदल्पं च तत्तामसमुदाहृतम् ।।२२।।**

जे ज्ञान एखाद्याच गोष्टीला सर्वस्व समजते, त्याच्याशीच चिकटून राहते, प्रमाणशून्य असते, यथार्थ नसते आणि अपुरे असते, तोटके असते, ते ज्ञान तामस आहे असे जाणावे.

एखाद्या लहानशा महत्त्व नसलेल्या गोष्टीशी अज्ञानाने वा मोहाने तिलाच सर्वस्व मानून दुराग्रहाने चिकटून राहणे हे तमोगुणाचे प्रथम लक्षण. वस्तुत: एखाद्या गोष्टीला आग्रहाने चिकटून राहणे हे एकनिष्ठ असल्यासारखे दिसते, पण ते खरे नाही. व्यसनासक्त माणसाकडे पाहिले म्हणजे हे लक्षात येईल. तंबाखू, गांजा, अफू, मद्य किंवा अफू-गांजातून निर्माण केलेले गर्दसारखे महाभयंकर पदार्थ माणसाला आपल्या छंदापायी, आसक्तीपायी अध:पाताच्या गर्तेत पोचवितात. संपत्तीची, कर्तृत्वाची, कुटुंबाची, येवढेच नव्हे, तर स्वत:च्या शरीराची धूळधाण होते तरी माणसे व्यसन सोडीत नाहीत. याला आपण

एकनिष्ठा म्हणणार का?

एकनिष्ठेचे अधिष्ठान उदात्त ध्येयाचे असावे लागते. संशोधक, देशभक्त, पतिव्रता, संत हे असे एकनिष्ठ असतात आणि आपल्या निष्ठेपायी सर्वस्वाचा त्याग करण्यास सिद्ध असतात. पण त्यांचे ध्येय उदात्त असते. हितकर असते. व्यसनी माणसासारखे क्षुद्र नसते. सर्वस्वाचा घात करणारे नसते. देशभक्तीसाठी केलेला सर्वस्वाचा त्याग आणि दारूपायी, गर्दपायी झालेला सर्वस्वाचा विनाश यांची तुलना तरी होऊ शकते काय? क्षुद्र वस्तूपायी घर, दार, संपत्ती, प्रतिष्ठा, आरोग्य असे सर्व काही घालविणारे मूर्ख असतात. मोहाला बळी पडतात. किंवा उर्मट अहंकारापायी आपला दुराग्रह सोडीत नाहीत. आमच्या पंढरपुरात गांजासारख्या व्यसनापायी घरदार विकून, श्रीमंती घालवून दीन झालेले पुष्कळ लोक मी पाहिले आहेत. या व्यसनीपणाला एकनिष्ठ म्हणत नाहीत.

एक गृहस्थ माझ्या परिचयाचे होते. विद्वान होते. कर्मठ होते. धार्मिक कुटुंबात जन्माला आलेले होते. पण त्यांनी आपले सर्व आयुष्य छंदिष्ट उद्योगापायी वाया घालविले. बारीकसारीक गोष्टींवरून न्यायालयात भांडत राहिले. कोणतेतरी भांडण उभे केल्यावाचून त्यांना जेवण गोड लागत नसे. अशा माणसाची विद्वत्ता काय कामाची? क्षुद्र गोष्टीला कसे महत्त्व दिले जाते आणि त्यापायी अहंकार जोपासून प्रत्यक्षात होणारी हानी कशी दुर्लक्षिली जाते हे त्या व्यक्तीच्या जीवनाकडे पाहिले की कोणाच्याही लक्षात येईल. तमोगुणाने निर्माण झालेल्या दुराग्रहाचे ती व्यक्ती म्हणजे मूर्तिमंत प्रतीक होते.

तुच्छ गोष्टीपायी अहंकाराने आपत्ती स्वीकारणे हे काही शहाणपणाचे नाही. ती काही निष्ठा नव्हे. अहंकारी मूर्खतेतून निर्माण झालेली ती एक घातक आसक्ती आहे. क्षुद्राविषयी असलेल्या अशा आसक्तीला निष्ठा का म्हणू नये ते पुढील लक्षणावरून लक्षात येईल. प्रमाणशून्यता, अयथार्थता आणि कोतेपणा या दोषामुळे अशी आसक्ती त्याज्य ठरत असते.

तंबाखू, गांजा, अफू, दारू यांच्या व्यसनापायी माणूस सगळे काही गमावतो. पण या द्रव्यांचे चांगुलपण कोणत्या प्रमाणाने सिद्ध करता येते? ती स्वीकारार्ह वाटतात याला मोहाशिवाय दुसरे कोणतेही कारण सांगणे शक्य आहे का? पाप-पुण्याची कल्पना सोडा, पण आरोग्यशास्त्राने तरी ही द्रव्ये शरीराला हितकर आहेत असा उल्लेख केला आहे का? त्यामुळे कोणाचे

कल्याण झाले आहे असे दिसून येते का? यातील काही नसते. हे अहेतुकत्व, प्रमाणशून्यता म्हणजेच योग्य कारणाचा अभाव.

क्षुद्र वस्तूंना जे क्षुद्रत्व येते ते काही त्या केवळ प्रमाणाने लहान असतात म्हणून नव्हे. त्यांचे वाटणारे गुण सत्य नसतात. फसवे असतात. त्याचा स्वीकार घातक ठरतो. म्हणून त्यांना तुच्छ किंवा क्षुद्र किंवा निषिद्ध मानले जाते. हेच अतत्त्वार्थवत्व.

अतत्त्वार्थवत्व म्हणजे अयथार्थता, खोटेपणा. हा मूलत: अहैतुकत्व, प्रमाणशून्यता यांमुळेच उत्पन्न होतो. अलीकडच्या रामायण-महाभारताच्या आधारे लिहिल्या जाणाऱ्या अनेक साहित्यिकांचे निबंध वा ललितवाङ्मय पाहिले किंवा भारतीय संस्कृतीविषयी केली जाणारी बुद्धिवादी म्हणून मिरविणाऱ्या संशोधकांची विधाने पाहिली म्हणजे हे लक्षात येईल. कर्णाचा गौरव, पांडवांची अवहेलना, भीष्मासारख्याचे केलेले अवमूल्यन, रामचरित्रावर घेतले जाणारे आक्षेप हे सर्व प्रमाणशून्य असतात. तो क्वचित् अज्ञानाचा परिणाम असतो, तर बहुधा दंभ असतो. भाषेच्या लालित्यामुळे हे दोष सामान्यांच्या लक्षात येत नाही इतकेच.

वेदकाळी भारतीय संस्कृती आणि तत्त्वज्ञान अविकसित होते, वेद ख्रिस्त शकापूर्वी दोन-पाच सहस्रकाइतके अर्वाचीन आहेत; आर्य बाहेरून आले; महाभारतकाली कोणाला घोड्यावर बसता येत नव्हते; हिंदूंचा इतिहास हा सातत्याने पराभवाचाच आहे; इंग्रज येण्यापूर्वी शिक्षणाचा प्रसार आपल्या देशात झालेला नव्हता; ब्राह्मणेतर वर्ग प्राय: अशिक्षित होता; ब्राह्मणांनी वेदापासून दूर ठेवल्यामुळे इतरेजन अज्ञानी राहिले, अशी ऐतिहासिक म्हणविली जाणारी विधाने स्पष्टपणे अतत्त्वार्थवत् आहेत, खोटी आहेत. कारण त्याला कोणीतरी पाश्चात्य पंडित म्हणतो याव्यतिरिक्त कोणताही पुरावा उपलब्ध नाही. दुर्दैवाने अशी विधाने करणारेच प्रचाराच्या बळावर प्रतिष्ठा पावले आणि समाजामध्ये द्वेष, मत्सर, परस्पर अविश्वास इत्यादी दुर्गुण वाढले. विविधता असूनही प्रत्ययास येणारी एकता, जी सहस्रावधी वर्षांच्या सातत्याने अखंड होती, ती दीडशे वर्षांतील बुद्धिभेदामुळे भंग पावली. तामस ज्ञान किती भयानक परिस्थिती निर्माण करू शकते हे यावरून लक्षात येईल.

व्यसनाच्या संदर्भातील प्रमाणशून्यता किंवा त्याची क्षुद्रता तत्त्वत:

कोणाच्याही लक्षात यावी अशी असतानाही तंबाखू-गांजा-अफू-मद्य यासारख्या घातक पदार्थाचे व्यसन तुम्हांला का लागले असे विचारले तर तो मनुष्य जे उत्तर देतो, त्यावरून कोतेपणा लक्षात येतो. मित्रांनी आग्रह केला, त्याची भीड मोडवली नाही, कारण सबंध राखले पाहिजेत; परीक्षेत अनुत्तीर्ण झाल्यामुळे, कुणी अपमान केल्यामुळे, धंद्यात ठोकर लागल्यामुळे, कुणा आप्ताच्या मृत्युमुळे झालेले दु:सह दु:ख विसरण्यासाठी आम्ही या व्यसनात गुंतलो. दारू पिणे प्रतिष्ठितपणाचे समजले जाते म्हणून आम्ही घेतो. ही किंवा यांसारखी उत्तरे मिळतात. निषिद्ध पदार्थाचा स्वीकार करण्यासाठी आग्रह करणाराला मित्र म्हणणे, दु:ख विसरण्याच्या तात्कालिक मोहाला बळी पडून घातक व्यसनात गुंतणे, मद्यपानाला प्रतिष्ठित समजणे ही सर्व विचाराच्या कोतेपणाचीच लक्षणे आहे. ''सामान्या भली आंग । न शिविजे तंव ।।'' (ज्ञाने. १८/२५०) स्पर्श करीत नाही तोवरच वेश्या चांगली, तसे या व्यसनाचे असते. वर थोडी दुधाची साय असलेला विषाने भरलेला कुंभ हा जसा त्याज्य, तसेच या सर्व व्यसनासंबंधी समजले पाहिजे. पण तामसज्ञान हा उमज पडू देत नाही. उलट व्यसनापायी ते अधिक हट्टी, अधिक दुराग्रही होत जाते.

रजोगुणी मनुष्य विविधतेच्या मोहाने, उत्सुकतेमुळे, कुतूहलामुळे मादक द्रव्याचा स्वीकार करता झाला, तरी रजोगुणाच्या चंचलतेमुळे तो त्याच द्रव्याशी आसक्त होऊन राहील असे नाही. द्रव्य प्रभाव गृहीत धरूनहि त्याचे ते व्यसन सुटण्याची शक्यता असते; पण तमोगुणी माणसाचे व्यसन सुटणे कठीण. बिडीच्या प्रत्येक झुरक्यागणिक खोकल्याची ढास लागून जीव कासावीस होतो आहे, श्वासरोग बळावतो आहे, छातीचे खोके झाले आहे, श्वासाला दुर्गंधी येत आहे; तरी बिडी न सोडणारे अनेक रोगी मी पाहिले आहेत. बिडीपायी, दारूपायी, गांजापायी नाना व्याधींनी पीडित होऊन मरतात, तरी व्यसन सोडीत नाहीत. तुच्छ गोष्टीला सर्वस्व मानून तिच्याशी आग्रहाने चिकटून राहणे, या तामसज्ञानामुळेच घडते.

भक्तांनी वा ध्येयनिष्ठांनी कधीकधी निष्ठेच्या आग्रहासाठी व्यसनासक्तीचे उपमान वापरले आहे; ते केवळ आग्रहाने धरून राहण्याच्या वैशिष्ट्यापायीच चिकटून राहणे किती उत्कट असावे ते लक्षात आणून देण्यासाठी. चांगल्या वस्तूसाठी इतका बळकट आग्रह असावा हे समजावे म्हणून. ज्या द्रव्याचे

व्यसन असते त्या द्रव्याचा चांगुलपणा काही त्या उपमानातून सांगायचा नसतो. ''विद्याभ्यसनं व्यसनं अथवा हरिपादसेवनं व्यसनं'' येथे आलेला व्यसन शब्द हा आग्रह व्यक्त करण्यासाठी आहे. ''सक्ताः कर्मण्य विद्वांसो यथा कुर्वन्ति भारत। कुर्याद्विद्वांस्तथा सक्तः चिकीर्षुर्लोकसंग्रहम् ।।'' (गीता ३/२५) अज्ञानी माणसे कर्मफलाविषयी आसक्ती धरून ज्या उत्साहाने कर्म करतात तोच उत्साह लोकसंग्रहासाठी, फलाविषयी कोणतीही अपेक्षा नसलेल्या विरक्ताने कर्तव्यकर्म करताना ठेवला पाहिजे. तेव्हा कर्म करण्यात उत्साह असणे एवढेच लक्षात घ्यायचे असते. त्याच्या सारखेपणामुळे लोकहितासाठी झटणारा विरक्त संत आणि उद्योगात गढलेला स्वार्थी संसारी, एक नव्हेत, एका योग्यतेचेही नव्हेत म्हणून सारखेच आदर्श नव्हेत हे लक्षात ठेवलेच पाहिजे. व्यसनाच्या उपमेवरून तसेच समजावे.

कर्माला प्रेरणा देणाऱ्या त्रिविधज्ञानाचे वर्णन करून झाल्यानंतर त्यांच्यामुळे प्रेरणा मिळालेली कर्मे हीही कशी त्रिविध स्वरूपाची असतात, हे भगवंत आता क्रमाने सांगत आहेत.

**नियतं संगरहितं अरागद्वेषतः कृतम् ।**
**अफलप्रेप्सुना कर्म यत्तत्सात्त्विकमुच्यते ।।२३।।**

जे कर्म अवश्य कर्तव्य आहे, जे आसक्ती न ठेवता केले जाते, जे रागद्वेषाच्या भावनेविना आणि फलाची अपेक्षा न ठेवता केले जाते, त्या कर्माला सात्त्विक कर्म असे म्हणतात.

नियत म्हणजे शास्त्राने करावे म्हणून सांगितलेले नित्य किंवा नैमित्तिक कर्म, जे सामान्यतः वर्णधर्माप्रमाणे किंवा आश्रमधर्माप्रमाणे आचरण्यास योग्य म्हणून सांगितले जाते. अलीकडे वर्णाश्रमांच्या मर्यादांचा लोप झालेला आहे. कोणी कोणते व्यवसाय करावेत यावरची धर्मशास्त्राची बंधने सुटली आहेत. त्यामुळे शास्त्रोक्त तेवढेच नियत, एवढाच मर्यादित अर्थ करून चालणार नाही. तेव्हा आपण ज्या परिस्थितीत असू, जो व्यवसाय-उद्योग आपण स्वीकारला असेल, जीवनामध्ये वावरताना जे उत्तरदायित्व आपणाकडे आले असेल, तत्संबंधीची कर्तव्ये हेच नियत कर्म किंवा विहित कर्म समजावे लागेल. यालाच स्वधर्माचरण असेही म्हणता येईल. किंवा शेती, मजुरी, व्यापारधंदा, वकिली,

वैद्यकी, शिल्पनिर्मिती (इंजिनिअरिंग), कुटुंबपोषण, कुटुंबसंरक्षण इत्यादी गोष्टी परिस्थितीप्रमाणे नियत कर्म ठरतील. निरनिराळ्या व्यवसायासंबंधी काही नियम असतात, त्यांचे पालन करणे हेही नियत कर्म ठरते.

हे जे नियत कर्म, ते कसे करावे ते पुढील लक्षणांनी सांगितले आहे. ती खरे तर कर्त्याची लक्षणे आहेत. कारण त्या लक्षणांवरून कर्त्याची मनोवृत्तीच व्यक्त होते. आसक्ती नसणे, राग-द्वेष नसणे, फलाकांक्षा नसणे हे सर्व, कर्त्याच्या अंत:करणाचेच भाव आहेत. कधीकधी त्यांचा प्रभाव कर्मावर पडत असतो. म्हणून कर्माचा विचार करतानाही ते लक्षात ठेवावे, असा उद्देश कर्माची लक्षणे सांगताना असावा. आसक्ती किंवा रागद्वेष असताना केलेली कर्मे बहुधा जशी व्हावयास हवीत तशी होत नाहीत. सुगरिणीचाही स्वयंपाक बिघडतो. वक्त्याची जीभ चाचरते. शस्त्रवैद्याचा हात कापू लागतो. कर्माच्या ठिकाणी निर्माण झालेले हे दोष, संगादी भावना कर्माला कशा प्रभावित करतात ते व्यक्त करतात, असे म्हणता येते.

एक स्त्री खायला द्यायच्या वेळी आपल्या मुलाच्या समागमे आहे म्हणून सभ्यपणे शेजारणीच्या मुलालाही लाडू देते. ते काही आपल्या मुलावर जसे तिचे प्रेम असते तसे त्या शेजारणीच्या मुलावर असते म्हणून देत नाही. कुणी पाहिलं तर तसे वाईट दिसू नये किंवा न खाणाऱ्याची दृष्टी खाणाऱ्याला बाधते या धारणेपोटी देते. प्रेमाने देत नाही. तसेच ती स्त्री आपल्या मुलाला मारते तेव्हा मारणे या कृतीच्या पाठीमागे तिच्या अंत:करणात मुलाविषयी द्वेष भावनाही नसते. 'अरागद्वेषत: कृतं' कर्म कसे असते ते लक्षात यावे एवढ्यापुरते हे उदाहरण दिले. रोग्याची शुश्रूषा आई, बायको, बहीण, मुलगी या नात्यातल्या व्यक्तीहि करतात. आणि कर्तव्यनिष्ठ तज्ज्ञ परिचारिकाही करते. शास्त्र असे आहे की, संबंधी आप्तांनी केलेली शुश्रूषा प्रेमापोटीच घातक ठरू शकते. परिचारिकाच हितकर म्हणून अधिक उपयुक्त ठरते. शस्त्रवैद्यही हातपाय तोडतो, पण त्याच्या अंत:करणात द्वेष नसतो. पेढीवरचा रोकड्याजी लाखो रुपये वाटतो, पण ज्यांना देतो त्यांच्याविषयी प्रेम असते म्हणून तो हा व्यवहार करीत नाही. लहानमोठ्या शिक्षा ठोठावताना न्यायाधीशाच्या अंत:करणात द्वेषाची भावना नसते. रागद्वेषरहित कर्म कसे असू शकते ते यावरून लक्षात येते. फलाकांक्षेसंबंधीचा विचार आपण पूर्वी त्यागाच्या संदर्भात केला आहे.

आसक्ती हेच रागद्वेषाचे किंवा फलाकांक्षेचे मूळ असल्याने कर्तव्यामागे आसक्तीची भावना नसली की मग रागद्वेष निर्माण होण्याला किंवा फलासंबंधी अभिलाषा राहण्याला फारसे अधिष्ठान उरत नाही.

**यत्तु कामेप्सुना कर्म साहंकारेण वा पुनः ।**
**क्रियते बहुलायासं तद्राजसमुदाहृतम् ।।२४।।**

जे कर्म फलाची आकांक्षा ठेवून केले जाते, जे अहंकारामुळे करावेसे वाटते, आणि जे करताना अत्यंत कष्ट होतात त्या कर्माला राजस म्हणावे.

मनामध्ये काही ना काही अपेक्षा धरूनच कर्माचा आरंभ होतो. ''प्रयोजनं अनुद्दिश्य न मन्दोऽपि प्रवर्तते'' असे जे वचन आहे ते इथेही लागू पडण्यासारखे आहे. यातूनच 'काही लाभ नसेल तर कर्म करणार नाही' अशीही वृत्ती निर्माण होते. ही वेश्यावृत्ती झाली. हा काही पत्नीधर्म नव्हे. उद्योगधंद्यातही प्रतिदिनी जे लाभाचाच विचार करतात, ते आपल्या व्यवसायात स्थिर राहू शकत नाहीत. सगळ्याच उद्योगात तेजी-मंदी असते, म्हणून प्रत्येक मंदीगणिक धंदा पालटला तर व्यवसाय कधीच उभा राहणार नाही. पण राजसवृत्ती हा विवेक बाळगत नाही.

तसेच कर्म करताना कर्तव्यभावनेपेक्षा अहंकारच जास्त प्रबल असतो. ''मी केले तरच होईल, माझ्यासारखे कोणाला साधणार नाही'' या वृत्तीनेच सामान्यत: कर्म केले जाते.

अर्जुन युद्ध करीत नाही म्हणाला आणि युद्ध न करणे, संहार न करणे कसे योग्य आहे ते सांगू लागला तेव्हा, भगवान् त्याचा अधिक्षेप करताना 'हे तुझे बोलणे म्हणजे प्रज्ञावाद आहे, पांडित्यप्रदर्शन आहे, तर्कट आहे' असे म्हणाले. या प्रज्ञावाद शब्दाचे स्पष्टीकरण करताना ज्ञानेश्वरमहाराजांनी जे भाष्य लिहिले आहे ते मोठे मार्मिक आहे. ''तरी सांग पा मज अर्जुना । तुजपासूनि स्थिति या त्रिभुवना । हे अनादि विश्व रचना । ते लटिके कायी ।। एथ समर्थु एक आथी । तयापासून भूते होती । तरी हे वायांचि काय बोलती । जगामाजी ।। हो कां सांप्रत ऐसे जहाले । जे हे जन्ममृत्यू तुवां सृजिले । आणि नाशु पावे नाशिले । तुझेनि कायी ।। तू भ्रमलेपणे अहंकृति । यासी घातु न धरिसी चित्ती । तरी सांगे कायी हे होती । चिरंतन ।।' (ज्ञाने. २/९५ ते ९८) श्रीज्ञानेश्वरमहाराज

म्हणतात की – श्रीकृष्ण म्हणाले, ''अरे अर्जुना ! मला सांग, या त्रिभुवनाचे अस्तित्व तुझ्यामुळे आहे का? ही विश्वाची रचना सनातन आहे असे मानले जाते ते खोटे आहे काय? या जगद व्यापाराच्यामागे कोणी एक समर्थ ईश्वर आहे आणि त्याच्यापासूनच सर्व भूते उत्पन्न होतात असे जे जगामध्ये बोलले जाते ते निरर्थक आहे काय? का आता हे जन्म आणि मृत्यू तूच उत्पन्न केलेस असे झाले आहे? म्हणून तू मारशील तरच हे मरतील असे होणार आहे? मी या कौरवांचा घात करणार नाही असे जे तू म्हणतो आहेस ते भ्रमाने तुला वाटणाऱ्या अहंकारापोटी म्हणतो आहेस. तू मारीत नाहीस म्हणतोस, म्हणून हे चिरंजीव होणार आहेत का?'' हे सर्व प्रतिपादन कर्माच्या पाठीमागे अहंकारी वृत्ती कशी उभी राहते त्यावर प्रकाश टाकणारे आहे.

वक्ता बोलतो त्या वेळी अहंकाराने बोलतोच, पण श्रोता ऐकतो त्या वेळी त्याच्याही अंत:करणात अहंकार असतो. आणि त्यामुळेच वक्त्याचे बोलणे हे आपल्यालाच उद्देशून आहे असे वाटत असते. या संदर्भात आमच्या दादांचे एक सुभाषित फार चांगले आहे. ''वक्त्याचे वच ते जरिही नसले टोचून कोणाप्रति । श्रोते ऐकुनिया तदर्थ आपुल्या की वर्तनी ओढीती । त्याचे ते वच बाण साच गमती अंगी जयाच्या उणे । नाही कौतुक यात साच बुध हो चोरामनी चांदणे ।।''

वक्ता कित्येक वेळी सिद्धांत म्हणून काही सांगत असतो. स्वत:च्या धारणेप्रमाणे हितकर काय त्याचे प्रतिपादन करीत असतो त्यामुळे काही श्रोत्यांचा अहंकार दुखावतो. राजकीय क्षेत्रात तर अहंकाराचा नंगानाच चालू आहे. आणि त्यामुळेच आम्ही लोकहितासाठीच मानवाच्या सेवेसाठीच प्रयत्नशील आहोत अशा पाट्या कपाळावर बांधलेले सारेच पक्षोपपक्ष परस्परांशी भांडत असतात. आणि संधी मिळेल तेव्हा एकमेकांचे पाय मागे ओढत असतात. कित्येक वेळा सहकार्य करताना दिसतात; पण ते सुद्धा स्वार्थासाठी. जनसेवेसाठी नाही. मठपती आणि सांप्रदायिक महंत यांचीही स्थिती यापेक्षा वेगळी नसते. यांचेही अहंकार चांगलेच उग्र असतात. स्वत:चा मोठेपणा मिरविणे आणि इतरांना तुच्छ लेखणे तेथेही आढळून येते.

चिकित्सक माझ्या औषधाने गुण आला म्हणतो पण ''प्रयत्नस्य प्रभुर्वैद्य: न वैद्य: प्रभुरायुष:'' चिकित्सक प्रयत्नांचा धनी आहे, आयुष्याचा नाही.

म्हणून मी रोग्याला जगविले असे वैद्याने मानू नये. जरा नीट अवलोकन केले तर कर्माच्या पाठीमागचे असे अहंकार आपल्याला अनेक ठिकाणी दिसून येतील. माणसे निवडणुकीतच नव्हे, तर एरवीही ऐकणाराला उबग येईल इतक्या प्रमाणात स्वत:विषयी बोलत असतात. जणूकाही सर्व विभक्ति-प्रत्यय 'मी' या एकाच सर्वनामाकरिता असतात.

नीट विचार केला तर अहंकार मिरवावा असे कर्तृत्व फारच कमी आढळते. आपल्या प्रयत्नाचे मोल किती हे सांगणारे एक संस्कृत सुभाषित आहे. ''अरक्षितं तिष्ठति दैवरक्षितम् । सुरक्षितं दैवहतं विनश्यति ।। जीवत्यनाथोऽपि वने विसर्जित:। कृत: प्रयत्नोऽपि गृहे विनश्यति ।।'' रानात टाकलेले अनाथ पोर दैव अनुकूल असल्यामुळे चांगले वाढते, तर घरात चांगल्या दक्षतेने वाढविली जाणारी मुले दुर्दैवाने अल्पायुषी ठरतात. याचा अर्थ प्रयत्नाला अर्थ नाही, ते सोडून द्यावेत असा नाही; तर काम करणाराने अहंकार बाळगू नये इतकाच याचा अर्थ आहे.

आम्ही सेवा करतो असे तोंडाने म्हणत मिरवणारे स्वयंसेवक सभापरिषदातच नव्हे, तर उत्सवमहोत्सवासारख्या धार्मिक कार्यातही आपला अहंकार दूर ठेवू शकत नाहीत. म्हणून तेथेही द्वेष, मत्सर, तुच्छता इत्यादी विकार आपले अस्तित्व निरनिराळ्या प्रकारे प्रगट करीत असतात. हा रजोगुणाचाच परिणाम आहे.

रजोगुणाचे आणखी एक वैशिष्ट्य. साध्यासुध्या कामात रजोगुणी व्यक्तीला रस वाटत नाही. काम अवघड, कठीण, अधिक कौशल्य बुद्धिमत्ता लागणारे, कराव्या लागणाऱ्या श्रमामुळे इतरांपेक्षा उठून दिसणारे, ज्याला पूर्व सिद्धता-साधन संभार विपुल प्रमाणात लागतो, जे काम करताना साहसाची आवश्यकता असते अशीच कामे करावीशी वाटतात. छांदिष्ट गिर्यारोहक हे याचे उदाहरण. यामुळे एकप्रकारे अहंकाराचेच पोषण होत असते. संशोधकही असेच कष्ट उपसत असतात, पण त्यांच्यापुढे काही चांगले ध्येय असते. सैनिकांनाही साहसाची आणि कष्टाची कामे अनेक वेळा करावी लागतात, पण ते त्यांचा चपळपणा आणि काटकपणा प्रसंगविशेषी अपुरा ठरू नये म्हणून आवश्यक असते. पण छांदिष्टांना केवळ साहसाचेच आकर्षण असते. लहानशा साध्या होडीतून समुद्र पार करणे, विषारी सापांच्या संगतीत राहणे

इत्यादी गोष्टी पाहिल्या म्हणजे ''बहुलायासम्'' प्रकरण चांगले समजू शकते.

सर्व संतांनी, भगवंताचे नामस्मरण हे अत्यंत सोपे तरी अत्यंत श्रेष्ठ साधन आहे म्हणून सांगितले आहे आणि अनेक प्रकारांनी वारंवार पटवूनही दिले आहे. ''योग याग विधी येणे नोहे सिद्धी । वायाची उपाधी दंभ दर्प ।।'' असा इतर साधनांचा निषेध केला असतानाही माणसाला अगदी परमार्थिक म्हणविणाऱ्या साधकालाही केवळ नामाने समाधान होत नाही. काहीतरी विशेष व्रते, अनुष्ठाने, तीर्थयात्रा, उत्सव-महोत्सव केल्याविना वा योगमार्गातील प्राणायाम, ध्यान, धारणा यांच्या नादी लागल्याविना त्याला बरे वाटत नाही. मग सांप्रदायिकांना बहुजन संतोषासाठी त्याचाही अवलंब करावा लागतो. त्यातून सत्त्वगुण वाढला, श्रद्धा, निष्ठा बळावली, भक्ती-प्रेम वाढले तर हा खटाटोपही उपयुक्त ठरतो असे म्हणता येईल. पण तसेही फारसे घडत नाही. या अशा उद्योगामुळे पुष्कळ काही केले असे वाटून रजोगुणी अहंकार सुखावतो, एवढेच घडते.

वस्तुत: फार मोठ्या त्याग, वैराग्याच्या भानगडीत न पडता, सामान्य सदाचरणात राहून नामस्मरण करीत राहिले की काही काळानंतर भक्ती-प्रेम वाढू लागते. आणि भक्ती-प्रेमाने केलेल्या नामस्मरणाने परमार्थमार्गातील प्रगतीही अपेक्षेपेक्षा लवकर होऊ शकते. नामस्मरणातील एकाग्रता वाढू लागली, तिला इष्ट देवतेच्या सगुणरूपाचे अधिष्ठान असले की योगप्रक्रियेतील मुळात अवघड असलेल्या धारणा ध्यानाचेही लाभ मिळू शकतात. नामरूपाच्या आलंबनावाचून केलेला ध्यानाचा प्रयत्न हा स्वसंमोहनात परिणत होऊ शकतो. ते इष्ट नाही. पण नामस्मरणाचा साधेपणाच माणसाला परवडत नाही. कारण हा उपक्रम नित्याचा असावा लागतो. सातत्याने दीर्घकाळ करावा लागतो. या सातत्याला, दीर्घकाळाला माणूस कंटाळतो हेहि रजोगुणाचेच लक्षण आहे.

**अनुबन्धं क्षयं हिंसामनवेक्ष्य च पौरुषम् ।**
**मोहादारभ्यते कर्म यत्तत्तामसमुच्यते ।।२५।।**

परिणाम, नाश, हिंसा, स्वत:ची शक्ती, यांचा विचार न करता कोणत्यातरी मोहाला बळी पडून जे काम केले जाते, त्याला तामस कर्म म्हणतात.

काम करावयास घेण्यापूर्वी त्याचे परिणाम काय होतील याचा दूरवर

विचार आधीच केला पाहिजे. तसे केले नाही, तर उभारलेल्या कामाबरोबर होणारी फरफट घातक ठरते. आपली शक्ती किती? आपले सामर्थ्य किती? केवढे काम आपल्याला पेलेल? त्याला भांडवल किती लागेल? माणूसबळ केवढे पाहिजे? तंत्रकौशल्य किती हवे? हे सर्व विचारात घेऊन कर्माचा आरंभ करणे आवश्यक आहे. पण कुठल्यातरी मोहाला बळी पडून मनुष्य तिकडे दुर्लक्ष करतो आणि मग तो उद्योग आंगलट येतो. हे लक्षण तमोगुणाचे आहे. निवडणुकीत आपटी खाणारी माणसे हे याचे चांगले उदाहरण. निवडणुकीत निदान दुसऱ्या-तिसऱ्या क्रमांकावर तरी आला पाहिजे, निदान तारण बुडणार नाही, एवढी तरी दक्षता घेतली पाहिजे, पण तसे होत नाही. एकेका स्थानासाठी दहा-पंधरा किंवा त्याहूनही अधिक इच्छुक उभे असतात. (यातही कित्येक वेळा राजकारण असते.) स्वसामर्थ्याचा अनाठायी गर्व हा याला कारण असतो. ''अनवेक्ष्य च पौरुषं'' ते हेच.

ज्या कर्मामुळे आपला स्वार्थ कदाचित् साधलाही जात असेल, पण त्या योगाने इतरांचे शोषण होत असेल, त्यांना त्रास किंवा पीडा सहन करावी लागत असेल तर ते कर्म हिंसायुक्त म्हणजे तामसच समजले पाहिजे. हिंसा म्हणजे जीवहत्याच झाली पाहिजे असे नाही. श्रीज्ञानोबारायांनी अहिंसेची व्याख्या करताना ''आणि जगाचिया सुखोद्देशे । शरीर वाचा मानसे । राहाटणे ते अहिंसे । रूप जाण ।।'' (ज्ञाने. १६/११४). जगाला सुखवावे म्हणून शरीराने, वाणीने आणि मनाने जसे वागावे तसे वागणे हे अहिंसेचे लक्षण आहे असे सांगितले आहे. यावरून याच्या उलट वागणे म्हणजे हिंसा हे लक्षात येऊ शकेल. भर्तृहरीने माणसाचा जो तिसरा राक्षसी गट सांगितला आहे तो अशा हिंसक वृत्तीचा असतो. आपला स्वार्थ साधला म्हणजे झाले, मग दुसऱ्याचे काही का होईना, अशा वृत्तीची ही माणसे असतात. चोर, दरोडेखोर तर यात येतीलच, पण दारू करणारे आणि दारू विकणारे (अगदी नैर्बंधिकरीत्या शासकीय संमती घेऊन तसे करणारे असले तरी), मादक द्रव्याची तस्करी करणारे हे लोक तर भावनेच्या भरात एखाददुसरी हत्या करणाऱ्या उग्र प्रकृती माणसापेक्षाही अधिक भयंकर, अधिक घातक असतात असे समजले पाहिजे. वरून ते सभ्य वाटतात, क्वचित प्रतिष्ठेने मिरवतात म्हणून त्यांचा घातकीपणा लक्षात येत नाही. पण अशा माणसाच्या ठिकाणी, तमोगुणाचा अर्क एकवटलेला असतो

असे समजले पाहिजे. आणि अशा व्यक्तींना निदान प्रतिष्ठा तरी लाभणार नाही, अशी दक्षता समाजाने घेतली पाहिजे.

कर्माचे हे तीन प्रकार सांगून झाल्यानंतर भगवान आता कर्त्याचे तीन प्रकार सांगत आहेत.

**मुक्तसङ्गोऽनहंवादी धृत्युत्साहसमन्वित: ।**
**सिद्ध्यसिद्ध्योर्निर्विकार: कर्ता सात्त्विक उच्यते ।।२६ ।।**

ज्याच्या ठिकाणी आसक्ती नाही, जो अहंकारी नाही, यश किंवा अपयश यांच्या संबंधात जो निर्विकार आहे, तटस्थ आहे आणि तरीही जो धैर्य आणि उत्साह या गुणांनी युक्त आहे, त्याला सात्त्विक कर्ता म्हणावे.

पहिल्याप्रथम जेव्हा मी हा श्लोक वाचला आणि अर्थ जाणून घेतला तेव्हा मला एकदम उजाडल्यासारखे झाले. अनेक प्रश्न सुटले, अनेक कोडी उलगडली. मला आवडलेल्या गीतेतल्या उत्कृष्ट श्लोकांपैकी हा एक श्लोक आहे. सात्त्विक कर्ता निरहंकारी असतो. मी करीन तरच होईल, माझ्यासारखे कोणाला करता येत नाही, अशी वृत्ती त्याची नसते. मी करणार नाही म्हणण्यामधेही अहंकारच असतो, त्यामुळे हा आपण करीत नाही आणि दुसऱ्या कोणाला करू देत नाही. एकूण धोरण अडवणुकीचे असते. अलीकडच्या बहुतेक संपातून हे आढळून येते. आपण कामावर जायचे नाही, कुणी जात असला तर त्याची हत्या करीपर्यंत टोकाची भूमिका घ्यायची. मारामारी तर निश्चितच. हे सारे अहंकाराचेच आविष्कार आहेत. सात्त्विक कर्ता निरहंकारी असतो. तेव्हा करीनच किंवा करणारच नाही असा कोणताही दुराग्रह त्याचे ठिकाणी नसतो.

निरहंकारी असल्यामुळेच, सात्त्विक कर्त्याला, कर्माविषयी आसक्ती नसल्याने तो आपले कर्तव्यकर्म योग्य रीतीने करीत असतानाही यशापयशाविषयी चिंता करीत नाही. यश मिळाले तरी चढून जात नाही, अपयशाने खचून जात नाही.

यशापयशाविषयी असा निर्विकार असल्यामुळेच कर्तव्यकर्म करण्याविषयीचे त्याचे धैर्य आणि त्याचा उत्साह टिकून राहतो, त्याला कधी निराशा वाटत नाही. त्याला कधी मरगळ येत नाही. त्याचा साक्षेप टिकून राहतो.

ही सगळी लक्षणे एकत्र राहतात हे आपल्याला पटतच नाही. अहंकार नाही, आसक्ती नाही, यशापयशाची चिंता नाही आणि तरी धैर्य आणि उत्साह टिकतो हे कसे शक्य आहे, असे आपणांस वाटत असते. आपण स्वत: कर्तव्य म्हणून काही गोष्टी करीत असतो. इतरांनीही केलेल्या पाहत असतो. कामे करताना धैर्य आणि उत्साह टिकून राहतो असेही आपणांस आढळून येते, पण यात मुळाशी अहंकार असतो, कर्माविषयीची आसक्ती असते आणि फळाविषयीची अभिलाषाही असते. कर्मासक्ती आणि फलाकांक्षा या परस्परावलंबी आहेत. जणू एकाच नाण्याची ती दोन अंगे आहेत. धृत्युत्साह टिकण्यासाठी त्यांची आवश्यकता आहे असे आपणांस वाटत असते, आणि त्यांच्यावाचून धृत्युत्साह टिकणारच नाही असा आपला अनुभवही असतो, कारण काहीतरी प्रलोभन (इन्सेंटिव्ह) असेल तरच आपण कर्माला प्रवृत्त होणार, असेच सगळीकडे पाहावयास मिळते. नेमलेल्या वेळात काम करायचे नाही आणि वेळेनंतर बसून काम केल्याचे दीडपट-दुप्पट पैसे मिळतात म्हणून नेमलेल्या वेळेबाहेर अधिक वेळ बसून काम करायचे अशी पद्धती पुष्कळ ठिकाणी आढळून येते. कित्येकदा तर नेमलेल्या वेळात चटोर मासिके लपवून वाचली जातात असेही दिसते. आणि त्यामुळेच आपणास आसक्ती किंवा फलाकांक्षा यावाचून धृत्युत्साह टिकून राहतो हे विधान योग्य असल्याचे पटत नाही. असे वाटणे म्हणजे आदर्श आरोग्याची जी लक्षणे शास्त्राने सांगितली आहेत ती फारशी कुठे दिसत नाहीत म्हणून आदर्श आरोग्याची व्याख्याच चूक असे म्हणण्यासारखे आहे. शास्त्राचे सिद्धांत आपल्या वाटण्या-न वाटण्यावर अवलंबून नसतात. ते शास्त्राने सांगितले, शास्त्रज्ञांनी सांगितले म्हणूनच मान्य करायचे असतात. गीता हे शास्त्र आहे. कारण ते श्रीकृष्णासारख्या ईश्वरावताराने, पाहिजे तर योगेश्वराने म्हणा, सांगितले आहे. तेव्हा सिद्धांत सत्य आहे. आपले अनुभवाचे क्षेत्र फारच लहान असते. आणि आपण स्वयंकेंद्रित दृष्टीने विचार करतो म्हणून पटण्या - न पटण्याचा प्रश्न उपस्थित होतो. थोर थोर महात्म्यांची जीवन मोकळ्या मनाने अवलोकिली तर वरील सिद्धांताला अनुकूल अशा घटना त्यांच्या जीवनात घडल्याचे प्रत्ययास येईल.

वाचस्पती मिश्र आणि त्यांची पत्नी भामती यांचे चरित्र आपणांस माहीत आहेच. पत्नी आपल्या पतीची सेवा निरलसपणे करीत आहे आणि पतीला

त्याची कोणतीही जाणीव नाही अशा स्थितीत म्हातारपण आले आहे आणि इतक्या दीर्घ कालातही पत्नीने आपले कर्तव्य कधीही चुकू दिले नाही. त्याला आता धृत्युत्साह टिकून राहणेच म्हणायचे की नाही. हे कसे घडले? फलाची अभिलाषा यत्किंचितही नसल्याचाच हा प्रभाव आहे की नाही! आणि हे निरहंकार वृत्तीमुळेच घडू शकते की नाही?

बाजीप्रभू पावनखिंड लढवीत आहेत. शत्रूची आक्रमणे उग्र होत आहेत. शरीरावर घावामागून घाव पडत आहेत. शरीरातून रक्ताचे पाट वाहत आहेत, मृत्यू पावल्यामुळे सहकाऱ्यांची संख्या उणावली आहे, तरी बाजीप्रभू *''तोफे आधी न मरे बाजी''* म्हणून मृत्यूलाच ठणकावीत आहे. हा अलौकिक धृत्युत्साह कसा टिकून राहिला!

संतांची चरित्रे आपणांस पटत नाहीत. पण थोर शास्त्रज्ञांच्या जीवनातील गोष्टी तरी आपणांस मान्य होतील. न्यूटन नावाचा एक थोर शास्त्रज्ञ होऊन गेला. आजचे विज्ञान त्याचे मोठे ऋणी आहे. तो आपल्या संशोधनात गढलेला असे. एकदा असे झाले की त्याच्या सेवकाने त्याचे जेवण त्याच्याजवळ आणून ठेवले. न्यूटन आपल्या कामात गढलेला होता. त्याला ताट आणून ठेवल्याचे कळलेही नाही. नित्याचा हाच धारा असल्याने सेवकाला त्याचे विशेष वाटलेही नाही. न्यूटनचे एक लाडके मांजर होते. ते आले. त्याने जेवणाचे ताट पाहून जेवणाची वेळ झाल्याने ते चाटूनपुसून स्वच्छ केले. काही वेळाने सेवक आला. तो रिकामे ताट घेऊन गेला. त्यानंतर बऱ्याच वेळाने प्रयोगातून वा चिंतनातून भानावर आलेल्या न्यूटनने आपल्या सेवकाला हाक मारून जेवण आणण्यास सांगितले. सेवक म्हणाला – महाराज! मी ताट आणून ठेवले होते आणि रिकामे ताट घेऊन गेलो. न्यूटन सरळपणे म्हणाला – जेवलो तर! ठीक आहे. जा तू. जेवणाविषयीचीही जाणीव विसरविणारा हा धृत्युत्साह केवढा उत्कट. सिद्धांताला पुष्टी देणाऱ्या अशा घटना थोर लोकांच्या जीवनात पुष्कळ वेळा घडलेल्या दिसतात. या क्वचित एकांगी आहेत. सुट्या सुट्या आहेत. पण त्यामुळे सिद्धांतात सांगितलेली शक्यता सिद्ध होते. सिद्धांताप्रमाणे सांगितलेले वर्तन असंभवनीय नाही, एवढे लक्षात येणेही सत्त्विकतेची प्रेरणा मिळण्याच्या दृष्टीने पुरेसे आहे.

सात्त्विक कर्त्याची ही लक्षणे परमार्थ मार्गातील साधकाने, त्याप्रमाणेच

समाजसेवा वा देशकार्य करू इच्छिणाऱ्या कार्यकर्त्याने अवश्य लक्षात ठेवली पाहिजेत अशी आहेत.

परमार्थात काही साधना करीत राहणे हे आवश्यक असते, पण मी चांगला साधक आहे असे वाटणे हे घातक ठरते. तसेच इतके दिवस साधना करीत आहे – काहीच प्रगती कशी होत नाही? काही अनुभव कसे येत नाहीत? आपण ही साधना स्वीकारली ती चुकीची तर नाही ना? तिच्यात काही चुकत तर नाही ना? काही अनुभवावाचून प्रगती कोठवर आली हे कसे कळावे, असे काहीतरी साधकाला वाटत राहते. ही एक प्रकारची फलाकांक्षाच आहे. सिद्धी किंवा असिद्धी विषयी अंत:करण निर्विकार नाही हेच यावरून लक्षात येते. तेव्हा *''तुका म्हणे नाही चालत तातडी । प्राप्त काल घडी आल्यावीण ।।''* या संतवाक्यावर विश्वास ठेवून जाणीवपूर्वक स्वीकारलेली साधना उत्साहाने करीत राहिले पाहिजे. धीर ढळू देता कामा नये. *'संशयात्मा विनश्यति'* हे लक्षात ठेवून मन शंकाकुल होऊ देऊ नये. असेल त्या शक्तीप्रमाणे प्रामाणिकपणे साधना सातत्याने करीत राहिले पाहिजे, किती काळ हा प्रश्न विचारू नये. केवळ करीतच राहावे, यामुळे योग्यता नसली तर येते, असली तर वाढते. योग्यतेची काही कुठे खाण नसते की तेथून आपणांस पाहिजे तेवढी खणून उचलून आणावी वा मूल्य देऊन आणावयास ती कुठे विकतही मिळत नाही. योग्यता हा विषयही प्रयत्नसाध्य आहे, अभ्यास-साध्य आहे, हे साधकाने लक्षात घेतले पाहिजे.

सामाजिक कार्यकर्त्याने तर सात्त्विक कर्त्याची लक्षणे सांगणारा गीतेतील हा श्लोक आपल्या अंत:करणावर कोरून ठेवला पाहिजे. ज्या परिस्थितीत, ज्या क्षेत्रात तो कार्य करीत असतो तेथे पाहिजे तशी, पाहिजे तितकी अनुकूलता बहुधा नसते. ज्याच्यासाठी तो काम करतो त्यांचेही सहकार्य हवे तेवढे मिळत नाही. घेतलेल्या कष्टाच्या मानाने फल पदरात पडत नाही. प्रोत्साहन देणारे, कौतुक करणारे कधी कुणी आढळतात पण दोषैक दृष्टीने केलेला उपहास वा निंदा अधिक बोचते. आणि मग या सगळ्या वस्तुस्थितीमुळे कार्यकर्त्यांचा उत्साह मावळतो. त्याला निराशा येते. कार्यकर्त्याने सांभाळावे लागते ते इथे. उत्साह टिकण्यासाठी अहंकारी नसणे, यशाने हुरळून न जाणे आणि अपयशाने न खचणे हे साधले असले तरच कार्यकर्त्याची कार्यक्षमता टिकून राहू शकते.

असा सात्त्विक कर्ता असणे हे स्वभावाने घडणे, प्रकृतीने असणे अत्यंत दुर्मिळ आहे. कारण त्याला पूर्वपुण्य बलवान असावे लागते आणि त्याला बालपणापासून लाभणाऱ्या सात्त्विक संस्कारांची जोड असावी लागते. सात्त्विक कर्तेपणा सुखसाध्य नाही. पण अभ्यासाने, प्रयत्नाने ते गुण प्राप्त करून घेणे हे अशक्य मात्र नाही. घडणाऱ्या प्रत्येक कृतीचे आणि उठणाऱ्या प्रत्येक वृत्तीचे निरीक्षण–परीक्षण योग्य रीतीने केले, सद्ग्रंथांच्या वाचनाने वा सद्वचनांच्या श्रवणाने लाभलेले ज्ञान, मनन–निदिध्यासाने चांगले ठसलेले असले, विवेक जागृत असला, अभ्यासाचा–प्रयत्नाचा कंटाळा नसला म्हणजे सात्त्विक गुण वाढू शकतात. कारण थोडा ना थोडा तरी सात्त्विक गुण प्रत्येक माणसाच्या ठिकाणी असतोच असतो. त्याची वाढ होण्यासाठी मात्र प्रकृती–प्रवृत्ती परिस्थितीप्रमाणे उणे–अधिक प्रयत्न करावे लागतात. हे प्रयत्न मन:पूर्वक होतील, मनाची साथ लाभून होतील, तेव्हा त्याचा विशेष उपयोग होतो यांत शंका नाही. पण मन वळवणे, मनाला वळण लागणे फार अवघड आहे. मग काय करावे त्याचे श्री कबीर सांगतात तेच उत्तर. मनाचे सहाय्य मिळो न मिळो शरीराने जे योग्य ते निग्रहाने करीत राहिले पाहिजे. श्री समर्थांनी रजोगुण वर्णनांत या आशयाचेच दिग्दर्शन केलेले आहे. 'आता रजोगुण सुटेना । प्रपंची गुंतली वासना । संसारिक हे सुटेना । यास उपाय कोण ।। उपाय एक भगवद्भक्ति । जरी ठाकेना विरक्ति । तरी यथानुशक्ति । भजन करावे ।।' भज धातूचा अर्थ सेवा करणे असा आहे. सेवा ही प्रामुख्याने शरीरानेच करावयाची असते. तेव्हा कर्तव्याचा त्याग शरीराकडून घडणार नाही एवढी तरी दक्षता साधकाने – आपले काही चांगले घडावे असे वाटणाराने – घेतलीच पाहिजे. याहून दुसरा सोपा मार्ग उपलब्ध नाही.

स्वभावत: बहुधा सर्वत्र आढळून येणाऱ्या राजस कर्त्याची लक्षणे भगवान् पुढील श्लोकात सांगत आहेत.

**रागी कर्मफलप्रेप्सुर्लुब्धो हिंसात्मकोऽशुचि: ।**
**हर्षशोकान्वित: कर्ता राजस: परिकीर्तित: ।।२७।।**

आसक्ती असलेला, कर्मफलाची इच्छा करणारा, लोभी, हिंसक, अपवित्र, हर्ष आणि शोक यांनी युक्त असा जो असतो त्याला राजसकर्ता

असे म्हणतात.

राज्यसकर्त्याला अत्यंत आसक्ती असते. रागी म्हणजे आसक्त असलेला. 'कर्मफलप्रेप्सु:', 'लुब्ध:' यात रागीपणाचाच अधिकाधिक विकास झालेला असतो. कोणतेही प्रलोभन असल्यावाचून रजोगुणी माणूस कर्म करण्यास प्रवृत्तच होत नाही. एक घोडे फार खोड्याळ होते. टांग्याला जुंपले की हलायचेच नाही. मारले तर मागे सरके, पण पुढे पाऊल टाकीत नसे. चांगले धष्टपुष्ट आणि उंच होते. देखणे होते. टांगेवाला वैतागला. ही खोड माहीत झाल्यामुळे घोडे कुणी विकतही घेईना. शेवटी गावातल्या एका अनुभवी वयस्क माणसाने टांगेवाल्याला सांगितले, एक लांब दांडी घे. तिचे पुढचे टोक घोड्यापासून हात-दीड हात पुढे येईल अशा रीतीने टांग्याला बांध आणि त्या टोकाला एका आखूड दोरीने हिरव्यागार गवताची पेंडी लोंबती राहील अशी बांधून ठेव. कितीही झोका मिळाला तरी ती पेंडी घोड्याच्या तोंडाला लागता कामा नये अशी दक्षता घे. आणि टांगा हाक. पाहिजे तर आदल्या दिवशी संध्याकाळपासून घोड्याला काही खायला घालू नकोस. टांगेवाल्याने तसेच केले आणि पेंडीच्या आकर्षणाने घोडे पुढे पुढे सरकून मग नीट चालू, धावू लागले. असे होऊ नये म्हणून गीतेने आसक्ती सोडा, कर्मफलाचा त्याग करा असा आदेश जीवन उदात्त व्हावे म्हणून अनेक वेळा, अनेक प्रकारांनी दिला आहे. त्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करून रजोगुणी मनुष्य आसक्ती ठेवणारा असतो, इतकेच नव्हे, तर त्यापायी लोभीही बनतो. लोभी म्हणजे हावरा. कितीही मिळाले तरी संतुष्ट न राहणारा. मिळालेले साठवून ठेवणारा. त्यामुळेच अतिकृपणपणे वागणारा असा होतो. कृपणपणा तरी किती असतो! स्वत: तर कोणाला काही देत नाहीच; पण कुणी काही देताना पाहिले तरी त्याला दु:ख होते. प्रत्यक्षात तर राहू द्या; स्वप्नात काही देतो म्हणाला तरी ते त्याला सोसत नाही. कृपणपणाचे वर्णन एका संस्कृत सुभाषितकाराने फार चांगले केले आहे. *''भार्ये जागृहि भागधेय पिशुनं मे स्वप्नवृतं शृणु द्रव्यं याचन केन दीनवचसा केनाप्यहं याचित: । तस्मै दातुमहं पणं कटिगतं यावत् समुद्युक्तवान्। तावत् पूर्वजपूर्वपुण्यनिचयै: कान्ते प्रबुद्धोस्म्यहम् ।।''*

एक गृहस्थ मध्यरात्री जागा झाला. त्याने आपल्या बायकोला ढोसून जागे केले. बापडी दिवसभराच्या कष्टाने थकून गाढ झोपली होती. ती दचकून

जागी झाली, म्हणाली – ''अहो काय?'' ''काय, काय विचारतेस? केवढी आनंददायक घटना झाली! ती आपल्या भाग्याची सूचक समजली पाहिजे.'' ''असं काय झालं?'' ''मला एक स्वप्न पडलं. एक भिकारी माझ्याकडे आला. हात पसरून त्याने मला काही मागितले. मलाही दुर्बुद्धी होऊन त्याची दया आली. कडोसरीचा एक पैसा काढून मी त्याच्या हातावर ठेवणार तोच जागा झालो. आमच्या पूर्वजांनी केलेले मोठे पुण्य फळास आले. नाहीतर पैसा गेला असता!'' बायकोने बहुधा कपाळावर हात मारून घेतला असणार.

अशा या लोभापायी माणूस अत्यंत स्वार्थी होतो. दुसऱ्याचा थोडाही विचार तो करीत नाही. आपल्या वागण्यापायी कोणाला किती त्रास होतो याचा यत्किंचितही विचार तो करीत नाही. म्हणून त्याचे वागणे हिंसात्मक होते. दुसऱ्याला पीडा झाली तरी, आपल्याला बरे वाटते तसेच वागणे, आपला स्वार्थ साधत असताना कोणी लुबाडले गेले, कोणाचे शोषण झाले तरी याला त्याची क्षिती नसते. भेसळ करणारे व्यापारी, लाच खाणारे अधिकारी, सज्जनावरच दात धरणारे आरक्षी (पोलिस), संघटना उभारून गुंडपणाच्या बळावर सर्वसामान्यांना धाकात ठेवणारे पुढारी हे सर्व रजोगुणाच्या हिंसात्मकतेचेच आविष्कार आहेत. तमोगुणाच्या संदर्भात वर्णिलेली हिंसा ही उघड आणि क्रूर असते. ही रजोगुणी हिंसा एकदम लक्षात येत नाही. ती बऱ्या वाटणाऱ्या कोणत्यातरी तथाकथित सिद्धांताच्या पांघरुणाखाली लपलेली राहते. सर्व क्षेत्रांत अलीकडे आढळून येणारा भ्रष्टाचार या रजोगुणाचाच प्रभाव आहे. तो किती हिंसक होतो तेही त्यामुळे झालेल्या महागाईच्या परिणामातून आपण प्रत्यही अनुभवीत आहोत. तेलातुपादी खाद्य पदार्थातील भेसळ, खोटी औषधे यांनी कित्येकांचे आरोग्य बिघडते. कित्येकांच्या प्राणावर बेतते. तरी संबंधितांना लाज नसते. उद्योगात अपवित्रपणा निर्माण होतो तो असा.

ज्याच्या मनात लोभ आहे, वर्तनात हिंसा आहे तो पवित्र राहणे शक्यच नाही. सगळी अपवित्रता मुळात आसक्तीतून निर्माण होते. एक प्रयोग करून बघण्यासारखा आहे. धूळ बसलेला पाट कोरड्या वस्त्राने झटका. पाटावरची धूळ जाते. वस्त्राला धूळ चिकटत नाही. वस्त्र ओले असले तर धूळ वस्त्राला चिकटल्याशिवाय राहत नाही. त्याप्रमाणे व्यवहारात वागताना ज्या माणसाचे अंत:करण आसक्तीरहित असते म्हणजे लक्षणेने कोरडे असते, त्याला त्याच्या

भोवतालच्या व्यापातील केर, धूळ यांचा स्पर्श होत नाही. अंत:करण मलीन होत नाही. म्हणून वर्तनही पवित्र राहते.

आसक्तीच माणसाला विधिनिषेधाचा विचार करू देत नाही. त्याला पातकाची, दुर्वर्तनाची खंत वाटत नाही. ज्याला पवित्र राहण्याची इच्छा आहे, त्याने आसक्तीचा आणि लोभाचा त्याग केला पाहिजे.

आसक्तीमुळेच, लोभामुळेच या रजोगुणी मनुष्याला हर्ष आणि शोक यांनी युक्त व्हावे लागते. थोडेसे मनासारखे झाले, कार्याला यश आले की हा हर्षाने उचंबळून येणार. ताठ्याने मिरवणार. इतरांना तुच्छ लेखणार. माझे कौशल्य, माझी बुद्धिमत्ता असामान्य आहे म्हणून मला हे एवढे यश मिळाले. भेटेल त्यापुढे अशी आपली वाखाणणी करीत राहणार. उलट थोडेसे मनाविरुद्ध झाले, कार्याला यश आले नाही की याचा धीर सुटणार. हा निराशेने खचून जाणार. 'आम्ही करंटे, आम्ही दळभद्रे, अशा स्थितीत जगायचे तरी कशाला?' असे म्हणत पडल्या चेहऱ्याने खिन्नपणे वावरणार.

रजोगुणी माणसाला काही सोसत नाही. तो अधीर, हळवा, घायकुता असतो. वास्तविक माणसाने *''न प्रहृष्येत् प्रियं प्राप्य नोद्विजेत् प्राप्यचाप्रियम्''* अशी स्थिर बुद्धी, धीरवृत्ती ठेवली पाहिजे. पण हा रजोगुणी सदासर्वदा हर्षशोकान्वित राहतो. म्हणून त्याचे जीवन सुख-स्वास्थ्य-समाधानापासून वंचित राहते. तामस कर्ता कसा असतो ते भगवान् पुढील श्लोकात सांगत आहेत.

**अयुक्तः प्राकृतः स्तब्धः शठो नैष्कृतिकोऽलसः ।**
**विषादी दीर्घसूत्री च कर्ता तामस उच्यते ।।२८।।**

जो अस्थिर, असंस्कृत, उर्मट, दुष्ट, कपटी, आळशी, रडका आणि कोणतेही काम वेळेवर न करता चालढकल करणारा असा असतो त्याला तामस कर्ता म्हणावे.

सात्त्विक कर्ता हा जीवनाचा आदर्श. कार्य करणारी सर्वसामान्य माणसे रजोगुणी असतात; तर कार्यकर्ता कसा असताच कामा नये, हे या तामस कर्त्याच्या लक्षणाने सांगितले आहे. यातील प्रत्येक लक्षणाचे भाष्यकारांनी व टीकाकारांनी केलेले अर्थ थोडे वेगवेगळे आहेत. पण कोणताही अर्थ त्याज्य

गुणाने युक्त असाच आहे. ज्याचे मन स्थिर नाही, विवेकी नाही, समाहित नाही, तो अयुक्त. केव्हा कसा वागेल याचा भरवसा अशा माणसाच्या स्वभावामुळे देता येत नाही. तो प्राकृत म्हणजे असंस्कृत, अडाणी असतो. स्तब्ध शब्दाने उर्मटपणा, ताठपणा, विनय-नम्रता या गुणांचा अभाव सुचविला जातो. ज्याच्यावर कोणत्याही गोष्टीचा परिणाम होत नाही त्यालाही स्तब्ध म्हणता येईल. रस्त्यामध्ये वाहनाला आडव्या येणाऱ्या गाढवासारखी वा म्हशीसारखी त्याची वृत्ती असते. तुम्ही भोंगा केवढ्यानेही वाजवा, ते आपली चाल सोडणार नाहीत. शठ शब्दाचा अर्थ आहे धूर्त, फसवा, मायावी, कपटी. पैसे दुप्पट करून देतो, सोने दुप्पट करून देतो म्हणून फसविणारे ते शठ. एखादी चांगली वस्तू अत्यंत स्वस्तात देतो असे सांगतो तो शठ. आणि त्याच्या या धूर्तपणाला मोहाने बळी पडतो तो लोभी, राजस. श्रीरामानुजाचार्यांनी शठ शब्दाचा अर्थ *''अविचारादि कर्मरुचि:''* म्हणजे, जारण-मारण-उच्चाटन करणारा, चेटूक करणारा असा केला आहे.

नैष्कृतिक या शब्दाचा निंबार्काचार्यांनी आपल्या टीकेत केलेला अर्थ लक्षणीय आहे. ते म्हणतात – *''परवृत्तिच्छेदनाभिप्रायेण धर्मादिप्रदर्श्य स्वार्थसाधक:''* धर्माच्या नावाखाली दुसऱ्याला लुबाडून स्वत:चा स्वार्थ साधतो तो. ख्रिश्चन मिशनरी, बुवा, दांभिक महंत या गटात येतात. श्रीमधुसूदनसरस्वतींनी या शब्दाचा अर्थ थोडा निराळा केला आहे. *''स्वास्मिन् उपकारित्व भ्रमं उत्पाद्य परवृत्तिच्छेदनेन स्वार्थपर: ।''* आमच्यावर विश्वास ठेवा, आम्ही तुमचे कल्याण करू असे सांगून जे दुसऱ्याला फसवून त्यांची हानी करतात, स्वत:चा स्वार्थ मात्र साधून घेतात, ते नैष्कृतिक. हे लक्षण पुष्कळशा कामगार पुढाऱ्यांना लागू पडणारे आहे. ते कामगार-हिताची घोषणा करून दीर्घकालीन संप पुकारतात. आणि त्यात कामगारांची हानी होते. कित्येक वेळा तर हे लोक उद्योगपतींच्या हितासाठीच संप घडवून आणतात असेही आढळून येते. बहुतेक सारे धनपती (भांडवलदार) शठ तर साम्यवादी नेते नैष्कृतिक असतात असे आढळते. कामगार पुढाऱ्यांचे हे ऐश्वर्य किंवा विलासी जीवन कित्येक वेळा उद्योगपतींनाही लाजवील असे संपन्न असते. एक धनाच्या बळावर उद्योग उभारून श्रमिकांचे शोषण करतो; तर दुसरा श्रमिकांना त्यांच्या अधिकाराची जाणीव देऊन संघटित करून संघर्ष उभारतो

आणि स्वत:ची प्रतिष्ठा वा स्वार्थ साधून घेतो. म्हणून भारतीय संस्कृतीने धनसत्ता आणि श्रमसत्ता या दोहींच्या मधून जीवनाची वाटचाल शोधली आहे. भारतीय संस्कृती धर्मसत्तावादी आहे. 'धर्म' संकल्पनेचा अर्थ लोक चुकीचा करीत असतात. धर्म म्हणजे उपासनापद्धती नव्हे. उपासनापद्धती हे संप्रदायाचे अंग आहे. आज चांगल्या अर्थाने संस्कृतीची जी जी अंगे आहेत ती सर्व धर्म शब्दात समाविष्ट होतात. धर्मसंकल्पनेचा अर्थ आधी संकुचित करायचा आणि मग धर्माला ठोकून काढायचे अशी पद्धती बुद्धिवादी अवलंबितात. ख्रिश्चन, मुसलमान यांच्यासारख्या अत्याचारी आक्रमकांनी धर्माच्या नावावर केलेली अनन्वित कृत्ये ही जणू धर्माचे अपरिहार्य अंग आहे, असे समजून तथाकथित बुद्धिवाद्यांनी धर्माला ठोकून काढताना उदाहरणे म्हणून त्या दुष्कृत्यांचा उपयोग केला आहे. हिंदू धर्माच्या नावाने ओरडण्यापूर्वी अशी क्रूर कर्मे हिंदू लोकांनी धर्माच्या नावावर कधीही केलेली नाहीत, हे लक्षात घेतले पाहिजे. हिंदू धर्मासारखा सहिष्णु आणि सर्वधर्मसमभाववादी धर्म जगाच्या पाठीवर दुसरा नाही. तो तात्त्विक पातळीवर वादविवाद करील. त्या कामी आपले तर्ककौशल्य पणाला लावील, पण दुसऱ्याच्या उपासनास्थानांचा विध्वंस करावा अशी रीत त्याने कधी अवलंबिली नाही. असो.

धर्मसत्तेमध्ये समावेश होतो तो नियतकर्माचा, कर्तव्यकर्माचा, ईश्वरनिष्ठेचा. एकूण सर्व प्रकारच्या सात्त्विक गुणांचा. आणि म्हणून भारतवर्षाच्या इतिहासाच्या अत्यंत प्रदीर्घ कालखंडातही वर्गविग्रह, वर्णसंघर्ष वा जातिभेदाधिष्ठित वैर कधी उत्पन्न झाले नाही. गीतेसारखा ग्रंथ हा जीवनाचा आदर्श असल्यामुळेच हे घडू शकले. वॉरन हेस्टिंग्ज सारख्या परकीय राज्यकर्त्यानेही यासाठीच गीतेचा गौरव केला आहे. आपण *''गीता सुगीता कर्तव्या किमन्यै: शास्त्रविस्तरै:''* म्हणतो ते यामुळेच.

विषादी म्हणजे रड्या, मरगळलेला, निराशावादी, हताश. ज्याच्याजवळ उत्साह म्हणून काही वस्तू नावालाही नसते, जगात काही चांगले आहे, आपले काही चांगले होईल, चांगले म्हणून काही असणे शक्य आहे यावर त्याचा मुळीच विश्वास नसतो. असा हा विषादी तमोगुणाच्या प्रभावाने घडत असतो.

दीर्घसूत्री म्हणजे जे काम लगेच केले पाहिजे ते पुढे कधीतरी करू म्हणून थांबणारा. वास्तविक *''कल करे सो आज कर, आज करे सो अब । पलमे*

*परलयी होयगी, बहुवर करोगे कब?''* असा एक दोहा प्रसिद्ध आहे. उद्या करायचे ते आज करा. आज करायचे ते आत्ता करा. *''गृहीत इव केशेषु मृत्युना धर्ममाचरेत् ।''* हा सिद्धांत आपल्या शास्त्राने सांगितला आहे. पण तमोगुणी हे लक्षात घेत नाही. तो, 'बघू हो! काय घाई आहे? करू या सावकाश!' असे म्हणत आळसाने वा कार्याचे महत्त्व न पटल्याने रेंगाळत राहतो. योग्य तो निर्णय चटकन् घेणे आणि त्याची कार्यवाही त्वरित करणे ही गोष्ट कर्तव्यकर्म चांगल्या रीतीने पार पडण्याच्या दृष्टीने आवश्यक असते. पण ही तत्परता तमोगुणी व्यक्तीच्या ठिकाणी नसते. म्हणून कर्ता कसा नसावा याचे तमोगुणी माणूस हे मूर्तिमंत उदाहरण आहे.

भगवंताने कर्माला प्रेरणा देणाऱ्या आणि कर्माला अधिष्ठान असणाऱ्या अशा ज्ञान-कर्म-कर्ता या तीन गोष्टींविषयी त्रिविध प्रकाराने सांगितले. यात कर्माचा प्रमुख जो कर्ता, त्याची बुद्धी आणि धृती हीच महत्त्वाची कारणे असतात. त्यामुळेच ज्ञानाला किंवा कर्माला त्रिविधता येत असते. कर्त्याचे तीन प्रकार होतात तेही या बुद्धी आणि धृतीमुळेच.

विचार करण्याचे, निर्णय घेण्याचे, चांगल्या-वाईटाचा विवेक ठरविण्याचे जे साधन, ते बुद्धी, आणि ज्याच्यामुळे स्वीकारलेल्या कामातील सातत्य, साक्षेप, उत्साह टिकून राहतो ती धृती. या बुद्धीचे आणि धृतीचेही सात्त्विक-राजस-तामस असे तीन प्रकार आहेत. आणि त्यामुळे ज्ञान, कर्म किंवा कर्ता यांचे ते ते वैशिष्ट्य ठरत असते. भगवान् पुढील श्लोकातून त्यासंबंधीच सांगत आहेत.

**बुद्धेर्भेदं धृतेश्चैव गुणतस्त्रिविधं शृणु ।**
**प्रोच्यमानमशेषेण पृथक्त्वेन धनंजय ।।२९।।**

हे धनंजया, अर्जुना! सत्त्वादी तीन गुणांमुळे बुद्धीचे आणि धृतीचे होणारे प्रत्येकी तीन प्रकार नीट फोडून सांगतो. त्यामुळे बुद्धी आणि धृती यांच्याविषयी सगळे ज्ञान होईल. ते सावधपणाने ऐक.

बुद्धीचे आणि धृतीचे सात्त्विक, राजस, तामस या तीन गुणांनी प्रत्येकी तीन प्रकार होतात. त्यांचे ज्ञान वेगळे वेगळे असे करून घेतले पाहिजे आणि ते सांगोपांग असले पाहिजे. एखाद्या वस्तूसंबंधी ज्ञान करून घेण्याच्या दोन

पद्धती असतात. एक पृथक्करणात्मक असते आणि दुसरी संकलनात्मक असते. संकलनात्मक ज्ञानामुळे वस्तूचे महत्त्व आणि उपयुक्तता कळते. तिचा उपयोग केव्हा, कुठे, कसा, किती करून घ्यावा हे चांगले लक्षात येते. पृथक्करणात्मक ज्ञानामुळे वस्तूचे ज्ञान सांगोपांग रीतीने होते. अवयवशः होते. त्यामुळे वस्तूच्या स्वरूपाचा बोध स्पष्ट रीतीने होतो. व्यवहाराच्या दृष्टीने दोन्ही प्रकारची ज्ञाने कर्त्याच्या ठिकाणी असावी लागतात. पृथक्करणात्मक ज्ञानाचा विस्तार पाहिजे तेवढा वाढू शकतो. त्या दृष्टीने कुठेतरी थांबावे लागते. पृथक्करण हे केळीच्या खुंटाची सोपटे काढण्यासारखे आहे. तरीपण पृथक्करण हे दुर्लक्षून चालत नाही, म्हणून भगवान् ''तुला बुद्धीचे आणि धृतीचे ज्ञान पृथक्पणे सांगतो, उलगडून सांगतो, प्रत्येकी वेगवेगळ्या लक्षणांनी सांगतो'' असे म्हणतात. पुढील श्लोकात भगवंत सात्त्विक बुद्धीचे लक्षण सांगत आहेत.

**प्रवृत्तिं च निवृत्तिं च कार्याकार्ये भयाभये ।**
**बन्धं मोक्षं च या वेत्ति बुद्धिः सा पार्थ सात्त्विकी ।।३०।।**

काय करावे, करू नये, योग्य कोणते, अयोग्य कोणते, कशाचे भय बाळगावे, कोठे धीटपणाने पुढे व्हावे, बंधने कशी व कशाने निर्माण होतात, त्याचप्रमाणे सुटका कशी व कशाने होते हे सर्व ज्या बुद्धीला योग्य वेळी नेमकेपणाने कळते, अर्जुना! त्या बुद्धीला सात्त्विकबुद्धी असे जाणावे.

केवळ प्रवृत्ती कळणारी बुद्धी राजस असू शकते, तसेच केवळ निवृत्ती हा आळसाचा प्रभाव असल्याने तो तामसी असू शकतो. चांगल्या अर्थाने प्रवृत्ती ही उद्योगाची द्योतक आहे, तर निवृत्ती शांततेची द्योतक आहे. सात्त्विक बुद्धीला या प्रवृत्तीची आणि निवृत्तीची योग्य स्थाने कोणती, त्यांचा उपयोग कुठे, केव्हा, कसा, किती हे उचित रीतीने कळते. आपल्या धर्माची प्रवृत्ती आणि निवृत्ती ही दोन लक्षणे आहेत, दोन अंगे आहेत. प्रवृत्तीमुळे ऐहिक व्यवहार उत्तम रीतीने पार पाडता येतात; तर निवृत्तीमुळे परमार्थाची साधना चांगल्या रीतीने होते. प्रवृत्ती ही गृहस्थासाठी आणि निवृत्ती हा संन्याशाचा गुण म्हणून योग्य असते, असेही सांगितले आहे. अत्यंत तात्त्विक दृष्टीने विचार करताना त्या त्या आश्रमातील मर्यादा स्पष्ट करण्याच्या दृष्टीने हा विचार योग्यच आहे. पण त्यामुळे प्रवृत्ती आणि निवृत्ती हे शब्द केवळ पारिभाषिक ठरतात.

हे दोन्ही शब्द प्रपंच आणि परमार्थाकरिता वेगळे वेगळे आहेत असे म्हटले तरी परमार्थाकरिताही प्रपंच चांगला असावा लागतो. निदान चांगला करण्याची शक्यता असावी लागते. म्हणून तर समर्थांनी परमार्थापूर्वी प्रपंच नेटका केलेला असला पाहिजे असे आग्रहाने सांगितले आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीही *''जयाचे ऐहिक धड नाही । तयाचे परत्र पुससी कायी ।''* (ज्ञाने. ४/१५५) असेच आवर्जून सांगितलेले आहे. समर्थ रामदास स्वामींचे सर्व प्रपंच-विज्ञान हे जणू या ओवीवरील भाष्य आहे. कारण समर्थांनाही प्रपंचाकरिता प्रपंच अपेक्षित नाही. परमार्थाची योग्यता येण्यासाठी प्रपंच फिका फिका होत जावा लागतो. आणि नेटका केल्याविना हे घडू शकत नाही असे ते म्हणतात. याचाच अर्थ प्रवृत्ती आणि निवृत्ती यांचा विचार प्रत्येकाने योग्य रीतीने केला असला पाहिजे असाच आहे.

कार्याकार्य, भयाभय, बंध-मोक्ष यांचे ज्ञान असणे, हे जे सात्त्विक बुद्धीचे लक्षण सांगितले आहे, त्याप्रमाणे वागणे हे मुळात प्रवृत्ती-निवृत्तीवरच अवलंबून आहे. प्रवृत्ती-निवृत्तीकडे लक्ष ठेवणे म्हणजे तोल सांभाळून चालणे. आपणांस दोन पाय आहेत, म्हणून आपल्याला साध्या सरळ रस्त्यावरून तोल सावरून चालता येते. एकाच पायाने लंगडी घालत काही वाटचाल करता येत नाही. दुर्दैवाने एखादा पाय नसेल तर त्याचा प्रतिनिधी म्हणून कुबडी घ्यावी लागते वा कृत्रिम पायाचा आधार घ्यावा लागतो. साध्या सरळ वाटेने चालताना सुद्धा तोल सावरण्यासाठी असे दक्ष राहावे लागते, तर पारमार्थिक वाटचाल हे तर सुरीच्या धारेवरून चालणे आहे. *''क्षुरस्य धारा निशिता दुरत्यया दुर्गं पथस्तत् कवयो वदन्ति ।''* (कठ ३-१४) असे उपनिषदांनी म्हटले आहे. तेव्हा या मार्गाने प्रगती साधताना फारच सावधपणा बाळगावा लागतो. डावीकडे वा उजवीकडे झोक गेला तर चालेल असे म्हणता येत नाही. कोणत्याही अंगावर पडला तरी लागायचे ते लागणारच. सात्त्विक बुद्धी प्रवृत्ती-निवृत्तीचा विवेक करीत असल्याने समतोल राखणे शक्य होते.

कार्याकार्यादी सर्व गोष्टीचा विचार केवळ निरपेक्षपणे करता येत नाही. प्रसंगानुसारच ते सर्व विचारात घ्यावे लागते. यज्ञ-दान-तप या गोष्टी करण्यास योग्य आहेत. चोरी-चहाडी-शिंदळकी यांपासून दूर राहावे, कारण त्या गोष्टी करू नयेत अशा आहेत, अकार्य आहेत, बालहत्या अकार्य आहे. पातक

आहे. पण बाळंतीण अडली तर कित्येक वेळी शस्त्रवैद्याला स्त्रीचा जीव वाचविण्यासाठी अगतिकपणे मूल कापून काढावे लागते. म्हणजे अकार्यच प्रसंगविशेषी कार्य होते!

भय आणि अभय यांचेही असेच आहे. अभय हा दैवी संपत्तीचा पहिला गुण सांगितला आहे. धीटपणा, निर्भयता, शौर्यासाठी, पराक्रमासाठी वीराच्या ठिकाणी आवश्यक असलेला गुण. पर्वतातील खोल दऱ्यांच्या कडेवरून जाणारी उंच-सखल अरुंद वाट जर चालायची असेल तर अंगी धीटपणा असलाच पाहिजे. तरच असामान्य निसर्गसौंदर्याने नटलेल्या वनश्रीचा आल्हाद अनुभविता येईल. कोणत्याही दिव्य-भव्य दर्शनाचा आनंद उपभोगण्यासाठी अंत:करण निर्भय असले पाहिजे. अवघड वाटेवर पाय लटपटू लागले, खोल दऱ्याखोऱ्या पाहून चक्कर येऊ लागली, तर हिमालयाच्या अलौकिक सौंदर्याचा साक्षात्कार कसा होणार? परमार्थातील तपाचरण असो की ऐहिकातील भूगोलाचे संशोधन असो, दोनही ठिकाणी माणूस निर्भय असल्याशिवाय प्रगती करून घेऊ शकत नाही. भित्रा मनुष्य उद्योगधंद्यातसुद्धा यशस्वी होऊ शकत नाही असे म्हणतात. तेथे *'साहसे श्री: प्रतिवसति'* असेच आढळते.

निर्भयतेचे असे माहात्म्य असले तरी पातकाला भिणे, पापभीरू असणे हा सद्गुण आहे. मरणाला भिऊ नये पण दुष्कीर्तीला भिणे हे सज्जनपणाचे आहे. मृच्छकटिकाचा नायक चारुदत्त *'न भीतो मरणादस्मि केवलं दूषितं यश:'* असेच म्हणतो.

बंध म्हणजे संसार आणि मोक्ष म्हणजे मुक्ती, असा अर्थ केला तरी मोक्ष मिळेपर्यंत, मुक्त होईपर्यंत संसार सुटत नाही. आणि हा प्रवास फार दीर्घकालाचा आहे. म्हणून बंधमोक्षाचा विचारही योग्य रीतीने करावा लागतो. आसक्तीच्या पाशात गुंतू नये हे खरे. रागद्वेषाच्या बंधनातून सुटले पाहिजे पण सदाचाराच्या मर्यादा, विधिनिषेधाची बंधने पाळलीच पाहिजेत. पारतंत्र्य चांगले नाही. कोणाचे दास्य स्वीकारू नये, पण खऱ्या प्रेमाच्या बंधनात राहणे चांगले आहे. ईश्वराचा दास होणे भूषणाचे आहे. व्याधी कशामुळे होतो आणि तो नाहीसा करण्यासाठी काय करावे, हे कळणे हे एक प्रकारे बंधमोक्षाचेच ज्ञान आहे. अयोग्य आहार-विहार रोग उत्पन्न करतात. पथ्याने राहिल्यामुळे रोग नाहीसा होतो. हे नीट उमगेल आणि चांगले लक्षात राहील तर आरोग्य

सांभाळण्यासाठी कसे वागावे ते सहजपणाने कळेल. प्रत्येक प्रश्नाला उलट-सुलट अशी दोन अंगे असतात. अनुकूल-प्रतिकूल अशा दोन दिशा असतात. म्हणून प्रवृत्तिनिवृत्ती, कार्याकार्य, भय-अभय, बंध-मोक्ष हे सर्व नीट समजून घ्यावे लागते. नाहीतर चक्रव्यूहात शिरलेल्या अभिमन्यूसारखी दशा होईल. यासाठीच दोन्ही कडा समजतात ती बुद्धिमत्ता श्रेष्ठ.

जेव्हा एखादा सिद्धांत आपण स्वीकारतो आणि तो इष्ट म्हणून दुसऱ्या कोणास पटवून द्यायचा असतो, तेव्हा त्या विषयाचे पुष्कळच चिंतन करावे लागते. मी म्हणतो त्या पटवून द्यायच्या पद्धतीवर दुसरा काय आक्षेप घेईल? माझ्या विरोधात कोणते तर्क लढवील? माझ्यापुढे कोणते पेच उभे करील? मला कोठे अडवील? कोणती उदाहरणे देईल? त्या वेळी मला कोणते तर्क करावे लागतील? कोणत्या उलट उदाहरणाने माझे मत सिद्ध करावे लागेल? या सर्वांचा विचार व्यापक रीतीने करावा लागतो. बुद्धीला हे असे सामर्थ्य असावे लागते. प्रतिपक्ष आपले मत कसे मांडील ते त्याच्यापेक्षा अधिक कुशलतेने आपणांस मांडता आले पाहिजे, आणि मग त्याचे योग्य रीतीने खंडण करता आले पाहिजे. हे बुद्धिकौशल्य सामान्य नाही.

एका वकिलाची गोष्ट सांगतात. न्यायालयात विजय मिळवणे आणि आपल्या पक्षकाराची भूमिका खरी असल्याचे सिद्ध करून देणे हा जणू त्यांच्या हाताचा मळ होता. या गुणावर त्यांनी वकिलीत पुष्कळ ऐश्वर्य आणि लौकिक संपादन केला. त्यामुळे पुढे पुढे ते व्यसनाच्या आहारी जाऊ लागले. एकदा ते मद्याच्या धुंदीत न्यायालयात आले आणि आपल्या भाषणाच्या वेळी प्रतिपक्षाचा वकील जसा बोलेल तसे बोलू लागले. ऐकणारे आश्चर्याने ऐकू लागले आणि यांचा पक्षकार घाबरला. आता आपली धडगत नाही असे त्यास वाटले. अर्ध्या-पाऊण तासानंतर महाशयांची धुंदी उतरली. आपण स्वत:ला विरोधी जाणारे प्रतिपादन करीत आहोत हे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी आपला स्वर पालटला. न्यायमूर्तींना नम्रतेने अभिवादन करून ते म्हणाले – महाराज! आतापर्यंत आमचे विरोधी अधिवक्ते स्वत:च्या पक्षकाराला वाचविण्यासाठी काय म्हणतील, ते मी आपणांस सांगितले. आता मी आम्हांला काय म्हणायचे आहे ते सांगतो. असे बोलून त्यांनी पुढील प्रतिपादन इतक्या कौशल्याने केले की शेवटी यश त्यांनाच मिळाले. वाद जिंकायचा तर हे असे चातुर्य बुद्धीला

असावेच लागते. हा लाभ मद्यप्राशनाचा आहे असे मात्र कृपया कुणी मानू नये.

भाष्यकार भगवान् श्रीशंकराचार्य अद्वैत सिद्धांताचे पुरस्कर्ते होते. अद्वैत मताला प्रतिकूल असलेल्या आणि त्या काळी प्रचलित असलेल्या सर्व विचारांचे खंडण त्यांनी अत्यंत समर्थपणे केले आहे. ते पूर्वपक्षाची भूमिका, तो मांडील, त्याहीपेक्षा सरस रीतीने मांडीत आणि मग प्रमाणसिद्ध तर्काने त्याचे खंडन करून आपल्या उत्तरपक्षाचे प्रतिपादन करीत. सात्त्विक बुद्धीचे माहात्म्य लक्षात यावे म्हणून मी हे आपणास सांगितले.

एखाद्याला आक्षेप घेता येतात, तर एखाद्याला आपला सिद्धांत चांगल्या रीतीने मांडता येतो. पण आक्षेपाच्या पुढे त्याला गांगरल्यासारखे होते. उलट एखाद्याला आक्षेपांचे खंडण प्रभावीपणे करता येते. त्या वेळी त्याच्या वक्तृत्वाला चांगली धार चढते. पण एखादा विषय स्वतंत्रपणे रसाळ करून सांगावा हे त्यास साधतेच असे नाही. वक्तृत्त्वाचे आणि त्याला कारण असणाऱ्या बुद्धिमत्तेचेही असे काही विशेष असू शकतात. बुद्धिमत्तेची सात्त्विकता परिश्रमाने वाढविणे शक्य आहे. भावांची शुद्धता तिच्यामुळे प्राप्त होते. हे एक मानसिक तपच आहे.

रजोगुणाने युक्त बुद्धी कशी असते तिचे वर्णन करताना भगवंत सांगतात की–

**यया धर्ममधर्मं च कार्यं चाकार्यमेव च ।**
**अयथावत् प्रजानाति बुद्धिः सा पार्थ राजसी ।।३१।।**

धर्म आणि अधर्म, कार्य आणि अकार्य यांच्याविषयीचा यथायोग्य निर्णय जी बुद्धी घेऊ शकत नाही तिला राजस समजावे.

धर्माधर्माचा, कर्माकर्माचा हा घोटाळा चांगल्या चांगल्यांचाही होतो. सगळी सिद्धता करून युद्धाला उभ्या राहिलेल्या अर्जुनासारख्या वीराग्रणीलाही अत्यंत धर्म्य असलेले युद्ध अधर्माचे वाटले. द्यूतामध्ये पत्नी पणास लावणे हा वास्तविक अधर्म होता. पण क्षत्रियाने द्यूताचे आव्हान नाकारू नये असा संकेत असल्याने युधिष्ठिर सारी संपत्ती पणाला लावून हरत गेला तरी थांबला नाही, हे समजू शकते. पण पती म्हणून पत्नीचे सर्वतोपरी रक्षण करणे अवश्य कर्तव्य आहे हे विसरून त्याने 'द्यूताचे आव्हान नाकारू नये' या संकेतापायी द्रौपदीसही

पणाला लावले हे अधर्मालाच धर्म समजणे झाले. असाच प्रसंग युधिष्ठिराच्या दृष्टीने इतिहासकालीन असलेल्या नलाच्या संबंधातही घडला आहे. पुष्कर या आपल्या चुलतभावाशी द्यूत खेळताना नलही राज्यसंपत्ती इत्यादी सर्वस्व हरला होता. तेव्हा पुष्कराने ''तुझे सर्वस्व गेले आहे, दमयंती तेवढी राहिली आहे, ती आता पणाला लाव'' असे म्हणताच नल अत्यंत व्यथित झाला. त्याने पुढे खेळण्याचे नाकारले आणि एकावस्त्रानिशी तो दमयंतीसह बाहेर पडून वनवासात गेला. पत्नीला पणास न लावण्याचा विवेक त्याने राखला, कारण त्याने प्रवृत्ति-निवृत्तीची मर्यादा योग्य प्रकारे जाणलेली होती. युधिष्ठिर हा विवेक राखू शकला नाही. व्यवहारात असे अनेक वेळा होते. म्हणूनच गीतेने *''किं कर्म किमकर्मेति कवयोऽप्यत्र मोहित:''* *(गीता ४/१६)* असे म्हटले आहे. कारण आलेल्या प्रसंगाचे स्वरूपच गोंधळ निर्माण करणारे असते. यासाठीच महाभारतात - *''अधर्मरूपो धर्मो हि कश्चिदस्ति नराधिप । धर्मश्चाधर्मरूपोऽस्ति तच्चज्ञेयं विपश्चिता ।।'' ''अधर्म असतो खरा वरून धर्म भासे जरी । कधी उलट ही असे समजण्यात ते चातुरी ।।''* (कृष्णकथामृत सर्ग १४/१६२), असे म्हटले आहे.

गोंधळलेल्या अर्जुनाला भगवंतांनी 'काय करावे ते मी तुला सांगतो - *''तत्ते कर्म प्रवक्ष्यामि यज्ज्ञात्वा मोक्ष्यसेऽशुभात् ।।''* (गीता ४/१६) ते जाणून घे आणि त्याप्रमाणे वाग म्हणजे तू पातकातून सुटशील - असे ठामपणाने सांगितले आहे. अर्जुनाचे हे भाग्य प्रत्येकाने कोठून आणायचे? पण सदाचरणाने, शास्त्राभ्यासाने, चिंतन-मननाने, अनुभवांच्या विश्लेषणाने, सतेज झालेली बुद्धी विवेकाने असा निर्णय देऊ शकते. असा हा निर्णय जणू प्रत्येकाच्या हृदयात वास करणाऱ्या ईश्वरानेच दिला आहे, असे समजावे. म्हणजे अर्जुनाच्या भाग्याचा काही अंश तरी आपल्या वाट्यास आला आहे, असे मानता येईल.

श्री ज्ञानेश्वरमहाराजांच्या चरित्रात वर्णिलेला एक प्रसंग या दृष्टीने विचारात घेण्यासारखा आहे. नेवाशाला सच्चिदानंदबाबा या नावाचे एक कुलकर्णी होते. त्यांना देवाज्ञा झाली. त्यांच्या पत्नीने देहासवे सहगमन करून सती जाण्याचे ठरविले. सतीचा वेष परिधान करून ती साध्वी घराच्या उंबऱ्याबाहेर पाऊल टाकणार एवढ्यात तिच्या चार-पाच वर्षांच्या लहान मुलीने तुझ्यासह मला

घेऊन चल असा हट्ट धरला. नवे लुगडे नेसून आपली आई कुठेतरी हळदी-कुंकवाच्या समारंभाला चालली आहे असे मुलीला वाटले असणार. मुलीला नेणे शक्यच नव्हते. एक क्षणभर त्या माउलीच्या अंत:करणाचा गोंधळ उडाला असणार. पातिव्रत्य तिला बाहेर ओढीत होते; तर मातृत्व तिला अडवून ठेवीत होते. स्त्रीच्या हृदयातील पातिव्रत्य आणि मातृत्व या दोन अत्यंत उज्वल, अत्यंत पवित्र, अति उदात्त, परममंगल अशा भावना. दोनही सारख्याच श्रेष्ठ आणि वंदनीय. आता त्या दोन भावनांमध्येच संघर्ष निर्माण झालेला होता. अशा वेळी हे का ते, असा संभ्रम निर्माण होणे अगदी स्वाभाविक आहे. पण त्या पतिव्रतेने पाऊल पुढे टाकण्याचाच निर्णय घेतला. त्या मुलीच्या कोमल हाताची मिठी कष्टाने सोडवून तिला आपल्या सुनेच्या स्वाधीन केले आणि ती थोर स्त्री बाहेर पडली. पातिव्रत्याच्या अधिष्ठानावर असलेलेच मातृत्व शोभते असा विचार जणू तिने केला असावा. धर्मावरील निष्ठेने पवित्र झालेली विवेकशील बुद्धीच असा निर्णय घेऊ शकते. रजोगुणाच्या प्रभावाने हा विवेकच दुष्कर होतो आणि त्यामुळे कार्याकार्य, धर्माधर्म यांतील विवेक त्याला योग्य रीतीने करता येत नाही. कार्य किंवा अकार्य, धर्म किंवा अधर्म हे दोनही एका वेळी तर कधीच स्वीकारता येत नाहीत. यांतील काहीतरी एकच स्वीकारले जाते आणि त्याची कार्यवाही करीत असताना वा ती ती कृती पुरी झाल्यावर दुसऱ्या पद्धतीने वागलो असतो तर बरे झाले असते, वेगळा निर्णय अधिक श्रेयस्कर ठरला असता असे सारखे वाटत राहते. हा रजोगुणाच्या *''अयथावत् प्रजानाति''* या लक्षणाचा प्रभाव आहे. या संदर्भात सॉक्रेटिसचे एक उत्तर लक्षणीय आहे.

साधारणत: दोन हजार पाचशे वर्षांपूर्वी सॉक्रेटिस नावाचा एक प्रज्ञावंत तत्त्ववेता ग्रीक देशात होऊन गेला. तत्त्वनिष्ठेपायी त्याने उघड्या डोळ्याने मरण पत्करले; असा तो मोठा धैर्यवान होता. त्याला कुणीतरी एकदा प्रश्न विचारला, लग्न करावे की करू नये? काय चांगले? सॉक्रेटिसने उत्तर दिले - दोघांनाही पश्चात्ताप होतो. हे उत्तर मार्मिक आहे. केवळ विनोदाचे नाही. लग्न झालेल्याला न झालेला म्हणतो, तुझे बाबा ठीक आहे! तुला घरात आले की सगळे आयते मिळते, आमचे कोण पाहणार इत्यादी. तर लग्न झालेला म्हणतो - तू एकटा जीव सदाशिव. तुझ्यामागे कसला व्याप नाही. बायको-

पोराची चिंता नाही. नित्याच्या धुसफुशीला तोंड द्यायला नको; इत्यादी. ''अयथावत् प्रजानाति'' ते हेच. जे आहे, जे पत्करले आहे, त्यांत समाधान नाही. शेजाऱ्याची बायको चांगली अशी इंग्रजीत एक म्हण आहे. जे जवळ नाही, जे मिळालेले नाही ते चांगले. ही वृत्ती सरळपणेच अविवेकाचा परिणाम आहे असे दिसून येते. रजोगुणाच्या चंचलतेचा हा प्रभाव आहे. असमाधान, अस्वास्थ्य हे यामुळेच सतत वाटण्यास येते.

पुष्कळ वेळा आपणांस जे करायचे असते, ते कोणत्यातरी चांगल्या माणसाच्या आदेशाने आपण करीत आहोत, असेही दाखविण्याचा प्रयत्न माणसे करीत असतात. मनातून तेच करायचे असते पण आज्ञाधारकपणाचे प्रदर्शन करण्यात भूषण वाटत असते. एकदा एक तरुण लोकमान्यांच्याकडे आला आणि म्हणाला– आजन्म ब्रह्मचारी राहून देशसेवा करावी अशी इच्छा आहे. आपले काय मत आहे? लोकमान्य गंभीरपणे म्हणाले – मुलगी पसंत करून पहिल्या मुहुर्तावर लग्न उरकून घे. 'जशी आपली आज्ञा', म्हणून तो तरुण निघून गेला. कुणीतरी टिळकांना विचारले – बळवंतराव, एक चांगला होतकरू तरुण तुम्हांला तुमच्या कार्यासाठी मिळाला असता त्याला असे उडवून काय लावले? टिळक हसून म्हणाले– अहो! देशाकरिता करायची कामे थोडी का पडली आहेत? ज्याला खरीच देशसेवा करायची आहे, तो कोणाच्या संमतीची वाट बघत थांबेल का? उठून कामाला लागेल. आता हा 'टिळकांची आज्ञा' म्हणून मी संसारात पडलो, नाहीतर मला देशसेवा करायची होती अशी प्रौढी मिरविण्यास मोकळा झाला. पुष्कळ वेळा रजोगुणी मनुष्य कार्याकार्याचा जो निर्णय घेतो तो या जातीचा असतो.

भारतीय तत्त्वज्ञानाने कोणाची महत्त्वाकांक्षा मारली नाही किंवा सर्वांनी परलोकवादी असावे असे प्रतिपादले नाही. मोक्षाची महती अवश्य गायिली आहे. पण त्यासवेच धर्माच्या जोडीने पुरुषार्थ म्हणून अर्थकामांना प्रतिष्ठाही दिली आहे. पण हे लक्षात न घेता भारतीय तत्त्वज्ञानाने, विशेषत: अद्वैतवादाने, त्यातही मायावादाने माणसाची जीवनाकांक्षाच मारली आहे, तिला निराशावादी होण्यास भाग पाडले आहे, अशा स्वरूपाचा खोटा प्रचार तथाकथित बुद्धिवादी करीत असतात, ते रजोगुणाच्या *''अयथावत् प्रजानाति'* चे एक चांगले उदाहरण आहे.

रजोगुणी माणसाची बुद्धी नेहमी शंकाकुल राहते. तमोगुणाची पायरी याच्या वरची आहे. त्याचा निर्णय ठाम असतो. पण तो चांगल्याकरिता, हिताकरिता, योग्याकरिता नसतो. तेच भगवान पुढील श्लोकात सांगत आहेत.

**अधर्मं धर्ममिति या मन्यते तमसावृता ।**
**सर्वार्थान्विपरीतांश्च बुद्धिः सा पार्थ तामसी ।।३२।।**

अज्ञानाने मोहाने ज्या बुद्धीला अधर्म हाच धर्म आहे असे वाटत असते, सर्व गोष्टी जिला नेमक्या उलट्याच वाटत असतात ती बुद्धी तामसी समजावी.

निश्चयाने अगदी सुलट्याचे उलटे आणि उलट्याचे सुलटे वाटत असते. आणि त्यामुळे अधर्मच धर्म आहे असा निश्चय असतो. अधर्माला धर्म म्हणताना राजसाला निदान शंका तरी असते. तामसाला शंकाबिंका काही नसते. त्याचा निर्णय, त्याचा निश्चय अगदी ठाम असतो. मात्र वास्तविक तो जसा असावयास पाहिजे त्याच्या नेमका उलट असतो. तामसी व्यक्ती चांगल्याला वाईट आणि वाईटाला चांगला, अयोग्याला योग्य आणि योग्याला अयोग्य, हिताला अहितकर आणि अहितकराला हितकर असे मानणार. त्याप्रमाणेच घडले पाहिजे असा आग्रहही धरणार. त्यासाठी कितीही विध्वंस झाला, कितीही हिंसा करावी लागली तरी ते इष्टच समजणार. त्याचे दृष्टीने लैंगिकता ही कधी पाप नसतेच. (सेक्स इज नो सिन) *''पशुपक्ष्याचे विवाही । जोशी कामापरौता नाही''* (ज्ञाने. १७/१८९) या पद्धतीनेच तो वागणार. पशुपक्ष्यांच्या संबंधात ठराविक ऋतूचे तरी बंधन असते. हा तेही पाळणार नाही. आणि उलट कोणी नीतिनियम सांगू लागला तर त्यालाच विचारणार - *''वालभे परद्वार केले । कोणी कोढी होय''* (ज्ञाने. १६/३०५) व्यभिचार केला म्हणजे कोड फुटते असे कधी होते का?

एक भारतीय धर्मप्रचारक एकदा परदेशात गेला. तेथे त्याचे व्याख्यान झाले. त्यानंतर एका अरब श्रोत्याने व्याख्यात्यास विचारले - कसे वागणाराला तुमच्या देशात श्रेष्ठ पुरुष समजतात? धर्मप्रसारक म्हणाला - जो दुसऱ्याच्या स्त्रीकडे वा संपत्तीकडे अभिलाषेने पाहत नाही, त्याला आम्ही श्रेष्ठ समजतो. तो अरब म्हणाला म्हणे - म्हणजे तुम्ही लोक नपुंसकाला आणि मूर्खाला श्रेष्ठ समजता तर! ही गोष्ट म. म. बाळशास्त्री हरदास यांनी आपल्या व्याख्यानाच्या

वेळी सांगितली होती. अधर्मालाच धर्म मानणारी विचारसरणी कशी असते ते यावरून लक्षात येईल.

वाईट परिस्थिती सुधारून घेण्यासाठी वैयक्तिक, कौटुंबिक वा राष्ट्रीय पातळीवर प्रयत्नशील असावेच लागते. त्यासाठीच क्वचित काही संघर्षाला न भिता उभे राहावे लागते. परंतु क्रांती म्हणजे बंदुकीच्या नळीतून प्रगट व्हावयाची. हा सिद्धांत स्वीकारून विरोधकांची निर्दयपणे हिंसाच करीत राहायचे आणि त्याशिवाय साम्यवाद येणारच नाही असे मानायचे हे ''सर्वार्थान् विपरीतांश्च'' या वचनाचेच प्रतीक आहे. क्रूर राजवट पंचवीस-पन्नास-साठ वर्षे शस्त्राच्या धाकाने नांदली तरी साम्यवाद्यांचा स्वर्ग कोठे अवतीर्ण झाला नाही. संधीचा क्षण मिळताच लोक सहस्रावधीच्या संख्येने साम्यवादी शासनाच्या जोखडातून बाहेर पडतात. या पळून जाण्याच्या प्रयत्नात मरणही पत्करतात. असे असते साम्यवादी शासन! पण या नरकतुल्य राज्ययंत्रणेलाही साम्यवादी विचारसरणी स्वर्गतुल्यच ठरवीत असते. तामसी बुद्धीचे स्वरूप यावरून स्पष्ट होईल.

यकृत बिघडल्यामुळे जलोदर झालेला एक रोगी होता. त्याला वैद्याने सांगितले, दारू पिणे पूर्णपणे थांबव. रोगी म्हणाला – मग जगायचे कशाला? हा रोगी चांगला साहित्यिक आणि नाटककार म्हणून प्रसिद्ध होता बरे का! संत म्हणतात – नामस्मरणावाचून जगणे व्यर्थ आहे, आणि हा म्हणणार – दारूवाचून जगणे म्हणजे नीरस जीवन कंठणे आहे. संयम हेच ज्याला दडपण वाटते, सदाचार हा जो बुरसटलेपणाचे लक्षण समजतो, साधेपणाने वागण्याला जो बावळटपणा म्हणतो, तो तामस बुद्धीचा समजावा. अलीकडचा बहुतेक बुद्धिवाद या प्रकारचा आहे. सहस्रावधी वर्षांच्या परंपरेने ज्या धारणांना आपण चांगले समजत आलो त्याला हा नवीन बुद्धिवादी तर्कटी नेमके विपरीत मानीत असतो.

जी गोष्ट नीतीची, सिद्धांताची, तीच व्यक्तिविशेषांची. आतापर्यंत आपण पांडवांना चांगले आणि कौरवांना वाईट मानीत आलो. पण आता कौरवपक्षीयांना चांगले ठरवून पांडवांना वाईट ठरविण्याची जणू स्पर्धा लागली आहे. पुराव्यावाचून प्रतिपादन करण्याचे असामान्य कौशल्य हे आधुनिक साहित्यिक प्रगट करीत असतात. त्यांची भाषा देखणी असते, पण आशय विषारी असतो. एका साहित्यिकाने लिहिले आहे की, ''युधिष्ठिराची जी

असेल–नसेल ती सर्व गुणवत्ता कर्णाच्या पायाचे नख धुवावयासही पुरेशी ठरणार नाही.'' दुसऱ्या एका विदुषीने श्रीकृष्ण आणि द्रौपदी यांच्या संबंधातील प्रेमाला, द्रौपदीच्या कृष्णावरील भक्तीला अनैतिक वासनेचे स्वरूप देण्याचा प्रयत्न केला आहे. अत्यंत बुद्धिमान मानल्या गेलेल्या एका पुढाऱ्याने रामायणाचे कोडे सोडविण्याच्या प्रयत्नात मर्यादा पुरुषोत्तम रामचंद्राची निर्भत्सना होईल असे लेखन केले आहे. तामस बुद्धीचे हे बुद्धिवादी साहित्यिक उद्या श्रीशिवछत्रपतींच्या उज्ज्वल चरित्रालाही कलंकित करण्याचा प्रयत्न करणारच नाहीत असे नाही. तसा थोडासा आरंभ झालेला आहे. पण अजून त्यांना पुरेसे धारिष्ट्य लाभलेले नाही. अर्जुनाला वाईट ठरविण्याइतके शिवाजीमहाराजांची निंदा करणे सोपे नाही, याची चांगली जाणीव त्यांना आहे. ते गप्प आहेत ते भयापोटी. रामभक्त किंवा गीताभक्त आपली घरे पेटविण्याइतके क्रूर होणार नाहीत हा विश्वास असल्यानेच हे आधुनिक साहित्यिक रामावर, गीतेवर वा पांडवांवर हवे तसे तोंडसुख घेत असतात. असो. या मंडळींचे आक्षेप घेणे कसे चुकीचे आहे हे दाखविणे हा काही आपला विषय नाही. पण तामसबुद्धीचे विपरीत ज्ञान कसे असते ते स्पष्ट करण्यासाठी मी हा उद्योग केला.

तर्क केवळ करता येतो म्हणून करणे चांगले नाही. तो प्रामाणिक असला पाहिजे, उचित प्रमाणावर आधारलेला असला पाहिजे. शतकानुशतकांच्या प्रदीर्घ कालावधीत जे चांगले आहे, या दृष्टीने स्वीकारले गेले आहे, त्याचा चांगुलपणा गृहीत धरण्यास वास्तविक पुराव्याची आवश्यकता असू नये. परंपरेने मान्य असलेले चांगले हे चांगले नाही हे सिद्ध करण्यास मात्र बलवान प्रामाणिक कारणे दिली पाहिजेत. पण तसे कोणी करीत नाही. बहुश्रुत नसलेल्या वाचकाच्या मनात, निरागस तरुणाच्या अंत:करणात संशयाचे भूत उभे करणे एवढेच काम हे आधुनिक साहित्यिक करीत असतात.

आपल्या बापाला कोणी वाईट म्हणत असेल तर जो कोणी असे म्हणतो त्याचे मनगट धरून कारणे विचारली पाहिजेत. ती खरी आहेत की नाही ते पारखून घेतले पाहिजे. ती तशी नसली तर वाईट म्हणणारास क्षमा मागावयास लावली पाहिजे. पण असे काही न करता आजचा तरुण ''बाबा! तो अमका तमका तुम्हांला नावे ठेवतो. तरी तुम्ही चांगले आहात ते सिद्ध करा, '' असे आपल्या बापालाच विचारण्याच्या भूमिकेत असतो. हेही *'विपरीतार्थदर्शन'*च!

चांगले गृहीतच धरायचे तर ते श्रीमत् शंकराचार्य, श्रीज्ञानेश्वरमहाराज, श्रीतुकोबाराय, श्रीरामदासस्वामी, आपली प्राचीन परंपरा ज्याला चांगले म्हणते तेच चांगले असे गृहीत धरले पाहिजे. त्याच्या उलट जो सांगतो तो तामसी बुद्धीचा आहे असे नि:शंकपणे म्हटले पाहिजे.

आर्य बाहेरून आले हा खोटा इतिहास इंग्रजांनी आपणांस शिकविला आणि त्याला बळी पडून आपण आता स्वराज्यातही ''वनेचरांना, गिरिजनांना आदिवासी म्हणून संबोधित आहोत. सुसंस्कृत आर्यांच्या पाच सहस्र वर्षांच्या सहवासात आणि गेल्या दीडशे वर्षांच्या सुधारणा युगात जर गिरिजन हे तसेच मागासलेले राहिले असतील तर त्याआधीही शतकानुशतके अगदी आरंभापासून ते तसेच असले पाहिजेत. ते मागासलेले आहेत म्हणून आदिवासी आणि इतर जे सुधारलेले आहेत म्हणून मागाहून आले असेही समजण्याचे काहीच कारण नाही. आर्य हेही प्रथमपासून भारतीयच आहेत. ते तसे नाहीत म्हणणे हे विपरीतार्थदर्शन होय.

असा विपरीत भाव लक्षात आणून देणारी, उलटा समज करून देणारी बुद्धी ही तामसी आहे आणि ती अतिशय घातक आहे, हे ज्याला आपले हित व्हावे असे वाटते, त्याने लक्षात घेतले पाहिजे.

बुद्धीचे प्रकार सांगून झाल्यावर भगवान आता धृतीचे तीन प्रकार सांगत आहेत.

**धृत्या यया धारयते मनः प्राणेन्द्रिय क्रियाः ।**
**योगेनाव्यभिचारिण्या धृतिः सा पार्थ सात्त्विकी ।।३३।।**

चिंतनातून निर्माण झालेल्या विवेकाने एकनिष्ठ झालेली जी धृती मन, प्राण, इंद्रिये यांच्या क्रियांचे (योग्य मार्गावर) नियमन करते त्या धृतीला सात्त्विक धृती म्हणावे.

सत्त्व, रज, तम या प्रकृतीच्या तीन गुणांचे निरनिराळे आविष्कार भगवान् वर्णन करून सांगत आहेत. ज्ञान, कर्म, कर्ता, बुद्धी यांच्या स्वरूपातील त्रिगुणांचे रूप कसे असते ते सांगितले. आता या सत्त्व-रज-तमांनी धृतीला कसे वळण लागते, ते भगवान् सांगत आहेत. पुढे याच अध्यायात सुखाचे त्रिविध रूप सांगितले जाणार आहे. मागे १७ व्या अध्यायात त्रिविध श्रद्धा

सांगितली. त्याचप्रमाणे आहार, यज्ञ, तप, दान यांच्यामध्ये तीन गुणांच्या प्रभावाने लक्षणांची विविधता कशी निर्माण होते, हे सांगितले आहे. तर त्यापूर्वीच्या चौदाव्या अध्यायात सत्त्व-रज-तम या प्रकृतीच्या गुणांचे वर्णन पुष्कळच सविस्तर केले आहे. तेथे सत्त्व-रज-तमांचीच लक्षणे आणि त्यांचे परिणाम विस्ताराने सांगितले आहेत. कारण सगळे जगत् हे प्रकृतीचे झालेले आहे आणि प्रकृती ही त्रिगुणात्मक आहे. त्यामुळे जे जे दिसते, भासते, प्रत्ययाला येते, त्या प्रत्येक गोष्टीमध्ये उण्या-अधिक प्रमाणात सत्त्व-रज-तमाचा आविष्कार असतोच. त्यामुळे वाईटाकडून चांगल्याकडे आणि चांगल्याकडून अधिक चांगल्याकडे प्रगती होण्यासाठी आपल्या प्रकृती-प्रवृत्तीचा विचार करून साधना निवडावी लागते. सर्व स्थावर-जंगमात हे त्रिगुण असतातच. पाने, फुले, फळे अशी वनस्पती-द्रव्ये आणि पशुपक्ष्यादी मूढयोनी यांच्यातही त्रिगुण असतात. त्यांनाही प्रारब्ध असते. पण त्या केवळ भोगयोनी आहेत. एक फूल देवाच्या पूजेकरिता वापरले जाते, एक दुसरे भ्रष्ट पुढाऱ्याला दिले जाते, तर तिसरे प्रेताच्या अंगावर उधळले जाते. एक दगड देवमूर्ती होतो, दुसऱ्याची मंदिराची पायरी होते. तिसरा शौचकूपासाठी वापरला जातो. काही पशुपक्षी निसर्गाच्या सान्निध्यात मुक्तपणे उपभोग घेतात तर काहींना प्राणिसंग्रहालयांत पिंजऱ्याच्या बंधनात राहावे लागते, तर काही गारुड्याच्या हाती पडून त्याच्यासाठी भीक गोळा करीत दारोदार हिंडतात. पण या मनुष्येतर सृष्टीला प्रगती-परागतीचा विचार नाही. माणसाला ती संधी उपलब्ध आहे. म्हणून त्याच्या प्रगती-परागतीच्या दृष्टीने आहारापासून बुद्धीपर्यंत साधनेला उपयुक्त होतील अशी सत्त्व-रज-तमांची वर्णने शास्त्राने केली आहेत.

बाह्य दृष्टीने सुखात जगणाऱ्या पशूंपेक्षाही अडचणीशी, दुःखाशी तोंड देत जगणारा मनुष्य हाच श्रेष्ठ समजावा लागतो. माझा एक अनुभव मी या दृष्टीने आपणास सांगतो. मी एकदा मुंबईजवळील शासनाने चालविलेला आरे गौळवाडा बघण्यास गेलो. तिथे गाई-म्हशी या दुभत्या पशूंची व्यवस्था फारच चांगली ठेवली होती. गोठे स्वच्छ, नीटनेटके. म्हशीच्या खाण्यापिण्याची उत्तम व्यवस्था, स्वच्छता राखण्यासाठी तत्पर सेवक, त्या पशूंचे आरोग्य नीट राखण्यासाठी पशुवैद्य अशी सर्व चांगली व्यवस्था होती. त्या दिवशी तो गौळवाडा पाहण्यासाठी आलेले १५-२० तरी लोक होते. गौळवाडा पाहून

झाल्यानंतर जवळच्या उपाहारगृहात आम्ही कॉफी घेत बसलो होतो. त्या वेळी पस्तीस-चाळीशीचे एक गृहस्थ आमच्यात होते. त्यांनी जणू व्याख्यान देण्यास आरंभ केला. ते साम्यवादी असावेत असे त्यांच्या बोलण्यावरून वाटले. ते म्हणाले - पहा - आमच्या देशात माणसाची दैना आहे. हजारो लोक झोपडपट्टीत राहतात. त्यांना नीट निवारा नाही. तुंबलेल्या उघड्या गटारांचा घाण चिखल सगळीकडे पसरलेला असतो. रात्री डासांचे राज्य चालते. दिवसा माशा उच्छाद देतात. कामाठीपुऱ्याच्या चाळीत राहणाऱ्या माणसाची अवस्था ही अशी दयनीय असते. आणि इथे म्हशीचा थाट मात्र एखाद्या राणीसारखा राखला जातो. ते भाषण ऐकताना एक विचार माझ्या मनात आला आणि मला हसू आले. त्या गृहस्थाने विचारले, ''का हसलात?'' ''काही नाही. सहज!'' मी म्हणालो. ''तसं नाही, कारण सांगा.'' ते गृहस्थ म्हणाले. मी उत्तर दिले - ''तुम्ही ईश्वर मानीत नसाल. पण समजा, ईश्वर प्रगट झाला आणि त्याने तुम्हाला विचारले - तू पुढच्या जन्मी, झोपडपट्टीतील माणूस किंवा आरे गौळवाड्यातील म्हैस यांपैकी काय होण्याचे पत्करशील? हे ऐकून ते गृहस्थ रागावले, संतापून बरेच काही बोलले. पण सुस्थितीतील म्हैस होणे अधिक चांगले असे काही ते म्हणाले नाहीत.

माणसाला सुखाचे आणि स्वास्थ्याचे आकर्षण आहे खरे! तरी सुस्थितीतील म्हैस होणे काही कुणाला मान्य होणार नाही. मनुष्याला प्रथम माणूस म्हणूनच राहणे आवडेल. कारण माणसाच्या सर्व दुःखदैन्यामध्येही प्रगतीची आशा आहे. विचार करू शकणारी बुद्धी आहे. कर्म करण्याची काही स्वतंत्रता आहे. मी परिस्थिती पालटू शकेन हा भरवसा आहे. हे माणूसपणाचे वैशिष्ट्य आहे. वैतागाने, त्राग्याने तो कधी कधी काही म्हणो, पण पशू होणे हे काही त्याला आवडणारे नाही. हे असे असल्यामुळे सगळा काही उपदेश आहे तो माणसासाठीच आहे. सगळी शास्त्रे माणसाकरिता आहेत. त्याने विधिनिषेध पाळले पाहिजेत असा आग्रह आहे. आपल्या बुद्धीचा आणि कर्मस्वातंत्र्याचा उपयोग करून घेणे हे बरेचसे त्याच्या हातातले आहे. तो मनात आणील तर नराचा नारायणही होऊ शकेल. नाहीतर आपल्या कृतीने दुर्योधन-दुःशासनासारख्या नीचांना, दुष्टांना लाज आणील. म्हणून माणसाने आपले मन, आपले प्राण, आपली इंद्रिये यांच्याद्वारे होणाऱ्या क्रियांच्या

संदर्भात फार सावध राहिले पाहिजे. सत्त्व-रज-तमाचे स्वरूप, त्यांची कार्ये, त्यांचा परिणाम यासंबंधी माणसाने सर्व काही नीटपणे जाणून घेतले पाहिजे. यासाठी भगवंतांनी गीतेमध्ये निरनिराळ्या प्रकारांनी त्रिगुणांचे स्वरूप उलगडून दाखविले आहे.

माणसाच्या वैयक्तिक किंवा सामाजिक कल्याणाच्या दृष्टीने गीता हा एकच ग्रंथ पुरेसा समर्थ आहे. गीतेच्या अभ्यासाने, मननाने, आणि तद्नुरूप अनुष्ठानाने मनुष्य आपले सर्व प्रकारचे हित साधून घेऊ शकतो. गीतेची ही थोरवी असामान्य आहे. म्हणूनच प्रस्थानत्रयीत गीतेला महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे. उपनिषदे, ब्रह्मसूत्र आणि गीता ही आपल्या तत्त्वज्ञानातील प्रस्थानत्रयी. उपनिषदे ही सोन्याच्या खाणीसारखी आहेत. ब्रह्मसूत्रे जणू सोन्याची लगड आहे. आणि गीता ही शुद्ध सोन्याचा अलंकार आहे. हिच्या बळावर माणूस आपले जीवन सर्व प्रकारे समृद्ध करू शकतो, उन्नत होऊ शकतो, प्रगती साधू शकतो. या दिशेने वाटचाल करीत असताना बुद्धीचे आणि धृतीचे साहाय्य आवश्यक असते. बुद्धी काय करावे, काय करू नये याचा निर्णय घेते. आणि तो निर्णय तडीला नेण्याची जी शक्ती आहे तिला धृती म्हणतात. निर्णय पूर्ण विचारांती योग्य प्रकाराने घ्यावा लागतो. हे कार्य बुद्धीचे आहे. घेतलेला निर्णय आचरणात आणण्यासाठी धृती उपयोगी पडते.

काही चिंतनासाठी, मनाच्या एकाग्रतेच्या प्रयत्नासाठी उपयुक्त म्हणून आपण मांडी घालून स्थिरपणे बसायचे ठरविले, तरी सवय नसल्यामुळे कित्येक वेळा अगदी दोन-तीन मिनिटांतही पायात कळ येते. पाच मिनिटे काही सुखाने बसता येत नाही. पण कळ येऊ लागताच दहा-पंधरा सेकंद ती सोसायचे ठरविले तर हळूहळू आसनाची स्थिरता वाढविता येते. हे जे थोडे सोसणे आहे तीच धृती. जप करावयास बसले की मन इकडे-तिकडे जाते. त्याला चुचकारून एकाग्र करण्याचा प्रयत्न धृतीमुळेच साधतो. धृती हा बुद्धीचाच एक प्रकार-विशेष आहे. कार्यानुरोधाने समजून घेण्याच्या सोयीसाठी आपण धृती, स्मृती, धारणा, मेधा, प्रज्ञा अशी नावे देऊन व्यवहार करीत असतो. या धृतीच्या बळावरच मनावर आणि इंद्रियांवर नियंत्रण ठेवता येते. कर्म-भक्ती-ज्ञानाच्या मार्गाने जाणाराला तेवढे पुरते. योगमार्गाने साधना करणाराला मात्र प्राणांच्या क्रियांवरही नियंत्रण प्रस्थापित करावे लागते. आणि त्यासाठी

प्राणायाम, मुद्रा, बंध इत्यादी अवघड प्रक्रियांचा अवलंब करावा लागतो. आणि ते काम सोपे नाही. आज ठिकठिकाणी योगशिक्षणाचे वर्ग चालतात असे ऐकतो, त्यात निरनिराळी आसने करावयास शिकवितात. आरोग्यासाठी उपयुक्त ठरणारा तो एक व्यायामप्रकार आहे. योगमार्गाचा बालवर्ग तरी त्याला म्हणावे की नाही याविषयी मला शंका आहे. फार तर स्वसमाधानासाठी कनिष्ठ शिशुवर्ग (ज्युनिअर केजी) म्हणावे. आपण समजतो तसा खरोखरीच योग सोपा असता तर श्रीज्ञानेश्वरांसारख्या योगीश्वराने *''म्हणौनि योगांचिया वाटा । जे रिगाले गा सुभटा । तया दुःखाचाचि शेलवाटा । भाग आला।।''* (ज्ञाने. १२/६९) असे म्हणून साधकांना सावध केले नसते. योगमार्ग सर्वसाधारणांचा नाही. कुणी स्वतःला विशेष काही समजत असेल तर मी त्याला नमस्कार करतो. आमच्या ती. दादांनी स्पष्ट म्हटले आहे की, *''योगमार्ग योग्यांचा । तो न गृहस्थाश्रमी लोकांचा । परंतु तो टवाळीचा । विषय केव्हाहि करू नये ।।''* (छात्रबोध) असो. प्राणक्रियेवरील नियंत्रणाची आवश्यकता योगमार्गात अधिक आहे. एवढे जाणणे आपल्या दृष्टीने पुरेसे आहे.

या श्लोकात आलेला ''योगेन'' हा शब्द मात्र योगमार्गाचा, अष्टाङ्गयोगाचा, पातञ्जलयोगाचाच वाचक आहे असे समजण्याचे कारण नाही. इथे योग शब्द चित्ताची एकाग्रता, विवेकशीलता, विचारांची युक्तता या अर्थाने आला आहे असे समजावे. सात्त्विकधृती ही अशा विवेकशीलतेतून जन्माला येते वा आली पाहिजे. आणि मग ती अव्यभिचारी राहिली पाहिजे. एकनिष्ठ असली पाहिजे. घेतलेल्या निर्णयावर ठामपणे उभी पाहिजे. सतत पालट, या विचारसरणीला ही धृती परवडणार नाही; किंवा या सात्त्विक धृतीला पालटाचे तत्त्वज्ञान मानवणारे नाही.

अव्यभिचारिणी धृती ही पतिव्रतेसारखी असते. ठामपणाने एकनिष्ठ राहणे हे तत्त्वज्ञानाच्या, परमार्थाच्या क्षेत्रात सोडा, पण व्यवहाराच्या क्षेत्रातही उपयुक्त असते, आवश्यक ठरते. प्रत्येक वेळी निरनिराळ्या चिकित्सकांकडे जाऊन औषधोपचार करून घेणे हे काही कुणी इष्ट मानीत नाही. प्रत्येक कुटुंबाचा सामान्यतः एक ठरलेला चिकित्सक असतो. असा चिकित्सक ठरविताना तो पदवीधर आहे, अनुभवी आहे, लोक त्याच्याविषयी चांगले बोलतात याची निश्चिती करून घ्यावीच लागते, घेतलीही जाते. पण असा

एखादा कुटुंबचिकित्सक (फॅमिली डॉक्टर) निश्चित झाला की मग माणसे त्याच्यावरच विश्वास ठेवतात. प्रसंगविशेषी त्या चिकित्सकाला वाटले तर तो विचारविनिमयासाठी दुसऱ्याला बोलावील; पण रोगी आपण होऊन दुसऱ्याकडे जाणार नाही. पूर्वी त्या त्या कुटुंबाचे असे सर्व संबंधी ठरलेले असत. आमचे ती. दादा कापड, खाद्यपदार्थ, इतर व्यवहारोपयोगी वस्तू नेहमी त्याच त्याच दुकानातून घेत. त्यांचा शिंपी, न्हावीसुद्धा ठरलेला असे. क्वचित व्यवहार योग्य वाटला नाही, तर त्या व्यक्तीला बोलावून आणून रागे भरीत. पण दुसऱ्याला ते काम सांगितले असे बहुधा कधी घडत नसे. त्यामुळे संबंधात गोडी निर्माण होई. आपुलकीही वाटू लागे व प्रामाणिकताही राही. स्वीकारण्यापूर्वी दहा वेळा, शंभर वेळा विचार करावा; पण स्वीकारल्यानंतर न सोडणे हेच श्रेयस्कर मानले पाहिजे.

लग्न करण्याआधी नवरा-मुलगा कसा आहे हे शोधून काढले पाहिजे. तो अव्यंग, अपतित, अक्लीब, दशदोषविवर्जित असाच असला पाहिजे. मग देव, अग्नी, ब्राह्मण यांच्या साक्षीने लग्न होते. त्यानंतर मात्र घटस्फोट नाही. गुरू करण्याआधीही *''कोणा भजती कोठे राहती । उदर कशावर ते भरिती ।।''* हा विचार नीटपणे करावा. पण माणसे आधी नीट विचार करीत नाहीत. त्यातूनच पालटाचे तत्त्वज्ञान निर्माण होते. नवरा वाईट निघाला तरी पतिव्रता उद्धरून जाऊ शकते. गुरू चांगला नसला तरी एकनिष्ठ शिष्य तरून जातो. म्हणून न सोडणे महत्त्वाचे आहे. अव्यभिचारी धृती ती हीच.

सर्व अनुकूल असताना टिकून राहणे यात कसोटी लागत नाही. आपत्तीतही निष्ठा न सोडणे यात धृतीची कसोटी लागते. भट्टीतून गाळून घेतलेल्या सोन्याप्रमाणे अव्यभिचारी धृती तेजस्वी असते. अशा धृतीने मन, प्राण, इंद्रिये यांच्या व्यापारावर नियंत्रण ठेवायचे असते. तेव्हाच ती योग्य रीतीने वागतात आणि साधना फलद्रूप होते. नियंत्रणाचा आरंभ इंद्रियापासून-शरीरापासून करावा लागतो. मग हळूहळू मनावर नियंत्रण प्रस्थापित करता येते. धृतीच्या सात्त्विक स्वरूपातच हे शक्य होते. मन पूर्णपणे नियंत्रित झाले की साधना जवळजवळ संपते, असे मानता येते. ज्याचे मन नियंत्रित आहे, त्याचेकडून कधी दुष्कर्म घडत नाही. तो जे चांगले तेच करतो. जे श्रेष्ठ तेच आचरतो. म्हणून तो जे करील तेच चांगले ठरते. सात्त्विक धृतीचा हा परिणाम

आहे. पुढील श्लोकात राजस धृतीचे वर्णन आलेले आहे.

**यया तु धर्मकामार्थान्धृत्या धारयतेऽर्जुन ।**
**प्रसङ्गेन फलाकाङ्क्षी धृतिः सा पार्थ राजसी ।।३४।।**

जी धृती प्रसंग, परिस्थिती उत्पन्न होईल त्याप्रमाणे फळाची अभिलाषा धरून धर्म, अर्थ वा काम यांच्या संबंधीची कृत्ये साक्षेपाने करते, त्या धृतीला हे अर्जुना! राजस धृती, रजोगुणी धृती समजावे.

सात्त्विक व्यक्ती धर्म, अर्थ, काम या तीन पुरुषार्थासवे मोक्षाचाही विचार करते. परिस्थितीप्रमाणे, अवस्थेप्रमाणे मोक्षाच्या प्राप्तीसंबंधीही मनुष्य प्रयत्नशील असतो. पण रजोगुणी कधीही मोक्षाचा विचार करीत नाही. त्याची मुख्य प्रेरणा अर्थकामाचीच असते. पण सभ्य असल्यामुळे तो धर्माची मर्यादा शक्यतो राखू इच्छितो. धर्माला मान देतो. हेही त्याचे समाजावर उपकारच मानले पाहिजेत.

देहधारणेच्या दृष्टीने अर्थकामांची आवश्यकता असल्याने अर्थकामांसाठी कोणी प्रयत्नशील असेल तर ते नैसर्गिकच आहे. गृहस्थाने अर्थकामांच्या प्राप्तीसाठी योग्य तो व्यवसाय केलाच पाहिजे. पण तडी-तापसी-संन्यासी यांनाही जीवनधारणेकरिता अन्न-वस्त्र-निवाऱ्याची आवश्यकता असते. हाही अर्थकामच आहे. आपापल्या आश्रमधर्माच्या उचित मर्यादेत तो असला पाहिजे एवढी दक्षता घेतली म्हणजे झाले. हे असे अर्थकाम प्रत्येक माणसाच्या जीवनात त्याच्या त्याच्या प्रकृती-परिस्थितीप्रमाणे राहतात आणि राहावेतही. योग्य मर्यादेत असलेली त्यांच्याविषयीची अपेक्षा ही काही बाधक नाही म्हणून अपराधही नाही. पण रजोगुणी माणसाचे एवढ्याने भागत नाही. त्याच्या अर्थकामाच्या अपेक्षा आवश्यकतेच्या मर्यादेत राहत नाहीत. त्या सतत वाढत्या असतात. *''निस्वोवष्टि शतं शती दशशतं लक्षं सहस्राधिपः ।''* या क्रमाने त्याचा लोभ परिपुष्ट होत राहतो. त्यासाठी तो स्वतःच्या प्रयत्नाच्या जोडीला धर्माचेही पाठबळ मिळवू इच्छितो.

अर्थकामांच्या संबंधात कुणी फलाभिलाषी राहील तर ते समजू शकते. कारण अर्थकाम हे फलासाठीच असतात. पण हा रजोगुणी धर्मालाही फलाकांक्षेने राबवीत असतो. देवधर्म, तीर्थयात्रा, पूजापाठ, यज्ञयाग, व्रते,

उद्यापने, दान, परोपकार ही किंवा यांसारखी इष्टापूर्ते ही सगळी धार्मिक कृत्येच आहेत. प्रत्येक माणसाने आपले कर्तव्य म्हणून स्वहितासाठी, स्वत:च्या शक्त्यनुसार या धर्मकृत्यांचा अवलंब केला पाहिजे. पण रजोगुणी माणूस ही कृत्ये आत्मकल्याणासाठी कर्तव्य म्हणून करीत नाही. फलाची अभिलाषा ठेवून करतो. धनेषणा–दारेषणा–लोकेषणेसाठी करतो. नवस म्हणून करतो.

ज्या धर्मकृत्यामुळे त्याचे मनोरथ निश्चयाने सफल होतील, त्वरित सफल होतील असे त्यास वाटते, तेथे तो कष्ट करतो. कितीही द्रव्य वेचिले गेले तरी त्याची क्षिती तो बाळगत नाही. देहू, आळंदी, पंढरपूर, शेगाव, शिर्डी, बालाजी इत्यादी तीर्थक्षेत्रांचा विचार केला म्हणजे मी काय म्हणतो ते लक्षात येईल. श्रीगजाननमहाराज, वा साईबाबा, वा बालाजी हे नवसाला पावतात, त्यांना केलेले नवस हे त्वरित आणि निश्चयाने सफल होतात. रोग जातो. संकटे टळतात. धन लाभते, वाढते. नोकरी मिळते. वांझपणा जातो इत्यादी धारणेने तेथे भक्तांची दाटी होते. दान, दक्षिणा देताना हात सढळ राहतो. त्यामुळे हा हा म्हणता शिर्डी–शेगावचे वैभव वाढले. उत्पन्नाच्या तुलनेने देहू–आळंदी तर काय पण पंढरपूरही मागासलेले राहिले. पंढरपूरच्या पद्धतीप्रमाणे जेवढी दक्षिणा देवापुढे ठेवली असेल तेवढीच ओवाळून ठेवावी लागते. ही रूढी वर्षानुवर्षे चालत आलेली आहे. ती कुणी जाणून घेत नाही. ठाऊक असली तरी तिची उपेक्षा करतो, असे कशाला पाहिजे असे म्हणतो आणि मग पैसे ओवाळून न ठेवल्यामुळे पुजारी जर वर्दळीवर आला तर त्याच्याविषयीची तिरस्काराची भावना याच्या अंत:करणात निर्माण होते. गिरिबालाजीवर ब्रह्मोत्सव, कल्याणमंगलम् इत्यादी देखाव्याच्या कृत्यासाठी मात्र, ती नवसाने मागून घेतलेली असल्यामुळे वा त्या योगाने व्यापारधंद्यात चांगला लाभ मिळतो या अभिलाषेने हाच माणूस सहस्रावधी रुपये सहजपणे देतो. बालाजीजवळच्या माणसाने निरनिराळ्या निमित्ताने दोनशे–पाचशे–सातशे रुपये आधीच पावती देऊन घेतलेले असतात. ते हा रजोगुणी संतोषाने देतो. पंढरपूरचा पांडुरंग माळबुक्क्यावर संतुष्ट राहतो. त्याच्यापुढे रुपया–आठ आणे दक्षिणा (तीही सध्याच्या काळात) ठेवली तर तीही जणू श्रीविठ्ठलावर निदान बडवे–पुजाऱ्यावर उपकार केल्याच्या भावनेने ठेवली जाते. वस्तुत: व्यंकटेश काय किंवा पांडुरंग काय, शिर्डी काय वा आळंदी काय, तत्त्वत: सारख्याच

योग्यतेचे आहेत, पण जागृत दैवताच्या खुळ्या कल्पनेने रजोगुणी श्रद्धा त्यात तरतम करते आणि व्यवहारात केल्या जाणाऱ्या भेदाच्या दृष्टीने ती व्यक्त होते. सभ्यपणे तोंडाने कुणी स्पष्ट बोलत नाहीत इतकेच.

नवसाची व्रते उद्यापने, पूजापाठ, तीर्थयात्रा, यज्ञयाग यात होणारे कष्ट काही थोडे नसतात. किंवा त्यांना लागणारे द्रव्य थोडे पुरते असेही नाही. पण माणूस तेथे द्रव्याला वा श्रमाला मागे पाहत नाही. ते कितीही लागले तरी ते वेचण्याची माणसाची सिद्धता असते. कारण त्याच्या अंत:करणात फलाशा असते. दारिद्र्य असते म्हणून पैसे दिले जात नाहीत, अशक्त असतो म्हणून श्रम केले जात नाहीत असे काही घडत नाही. सुगीच्या दिवसात कापसाच्या अड्ड्यावर व्यापारी बारा-बारा, पंधरा-पंधरा तास तहानभूक विसरून उभा राहतो. पण भजनाला थांब म्हणले तर ते काही त्याच्याने होत नाही. स्वत:च्या घरच्या लग्नकार्यात श्रमाची कामे करताना जो उत्साह टिकून राहतो, तो काही दुसऱ्याच्या घरी साहाय्यासाठी जावे लागले तर राहत नाही.

एखादी गोष्ट साधण्यासाठी, करण्यासाठी, एखादे कृत्य पार पाडण्यासाठी रजोगुणी व्यक्तीजवळ आवश्यक तो साक्षेप निश्चित असतो. पण तो फलाच्या अभिलाषेने उत्पन्न झालेला असतो. मग हा प्रसंग नवसाच्या धर्मकृत्याचा असो, प्रतिष्ठेच्या उत्सव-महोत्सवाचा असो, उद्योगधंद्यात मिळणाऱ्या द्रव्यलाभावर दृष्टी ठेवून केलेला असो वा उपभोगाच्या लालसेने असो.

साक्षेप असणे, उत्साह असणे, शक्ती पणाला लावून काम करणे हे सर्व चांगलेही आहे आणि आवश्यकही आहे. त्याविना प्रगती-उन्नती साधली जाणार नाही. पण असा हा उल्हास केवळ फळाच्या अभिलाषेने नसावा. निदान ते फळ तरी सत्ता-संपत्ती-सन्मान यांच्या प्राप्तीसारखे सामान्य नसावे. पण रजोगुणी माणसाच्या अंत:करणात हा विचार कधी येत नाही. त्याला भव्य-दिव्य उदात्ततेचे आकर्षण नसते. क्वचित तसे काही अनुभवावेसे वाटले तरी त्यासाठी घेण्याचे कष्ट तो घेऊ इच्छित नाही. त्यामुळे त्याचा सर्व साक्षेप म्हणजेच धृती कधी धर्मासाठी, कधी अर्थासाठी, कधी कामासाठी प्रसंग असेल त्याप्रमाणे उत्पन्न होते आणि तेवढ्यापुरती टिकूनही राहते. सात्त्विकाची धृती हितासाठी असते. राजसाची धृती उपभोगासाठी काम करते. सात्त्विकाचे प्रत्येक कृत्य विवेकावर आधारलेल्या निष्ठेने घडते. तो हिताला, श्रेयाला

सर्वस्व मानीत असतो. रजोगुणी लोभाने, आसक्तीने, आकर्षणाने, सुखाच्या लालसेने कार्यास प्रवृत्त होतो. त्याला श्रेयापेक्षा प्रेय, हितापेक्षा सुख हवेहवेसे वाटत असते.

तमोगुणी हिताचा विचारही करीत नाही आणि सुखाचाही विचार करीत नाही. त्याची कार्याची जी प्रेरणा असते, ती केवळ अहंकाराची असते. विवेकशून्य अहंकाराची असते. तिचेच वर्णन भगवान पुढील श्लोकात करीत आहेत.

**यया स्वप्नं भयं शोकं विषादं मदमेव च ।**
**न विमुञ्चति दुर्मेधा धृतिः सा पार्थ तामसी ।।३५।।**

दुर्बुद्धी-पुरुषाची(दुष्ट मनुष्याची) जी धृती ती निद्रा, भय, शोक, विषाद, आणि गर्व यांचा त्याग करू शकत नाही. अर्जुना, त्या धृतीला तामसी म्हणून ओळखावे.

जीवनधारणेकरता भुकेप्रमाणे झोपही अत्यंत आवश्यक गोष्ट आहे. अगदी तान्ह्या मुलाला १५-२० तास झोप लागते. तरुणपणी ७-८ तास झोप आवश्यक असते. म्हातारपणी ५-६ तास झोप पुरेशी होते. प्रकृतिभेदाने यात थोडे उणे-अधिक होऊ शकते. पण हे काही असले तरी माणसाचे झोपेवर नियंत्रण असले पाहिजे. लहान मुले कुठेही, केव्हाही झोपतात. मोठ्यांचे तरी तसे होता कामा नये. पण तमोगुणी माणसाला झोप आवरत नाही. त्याला झोपून राहण्यात, झोप न आली तरी आळसाने लोळण्यात सुख वाटत असते. कीर्तन-प्रवचनात बसल्या बसल्या झोपणारी माणसे आपण पाहिली आहेत. अगदी सकाळच्या प्रवचनातसुद्धा माणसाला ऐकता ऐकता डुलकी लागते. माझा एक मित्र सायकल चालविता चालविता झोपला होता. खाली आदळला तेव्हा जागा झाला. चालकाला डुलकी लागल्यामुळे वाहनांचे अपघात होतात अशी उदाहरणे कितीतरी आहेत.

सैनिकांना त्यांची कार्यक्षमता टिकावी म्हणून एखाद-दुसरा दिवस बळानेच झोपेवाचून घालविण्यास लावतात. आरक्षीच्या नोकरीवर असलेला माझा एक मित्र अक्षरशः वीतभर रुंदीच्या बाकड्यावर कित्येक दिवस झोपत असे. झोपेवरच्या या नियंत्रणाचे महत्त्व तमोगुणी माणसाला पटत नाही. त्याला

आपला आळस, झोपाळूपणा हाही कौतुकाचा विषय वाटत असतो.

भित्रेपणा हे तमोगुणी माणसाचे दुसरे लक्षण. त्याला सारखे कशाचे ना कशाचे तरी भय वाटत असते. आत्मविश्वासाच्या अभावाचा हा परिणाम आहे. त्यामुळे आपण असुरक्षित आहोत असे त्यास सतत जाणवत राहते. कोणीतरी आपली हानी करणार आहे, सगळे आपल्या वाईटावर टपलेले आहेत असे त्यास वाटत राहते. एकटा असला तरी भिणार. दुसरा कुणी अनोळखी समागमे असला तरी भिणार. अंधाराला घाबरणार. वीज गेली की अस्वस्थ होणार. कुणी मोठ्याने बोलले तरी याला कापरे सुटणार. दुसऱ्या कोणासमोर काही विशेष हालचाली करतानाही याचे हात कापणार. तर काही वेळा अशा भयापोटीच अहर्निश प्रतिकाराला सिद्ध असणार. क्रूरतेने वागणार.

सर्वदा शोकाकुल असणे हे तमोगुणाचे तिसरे लक्षण. हिंदीमध्ये एक म्हण आहे. ''मियाँ रोते क्यों? तो बोले सुरत ही वैसी है ।'' याची कोणा ना कोणाविरुद्ध काही ना काही तक्रार सतत चालू राहते. याची कुरकुर कधी संपत नाही. कुरकुरीला लहानमोठे कोणतेही निमित्त पुरते. कोणाचा स्वभाव, कोणाचे वागणे-बोलणे, महागाई, भ्रष्टाचार, वर्तमानपत्रातील वार्ता, राजकीय घडामोडी, आप्तेष्टांचे हेवेदावे असे काही ना काही निमित्त त्यास सतत मिळत राहते. दु:ख देणारे काही प्रसंग प्रत्यक्ष ओढवले असले तर मग विचारायास नको. घायकुतेपणा हा याचा स्वभावधर्म होऊन बसलेला असतो.

विषाद ही शोकाचीच परिणती आहे. पाहिजे तर शोकाचाच थोरला भाऊ म्हणा! हातून काही वाईट घडल्यामुळे पश्चात्तापाने वाटणारी खंत निराळी. घडलेल्या चुकीचे दुष्परिणाम झालेले पाहून खिन्नता वाटणे स्वाभाविक आहे. सज्जनाला तशी खिन्नता येते पण अल्पकाळ टिकते. विषादाची जात यापेक्षा वेगळी आहे. समाधान-शांतता-स्वस्थता-निवांतपणा याचा स्पर्शही या विषादी माणसाला कधी होत नाही. तो नेहमी दुर्मुखलेला राहतो. कोणत्याही गोष्टीत त्याला उत्साह नसतो. त्याला कशानेही प्रसन्न वाटत नाही. उल्हास कशाला म्हणतात ते तर त्याला जणू ऐकूनही ठाऊक नसते. भय-शोक-विषाद या जणू एकमेकीपेक्षा चढत्या पायऱ्या आहेत. त्यांच्या मुळाशी बहुधा स्वयंकेंद्रितता असते. स्वत:शिवाय दुसऱ्या कोणाचाही, कशाचाही विचार स्वयंकेंद्रित व्यक्ती करीत नाही. ही स्वयंकेंद्रितता तत्त्वत: अहंकाराचीच परिणती आहे. तीच

पुढे मदाच्या, गर्वाच्या, ताठ्याच्या रूपाने प्रगट होत असते. जवळ जाताच बोकडाच्या अंगाची घाण यावी तशी अवस्था मदोन्मत्ताची असते. त्याच्या अहंकाराला उग्रतेचा विलक्षण दर्प येतो. दुर्योधन–दु:शासन ही त्याची चांगली उदाहरणे.

दुर्योधन शेवटी थोडा वेळ केविलवाणा झाला होता. पण आपली सुटका होणे शक्य नाही असे लक्षात येताच त्याच्या मूळ अहंकाराने उन्मत्तपणाने फणा काढला. शेवटी भीमासवे लढताना तो घायाळ होऊन कोसळला. वेदनांनी तडफडू लागला, मरणोन्मुख झाला. तरी त्याला पश्चात्ताप झाला नाही. त्याचा मद शमला नाही. उलट तो ''को नु स्वंततरं मया' असे म्हणत राहिला. महाभारतातील त्या संदर्भाचा अनुवाद करताना मोरोपंत म्हणतात, *''निखिलाहि भोगिली म्या पृथ्वी अरिमस्तकी दिला पाय । स्वंततर कवण मजहुनी आता कर्तव्य राहिले काय?''* दुर्योधन मोठ्या ताठ्याने उद्‌गार काढतो की, मी शत्रूच्या डोक्यावर पाय देऊन उभा राहिलो. सगळ्या पृथ्वीचे साम्राज्य उपभोगिले, आता मिळविण्यासारखे काय राहिले आहे? रणांगणात मला मृत्यू येतो आहे, यापेक्षा अधिक चांगला शेवट कोणाचा असणे शक्य आहे काय? दुर्योधनाचे धैर्य कौतुकास्पद वाटले तरी ही धृती तामसी आहे. कारण ती दंभावर आधारलेली आहे. सर्वनाशाच्या आणि तीव्र वेदनांच्या पार्श्वभूमीवर ती उठून दिसते. पण ते खरे नाही. दुर्योधनाने साम्राज्य उपभोगिले; पण ते धर्मनिष्ठ पांडवांना कपटद्यूतात हरवून. पराक्रमाने जिंकून काही त्याने साम्राज्य मिळविले नाही. पांडवांचे वैभव पाहून तो मत्सराने जळफळत होता. भर सभेत मांडी उघडी करून द्रौपदीला, येथे येऊन बैस म्हणणे, यात त्याचे काहीच पौरुष नाही. तो त्याचा नीच निर्लज्जपणा आहे. म्हणून शेवटी ''को नु स्वंततरं मया'' असे त्याने म्हणणे म्हणजे 'पडलो तरी नाक वर' या वृत्तीचे आहे. दांभिक अहंकाराचा तो परिपाक आहे.

दु:शासनाचेही तसेच. भीमाने त्याला पकडून उताणे पाडले. त्याच्या छातीत गुडघा रोवला आणि त्याला विचारले, ''तुझा हात कोणता, की जो द्रौपदीची विटंबना करण्याकरता सरसावला होता?'' तेव्हा निरुपाय झालेला दु:शासन आपला हात वर करून मोठ्या ताठ्याने म्हणाला, ''हा तो माझा हात; ज्याने पराक्रमी म्हणविणारे तुम्ही पांडव पाहत असताना द्रौपदीच्या

वस्त्राची निरी खेचली होती.'' परस्त्रीच्या वस्त्राला निर्लज्जपणे हात घालणे हे भूषणाचे आहे का? पण दु:शासन त्याचेच भूषण मिरवतो आहे. हे त्याचे अवसान उसने अवसान आहे. मृत्यू समोर दिसत असतानाही त्याचे धैर्य न गळणे हे वीराला नि:संशयपणे शोभते. पण ती वीरता काही उदात्त ध्येयाने प्रेरित झाली असली पाहिजे. तो मृत्यू नरवीर तानाजी मालुसरे, बाजीप्रभू देशपांडे यांच्या वीरमरणाच्या जातीचा असला पाहिजे. भडकपणा म्हणजे काही भव्यता नव्हे. त्यामुळे तमोगुणांच्या मदातून प्रगट झालेले धैर्य हे काही प्रशंसनीय नाही. प्रसाधनांच्या मापाने सौंदर्य मोजता येत नाही.

खरे धैर्य प्रगट होण्यासाठी त्याला निर्भय अशा सात्त्विकतेचे अधिष्ठान असले पाहिजे. अंगुलीमाल म्हणून एक क्रूर दरोडेखोर बुद्धाच्या काळी होता. तो वाटसरूंना लुटून, ठार करून त्यांची बोटे तोडी आणि त्यातील हाडांच्या मण्यांची माळ करून गळ्यात घाली. म्हणून त्या दुष्टाचे नाव अंगुलीमाल. घनदाट अरण्यातून प्रवास करताना या अंगुलीमालाने बुद्धाला गाठले. तो दरडावून बोलू लागला – ''कोण तू?'' बुद्धाने उत्तर दिले – ''ज्याला 'तू' म्हणून ओळखावे असे काही अस्तित्वात नसते.'' अंगुलीमालाला या उत्तराचे आश्चर्य वाटले. काळाकभिन्न, धिप्पाड, उग्र मुद्रेचा, हातामध्ये तीक्ष्ण शस्त्र. तो पुढे आला की समोरच्याची गाळण उडत असते. अशा स्थितीत हा एक जोगी आपल्यासमोर निर्भयपणे उभा राहून उत्तरे देत आहे हे पाहून अंगुलीमाल चक्रावला. उत्तरातील शब्दांचा आशय समजण्याची तर शक्यताच नव्हती. तो पुन्हा ओरडून म्हणाला – ''मी तुझा काळ आहे. तुला मृत्यूचे भय वाटत नाही?'' गौतम बुद्ध म्हणाला – ''जन्मल्या क्षणापासून मृत्यू सततच पुढे असतो. त्याला काय भ्यायचे? प्रत्येक वस्तू क्षणिक आहे. ज्याला देह म्हणतात तोही त्यातलाच.'' या कधी न पाहिलेल्या धैर्यामुळे अंगुलीमाल शरण आला व बुद्धाचा शिष्य बनला.

सात्त्विक धैर्य असे बुद्धासारखे असावे लागते. पण असे म्हणताच काही अतिरेकी अहिंसावादी प्रत्याघात, आक्रमण, पराक्रम यांच्यासाठी जे धैर्य उभे असते ते सात्त्विक नसते, असे सिद्ध करण्याच्या प्रयत्नात असतात, ते योग्य नाही. अर्जुनाची गोष्ट या संदर्भात लक्षात घेतली पाहिजे.

पाशुपत अस्त्राच्या प्राप्तीसाठी अर्जुन उग्र तपश्चर्या करीत होता. पाशुपत हे

भगवान् शंकरांचे दिव्य आणि अमोघ अस्त्र. त्याच्या प्रभावापुढे ब्रह्मास्त्राचे अत्युग्र तेजही फिके ठरावे अशी पाशुपतास्त्राची महती. अर्जुनाची परीक्षा पाहण्यासाठी भगवान् शंकर किरातवेषाने प्रगट झाले. एका वराहाच्या पारधीवरून अर्जुन आणि भिल्लरूपात आलेले शंकर यांच्यात भांडण झाले आणि या भांडणाची परिणती युद्धात झाली. अर्जुन त्वेषाने लढू लागला; पण त्याची शस्त्रास्त्रे किरातापुढे निष्प्रभ ठरली. हातातील धनुष्य भंगून गेले. बाणांचा अक्षय्य भाता रिकामा झाला. तलवार तुटली. हातात शस्त्र म्हणून राहिले नाही. तरी अर्जुनाचे धैर्य भंगले नाही. त्याने भंगलेल्या धनुष्याचा एक तुकडा लाठीसारखा हातामध्ये घेतला आणि आवेशाने तो किराताच्या अंगावर धावून गेला आणि दोनही हातांनी त्या भिल्लरूपी शंकराच्या मस्तकावर अर्जुनाने सर्वशक्तिनिशी प्रहार केला. शौर्याच्या या देदीप्यमान दर्शनाने, धैर्याच्या या अलौकिक धारिष्ट्याने भगवान शंकर प्रगट झाले आणि आपले बाहू पसरून क्रोधाने क्षुब्ध झालेल्या धनंजयाला हृदयाशी धरले. शंकरांच्या मंदस्मितातून जणू मस्तकी धारण केलेल्या चंद्रकलेतील अमृत पाझरू लागले. त्या आल्हाददायक सिंचनाने अर्जुन शांत झाला. प्रसन्न झाला. भगवंताच्या दर्शनाने आणि आलिंगनाच्या वत्सल स्पर्शाने त्याचे अंगअंग पुलकित झाले. हृदय भावाने भरून आले. चरणस्पर्शासाठी तो खाली वाकू लागला, पण शंकरांनी त्याला तसेच घट्ट धरून म्हटले – ''अर्जुना! मी तुझ्या तपश्चर्येपेक्षा तुझ्या धैर्याने अधिक प्रसन्न झालो आहे. हे पाशुपतास्त्र घे. याचा अनाठायी उपयोग तू करणार नाहीस असा मला विश्वास आहे. ती योग्यता तुझ्या ठिकाणी आहे किंवा नाही हे पाहण्याकरिताच मी हा प्रसंग उभा केला आहे. अर्जुनाचे हे धैर्यही सात्त्विकच आहे. पण हे कळण्याचे सामर्थ्यही सर्वांना नसते. लोक निमूटपणे सोसण्याच्या वृत्तीला, मिळमिळीतपणाला सात्त्विक समजत असतात. तसे म्हणणे म्हणजे नपुंसकाला ब्रह्मचारी म्हणण्यासारखे आहे. आणि आपले या प्रकाराचे मत घट्ट धरून ठेवणारे दुर्मेधायुक्त आहेत. दुर्बुद्धी आहेत. उथळपणे विचार करणे आणि आपला विचार उथळ आहे हेही न कळणे या विचारसरणीला दुर्मेधा म्हणण्यावाचून दुसरी काय गती आहे? मनुष्य अज्ञानी असू शकतो. पुष्कळ लोक तसे असतात. ज्ञान ही काही जाताजाता सडकेच्या कडेने मिळणारी सुलभ गोष्ट नाही. त्याकरिता अथक परिश्रम सातत्याने करीत राहावे लागतात,

तेव्हा ज्ञानाच्या बारीकशा प्रकाशकिरणाचे दर्शन होऊ शकते.

माणूस अज्ञानी असतो यात काही नवल नाही, ते बरेचसे स्वाभाविक आहे. पण आपण अज्ञानी आहोत हेच न कळणे, त्यामुळे ज्ञानप्राप्तीकरिता प्रयत्न न करणे, अज्ञानातच संतोष मानणे किंवा आपल्या अज्ञानालाच ज्ञान मानून अहंकाराने मिरवणे हे मात्र एकापेक्षा एक घातक आहे. हा तमोगुणाचा प्रभाव आहे. म्हणून धैर्य, धृती, निष्ठा असल्याविना कार्यामध्ये यश मिळत नाही. हे कितीही खरे असले तरी ती धृती तामसी नाही ना, विवेकावर आधारित आहे ना, हे नीट पारखून घेतले पाहिजे. गीताशास्त्र म्हणूनच उद्‌बोधक ठरते.

ज्ञान, कर्म, कर्ता, बुद्धी, धृती यांचा त्रिविध गुणांच्या दृष्टीने विचार सांगून झाला. आता ज्ञान काय, बुद्धी काय किंवा धृती काय यांचा उपयोग प्रत्यक्ष कृतीसाठी व्हावयाचा असतो. प्रवृत्ती योग्य मार्गावर ठेवण्याचे कार्य ज्ञान, बुद्धी, धृती करीत असतात. परंतु माणूस कोणतीही कृती कशासाठी करीत असतो? त्याच्या ठिकाणी काही करण्याची प्रवृत्ती निर्माण होते तीच मुळात का होते? या मूलभूत प्रश्नाचे शास्त्राने दिलेले उत्तर *''सुखार्थाः सर्वभूतानां मताः सर्वाः प्रवृत्तयः''* असे आहे. मनुष्याला जे जे काही करावेसे वाटते वा तो जे जे काही करतो, त्याच्या मुळाशी स्वतः सुखी असावे, स्वतःला सुख मिळावे हीच एकमात्र प्रेरणा असते. मग तो पामर, बद्ध, मुमुक्षू, साधक यांपैकी कोणत्याही गटात असो.

तेव्हा ज्या सुखासाठी मनुष्य प्रवृत्त होतो त्या सुखाचे स्वरूप भगवान् सांगत आहेत.

**सुखं त्विदानीं त्रिविधं शृणु मे भरतर्षभ ।**

हे भरतश्रेष्ठ अर्जुना! सुखही सात्त्विक-राजस-तामस असे तीन प्रकारचे आहे. त्याच्यासंबंधी सांगतो ते ऐक.

सुख हा शब्द साधित शब्द आहे. सु म्हणजे योग्य प्रकारे, चांगल्या प्रकारे, जसे असावयास हवे तसे असणे. ख म्हणजे इंद्रिये; खरे तर स्रोतसे. शरीराचे सर्व व्यापार ज्यांच्याद्वारे घडत राहतात त्यांना स्रोतसे असे म्हणतात. ही स्रोतसे आणि त्यांचे व्यापार जसे असावेत तसे चांगल्या प्रकारे असणे म्हणजे सुख. या स्पष्टीकरणाप्रमाणे विचार करता आरोग्यसंपन्नता म्हणजेच सुख. त्याच्याउलट अनारोग्य म्हणजेच दुःख असे म्हणता येईल. आणि हे

पूर्णपणे यथार्थ आहे. पण हे कितीही खरे असले आणि परिणामतः हितकर असले तरी आपण सुख वा दु:ख हे शब्द इतक्या तात्त्विक अर्थाने व्यवहारात वापरीत नाही. व्यवहारतः *''अनुकूल वेदनीयं सुखं'', ''प्रतिकूल वेदनीयं दु:खं''* या व्याख्याच ठीक आहेत. जे हवेसे वाटते, ज्याच्यामुळे बरे आहे ही जाणीव निर्माण होते, ते सुख. जे नकोसे वाटते ते दु:ख.

यातील बरे वाटणे आणि नको वाटणे हेच नीट पारखून घ्यावे लागते. हे दोनही इंद्रिये, मन, बुद्धी यांच्या संवेदना आहेत. त्या काही प्रमाणात वस्तुनिष्ठ (Objective) असल्या तरी पुष्कळ अंशी ज्ञातृनिष्ठ आहेत. या संवेदनांमागे परिस्थिती, प्रकृती, संस्कार यांचा भाग महत्त्वाचा असतो. उदा. शीत सुखकारक की उष्ण सुखकारक? याचे उत्तर वस्तुनिष्ठ दृष्टीने देता येणार नाही. उन्हाळा असेल, उकडत असेल, पित्तप्रकृती असेल तर शीत सुखकारक. उलट हिवाळ्यात गारठा वाटत असताना कफ प्रकृतीच्या माणसाला उष्ण हवेहवेसे वाटेल. साखर आणि मिरची यांचे असेच आहे. पानात गोड न पडू देणारी माणसे आहेत. ती माणसे लवंगी मिरच्यांचीही भाजी करून खातात. तर एखाद्याला शिजताना आमटीत टाकलेल्या एखाद्या लहान मिरचीच्या तुकड्यानेही ती आमटी भातावर घालून खाताना तोंड भाजल्यासारखे वाटते. उलट पेलाभर दुधात मूठभर साखर घातली तरी अगोडच आहे असे म्हणणारे लोक आहेत. हवे-नकोची कल्पना अशी बरेच वेळा सापेक्ष राहते. म्हणून तर नीट जाणून घ्यावे लागते. त्यासंबंधीचे मार्गदर्शन करण्याचे कार्य गीता करीत आहे. भगवान् सात्त्विक सुखाची ओळख करून देताना म्हणतात -

**अभ्यासाद्रमते यत्र दु:खान्तं च निगच्छति ।।३६।।**

**यत्तदग्रे विषमिव परिणामेऽमृतोपमम् ।**
**तत्सुखं सात्त्विकं प्रोक्तं आत्मबुद्धिप्रसादजम् ।।३७।।**

अभ्यासामुळे, सातत्यामुळे ज्याच्याविषयी गोडी वाटू लागते, ज्याच्यामुळे दु:खाचा निरास होतो, जे आरंभी विषाप्रमाणे नको वाटते, पण परिणामी अमृतासारखे हितकर ठरते त्याला सात्त्विक सुख म्हणतात. हे सात्त्विक सुख आत्मविषयबुद्धीच्या निर्मलतेतून उत्पन्न होत असते.

काही टीकाकार संपूर्ण ३६ वा श्लोक सुख-विषयाच्या प्रास्ताविकासारखा

मानतात व केवळ ३७ व्या श्लोकाला सात्त्विक सुखाचा लक्षण सांगणारा समजतात, तर काही ३६ व्याची पहिली ओळ प्रास्ताविकासारखी मानून ३६ व्याची दुसरी ओळ आणि ३७ व्याच्या दोन्ही ओळी मिळून तीन ओळीत सात्त्विक सुखाचे वर्णन आले आहे असे म्हणतात. मला, या तीन ओळी सात्त्विक सुखाचे लक्षण सांगणाऱ्या आहेत, असे गृहीत धरणे सोयीचे वाटते.

सात्त्विक सुख हे सुख खरे, पण ते आरंभी तरी बहुतेक वेळा सुखकर वाटत नाही. नको नकोसे वाटते. त्रास देते, कंटाळा आणते. उदा. आरोग्यशास्त्राने स्वास्थ्य चांगले राहावे यासाठी जे आहारविहाराचे नियम सांगितले आहेत, त्याचे पालन करणे माणसाला सहसा आवडत नाही. आहार साधा असावा. पुष्कळ तिखट-मीठ घातलेले, चमचमीत फोडणीचे खमंग पदार्थ, गूळ-साखरेचा मुक्त हस्ताने वापर केलेली मिष्टान्ने, आटवलेले दूध, खवा यांसारखे पचावयास जड असलेले पदार्थ खाऊ नयेत. जेवणात तिखट-मिठाचे प्रमाण अत्यल्प असावे. रात्री लवकर झोपावे. पहाटे लवकर उठावे. अंथरूण सोडण्याचे दृष्टीने ब्राह्ममुहूर्त (सूर्योदयापूर्वी दोन-अडीच तास) फार चांगला. आहार-विहार अगदी नियमित प्रमाणात, नियमित वेळेत असावेत. प्रतिदिनी व्यायाम अवश्य करावा. मद्यादी मादक पदार्थांचेच काय, पण चहा-बिडी सारखेही व्यसन नसावे. शय्या टणक असावी. मऊ दुलदुलीत असू नये. इत्यादी नियम आरोग्यशास्त्र सांगते. पण त्याचा आचार तर राहूद्याच, विचार तरी किती लोक करतात? कारण हे सर्व कृतीत आणणे आरंभी आरंभी तरी कष्टदायक असते. पहाटेच्या गुलाबी गारव्यात अंथरूण सोडायला नको वाटते. दूरदर्शन, चित्रपट, नाटक, नृत्यगीताचे कार्यक्रम यांचे आकर्षण रात्री लवकर झोपणे टाळीत असते. तिखट-मीठ मसाल्याच्या अभावाने खमंग नसलेला पदार्थ तोंडात घोळतो, गिळला जात नाही. त्याचे कारण एकच की, आरोग्यासाठी सांगितलेले नियम परिणामी हितकर असले तरी आरंभी नकोसे वाटणारेच असतात. त्यांच्या चांगुलपणाची अभ्यासाने सवय जडवून घ्यावी लागते. असा प्रयत्न दीर्घकाल करावा लागतो. तेव्हाच या नियमांच्या पालनात सहजता येते आणि मग ते सुखावहही वाटू लागतात. परिणामी ते सुखाचेच नव्हे, तर हिताचेही ठरत असते. पण या सात्त्विक सुखाचे एक वैशिष्ट्य आहे. त्याचे सुख सहजासहजी जाणिवेत येत नाही. सात्त्विक सुख हे काहीसे

आरोग्यासारखे आहे. आरोग्य सुखावह असते यात कोणाला शंका नाही. पण ते सुख काही मिष्टान्न भोजनाच्या मधुर-स्वादाप्रमाणे वा सौंदर्यदर्शनाच्या आल्हादकतेप्रमाणे वा कोमल स्पर्शाच्या मार्दवाप्रमाणे जाणवत नाही. जणू काही त्यामुळेच माणसे आरोग्य राखण्यासाठी धडपडताना दिसत नाहीत, ती धडपड इंद्रियाद्वारा मिळणाऱ्या शब्दस्पर्शाच्या लालसेने होताना दिसते.

अशी स्थिती जर आपल्या शरीराशी संबद्ध असलेल्या, इहलोकातच लाभदायक ठरणाऱ्या आरोग्याच्या संबंधात असते, तर मग परमार्थाच्या विषयात अवस्था आणखीनच बिकट राहते हे सांगावयासच नको.

नामस्मरण, पूजापाठ, धारणा, ध्यान यामुळे मनुष्याचे अंत:करण शुद्ध होते. परमार्थाच्या दृष्टीने करायच्या वाटचालीत त्याची प्रगती होऊ लागते हे खरे आहे. पण त्यासंबंधीचा नियम सातत्याने पाळण्याकडे माणसाची प्रवृत्ती नसते. या गोष्टी नियमाने का करीत नाहीस, असे विचारले तर मन लागत नाही, कंटाळा येतो असे उत्तर येते. पण हे असेच असणार. पूजापाठात मन रमणे वा चिंतनात एकाग्रता साधणे हा काही बालवर्ग नाही. ते महाविद्यालयीन शिक्षण आहे. महाविद्यालयात प्रवेश मिळण्याकरिता त्यापूर्वी दहा-बारा वर्षे शिक्षण घेतलेले असले पाहिजे. तेथे सुद्धा नुसती वर्षे मोजून चालत नाही. प्रत्येक इयत्तेत प्रत्येक वर्षी उत्तीर्ण झाले तरच वर्षगणनेला अर्थ राहतो. तेव्हा मन लागत नाही हे कारण काही उचित नाही. नामस्मरण, पूजापाठ, इत्यादी उपासना न कंटाळता चढत्या-वाढत्या प्रमाणात सातत्याने दीर्घकाल करीत राहिले पाहिजे. त्यात मन लागावे अशी इच्छा असेल तर जीवनातले हवे-नको, मनातील राग-द्वेष हे क्रमाने उणावत नेले पाहिजेत. अत्यंत आवश्यकतेच्या मर्यादेत ते राहिले तर बाधक होत नाहीत, पण त्यापेक्षा त्यांचे प्रमाण जितके जास्त असेल तितक्या प्रमाणात मनाची चंचलता वाढत जाते. लंबकाची दोरी जितकी लांब तितका त्याला बसणारा झोका मोठा. हवे-नकोचे प्रमाण ही लंबकाच्या दोरीची लांबी समजावी. ती आखूड करीत नेणे हे प्रयत्नसाध्य आहे. मन एकाग्र करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणे हा अभ्यास. आणि त्याच्या जोडीला हवे-नको उणावत नेणे हे वैराग्य. तेही हळूहळूच साधावे लागते. आवश्यकता आणि विलास यांतील अंतर समजावून घेतले, अपरिहार्य आणि काल्पनिक यातील भेद जाणला

की मग हवे-नकोचे प्रमाण उणावत नेणे, अपरिहार्य आवश्यकतेच्या मर्यादेत राखणे शक्य होते. मग नामस्मरण, पूजापाठ, धारणा-ध्यानादी साधनेत मन एकाग्र होऊ लागते. आणि तसे ते होऊ लागले की, साधकाला सुखाचा-समाधानाचा-प्रसन्नतेचा लाभ होतो. सात्त्विक सुखातही हे सुख बऱ्याच वरच्या पायरीवरचे आहे.

सात्त्विक सुखाच्या प्राप्तीसाठी प्रयत्नांना कंटाळून चालत नाही आणि सात्त्विक सुखाइतके समाधान देण्याचे सामर्थ्य दुसऱ्या कोणत्याही सुखात नाही हे अगदी खरे आहे. पण हे टिकण्यासाठी बुद्धीला आत्मज्ञानाची, सत्यज्ञानाची, हिताविषयीची, विवेकशीलतेची ओढ असावी लागते आणि मोह-आसक्तीच्या पाशातून ती सुटलेली म्हणजे निर्मलही असावी लागते. अन्यथा सात्त्विक सुखाचे महत्त्व पटणार नाही. त्याविषयीचे आकर्षण निर्माण होणार नाही. ते प्राप्त व्हावे म्हणून कष्ट सोसून दीर्घकालपर्यंत सातत्याने करायच्या प्रयत्नासाठी आवश्यक असणारा धीरही टिकणार नाही. म्हणूनच वरील श्लोकात सात्त्विक सुखाच्या लक्षणांचा समारोप करताना त्याला ''आत्मबुद्धिप्रसादजम्'' असे विशेषण दिले आहे.

माणूस म्हणून जन्माला आलेल्या प्रत्येक प्राण्याला बुद्धी उपलब्ध आहे. सुखाकडे धावण्याच्या प्रवृत्तीला प्रेरणा देण्याचे तिचे सामर्थ्यही नैसर्गिक आहे. पण या बुद्धीची बहिर्मुखता उणावून ती आत्म्याकडे वळावी आणि आत्म्याकडे वळलेली ही बुद्धी निर्मल व्हावी यासाठी मात्र काही विशेष दक्षता घेतली पाहिजे. कुलधर्माचे पालन करणे, दासबोध-गाथा-ज्ञानेश्वरी अशा सद्ग्रंथांचे वाचन-मनन करणे, सत्संगतीत विवेकपूर्वक राहणे, आपल्या वर्तनांतून निर्माण होणाऱ्या परिणामांचे परीक्षण करणे इत्यादी गोष्टी यथाशक्ती करीत राहिल्या तर सात्त्विक सुखाची ओळख पटते, ओढ लागते आणि त्याच्या प्राप्तीची साधनाही आरंभते.

रात्री झोपण्यापूर्वी दिवसभरात घडलेल्या आपल्या वर्तनाचे समालोचन जर कुणी नीटपणे केले, तर आत्मबुद्धी प्रसादाच्या दृष्टीने त्याची प्रगती होत राहण्यास काही अडचण राहणार नाही. पुढच्या श्लोकांत राजस सुखाचे वर्णन भगवंत करीत आहे.

**विषयेन्द्रियसंयोगाद्यत्तदग्रेऽमृतोपमम् ।**
**परिणामे विषमिव तत्सुखं राजसं स्मृतम् ।।३८।।**

विषय आणि इंद्रिये यांच्या संयोगामध्ये तेवढ्यापुरते जे सुखाचे वाटते पण त्या (विषयसेवनाचे परिणाम) सुखोपभोगाचे परिणाम पुढे विष घेतल्याप्रमाणे घातक होतात. त्या सुखाला राजस सुख म्हणून जाणावे.

राजस सुखाचे स्वरूप सात्त्विक सुखाच्या नेमके उलट आहे. आरंभ कष्टदायक पण परिणाम चांगला असे स्वरूप सात्त्विक सुखाचे असते. राजस सुखामध्ये आरंभाला बरे वाटते, पण परिणाम मात्र त्रासदायक होतो. आपणा सर्वांचे दैनिक वर्तन बहुधा राजस सुखाला धरून होत असते. माणसाला जीवनधारणेसाठी आवश्यक ते व्यवहार नीटपणे करता यावेत म्हणून डोळे, कान, नाक, जीभ आणि त्वचा अशी पाच ज्ञानेंद्रिये दिलेली आहेत. ती क्रमाने रूप, शब्द, गंध, रस आणि स्पर्श या विषयाचा अनुभव घेऊ शकतात. कर्मेंद्रिये ही यांना साहाय्यक ठरतात. हे साहाय्य प्रसंगाप्रमाणे घडत असते. शब्दस्पर्शादी विषय आणि त्या त्या विषयांना ग्रहण करणारे इंद्रिय यांचा जो संयोग होतो त्याला शास्त्रीय भाषेत मात्रास्पर्श असे म्हणतात. हा मात्रास्पर्श, हा विषयेंद्रियसंयोग, प्रकृती-परिस्थितीप्रमाणे सुखदु:खाची भावना निर्माण करीत असतो. हे सर्व नैसर्गिक आहे आणि असे असणेच आवश्यकही आहे. पण माणूस एवढ्यावर थांबत नाही. डोळ्यांना रूप दिसलेच पाहिजे. रूप पाहण्याइतके डोळे कार्यक्षम असले पाहिजेत. पण त्यातून नाटके आणि चित्रपट पाहण्याची ओढ निर्माण होणे हे काही नैसर्गिक नाही. खाण्याच्या पदार्थात प्रामुख्याने सहा रस असतात. गोड, आंबट, खारट, तिखट, तुरट, कडू. जिभेला त्यांची चव कळते. कळलीच पाहिजे. त्यावरून खाद्यपदार्थाचे गुणधर्म लक्षात येतात. जिभेने पदार्थाची चव अमुक-अमुक आहे हे अवश्य सांगावे, यासाठीच चव जाणण्याचा गुण जिभेच्या ठिकाणी आहे. आपले हे काम जिभेने योग्य प्रकारे केले पाहिजे. पण हे प्रकरण येथे थांबत नाही. जीभ खाद्यपदार्थाची केवळ चव सांगून राहत नाही, ती ते खाद्यपदार्थ किती खावेत त्यांचे प्रमाणही ठरविते. जीभ येथे आपल्या अधिकाराच्या बाहेर अतिक्रमण करीत असते आणि आपण मोहाने त्याला बळी पडत असतो. आपण जेवण करीत असतो,

भुकेचे समाधान साधीत असतो, हे शरीराच्या धारणेसाठी, रसरक्तादी धातूच्या पोषणासाठी. परंपरेने तांदूळ, गहू, ज्वारी, कडधान्ये, फळभाजी, पालेभाजी, शेंगा, कंदमुळे यांची आहारासाठी जी निवड केली आहे, ती हे सारे पदार्थ शरीरपोषणास आवश्यक म्हणून केली आहे. हे पदार्थ कच्चे खाणे, भाजून खाणे, उकडून खाणे हे पचनशक्तीप्रमाणे ठरवावे लागते. येथून पुढचा जो सर्व व्यापार आहे तो जिभेची चव लक्षात घेऊन होतो. आणि मग खमंग वा गोड पक्वान्नांच्या संख्येला मर्यादा राहत नाही. परिणामी आरोग्य बिघडते. चिकित्सकांचे व्यवसाय चांगले चालतात. आपण जे खातो त्यांतल्या अर्ध्यावर आपण जगतो व अर्ध्यावर चिकित्सक जगतो अशा अर्थाची एक इंग्रजी म्हण आहे. आपल्या धर्मशास्त्राने देवकार्य-पितृकार्याव्यतिरिक्त पक्वान्न भोजन करू नये असा नियम सांगितलेला आहे, पण तो कुणी लक्षात घेत नाही. आस्वाद घेणे आणि बोलणे या जिभेच्या आश्रयाने राहणाऱ्या दोन क्रिया. जिभेवर नियंत्रण राहिले की पहिलीमुळे आरोग्य वाढते, दुसरीमुळे स्नेहभाव लाभतो. त्यामुळे वैयक्तिक आणि सामाजिक पातळीवर मनुष्य सुखी होऊ शकतो. जिभेचा संयम ज्याला साधला त्याला इतरही इंद्रियाचा संयम साधणे अवघड जात नाही. कारण *''तैसा मानसी विषो पोखे । रसनाद्वारे।।''* (ज्ञाने. २-१०६) जीभ सैल सुटली की त्या रसलोलुपतेच्या मागोमाग मनामध्ये इतरही विषयांचे आकर्षण वाढू लागते आणि मग सर्वच इंद्रिये स्वैराचारी होतात. स्वैराचाराचा परिणाम घातक असतो हे उघड आहे. विषयसेवनाच्या वेळी आरंभी वाटणारे सुख प्रथमत: जरी निरुपद्रवी वाटले, तरी शेवटी ते दु:खदायी होते. रजोगुणाचे सुख असे 'विषकुंभपयोमुखी' असते.

रसास्वादाच्या स्वरूपात रजोगुणाचे जे वर्णन केले आहे, ते इतर विषयांच्या सेवनाच्या संदर्भातही तसेच खरे आहे. जेवणासंबंधी समाजात उघडपणे बोलता येते आणि त्याचा अनुभव आबालवृद्धांना सारखाच असतो. इतर विषयांची गोडी तितकी सार्वजनिक नाही आणि काही विषयासंबंधी उघडपणे बोलणे सभ्यपणाचे नसते, म्हणून भोजनासंबंधीच्या आकर्षणाचा विषय विस्ताराने सांगितला. त्यावरून उपलक्षणाने इतर विषयांच्या आसक्तीचे स्वरूपही लक्षात येऊ शकते.

विषय भोगायचे नाहीत, तर देवाने विषय आणि इंद्रिये दिली कशाला?

आणि त्यात गोडी कशाला ठेवली? असा प्रश्नही विचारणारे लोक आहेत. हा प्रश्न विचारणे मुळात चूक आहे. विषयसेवनाचा संपूर्ण त्याग कुणी सांगत नाही. सांगितला जातो तो संयम. त्याचे प्रमाण आवश्यकतेच्या मापाने ठरविले पाहिजे. निदान विषयसेवन बाधक होणार नाही एवढ्या तरी मर्यादेत ठेवलेच पाहिजे. तसे न करणे आपल्या हाताने आपल्या पायावर धोंडा पाडून घेणे आहे.

सर्वसामान्य सभ्य गृहस्थाला सुखाने जगायचे असेल तर कसे वागावे हे चांगले समजते. आपल्या मासिक उत्पन्नातून भविष्यकालाच्या दृष्टीने प्रत्येक वेळी तो काही संचय करतो. दूध-धान्य, भाजीपाला, घरभाडे, मुलांचे शिक्षण यासाठी होणाऱ्या खर्चाची नीट कल्पना करून मग चित्रपट पाहणे, कपडे शिवणे इत्यादी सुखोपभोगाचा विचार करतो. सगळेच्या सगळे पैसे चैनीकरता उधळणारा माणूस महिन्याच्या पहिल्या दहा दिवसात गरम, पुढच्या दहा दिवसांत नरम आणि त्यानंतर बेशरम होतो. हे ''अग्रे अमृतोऽपमम् आणि परिणामे विषमिव'' च नाही का? यासाठी रजोगुणाच्या प्रेरणेने सुखोपभोगांकडे वळू नये. तमोगुण रजोगुणापेक्षाही घातक असतो. त्याचे वर्णन पुढील श्लोकात आले आहे.

**यदग्रे चानुबंधे च सुखं मोहनमात्मनः ।**
**निद्रालस्यप्रमादोत्थं तत्तामसमुदाहृतम् ।।३९।।**

जे आरंभी वा परिणामीही अंत:करणाला भुरळ पडल्यामुळेच सुखकारक वाटते; तसेच जे निद्रा, आळस आणि अयोग्य वर्तन यातून निर्माण होते त्या सुखाला तामस सुख असे म्हणतात.

तामस सुख हे राजसाप्रमाणे आरंभीही चांगले नसते वा सात्त्विक सुखाप्रमाणे परिणामीही चांगले नसते. त्याचे सेवन केले जाते ते केवळ मोहामुळे. या सुखाच्या सेवनामुळे एक प्रकारची धुंदी येते. तंद्री लागते. जाणीवशक्ती नाहीशी होते. म्हणून हे सुख, सुख वाटत असते. बिडी-काडी, तंबाखू, मद्य, गांजा, अफू वा तदुत्पन्न इतर मादक द्रव्ये ही तामससुखाचे उदाहरण म्हणून दाखविता येतात. तंबाखूचा, दारूचा स्पर्श सुखावह नसतो. तंबाखू खाल्ली तर मळमळते, ओढली तर ठसका लागतो. दारू घशात जळजळ करीत जाते.

आणि तरी माणसे त्या व्यसनात आकंठ बुडलेली राहतात. तंबाखू खाणारा आपला एकट्याचाच घात करून घेतो. पण तंबाखू ओढणारा, धूम्रपान करणारा, स्वत:च्या सवेच इतरांच्याही आरोग्याला घातक ठरत असतो. पण हे तो लक्षात घेत नाही. मद्यपानाने व्यक्ती-बरोबर कुटुंबाचाही नाश ओढवतो. पण तमोगुणी त्याचा विचार करीत नाही. उलट धूम्रपान करणे, मद्यप्राशन करणे हे प्रतिष्ठेचे लक्षण मानले जाते. यापरते सामाजिक दुर्दैव दुसरे कोणते नाही. त्यामुळे समाजात ज्यांना प्रतिष्ठा आहे असे साहित्यिक, कलावंत, पुढारी, पत्रकार, आपल्या मद्यपानाच्या बैठकीचे चवीचवीने वर्णन करीत असतात. कथा-आत्मकथा, नियतकालिके यांतून ही वर्णने लेखनाच्या रूपाने प्रसिद्ध होत असतात. त्यामुळे मद्यपानाचे व्यसन तरुणांच्यामध्ये बळावत आहे. तोंडात चिलीम धरून डौलाने धूम्रपान करीत असलेली प्रतिष्ठितांची छायाचित्रे कौतुकाने प्रसिद्ध केली जातात. त्याचाही परिणाम तरुण पिढीवर होतो. असे काही व्यसन नसणे हे मागासलेपणाचे, धैर्याच्या, पौरुषाच्या अभावाचे लक्षण मानले जाते.

आगगाडीतून प्रवास करताना मला आलेला एक अनुभवच आपणांस सांगतो. मुंबईहून मला कोलकत्त्यास जायचे होते. पहिल्या वर्गाच्या एका कक्षात आम्ही चौघे प्रवासी होतो. माझी आरक्षित शय्या खालची होती. एका सहप्रवाशाने (तो बराच स्थूल होता) मला विचारले - ''तुम्ही वरची शय्या घ्याल का?'' मी म्हणालो - ''दिवसा मला खिडकीशी बसू द्या. रात्री मी वर झोपेन.'' कारण पुस्तक वाचण्याच्या दृष्टीने मला उजेडाची आवश्यकता होती. मी चहा घेत नाही. धूम्रपान करीत नाही. पत्ते खेळण्यात मला सहभागी होता येत नाही. मांसाहार मी करीत नाही. माझ्या सहप्रवाशांना माझी संगत जणू शल्यभूत झाली. त्यांचे प्रत्येक आवाहन मला साभार नाकारावे लागले होते. मी त्यांना म्हणालो - ''तुमचे चालू द्या, माझ्यामुळे संकोच करू नका.'' मी त्यांना तसे म्हणालो नसतो तरी ते वागायचे तसेच वागले असते. मी सभ्यपणा दाखविला इतकेच. शेवटी न राहवून त्यातील एकजण मला म्हणाला - ''कैसे हो जी आप? मर्द को ऐसा कुछ ना कुछ होनाही चाहिये ।'' व्यसनांना दुर्वर्तन मानण्याच्या ऐवजी काही पराक्रम मानणे, त्यामुळे प्रतिष्ठा लाभते असे समजणे, याच्याइतके दुसरे 'मोहनमात्मन:' काही असू शकते

काय? ही भुरळ, वैयक्तिक आणि सामाजिक पातळीवर भयंकर परिणाम घडवून आणते. हा तमोगुणाचाच प्रभाव आहे, कारण प्रमाद हे तमोगुणाचेच लक्षण आहे. आळसात पडून राहणे, झोपेला सुखसर्वस्व मानणे हेही तामस-सुखच आहे. व्यसनाच्या तुलनेने ते निरुपद्रवी आहे इतकेच.

कर्तव्य काय ते न समजून घेता जे करावेसे वाटते, त्यालाच कर्तव्य मानणे हाच प्रमाद. त्यामुळे तमोगुणी व्यक्तीला समजावून सांगताही येत नाही. तो कुणाचे ऐकून घेण्याच्या मन:स्थितीत नसतोच. त्याचा अहंकार अत्यंत उर्मट असतो. तो दुराग्रही असतो. फार हट्टी असतो.

तंबाखू, दारू, अफू, गांजा हे पदार्थ वाईट आहेत तर ते निर्माण केले कशाला? असाही मूर्ख प्रश्न उद्धटपणे विचारणारे लोक आहेत. 'योजकस्तत्र दुर्लभ:' या न्यायाने प्रत्येक पदार्थाचा उपयोग आहे. सोमल, बचनाग, फार काय नागाचे विष अशी भयंकर द्रव्येही योग्य मर्यादेत औषध म्हणून वापरता येतात. तसेच व्यसनाकरिता वापरली जाणारी द्रव्येही औषधाकरिता वापरता येतात, वापरलीतही. पण त्याच्या उपयोगाचे क्षेत्र अत्यंत मर्यादित आहे. ते तज्ज्ञ वैद्याने निश्चित करायचे आहे. या प्रकरणी वैद्यावर सुद्धा शासकीय बंधने असतात. तंबाखूचे पान खाण्याकरिता देवाने निर्माण केले नाही. काही प्रकारच्या सुजेवर बांधण्याकरिता त्याचा उपयोग होतो. देवाने काटे निर्माण केले आहेत म्हणून ते कुंपणावर न घालता कुणी अंथरुणावर पसरील तर ते शहाणपणाचे ठरते का? ज्याचे व्यसन लागते त्या द्रव्यासंबंधीही असेच म्हणता येईल.

सुखाच्या सर्व प्रकारात तामस सुख हे सर्वांत त्याज्य सुख आहे. ते निषिद्ध मानून वर्ज्य केले पाहिजे.

सत्त्वादी गुणांचे निरनिराळ्या प्रकारांनी वर्णन केले. आता पुढील श्लोकात त्या गुणांची व्याप्ती भगवान सांगत आहेत.

**न तदस्ति पृथिव्यां वा दिवि देवेषु वा पुन: ।**
**सत्त्वं प्रकृतिजैर्मुक्तं यदेभि: स्यात् त्रिभिर्गुणै: ।।४०।।**

पृथ्वीवर वा देवलोकी, स्वर्गात अशी एकही व्यक्ती वा वस्तू नाही, जिच्या ठायी सत्त्व-रज-तम हे तीन गुण नाहीत.

आपल्या पृथ्वीवर वा विश्वात जे जे काही म्हणून स्थावर-जंगम भूतजात आहे, ते सजीव-निर्जीव कसेही असोत, त्यात मनुष्य, पशू, पक्षी, कृमी, वनस्पती, सोने, लोखंड, दगड, माती, इत्यादी कितीही भेद असोत, त्यात त्रिगुणांचे अस्तित्व असतेच असते. व्यक्तीव्यक्तीगणिक, वस्तूवस्तूगणिक, वर्गावर्गागणिक अंतर पडते, ते त्रिगुणाच्या उणे-अधिक प्रमाणाचे. ईश्वरी तत्त्व खरेतर एकटे ब्रह्म तेवढेच काय ते त्रिगुणातीत असते. इतर सर्वांचा उल्लेख त्रिगुणात्मकतेतच होतो. वर्तनावरून, स्वभावावरून ''व्यपदेशस्तु भूयसा'' या नियमाप्रमाणे प्राधान्याने त्यांचे सात्त्विक, राजस, तामस असे भेद पडतात. उदा. सत्पुरुष सात्त्विक, सर्वसामान्य माणूस राजस, दुर्जन तामस; किंवा दूध सात्त्विक, चहा राजस, मद्य तामस. सगळ्या वस्तूजातांचे असे भेद ठरविता आले तरी व्यवहाराच्या दृष्टीने प्रत्येक वस्तूमध्ये तीनही गुण असावेच लागतात.

कोकणामध्ये मला एक खाडी ओलांडून जायचे होते. नावेने जावे लागणार होते. मी पाहिले तो त्या नावेत ५-६ दगड ठेवले होते. मी नावाड्याला विचारले. नावाडी म्हणाला - ''नावेत पुरेसा भार नसेल तर नाव डळमळते. माणसे जास्त बसणार असतील तर आम्ही दगड काढून ठेवतो. म्हणजे नावेसारख्या तारून नेणाऱ्या वस्तूतही तमोगुणी जडता आवश्यक ठरली. नावेपुरता विचार केला तर जडता आणणारे दगड तमोगुणी, गती देणारे वल्हे राजस, तरंगणे हा गुण आणि दिशा सांभाळणारे सुकाणू हे सात्त्विक.

प्रत्येक माणसाला चांगल्या-वाईटाचा निर्णय करता येतो तो सत्त्वगुणामुळे. कार्यक्षमता टिकते ती रजोगुणामुळे आणि झोप येते ती तमोगुणामुळे अशी त्रिविधता प्रत्येक व्यक्ती-व्यक्तीत दाखविता येईल, कुणीही त्याला अपवाद नाही. निरपेक्षपणे विचार केला तर सत्त्व-रज-तम यांतील कोणताही गुण वाईट नाही, चांगलाही नाही. त्याचे चांगले-वाईटपण त्याच्या उपयोगाच्या प्रमाणावरून ठरणारे असते. विष्ठा बैठकीवर कितीही वाईट असली तरी शेतात घालण्यासाठी सोनखत म्हणून विकत घ्यावी लागते. तेथे ती उपयुक्त म्हणून चांगली ठरते. उलट सत्त्वगुण हा निर्मल आणि प्रकाशक आहे. तो स्वच्छ, पवित्र आणि ज्ञान देणारा म्हणून स्वतंत्रपणे कितीही चांगला असला, तरी तो सुखसंगाने आणि ज्ञानसंगाने बंधन निर्माण करतो, म्हणून त्या प्रमाणात तो वाईटच ठरतो. सोने श्रीमंतीचे द्योतक. अलंकार म्हणून चांगले, हे कितीही खरे

असले तरी सोन्याच्या बेड्या करून कोणाच्या हातापायात घातल्या, तर त्या त्यावेळी सोन्याच्या म्हणून काही चांगल्या ठरणार नाहीत. शस्त्राचे चांगले-वाईटपण ते उपयोगात आणणाऱ्याच्या हेतूवरून ठरावयाचे असते. हत्यार दरोडेखोराच्या हातात वाईट, पण तेच जर छत्रपती शिवाजीमहाराजांसारख्यांच्या हातात असेल तर आदरणीय ठरते. त्याची पूजाही होते.

शरीरात आहारापासून उत्पन्न होणाऱ्या विष्ठेसारख्या मलालाही काही प्रमाणात उपयुक्तता आहे. विष्ठेचे नित्यनेमाने विसर्जन होणे आवश्यक असते, तरच सगळा दिवस चांगला जातो. हा अनुभव सर्वांनाच आहे, तरी – 'अवष्टंभ: पुरीषस्य' असा त्याचा उपयोग आयुर्वेदाने सांगितला आहे. क्षयरोगासारख्या व्याधीत तर *'बलं तस्य हि विट्बलम्'* असे वर्णन येते. यावरून चांगले-वाईटपण हे सापेक्ष संबंधाने ठरवायचे असते हे लक्षात येईल. यासाठी मनुष्याने सावध राहून गुणांना उपयुक्ततेच्या मर्यादेत आपापल्या योग्य प्रमाणात राखले पाहिजे म्हणजे केवळ हिताकरिता त्या सर्वांचा उपयोग होऊ शकतो. यासाठीच गुणातीताच्या वर्णनात आरंभीच 'गुणांचा केवळ गुण म्हणून स्वीकारही करू नये आणि तिरस्कारही करू नये' या अर्थाचा श्लोक आलेला आहे. (गीता १४/२२) एक संस्कृत सुभाषितही या दृष्टीने विचारात घेण्यासारखे आहे. *''अमंत्रमक्षरं नास्ति नास्तिमूलमनौषधम् । अयोग्य: पुरुषो नास्ति योजकस्तत्र दुर्लभ: ।।''*

यासाठी मनुष्याने आपल्या अंत:करणात उत्पन्न होणाऱ्या प्रत्येक संकल्प-विकल्पाचे, घेतल्या जाणाऱ्या प्रत्येक निर्णयाचे, हातून घडणाऱ्या प्रत्येक कृतीचे, आपल्या श्रद्धेचे नीट परीक्षण सदैव करीत राहिले पाहिजे. सगळे काही हिताच्या कसोटीवर घासून पाहिले पाहिजे. त्यासाठी शास्त्राने सांगितलेल्या विधिनिषेधांचा विचार केला पाहिजे व तदनुसार आचरण ठेवले पाहिजे. आपल्याला सगळे काही समजते या अहंतेइतकी अंध:श्रद्धा दुसरी कोणतीही नाही. उपयुक्ततेच्या दृष्टीने तत्त्वत: सत्त्वादी त्रिगुणांच्या प्राधान्याला अनुसरून समाजव्यवस्था सुरळीत चालावी यासाठी चार वर्णांची विभागणी निर्माण झाली आहे. त्या त्या वर्णाला अनुरूप कर्मांचे वर्णन भगवान् पुढील श्लोकातून करीत आहेत.

**ब्राह्मणक्षत्रियविशां शूद्राणां च परंतप ।**
**कर्माणि प्रविभक्तानि स्वभावप्रभवैर्गुणैः ।।४१।।**

ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र यांच्या कर्मांची विभागणी, हे पराक्रमी अर्जुना! स्वभावानुसार प्रभावी असलेल्या गुणांना अनुसरून झालेली आहे.

आपल्या भारतीय धारणेप्रमाणे अत्यंत पूर्वीच्या काळात म्हणजे कृतयुगाच्या, सत्ययुगाच्या प्रारंभी मानवी समाजात जशी शासनव्यवस्था नव्हती, तशी वर्णव्यवस्थाही नव्हती. हंस नावाचा एकच वर्ण होता. पण हा समाज जेव्हा केव्हा होता, तेव्हा तो अगदी साधा, सरळ असा होता. कोणतीही व्यक्ती कोणावरही अवलंबून नव्हती. प्रत्येकजण पूर्णपणे अगदी शत प्रतिशत स्वावलंबी होता. पण काळाच्या ओघात पूर्ण स्वावलंबी राहून जेवढे मिळेल तेवढ्यातच संतोषाने राहावे ही वृत्ती उणावू लागली, वैभव पाहिजे असे वाटू लागले आणि मग ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र याप्रमाणे समाजाची विभागणी झाली. ईश्वराने वैभवसंपन्नतेसाठी या चारही वर्णांची उत्पत्ती केली अशा अर्थाचे वचन बृहदारण्यकोपनिषदामध्ये आले आहे. (बृह. १/४/११ ते १५)

सामान्यतः संपन्न जीवन जगणारे जे काही मानवी समाज पृथ्वीच्या पाठीवर निरनिराळ्या राष्ट्रांतून आहेत, त्यातही ब्राह्मण-क्षत्रिय-वैश्य-शूद्र यांच्या कर्मवैशिष्ट्याने युक्त असलेले गट, वर्ग अस्तित्वात आहेतच. वैदिक संस्कृतीने ही व्यवस्था जन्मजात पद्धतीने वर्णबद्ध केली आहे. कालाच्या ओघात या व्यवस्थेत काही दोष शिरले असतील तर ते काढून टाकावे लागतील. आज ही व्यवस्था आपल्या देशात वैदिक समाजातही आदर्श स्वरूपात टिकून राहिलेली नाही. तिचे स्वरूप अत्यंत भ्रष्ट झालेले आहे. एखाद्या भयंकर व्याधीने सर्वथैव पीडिलेल्या, दुबळ्या झालेल्या मनुष्याची जशी अवस्था असते; तशी दशा वैदिक समाजाची झालेली आहे. दुर्दैवाने आपल्याला भोगाव्या लागलेल्या इंग्रजांच्या परतंत्र राजवटीत आपल्या समाजाचा हेतुपुरस्सर बुद्धिभेद करण्यात आला. आपल्यातलेच अनेक बुद्धिमान लोक इंग्रजांच्या या प्रचारतंत्राला बळी पडले आणि *''प्रज्ञाहतास्तु सुहता भवन्ति''* ज्याची बुद्धी नष्ट झाली तो नष्ट होतो या न्यायाने आपला समाज विलक्षण आपत्तीच्या भोवऱ्यात सापडलेला आहे. मॅक्सम्यूलर, सर व्हेलेंटाइन चिरोल यांनी आपल्या संशोधनाची दिशा वा

लेखनाचा हेतू चोरून ठेवलेला नाही. व्हॅलेंटाइन चिरोलने तर स्पष्ट म्हटले आहे की, भारतामध्ये आम्ही सुशिक्षितांची एक नवी पिढी अशी निर्माण केली आहे की तिचा एक पाय आम्हा पाश्चात्त्यांच्या संस्कृतीत पक्का रोवला गेला आहे, दुसरा कदाचित अजून त्यांच्या प्राचीन संस्कृतीत रेंगाळत असेल. चिरोलची ही दर्पोक्ती पुष्कळशी वास्तवात उतरलेली आहे यात संशय नाही. आमच्या समाजातील उच्चभ्रू वर्गाकडे पाहिले म्हणजे हे लक्षात येईल.

हिंदुस्थान खंडित होऊन आपल्याला स्वराज्य मिळाले असले तरी इंग्रजीच्या पारतंत्र्यातून आपली सुटका अद्यापिही झालेली नाही. इंग्रजी माध्यमाचे आकर्षण वाढते आहे. न्यायालयातसुद्धा सर्व शासकीय व्यवहार बव्हंशी इंग्रजीतून होतात. क्वचित देशी भाषा कुठे वापरली गेली तरी अधिकृतपणा असतो तो इंग्रजी भाषेला. भाषेच्या मागोमाग संस्कृती येत असल्याने आजही पाश्चात्त्यांचे आचार-विचार, त्यांची सभ्यता, त्यांच्या संस्कृतीची वैशिष्ट्ये, हेच आपल्यातल्या सुशिक्षित, श्रीमंत, पुढारलेल्या अशा लोकांना आदर्श वाटतात, प्रतिष्ठितपणाचे वाटतात. यामुळेच आपले सर्व काही आपणांस परिवर्तनयोग्य, उपहासास्पद व त्याज्य वाटू लागले.

आपली, समाजव्यवस्थेची एक चांगला आदर्श असलेली वर्णव्यवस्था, समाजवादी तर सोडाच, पण राष्ट्रवादी हिंदुत्वनिष्ठानांही आक्षेपार्ह वाटते. वर्णव्यवस्थेच्या दृष्टीने काही अनुकूल तर्क वा बुद्धिवाद असू शकतो हे मान्य करण्याच्या वा तो ऐकून घेण्याच्या मन:स्थितीतही ही मंडळी राहिलेली नाहीत. त्यामुळे त्यांच्यातले काही उग्र प्रकृतीचे लोक मोठे विचित्र विधान करीत असतात. ते म्हणतात, 'आम्ही ब्राह्मणाच्या विरोधी नाही आहोत. आमचे वैर ब्राह्मण्याशी आहे.' ही मंडळी चांगली शिकलेली आहेत. तेव्हा त्यांना आपण काय म्हणतो त्याचा अर्थ समजत नाही असे विधान मी कसे करू? पण त्यांच्या समजुतीत काही घोटाळा आहे हे निश्चित.

आदर्श तत्त्वे आणि तदनुसार करायचा व्यक्तीचा आचार यात व्यक्तीच्या प्रकृती-परिस्थितीप्रमाणे थोडेबहुत अंतर पडते. अज्ञान, अहंकार, दंभ, मिथ्याचार यांमुळे वर्तन अनेक वेळा विकृत होते. बाह्यांगालाच महत्त्व येते. अंतरंगाचे स्वरूप उपेक्षिले जाते, डावललेही जाते. हे असे होते म्हणजे काय होते ते आमच्या ती. दादांनी श्रीसंत रोहिदासाच्या आख्यानात मार्मिकपणे

प्रगट केले आहे.

श्रीसंतरोहिदास हे जातीने चांभार होते. त्यांच्याशी एका ब्राह्मणाने ते पूजा करीत असलेले पाहून वाद घातला. ब्राह्मण म्हणाला – पूजेचा अधिकार ब्राह्मणाशिवाय कोणालाही नाही. रोहिदास म्हणाले – ब्राह्मण होण्यासाठी काय करावे ते सांगा. तेव्हा ब्राह्मण म्हणाला – *''गळा पाहिजे जानवे । नाव भटजी हे असावे ।। धेनु खुराएवढी शेंडी । अंगी धाबळीची बंडी ।। करी बेले तपकीरीचे । जवळ पुडके पंचागाचे ।। भाली भस्म वरी चंदन । ऐशी ब्राह्मणाची खूण ।।''*

आता हे ब्राह्मणाचे लक्षण बाह्यांगाचेच नाही, तर गबाळेपणाचेही आहे. शेंडी केवळ ब्राह्मणाचे लक्षण नाही, सर्व हिंदुमात्राचे लक्षण आहे. जानव्याचा अधिकार मुळात त्रैवर्णिकांना आहे, पाहिजे तर होता म्हणावे. क्षत्रिय आणि वैश्य वर्गातील काही लोक अजूनही जानवे धारण करणारे असतात. पंचांग हा काही मोठा शास्त्रग्रंथ नव्हे की ज्यामुळे तो जवळ असणाराची विद्वत्ता सिद्ध होते. पंचांग ही नित्योपयोगी वस्तू आहे इतकेच. कपाळी गंधाचा टिळा असणे हे हिंदुमात्राचे वैशिष्ट्य आहे, केवळ ब्राह्मणाचे नव्हे. शिवाचे उपासक असलेले ब्राह्मणेतरही भस्म लावताना दिसतात. काही ब्राह्मण तपकीर ओढणारे असतात. म्हणून तपकीरीचे बेले जवळ असणे हे ब्राह्मणाचे लक्षण समजणे ही तर भोंगळपणाची परिसीमा झाली. सर्वसाधारण समजुतीत बाह्यांगालाच कसे महत्त्व येते ते यावरून दिसून येईल.

असा हा गबाळेपणा उण्याअधिक प्रमाणात गेली ८–१० शतके हिंदू समाजामध्ये पुष्कळशा प्रमाणात टिकून आहे. कारण इसवी सनाच्या आठव्या–नवव्या शतकापासून आपण जवळजवळ पारतंत्र्यात आहोत. आधी मुसलमानांच्या आणि नंतर इंग्रजांच्या पारतंत्र्यात आपली शतकानुशतके गेली. या पारतंत्र्याविरुद्ध लहान–मोठे संघर्ष सतत होत होते. त्याला कधी कधी विजयनगरच्या अत्यंत संपन्न राजवटीसारखे वा छत्रपती शिवरायांच्या हिंदवी स्वराज्यासारखे चांगले फळही लाभले. ते नाव घेऊन नोंदविण्यासारखे होते. परदेशी प्रवाशांनीही विजयनगरच्या साम्राज्याचे जे वर्णन केले आहे, ते अंत:करण स्वाभिमानाने भारून टाकील इतके उज्ज्वल आहे. इतरही अशी अनेक सोनेरी पाने आपल्या काळवंडलेल्या इतिहासाच्या दीर्घकालीन

ग्रंथात मधून मधून चमकली आहेत. परकीयांच्या प्रभावाने भारलेल्या आणि परकीयांनीच प्रेरित केलेल्या इतिहासलेखनाने ही गोष्ट अज्ञानाने दुर्लक्षिली तरी आहे किंवा मोहाने विकृत स्वरूपात मांडलेली तरी आहे.

जाता जाता एक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे ती अशी की इतिहासलेखनच आपल्याला मुसलमानांनी वा इंग्रजांनी शिकविले हे म्हणणे अतिशयोक्तीचे आहे. अलीकडच्या इतिहासलेखनात स्थल आणि काल यांनाच अतिशय महत्त्व दिले जाते. प्रत्यक्ष घटनेपेक्षा तिचे हे दोन घटकच भाव खात असतात. आपला इतिहासाकडे पाहण्याचा दृष्टिकोन यापेक्षा वेगळा होता. आपण व्यक्तिविशेषाला, त्यातही तिच्या चारित्र्याला आणि घडणाऱ्या घटनांच्या मागील उद्दिष्टाला प्राधान्य देत होतो. स्थल-कालाला आपल्या दृष्टीने तादृश महत्त्व नव्हते. त्यामुळे आपल्याकडील मोठमोठ्या व्यक्तींच्या चरित्रविषयक कथांच्या संदर्भात स्थलकालाच्या नेमकेपणाचा संभ्रम आढळतो. उदा :- कालिदासाचे जन्मस्थळ आणि काल हा अद्यापि संशोधकांच्या वादाचा विषय आहे. श्रीज्ञानेश्वर, श्रीरामदास, श्रीतुकाराम, या अत्यंत थोर महापुरुषांची चरित्रेही याला अपवाद नाहीत. नवीन पद्धतीच्या इतिहासलेखनाच्या मापाने आपणांस हा मोठा दोष वाटतो. जणू त्यामुळे चरित्राचे ऐतिहासिकत्वच नष्ट होते असे आपण गृहीत धरतो. हाही पाश्चात्त्य विचारसरणीचा प्रभाव आहे. रवींद्रनाथ टागोरांनी मात्र भारतीयांचा इतिहास पाश्चात्त्यांनी सांगितलेल्या कसोटीवर घासून पाहणे योग्य नाही असे स्पष्ट शब्दात प्रतिपादिले आहे. (धम्मपद). पण या चेतावणीकडे भारतीय इतिहासाच्या आधुनिक टीकाकारांनी पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे. या दुर्लक्षाचा परिणाम भयंकर झाला आहे. रामायण-महाभारत यांसारखे इतिहास ग्रंथ आमच्या या आधुनिक टीकाकारांना इतिहासग्रंथ न वाटता वाल्मिकीच्या वा व्यासांच्या प्रतिभेतून स्फुरलेले काव्यग्रंथ वाटतात. त्यातील काही या प्रतिभेच्या उत्तुंगतेने दिव्यतेने दिपून रामायण-महाभारताला स्तुती करण्यास योग्य, श्रेष्ठ ग्रंथ मानतात; पण काव्यग्रंथ मानतात. इतिहासग्रंथ मानीत नाहीत. हेही आपले एक मोठे सामाजिक दुर्दैव आहे. कारण रामायण-महाभारतांतून व्यक्त होणारे काही चांगले आदर्श आपणांस काव्यमय आदर्श वाटतात. ते ऐतिहासिक वास्तव आहे याचे भान आपण ठेवत नाही. आणि त्यामुळेच भारतीय संस्कृतीने स्वीकारलेल्या धारणा योग्य नाहीत असे

म्हणणाऱ्याला संस्कृतीच्या स्वाभिमानी समर्थकाने दिलेली उत्तरे, आपणांस केवळ तार्किक वाटतात. ती वस्तुस्थितीवर आधारलेली आहेत, हे मानावयास आधुनिक विचारांच्या प्रभावाने, त्याच धारेबरोबर वाहत जाणारे प्रवाहपतित मान्य करीत नाहीत. यामुळेच चातुर्वर्ण्य व्यवस्था ही समाजरचनेची एक चांगली व्यवस्था आहे हे विधान कोणी पटवून घेत नाहीत, कारण याचे कारण समजून घेणारी मने मोकळी नाहीत, ती पूर्वग्रहदूषित आहेत.

कोणतीही मानवी व्यवस्था शंभरी शंभर निर्दोष संभवत नाही. तेव्हा कोणत्याही व्यवस्थेत गुणांप्रमाणे काही ना काही दोष अस्तित्वात राहणारच, पण समाजरचनेच्या दृष्टीने चातुर्वर्ण्य व्यवस्थेत इतर कोणत्याही व्यवस्थेपेक्षा अगदी समाजवादी-साम्यवादी व्यवस्थेपेक्षाही दोष अल्प आणि गुण पुष्कळ आहेत. शाश्वत सौख्याच्या दृष्टीने चातुर्वर्ण्यव्यवस्था ही अधिक लाभदायक आहे. या व्यवस्थेत ज्ञान, सत्ता, संपत्ती आणि श्रमकौशल्य यांचे पूर्णपणे विकेंद्रीकरण झाले आहे आणि थोडासा कठोरपणा पत्करूनही त्यांचे केंद्रीकरण होणार नाही अशी दक्षता या व्यवस्थेने घेतली आहे. समाजाच्या वैभवसंपन्नतेसाठी, सुखस्वास्थ्यासाठी ज्ञान तेजस्वी, निःस्पृह, सर्वंकष असावे लागते. सत्ता समर्थ आणि कार्यक्षम असावी लागते. संपत्ती विपुल आणि न्यायाधिष्ठित असावी लागते. श्रमकौशल्य महोद्यमी वा प्रयत्नशील असावे लागते. यातील कोणीही सदोष असले तरी समाजहिताला हानी पोहोचल्याविना राहत नाही. तसेच यातील कोणीही दोन वा अधिक एकत्रित झाले, तर त्या प्रमाणात समाजाचे शोषणही अधिकाधिक होऊ लागते. ते समाजाच्या स्वास्थ्याला चूड लावते, स्वार्थाला प्रेरणा देते आणि संघर्षाला प्रवृत्त करते. कारण ज्ञान, सत्ता, संपत्ती, श्रमकौशल्य यांतील प्रत्येक गोष्ट फार शक्तिशाली आहे. ती जर स्वार्थाने प्रेरित होईल तर त्या व्यक्तीचे वा गटाचे काही काळ भले झाले तरी मानवी समाजाची हानी झाल्याविना राहणार नाही. म्हणून भारतीय समाजव्यवस्थेने कोणाही एका व्यक्तीचा वा गटाचा स्वार्थ इतरांच्या सुखसंतोषाचे अपहरण करण्याइतका उन्मत्त होणार नाही अशी दक्षता त्या शक्तिशाली गुणांचे चार वर्गात विकेंद्रीकरण करून घेतली आहे.

जीवनधारणेकरता आवश्यक ते व्यवसाय जन्मजात वर्णाधिष्ठित ठेवल्याने त्या त्या व्यवसायाकरिता द्याव्या लागणाऱ्या शिक्षणाकरिता, करावा लागणारा

खर्च अतिशय मर्यादेत राहतो, बेकारी टळते. व्यवसायासाठी मान्यता प्राप्त करून घेण्यासाठी (लायसेन्स-परमिटसाठी) कोणाच्या तोंडाकडे पाहावे लागत नाही. कोणाला संतुष्ट करण्यासाठी भले-बुरे उपाय अवलंबावे लागत नाहीत. त्यामुळे भ्रष्टाचारही बोकाळत नाही. चातुर्वर्ण्य-व्यवस्थेचे हे सर्व लाभ पूर्णपणे उपेक्षिले गेले.

चातुर्वर्ण्यव्यवस्थेचे आदर्श कोसळले, त्याला बराच काळ लोटला. पेशवाईच्या उत्तरार्धात तर ही भ्रष्टता आणि तज्जन्य अनाचार हे परक्या इंग्रजांचे राज्य समाजाला सुखावह वाटावे इतके वाढले होते. पण तेवढ्याने काही चातुर्वर्ण्यव्यवस्थाच टाकाऊ आहे असे ठरत नाही. एखाद्या व्यक्तीचा रोग बळावला म्हणजे प्रयत्न केला जातो तो रोग नाहीसा करण्याचा. त्या व्यक्तीचे आयुष्य संपविणे हा काही त्याच्या अस्वास्थ्यावरचा उपाय नाही. संस्कृतीच्या आणि व्यवस्थेच्या संदर्भातही हेच लक्षात ठेवले पाहिजे. ती ती व्यवस्था जर एकूण लाभदायक आहे असे तत्त्वत: सिद्ध होत असेल तर व्यवस्था टिकून राहील आणि तिच्यात असणारे दोष क्षम्यतेच्या अनुपद्रवतेच्या मर्यादेत राहतील, वाढणार नाहीत, अशी दक्षता घेतली पाहिजे, वाटले तर ते दोष काढून टाकण्याकरिता प्रयत्नशील राहिले पाहिजे.

मानापमानाच्या कल्पना थोड्या मर्यादेत ठेवल्या तर हे घडू शकेल. चातुर्वर्ण्यव्यवस्था गृहीत धरली तर अपमान सहन करण्याचा प्रसंग ब्राह्मणावर येतच नाही हे खरे नाही. आजच्या कालाच्या तुलनेने तेजस्वी असलेले ब्राह्मण्य कितीतरी अधिक प्रमाणात व्यवहारामध्ये जिवंतपणे वावरत होते. त्या काळातील दोन घटना मी तुम्हांस सांगू इच्छितो.

द्रौपदी स्वयंवरामध्ये द्रुपदाने लावलेला कठीण पण, पराक्रमी म्हणून प्रसिद्ध असलेल्या अनेक क्षत्रिय राजांना जिंकता आला नाही. कर्ण-शल्य यांसारख्या वीरांनाही पण जिंकण्यासाठी ठेवलेले धनुष्य चढवताही आले नाही. ***''यत् कर्णशल्य प्रमुखैर्पार्थिवैर्लोकविश्रुतैः । नानतं बलवद्भिर्यद् धनुर्वेद परायणैः ॥''*** त्या वेळी ब्राह्मण वेषातील तरुण अर्जुन मत्स्यवेधाचा तो पण जिंकण्यासाठी पुढे सरसावला. त्या ब्राह्मणबटूला पाहून क्षत्रिय राजे म्हणाले - जे काम मी मी म्हणणाऱ्या कर्ण-शल्यासारख्या धनुर्धरांनाही साधले नाही, ते काम हा ब्राह्मणाचा पोर कसा पूर्ण करणार? हा स्वत:ही फजित होईल आणि

आपल्यासवे सगळ्या ब्राह्मण जातीलाही फजित करील. ज्या काळी परशुराम, द्रोण यांसारखे ब्राह्मणवीर नावाजलेले होते, त्या काळी क्षत्रिय मंडळी शस्त्र हाताळू इच्छिणाऱ्या ब्राह्मणाचा तुच्छतेने असा उपहास करीत असत. धनुर्विद्या हे ब्राह्मणाचे काम नव्हे. या क्षेत्रात त्यांनी लुडबूड करू नये हे बरे. तिथे ते अपमानित होणार. हे क्षत्रियांनी गृहीतच धरलेले आहे. असे गृहीत धरणे हा ब्राह्मणाचा जातीवरून केलेला अपमानच आहे.

कर्णाच्या संदर्भात घडलेली दुसरी गोष्ट अशीच आहे. कर्णाचे दुर्जनपण लक्षात घेऊन द्रोणाचार्यांनी त्यास नाकारलेले ब्रह्मास्त्र परशुरामाकडून प्राप्त करून घ्यावे या उद्देशाने कर्ण परशुरामाकडे ब्राह्मण वेषाने आला आणि आपल्या सेवेने संतुष्ट करून त्यांच्यापासून ब्रह्मास्त्र मिळविले. परत फिरण्यापूर्वी एक दिवस परशुराम कर्णाच्या मांडीवर डोके ठेवून झोपले होते. कर्णाच्या मांडीखाली अलर्क नावाचा किडा सापडला होता. त्याने कर्णाची मांडी पोखरण्यास आरंभ केला. गुरूंची झोपमोड होऊ नये म्हणून कर्णाने मांडी कोरली जात असताना होणाऱ्या वेदनाही अतिशय धीराने सहन केल्या. मांडी हलविली नाही. रक्ताचा पाट वाहू लागला. त्याच्या स्पर्शाने परशुराम जागे झाले. त्यांनी पाहिले तर कर्णाच्या मांडीला खोल मोठे छिद्र पडले आहे व त्यातून रक्ताची धार लागली आहे. परशुराम ताड्दिशी म्हणाले – खरे सांग, तू ब्राह्मण नाहीस. अशा वेदना सहन करणे हे ब्राह्मणाचे काम नव्हे. परशुरामाने ब्राह्मणाला असा अधीर, हळवा, घायकुता म्हणावे हा ब्राह्मणाचा अपमानच आहे. आणि तो एका ब्राह्मणानेच केला आहे. तेव्हा चातुर्वर्ण्यव्यवस्थेमुळे ब्राह्मणेतरांचाच अपमान होतो असे नाही. आपल्या मर्यादेच्या बाहेर जाणाऱ्या कोणाचाही अपमानच होतो. उलट गुणांनी वैशिष्ट्य दाखविले, तर त्या त्या व्यक्तीचा सन्मानही होतो. स्वत:ला शूद्र किंवा कुणबी म्हणवून घेणाऱ्या श्रीतुकाराम महाराजांच्या पायाशी रामेश्वरभटासारखा विद्वान नम्र होतो. *''तुकिता तुलनेसी ब्रह्म तुकासी आले । म्हणुन रामेश्वरे चरणी मस्तक ठेविले ।।''* श्रीतुकाराम महाराजांच्या अलौकिक संतत्वाने प्रभावित झालेला रामेश्वर त्यांची ब्रह्माशी तुलना करतो आणि त्यांच्या चरणावर मस्तक ठेवण्यात धन्यता मानतो. धर्मव्याध नावाच्या एका खाटकाने एका ब्राह्मणाला अध्यात्माचा उपदेश केल्याचे वर्णन महाभारतात आलेले आहे. अनेक ब्राह्मण ऋषी ज्ञान संपादण्यासाठी क्षत्रिय

राजांकडे गेल्याचा उल्लेख उपनिषदांतून आढळतो. चातुर्वर्ण्यव्यवस्थेत हेही घडू शकते. तेव्हा त्रेतायुगात घडलेल्या शंबूकवधाच्या घटनेचे भांडवल करून चातुर्वर्ण्यव्यवस्थेला ठोकीत राहणे अडाणीपणाचे तरी आहे, नाहीतर ते दुष्टतेचे तरी लक्षण आहे.

ब्राह्मणांनी ब्राह्मणेतरांना अडाणी ठेवले, ज्ञान दिले नाही हाही आरोप खोटा आहे. ब्राह्मणेतरांनी विशेषत: शूद्रांनी वेदाध्ययन करू नये असे म्हटले गेले आहे. पण महाभारत, रामायण यांसारखे ग्रंथ शूद्रांना अध्ययनासाठी उपलब्ध असताना त्यांना कोणत्याही ज्ञानापासून वंचित ठेवले हे म्हणणे खरे नाही. असो. चातुर्वर्ण्यव्यवस्थेवरील आक्षेपांचा स्थूलमानाने परामर्श घेतला आहे. या विषयाशी संबंधित असे पुष्कळ लेखन अप्रबुद्ध या नावाने प्रसिद्ध असलेल्या श्री. वि. के. पाळेकर या नागपूरच्या महापंडितांनी केलेले आहे. जिज्ञासूंनी त्याचे अवलोकन करावे.

समाजधारणेच्या दृष्टीने अत्यंत श्रेष्ठ असलेल्या चातुर्वर्ण्याची निर्मिती ब्रह्माने वा ईश्वराने केली अशी आपली धारणा आहे. शरीराचे अवयव वर्षानुवर्ष आणि पिढ्यान्‌पिढ्या तेच तेच काम सातत्याने करीत राहतात व त्यामुळेच शरीर आयुष्यभर आपली कार्यक्षमता टिकवू शकते. समाज व्यवस्थित चालण्यासाठी अशीच विभागणी असणे सोयीस्कर आहे. ते अधिक उपयुक्त आहे आणि काटकसरीचेही आहे. पण या प्रश्नाची चर्चा निवडणुकीच्या पातळीवर करता येणार नाही. सत्तासंपत्तीच्या वा पुढारीपणाच्या मोहाच्या पातळीवर करता येणार नाही. ही चर्चा मोकळ्या मनाने बौद्धिक वा शास्त्रीय पातळीवर केली पाहिजे. तशीच ती तात्कालिक लाभहानीचा विचार करून करता येणार नाही. व्यापक क्षेत्रातील दीर्घकालीन परिणामांचा विचार करून ही चर्चा करावी लागेल.

चातुर्वर्ण्याची विभागणी गुणकर्माच्या आधारे झालेली आहे. पण हे गुणकर्म प्रत्येक व्यक्ती-व्यक्तीचे पाहून विभागणी करायची, असे नाही. प्रत्येक व्यक्तीच्या आवडीनिवडी पाहून अशी विभागणी करायची असे म्हटले तर तो इतर देशात आहे तसा वर्ग होईल, वर्ण होणार नाही. वर्णव्यवस्थेमध्ये केवळ व्यवसायांची विभागणी एवढाच उद्देश नाही. व्यवसायाची निश्चिती महत्त्वाची आहेच. पण ते वर्णव्यवस्थेचे बाह्यांग आहे. वर्णव्यवस्थेमध्ये महत्त्व आहे

ते वृत्तीला-स्वभावाला-नैतिक मूल्याला. आणि हे काही कोणाला कोणता व्यवसाय करणे आवडते वा सोयीचे जाते यावर अवलंबून नाही. व्यवसाय करण्याची इच्छा ही धनलाभ किती होतो हे पाहून मुख्यत: ठरविली जाते. आज जो उठतो तो वैद्यकीकडे वा शिल्पशास्त्राकडे (इंजिनियरिंग) वळतो. शिक्षणक्रमात सरळ प्रवेश मिळाला नाही, तर पाच-दहा लाख रुपये भरून प्रवेश मिळविला जातो. मग क्रम लागतो तो वाणिज्याचा (कॉमर्स), विज्ञानाचा (सायन्स). साहित्याकडे, वाङ्मयाकडे (आर्टस्) कुणी वळतच नाही. शिक्षक व्यवसायाची निवड सगळ्यात शेवटी केली जाते. कोणाला कोणताही व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्य असावे, असे म्हणण्यात प्रत्येकाच्या पात्रतेचा विचार केला जातो हे म्हणणे किती खोटे आहे हे यावरून लक्षात येईल.

स्वभाव-वैशिष्ट्याच्या जडणघडणीसाठी पूर्वजन्माला महत्त्व आहेच. पण बुद्धिवादाच्या मोहात पुनर्जन्म नाकारायचे ठरविले तरी अनुवंशाने येणारे, कुलपरंपरा, कुलपद्धती यातून सहजासहजी घडणारे संस्कार तरी मान्य करावेच लागतील. तेव्हा वर्णव्यवस्थाही जन्मसिद्ध असणेच इष्ट आहे आणि तशी ती प्राचीन कालापासूनही आहे. विश्वामित्राचे एखादे उदाहरण हे नियमाला अपवाद असतो त्याप्रमाणे आहे. आणि ह्या अपवादभूत घटनाही अत्यल्प प्रमाणात घडलेल्या आहेत. भारतासारख्या विशाल देशात वर्षसहस्रकांच्या दीर्घ परंपरेत अशी उदाहरणे अगदी तुरळक, हाताच्या बोटावर मोजण्याइतकी तुरळक आहेत.

वर्णव्यवस्था जन्मसिद्ध असल्याविना वर्णसंकर या शब्दाला अर्थच प्राप्त होणार नाही. आणि आपल्या परंपरेत वर्णसंकर ही गोष्ट अतिशय त्याज्य मानली आहे. वर्णशुद्धीसाठी, वंशशुद्धीसाठी दक्षता घेतलेली आहे. म्हणूनच विवाह संबंधावर अधिक मर्यादा घातलेल्या आहेत. आणि विरोधी प्रचाराच्या गदारोळातही हे मर्यादापालन जवळजवळ टिकून आहे. असो.

चातुर्वर्ण्यव्यवस्थेतील त्या त्या वर्णाचे वैशिष्ट्य भगवान् पुढील श्लोकातून सांगत आहेत.

**शमो दमस्तप: शौचं क्षान्तिरार्जवमेव च ।**
**ज्ञानं विज्ञानमास्तिक्यं ब्रह्मकर्म स्वभावजम् ।।४२।।**

मन आवरलेले असणे, इंद्रिये नियंत्रित असणे, उदात्त ध्येयाच्या प्राप्तीसाठी सर्व प्रकारचे कष्ट करणे, पावित्र्य राखणे, सोशिक-क्षमाशील असणे, सौम्यपणाने-सरळपणाने वागणे, निरनिराळ्या प्रकारचे ज्ञान संपादन करणे आणि ईश्वरावर निष्ठा ठेवणे किंवा वेदांचे प्रामाण्य मानणे ही ब्राह्मणाची स्वभावसिद्ध कर्मे आहेत.

कर्मे स्वभावसिद्ध आहेत असे म्हणण्यात प्रवृत्ती तशी असणे आणि त्याप्रमाणे वर्तन करणे या दोन्ही गोष्टींचा समावेश होतो. प्रवृत्ती आणि वर्तन एकरूप असेल तरच कोणतीही कृती प्रामाणिक राहते. मग तेथे देखाव्याला, दंभाला वाव राहत नाही. म्हणूनच चारी वर्णांच्या वर्णनामध्ये 'स्वभावजं कर्म' असे शब्द आलेले आहेत.

ब्राह्मणाचे वैशिष्ट्य सांगताना शमाचा उल्लेख प्रथम केला आहे, तो फार महत्त्वाचा आहे. शम म्हणजे मनाचा संयम. जे अहितकर आहे, अयोग्य आहे, वाईट आहे, सोयीचे-सुखाचे वाटत असले तरी परिणामी घातक आहे, ज्याच्यामुळे दुसऱ्याला त्रास होईल असे वागण्याची इच्छा नसणे हे शमाचे, मनाच्या संयमाचे महत्त्वाचे लक्षण. अर्थातच मग असे मन विषयोपभोगाविषयी आसक्ती ठेवीत नाही, कोणाचा द्वेष करीत नाही. आसक्ती असलीच तर ती ईश्वरभक्तीची, शास्त्राध्ययनाची, परोपकाराची, उदात्त वर्तनाची. द्वेष केला जात असेल तर तो पातकाचा, निषिद्धाचा. अर्थातच असा शम-गुणाने युक्त असलेला माणूस कामक्रोधादी षड्विकारापासून दूर असतो. त्या विकाराची उपयुक्तता असलीच तर ती व्यवहारापुरती मर्यादित असते. त्यामुळे शमगुणाने युक्त व्यक्तीचे मन शांत, प्रसन्न, समाधानी, आनंदी राहते, राहू शकते. परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी ही व्यक्ती डळमळत नाही. विषण्ण होत नाही. तिचा धीर सुटत नाही. तोल जात नाही. अर्थातच अशा व्यक्तीचे वर्तन सर्वदा सद्वर्तनच असते. ती व्यक्ती नेहमी सदाचरणानेच वागते.

दम म्हणजे इंद्रिये आवरून वागणे. मन आवरलेले असणे हे कठीण आहे, त्या दृष्टीने प्रयत्न करीत राहणे हेही सोपे नाही. अशा प्रयत्नांना यशही लवकर प्राप्त होते असे नाही. पण इंद्रियांच्यावर नियंत्रण प्रस्थापित करणे हे मन आवरण्याच्या मानाने कितीतरी सोपे आहे. नको ते करावेसे वाटणे वा नको ते करण्याचा मोह होणे हे बहुतेक वेळा आपल्या स्वाधीनचे नसते.

मन चंचल, बलवान आणि दुराग्रही आहे. पण इंद्रिये ही काही तशी नाहीत. विवेक थोडासा जरी जागृत असेल तरी 'इंद्रिये बरळो नेदावी' हे साधणे शक्य आहे. व्यवहारामध्ये याचा अनुभव आपल्याला पुष्कळ वेळा येतो. एखादा पदार्थ खावासा वाटला तरी आपण आरोग्याचा विचार करून खात नाही. खावेसे वाटले तरी न खाणे हे दमाचेच प्रतीक आहे. शम हा श्रेष्ठ खरा, पण तो साधण्यासाठी दमाच्या मार्गानेच जावे लागते. शमाला मूलत: बाधक असलेल्या कामक्रोधांना जिंकण्यासाठी आधी इंद्रियांचे नियंत्रण करावे हाच उपाय भगवद्गीतेने सांगितला आहे. जो दमाचे अवलंबन करतो, तोच समाजामध्ये सभ्य म्हणून गणला जातो. ज्याला शम पूर्णपणे साधला तो संतपदावर चढतो. आपल्या धार्मिक परंपरेमध्ये नाना प्रकारची जी व्रते सांगितली आहेत, ती दम लक्षात घेऊन तो साधण्यासाठीच सांगितली आहेत.

कोणत्याही उदात्त ध्येयनिष्ठेने सर्व प्रकारचे कष्ट करणे हेच तप. तपाचा विचार आपण पूर्वी केलेला आहे. (श्लोक ४-५)

शौच म्हणजे स्वच्छता-शुद्धता-पवित्रता. स्वच्छता-शुद्धता हे गुण प्रत्यक्ष आहेत. पवित्रता हा गुण भावगम्य आहे. आपल्या परंपरेतील सोवळेओवळे, स्पर्शास्पर्श, ग्राह्याग्राह्य हे सर्व मुळात शौच कल्पनेवरच आधारित आहेत.

सोवळे-ओवळे हा उपहासाचा विषय बनला आहे हे खरे, पण याला कारण सोवळ्या-ओवळ्यातील तत्त्व गेले आणि ढोबळ तंत्र तेवढे उरले हे आहे. कुणीही कितीही वेळा वापरलेले आणि वर्षानुवर्ष न धुतलेले वस्त्र म्हणजे सोवळे अशी गबाळी कल्पना रूढ झाली. आता हा विषय टिंगल-टवाळीचा न होईल तरच नवल. धूतवस्त्र हे खरे सोवळे. मुकटा किंवा धाबळी हा त्याचा क्षम्य प्रतिनिधी. थोडा सोयीचा म्हणून ग्राह्य. पण हे असे सोवळे केवळ बाह्यांग झाले. जो *'अर्थतः शुचि, कामतः शुचि'* नाही, त्याने हे बाह्यांगाचे सोवळे-ओवळे पाळणे, हे सोवळे या कल्पनेचे विडंबन आहे. पैसा कोणत्याही मार्गाने मिळवावा तेथे नीति-अनीती, न्याय-अन्याय याचा काही विचार करू नये आणि अन्नाला कोण शिवले आहे तेवढे पाहावे हा मिथ्याचार आहे. हे शौच नव्हे. धनार्जन आणि विषयोपभोग यात नीतीचे पालन करणारा माणूसच शुचिता सांभाळतो असे मानले पाहिजे. अशा माणसालाच बाह्यांगाने राखलेले सोवळे शोभते.

क्षमाशीलता, सोशिकपणा हा गुण क्षांती या शब्दाने सुचविला जातो. यात शरीर–मन–बुद्धी यांच्या पातळीवरील प्रतिकूलता सहन करणे, शांतपणाने सोसणे हे गृहीत आहे. शीत–उष्ण, सुख–दु:ख आणि मान–अपमान यांचा विचार या संदर्भात केला पाहिजे. हळवे नसणे, घायकुते नसणे, रागीट व संतापी नसणे हे क्षांतीचे बाह्य रूप. असा मनुष्य मनाविरुद्ध घडले, संकटे आली, अपमान झाला तरी कधीही तोल सोडून वागत नाही. अवज्ञा करणाऱ्या वा अपमान करणाऱ्या व्यक्तीविषयी ज्याच्या मनात द्वेषाची वा तिरस्काराची भावना नसते तो क्षमाशील.

सरळपणाने वागणे म्हणजे आर्जव. ज्याच्या वागण्यात कपट नसते, जो कोणाची वंचना करीत नाही, कोणाला फसवीत नाही, स्वार्थासाठी दुष्टतेने कोणाला हानी पोहोचवीत नाही, ज्याच्या वागण्यात सौजन्य, नम्रता, गुणग्राहकता आहे, तो आर्जवी. ज्याच्या वागण्या–बोलण्यात आर्जव आहे असा माणूस सर्वांना हवाहवासा वाटतो. तो कोणाला दुखत–खुपत नाही. एखाद्याला तुला कसे कळत नाही असे म्हणणे हे काही वेळा आर्जवात बसेल, पण ज्याला कळत नाही त्याला मूर्ख, गाढव म्हणणे हे काही आर्जवात बसणार नाही. फटकळपणा हा स्पष्टवक्तेपणा नव्हे. त्या दोहोतील अंतर जाणून घेतले पाहिजे. दुसऱ्याच्या भावना जाणून त्या दुखावणार नाहीत असे वागणे म्हणजे आर्जवाने वागणे. क्षांती आणि आर्जव हे शब्द ओळीने आले आहेत. यात मार्मिकता आहे. क्षांतीमध्ये स्वत:च्या भावना आवरायच्या असतात, तर आर्जवामध्ये दुसऱ्याच्या भावनांना जपायचे असते. समाजात वावरताना हे दोन गुण अंगी असणे आवश्यक आहे. क्षांती शमाची परिणती आहे, तर आर्जव दमाचा आविष्कार आहे असे म्हणता येईल.

ज्ञान आणि विज्ञान यांचा उल्लेख गीतेच्या सातव्या अध्यायात आलेला आहे. आत्म्याविषयीचे, ब्रह्माविषयीचे ज्ञान म्हणजे ज्ञान; आणि प्रपंचाविषयीचे, भौतिकाविषयीचे ज्ञान ते विज्ञान असा अर्थ श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी तेथे केला आहे, तोच येथेही आहे. ब्राह्मण हा असा ज्ञानविज्ञानसंपन्न असावा. सर्व प्रकारचे ज्ञान मिळविणे, ते वाढविणे, त्याकरिता अभ्यास करणे, संशोधन करणे हे मनुष्यामात्राने – निदान ब्राह्मणाने तरी – आपले आवश्यक कर्तव्य मानले पाहिजे. त्याकरिता पडतील ते कष्ट उचलण्यास सिद्ध असले पाहिजे.

ज्ञानाच्या दृष्टीने तत्त्वज्ञानाची वा भौतिकशास्त्राची कोणतीही शाखा त्याला अज्ञात वा अपरिचित असू नये. सगळ्यांनाच काही सगळ्या विषयावर प्रभुत्व संपादन करता येत नाही. पण एखाद्या विषयावर प्रभुत्व मिळवून इतर अनेक विषयांशी थोडाबहुत परिचय राखणे काही अशक्य नाही, उलट ते इष्ट आहे. इतर विषयांच्या परिचयामुळे एका विषयातले पांडित्य अधिक तेजस्वी होऊ शकते. स्वीकारलेला कोणताही मार्ग, व्यवसाय, साधना यांचा अवलंब ज्ञानविज्ञानाच्या बळावर अधिक कार्यक्षम रीतीने करता येतो.

ईश्वराच्या अस्तित्वावरील श्रद्धा म्हणजे आस्तिक्य. ईश्वर सर्वांचा नियंता आहे, निर्माता आहे, तो सर्वव्यापक आहे, सर्वशक्तिमान आहे तसा सर्वज्ञही आहे हे पूर्णपणे मान्य असणे म्हणजे आस्तिक्य. आधी सांगितलेल्या शमदमादी सर्व गुणांचे आस्तिक्य हेच खरे म्हणजे अधिष्ठान आहे. आपण बहुतेकजण ईश्वरनिष्ठ आहोत.

काही थोडे बुद्धिवादी वगळले तर ईश्वराच्या अस्तित्वाविषयी कोणालाही संशय नाही. पण ईश्वराचे अस्तित्व मानणारे आपण सर्व ईश्वराचे स्वरूप जसे सांगितले आहे तसे लक्षात ठेवून वागतो असे मात्र म्हणता येणार नाही. मंदिरात स्थापन केलेली मूर्ती म्हणजेच ईश्वर असे आपण समजतो. तिची नवसाला पावण्याच्यासंबंधात प्रख्याती असली तर ते स्थान जागृत ठरते. आणि अशा देवाला नवसाच्या निमित्ताने काही वस्त्रदक्षिणादी देणे, तेथे जाऊन पूजाअर्चादी विधी करणे, त्या स्थानी काही दानधर्म करणे म्हणजे ईश्वरभक्ती झाली असे आपण समजतो. आणि एवढ्या पूजादींनी प्रसन्न होऊन ईश्वराने आपले मुलाबाळांसह सर्व प्रकारच्या आपत्तीतून रक्षण करावे, आणि आपली सगळी मनोवांछिते पुरवावीत अशी आपण इच्छा करतो. देवाने उदार असावे, दयाळू असावे, क्षमाशील असावे असे आपण मानीत राहतो. देवाच्या समोरून देवळातून बाहेर पडले की मग आम्ही कसे वागतो, काय करतो ते देवाने पाहू नये, अशीही आमची धारणा असते. काही लोक तर देवळातल्या देवाला आपल्या व्यवसायधंद्याचे साधन मानीत असतात. त्यांची देवावरील श्रद्धा कितपत खरी, त्याचे त्यांनाच माहीत! काही लोक शब्दज्ञानाच्या बळावर ईश्वर सर्वव्यापक आहे असे म्हणतात आणि त्यामुळे देवळापुरते तरी चांगले वागले पाहिजे एवढेही लक्षात घेत नाहीत. एक हिंदी कविता या दृष्टीने लक्षात

घेण्यासारखी आहे. एक दारुडा कवी म्हणतो – ''साकी शराब पीने दे मसजिद् में बैठकर । नहीं तो वह जगह बता जहाँपर खुदा न हो ।।''

साकी (मद्य आणून देणारा – री), मशिदीत बसलो असलो म्हणून काय झाले? मला येथेही पिण्यासाठी दारू आणून दे. नाहीतर ईश्वर नाही अशी जागा दाखव.

ईश्वरासंबंधीची अशी भावना म्हणजे काही खरी आस्तिकता नव्हे. भक्तिमार्ग हा एखाद्या मोठ्या शिक्षणसंस्थेसारखा आहे. तेथे बालवर्गापासून पदव्युत्तर अभ्यासक्रमापर्यंत सर्वांच्या प्रगतीची सोय आहे. पण एकेका इयत्तेत किती किती दिवस राहायचे हे ज्याचे त्याने ठरवायचे आहे. देव केवळ मूर्तीतच आहे असे मानणे वा तो नवसाने प्रसन्न होतो असे समजणे हे तेवढ्यापुरते जर प्रामाणिक असेल तर तो भक्तिमार्गातला बालवर्ग आहे. पूर्णपणे निष्काम भावनेने केवळ आध्यात्मिक प्रगतीसाठी ईश्वराची आराधना करणे हे पदवीच्या शिक्षणासारखे आहे. प्राप्त होईल ती परिस्थिती ईश्वराची इच्छा समजून त्या अवस्थेतही समाधानाने, प्रसन्न चित्ताने राहणे, ईश्वराच्या भक्तीने अंत:करण सदैव भरलेले असणे हे पदवी मिळविल्यासारखे आहे. यातील कोणत्याही अवस्थेत देखाव्याचा, दंभाचा लवलेशही असता कामा नये. तरच ती आस्तिकता खरी असे म्हणता येईल.

खऱ्या आस्तिक व्यक्तीच्या हातून ज्याला आपण पापाचरण म्हणू असे कृत्य कधी घडणारच नाही. तो कोणत्याही उद्योगव्यवसायात प्रामाणिकच राहील. क्वचित मोहाने, अनवधानाने, आसक्तीने त्याच्याकरवी काही घडू नये ते घडले तर तो पश्चात्तापाने व्यथित होईल. ईश्वराची करुणा भाकेल. योग्य ते प्रायश्चित घेईल आणि तसे निषिद्ध वर्तन पुन्हा घडणार नाही याची दक्षता घेईल.

शमापासून आस्तिक्यापर्यंत सांगितलेली सर्व लक्षणे ब्राह्मणाच्या वर्तनात जितक्या अधिक प्रमाणात असतील तितका तो खरा ब्राह्मण. हीच लक्षणे इतरांच्या ठिकाणी जेवढ्या प्रमाणात दिसतील तेवढ्या प्रमाणात त्याच्या ठिकाणी संतत्व प्रगट होते आहे असे समजावे.

शमदमादी ही सर्व लक्षणे उदात्त, श्रेष्ठ चारित्र्याचा आदर्श आहेत आणि हा आदर्श सर्व मानवजातीकरताच अनुकरणीय आहे. मग केवळ अत्यंत मर्यादित अशा ब्राह्मणवर्गाकरिता लक्षण म्हणून या आदर्शभूत गुणांचा उल्लेख

का केला गेला अशी शंका अनेकांच्या मनात येते. ती तशी येणे योग्यही आहे. ब्राह्मणांनी आपली श्रेष्ठता अबाधित ठेवण्याकरिता ही लक्षणे स्वत:च्या वर्गाकरिता निश्चित केली. आम्ही ब्राह्मण आहोत म्हणजे या लक्षणांनी युक्त आहोतच म्हणून आम्हास श्रेष्ठ आणि वंदनीय माना असे इतरांना सांगता यावे या स्वार्थी हेतूने ब्राह्मणांनी ही लक्षणे आपल्या वर्णाशी धूर्ततेने जोडली आहेत, असाही आरोप केला जातो. ब्राह्मणांतील काही लोकांचे वर्तन आणि अहंकार पाहिला की या आरोपाला आधारशिला प्राप्त होते यात शंका नाही. पण आपण तात्त्विक दृष्टीने विचार करीत आहोत तेव्हा आरोपाचा विचार न करता प्रथम उल्लेखिलेल्या शंकेपुरता विचार करू.

अगदी थोडक्यात उत्तर द्यायचे तर शमादी सद्‌गुण इतरांच्याकरिता आदर्श असले तरी ब्राह्मणाकरिता ते कर्तव्यासारखे आहेत. हे कर्तव्य आवश्यकही आहे. त्या दृष्टीने प्रयत्नशील राहणे अपरिहार्य आहे. त्याविना श्रेष्ठतेची, मानसन्मानाची कोणतीही अपेक्षा करणे अन्याय्य आहे. त्यातील शम, दम, तप ही तीन लक्षणे तर अत्यंत महत्त्वाची आहेत. पहिली दोन शौच म्हणजे पावित्र्य या लक्षणात समाविष्ट करता येतात. चारित्र्य, शील हे पावित्र्याच्या मापानेच मोजावयाचे असते. ते ज्याच्याजवळ नाही तो जन्माने ब्राह्मण असला तरी इतरांनी त्याला शूद्राप्रमाणे समजावे असेच शास्त्राने सांगितले आहे. राजाने त्याला वेठीला धरावे व त्याच्याकडून करही घ्यावेत असे धर्मशास्त्र म्हणते.

चारित्र्याचा असा उच्च आदर्श सातत्याने टिकविणे हे मोठ्या धैर्याचे आणि कष्टाचे काम आहे. कुलाचा आणि वर्णाचा स्वाभिमान असेल तर हा धीर टिकू शकतो. कष्ट सोसू शकतात. प्रत्येक माणसाला हे इतक्या प्रमाणात शक्य नाही. ती प्रेरणा त्याच्या ठिकाणी निर्माण करणेही सोपे नाही. म्हणून तपादी गोष्टी ब्राह्मणापुरत्या कर्तव्य म्हणून मर्यादित ठेवल्या आहेत. इतरांनी त्यांचा स्वीकार केला तर ते संत म्हणविले जातात, संत म्हणून आदरणीय, वंदनीय, सन्माननीय म्हणून गणले जातात हे पूर्वी सांगितलेच आहे. पुढील श्लोकात क्षत्रियाचे वैशिष्ट्य सांगितले आहे.

**शौर्यं तेजो धृतिर्दाक्ष्यं युद्धे चाप्यपलायनम् ।**
**दानमीश्वरभावश्च क्षात्रं कर्म स्वभावजम् ।।४३।।**

शौर्य, तेजस्विता, धैर्य, दक्षता, युद्धातून पळून न जाणे, औदार्य, प्रभुत्व गाजविण्याची इच्छा आणि ईश्वरनिष्ठा ही क्षत्रियाची स्वाभाविक कर्मे आहेत.

क्षत्रियांच्या गुणांचे भगवान् विस्ताराने वर्णन करीत आहेत. पहिला गुण शौर्य असा आहे. क्षत्रियांच्या गुणात तो महत्त्वाचा गुण, जसा ब्राह्मणाचा शम. शौर्य म्हणजे पराक्रम. कोणत्याही परिस्थितीत न डगमगता प्रतिकूलतेवर मात करण्याची इच्छा हे शौर्याचे अधिष्ठान. अशा शूर वीरांच्या अनेक कथा आपल्या इतिहासात प्रसिद्ध आहेत. शिवाजी महाराजांच्या परिवारामध्ये एकापेक्षा एक पराक्रमी असलेल्या वीरांची नामावली, दुबळ्यालाही स्फुरण देईल अशी आहे. तानाजी मालुसरे, बाजीप्रभू देशपांडे, नेताजी पालकर, नावजी बलकवडा, येसाजी कंक यांच्या पराक्रमाचे स्मरण आजही शरीर रोमांचित करते. त्या स्मरणाने हृदय अभिमानाने भरून येते. समुद्रगुप्त, चंद्रगुप्त, अभिमन्यू, अर्जुन, भीम ही प्राचीन काळातील शूर मंडळी, ज्यांच्या पराक्रमाचे पोवाडे गायिले जात असतात. असे हे शौर्य क्षत्रियाचे वैशिष्ट्य आहे.

शौर्य हे विशिष्ट प्रसंगी व्यक्त व्हायचे असते. युद्धाचा काळ नसेल तर शौर्य प्रगट होणार नाही. वीरतेची, शूरतेची कसोटी लागणार नाही. पण तेज हा गुण स्वभावत: प्रगट होणारा आहे. तेज म्हणजे तेजस्विता, चमक, प्रकाशणे. ज्याच्या अंगी हा गुण आहे; त्याच्यावर लोकांची दृष्टी आपोआप खिळून राहते. लोकांचे लक्ष वेधावे म्हणून पुढे पुढे करणे म्हणजे मात्र तेजस्विता नव्हे. तेजस्वी व्यक्तीला आपले गुण आपल्याच तोंडाने वाखाणावे लागत नाहीत वा त्याकरिता प्रचारयंत्रणाही उभी करण्याची आवश्यकता नसते. त्याचे वागणे-बोलणे असे असते की तो चारचौघात सहज उठून दिसतो. त्याची नुसती उपस्थितीही प्रभावी ठरत असते. माझे मूल्य इतके आहे असे हिरा कधी सांगत नाही. पैलू पाडलेल्या हिऱ्याचे तेज स्वत:ची थोरवी स्वत:च प्रगट करीत असते. ''रहिमन हिरा कब कहे लाख हमारो मोल ।'' अशा व्यक्तीला निवडणूक लढवावी लागत नाही. लोक त्याला आपण होऊन निवडून देतात. इतर मात्र मी माझ्या निवडणूक-क्षेत्रात प्रचारालाही जाणार नाही अशी केवळ बढाई मारतात. प्रत्यक्षात त्यांना सत्तेचा दुरुपयोग करून, नाना प्रकारची प्रलोभने दाखवून, दडपणे आणून, भय उत्पन्न करून, पैसे वाटून, पुन:पुन्हा चकरा मारीत विनवण्या करून निवडून यावे लागते. खऱ्या तेजस्वितेला यांतले

काही करावे लागत नाही.

तेज हा असा क्षत्रियाचा महत्त्वाचा गुण. त्यामुळे तो अपमान सहन करीत नाही. शिवाजीराजांनी अगदी बालपणात विजापूरच्या आदिलशहाला मुजरा करण्याचे नाकारले होते अशी कथा प्रसिद्ध आहे. औरंगजेबासारख्या क्रूर-उन्मत्त-मोगल सम्राटापुढे आग्र्याच्या भर दरबारात त्यांनी आपली ही तेजस्विता प्रगट केली होती. मात्र तेजस्विता म्हणजे उद्धटपणा नव्हे हे लक्षात ठेवले पाहिजे. परकीयांपुढे लाचारी आणि स्वकीयांपुढे गर्विष्ठपणा असे राजा मानसिंगासारखेही तेजस्वितेचे स्वरूप नसते. तेजस्वी असलेले छत्रपती शिवराय श्रीरामदास-तुकाराम यांच्यासारख्या संतांपुढे विनम्र होत असत हेही लक्षात ठेवले पाहिजे.

धृती म्हणजे धैर्य. कोणत्याही प्रतिकूल परिस्थितीत न डगमगता दटून उभे राहणे. दत्ताजी शिंदे रणांगणात मर्मी आघात होऊन कोसळले. त्या वेळी त्यांना शत्रूने विचारले - ''क्यों पटेल! और भी लडोगे क्या?'' तेव्हा त्याही घायाळ स्थितीत दत्ताजी म्हणाले - ''बचेंगे तो और भी लडेंगे! '' ज्याचे धैर्य बलवान आहे त्याचा उत्साह पराभवाने मावळत नाही; उलट तो अधिक त्वेषाने पराक्रम करण्यास सिद्ध होतो. कोणत्याही प्रकारच्या आपत्तीत त्याचा धीर खचत नाही. शौर्य आणि तेज याच धृतीच्या पायावर उभे असतात. धृतीवाचून शौर्य पराक्रम गाजवू शकत नाही. धृतीविना तेज मलूल होते. त्याचा मग 'मानापमाना'तला लक्ष्मीधर होतो.

पेशवाईतील एक गोष्ट आहे. एका सरदाराच्या घरी कीर्तनाचा कार्यक्रम चालू होता. सरदारसाहेब, दिवाणजी, त्याचे इतर मानकरी, सेवक कीर्तन ऐकत होते. त्यांचा दिवाणजी सारखी चूळबूळ करीत होता. त्याच्या अंगरख्यात शिरलेला ढेकूण त्याला चावत होता. आणि दिवाणजी पुढून-मागून हात घालून त्याला शोधीत होता. शोधून सापडला तर तो ढेकून कसला? लपून बसणे हाच त्याचा पराक्रम. त्याची उपद्रव-शक्ती या कौशल्यानेच कार्यक्षम होत असते. जवळजवळ सर्व कीर्तनभर दिवाणजीची चुळबूळ चालूच होती. कीर्तन संपल्यावर सरदाराने त्याला विचारले - दिवाणजी! कीर्तनभर तुमची वेडीवाकडी हालचाल का चालू होती? तुम्ही अस्वस्थ का होता? दिवाणजी म्हणाला, सरकार, क्षमा करा. एक ढेकूण अंगरख्यात शिरला होता. तो मला

चावत होता. त्यामुळे मला अगदी चैन पडत नव्हते. सरदार हसून म्हणाला – एका ढेकणाने तुम्हाला हैराण केले? सरदाराने आपले पागोटे काढून दाखविले. त्यात एक विंचू होता. आणि त्याच्या चाव्यामुळे डोक्याचा भाग काळानिळा झाला होता. पण सरदाराच्या प्रसन्न गंभीर मुद्रेवर वेदनेची रेषाही उमटली नव्हती. धृती हा असा क्षत्रियाचा जातिवंत गुण आहे. त्यामुळेच तर परशुरामाने कर्णाला त्याच्या सोशिकपणामुळे तो ब्राह्मण नाही हे ओळखले.

धैर्यानंतर वर्णन आहे ते दक्षतेचे. शौर्य, तेज, धृती या गुणांनीच पराक्रम वाढत असतो. पण असा हा पराक्रम यशस्वी व्हायचा तर दक्षता, सावधपणा या गुणांची त्याला जोड असावी लागते.

शिवपुत्र संभाजी आपल्या वडिलांच्यापेक्षा कांकणभर अधिकच शूर होता म्हटले तरी चालेल. पण त्याच्या ठिकाणी कोणत्याही कारणाने असो, दक्षता, सावधपणा या गुणांची उणीव होती आणि म्हणूनच संगमेश्वरसारख्या गढीचे, किल्ल्याचे संरक्षण नसलेल्या गावात त्याला मोगलांनी पकडले. त्या वेळी त्याच्याजवळ सैन्यही अगदी थोडे होते. दक्षतेचा अभाव किती घातक ठरतो, याचे संभाजीचे चरित्र हे उत्तम उदाहरण आहे.

महाराजांचे सेनापती प्रतापराव गुजर यांचेही वर्तन या दृष्टीने विचारात घेण्यासारखे आहे. शिवाजीराजांच्यावर चालून आलेल्या बहलोलखान या विजापूरच्या सरदाराचा प्रतापराव गुजरांनी आपल्या पराक्रमाने पराभव केला आणि त्याला पकडले. त्याने शरण येऊन क्षमा मागितली. हिंदू रक्तातल्या स्वाभाविक औदार्याने प्रतापरावांनी बहलोलखानास सोडून दिले. शिवरायांना ही गोष्ट आवडली नाही. शिवराय राजकारणधुरंधर होते. श्रीकृष्णाचे शिष्य शोभावेत असे त्यांचे राजकारण अखंड सावधानतेचे होते. कोणताही गबाळेपणा त्यांना मान्य नव्हता. सद्गुणविकृतीने त्यांना कधी स्पर्शही केला नाही. त्यांनी प्रतापरावाला बहलोलखानास सोडून देण्याच्या ढिलाईकरता फटकारले. अत्यंत तेजस्वी असलेल्या प्रतापरावासारख्या शूरवीराला ती अवहेलना सोसली नाही. तेवढ्यात बहलोलखान अधिक सिद्धता करून मोठे सैन्य घेऊन मराठ्यांवर चालून आला. या पार्श्वभूमीवर महाराजांनी जे फटकारले ते त्याला अधिकच बोचले आणि सेनापती प्रतापराव केवळ सात सैनिकांनिशी बहलोलखानाच्या सैन्यावर तुटून पडले. या अविवेकाचा परिणाम व्हायचा तोच झाला. बहलोलखानाच्या

सैन्यांतील शे-पाऊणशे माणसे मेली असतील, पण आपल्या सातही वीरांसह प्रतापरावास धारातीर्थी मरण पत्करावे लागले. प्रतापरावाचे शौर्य, प्रतापरावाचे तेज, प्रतापरावाचे साहस सावधपणाच्या अभावाने पराभूत झाले.

याउलट औरंगजेब सत्तावीस वर्षे महाराष्ट्रात आपल्या अफाट सैन्यानिशी धुमाकूळ घालीत असतानाही मराठ्याच्या वृकयुद्धनीतीने (गनिमी कावा) त्यास म्हणावे तसे यश कधी लाभले नाही. त्याने एक गड जिंकून पुढे जावे आणि मूठभर मराठी सैन्याने तो गड पुन्हा परत मिळवावा. संभाजीमहाराज मारले गेले होते. राजाराम जिंजीला परांगदा झाला होता. अशा स्थितीत अत्यंत अल्पसंख्य असलेले मराठी सैन्य शौर्याने लढले, धैर्याने लढले, पण दक्षता घेऊन लढले म्हणून पराभूत झाले नाहीत. उलट मोगलांचा शहेनशहा असलेला धूर्त औरंगजेब हताश मन:स्थितीत मराठी मातीतच गाडला गेला. क्षत्रियाच्या गुणातील दक्षता हा गुण किती महत्त्वाचा आहे ते यावरून लक्षात येईल.

जीवाच्या भयाने युद्धातून पळून न जाणे हा क्षत्रियाचा पाचवा गुण. धीर सुटल्यामुळे सैनिक युद्धातून पळून येतो. युद्धातून पळून येणे हे क्षत्रियामध्ये मोठ्या अपमानाचे समजले जाते. युद्धातून पळून आलेल्या एका रजपूत राजाला त्याच्या राणीनेच राजधानीत शिरू दिले नाही. धि:कारून परत पाठविले. मात्र कधीकधी धोरण म्हणून, युद्धातील एक यशस्वी डावपेच म्हणून यशस्वी माघारही घ्यावी लागते. पण तो युद्धकौशल्याचा भाग असावा लागतो. ते भेकडपणाचे पांघरूण होऊ नये. श्रीकृष्ण मथुरेहून पळाले आणि त्यांनी द्वारका स्थापन केली. शिवाजीमहाराज औरंगजेबाच्या बंदीवासातून आग्र्याहून पळूनच आले. युद्ध जिंकण्यासाठी काही वेळा चकमकी हराव्या लागतात. दुसऱ्या महायुद्धात चर्चिलच्या नेतृत्वाखाली लढणाऱ्या इंग्लंडने हे युद्धकौशल्य अनेक वेळा वापरले आहे. यशस्वी माघार (सक्सेसफुल रिट्रीट) हा शब्द तेव्हापासूनच अधिक रूढ झाला आहे.

कर्तव्यबुद्धी, औदार्य, गुणग्राहकता, सहानुभूती, दया इत्यादींच्या अधिष्ठानावर दान हा गुण अभिव्यक्त होतो. क्षत्रियाच्या ठिकाणी असलेल्या या गुणामुळे गुणी माणसाचे श्रम कारणी लागतात. त्यांचे जीवन सुखावह होते. दान हा संग्रहप्रवृत्तीवरचा एक उतारा आहे. त्यामुळे सामाजिक संघर्षाची बीजे नष्ट होतात. क्षत्रिय हा समाजाचा संरक्षक असल्याने सामाजिक स्वास्थ्य

राखणे हे त्याचे आवश्यक कर्तव्य आहे. संघर्ष नाहीसा करणे, संघर्ष वाढू न देणे, संघर्ष निर्माण होणार नाही असे पाहणे हा सर्व त्याच्या विहित कर्तव्याचा भाग ठरतो. दान हे त्याचे चांगले साधन आहे. प्राचीन काळातील राजेलोक विश्वजित नावाचा यज्ञ करून आपल्याजवळील सर्व संग्रह वाटून टाकीत. सूर्यकुलोत्पन्न राजा रघु आणि कौत्स नावाचा ऋषीकुमार यांची कथा या संदर्भात प्रसिद्ध आहे. राजा हर्ष यानेही असा यज्ञ केल्याचा उल्लेख चिनी प्रवाशांनी केला आहे. औदार्य वृत्ती असल्यावाचून दान घडू शकत नाही.

शंभर-पाऊणशे वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. दोन संस्थानिक मेण्यातून महाबळेश्वरला जात होते. प्रत्येक निवासावर भोई आणि दिवटे यांची व्यवस्था असे. एके ठिकाणचा दिवटा अनुपस्थित होता. म्हणून आधीच्याच दिवट्याने पुढच्या स्थानापर्यंत संस्थानिकास पोहोचविले. त्याच्या कष्टाने संतुष्ट होऊन एका संस्थानिकाने त्याला एक होन पारितोषिक म्हणून दिला. दुसरा म्हणाला - अहो! आतापर्यंत आपण या दिवट्यांना तेलासाठी पैसे देत होतो. त्यामुळे आपला कितीतरी तोटा झालेला आहे. मागचाच दिवटा पुढे आला म्हणजे दोन ठिकाणी पुरेल एवढे तेल आपण त्याला देत होतो. असे आज कित्येक वर्षे चालले आहे. यापुढे पैसे देताना आपण विचार केला पाहिजे. पहिला संस्थानिक हसून म्हणाला - त्या दिवट्याच्या श्रमाचे मोल कळण्यासाठी संस्थानिकाच्या कुळात जन्माला यावे लागते. दत्तक येऊन संस्थानिक झालेल्यांना ते कळणार नाही.

दान-दक्षिणा ही काही मजुरी नाही. मजुरी देताना हिशोब करणे योग्य ठरेल. दान-दक्षिणा हा औदार्याचा आविष्कार असला पाहिजे. कुलवंतपणाचे ते एक स्वाभाविक लक्षण आहे. पूर्वीच्या काळी कवीच्या प्रतिभेवर संतुष्ट होऊन त्याने रचलेल्या कवितेतील एकेका अक्षराकरिता लाख लाख रुपये दिल्याच्या कथा सांगण्यात येतात. (*'प्रत्यक्षरं लक्षं ददौ'*). अशा घटना अगदी तुरळक घडल्या असतील, पण त्या अशक्य मानण्याचे कारण नाही. श्रीमंताचे रसिक औदार्य अशा उत्कटतेने प्रगट होणे शक्य आहे. माणूस आपल्या मापाने विचार करतो म्हणून अशा उदात्त घटना त्यास अशक्य वाटतात. 'प्रत्यक्षरं लक्षं ददौ' चा माझ्या एका मित्राने मला अर्थ सांगितला की, राजा प्रत्येक अक्षराकडे लक्ष देत असे, प्रत्येक अक्षर लक्ष लावून ऐकत असे. लक्षं ददौचा

हा अर्थ असा आहे.

एकदा गोमांची परिषद भरली आणि त्यात चर्चेचा विषय निघाला की मारुतीने समुद्राचे उल्लंघन एका उड्डाणात केले म्हणतात ते खरे असेल काय? त्यातील एका गोमेने हे कसे अशक्य आहे ते परिषदेला पटवून दिले. ती म्हणाली – गोमभगिनींनो! आपणा प्रत्येकीला शंभर पाय आहेत तरीसुद्धा गायीच्या पावलाने उमटलेल्या खळग्यात पाणी साचले असेल तर तेवढेही अंतर आपणांस उडी मारून जाता येत नाही. मग दोन पायाचा मारुती समुद्र लंघून गेला हे कसे खरे असेल? जे शंभर पायांना शक्य नाही ते दोन पायांना साधणे शक्यच नाही. *''शतपदी सतिपाद शते क्षमा यदि न गोष्पदमप्यतिवर्तितुम् । किमियता द्विपदस्य हनूमतो जलनिधेस्तरणे विविदामहे ।।''*

परिषदेमध्ये एकमताने मारुतीच्या धि:काराचा ठराव मान्य करण्यात आला असला पाहिजे. ''प्रत्यक्षरं लक्षं ददौ'' चा माझ्या मित्राचा अर्थ असाच समजला पाहिजे.

देवांच्या रक्षणासाठी दधीचीने आपल्या अस्थी दिल्या. कपोताला वाचविण्याकरिता शिबिराजाने आपले मांस दिले. जीमूतवाहनाने एका नागाला वाचविण्यासाठी गरुडाला आपले प्राण देऊ केले. *'नास्त्यदेय महात्मनाम्'*. उदार अंत:करणाच्या महात्म्यांना काहीही देणे अवघड नसते. दिलीपानेही नंदिनीच्या रक्षणासाठी भक्ष्य म्हणून माझा स्वत:चा स्वीकार कर, पण नंदिनीला सोड असेच सिंहाला विनविले होते. स्वत्वरक्षणासाठी हरिश्चंद्राने स्वत:स डोंबाघरी विकून घेतल्याची कथा प्रसिद्ध आहे. हे सर्व दानवीर क्षत्रियच आहेत. म्हणून दान हा क्षत्रियाचा महत्त्वाचा गुण सांगितला आहे.

राजाच्या हातात सर्वंकष सत्ता एकवटलेली असते. तो जर उदार नसेल, दानी नसेल, कृपण असेल तर प्रजा भिकेला लागल्यावाचून राहणार नाही. म्हणून आमच्या ती. दादांनी एका संदर्भात

*''स्वार्थी भूपतिची प्रजा नच खऱ्या सौख्यास भोगी कदा ।*
*घाण्याच्या मधल्या उसासम स्थिती होई तिची सर्वदा ।।*
*राजाज्ञा अवमानण्या विबुधहो कोणास छाती नसे ।*
*न्यायान्याय मुळी अशा नृपतिला केव्हाहि ना तो दिसे ।।''*

असे वर्णन केले आहे.

जो शूर असतो, तेजस्वी असतो, धीराचा असतो, तो क्वचित तापट असला तरी उदार असतो. माणुसकीला शोभा देणारे अनेक सद्गुण औदार्याच्या आश्रयाने राहतात. म्हणूनच ब्रह्मदेवाने माणसाला त्याच्या उद्धारासाठी दान ही साधना सांगितली आहे. कुणाचे कौतुक करणे वा कौतुक वाटणे हे सुद्धा औदार्याशिवाय संभवत नाही. मात्र तोंडदेखलेपणा वा तोंडपुजेपणा म्हणजे कौतुक नव्हे हे लक्षात ठेवले पाहिजे.

सत्ता गाजविण्याची आकांक्षा म्हणजे ईश्वरभाव. मला सत्ताधारी व्हायचे आहे, अधिकार गाजवायचा आहे, ऐश्वर्य, सन्मान, प्रतिष्ठा मिळवायची आहे असे वाटणे म्हणजे ईश्वरभाव. हा ईश्वरभाव स्वत:च्या ठिकाणी असलेल्या अधिकाराच्या योग्यतेच्या यथार्थ जाणिवेतून निर्माण होत असतो. ईश्वरभाव हा स्वाभिमानाचा एक प्रसन्न आविष्कार आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज *''माझा मऱ्हाटाचि बोलू कवतिके । परी अमृतातेहि पैजा जिंके । ऐसी अक्षरे रसिके । मेळवीन ।।''* (ज्ञाने. ६/१४) असे उद्गार सहजपणे काढतात. भारताचार्य म्हणून पुढे प्रसिद्धीस पावलेले श्री. चिंतामणराव वैद्य, एम. ए. ची परीक्षा देऊन परत येत होते. आगगाडीच्या डब्यात त्यांच्यासमागमे त्यांचे चार-पाच सहाध्यायी होते. त्या वर्षीचे पहिल्या क्रमांकाचे पारितोषिक कोणाला मिळेल याविषयीची चर्चा ते वर्गमित्र करीत होते. चिंतामणराव स्वत: तटस्थपणे ती चर्चा ऐकत होते. त्यांना एका मित्राने विचारले - अरे, तू काही बोलत नाहीस? तुझे मत काय आहे? श्री. चिंतामणराव म्हणाले - चर्चा कशाची करता? ते पारितोषिक मलाच मिळणार. माझाच त्यावर अधिकार आहे. आणि पुढे तसेच घडले. हे आत्मविश्वासाचे प्रत्ययोद्गार असतात. इंग्लंडमध्ये असताना लो. टिळक आपल्या विचाराच्या तंद्रीत वाहनांनी गजबजलेला रस्ता सहज ओलांडून जात. कोणीतरी सहकाऱ्यांनी त्यांना विचारले - 'बळवंतराव ! असे काय करता?' टिळक म्हणाले - 'वाहनाखाली चिरडून मरण्यास मी जन्माला आलो नाही.'

विलक्षण आत्मविश्वास असणे, स्वत:च्या योग्यतेची, थोरवीची जाणीव असणे हा जसा ईश्वरभाव आहे, त्याप्रमाणेच ईश्वराचे अस्तित्व मान्य असणे, त्यावर निष्ठा असणे, ईश्वरी सामर्थ्याची ओळख ठेवणे हाही अर्थ ईश्वरभावाचा करता येतो. अत्यंत बलिष्ठ असलेल्या मुसलमानी राजवटीला पराभूत करून

सर्वथैव प्रतिकूल असलेल्या परिस्थितीत छत्रपती शिवाजीमहाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. ''हे राज्य व्हावे ही तो श्रींची इच्छा.'' असे उद्‌गार ते नेहमी काढीत. त्यांचे हे उद्‌गार ईश्वरभाव या शब्दाचे दोन्ही अर्थ व्यक्त करणारे आहेत.

क्षत्रियांच्या ठिकाणी असणाऱ्या सद्‌गुणवर्णनाचा समारोप अशा रीतीने आत्मविश्वास-निदर्शक आणि हृदयातील विनम्र आस्तिकता प्रगटविणाऱ्या ईश्वरभाव शब्दाने झाला आहे. यात मोठी मार्मिकता आहे असे मला वाटते. पुढील श्लोकातून वैश्य आणि शूद्र यांची कर्मे सांगितली आहेत.

**कृषिगोरक्ष्यवाणिज्यं वैश्यकर्म स्वभावजम् ।**
**परिचर्यात्मकं कर्म शूद्रस्यापि स्वभावजम् ।।४४।।**

शेती, गोरक्षण, व्यापार ही वैश्याची स्वाभाविक कर्मे आहेत. परिचर्या, सेवा करणे हे शूद्रांचे स्वाभाविक कर्म आहे.

आजच्या समाजव्यवस्थेमध्ये ज्याला आपण उत्पादक व्यवसाय म्हणतो, ते सर्व वैश्य आणि शूद्र यांचे व्यवसाय आहेत. त्यांत वैश्याच्या स्वाधीन अधिक महत्त्वाचे, जीवनधारणेसाठी अपरिहार्य असणारे असे दोन व्यवसाय आहेत. कृषी आणि गोरक्षण हे दोन व्यवसाय असे आहेत की ज्याचे फारसे केंद्रीकरण होऊ शकणार नाही. ते सर्व देशभर उण्या-अधिक प्रमाणात विखुरलेलेच राहतील. त्याविना गती नाही. आणि असे आहे म्हणूनच मानवी जीवन त्या प्रमाणात तरी सुरक्षित राहते, आणि उज्ज्वल भविष्याची स्वप्ने पाहू शकते. *''जीवन्नरोभद्रशतानि पश्यति''* हा अनुभव कृषी आणि गोरक्ष्य यामुळेच येऊ शकतो. व्यापार हे वैश्याचे तिसरे कर्म. शेती आणि गोरक्षणापेक्षा महत्त्वाच्या दृष्टीने तिसऱ्या क्रमांकाचे. उपयुक्त वस्तूंचा प्रसार आणि त्यांचा परस्परविनिमय हे व्यापाराचे स्वरूप. त्याकरिता श्रममूल्य म्हणून मिळणारी अडत ते वैश्याच्या उदरपूर्तीचे साधन. वस्तू अल्प मूल्यात घेऊन अधिक मूल्याने विकणे हे वाणिज्याचे स्वरूप. स्वत:चे श्रम वा स्वत:च्या आवश्यकतेची पूर्ती हे या मूल्यातील अधिकतेचे प्रमाण ठरविण्याचे साधन. पण आजच्या अर्थशास्त्रात मागणी आणि पुरवठा हे वस्तूचे मूल्य ठरविण्याचे साधन झालेले आहे. प्रचाराने, प्रसिद्धीने मागणी ही कृत्रिमरीत्या वाढविता येते.

आणि पुरवठा रोखून धरता येतो. त्यामुळे वस्तूच्या मूल्यात म्हणजेच महागाईत भरमसाट वाढ होते. आणि समाज अस्वास्थ्याने पीडिला जातो. सामान्यत: कोणताही उपभोग्य पदार्थ, त्यातल्या त्यात जीवनधारणेच्या दृष्टीने ज्याची अत्यंत आवश्यकता आहे, असा पदार्थ महागला म्हणून थोडा पुरत नाही, भाव उतरले म्हणून अधिक उपभोगता येतो असेही नाही. तांदूळ दहा रुपये शेर झाला म्हणजे दोन तोळ्याने पोट भरते आणि रुपया शेर मिळाला तरी अच्छेर खाऊ शकतो असेही नाही. असे जर आहे तर मागणी आणि पुरवठ्यावरून वस्तूचे मूल्य ठरविणे अनैसर्गिक आहे. आणि त्यामुळेच ज्याला शोषण म्हणतात, लुबाडणूक म्हणतात त्यात वाढ होते, अस्वास्थ्य वाढते, संघर्ष पेटतो. नीतीला प्रतिष्ठा असेल, तिच्या मर्यादांचे पालन करणे आवश्यक आहे असे वाटत असेल, शासन दक्ष आणि कार्यक्षम असेल तरच वाणिज्यावर–व्यापारावर नियंत्रण राहते. आणि समाजजीवन सुखी–समाधानी राहू शकते. पण आज हे सगळे उलटे–पालटे झालेले आहे. व्यापार प्रामाणिक राहिला नाही. तो नुसताच महाग झालेला नाही, तर भेसळ, खोटे माप आणि चोरट्या वस्तू यांनी बरबटलेला आहे. पन्नास–साठ वर्षांपूर्वीच्या जुन्या पिढीतल्या व्यापाऱ्यांना विचारा. पोत्यामागे रुपया आठ आणे सुटले तरी पुष्कळ झाले असे ते मानीत असत. आज ते प्रमाण सत्तर–ऐंशी रुपयांहूनही वाढले आहे. एवढा लाभ झाल्यावाचून व्यापारी व्यापार करीतच नाही म्हटले तरी चालेल. असे का विचारले, तर तो म्हणतो – ''असे करू नको तर काय करू? जकात, विक्रीकर (सेल्सटॅक्स), आयकर (इन्कमटॅक्स), संमतीपत्रे (परमीट), अधिकारपत्रे (लायसेन्स), पुढाऱ्यांचे, मंत्र्यांचे स्वागत, सत्कार, निवडणुकीला देणग्या इत्यादी सर्व आमच्याच बोकांडी बसत असते. या प्रत्येक प्रकरणात न्यायापेक्षा तुष्टीकरणाचा अवलंब करावा लागतो. व्यापाराकरिता प्रचंड भांडवल गुंतवावे लागते. त्याचे अठरा टक्क्यांपेक्षा अधिक व्याज द्यावे लागते तरच भांडवल उभे राहते. अशा स्थितीत आम्ही प्रामाणिक कसे राहावे सांगा.'' मग या परिस्थितीचा लाभ उठवून व्यापारीही सापडेल त्या संधीत हात धुऊन घेतो. भोवतालचे सगळेच बिघडलेले असताना, आपण जे करतो यात काही बिघडते असे त्यास वाटत नाही.

वैश्याचा व्यवसाय हा शरीरातील पोट आणि हृदय या अवयवांच्या

कामासारखा आहे. त्यातच विकृती निर्माण झाली की शरीराची कार्यक्षमता आणि आरोग्य बिघडणारच. म्हणून वर्णव्यवस्था आपापल्या मर्यादांचे अतिक्रमण करणार नाही आणि आपापली कर्तव्ये योग्य रीतीने पार पाडील अशी दक्षता घेतली गेली पाहिजे. तात्त्विक पातळीवर हे जर खरोखरीच पटले तर प्रत्यक्ष व्यवहारामध्ये ते आणण्यास अवघड जाणार नाही. थोडा विलंब लागेल इतकेच. सुधारणेच्या दृष्टीने तसे होणारच. ते इष्टही आहे.

परिचर्या हे शूद्राचे कर्म सांगितले आहे. शारीरिक श्रम आणि कौशल्य यांच्या बळावर व्यक्ती आणि समाज यांच्या उपयोगाची कामे करीत राहणे म्हणजे परिचर्या. यात मानहानी होते असे समजण्याचे तत्त्वत: कारण नाही. केवळ शब्दांचाच विचार केला तर अगदी राजपत्रित अधिकाऱ्यालाही (गॅझेटेड् ऑफिसर) सेवक, सर्व्हंट असेच संबोधिले जाते. मग तो आय. सी. एस. असो की आय्. ए. एस्. असो. या सन्माननीय वाटणाऱ्या पदव्या वा परीक्षातही शेवटी सर्व्हंट, सेवक हाच शब्द आहे. तेव्हा सेवा हे शूद्राचे कर्म आहे म्हणण्यात, त्यांना अपमानाने वागविले जाते, असे समजण्याचे कारण नाही. समाजधारणेसाठी अध्यापन, संरक्षण, व्यापार ही कामे जशी महत्त्वाची, तशीच सेवाही महत्त्वाचीच आहे. गवंडी, सुतार, शिंपी, कोष्टी, लोहार, चांभार हे सर्व समाजाची सेवाच करीत असतात. आणि ती प्रत्यक्ष स्वरूपाची आहे. आज तर शिक्षक असोत की सैनिक असोत, त्याच्या व्यवसायाला आपण सेवा म्हणूनच संबोधितो.

वर्णव्यवस्थेत उच्चनीचतेच्या वा मानापमानाच्या कल्पना शिरल्या आणि त्यांचाही अतिरेक झाला. हा दोष आहे, तो नाहीसा केला पाहिजे, काढून टाकला पाहिजे. मुळात या श्रेष्ठ-कनिष्ठतेचे स्वरूप जे होते ते फार सौम्य आणि मर्यादित होते. सोय-सवड हीही प्रत्येक वर्णाला उपलब्ध होती. आणि प्रत्येक वर्णाला काही बंधनांचे पालन करावे लागत असे. या बंधनांच्या स्वरूपात थोडे अंतर आहे. आणि ते तसे असणे समाजाच्या दृष्टीने आवश्यकही आहे. ब्राह्मण-क्षत्रियांवर असणारी बंधने अधिक नैतिक आहेत, तर वैश्य-शूद्रांवर असणारी बंधने अधिक व्यावहारिक आहेत. त्यामुळे वरवर विचार करता ही व्यावहारिक बंधने अधिक जाचक वाटतात. आणि तो अन्याय झाला आहे असे भासते.

वैश्य-शूद्रांची जी कर्मे आहेत ती जीवनाच्या प्रत्यक्ष धारणेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आणि अपरिहार्यपणे आवश्यक अशी आहेत. ब्राह्मण संपावर गेला तर लगेच काही बिघडणार नाही. पण शेतकरी संपावर गेला तर मात्र उपाशी मरावे लागेल. म्हणून शेतकऱ्याची सेवा ही अत्यावश्यक सेवा आहे. त्याचा संपावर जाण्याचा अधिकार काढून घेतला पाहिजे. आजही अत्यावश्यक सेवेतील लोकांनी संपावर जाता कामा नये असे शासकीय निर्बंध आहेत.

ब्राह्मणाच्या पाठीमागे पाप-पुण्य कल्पनेचा जितका जाच आहे, तितका तो शूद्राच्या मागे नाही. *'शूद्रे नास्तीह पातकम्'* इतकी सवड शूद्राला उपलब्ध आहे. नैतिक अपराधाच्या दृष्टीने ब्राह्मणाला शूद्रापेक्षा साठपट किंवा त्याहूनही अधिक शिक्षा सांगितली आहे. सामान्य माणसापेक्षा राजाला हजारपट शिक्षा सांगितली आहे.

हे सर्व नीट लक्षात घेतले म्हणजे चातुर्वर्ण्य व्यवस्थेचा सहानुभूतिपूर्वक विचार करणे शक्य आहे असे म्हणता येईल. एखाद्या व्यवस्थेतील दोष काढून टाकणे निराळे आणि काही दोष आहेत म्हणून ती व्यवस्थाच नाकारणे निराळे. व्यवस्था नाकारणे हे फार अडचणी निर्माण करते. पूर्वीची सर्व व्यवस्था क्रांतीच्या नावाने नाहीशी करून संपूर्ण नवीन व्यवस्था आम्ही निर्माण करतो, ती न्याय्य आणि सुखावह असेल, अशी घोषणा ज्यांनी ज्यांनी केली, त्यांची त्यांची ती प्रतिज्ञा फोल ठरली आहे. अत्यंत क्रूर आणि व्यापक हिंसेचा अवलंब करूनही साठ-सत्तर वर्षांच्या दीर्घकालातही साम्यवादी राजवटी अपयशी ठरल्या आहेत. आपल्या विचारसरणीचाच पुनर्विचार करणे त्यांना भाग पडले आहे. यावरून आपणही काही बोध घेऊ शकतो, असे मला वाटते. काही वर्षांपूर्वी रशियामध्ये स्त्रियांनी आम्हाला कामावर जाण्याची सक्ती असू नये, अशी मागणी सामुदायिकरीत्या केली होती. नवरा जर चांगला मिळवता असेल तर आम्ही घराबाहेर पडून काम केलेच पाहिजे असा आग्रह का? असा प्रश्न त्यांनी विचारला होता. त्या महिला घरात राहू इच्छितात आणि आमच्याकडे स्त्रियांनी घराबाहेर पडले पाहिजे असा प्रचार होतो आहे. हे सर्व गोंधळ निर्माण करणारे आहे. यातून काही धूर्तांचा लाभ होतो. समाजाच्या सरळपणाचा, भोळेपणाचा फायदा घेऊन ते पुढारी होतात, प्रतिष्ठा मिळवतात. त्यांचा स्वार्थ साधतो. संपत्तीच्या बळावर सत्ता आणि सत्तेच्या बळावर त्यांना

अमाप संपत्ती गोळा करता येते. पण त्यामुळे समाजाचे काही भले झाले आहे, असे मात्र दिसत नाही. एक संस्थानिक मला एकदा म्हणाले – ''अनंतराव! आम्ही नऊ पिढ्या राज्य केले. पण आज मी जितका श्रीमंत आहे त्यापेक्षा या लोकराज्य म्हणविल्या जाणाऱ्या व्यवस्थेत पाच–दहा वर्षात अधिक संपत्ती मिळणारे पुढारी सत्तेवर आहेत. मान्यताप्राप्त आहेत.''

पेशवाई हा काही चातुर्वर्ण्यव्यवस्थेचा आदर्शकाल नव्हे. उलट पेशवाईचा उत्तरार्ध तर मोगलाई बरी म्हणण्याचा प्रसंग आणणारा होता. पण त्याही काळात जातीविद्वेष आजच्याइतका उग्र झालेला नव्हता आणि ब्राह्मण पेशवे सत्ताधारी असतानाही ब्राह्मणेतर सरदारांची संस्थाने संख्येने पुष्कळ, आकाराने मोठी आणि अधिक श्रीमंत होती. ब्राह्मण सरदार त्या मानाने थोडे आणि लहान होते. आजच्या जातीजातीतील द्वेषाच्या पार्श्वभूमीवर हा इतिहास लक्षात घेणे आवश्यक आहे.

चातुर्वर्ण्यव्यवस्था चांगली खरी, पण ती केवळ तात्त्विकदृष्ट्या चांगली ठरून चालत नाही. तिचे चांगुलपण व्यवहारात उतरावे लागते. तरच ती चांगली ठरते आणि त्यासाठी प्रत्येक व्यक्तीने आपापल्या वर्णानुरूप प्राप्त झालेल्या विहित कर्माचे किंवा स्वीकारलेल्या व्यवसायाचे आचरण निष्ठेने करावे लागते. पुढील श्लोकातून हाच विषय भगवान् स्पष्ट करून सांगत आहेत.

**स्वे स्वे कर्मण्यभिरत: संसिद्धिं लभते नर: ।**
**स्वकर्मनिरत: सिद्धिं यथा विन्दति तच्छृणु ।।४५।।**

आपापली कर्मे जीव ओतून केली म्हणजे त्या व्यक्तीला चांगली सिद्धी प्राप्त होते. स्वकर्मामध्ये गढून गेलेल्याला सिद्धी कशी प्राप्त होते ते सांगतो. ते ऐक.

फार प्राचीन काळी, स्वकर्म म्हणजे स्वत:चे कर्तव्य, स्वत:चा उद्योग, व्यवसाय हे सर्व चातुर्वर्ण्यव्यवस्थेप्रमाणे जन्मासवेच प्राप्त होत असे. आश्रमव्यवस्थेप्रमाणे त्यात काही अंतर पडे पण त्याचे स्वरूप मर्यादित असे. आज चातुर्वर्ण्यव्यवस्था आपल्या चांगल्या स्वरूपात उरलेली नाही. ती जातीच्या स्वरूपात विवाहसंबंधापुरती मर्यादित राहिली आहे. तेवढी टिकली तरी पुष्कळ झाले असे म्हणायची वेळ आलेली आहे. जातीच्या स्वरूपात

का होईना पण वर्ण शुद्ध राहिले तर चातुर्वर्ण्यव्यवस्था पुन्हा आपल्या शुद्ध आणि श्रेष्ठ स्वरूपात प्रस्थापित करणे, वंशशुद्धतेच्या आधारावर सोपे जाईल, आणि तसे व्हावे अशी आस्था तरी उरेल. कारण वर्णव्यवस्था मोडली, त्याला फार दीर्घकाळ लोटला. वर्णव्यवस्थेच्या पतनाची बीजे महाभारतकालीच दिसून येतात. तेव्हा आज तरी *''स्थितश्चगतिश्चिंतनीया''* या दृष्टीनेच आहे त्या परिस्थितीत विहित कर्माचा वा कर्तव्याचा विचार करावा लागेल. आज एखाद्याने व्यवसाय स्वीकारताना वर्णाचा विचार काटेकोरपणे केला नाही, तरी काही मर्यादा पाळणे आवश्यक आहे असे मला वाटते. उदा. मद्यमांसाची विक्री ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य या वर्गातील व्यक्तींनी तरी करू नये. तसेच कोणत्याही व्यवसायात प्रामाणिकपणाचा अवलंब वैश्याकडून ब्राह्मणाकडे चढत्या प्रमाणात असावा. मग जो व्यवसाय, जो उद्योग तुम्ही स्वीकाराल तो प्रामाणिकपणे करीत रहा. आवडीने करीत रहा. निष्ठेने करीत रहा. भगवंतांनी कर्माच्या संदर्भात अभिरत हा शब्द वापरला आहे. त्यात आवड, प्रामाणिकपणा, निरलसता इत्यादी भाव सहजपणे समाविष्ट होतात. मग कोणतेही कर्म अशा रीतीने केले की ते सिद्धी प्राप्त करून देणारे ठरते, त्यामुळे श्रेयाचा लाभ होतो, असे भगवंतांनी सांगितले आहे.

स्वकर्मामध्ये जसा उद्योग-व्यवसायाचा समावेश होतो तसाच इतरही काही कर्तव्यकर्माचा समावेश होतो. पोटा-पाण्याच्या उद्योगासवे सर्व कर्तव्यकर्म संपते हे खरे नाही.

मनुष्य अनेक प्रकारच्या संबंधाने कुल, जाती, वर्ण, धर्म, प्रांत, राष्ट्र यादृष्टीने इतरांशी जोडलेला असतो. आणि त्या त्या संबंधानुरूप त्याची कर्तव्यकर्मे ठरलेली असतात. ती वर सांगितलेल्या कुलादिक्रमाने एकापेक्षा एक व्यापक क्षेत्रातील असतात. तेव्हा व्यापक होत जाणाऱ्या क्षेत्रातील कर्तव्यकर्माला बाध न येता माणसाने आपल्यावर असणारे सर्व प्रकारचे दायित्व योग्य रीतीने सांभाळावे लागते.

कुळातही माता-पिता, कन्या-पुत्र, बंधू-भगिनी, पती-पत्नी या नातेसंबंधातून निर्माण होणारी कर्तव्यकर्मे प्रत्येकाला पार पाडायची असतात आणि तसे करीत असताना दुसरा कसे वागतो यापेक्षा आपण योग्य ते करतो की नाही, हे लक्षात घेऊनच वागावे लागते. असे करणे, असे वागणे म्हणजे

स्वकर्मनिरतता. या मार्गाने सिद्धी का व कशी मिळते ते भगवान् पुढील श्लोकातून सांगत आहेत.

**यतः प्रवृत्तिर्भूतानां येन सर्वमिदं ततम् ।**
**स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विन्दति मानवः ।।४६।।**

ज्याच्यापासून सर्व भूतमात्रांची (सृष्टीची) उत्पत्ती झालेली आहे आणि जो सर्व विश्वाला व्यापून राहिला आहे, त्या ईश्वराची पूजा जो स्वकर्माने करतो त्या मनुष्याला सिद्धी प्राप्त होते.

या श्लोकावर भाष्य करताना श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी फार सुंदर, बोधप्रद अशी सर्व ओवी लिहिलेली आहे. *''तया सर्वात्मका ईश्वरा । स्वकर्मकुसुमांची वीरा । पूजा केली होय अपारा । तोषालागी ।।''* (ज्ञाने. १८/९१७) श्रीज्ञानेश्वरमहाराज नुसते स्वकर्म असे न म्हणता स्वकर्मरूप फुले असे म्हणतात. वनस्पतीच्या अंगोपांगांपैकी फूल हे सर्वात अधिक सुंदर, आकर्षक, निरनिराळे मनोहर रंग धारण करणारे कोमल, सुगंधी असे असते. त्यात मध असतो, आणि तेच फळाचे जनक असते. कर्माला फूल म्हणण्यात फुलाचे हे सर्व वैशिष्ट्य लक्षात आणून द्यायचे आहे. आपल्या कर्माचे स्वरूप फुलाप्रमाणे असते का? याचा निर्णय ज्याचा त्याने घ्यायचा आहे. कुणी शिकवण्याचे कर्म करीत असेल तर त्याचे ठिकाणी त्या विषयाचे ज्ञान आणि तो विषय शिकवण्याचे कौशल्य चांगले असले पाहिजे. त्याने स्वतःचे ज्ञान मलिन होणार नाही आणि वाढत राहील या दृष्टीने अभ्यासू वृत्तीने राहिले पाहिजे, बहुश्रुतता वाढविली पाहिजे. विद्यार्थ्याविषयी त्यास प्रेम असले पाहिजे. शिकविण्यात आस्था असली पाहिजे; म्हणजे त्याचे अध्यापन हे कर्मफुलासारखे भगवंताच्या पूजनासाठी योग्य ठरेल. आणि या अध्यापनामध्ये तो जितक्या निःस्वार्थ बुद्धीने, जितक्या निष्काम भावनेने वागेल तितक्या प्रमाणात त्याचे पूजन योग्य प्रतीचे ठरेल. कोणताही व्यवसाय, धंदा, नोकरी हे सर्व याच दृष्टीने पाहिले पाहिजे. यात राजकारण, पुढारीपण, समाजकार्य इत्यादी सर्व गोष्टी येतात. कर्मातील कौशल्य हे स्वकर्मकुसुमांचे सौंदर्य आहे. प्रामाणिकता हा या फुलाचा सुगंध आहे. तत्परता ही या फुलाची कोमलता आहे. प्रेम, आस्था हा या फुलातील मध आहे, आणि निःस्वार्थ, निष्कामता

यांच्यामुळे हे फूल पूजनाच्या योग्यतेचे ठरते.

ईश्वर वस्तुत: सर्वात्मक आहे. तेव्हा त्याच्या पूजेसाठी लागणारी फुले ही अशी स्वकर्माचीच असावी लागतात. आपण गंध, फूल, पाणी यांनी जी पूजा करतो ती खरी तर केवळ प्रतीकात्मक आहे.

मूर्तीत देव नाही असे म्हणणे हे एका टोकाचे अज्ञान आहे. तथाकथित बुद्धिवादी हे या टोकावर उभे आहेत. मूर्तीतच काय तो देव आहे, मूर्ती म्हणजेच देव आहे असे मानणे हे दुसऱ्या टोकाचे अज्ञान आहे. कर्मकांडी, तथाकथित धार्मिक या टोकावर उभे आहेत.

मूर्तिपूजा ही साधना अवश्य आहे, पण तिची यथार्थता स्वकर्मपुष्पाच्या समर्पणाने प्रगट व्हायची असते. ती प्रतीकात्मक आहे हे लक्षात घेतले नाही तर ते केवळ कर्मकांड ठरेल. ते अडाणीपणाचे आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराजांसारख्या संतश्रेष्ठांनी *''अवजानन्ति मां मूढा: मानुषीं तनुमाश्रितम् । परं भावमजानन्तो मम भूतमहेश्वरम् ।।''* (गीता ९/११) या श्लोकावरील भाष्यात फार बोधप्रद रीतीने या अडाणीपणाचा उपहास केला आहे.

श्रीनामदेव महाराजांच्या चरित्रातील एक प्रसंग या दृष्टीने लक्षणीय आहे. भक्त म्हणविणारांनाही सगुण-साकाराचे प्रेम असते, आकर्षण असते. ते स्वाभाविक आहे, उपयुक्त आहे, आवश्यकही आहे. पण ती परिपूर्णता नाही. श्रेष्ठ भक्तिमार्गातीलही ती न्यूनताच आहे. श्रीनामदेवांची योग्यता मोठी. ते थोर भक्त. आईने मुलाशी वागावे तसे देव नामदेवांशी वागत. त्यांचे लाड करीत, हट्ट पुरवीत. त्यांच्या लडिवाळपणाचे देवाला कौतुक वाटे. कीर्तनामध्ये नामदेवांच्या साथीला देव उभे राहत. मागे राहून टाळ वाजवीत. नामदेवांचा हा एवढा अधिकार असतानाही त्यांना श्रीसंत गोरोबांनी श्रीज्ञानदेवादी संतांच्या सभेत कच्चा ठरविले होते. त्यांनी रोषाने देवालाच त्याचे कारण विचारले. तेव्हा देव म्हणाले, 'तू माझा भक्त आहेस, पण तुला माझी व्यापकता अजून कळली नाही. त्यासाठी गुरूला शरण जा. म्हणजे तुला माझ्या सर्वात्मकतेचे यथार्थ ज्ञान होईल.' स्वकर्माने पूजा घडते ती सर्वात्मक अशा ईश्वराची. मूर्तीची नव्हे.

जन्माला आलेल्या माणसाला जीवनासाठी काही ना काही उद्योग करावा लागतोच. पण हे करीत असताना तो आपले दायित्व ओळखीत

नाही. कर्तव्याची भावना ठेवीत नाही. कोणत्याही प्रकारे स्वार्थ साधणे एवढे एकच त्याचे उद्दिष्ट असते. मग सरकारी अधिकारी लाच खाईल, व्यापारी फसवील, मजूर कामचुकारपणा करील, सामाजिक कार्यकर्ता आपले पुढारीपण टिकवण्यासाठी संघटनेचा दुरुपयोग करील, कोणत्या ना कोणत्या प्रकारची सत्ता असलेला अडवणुकीचे धोरण अवलंबील, भिक्षुकी करणारा केवळ दक्षिणेवर दृष्टी ठेवील, कर्म यथासांग करणार नाही, महंत दांभिकपणे वागेल, तर ती ती कर्मे कधीही फुले ठरणार नाहीत. मग ईश्वरपूजनासाठी त्यांचा उपयोग होणे दूरच राहिले. अशी अप्रामाणिकपणे केली जाणारी कर्मे हा अपराध आहे. ती पापरूप आहेत. त्यामुळे माणसाचा अध:पात होतो. समाजाचे स्वास्थ्य बिघडते. त्यामुळे ऐहिक उन्नती–प्रगतीही दुरावते. परमार्थ तर दूरच राहिला.

गंध, फूल हे उपचार जसे उचलून देवाला वाहता येतात, तसे काही स्वकर्माचे होत नाही. स्वकर्माच्या मागची भावना जितकी निरहंकारी, जितकी नि:स्वार्थी तितक्या प्रमाणात स्वकर्म हे ईश्वरार्पण होत असते आणि त्यामुळेच मनुष्याला सिद्धी मिळत असते.

येथे सिद्धी या शब्दाचा अर्थ योगशास्त्रातील सिद्धीप्रमाणे चमत्कार करण्याचे सामर्थ्य असा नाही. येथील सिद्धी हा शब्द श्रेयोरूप आहे. आत्मकल्याण, आत्मज्ञान, ईश्वरी साक्षात्कार, हे तिचे स्वरूप आहे. स्थितप्रज्ञ होणे, गुणातीत होणे, ईश्वराला प्रिय असा भक्त होणे, हे येथील सिद्धीचे स्वरूप आहे. हा सिद्धीला प्राप्त झालेला पुरुष 'ब्रह्मविद्' असतो, 'ब्रह्मणिस्थित' असतो. म्हणजे ब्रह्माला जाणतो; ब्रह्मातच राहतो. व्यवहारात वागताना तो मनासारखे घडल्याने उचंबळून येत नाही वा मनाविरुद्ध घडल्याने विषण्णही होत नाही, तो कशालाही भुलत नाही. कधी मोहित होत नाही. त्याची बुद्धी नेहमी स्थिर असते, निष्ठा अचल असते, मन समाधानी व प्रसन्न राहते.

स्वकर्माने निष्ठापूर्वक पूजा केली, योग्य रीतीने केली म्हणजे त्याला एवढे दिव्य फल प्राप्त होते. परिस्थितीवशात् हे स्वकर्म स्थूलदृष्टीने सदाचरणात, पुण्यकृत्यात मोडणारे नसले तरी ते स्वकर्म उन्नतीला नेणारे, परिणामी हिताचे ठरते.

महानंदा एक वेश्या होती. वेश्या व्यवसाय हा एक अगदी हीन व्यवसाय आहे. तरीसुद्धा एका विशिष्ट नियमाचा निष्ठेने अवलंब केल्यामुळे महानंदाही

उद्धरून गेली. तिची शिवभक्ती तिला साहाय्यभूत ठरली. सद्भक्त म्हणून शिवलीलामृतासारख्या पवित्र ग्रंथात तिची कीर्ती गायिली गेली.

कबीरांची एक गोष्ट सांगतात. कबीर एक श्रेष्ठ संत, स्पष्टवक्ते. श्रीतुकाराम महाराजांसारखे फटकळपणे बोलणारे. त्यांनी एकदा चोरी करणे किती वाईट आहे हे एका प्रसंगी सांगितले. त्यांच्या प्रवचनाला एक चोर योगायोगाने उपस्थित होता. कदाचित जमणारी दाटी पाहून हात मारण्यासही तो आला असेल. पण कबीरांच्या वाणीने तो प्रभावित झाला. त्याला आपल्या कुकर्माकरिता फार वाईट वाटले. खिन्न होऊन तो कबिरांना भेटला आणि म्हणाला – ''महाराज, चोरी करणे वाईट आहे हे मला पटले. पण दुसरे मी काय करू? माझ्या तीन पिढ्या चोरांच्याच आहेत. मला दुसरा काही व्यवसाय येत नाही. या उतारवयात नवे काही शिकताही येणार नाही. तसेच मजुरी करून पोट भरण्याची शक्तीही आता राहिलेली नाही. कुटुंबाचाही भार माझ्यावर आहे. तेव्हा आता काय करू? आपणच मार्ग दाखवा. भीक मागणे शक्य आहे, पण तिची लाज वाटते.'' कबीरांना त्याच्या प्रामाणिकपणाचे कौतुक वाटले. ते म्हणाले, ''ठीक आहे. करीत जा चोरी!'' तो म्हणाला, ''महाराज, परवा तर आपण चोरीची निंदा केलीत.'' ''हो! चोरी वाईटच आहे.'' ''मग मला कशी करावयास सांगता?'' ''तुझ्या परिस्थितीत दुसरा मार्ग नाही म्हणून. मात्र एक नियम पाळ. तुझ्याइतका वा तुझ्यापेक्षा जो दरिद्री आहे त्याच्याकडे चोरी करू नकोस आणि तुला व तुझ्या कुटुंबाला आठ दिवस पुरेल इतकी सामग्री असताना चोरी करू नकोस.'' चोराची वृत्ती पालटत गेली. अशाच एखाद्या चोराला उद्देशून संस्कृतमध्ये चांगला श्लोक आहे.

*''वासः खंडमिदं प्रयच्छ यदि वा स्वाङ्के गृहाणार्भकं ।*
*रिक्तं भूतलमत्र नाथ भवतः पृष्ठे पलालोच्चयः ।।*
*दंपत्योरिति जल्पतोर्निशि यदा चोरः प्रविष्टस्तदा ।*
*लब्धं कंबलमन्यतः तदुपरि क्षिप्त्वा रुदं निर्गतः ।।''*

बायको नवऱ्याला म्हणत होती की, अहो! एखादा कापडाचा तुकडा खाली अंथरा किंवा थोडा वेळ या लेकराला तुमच्या मांडीवर घ्या. जमिनीवर काही नाही; तिला थोडी ओल आहे. निदान तुमच्यामागे कडब्याची पेंडी आहे ती तरी खाली पसरा. त्याच वेळी त्याच्या घरात चोर शिरला होता. त्याने

त्या बाईची केविलवाणी भाषा ऐकली. त्याने कुठून तरी एक कांबळे चोरून आणले होते तेच त्या जोडप्यापुढे टाकले आणि तो अश्रू गाळीत मुकाट्याने बाहेर पडला. नियम कटाक्षाने पाळण्यासाठी निष्ठा असावी लागते. अशी निष्ठा माणसाच्या अंत:करणातील सद्भाव जागृत करते आणि हा सद्भाव माणसाच्या उन्नतीचा मार्ग मोकळा करीत असतो.

कर्तव्य पार पाडण्यासाठी आवश्यक तर आपद्धर्म म्हणून अकार्य करण्याचीही अनुज्ञा मनूने दिली आहे.

तात्पर्य असे की, कर्तव्यकर्म प्रामाणिकपणे पार पाडणे याच्याइतके आत्मोद्धाराचे दुसरे चांगले साधन नाही. भगवंताच्या पूजेसाठी याहून अधिक योग्य असा दुसरा उपायही नाही. पंचामृताच्या अभिषेकाने वा सुवासिक गंधफुलाच्या समर्पणाने देवाला संतोष होत नाही. पण स्वकर्म-कुसुमांनी केलेली पूजा मात्र ईश्वराला अपार संतोष देते असे वर्णन श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी केले आहे. कर्तव्यकर्म प्रामाणिकपणे केलेले असावे. त्यात आळस नसावा. स्वार्थ नसावा. कोणाची फसवणूक नसावी. त्याने कोणाचा छळ होऊ नये. कोणास कसली हानी पोहोचू नये. मग असे कर्तव्यकर्म भगवंताचे पूजन ठरते. माणसाची उन्नती साधून देते.

**श्रेयान्स्वधर्मो विगुण: परधर्मात्स्वनुष्ठितात् ।**
**स्वभावनियतं कर्म कुर्वन्नाप्नोति किल्बिषम् ।।४७।।**

स्वधर्माचे पालन अवघड वाटले तरी आचरण्यास सोयीच्या वाटणाऱ्या परधर्मापेक्षा स्वधर्मच श्रेयस्कर समजला पाहिजे. जे कर्म स्वभावत: नियत (स्वधर्मानुरूप) असते, (ते कसेही असले तरी) ते करण्यामुळे पाप लागत नाही.

गीतेच्या तिसऱ्या अध्यायातही भगवंतांनी स्वधर्माची श्रेयस्करता अधिक आग्रहाने सांगितली आहे (३/३५). पहिली ओळ येथे आणि तेथे सारखीच आहे. पण दुसऱ्या ओळीत मात्र तिसऱ्या अध्यायामध्ये जाज्वल्य निष्ठेचा भाव व्यक्त झाला आहे. स्वधर्मात राहून मरण पत्करण्याचा प्रसंग आला तरी तो स्वीकारावा, पण परधर्म पत्करू नये. परधर्म हाच अधिक भयावह आहे, कारण त्यामुळे सर्वनाश घडून येतो.

छत्रपती संभाजी, गुरू तेगबहाद्दर, बंदा बैरागी यांनी स्वधर्माकरिता असे वीर– मरण स्वीकारले आहे. त्यांचे हे मरण मृत्यूलाही भीषण वाटावे असे भयानक होते. झोपेच्या गोळ्या खाऊन किंवा डोहात बुडी मारून आत्महत्या करण्याइतके ते सोपे नव्हते. कातडी सोलली जात होती. डोळे फोडले जात होते. लाल तापलेल्या लोखंडाच्या फाळाने अंगावरील मांस जाळले जात होते. तरीही ते धैर्यशील पुरुष डगमगले नाहीत. ''स्वधर्मे निधनं श्रेय:'' यासाठी याच्याइतके उदात्त उदाहरण क्वचितच आढळेल.

आपल्या नेत्यांच्या भोंगळपणामुळे, स्त्रैणपणामुळे, घाबरटपणामुळे आणि सत्तेच्या लोभामुळे भारताची फाळणी झाली. सहस्रावधी हिंदूंना आपले घरदार, क्वचित बायका–मुले यांना मुकूनही निर्वासित व्हावे लागले; पण त्यांनी धर्मांतर केले नाही. ''परधर्मो भयावह:'' याची पूर्ण जाणीव त्यांनी बाळगली.

भगवंताचे तिसऱ्या अध्यायातील बोलणे अठराव्या अध्यायातील या वचनाच्या मानाने कडोविकडीचे असले, निष्ठेची अतिकठीण परीक्षा घेणारे असले तरी त्याप्रमाणे वागण्याची श्रद्धा असणारे लोक असतात हे वरील उदाहरणावरून लक्षात येईल. आपल्या दैनंदिन जीवनात इतक्या कठोर कसोटीला सामोरे जाण्याचा प्रसंग सहसा येत नाही हे खरे असले तरी ''श्रेयान् स्वधर्मो विगुण: परधर्मात्स्वनुष्ठितात्'' हे लक्षात ठेवून तशी श्रद्धा आपण जीवनात जोपासली नाही, तर साधारण प्रसंगाच्या आघातानेही आपण कोसळून जाऊ. श्रेयाला, हिताला मुकू. म्हणून भगवंतांच्या या वचनातील सिद्धांत आदर्श म्हणून सदैव लक्षात ठेवला पाहिजे.

सोयीचा नाही अडचणीत टाकणारा आहे, तर त्याला स्वधर्म कशाला म्हणायचे? असा प्रश्न विचारण्यात अर्थ नसतो. प्रत्येक स्वधर्म हा सोयीचाच असतो आणि प्रत्येक स्वकर्म हे सुखाचेच असते असे नाही. कारण तसे असते तर श्रेय आणि प्रेय यांचे द्वंद्व निर्माणच झाले नसते. प्रेयाची सांगड सुखाशी आणि श्रेयाची सांगड हिताशी आहे हे लक्षात घ्यावे लागते. खाद्यपदार्थ चवीला चांगला असावा का आरोग्याच्या दृष्टीने हितावह असावा, याचा विचार जसा विचारी माणसाला करावाच लागतो तसा स्वधर्माचाही विचार केला पाहिजे.

व्यवहारात बहुतेक सर्व विचार धनेषणा, दारेषणा, लोकेषणा यांच्या माध्यमातून केला जातो. पण हा विचार प्रेयाचा आहे. बरे वाटते, सुखावह

वाटते त्याचा आहे. श्रेयाचा विचार यापेक्षा वरच्या पातळीवरचा विचार आहे. तेथे धनेषणा इत्यादींमुळे जे वर्तन घडते ते व्यक्ती, कुटुंब, समाज, राष्ट्र यांच्या हिताला विरोधी जाणार नाही याचा विचार करावा लागतो. हा विचार करणे म्हणजेच श्रेयाचा विचार करणे आहे.

श्रेय हे बव्हंशी प्रामाणिक राहते, एकरूप असते. दोन हितांमध्ये कधीही संघर्ष उत्पन्न होण्याची शक्यता नाही. प्रेय मात्र बहुधा याच्या उलट असते. तेथे नियम म्हणून काही सांगता येत नाही. ममत्वामुळे प्रिय वाटते म्हणावे तर तसेही नसते. ''आपला तो बाळ्या आणि लोकांचे ते कारटे'' हे जसे खरे तसे ''जावई माझा भला आणि लेक बाइलबुद्ध्या झाला'' हेही खरेच. मुलगाही आपलाच आणि मुलगीही आपलीच. मग असे अंतर का पडावे? प्रेय अप्रामाणिक असते म्हणूनच असे घडते. यासाठीच प्रेयाला विश्वसनीय मानू नये. विश्वास श्रेयावर ठेवावा. पण असे होत नाही.

स्वत:च्या वाट्याला आलेल्या कामापेक्षा दुसऱ्याकडे सोपविलेले काम सोयीचे वाटते. एखादे काम कितीही उपयुक्त असले तरी ते प्रतिष्ठेचे नाही, असे वाटले तर करावेसे वाटत नाही. उदाहरण म्हणून जेवणाच्या पंक्तीचा विचार केला तर हे लक्षात येईल. चटणी-मीठ वाढणे सोपे, पण प्रतिष्ठेचे नाही. पक्वान्ने वाढणे प्रतिष्ठेचे, पण सोपे नाही. तूप वाढणे सोपे आणि प्रतिष्ठेचेही. पाणी वाढणे सोपेही नाही आणि प्रतिष्ठेचेही नाही. उष्टी काढणे अवघड पण प्रतिष्ठेच्या अगदी विरोधी. आता केवळ प्रेयाचा विचार केला म्हणजेच केवळ सोयीचा वा प्रतिष्ठेचा विचार केला आणि सगळ्यांनी तेवढीच कामे करीन असे ठरविले तर पंगत यशस्वी होण्याची शक्यताच नाही. भोजन-समारंभ उत्तम रीतीने पार पडावा अशी इच्छा असेल तर वाट्यास येईल ते काम वा आपणांस शारीरिकदृष्ट्या शक्य असेल ते काम निरलसपणे केले पाहिजे. तेथे सोय आणि प्रतिष्ठेचा विचार मनातून दूर ठेवला पाहिजे. येथे आपल्या वाट्यास आलेले काम हा स्वधर्म, असे समजले म्हणजे श्लोकाचा आशय लक्षात येईल.

मी हे समजावून देण्याकरिता सांगतो आहे. स्वधर्माची वा जेवणातील वाढपाची मी तुलना करतो वा त्यांना एकरूप समजतो असे मात्र कृपा करून समजू नका. स्वधर्माची व्यापकता मोठी असते. ती सर्व जीवनाला व्यापून राहते आणि तिचा संबंध मुख्यत: वृत्तीशी असतो. घटना वा कृती लहान-मोठी

कशीही असली तरी वृत्ती जर स्वधर्मनिष्ठ असेल, समतोल असेल, विवेकी असेल तर हातून घडणारे प्रत्येक कृत्य स्वधर्मानुकूलच असेल. त्या वृत्तीला परधर्माचे आकर्षण कधी वाटणारच नाही.

स्वधर्म विगुण वाटतो, सोयीचा वाटत नाही, सुखाचा वाटत नाही, अडचणीचा वाटतो, कष्टदायक वाटतो. यामागे मुख्यत: प्रेयाचे आकर्षण हे कारण असते. जे हिताचे तेच प्रिय वाटले असते तर स्वधर्म का परधर्म हा प्रश्नच उत्पन्न झाला नसता. प्रेय अप्रामाणिक असते हे सांगितलेच आहे. कित्येक वेळा तर केवळ साहचर्य वा सहवास अधिक काळ टिकला म्हणूनही जे एकदा प्रिय होते, प्रिय वाटत होते, त्याचाच कंटाळा येतो. एक सुभाषित आहे, थोडे विनोदी आहे.

*''आकारेण शशी गिरा परभृत: पारावतश्चुंबने ।*
*हंसश्चक्रमणे समं दयितया रत्या विमर्दे गज: ।।*
*एवं भर्तरि मे समस्तवनिताश्लाघ्यैर्गुणै: किञ्चन ।*
*न्यूनं नास्ति परं विवाहित इति स्यान्नेक दोषो यदि ।।''*

एका स्त्रीला तिच्या मैत्रिणीने विचारले, ''अगं! तुझे नवऱ्याशी अलीकडे पटत नाही असे ऐकले खरे का?'' ''हो''. ''कारण? काही दुर्गुण आहेत का?'' ''नाही ग, चांगले आहेत, सशक्त आहेत, देखणे आहेत, रसिक आहेत. पैसे चांगले मिळवतात. प्रेमळ आहेत. लोकांमध्ये चांगली प्रतिष्ठा आहे.'' ''इतके सगळे आहे तर मग बिघडले कुठे?'' ''खरं सांगू का? आमचे लग्न झाले आहे हाच एक मोठा दोष आहे.'' शेजाऱ्याची बायको अधिक चांगली, अशा अर्थाची एक इंग्रजी म्हण आहे. ''अतिपरिचयादवज्ञा'' असे वचन सगळ्यांना ठाऊक आहेच. आपले कल्याण साधून घ्यायचे असेल तर स्वधर्माच्या संबंधात तरी असे घडू नये.

जो स्वधर्म आपण वर्ण, जाती, कुल, संप्रदाय, परिस्थिती, आवड यांच्यामुळे पत्करला असेल, वाट्याला आला असेल तो पतिव्रतेच्या निष्ठेने स्वीकारून, त्याला अनुरूप अशी वागणूक दृढ निश्चयाने ठेवली पाहिजे. स्वधर्माचरण कसे करावे, यासंबंधात श्रीज्ञानेश्वरीतील वचन अगदी स्पष्ट आणि मार्गदर्शक आहे. *''पतीचिया मता । अनुसरोनि पतिव्रता । अनायासे आत्महिता । भेटेचि ते ।।''* (ज्ञाने. १६/४५६). पतीच्या इच्छेप्रमाणे वागले

की मग पतिव्रतेला आत्मोद्धारासाठी इतर काही करावे लागत नाही. *''नास्ति तासां पृथक्यज्ञ: न व्रतं नाप्युपोषणम् । पती शुश्रूषते येन तेन स्वर्गे महीयते ।।''* असे सीतेचे एक वचन आहे. श्रीज्ञानेश्वरीतील ओवी त्याप्रमाणेच आहे. व्रतनियम हे जीवनसत्त्वांच्या गोळ्यांसारखे आहेत. आहार चौरस असला आणि योग्य विहाराने चांगला पचला की जीवनसत्त्वाच्या वेगळ्या गोळ्या घ्याव्या लागत नाहीत. स्वधर्माचरणाचे तसेच असते. पण त्याप्रमाणे घडत नाही. आणि मग इतर प्रकारची धावपळ करावी लागते. असे होऊ नये म्हणून भगवान् आग्रहाने सांगत आहेत की, *''स्वभावनियतं कर्म कुर्वन्नाप्नोति किल्बिषम्''* स्वभावाने नियत झालेले कर्म, आपल्या वाट्याला आलेले काम कसेही असले तरी ते केलेच पाहिजे. प्रामाणिक कर्त्याला त्या कर्माचे काही दोष असतील तर ते लागतच नाहीत.

हत्याऱ्याला फाशी देणे हे न्याय्य आहे. समाजस्वास्थ्याच्या दृष्टीने ते आवश्यक आहे, इष्ट आहे. आता फाशीची शिक्षा देणारा न्यायाधीश, प्रत्यक्ष फाशी देणारा मांग, फाशी देणे हेच कसे योग्य आहे हे पटवून देणारा सरकारी वकील, अपराधाचे पुरावे गोळा करणारा आरक्षी (पोलिस) हे सगळे फाशी देण्याच्या कृत्यात सहभागी असले तरी ते सगळे निर्दोषी आहेत. समाजरक्षणासाठी आवश्यक ते कृत्य करीत असल्याने पुण्यवान आहेत.

आपल्या कर्माविषयीची ही धारणा जर मनुष्याच्या अंत:करणात पूर्णपणे नांदत असली तर व्यक्तीचे, समाजाचे, राष्ट्राचे सगळे कसे सुरळीत, छान चालेल. कसलीही भानगड निर्माण होणार नाही.

श्री. कृष्णमूर्ती जीव तोडून सांगतात की तुलना करू नका. (नो कंपॅरिझन.) ते लक्षात ठेवून आपल्या वाट्याला जे येईल ते नियत कर्म, विहित कर्म योग्य रीतीने करावे. ते चांगले, वाईट, सोयीचे, अडचणीचे, श्रेष्ठ-कनिष्ठ जसे असेल तसे असेल. ही भिन्नता वाटते ती दुसऱ्या कर्माशी, दुसऱ्याच्या कर्माशी तुलना केली जाते त्यामुळे वाटते. उथळ विचाराने वरवर पाहता वेगळेपणा दिसतो, पण परिणामाचा विचार करता ती सारखीच श्रेष्ठ, सारखीच महत्त्वाची असतात. ब्राह्मणाने श्रद्धेने यजन-याजन करणे आणि शूद्राने त्याला नमस्कार करणे हे दोन्ही, लाभणाऱ्या पुण्याच्या दृष्टीने सारखेच आहे असे श्री ज्ञानोबारायांनी म्हटले आहे - *''जैसा द्विज षट्कर्मे करी । शूद्र तयाते नमस्कारी । की दोन्हीसीहि*

*सरोभरी । निफजे यागु ।।''* (ज्ञाने. १६/९६). पण या सत्यकथनामुळेच श्रीज्ञानेश्वरांना दोष देणारे, त्या अत्यंत थोर महात्म्याविषयी अनादराचे उद्गार काढणारेही करंटे लोक या जगात आहेत. मनुष्याच्या अंत:करणातील रजोगुण–तमोगुण कसे बलवान असतात आणि ते त्याला सत्य कसे उमगू देत नाहीत, ते यावरून लक्षात येईल. स्वधर्माची महती निरनिराळ्या प्रकाराने पुन:पुन्हा द्यावी लागते ती यामुळेच.

कर्म एकदा स्वभावाने नियत झाले की मग ते जसे असेल तसे स्वीकारावेच लागते. वैद्यकीच्या शिक्षणात शरीराचे ज्ञान योग्य प्रकारे व्हावे म्हणून प्रेते फाडून अंगोपांगे कशी असतात, कुठे असतात, त्यांचे परस्परसंबंध कसे असतात ते सगळे निश्चित जाणून घ्यावे लागते. हे सगळे काम कंटाळवाणे आणि किळसवाणेही असते. मी तर त्याला गिधाडकामच म्हणत असे. प्रेते फाडलेल्या त्या हातांनी जेवायचे म्हणजे उबग येई. पण हे असे असले तरी अभ्यासाच्या दृष्टीने ते आवश्यक होते, करावेच लागते. किळस बाळगून ते टाळता येत नाही, टाळणे योग्य नाही. वैद्यकीय शिक्षण पुरे करायचे, यशस्वी चिकित्सक व्हायचे, उत्तम शस्त्रवैद्य म्हणून व्यवसाय करायचा तर, शवविच्छेदन करणे घाणेरडेपणाचे आहे असे म्हणून चालणार नाही. ''कुर्वन्नाप्नोति किल्बिषं'' म्हणून सांगितले आहे ते यासाठीच.

यासाठी शास्त्र प्रमाण मानून स्वधर्मानुष्ठान, विहित कर्माचे आचरण निष्ठेने करावे. मग त्याचे स्वरूप कसेही असो. तर्कटीपणाने दोषच हुडकायचे झाले तर कोणतेही कर्म त्याला अपवाद ठरणार नाही. या ना त्या प्रकारची वैगुण्ये सगळ्याच कृत्यांच्या माथ्यावर थापता येतील. पण असे असले तरी स्वकर्म टाळणे योग्य नाही. तेच भगवान् पुढच्या श्लोकात सांगत आहेत.

**सहजं कर्म कौन्तेय सदोषमपि न त्यजेत् ।**
**सर्वारंभा हि दोषेण धूमेनाग्निरिवावृता: ।।४८।।**

जे सहजपणे माणसाच्या वाट्याला आले आहे, ते कर्म जरी (वरवर पाहता) दोषयुक्त वाटले तरी त्याचा त्याग करू नये. कारण कोणत्याही कर्माचा आरंभ हा दोषासहितच असतो. जसा अग्नी पेटताना धूर निघायचाच.

अग्नीचे इंधन कोणतेही असो. गोवरी, लाकूड, रॉकेल, कापूर, पेट्रोल

असे काही असले तरी पेटताना त्यातून उण्याअधिक प्रमाणात आरंभी तरी धूर निघतोच. जाड लोखंडी कवचातून अलीकडे स्वयंपाकासाठी वापरला जाणारा ज्वलननिल (गॅस) धूमहीन असतो असे म्हणतात. डोळे चुरचुरण्याच्या दृष्टीने ते खरेही आहे. पण त्या अग्नीवर वापरलेली स्वयंपाकाची भांडी बाहेरच्या बुडाशी काही वेळाने थोडी तरी काळवंडलेली दिसतातच. प्रमाण अत्यल्प असते इतकेच. अग्नीसवे धूर असतो म्हणून जसे कोणी अग्नीचा उपयोग करून घ्यायचा नाही असे म्हणत नाही, तसेच कर्म सदोष वाटले तरी टाळणे योग्य नसते.

कर्माची सदोषता वा गुणयुक्तता क्वचित प्रत्यक्ष प्रत्ययाला येत नाही, आधी कळत नाही, तरी संपर्कात आलेल्या लोकांनी केलेल्या निंदा-स्तुतीवरून ते कळू शकते. श्रीज्ञानेश्वरीसारखा अमृतातेही पैजा जिंकणारा, काव्यगुणांनी ओथंबलेला, उपमा-कौशल्याने कालिदासासही लाजविणारा, श्रेष्ठ तत्त्वज्ञानाची वाट सामान्यालाही मोकळी करून देणारा, साधकाचे जीवन सिद्धीपर्यंत पोहोचविणारा, श्रद्धावंताच्या व्यवहाराला पवित्र करणारा अद्वितीय ग्रंथ काही टीकाकारांना ''ज्ञानेश्वरी म्हणजे ना काव्य ना तत्त्वज्ञान'' असा वाटतो, तर अश्लील, गलिच्छ, बीभत्स शब्दांनी बरबटलेले मुक्तछंदातील नवकाव्य काही समीक्षकांना डोक्यावर घेऊन नाचावे अशा योग्यतेचे वाटते. तेव्हा कुणी दोष दाखवितो वा निंदा करतो म्हणून सत्कृत्य करूच नये, असे म्हणणे योग्य नाही. उलट दुष्कृत्यांचेही कौतुक करणारे भेटतात. म्हणून दुष्कृत्य आदरणीय ठरत नाही.

आपले कर्तव्यकर्म करणाराने ही गोष्ट सर्वदा लक्षात ठेवली पाहिजे. दोष हुडकणारी, निंदा करणारी, तिरस्कार दाखविणारी माणसेच आपल्याला भेटणार हे गृहीत धरूनच त्याने कामास लागले पाहिजे. काम करणे योग्य आहे हे एकदा ठरविले म्हणजे मग ते तडीस नेणे हेच योग्य असते. त्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्नशील राहणे हेच आवश्यक असते. कुणी बरे म्हणत नाही, कौतुक करीत नाही, उपहास होतो म्हणून वैतागून 'कशाला या भानगडीत पडलो' या विचाराने कर्तव्य सोडून देणे ही गोष्ट माणसाला न शोभणारी आहे.

कोणतीही साधना करताना असाच अनुभव येतो. स्थल-कालाची अनुकूलता नसते. पुरेशी सामग्री जुळवता येत नाही. शरीर साथ देत नाही, मांडी

घालून बसावे म्हटले तर गुडघे दुखतात. पाठीला रग लागते. ध्यानाचे वेळी मन भरकटते. पूजापाठाची गोडी लागत नाही, म्हणून उपासनेच्या साधनेच्या दृष्टीने काही करायचे म्हटले तर हे असे होते म्हणून काही करायचेच नाही असा विचार केला तर प्रगती-उन्नतीचे नावही काढता येणार नाही.

काय वाचावे असे विचारल्यावरून एकाला सांगितले की दासबोध वाच. काही दिवस गेल्यावर तो म्हणाला - भाषा रूक्ष वाटते हो! मी म्हणालो - ठीक आहे. ज्ञानेश्वरी वाच. काही दिवसांनी त्याने सांगितले - भाषा फार जुनी असल्याने काही कळत नाही. विषयही अवघडच आहे. आता काय करणार? एक रूक्ष वाटते म्हणून नको. दुसरे अवघड वाटते म्हणून नको. रामदास काय किंवा ज्ञानेश्वर काय दोघेही जगाच्या कल्याणाकरिता अवतरलेले महापुरुष आहेत. दोघांनीही जे लिहिले आहे ते समाजाच्या उद्धारासाठी, साधकाच्या मार्गदर्शनासाठी. साध्य आणि साधना या दृष्टीने दोघांच्याही तत्त्वज्ञानात काही अंतर नाही. दोघेही अद्वैती आहेत. भक्तिमार्गाची श्रेष्ठता दोघांनीही प्रतिपादिली आहे. नामाचे माहात्म्य दोघांनीही गायिले आहे. ब्रह्मज्ञानाची थोरवी दोघांनाही मान्य आहे. आता आपल्या प्रकृति-प्रवृत्तीप्रमाणे कोणाचा तरी हात बळकट धरून साधनामार्गावरून निष्ठेने चालले पाहिजे. आरंभीच काहीतरी खोडी काढून स्वस्थ बसण्यात अर्थ नाही. भाकरी म्हणजे पोळी नव्हे व लाडू म्हणजे शिरा नव्हे हे खरेच; पण दोघांचेही पोषणमूल्य सारखेच आहे. आरोग्यरक्षणाच्या दृष्टीने दोन्हीही उपयुक्त आहे. स्वधर्माचे, स्वकर्माचे तसेच समजावे. स्वधर्म आणि स्वकर्म पालटत नाही, पालटता येत नाही एवढा विशेष.

आपण एखादी गोष्ट एकदा पत्करली की मग तिचे जे काय गुण-दोष असतील ते स्वीकारावेच लागतात. कारकुनाला ज्या प्रकारचे काम करायचे असते, त्यापेक्षा शेतकऱ्याचे काम वेगळे असते. कारकुनाला कधी उन्हा-पावसात कष्ट करण्याचा प्रसंग येत नाही. शेतकऱ्याला मात्र उन्हात-थंडीत-पावसात न कंटाळता राबावेच लागते. आता कारकून व्हायचे ठरविले तर धान्याचे उत्पादन कोण करणार? जगण्यासाठी लागणारे अन्न कुठून मिळणार? कुणीतरी शेतकरी झालेच पाहिजे. कारकुनी तरी खऱ्या अर्थाने सुखाची आहे का? सहा-सात तास एके जागी बसून खर्डेघाशी करावी लागते. त्याचाही उबग येतो. आकडेमोडीनेही ताण येतो. शरीराला पुरेसा व्यायाम न मिळाल्याने मेद

वाढतो. पुत्रवती व्हायचे तर प्रसूतीचे दु:ख सोसलेच पाहिजे. ध्यान साधायचे म्हटले की मांडी घालून पाठीचा कणा ताठ ठेवून बसलेच पाहिजे. भाकरी भाजायची तर हाताला थोडा तरी चटका बसायचाच. मोहऱ्या तडतडून अंगावर उडतात म्हणून स्वयंपाकच करायचा नाही असे ठरविले तर चालत नाही. पदार्थ चांगला खमंग पाहिजे असेल तर तो करताना उसळणारा खाट सोसलाच पाहिजे. यासाठीच ''सहजं कर्म सदोषमपि न त्यजेत्'' असे भगवान् म्हणतात.

प्रामाणिकपणे आपली शक्ती-बुद्धी पणाला लावून एखादे काम करायचे ठरविले तरी ते जसे साधावे तसे साधत नाही. साधावे तसे न साधणे हा दोषच आहे. पण तरी ते काम करीतच नाही म्हणून चालत नाही. काम करीत राहण्यानेच त्यातील दोष क्रमाक्रमाने उणावत जातात. शंभरी शंभर निर्दोष असणे वा होणे हे व्यवहारात तरी साधणे शक्य नाही. अगदी चोख म्हणून घेतले जाणारे सोनेही ९९.५ टक्के असे असते. शेकडा ०.५ चा दोष तेथेही राहतोच. रासायनिक शुद्धतेच्या दृष्टीने हा दोष काही थोडा नाही. शास्त्रीयदृष्ट्या तो काढून टाकणे शक्य होईलही, पण त्या प्रयत्नात सोन्याचे मूल्य आहे त्यापेक्षा तिपटी-चौपटीने वाढेल. ते अव्यवहार्य आहे. यासाठी *''सर्वारंभाहि दोषेण धूमेनाग्निरिवावृता:''* हे मान्य करूनच वागावे लागते.

आपले जे सहज कर्म आहे ते जर आपण आपल्या शक्तिबुद्धियुक्तिनिशी प्रामाणिकपणे करीत राहिलो तर त्यातील जे काही दोष असतील ते क्रमाक्रमाने उणावत जातील आणि शेवटी जे उरतील ते सह्य असतील, क्षम्य असतील. ते बाधक होणार नाहीत. स्वकर्मावरची निष्ठा टिकून राहण्यासाठी आणखी काय पाहिजे?

आपले घर स्वच्छ असावे असे प्रत्येकालाच वाटते. त्या दृष्टीने तो प्रयत्नशीलही असतो. पण घरातला केर संपूणपणे नाहीसा करता येतो का? तसे कधी होत नाही. केर जसा माणसाच्या कर्तृत्वाने साठतो, तसा तो वातावरणातील धुळीमुळेही साचतो. रस्त्याच्या दुर्दशेमुळे उडणारी आणि प्रदूषणामुळे वाढणारी धूळ विचारात घ्यायची नाही असे ठरविले तरी वातावरणात धूळ राहतेच आणि त्यामुळे घरामध्ये ती उण्या-अधिक प्रमाणात साचतेच. अगदी वातानुकूलित खोल्याही याला अपवाद राहत नाहीत. वातावरणात धूळ नसेल तर घरात उजेड येणार नाही. धूलिकणांवरून परावृत्त होणाऱ्या सूर्यकिरणांमुळे आपल्याला

प्रकाश मिळत असतो. हा धुळीचा उपयोगही लक्षात घेतला पाहिजे. धूळ मुळीच नको म्हटले तर अंधार पत्करावा लागेल. तेव्हा केर काढण्याचा कंटाळा न करता घर जितके स्वच्छ राखता येईल तितके स्वच्छ राखले पाहिजे. वातावरणात धूळ असतेच म्हणून धूळ उधळते तेथेच जाऊन बसावे असे म्हणू नये, वा केर कशाला काढावा असेही म्हणू नये.

शंभरी शंभर चांगले साधत नसले तरी आपल्याला जितके चांगले साधणे शक्य आहे, त्यातील अधिकाधिक चांगले साधण्यासाठी सतत प्रयत्न करीत राहणे एवढेच आपल्या हातातील आहे. मग हे कर्तव्यकर्म वैयक्तिक जीवनातले असो, समाजातले असो, राजकारणातले असो वा परमार्थातले असो; ते निष्ठेने करीत राहिले तर जगातील बहुतेक सर्व संघर्ष मिटतील आणि माणसाला भेडसावणारे पुष्कळसे प्रश्न सहजपणे सुटतील.

कर्तव्यकर्म आचरणात आणण्याची उत्कटता कोणत्या उपायाने साधते त्याचे वर्णन भगवान् पुढील श्लोकात करीत आहेत.

**असक्तबुद्धिः सर्वत्र जितात्मा विगतस्पृहः ।**
**नैष्कर्म्यसिद्धिं परमां संन्यासेनाधिगच्छति ।।४९।।**

कोणत्याही कर्माविषयी ज्याची बुद्धी आसक्त नाही, ज्याचे शरीर-मन-बुद्धीवर नियंत्रण आहे, ज्याला कसलीही अभिलाषा नाही, अशा माणसाला नैष्कर्म्याची परमसिद्धी संन्यासाने प्राप्त होते.

कर्माविषयी ते केलेच पाहिजे, झालेच पाहिजे, मी केले तरच होईल असा दुराग्रह असणे याला कर्माविषयीची आसक्ती म्हणतात. पुढे पुढे करणे आणि वाट्यास आलेले पुढे होऊन करणे या दोन्हीत अंतर आहे, हे आपल्याही लक्षात येते. पुढे पुढे करणारा माणूस कोणतेही काम आवश्यक म्हणून करणार नाही. मिरवता येते म्हणून करणार. केवळ प्रतिष्ठितांच्या स्वागताकरिता धावणार. पेढे, फुले वाटणार. फुलेल (अत्तर) लावणार. सुगंधी जल शिंपडणार. पण बैठकी गोळा करण्याच्या वेळी पसार होणार. तेच कर्म करणार की ज्यात कष्ट नाहीत पण प्रतिष्ठा आहे. सोय आहे आणि मिरवताही येते. किंवा जे कर्म स्वार्थ साधून देते, ते करण्याविषयीच तत्पर राहणार. कर्माविषयीची आसक्ती ही या अशा वागण्यातून प्रगट होते.

जो अनासक्त आहे, असक्तबुद्धी आहे, त्याला केवळ कर्तव्यकर्माविषयी उत्साह असतो. पण अंगावर ओढून घेण्याचा उल्हास मात्र नसतो. हे करीन, ते करीन अशी हौस त्याला नसते. आवश्यकता आणि चैन यातले अंतर त्याला उमगते. काम करण्याची शक्ती आहे, आळसही नाही, पण काम मी करीनच असा दुराग्रहही नाही. हे समजून घेणे थोडे अवघड आहे हे खरे. पण विहित कर्तव्य, नियतकर्तव्य कशाला म्हणावे, स्वधर्म कशाला म्हणावे याची जाण चांगल्या प्रकारे असेल तर हे समजू शकते. थोडे भडक वाटणारे एक उदाहरण देतो म्हणजे लक्षात येण्याच्या दृष्टीने साहाय्य होईल. पतीला प्रसन्न ठेवणारी गृहिणी आणि धनिकाला संतुष्ट करणारी वारांगना यांच्या वर्तनात जे अंतर आहे तेच अंतर कर्तव्यकर्मात आणि आसक्तीने केलेल्या कर्मात आहे. लोकसंग्रहाचा कंटाळा न करणारा संत आणि लौकिकाची हाव असलेला, लोकेषणा असणारा महंत यांच्या वागण्या-बोलण्यात जी भिन्नता असते त्यावरूनही कर्तव्यकर्म आणि आसक्तीने केलेले कर्म यांचा भेद ओळखता येतो. कर्तव्यकर्म आणि आसक्तबुद्धीने केलेले कर्म यांचे स्वरूप संतांनी केलेला उपदेश आणि पांडित्यप्रदर्शनासाठी केलेले विद्वानांचे प्रवचन यांच्यासारखे असते.

कर्माविषयीची ही अनासक्ती ज्यांचे इंद्रिय-मन-बुद्धीवर नियंत्रण आहे, योग्यायोग्याचा उचित निर्णय घेण्याचा विवेक ज्याचे ठिकाणी आहे, म्हणजे जो जितात्मा आहे त्यालाच साधू शकते. आत्मा शब्द प्रसंगाप्रमाणे, प्रकरणाप्रमाणे शरीर-मन-बुद्धी यांचेसाठीही वापरला जातो. केवळ चित्स्वरूप असा जो आत्मा त्यासाठीही आत्मा शब्दाचा उपयोग होतो. येथील शब्द जितात्मा असा असल्याने आत्मा शब्दाचा अर्थ शरीर-इंद्रिय-मन-बुद्धी असा केला पाहिजे. मन आवरणे हेच यांतील प्रमुख. मनावर नियंत्रण प्रस्थापित झाले की जितात्मता खऱ्या अर्थाने परिपूर्ण होते. पण ती गोष्ट फार अवघड आहे. त्यासाठी शरीराचा वा इंद्रियांचा निग्रह आणि बुद्धीचा विवेक यांचे साहाय्य घ्यावे लागते. अर्थातच साधनेचा आरंभ गुरूंपासून प्राप्त झालेल्या ज्ञानाच्या, मार्गदर्शनाच्या आधारे शरीरापासून करावा लागतो. मनाला जिंकल्यानंतरच शरीरावर पूर्ण नियंत्रण ठेवणे शक्य होणारे असले तरी शरीराला थोडे तरी वळण लागल्यावाचून नियंत्रणासाठी मनापर्यंत पोहोचणेही शक्य होत नाही,

हे लक्षात घ्यावेच लागते. पोहावयास आल्यानंतर मगच पाण्यात पडेन असे कुणी म्हणेल तर त्याला साऱ्या जन्मात कधीही पोहता येणार नाही. पोहावयास येण्यासाठी आरंभीच पाण्यात पडले पाहिजे. मग अभ्यासाने समुद्रात दहा-बारा कोस रुंदीची खाडी सहजपणे तरून जाण्याचे सामर्थ्य येते. उपासनामार्गातील साधनेचेही तसेच होते. तेथे आरंभ शरीरापासून करावा लागतो. पण काही लोक तेथेही लबाडीने वागतात असे आढळते. मनात असले म्हणजे झाले. शरीराचा आग्रह कशाला धरायचा? *''मनः कृतं कृतं राम न शरीरकृतं कृतम्''* (योगवासिष्ठ) असा सिद्धांत ते साधार मांडीत असतात. तत्त्वतः हे कितीही खरे असले तरी व्यवहाराच्या पातळीवर यात दंभ निर्माण होतो हे निःसंशय. माझ्याकडील एका समारंभास मी माझ्या एका मित्रास आग्रहाने निमंत्रित केले. माझ्या मित्राने आपली एक अडचण कळवली, जी अगदीच किरकोळ होती, आणि लिहिले की मी शरीराने तिथे नसलो तरी मनाने तिथेच आहे असे समज. मी त्याला तातडीने उत्तर पाठविले की मनाने इथे नसलास तरी चालेल, पण शरीराने इथे ये. तुझी जी काय अडचण आहे म्हणतोस ती मनाने दूर कर. तो आलाही नाही आणि त्याने माझ्या या पत्राचे उत्तरही पाठविले नाही.

मनाने करतो, मानसपूजा करतो म्हणणारांचे बहुधा हे असे असते. मानसपूजा ही शरीराने केल्या जाणाऱ्या पूजनापेक्षा कितीतरी पटीने अवघड आहे. पूजेसंबंधीचे एखादे स्तोत्र मनातल्या मनात वा पुटपुटत म्हणणे म्हणजे काही मानसपूजा नव्हे. शरीर-मन-बुद्धीवर नियंत्रण प्रस्थापित होण्यासाठी, जितात्मता येण्यासाठी दीर्घकालाचे प्रयत्न जाणीवपूर्वक करावे लागतात.

जितात्मता आली म्हणजेच माणसाला विगतस्पृह होता येते. स्पृहा म्हणजे अभिलाषा, अपेक्षा, हाव, हे घडावे- हे घडू नये, हे मिळावे- हे मिळू नये असे वाटत राहणे. ज्याची अपेक्षा नष्ट झाली तो विगतस्पृह.

माणूस जे काही (कर्म) करीत असतो त्या सर्व वेळी त्याच्या मनात सुख मिळावे, काही लाभ व्हावा, संपत्ती, सत्ता, सन्मान मिळावा, आपले कौतुक व्हावे, प्रख्याती लाभावी अशी काही ना काही तरी आकांक्षा असतेच. आणि मग त्याचे ते कर्म केवळ कर्तव्य उरत नाही. त्याला धंद्याचे स्वरूप येते. गीतेच्या तत्त्वज्ञानाचा सर्व भर मुख्यतः निष्कामतेवर, निरभिलाष वृत्ती प्राप्त

करून घेण्यावर आहे. वृत्ती खऱ्या अर्थाने नि:स्पृह झाली म्हणजे मग त्याचा मार्ग कर्म, भक्ती, ज्ञान, योग यापैकी कोणताही असो, त्याची प्रगती-उन्नती त्याला ध्येयापर्यंत पोहोचविते. मग हे ध्येय अभ्युदयाचे असो की नि:श्रेयसाचे असो.

संपत्तीमान होणे हा अभ्युदयाचा एक लहान अंश आहे. पण त्यासाठीही आरंभीचा दीर्घकाल चैनीचा मोह दूर ठेवून निरलसपणे कष्ट करावे लागतात. तीही मर्यादित क्षेत्रातील निष्कामताच आहे. ध्येय अधिक उदात्त असेल तर त्या प्रमाणात निष्कामतेची प्रतही उच्च-उच्चतर-उच्चतम असली पाहिजे.

कर्माविषयी आसक्ती नसणे (असक्तबुद्धी), इंद्रिय-मन-बुद्धीवर पूर्ण नियंत्रण असणे (जितात्मा) आणि कोणत्याही प्रकारची अभिलाषा नसणे (विगतस्पृह) हे तिन्ही गुण एकत्रित असणे म्हणजेच संन्यास. अर्थात हा संन्यास वृत्तिसंन्यास आहे. गीतेतच पूर्वी एकदा या संन्यासाचे वर्णन स्पष्ट शब्दात आले आहे. *''ज्ञेय: स नित्यसंन्यासी यो न द्वेष्टि न कांक्षति । निर्द्वन्द्वो हि महाबाहो सुखं बन्धात् प्रमुच्यते ।।''* (गीता ५/३) तेथे जी लक्षणे सांगितली आहेत, त्यातील शब्द निराळे असले तरी आशय जवळजवळ सारखाच आहे. ''यो न द्वेष्टि न कांक्षति'' म्हणजे विगतस्पृहता, निर्द्वंद्वतेत जितात्मता आणि अनासक्ती येऊन जाते. तेथे ''बन्धात् सुखं प्रमुच्यते'' असे म्हटले आहे. येथे ''परमां नैष्कर्म्यसिद्धिं अधिगच्छति'' असा उल्लेख केला आहे. अर्थात हे प्रकरण सोपे नाही. त्या पाचव्या अध्यायातच ''हे पराक्रमी अर्जुना! संन्यासाची योग्यता मिळविणे फार अवघड आहे.'' (गीता ५/६) असेच भगवंतांनी सांगितले आहे. जे परमोच्च ध्येयापर्यंतच पोहोचविते ते काहीही सोपे नसते. प्रकृतिभेदाला अनुकूल असल्यामुळे कुणाकुणाला काही काही साधने सोपी वाटतात इतकेच. असो.

ज्याची वृत्ती पूर्णपणे संन्यस्त झाली तो या संन्यासाच्या बळावर परमोच्च अशी नैष्कर्म्यसिद्धी मिळवू शकतो. संन्यासामुळे त्याला अत्यंत श्रेष्ठ अशी नैष्कर्म्यसिद्धी प्राप्त होते असे भगवंत सांगतात. हा विषय नीटपणे समजावून घेतला पाहिजे.

मागे तिसऱ्या अध्यायात या विषयाचा थोडा ऊहापोह झाला आहे. तेथे भगवंतांनी म्हटले आहे की, ज्याला नैष्कर्म्य नैष्कर्म्य असे म्हणतात, ती

स्थिती केवळ कर्म करण्याचा आरंभ न केल्यामुळे काही प्राप्त होत नाही. तसेच नुसता संन्यास घेण्यानेही कोणाला सिद्धी प्राप्त होते असेही नाही. येथे मात्र नैष्कर्म्यसिद्धी संन्यासाने मिळते असे वर्णन आहे. मांडणीच्या स्वरूपात विरोध दिसतो तो विषयाचे आकलन यथार्थपणे न झाल्याचा परिणाम आहे.

नैष्कर्म्य शब्द धात्वर्थाने जरी काम न करणे अशा अर्थाचा असला तरी नैष्कर्म्य शब्दाचा आशय निवांतपणा असा आहे. अप्रवृत्ती म्हणजे निवृत्ती नव्हे. जो नोकरीची वर्षे पूर्ण करून निवृत्त झाला आहे तो, आणि ज्याला नोकरी मिळालेलीच नाही तो, हे दोन्ही जसे एक नव्हेत, तीच स्थिती नैष्कर्म्यता आणि अकर्म यांची आहे. अकर्मता कर्माविषयीची आसक्ती सुटण्यात आहे. कर्मच न करण्यात नाही. नाहीतर सगळ्या आळशांना नैष्कर्म्यसिद्ध म्हणून नमस्कार करावा लागला असता.

*''न च संन्यसनादेव सिद्धिं समधिगच्छति''* या तिसऱ्या अध्यायातील श्लोकार्धात उल्लेखिलेला संन्यास आपल्या या अठराव्या अध्यायातील प्रस्तुतच्या श्लोकातील संन्यासापेक्षा वेगळा आहे. तो बहुधा आश्रमसंन्यास असावा. संन्यासदीक्षा घेऊन, वस्त्रे भगवी करून भिक्षा मागून राहणे असे त्या संन्यासाचे स्वरूप असावे.

आश्रमसंन्यास प्रामाणिक असला तर त्याचाही काही लाभ होतो. पण त्यासाठी दीक्षा घेतलेल्या संन्याशाने वैराग्याचा अवलंब करून जप, ध्यान, तत्त्वचिंतन अशी साधना करावी लागते. वस्त्रे भगवी होताच काही आत्मदर्शनाचे ध्येय प्राप्त होत नाही. ''संन्यसनादेव'' या शब्दाने हेच सुचविले आहे. आश्रमसंन्यास प्रामाणिक असेल तर साधनेच्या बळावर क्रमाक्रमाने उद्धरून जाता येते. पण तो जर आमच्या ती. दादांनी वर्णन केल्याप्रमाणे *''भगव्याची केली कोट झगे जाकिटे । देतात पदीच्या बुटास रंगी पुटे ।। पाहता उपाधी मुळि न मठाची सुटे ।''* या जातीचा असेल तर कोणत्याही प्रकारच्या प्रगतीचे नावसुद्धा काढावयास नको.

मी नैष्कर्म्याला निवांतपणा म्हटले ते का, ते थोडे स्पष्ट करतो; निवांतपणा म्हणजे अंत:करणाची प्रसन्नता. ज्या अंत:करणामध्ये औत्सुक्य, मोह वा अरती अस्वस्थता लवमात्रही नाही, जे मोकळे आनंदी आहे त्याच अंत:करणाला निवांतपणा म्हणजे काय ते अनुभविता येते. ही जी प्रसन्न वृत्ती आहे, हा जो

निवांतपणा आहे, तो साधनामार्गावरील शेवटचा टप्पा आहे. अंतिम निवास आहे. त्यात कृतार्थता नसली तरी कृतकृत्यता आहे. उपवर मुलीचा विवाह होऊन ती सुस्थळी पडली म्हणजे पित्याला जसे वाटते, शिरावर असलेल्या ऋणाच्या ओझ्यातून मुक्त होताच माणसाला जे वाटते, बुद्धिमान प्रामाणिक विद्यार्थ्याने भरपूर अभ्यास केलेला आहे, आणि तो चांगल्या प्रकारे परीक्षा देऊन आला म्हणजे त्याला जसे वाटते, तसे काहीसे स्वरूप नैष्कर्म्याचे आहे.

ही नैष्कर्म्याची सिद्धी कर्तव्यकर्माच्या परिपूर्ततेनंतर प्राप्त व्हायची असते. परमार्थाच्या मार्गावरील ही स्थिती फार श्रेष्ठ आहे, अति उदात्त आहे. येथे पोहोचणे हे 'येरागबाळ्याचे काम' नव्हे. त्यासाठी संन्यास सिद्ध व्हावा लागतो, अनासक्तता, जितात्मता, निःस्पृहता या गुणांनी संन्यास सिद्ध व्हायचा असतो हे सांगितलेच आहे.

ही स्थिती प्राप्त होण्यासाठी 'असाल तेथून पुढती चला' या वृत्तीने प्रामाणिकपणाने असेल त्या सामर्थ्यासह प्रयत्नपूर्वक कर्तव्यकर्म करीत राहणे हाच एकुलता एक मार्ग तुम्हांआम्हांसाठी उपलब्ध आहे.

भगवान श्रीकृष्ण जो साधनामार्ग सांगणार आहेत, क्रमयोग सांगणार आहेत, ''ब्रह्मविद् ब्रह्मैव भवति'' ब्रह्मज्ञानी ब्रह्मच होतो; खरे तर 'ब्रह्मैव न तु ब्रह्मविद्' - तो ब्रह्मच आहे, त्याला ब्रह्मविद् म्हणणेही योग्य नाही. ही जी वाणी-मन-बुद्धीला कुंठित करणारी स्थिती ती कशा प्रकारे लाभते, हे पुढे सांगणार आहेत त्याचे प्रास्ताविक त्यांनी पुढील श्लोकात केले आहे.

**सिद्धिं प्राप्तो यथा ब्रह्म तथाप्नोति निबोध मे ।**
**समासेनैव कौन्तेय निष्ठा ज्ञानस्य या परा ।।५०।।**

सिद्धी प्राप्त झालेला माणूस ब्रह्म कसे मिळवतो ते मी सांगतो ऐक. थोडक्यात म्हणजे ज्ञानाची तीच परमनिष्ठा आहे.

श्रीमद्‌भगवद्‌गीतेमध्ये आतापर्यंत सांगितलेला बोध परमार्थ आणि व्यवहार या दोघांनाही धरून सांगितलेला आहे. कोणत्याही मार्गातील उन्नती-प्रगतीच्या दृष्टीने गीतेने दिलेले आदेश वा प्रतिपादिलेले सिद्धांत सारखेच उपयुक्त आहेत. परंतु येथून पुढे पाच श्लोकांत सांगितलेली साधना ही पारमार्थिक साधना आहे. व्यवहाराशी तिचा संबंध दूरान्वयानेच जोडता आला तर येईल. ही

साधना ब्रह्म-प्राप्तीकरिता, ब्रह्माच्या साक्षात्काराकरिता आहे.

कर्तव्यकर्म यथासांगपणे पार पाडून नैष्कर्म्यसिद्धी मिळविलेला माणूस ब्रह्माला कसा प्राप्त होतो, ते येथे सांगितले जात आहे. हे जणू पाड लागलेला आंबा कसा पिकतो ते सांगण्यासारखे आहे. भात शिजलेला आहे, वाफ जिरायची असते तसे हे आहे. बोलता येण्यासारख्या भाषेत बोलायचे तर हे ज्ञानाचे अंतिम टोक आहे. प्रत्यक्ष समुद्रात शिरलेला गंगेचा प्रवाह जसा असतो तसे हे आहे.

चौथ्या अध्यायात ज्ञानाचे महत्त्व वर्णन केले आहे. तेथे असे म्हटले आहे की सगळी कर्मे ज्ञानामध्ये संपून जातात. असे हे श्रेष्ठ ज्ञान मिळविले पाहिजे. ते ज्ञान मिळविण्यासाठी तत्त्वाचा, ब्रह्माचा, आत्म्याचा साक्षात्कार झालेल्या पुरुषाला नम्रपणाने शरण गेले पाहिजे. जिज्ञासू भावनेने त्या ज्ञानवंताला न कंटाळता पुन्हा पुन्हा प्रश्न केले पाहिजेत. आणि त्याने प्रसन्न होऊन बोध करावा म्हणून त्या सत्पुरुषाची निरलसपणे सेवा केली पाहिजे. या सर्व गोष्टीतून जिज्ञासूची ज्ञानग्रहणाची पात्रता सिद्ध होत असते. पात्रता नसताना उपदेश करणे म्हणजे पालथ्या घड्यावर पाणी ओतल्यासारखे होते. प्रणिपात, प्रतिप्रश्न आणि सेवा यांची आवश्यकता साक्षात्कारी पुरुषाला नसते. तो आपल्या ठिकाणी संतुष्ट आणि समाधानी असतो. जिज्ञासूची योग्यता प्रत्ययाला आल्यानंतर तो प्रसन्न होतो आणि मग ज्ञानाचा उपदेश घडतो. हे ज्ञान प्राप्त झाले, मुरले म्हणजे मग त्या व्यक्तीला कोणत्याही प्रकारे मोह उत्पन्न होत नाही. जे जे काही दिसते, भासते, प्रत्ययाला येते ते सगळे अंतर्बाह्य ओतप्रोत एक ब्रह्मच आहे हे त्याला यथार्थतेने कळते. या ज्ञानरूपी नौकेच्या साहाय्याने तो सर्व पातकाच्या, विधिनिषेधांच्या पार जातो. जणू प्रदीप्त झालेल्या ज्ञानाच्या अग्नीत त्याची सर्व कर्मे जळून जातात. म्हणजेच कोणत्याही कर्माचा त्याला कसलाही लेप लागत नाही. यासाठीच ज्ञानासारखे परमपवित्र असे या जगतात दुसरे काही नाही, असे म्हटले जाते ते यथार्थ ठरते. अधिकारी व्यक्तीकडून योग्य जिज्ञासूला ज्ञानाचा उपदेश होत असला तरी या ज्ञानाचा बोध वा आकलन कोठून बाहेरून होत नाही. तो बोध ज्ञानग्रहणाविषयी प्रयत्नशील असलेल्या, कर्तव्यकर्मे योग्य रीतीने पार पाडणाऱ्या जितेंद्रिय पुरुषाला योग्य वेळी आतूनच स्फुरत असतो. मात्र त्यासाठी जिज्ञासू पुरुषाच्या ठिकाणी नितांत श्रद्धा असावी लागते. ज्ञान

लाभले की मग त्या महात्म्याला परम शांतीचा लाभ होण्यास वेळ लागत नाही.

चौथ्या अध्यायात आलेले ज्ञानाचे हे सर्व मोठेपण आपल्या या श्लोकातील ज्ञाननिष्ठा या एका शब्दातून व्यक्त होत आहे. निष्ठा शब्दाचा अर्थ जाणला की हे लक्षात येईल.

निष्ठा या शब्दाचा अर्थ काय करावा यासंबंधात मतांचे वैचित्र्य असू शकते, पण शब्दांना अर्थाचे ओझे होत नाही, हे विनोबाजींचे विधान ध्यानात घेतले म्हणजे प्रामाणिकपणे विचार करणाऱ्याला अडचणीत पडावे लागत नाही.

संस्कृत व्याकरणावर मी अधिकारवाणीने काही बोलू शकणार नाही, पण निष्ठा या शब्दात नि + स्था अशी दोन पदे आहेत असे मला वाटते. स्था म्हणजे बसणे, राहणे, स्थिर असणे. नि म्हणजे नियमाने, निश्चयाने, निग्रहाने. जी गोष्ट एकदा धरली, पकडली ती आता पुन्हा सुटणार नाही, सोडणार नाही, सोडावीशी वाटणार नाही. त्यासाठी लागणारे शरीर-मन-बुद्धीचे साहाय्य निश्चयाने लाभेल, ते स्थिर असेल, असे होणे म्हणजे निष्ठा. निष्ठेमध्ये श्रद्धा आणि कृती एकरूप होतात असे समजावे. साधकाच्या पातळीवर हे घडून येण्यास काही काळ जावा लागतो. मनात आहे पण शरीराकडून घडत नाही, कृतीत उतरत नाही असे जे घडते, तसे कृती घडत असते पण मन लागत नाही, रमत नाही, एकाग्र होत नाही असेही घडते. साधकदशेत आरंभी आरंभी असा थोडा डळमळीतपणा असणे स्वाभाविक आहे आणि क्षम्यही आहे; पण हे असे किती दिवस चालायचे हे मात्र लक्षात घेतलेच पाहिजे. कोणत्याही सिद्धीची निष्ठा ही जननी आहे. निष्ठा नसेल तर ध्येयसिद्धीसाठी कराव्या लागणाऱ्या कृतीला काही अर्थ राहत नाही. *''माला तो करमे फिरे जीह फिरे मुखमाही । मनुवा तो दसदिसी फिरे यह कोई सुमिरन नाही ।।''* निष्ठेवाचून सर्व प्रयत्नांचे, उपासनांचे असे होते. ते उपहासास्पद ठरते. मन-बुद्धी आणि कृती यांची एकरूपता असावी लागते. ती स्थिर असावी लागते आणि दीर्घकालपर्यंत तिचे सातत्य टिकावे लागते. अशी ही निष्ठा प्रकृतिभेदाने परिस्थितिवशात् भक्तीची, ज्ञानाची, कर्माची, स्वधर्माची, स्वदेशाची कशाचीही असू शकते. अगदी गृहस्थधर्माचीसुद्धा असावयास

अडचण नाही. त्यामुळे इतर तीन आश्रमांचे जीवन निरामय होते. समाजोपयोगी असलेली पूर्तकर्मे यशस्वीरीत्या पार पाडता येतात. त्यामुळे प्रपंचही नेटका करता येतो. आणि स्वाभाविकपणेच परमार्थाची वाटचाल सोयीची होते, सुखाची होते.

निष्ठेमध्ये दोन गोष्टींना फार महत्त्व आहे. एक – विलक्षण प्रामाणिकता. दुसरी – असामान्य उत्कटता. या दोन गोष्टी एकत्र आल्या की मग मनुष्य जे करील ते त्याला योग्य ठिकाणीच पोचवील. *''रुचीनां वैचित्र्यादृजु कुटिल नाना पथजुषाम् । नृणामेको गम्यस्त्वमसि पयसामर्णव इव ।।''* असे जे महिम्न स्तोत्रात म्हटले आहे ते अगदी यथार्थ आहे.

माणूस आपल्या प्रवृत्तीप्रमाणे कोणत्याही मार्गाने जात असला, कोणतीही साधना करीत असला तरी प्रामाणिकपणा आणि उत्कटता हे दोन गुण त्याच्या ठिकाणी असतील तर तो ध्येयाप्रत प्राप्त होणार हे निश्चित. आत्मसाक्षात्कार हेच ते ध्येय. व्यवहाराच्या पातळीवर असणारी प्रामाणिकपणाची लहान-मोठी ध्येये मग या परमोच्च ध्येयाची केवळ अंगोपांगे होऊन राहतात. पर्वतशिखरावर नेऊन पोहोचविण्याऱ्या मार्गावरील चढ-उतारासारखे, वळणासारखे वा मध्यंतरी कराव्या लागणाऱ्या निवासासारखे या वेगवेगळ्या वाटणाऱ्या ध्येयांचे स्वरूप असते. मार्ग लांबचा, जवळचा असेल त्याप्रमाणे प्रवासाला अधिक-उणा वेळ लागेल इतकेच. शास्त्रीयदृष्ट्या हा वेळ दिवस-मास-वर्षानेच नव्हे, तर क्वचित जन्मानेही मोजावा लागेल. कारण भगवंतांनीच एकदा – *'बहूनां जन्मनामन्ते ज्ञानवान् मां प्रपद्यते ।'* वा *'अनेक जन्मसंसिद्धस्ततो याति परां गतिम् ।।''* (गीता – ७/१९, ६/४५) असे स्पष्टपणे सांगून ठेवले आहे. इतक्या दीर्घकालाचे नाव ऐकले की मग माणसाचा धीर खचतो, प्रयत्न शिथिल पडतात. कारण मुळात त्याचे ठिकाणी निष्ठा नसते. निष्ठा आहे आणि धीर खचतो असे होणे शक्यच नाही. ज्याच्याजवळ निष्ठा नसते त्याला केवळ काही जन्मातच नव्हे, तर श्रीशंकराचार्य म्हणतात त्याप्रमाणे ''कल्पकोटिशतैरपि'' ध्येय प्राप्त होण्याची शक्यता नाही.

निष्ठेचा एक विशेष सांगू? खऱ्या निष्ठावंताला तो करीत असलेल्या साधनेत अधिक गोडी असते. त्या गोडीच्या प्रभावाने तो म्हणतो – देवा! मोक्ष तुमचा तुम्ही ठेवा. मला विचाराल तर *'मनी भक्तीची आवडी । सेवा व्हावी*

*ऐसी गोडी।'* इतर कोणत्याही मार्गापेक्षा सर्वजनसुलभ असलेल्या भक्तीचा डांगोरा पिटण्यासाठी वैकुंठाहून भूलोकी अवतरलेल्या संतांच्या जीवनात या निष्ठेचे स्वरूप दाखविणारे उद्‌गार त्यांनी अनेक वेळा अनेक रीतीने काढले आहेत असे दिसून येते.

केवळ प्रामाणिकपणा आणि उत्कटता असून कसे भागेल? प्रयत्नशीलतेची आवश्यकता नाही काय? असा प्रश्न विचारला जातो. वरवर तो योग्यही वाटतो. पण प्रामाणिकता आणि उत्कटता असेल तर 'प्रयत्नशील हो' असे आवर्जून सांगावेच लागत नाही. प्रामाणिकता निष्क्रिय राहूच शकत नाही. उत्कटता त्याला आळशी होऊ देत नाही. *'अंतरीचे धावे स्वभावे बाहेरी'* असेच होत असते. प्रेम आहे, वात्सल्य आहे, ओढ आहे, आदर आहे, तर तो कृतीतून व्यक्त होत नाही असे होईलच कसे? प्रेमाचे प्रदर्शन नसते. नसावेही. पण भावनानुकूल कृती हा उत्कटतेचा स्वाभाविक परिणाम आहे हे कधीही विसरू नये. अगदी प्राथमिक अवस्थेत मात्र आरंभ प्रयत्नाच्या रूपाने करायचा असतो हे खरे. ते मी पूर्वी विवरून सांगितलेही आहे. आता आपण विषय जाणून घेतो आहोत तो निष्ठेचा. तेथे प्रयत्न वा कृती स्वाभाविकपणेच असतात.

ज्ञानाविषयी निष्ठा असली म्हणजे मग साधनेचे स्वरूप कसे असते ते भगवंत पुढील पाच श्लोकांतून स्पष्ट करून सांगत आहेत. मात्र ती साधना भात शिजल्यानंतर वाफ जिरावी लागते, त्या स्वरूपाची नाही. येथील आरंभ तांदूळ निवडण्यापासून वा निवडलेल्या तांदुळापासून आहे. भगवान् परमवत्सल आहेत. म्हणून त्यांनी फार थोडक्यात सांगून चालणार नाही, ते गळी उतरणार नाही, हे आईच्या हृदयाने जाणून साधना ही पूर्वांग-उत्तरांगासह थोड्या विस्ताराने सांगितली आहे. भगवान् दयाळू आहे म्हणतात, ते किती यथार्थ आहे ते अशा प्रसंगी लक्षात येते. भगवान् म्हणतात –

**बुद्‌ध्या विशुद्धया युक्तो धृत्यात्मानं नियम्य च ।**
**शब्दादीन्विषयांस्त्यक्त्वा रागद्वेषौ व्युदस्य च ।।५१।।**

विशुद्ध बुद्धीने युक्त होऊन आणि धृतीने अंत:करणाचे नियमन करून शब्द, स्पर्श इत्यादी इंद्रियांच्या विषयांना टाकून आणि राग, आसक्ती, हवे

वाटणे, तसेच द्वेष, तिरस्कार, नको वाटणे हे भाव सोडून (साधकाने पुढील श्लोकात सांगितल्याप्रमाणे) वागण्यास आरंभ करावा.

खऱ्या अर्थाने परमार्थमार्गी साधक कसा असावा आणि त्याने काय करावे हे या श्लोकात भगवंत स्पष्टपणे सांगत आहेत. तसे तर मनुष्य म्हणून जन्माला आलेली प्रत्येक व्यक्ती प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे साधक असतेच, निदान असावीच. पण आता जे वर्णन होत आहे, त्या दृष्टीने तेवढे साधकत्व पुरेसे होणार नाही. आता हा पदव्युत्तर अभ्यासक्रम आहे असे म्हणता येईल. शिक्षणाचा आरंभ जरी बालवर्गापासून होत असला तरी बालवर्गातच एक-दोन वर्षे काढून आलेल्याला किंवा थोडीशी अक्षरओळख झालेल्याला कुणी शिक्षित समजत नाही.

येथील साधनेसाठी जो साधक गृहीत धरला आहे, तो केवळ शुद्ध नव्हे, तर विशुद्ध बुद्धीने युक्त असा आहे. ही बुद्धी विवेक-विचाराच्या बळावर पूर्णपणे संशयरहित होऊन स्थिरावलेली आहे. तिला सत्य काय, तत्त्व काय, ध्येय काय हे नीटपणे उलगडलेले आहे. ध्येयाचे स्वरूप स्पष्ट झालेले आहे. साधनामार्ग स्वीकारलेला आहे.

निराळे काही ऐकून, निराळे काही पाहून आता हे का ते, करतो ते योग्य की अयोग्य, पुरेसे की अपूर्ण याविषयी कोणताहि विकल्प तिच्याठायी उरलेला नाही हे झाले 'बुद्ध्या विशुद्धया युक्तः'.

आता जे ठरले, पटले, स्वीकारले आणि त्या मार्गावर वाटचाल आरंभिली ते जसेच्या तसे दृढ धरून ठेवणे हे अत्यंत महत्त्वाचे असते. त्यासाठी अंत:करणात घाई, अधिरेपणा उत्पन्न होता कामा नये. मार्ग एकदा निश्चित निवडला असेल आणि न कंटाळता, न थकता, सातत्याने होत असेल तर किती आलो, किती राहिले यासंबंधीची उत्सुकताही अधिरेपणाचीच निदर्शक असते. किती आलो हे कळल्यामुळे विश्वास वाढतो; आणि किती जायचे आहे हे कळल्यामुळे उत्साह टिकवून ठेवण्यास सहाय्य होते, हे जसे खरे, तसेच किती आलो हे कळल्यानंतर ''हात्तीच्या! एवढेच का?'' असे वाटून निराशा येते व साधनेविषयी अविश्वास वाटू लागतो. त्याप्रमाणेच पुष्कळ वाटचाल झाली असे कळले तर स्वत:च्या पराक्रमाविषयी भलताच विश्वास वाटून पुढे ढिलाईही येऊ शकते.

तसेच किती जायचे आहे हे कळल्यामुळे ''बाप रे! इतके लांब आहे?'' असे वाटून चालण्यातला उत्साह मावळतो. ''आले, थोडे राहिले'' असे वाटणे हीही एक प्रकारे फलाकांक्षाच ठरते. यांतील काही होऊ देता कामा नये. उत्कटता असावी, पण उत्कंठा ही परिणामी साधनविरोधी ठरू शकते. फार सावधपणे हे सांभाळावे लागते. ''धृत्यात्मानं नियम्यच'' हे जे सांगितले आहे ते यासाठीच सांगितले आहे. कोणत्याही प्रकारची चंचलता आली तरी तो प्रकार धीर सुटण्याचाच आहे. अशी चंचलता येण्याला कारणे घडतात, ती अनेक प्रकारची असतात. त्यात इंद्रियांना असणारी विषयाची ओढ हे एक महत्त्वाचे कारण आहे. या श्लोकाच्या तिसऱ्या चरणात त्याचाच उल्लेख केला आहे. (शब्दादीन् विषयांस्त्यक्त्वा).

कानाचा विषय शब्द, त्वचेचा विषय स्पर्श, नेत्राचा विषय रूप, जिभेचा विषय रसास्वाद, आणि नाकाचा विषय गंध किंवा वास. हे सर्व विषय माणसाला निरनिराळ्या प्रकाराने निरनिराळ्या माध्यमातून आकर्षित करीत असतात. वस्तुत: स्वीकारण्यासाठी असलेल्या पदार्थाची वा वस्तूची ओळख करून घेण्यासाठी या शब्दादी विषयांच्या ज्ञानाचा उपयोग व्हायचा असतो. आणि तेवढ्यापुरतेच ते महत्त्वाचे ठरतात. पण माणसाच्या अंत:करणातील शब्दादींचे आकर्षण त्याला एवढ्या उपयुक्ततेच्या मर्यादेत राहू देत नाही. मनुष्य शब्दादींचा लोभी होतो, व्यसनी होतो. हे व्यसन त्याला कोणत्या थराला नेऊन पोचवील याचा मग काही नेम राहत नाही. एका संस्कृत सुभाषितात शब्दादीतील एकेका विषयाच्या लोभाने ते ते प्राणी आपत्तीत सापडतात, प्राणासही मुकतात, तर शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध या पाचही मात्रास्पर्शाचे म्हणजे विषयाचे आकर्षण असलेल्या माणसाचे काय होत असेल याची कल्पनाच करावी, असे म्हटले आहे. ते सुभाषित असे – ''कुरङ्गमातङ्गपतङ्गभृङ्गमीना: हता: पञ्चभिरेव पञ्च । गुणै: समस्तेश्च विमोहितो यो नरो विनश्यत् पथ किं विचित्रम् ।।''

वस्तुत: या शब्दादींच्यातील कशाचीही जाणीव नसणारा वा जाणीव न होणारा माणूसही जगू शकतो. उपनिषदात त्या दृष्टीने आलेली इंद्रिये व प्राण यांच्यातील श्रेष्ठत्वाच्या वादाविषयीची गोष्ट प्रसिद्ध आहे. इतके असूनही या शब्दादींच्या मागे लागण्यात मनुष्याच्या शक्तीचा अपव्यय होत असतो. आणि तो पुष्कळसा अनाठायी असतो.

मनुष्याजवळ इतर कोणाहीजवळ नसलेला चैतन्याचा एक अद्भुत स्रोत आहे. त्याचा उपयोग त्याने प्रामुख्याने आत्मोन्नतीसाठी करून घेतला पाहिजे. पण तसे सहसा घडत नाही. शब्दादी विषयासंबंधीच्या मोहाचे अवजड निगड (बेड्या) जणू त्याच्या पायात घातलेले असते. त्यातून सुटका झाल्याविना प्रगतीची वाटचाल करणे दुष्कर होऊन बसते. यासाठी भगवंताने शब्दादी विषयांचा त्याग करावयास सांगितला आहे.

शब्दादी विषयांचा सर्वथा त्याग करणे हे देहधारणेचा विचार केला तर अशक्य आहे. कठीण तर आहेच आहे. पण खोलवर विचार करून पाहिले असता अनावश्यकही आहे. शब्दस्पर्शादी गुण आपापल्या विषयांच्या वस्तूंच्या आश्रयाने राहतात. त्या त्या ज्ञानेंद्रियांना त्यांची जाणीव होत असते, व्हावीही लागते. इंद्रियांच्या सुस्थितीचे, कार्यक्षमतेचे ते गमक आहे. परंतु हे प्रकरण एवढ्यावरच काही थांबत नाही. एक किंवा अधिक शब्दादी गुणाविषयी माणसाच्या मनात हवे-नकोची भावना निर्माण होते. तिचा परिणाम आत्यंतिक आसक्ती आणि पराकाष्ठेचा द्वेष यात होतो. तदनुकूल कृती घडू लागतात. मग सगळे जीवन संघर्षमय होते. अस्वास्थ्याने भरून जाते. यामुळे व्यावहारिक जीवनाचे जे काय व्हायचे असेल ते होवो, पण पारमार्थिक साधनेत त्यामुळे फारच मोठा अडथळा उत्पन्न होतो, हे विसरून चालत नाही.

करीत असलेल्या पूजापाठांत, नामस्मरणात, वाचन-श्रवणात मन लागत नाही, एकाग्र होत नाही, ही अडचण जवळजवळ प्रत्येक साधकाची असते. याचे सर्वांत महत्त्वाचे कारण अंत:करणात सदैव जागृत असलेली हवे-नकोची भावना हे आहे. हे हवे-नको म्हणजे शास्त्रीय भाषेत रागद्वेष. त्यांचे स्वरूप प्रकृतीप्रमाणे, परिस्थितीप्रमाणे वेगवेगळ्या प्रकारचे असेल. ते कधी अगदी साधारण, क्षम्य असे असेल, तर कधी उग्र-निषिद्ध, निंद्य असेही असेल. पण हे हवे-नको अंत:करणात असते आणि तेच मनाला चंचल करीत असते. साधनेत रमू देत नाही, एकाग्र होऊ देत नाही.

एकदा एक वृद्ध महिला मला भेटण्यास आल्या. अशीच काहीतरी साधनेविषयी चर्चा चालू होती. बाई पंचाहत्तरीच्या वयाच्या, मुद्रेवर सात्त्विकता, वेष साधा, देवधर्म-पूजापाठात वेळ घालविणाऱ्या अशा होत्या. त्या म्हणाल्या, ''गेली कित्येक वर्षे मी नियमाने ज्ञानेश्वरी वाचते. नामस्मरण करते. पंढरपूरला

वारीला जाते. पण अजूनही नामस्मरणात-वाचनात मन रमावे तसे रमत नाही. एकाग्रता तर फारच थोडा वेळ होते, तीही क्वचित् लाभते. असे का व्हावे? इतकी वर्षे करीत आलेल्या साधनेचा काही उपयोग होऊ नये का?''

मी म्हणालो, ''कोणतीही साधना कधी वाया जात नाही. त्यामुळे निराश होण्याचे कारण नाही. पण चिंतनाच्या बळावर आचरणाच्या साहाय्याने मनातील हवे-नको ते क्षेत्र जितके लहान लहान होत जाईल तितके मन अधिकाधिक एकाग्र होण्यास सहाय्य होईल.''

त्या म्हणाल्या, ''अहो! आता मला हवे-नको काय उरणार? मुले मोठी आहेत. नातवंडे आहेत. आम्ही सर्व खाऊन-पिऊन सुखी आहोत. आता हवे-नको काय?''

मी थोडा हसलो आणि म्हणालो, ''तुमचे आता खाण्या-लेण्यातील हवे-नको संपले असेल, शक्य आहे. पण समजा, तुमचे डोके दुखते आहे, डोक्याला पट्टी बांधून तुम्ही आडव्या झाल्या आहात. तेवढ्यात तुमचा मुलगा तुमच्याकडे न पाहता किंवा तुमच्याकडे पाहून ''आई, काय होतेय् ग'' अशी विचारपूस न करता तुमच्या पुढून निघून गेला. तर तुम्हांला काय वाटतं?.'' त्या म्हणाल्या, ''वाईट वाटते. रागही येतो.'' ''मग हवे-नको संपले म्हणता ते काय? अशा पुष्कळ गोष्टी आहेत. तुम्हांला साडेतीन वाजता चहा लागतो. तो सुनेने अर्धा तास उशिरा दिला. कढत लागतो. दिला तेव्हा तितका कढत नव्हता. कडक नव्हता. तो फिक्कट होता. इत्यादी. अशा वेळी काहीच झाले नाही, इतके मन शांत राहते का?'' त्या म्हणाल्या, ''नाही.'' मी म्हणालो, ''आपल्या दैनिक जीवनातील हवे-नको चे स्वरूप असेच असते. 'थेंबेनि विरे । वारेनि सोखे । चिखलु जैसा ।।' अशा श्रीज्ञानेश्वरीत आलेल्या वर्णनाप्रमाणे माणसाच्या मनाची स्थिती असते. एवढे-तेवढे फुसके कारणही चंचलता आणण्यास पुरेसे होते. हिंदुस्थानचा पंतप्रधान व्हावे किंवा मोठा उद्योगपती व्हावे असा विचारही माझ्या मनात येत नाही. पण याचा अर्थ मी विरक्त झालो, नि:स्पृह झालो असा मात्र नाही.'' हवे-नको हे परिस्थितीवर अवलंबून असते आणि त्या मर्यादेत त्या मापानेच मोजावे लागते. पण जिथे ते असेल तिथे ते त्रासदायक व्हायचे ते होतेच.

चित्ताची चंचलता या हवे-नकोच्या बारीक ताण्या-बाण्यानेच विणलेली

असते. ही वीण चांगली दाट असते. तिच्या आवरणाने साधनेचा जीव घुसमटल्याशिवाय कसा राहील? म्हणून भगवंतांनी रागद्वेष सोडून देण्याचा आदेश दिला आहे.

अशा रीतीने बुद्धी शुद्ध झाली आहे. धैर्याने अंत:करण नियंत्रित केलेले आहे. त्यामुळे शरीर-मनाला चंचलता येत नाही. इंद्रिये विषयांकडे ओढ घेत नाहीत. शब्दादी गुणांच्या वैशिष्ट्याविषयीचे रागद्वेष मावळले आहेत. निदान मंदावले आहेत. आता काय करावे ते भगवान् पुढील श्लोकात सांगत आहेत.

**विविक्तसेवी लघ्वाशी यतवाक्कायमानसः ।**
**ध्यानयोगपरो नित्यं वैराग्यं समुपाश्रितः ।।५२।।**

एकांतात राहावे, पचायला हलके, थोडे असे अन्न खावे. शरीर-वाणी-मन यांच्यावर नियंत्रण असावे. वैराग्याचा स्वीकार करावा (आणि मग) नित्यनेमाने ध्यानयोगामध्ये गढून जावे.

एकांतवासामुळे सर्व प्रकारच्या बाह्य संपर्काचा संबंध संपतो, नाहीसा होतो आणि वृत्तींना उत्तेजित करील असे बाहेरचे कारण न उरल्याने त्या शांत, स्थिर होण्यास सहाय्य होते. एकांताच्या अभावी कोणत्या ना कोणत्या प्रकारच्या क्रिया-प्रतिक्रिया सतत घडत असतात. त्यामुळे मनाला, शांतता-स्थिरता येण्यासाठी सवडच सापडत नाही. यासाठी साधकाने दिवसाकांठी काही वेळ तरी निवांतपणे एकटे राहण्याची सवय प्रयत्नपूर्वक करावी. ज्यांना शक्य आहे त्यांनी प्रतिमासी काही दिवस आणि प्रतिवर्षी काही आठवडे एखाद्या पवित्रस्थळी एकाकी राहण्याचा अभ्यास करावा. आरंभी हे थोडे जड वाटते. एकटेपणाचा कंटाळा येतो, करमत नाही. काही लोक तर वेळ खायला उठतो असे म्हणतात. माणसाचे असे होते हे खरे आहे. काही म्हातारी माणसे निरुपायाने स्वीकाराव्या लागणाऱ्या एकाकीपणाला अगदी उबगून जातात. उलट संगतीला दुसरा कोणी असला की त्याच्या वागण्याचा, त्याच्या स्वभावाचा माणसाला उच्छादही वाटत असतो. वृत्तीची बहिर्मुखता हे या कंटाळ्याचे वा उबगाचे कारण असते. यासाठी एकांतवासाची सवय लावून घेतली पाहिजे. म्हणजे वृत्ती अंतर्मुख होणे वा एकाग्र होणे पुष्कळसे सोपे जाते. यासाठीच १३व्या अध्यायामध्ये ''विविक्तदेशसेवित्वं अरतिर्जनसंसदि'' अशा

परस्परावलंबी दोनही गोष्टींचा ज्ञानलक्षणे म्हणून उल्लेख केला आहे.

साधकाने आपला आहार पचावयास हलका आणि प्रमाणाने थोडा ठेवावा. असे केले नाही तर शरीर जड होते, श्रम नकोसे वाटतात, कष्टाचा कंटाळा येतो. निरनिराळ्या व्याधींना शरीरामध्ये घर करण्यास अवसर मिळतो. अर्थातच साधना जशी घडावयास पाहिजे तशी घडत नाही. आळसाचे प्रमाण वाढू लागते. क्वचित शरीराने करायची कामे नीटपणे करता आली तरी वाचन, पाठांतर, चिंतन, श्रवण या वेळी नेमकी झोप येते. झोपेवर नियंत्रण ठेवण्यासाठी लघु-आहार हे महत्त्वाचे साधन आहे. मात्र लघ्वाशी असावे म्हणजे भूक मारावी असा अर्थ करू नये. शरीर सडपातळ अवश्य असावे, पण अशक्त होणार नाही याची दक्षता घ्यावी. तप किंवा योगाभ्यास ही ज्यांची साधना आहे, त्यांचा विचार स्वतंत्रपणे करावा लागेल.

शरीर नियंत्रित ठेवण्यासाठी लघु आहाराचा उपयोग होतो. त्यामुळे मलमूत्राचे वेग आवश्यक त्या मर्यादेच्या आत राहतात. झोप थोडी पुरते आणि आसन-जयासाठी आवश्यक असलेली शरीराची स्थिरता सुखाने साधते. मनावर नियंत्रण प्रस्थापित होईल तेव्हा होईल, त्याआधी शरीर तरी स्वाधीनचे असले पाहिजे. भिंतीला न टेकता ताठ बसता येणे, हाता-पायाची चाळवाचाळव वरचेवर न करावीशी वाटणे, हे सर्व आवश्यक आहे. पण इकडे कोणाचे लक्ष नसते. कीर्तन प्रवचनाच्या वेळी बसणाऱ्या श्रोत्यांच्याकडे नीट पाहिले तर हे लक्षात येईल. त्यांची चुळबुळ सारखी सुरू असते. आणि हातापायांचीही हालवाहालव नीटपणे करता येत नाही म्हणून ते भोवतालच्या लोकांवर सारखे धुसफुसत असतात. शरीर नियंत्रित नसण्याचेच हे लक्षण आहे.

शरीराप्रमाणेच वाणी-मनही नियंत्रणात असावे लागते. वाणीवरचे नियंत्रण ही तर पूर्णपणे दुर्लक्षित झालेली गोष्ट आहे. आपण नको तितके, नको त्या वेळी, नको तिथे, नको त्याच्याशी, नको ते सारखे बोलत असतो. खरे तर मन आवरण्याइतके वा शरीर स्थिर ठेवण्याइतके न बोलणे काही अवघड नाही. पण असे असूनही मंदिरात वा कीर्तन-प्रवचनात शांतता ही गोष्ट दुर्मिळ झालेली आहे. मंदिरात, कीर्तन-प्रवचनात कुणी भेटला की भेटणारा माणूस जणू किती वर्षांनी भेटला आहे, आणि पुन्हा कधी भेटतो की नाही, कोणास ठाऊक, या भावनेने मनुष्य त्याच्याशी बोलता येईल तेवढे बोलून

घेत असतो. मन आवरावयास शिकायचे असेल तर वाणीवर नियंत्रण ठेवणे हे त्या दृष्टीने फार उपयोगी पडणारे आहे. आयुर्वेदाने बोलणे हे उदानवायूचे कार्य सांगितले आहे. बोलण्याप्रमाणेच प्रयत्न, ऊर्जा, बल, वर्ण आणि स्मृती हीही कार्ये उदानवायूची आहेत. तेव्हा प्रयत्न, बल, स्मृती, उत्साह या गोष्टी टिकून राहाव्यात, त्यासाठी लागणारी शक्ती पुरेशा प्रमाणात उपलब्ध व्हावी, असे वाटत असेल, तर वाणीवाटे वाया जाणारे उदानाचे सामर्थ्य राखून ठेवणे आवश्यक आहे. तपाच्या काही प्रकारात मौन हे एक विशेष प्रकारचे तप म्हणून अवलंबिले जाते. वरवर दिसताना मौनाचा संबंध वाणीशी आहे असे वाटत असले तरी मौन पाळणे हे खरोखरीच मनाच्या निग्रहावर अवलंबून आहे. म्हणून गीतेने सतराव्या अध्यायात मानसतप कशाला म्हणतात ते सांगत असताना ''मौन'' हे मनाचे तप म्हणून सांगितले आहे. वाणीचे अधिष्ठान असलेली जीभ हा अवयव बोलण्याच्या दृष्टीने वागींद्रिय म्हणजे जसे कर्मेंद्रिय आहे, त्या प्रमाणेच रसास्वादाच्या दृष्टीने रसनेंद्रिय म्हणजे ज्ञानेंद्रियही आहे. तेव्हा वाणीवर नियंत्रण ठेवण्याच्या निमित्ताने सर्वच इंद्रियांचा संयम उपासकाने प्रयत्नपूर्वक, अभ्यासपूर्वक साधणे आवश्यक आहे.

वाणी आणि शरीर यानंतर आवरावयास सांगितले आहे ते मन. मन आवरणे ही गोष्ट सर्वांत अवघड आहे, त्याप्रमाणेच अत्यंत आवश्यक म्हणून महत्त्वाची आहे. मन आवरणे ही एक स्वतंत्र साधना आहे. एवढेच नव्हे तर तीच एकमात्र साधना आहे, असे म्हटले तरी त्यात अतिशयोक्ति झाली असे मानायचे कारण नाही. कोणत्याही परिस्थितीत मन शांत, प्रसन्न राहू लागले, वागणुकीत सौम्यपणा दिसू लागला, क्षुब्धता प्रत्ययास येईनाशी झाली की मन आवरता येऊ लागले आहे असे समजावे.

एकांतवासात राहणे, आहार हलका-थोडा असणे, वाणी-शरीर-मन यांवर नियंत्रण असणे या गोष्टी जितक्या प्रमाणात साधतील तितक्या प्रमाणत वैराग्य प्राप्त झाले आहे असे समजावे. वैराग्यशब्द विराग शब्दातून निर्माण झालेला आहे. वि+राग = विराग. वि म्हणजे गेला आहे, नाहीसा झाला आहे. राग म्हणजे अभिलाष, आसक्ती, हवे वाटणे, पाहिजे वाटणे. यातच नको वाटणेही समाविष्ट होते. असा हा हवे-नको वाटण्याचा अभाव म्हणजे विराग, ज्या वेळी प्रत्यक्ष वागणुकीतून, आचार-विचारातून स्पष्टपणे प्रगट होऊ

लागतो तेव्हा ''वैराग्यं समुपाश्रित:'' असे झाले आहे, वैराग्याचा योग्य प्रकारे त्याने आश्रय केला आहे असे समजावे.

हे असे झाले म्हणजे 'ध्यानयोगपरोनित्यं' व्हावे. ध्यान हे अष्टाङ्गयोगातील सातवे अंग आहे. यापुढे समाधीची एकच अवस्था उरते. ती प्राप्त झाली की योग पूर्ण झाला असा योगशास्त्राचा सिद्धांत आहे. ध्यानापूर्वीच्या सहा अंगांत अहिंसा - सत्य - अस्तेय - ब्रह्मचर्य - अपरिग्रह हे पाच यम आणि शौच- संतोष - तप - स्वाध्याय - ईश्वरप्रणिधान हे पाच नियम अशी दोन अंगे अगदी आरंभीच उल्लेखिलेली आहेत. त्यानंतर आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा अशा अंगांचा उल्लेख येतो. ही सहा अंगे नीटपणे साधली म्हणजे मग ध्यानाच्या दृष्टीने प्रगती होऊ लागते.

ब्रह्मसूत्राने ''आसीन: संभवात्'' आणि ''अचलत्वं चापेक्ष्य'' या दोन सूत्रांच्या द्वारा ध्यानासाठी कसे बसावे, कसे असावे ते सूत्ररूपाने सांगितले आहे. येथेही गीतेने ध्यान योगपर व्हावे असे सांगितले आहे. त्याच्याआधी बुद्धी शुद्ध असावी, धैर्याने अंत:करण आवरून घ्यावे, शब्दादी विषयाच्या मोहात पडू नये, रागद्वेष टाकावेत, एकांतात राहावे, मोजके खावे, वाणी- शरीर-मन नियंत्रित असावे अशा सात गोष्टींचा पूर्वसिद्धता म्हणून उल्लेख केला आहे.

गीतेच्या सहाव्या अध्यायात ध्यानाची साधना कशी करावी हे अधिक स्पष्टपणे प्रगट केले आहे. त्या प्रकरणाचा श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी केलेला विस्तार त्यांच्या नाथपंथीय परंपरेच्या दृष्टीने केलेला आहे. सर्वसामान्याला साधणारा तो मार्ग नव्हे. हे श्रीज्ञानेश्वरमाऊलीनीच पुढे १२व्या अध्यायात स्पष्टपणे सांगितले आहे. ध्यानसाधनेचा अवलंब काही एका स्थूल अर्थाने चित्ताच्या एकाग्रतेसाठी आणि भावानुरूप होऊ शकणाऱ्या साक्षात्कारासाठी उपासना म्हणून करता येतो. पण तेथेही ही प्रक्रिया मुख्यत: गुरुबोधगम्यच आहे. अधिकारी व्यक्तीच्या मार्गदर्शनानेच या ध्यानसाधनेचा अवस्थाक्रम वा बारकावा नीट समजून घेतला पाहिजे. कुणीही, अगदी कुणीही केलेल्या शाब्दिक वर्णनाचा प्रत्यक्षात साधना म्हणून फारसा उपयोग होत नाही. क्वचित संभ्रमही निर्माण होऊ शकतो, हे प्रत्येकाने कटाक्षाने लक्षात ठेवले पाहिजे. मात्र शास्त्रप्रचीतीच्या दृष्टीने काही गोष्टी जाणून घेतल्या तर साधकाची विवेकबुद्धी

जागृत होऊ शकते आणि तो महंतीच्या आकर्षक प्रभावाने कुठेतरी भरकटला जाऊन फसगत न होण्याइतका सावध राहू शकतो, म्हणून शास्त्रदृष्टीने काही गोष्टी समजून घेणे उपयुक्त आहे. नाहीतरी साधनेचा क्रम–आधी शास्त्रप्रचीती, मग गुरुप्रचीती आणि नंतर आत्मप्रचीती असाच आहे.

आपल्या प्रकृति–प्रवृत्तीला अनुसरून धारणा–ध्यान या क्रमाने साधना करावी. ''देशबंधश्चित्तस्य धारणा'' अशी धारणेची व्याख्या पातञ्जल योगसूत्राने केलेली आहे. नाना प्रकाराने, नाना निमित्ताने भरकटणाऱ्या मनाला–ओढाळ जनावराला खुंट्याला बांधून ठेवतात त्याप्रमाणे–कोणत्या तरी एका प्रतीकाशी, एका आलंबनाशी बांधून ठेवण्याचा प्रयत्न करणे म्हणजे चित्ताचा देशबंध. हे प्रतीक किंवा आलंबन गुरूने सांगितले असेल त्याप्रमाणे स्वीकारणे बरे. पण काहीच प्रतीक न स्वीकारणे ही गोष्ट मात्र इष्ट नाही. आलंबन वा प्रतीक नसेल तर धारणा–ध्यानाची परिणती आत्मसंमोहनात होऊ शकते. आणि या भानरहित अवस्थेत विकृत स्वरूपाचे ध्वनी मुखावाटे उमटतात वा वेड्यावाकड्या हालचाली होऊ शकतात. हे असे होणे अनिष्ट समजावे. अंतर्मनात सुप्त असलेल्या विकृतीचे विमोचन वा विरेचन वेड्यावाकड्या चाळ्याच्या रूपाने होत आहे असे या दशेचे समर्थन केले जाते, ते योग्य नाही. आपल्या आवडीचे, देवतेचे, संताचे वा गुरूचे चित्र किंवा '**ॐ, श्री 卐**' असे काही चिन्ह चांगल्या स्थितीत काढलेले समोर ठेवावे. त्याची उंची आपले हृदयाच्या पुढे येईल अशी किंवा थोडीशी खाली असावी व त्यावर मन एकाग्र करण्याचा प्रयत्न करावा. मन एकाग्र करणे अशक्य वाटेल इतके भरकटले तरी धीर सोडू नये. अभ्यासाला कंटाळू नये. तसेच एकाग्र मन, एका जागी बांधून ठेवण्याचा प्रयत्नही फार हट्टाने करू नये. मनाच्या भरकटण्याकडे थोडे उपेक्षाबुद्धीने, थोडे तटस्थपणे पाहण्यास शिकावे. मनात येणारे विचार एकातून एक असे साखळीच्या स्वरूपात येणार नाहीत अशी दक्षता घ्यावी. म्हणजे क्रमाक्रमाने विचारांची संख्या, गती, क्षेत्र उणावत जाते आणि एकाग्रता वाढत जाते. एखादे लहानमोठे स्तोत्रही प्रतीक किंवा आलंबन म्हणून स्वीकारता येते. स्तोत्र उच्चारीत असताना त्यातील अर्थावर लक्ष ठेवावे आणि शब्द जसा उच्चारला जात आहे त्याप्रमाणे तो त्याच वेळी आपण ऐकतही आहोत अशी भावना ठेवावी. चित्ताची एकाग्रता साधून घटका दोन घटका स्थिर

झाली म्हणजे धारणेच्या क्षेत्रातून ध्यानाच्या क्षेत्रात प्रवेश झाला आहे असे समजावे. ध्यानविषयाला स्थिरता येणे, मनाला विलक्षण प्रसन्नतेचा अनुभव येणे, ध्यानाच्या प्रतीकात्मकतेला मूर्तत्व येऊन तेथे शब्दस्पर्शादींसारख्या दिव्य विषयांची अनुभूती येणे इत्यादी इत्यादी अनुभव पुढे पुढे येत जातात. त्यामुळे ध्यान ओसरल्यानंतरही अंत:करणाला प्राप्त झालेली प्रसन्नता सामान्य व्यवहारात वागतानाही अबाधितपणे टिकून राहते. वैराग्य जो जो अधिक प्रामाणिक आणि उज्ज्वल तो तो ही साधना सुलभ होत जाते. वैराग्य हे जणू ध्यानाचे कवच आहे असे समजावे. फळाफुलांनी डवरलेल्या संपन्न शेतीला जसे चांगले कुंपण आवश्यक आहे, तेच कार्य साधनेच्या दृष्टीने वैराग्याचे असते.

यातील काहीही साधणे, अगदी थोड्या प्रमाणात साधणे हाही दीर्घकालीन अभ्यासाचा परिणाम असतो. हा अभ्यासही अखंडितपणे आणि श्रद्धायुक्त अंत:करणाने, प्रेमादराने करावा लागतो. प्रगती किती झाली, होते आहे की नाही हा विचार सारखा मनात येणे हीही एक प्रकारची फलाकांक्षाच आहे. ती साधनेला बाधक ठरल्याशिवाय राहणार नाही. प्रयत्न सुटणार नाहीत, साधना मंदावणार नाही एवढी दक्षता घ्यावी. इतर सर्व भगवंताच्या कृपेवर सोपवून द्यावे. ''वैराग्यं समुपाश्रित:'' हे म्हणण्यात हाही भाव गृहीत आहे.

वैराग्य सर्वांगाने परिपूर्ण होण्यासाठी कशाकशाचा त्याग करावा लागतो, ते भगवंतांनी पुढील श्लोकातील पहिल्या ओळीत सांगितले आहे आणि दुसऱ्या ओळीत परिपूर्णतेनंतर प्राप्त होणाऱ्या अवस्थेचेही वर्णन भगवंतांनी केले आहे.

**अहंकारं बलं दर्पं कामं क्रोधं परिग्रहम् ।**
**विमुच्य निर्मम: शान्तो ब्रह्मभूयाय कल्पते ।।५३।।**

अहंकार, सामर्थ्य, दर्प, काम, क्रोध आणि निरनिराळ्या प्रकारचा संग्रह या सर्वांचा समूळ त्याग करून ध्यानयोगी ज्या वेळी पूर्णपणे निर्मम होतो, त्या वेळी तो सर्वार्थाने शांत होतो, आणि मग त्याला ब्रह्म होण्याची योग्यता प्राप्त होते.

या श्लोकात आलेले अहंकार, बल, दर्प, काम, क्रोध हे विकार त्याज्य म्हणून साधनामार्गात अनेक ठिकाणी उल्लेखिले जातात. आसुरी प्रकृतीच्या

लक्षणात तर ही अहंकारादींची नावे याच क्रमाने आली आहेत. येथे असलेल्या परिग्रहाचा उल्लेख आसुरी लक्षणात स्पष्टपणे आलेला नाही, इतकेच. तेथेही परिग्रह या अर्थाचे वर्णन आहे. पण ते अत्यंत उग्र स्वरूपात आहे. ''इदमद्य मया लब्धं इमं प्राप्स्ये मनोरथम् । इदमस्तीदमपि मे भविष्यति पुनर्धनम् ।।'' (गीता १६/१३) हे परिग्रहाचेच हिंसा, अन्याय, दुष्टता यांतून व्यक्त झालेले भयानक स्वरूप आहे. आसुरी प्रकृतीत वर्णन केलेल्या सर्व लक्षणांचा उपसंहार कार्यकारणात विलीन व्हावे त्या पद्धतीने भगवंतांनी १६व्या अध्यायात अहंकारादी लक्षणांचा उल्लेख करून केला आहे.

कामक्रोधांचा उल्लेख तिसऱ्या अध्यायात मनुष्याचे महाभयंकर शत्रू या स्वरूपात आला आहे; तर १६व्या अध्यायात नरकात नेऊन पोचविणारे दार म्हणून आला आहे.

प्रियाप्रिय, रागद्वेष, हर्षामर्ष, इष्टानिष्ट इत्यादी सर्व काम-क्रोधाचीच नामांतरे आहेत असेही म्हणता येईल. यांच्यापासून सर्वदा मुक्त व्हावे म्हणजेच श्रेष्ठ पदाची प्राप्ती होते, असे वर्णन गीतेने अनेक संदर्भात अनेक ठिकाणी केले आहे.

वीतरागभयक्रोधः स्थितधीर्मुनिरुच्यते । (२/५६) रागद्वेषवियुक्तैस्तु विषयान् इंद्रियैश्चरन् । आत्मवश्यैर्विधेयात्मा प्रसादमधिगच्छति। (२/६४) इंद्रियस्येन्द्रियस्यार्थे रागद्वेषौ व्यवस्थितौ । तयोर्न वशमागच्छेत् तौह्यस्य परिपन्थिनौ । (३/३४) वीतरागभयक्रोधा मन्मया मामुपाश्रिताः । बहवो ज्ञानतपसा पूता मद्भावमागताः ।। (४/१०) ज्ञेयः स नित्यसंन्यासी यो न द्वेष्टि न कांक्षति । (५/३) न प्रहृष्येत् प्रियं प्राप्य नोद्विजेत् प्राप्य चाप्रियम् । स्थिरबुद्धिरसंमूढो ब्रह्मविद् ब्रह्मणि स्थितः । (५/२०) विगतेच्छाभयक्रोधो यः सदा मुक्त एव सः । (५/२८) सर्वसंकल्पसंन्यासी योगारूढस्तदोच्यते । (६/४) निःस्पृहः सर्वकामेभ्यः युक्त इत्युच्यते तदा । (६/१८) संकल्पप्रभवान् कामान् त्यक्त्वा सर्वानशेषतः । (६/२४) हर्षामर्षभयोद्वेगैः मुक्तो यः स च मे प्रियः । (१२/१५) यो न हृष्यति न द्वेष्टि न शोचति न काङ्क्षति । (१२/१७) नित्यं च समचित्तत्त्वं इष्टानिष्टोपपत्तिषु । (१३/९) न द्वेष्टि संप्रवृत्तानि न निवृत्तानि काङ्क्षति । (१४/२२) हे सर्व पाहिले म्हणजे मग क्रमयोगाची सर्वश्रेष्ठ साधना सांगत असताना पुन्हा आसुरी प्रकृतीच्या लक्षणांतही ज्यांचा उल्लेख आहे

अशा अहंकारादी विकारांचा साधनेच्या अत्युच्च पातळीवरही त्याग करावा अशा संदर्भात उल्लेख का यावा अशी शंका येते. याचे उत्तर थोडक्यात असे की, येथील अहंकारादी विकारांचे स्वरूप हे स्थूल नाही, अत्यंत सूक्ष्म असे आहे. गीतेनेच एके ठिकाणी अहंकार हा सर्वांत सूक्ष्म असल्याचा उल्लेख केला आहे. गीतेच्या सातव्या अध्यायात भगवान् स्वत:च्या अपरा प्रकृतीचे स्वरूप सांगत असताना म्हणतात. – ''भूमिरापोऽनलो वायुः खं मनो बुद्धिरेव च । अहंकार इतीयं मे भिन्ना प्रकृतिरष्टधा ।। अपरेयम् ----------।।''

पृथ्वी, जल, अग्नी, वायू, आकाश, मन, बुद्धी, अहंकार ही माझी आठ प्रकारची अपरा नावाची प्रकृती आहे. येथे पृथ्वीपासून अहंकारापर्यंत स्थूलाकडून सूक्ष्मसूक्ष्मतर अशा पदार्थाचे क्रमाने वर्णन आले आहे. याच्याचपुढे जीव नावाची आपली परा-प्रकृती असल्याचा उल्लेखही भगवंत करतात. अपरा प्रकृतीचे स्वरूप वर्णन करताना पृथ्वी इत्यादी ज्या आठ गोष्टींचा उल्लेख केला आहे, त्यात बुद्धी सातवी आणि अहंकार आठवा आहे. याचा अर्थ असा की, बुद्धीपेक्षा अहंकार सूक्ष्म आहे आणि बुद्धीच्या पलीकडचाही आहे. येथे जे साधनेचे प्रकरण सांगितले जात आहे, त्याचा आरंभ विशुद्ध बुद्धीपासून उल्लेखिला आहे. अर्थातच बुद्धी शुद्ध झालेली असली तरी तिच्याहून सूक्ष्म आणि तिच्याहून पलीकडे असलेल्या अहंकाराच्या आश्रयाने काही दोष राहू शकतात. म्हणजेच हा अहंकार सदोष असतो, दोषांनी युक्त असतो. त्यामुळे साधनेच्या अंतिम अवस्थेत हा अहंकार काही अडथळे निर्माण करू शकतो. अर्थात सावध राहून या दोषयुक्त अहंकाराचा त्याग करणे हे साधकाच्या दृष्टीने आवश्यक ठरते; अपरिहार्यही असते. अशा या सूक्ष्म अवस्थेतील अहंकाराचाच त्याग करावा असे भगवंत सांगत आहेत.

असा हा सूक्ष्म अहंकार आणि त्यातून निर्माण होणारे बल-दर्पादी सूक्ष्मतेमुळे सहजासहजी लक्षात न येणारे दोष यांची जाणीव होण्यासाठीही प्रेमादराने दीर्घकालपर्यंत अखंडितपणे अवलंबिलेले आणि उत्कृष्ट वैराग्याची जोड असलेले ध्यान साधलेले असावे लागते. त्या ध्यानात सहजता आणि प्रसन्नता असावी लागते. वस्त्र अत्यंत स्वच्छ, शुभ्र असले तरच त्याला लागलेला अगदी थोडासाही मळ झटकन लक्षात येतो. पाणी स्फटिकासारखे स्वच्छ असेल तर त्याच्या तळाशी असलेला गाळ वरूनही दिसू शकतो.

ध्यानाभ्यासाने अहंकाराच्या आश्रयाने असलेल्या सूक्ष्म दोषाचीही तशीच जाणीव होते. या दोषांचे ज्ञान करून घेऊन ते दोष आणि त्यांना कारणीभूत होणारा अहंकार यांचा त्याग करून पूर्णपणे निर्मम व्हावे म्हणजे शांती लाभते. आणि ब्रह्मत्वाला पोचण्याची योग्यता येते.

हे अहंकारादी दोष सूक्ष्म असतात हे सांगितलेच आहे. त्यांची दोषास्पदता समजून घेण्याचा आपण थोडासा प्रयत्न करूया. समजून घ्यायचे म्हणजे शब्दांचाच आश्रय करावा लागेल. आणि शब्द हे फार सूक्ष्मापर्यंत पोचू शकत नाहीत. त्यामुळे वर्णन शब्दात आले की ते स्थूलाचेच वाटते. समज चांगली जागृत ठेवून अवधानपूर्वक ऐकले तर त्यातील आशय हा वाटतो तसा स्थूल नसून सूक्ष्म आहे याचे आकलन होऊ शकते. कृपा करून आपण त्या दृष्टीने प्रयत्नशील व्हावे अशी विनंती करतो. श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी श्रोत्यांना काही प्रसंगी अशा स्वरूपाची विनवणी केली आहे. ''जैसे शारदीचिये चंद्रकळे –। माजी अमृतकण कोवळे । ते वेचिती मने मवाळे । चकोरतलगे ।। तियापरी श्रोता । अनुभवावी हे कथा । अति हळुवारपण चित्ता । आणूनिया ।। हे शब्देविण संवादिजे । इंद्रिया नेणता भोगिजे । बोलाआदि झोंबिजे । प्रमेयासी ।। जैसे भ्रमर परागु नेति । परी कमळदळे नेणती । तैसी परी आहे सेविती । ग्रंथी इये ।। का आपुला ठावो न सांडिता । आलिंगिजे चंद्रु प्रगटता । हा अनुरागु भोगिता । कुमुदिनी जाणे ।। ऐसेनि गंभीरपणे । थिरावलेनि अंत:करणे । आथिला तोचि जाणे । मानू इये ।। आहो अर्जुनाचिये पांती । जे परिसणया योग्य होती । तिही कृपाकरून संती । अवधान द्यावे ।।'' (ज्ञाने. १/५६ते६२). आता ''आत्मप्रभा नीच नवी । तेचि करूनि ठाणदिवी । जो इंद्रियाते चोरून जेवी । तयासीचि फावे ।। येथ श्रवणाचेनि पांगे – । वीण श्रोतया व्हावे लागे । हे मनाचेनि निजांगे। भोगिजे गा ।। आहाच बोलाची वालीफ फेडिजे । आणि ब्रम्हाचियाची अंगा घडिजे । मग सुखेसी सुरवाडिजे । सुखाचिमाजी ।। ऐसे हळुवारपण जरी येईल । तरीच हे उपेगा जाईल । एरव्ही आघवी गोठी होईल । मुकयाबहिरयाची ।।'' (ज्ञाने. ६/२३ते२६). गुंजेचे मोल सोन्याच्या पासंगाला पुरेल इतके नसते. तरी गुंजांनीच सोने तोलले जाते. तसेच मी श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या शब्दांचा उपयोग केला आहे असे समजावे. विचारांची सूक्ष्मता जाणून घ्यायची असेल तर श्रवणाचे वेळी सावध असावे लागते. एवढे लक्षात आणून देण्यासाठीच मी हे धारिष्ट केले आहे. असो.

आठव्या क्रमांकावरील अहंकार हा सातव्या क्रमांकावरील बुद्धीपेक्षा सूक्ष्म आहे हे आपण पाहिले. पण असा सूक्ष्म अहंकारही भगवंतांनी आपल्या अपरा प्रकृतीचा भाग असल्याचे सांगितले. पुढे जीवनरूपाने सांगितलेली परा प्रकृती – ''अपरेयमितस्त्वन्यां प्रकृतिं विद्धि मे पराम् । जीवभूतां महाबाहो ययेदं धार्यते जगत्।।'' (अ. ७/५) ही अपरा प्रकृतीपेक्षा सूक्ष्म आहे हे उघडच आहे. या जीवाचे स्वरूप सांगताना शास्त्रकारांनी अंत:करणावच्छिन्न चैतन्य किंवा अंत:करणोपाधिक चैतन्य असे म्हटले आहे. म्हणजे चैतन्य ज्या वेळी अंत:करणाने मर्यादित होते किंवा अंत:करणाच्या उपाधीत गुंतते तेव्हा जीवभावाला प्राप्त होते. मन–बुद्धी–अहंकार यांना अंत:करण म्हणतात. म्हणजे परा प्रकृतीच्या स्वरूपात असलेल्या जीवाच्या ठिकाणीही मन–बुद्धी आणि अहंकार यांचा समावेश आहे. अर्थातच या जीवातील मन–बुद्धी–अहंकाराचे स्वरूप अपरा प्रकृतीत वर्णिलेल्या मन–बुद्धी–अहंकारापासून सूक्ष्मतर आहे हे मान्य करावेच लागते. हाच अहंकार वैराग्यपूर्वक ध्यानाच्या दृढ साधनेत स्थिरावलेल्या, निमग्न झालेल्या, गढून गेलेल्या साधकास आता सोडायचा आहे. कारण ''अहं ब्रह्मास्मि'' या साक्षात्काराच्या पातळीवर पोचलेल्या ज्ञानातहि हा अहंकार सोहंभावाची अटक निर्माण करू शकतो आणि मोक्षसुखासाठी तो रंकही बनवू शकतो. ''आम्ही झालो'' ही भावना उत्पन्न करून निखळ अज्ञानाच्या पातळीपर्यंत उतरवूही शकतो आणि मग हे आरंभी लेशमात्र वाटले तरी वासनांचे सामर्थ्य वाढवू शकते. निस्त्रैगुण्य झालो या दर्पाने नीति–नियमांच्या मर्यादेचे उल्लंघन करविते, प्राप्त पुरुषालाही कामक्रोधांच्या पाशात गोवविते. आणि मग सांसारिक सुखदु:खांचा भोग भोगण्यास भाग पाडते. हे अध:पतन इतके नकळत होते की तो भला साधकही परिग्रहाच्या पाशात गुंतून जातो. घरदार–मुलेबाळे व्यवहारत: सोडलेली दिसली तरी मठमहंति, शिष्यशाखा, गुरुत्वाचा गौरव, संतत्वाची प्रतिष्ठा, लौकिकासाठी लोकसंग्रह, लोकसंग्रहासाठी मानसन्मान या वलयात तो गुंतून राहतो. आपली तटस्थवृत्ती, उदासीनता तो राखू शकत नाही. वैराग्याचा कस उणावतो. सत्कार–समारंभ कुठेतरी हवेहवेसे वाटतात. त्यासंबंधीचे आकर्षण वाढत जाते आणि मग असे सन्मानोत्सव घडावे असा प्रयत्न प्रत्यक्ष–अप्रत्यक्षपणे, हस्ते–परहस्ते केला जातो. साध्यासुध्या संभाषणातूनहि हा आत्मगौरव मग प्रगट होत राहतो.

आपण करीत असलेले कार्य हे ईश्वराचे कार्य असून आपण ते लोकोद्धारासाठी, लोककल्याणाकरिता करीत आहोत, तो भार जणू ईश्वरानेच आपल्या शिरावर ठेवला आहे, माझ्याशिवाय हे कार्य दुसरा कोण करू शकणार? ईश्वर हे कार्य माझ्याकरवी करीत आहे अशा तऱ्हेची भावना जी कळत-नकळत अहंकाराचीच असते, तिचा परिणाम म्हणून कोणत्या ना कोणत्या स्वरूपाची, आत्मगौरवाची भाषा प्रगट होत असते. लोककल्याणासाठी उण्याअधिक प्रमाणात प्रचाराचा अवलंब करावा लागतो. प्रसिद्धीची साधने स्वीकारावी लागतात. सत्कार-गौरवाच्या स्वरूपाने हे साधत असल्याने आम्हांला अशा समारंभास मान्यता द्यावी लागते इत्यादी इत्यादी समर्थनेही दिली जातात, केली जातात. अहंकार किती विविध अंगाने प्रगट होऊ शकतो ते अशा प्रसंगाने लक्षात येते. लक्षात येऊ शकते.

या ठिकाणी आणखी एक सूचना किंवा चेतावणीच म्हणा देऊन ठेवणे आवश्यक वाटते, ती ही की, वर उल्लेखिलेल्या स्वरूपाची काही विधाने वा उद्गार सहज, स्वाभाविक, वास्तव स्वरूपाचेही असू शकतात. ते अहंकाराचे आहेत असे वाटणे हा ऐकणाराच्या अंत:करणातील अहंकाराचा परिणामही असू शकतो. या ठिकाणी 'सत्य असत्यासी मन केले ग्वाही' एवढीच एक कसोटी असू शकते. तिच्यावर आपले अंत:करण पारखून घेतले पाहिजे. कोणाशी तरी तुलना करण्याचा मोह टाळला की ही पारख करणे सोपे जाते. असो.

बरेच दिवसांपूर्वी माझी एका महंताशी गाठ पडली होती. आमच्या चर्चेचा विषय अत्यंत तात्त्विक होता. त्या वेळी ते गृहस्थ मला म्हणाले - 'मला जे मानतात असे लोक पुष्कळच आहेत. पण मी ज्यांना आपले म्हणतो असे लोक तुमच्या या पश्चिम महाराष्ट्रात तीन हजाराच्या वर आहेत.' त्या संभाषणाच्या संदर्भात या उल्लेखाची आवश्यकता वस्तुत: काही नव्हती. तसेच दुसऱ्या एका महंताने ''माझे एका महानगरात स्वत:च्या स्वामित्वाचे चार-चार, पाच-पाच खोल्यांचे स्वतंत्र कक्ष आहेत; आणि माझ्या सेवेला म्हणेन तेव्हा चार नव्या कोऱ्या गाड्या तत्पर असतात; ही माझ्यावर भगवंताची केवढी कृपा आहे! नाही तर मुळात मी अगदी सामान्य मध्यमवर्गीय होतो.'' असे सांगितले. तिसरे एक महंत काही कौटुंबिक आपत्तीत सापडले आणि त्या वेळी म्हणाले, ''गेली

पंचवीस-तीस वर्षे मी भगवंताची सेवा केली. भगवद्भक्तीचा जीव तोडून प्रसार केला. लाखो लोकांना हरिभजनास लावले. त्या माझ्यासारख्यावर लाजेने खाली मान घालावी लागावी अशी लाजीरवाणी आपत्ती यावी का?'' ही उदाहरणे म्हणजे केवळ सत्यकथने आहेत. यात अतिशयोक्ती किंवा विनोद यत्किंचितही नाही. ते तिघेही तसे परमार्थमार्गी, सज्जन, आणि मान्यताप्राप्त व्यक्ती आहेत. तरीही त्यांची भावना कशी अहंकाराने, ममत्वाने वा आकांक्षेने व्यापलेली आहे ते त्यांच्या उद्‌गारावरून दिसते. हा अहंकार, तज्जन्य रागद्वेष आपल्या विषयाच्या अनुषंगाने फार सूक्ष्म आहेत असे म्हणता येणार नाही. तसे ते स्थूलच आहेत. पण त्या विकारांचा चिवटपणा मात्र लक्षात घेतला की त्यांचे आश्रयस्थान सूक्ष्म आहे असे म्हणता येऊ शकते.

सत्कर्म करीत असतानाही कार्याचा व्याप वाढत जातो. कार्यकर्त्यांची सेना उभी राहते. त्यासाठी सोयीचे स्थान, आवश्यक ती साधने आणि विशाल जनसमूहाला आकर्षित करील असे ऐश्वर्य इत्यादी इत्यादी सर्व गोळा करणे आवश्यक वाटते. हा परिग्रहाचा विस्तार ममत्वाचे क्षेत्र वाढवीत नेतो. आणि श्रेष्ठ प्रतीच्या साधकालाही शेवटी सामान्य सांसारिकाच्या पातळीवर उतरवितो. श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी येथेच परिग्रहावर भाष्य करताना ज्या दोन ओव्या दिल्या आहेत त्यावरून माझ्या विवेचनाला मोठा आधार आहे हे आपल्या लक्षात येईल. ''शिष्यशास्त्रादिविलासे । मठादि मुद्रेचेनि मिसे । घातले आहाती फासे । निसंगाजेणे ।। घरी कुटुंबपणे सरे । तरी वनी वन्य होऊनि अवतरे । नागवियाहि शरीरे । लागला आहे ।।'' (ज्ञा. १८/१०६४-६५) यासाठी भगवान् अहंकारापासून परिग्रहापर्यंतच्या चढत्या गोष्टी सांगून त्यांचा त्याग करून निर्मम व्हावे असे सांगतात. हे निर्मम होणे साधले म्हणजे चित्त वा अंत:करण खऱ्या अर्थाने शांत झाले असे म्हणता येते. नंतर असा हा शांत पुरुष ब्रह्म होण्याच्या योग्यतेचा होतो.

१४व्या अध्यायाचे शेवटी ब्रह्म होण्याची योग्यता कशी प्राप्त होते त्याचे असेच वर्णन आले आहे. ''मां च योऽव्यभिचारेण भक्तियोगेन सेवते । स गुणान् समतीत्यैतान् ब्रह्मभूयाय कल्पते ।। (१४/२६)'' चवथी ओळ आपल्या विवेचनासाठी असलेल्या प्रस्तुतच्या श्लोकात आणि वर उल्लेखिलेल्या १४व्या अध्यायातील श्लोकात सारखीच आहे. १८व्या अध्यायात अहंकारापासून

परिग्रहापर्यंतचे विकार ''विमुच्य'' सोडावेत असे सांगितले असल्याने हे वर्णन निषेधात्मक आहे. व्यतिरेकात्मक आहे. तर १४व्या अध्यायातील वर्णन विधियुक्त आहे. विधेयात्मक आहे. अन्वयाचे आहे. येथे ब्रह्माची योग्यता प्राप्त होण्याचे साधन अहंकारादी सोडून निर्मम व्हावे, शांत व्हावे, हे सांगितले. तर तेथे १४व्या अध्यायात अव्यभिचारी भक्तियोगाचा स्वीकार करून गुणातीत व्हावे म्हणजे ब्रह्म होण्याची योग्यता प्राप्त होते असे म्हटले आहे. अव्यभिचारी भक्ती कशाला म्हणावे ते येथील श्लोकावर भाष्य करताना श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी फार विस्ताराने आणि अनेक उपमा-रूपकांचा आश्रय करून अमृतालाही लाजविणाऱ्या रसाळ भाषेत सुंदरपणे वर्णन केले आहे. आणि शेवटी वर्णनाचे तात्पर्य सांगताना महाराज लिहितात - ''हो का तरंगु लहानु । परि सिंधूसी नाही भिन्नु । तैसा ईश्वरी मी आनु । नोहेचि मा ।। ऐसेनि बा समरसे । ते दृष्टी जै उल्हासे । ते भक्ती पै ऐसे । आम्ही म्हणो ।। आणि ज्ञानाचे चांगावे । इयेचि दृष्टी नावे । योगाचेहि आघवे । सर्वस्व हे ।।'' (ज्ञाने. १४/३८६ते३८८) म्हणजे येथे एकरूपतेलाच खरे तर समरसतेला म्हणजेच अनन्यतेला अव्यभिचारी भक्ती असे म्हटले आहे. अर्थातच अनन्यतेला, समरसतेला बाधक असणारा अहंकार आणि तज्जन्य विकार यांचा अभावच अव्यभिचारता, अनन्यता या शब्दांतून व्यक्त होतो. कारण ''येथ भेदु कायी देखिजे । तरी व्यभिचारु तो ।। (ज्ञाने. १४/३८१) अहंकाराची जाणीव हेच भेदाचे मूळ स्वरूप आहे. म्हणून अव्यभिचारीपणात - अनन्यतेत अहंकाराचा अभाव सहजच गृहीत असावा लागतो. म्हणून येथे साधनेची परमोच्च अवस्था सांगत असताना भिन्नतेची वेगळेपणाची थोडीही जाणीव ठेवू नये. हे ''अहंकारं विमुच्य'', या शब्दांनी सांगितले आहे. पण बळापासून परिग्रहापर्यंत विकाराचे मूळ असलेला अहंकार आरंभीच सोडता येणे हे सगळ्यानांच सर्व वेळी शक्य असते असे नाही. मुळावर घाव घालणे हे उच्चारावयास सोपे असले तरी बहुधा सोयीचे नसते. मोठा वृक्ष तोडताना आधी फांद्यांचा पसारा तोडून मग खोडाकडे वा पुढे मुळाकडे तोडण्यासाठी जावे लागते. तसे परिग्रहाकडून क्रोध-काम या क्रमाने एकेक विकाराचा त्याग करीत अहंकार सोडण्याच्या स्थितीत यावे लागते. परिग्रहापासून बळापर्यंतचे सर्व विकार नाहीसे झाले म्हणजे निर्ममता येते. निर्ममता अंगी बाणली की अहंकार सुटू शकतो आणि अहंकार सुटला

म्हणजे तो साधक शांत होतो.

''तुल्यप्रियाप्रियो धीरः तुल्य निंदात्मसंस्तुतिः । मानापमानयोस्तुल्यः तुल्यो मित्रारिपक्षयोः ।'' किंवा ''समदुःखसुखस्वस्थः समलोष्टाश्म काञ्चनः ।'' ही जी लक्षणे वर्णन केली आहेत त्यावरून शांतता, शांती, शांत होणे कशाला म्हणतात ते लक्षात येते.

माझ्या दृष्टीने अशा शांतीला प्राप्त झालेल्या एका महात्म्याचे दर्शन मला दहा-पंधरा वर्षांपूर्वी केदारनाथ येथे झाले होते. फलाहारी बाबा म्हणून ते तेथे ओळखले जात. त्यांची एक लहान दोन खणांची खोली होती. आणि तेवढीच माडीची खोली त्या खोलीवर होती. वरची खोली सामान्यतः माळ्यासारखी होती. वर्षानुवर्षे सातत्याने ते केदारनाथ येथेच राहिले होते. केदारनाथाची उंची अकरा हजार सातशे पन्नास फूट आहे. अर्थातच प्राणवायू अगदी विरळ आहे. अगदी थोड्याशा हालचालीनेही तेथे धाप लागते. सवयीने हे कष्ट काही प्रमाणात उणावतात हे खरे. हिवाळ्यात तेथे कोणीहि राहत नाही. सामान्यतः दिवाळीपासून अक्षय्यतृतीयेपर्यंत केदारनाथाची पूजाही उखीमठाला होते. केदारनाथ येथे पंधरा-वीस फूट जाडीचे बर्फ पडते. जवळजवळ सर्व घरे हिमवृष्टीखाली झाकली जातात. अशा स्थितीत थंडी किती विलक्षण असेल त्याची कल्पना येऊ शकते. अशा परिस्थितीत हे फलाहारी बाबा बाराही मास केदारनाथ येथे कसे राहू शकतात याचे मला फार कुतूहल होते. तीन-चार वेळा भेटल्यामुळे झालेल्या परिचयामुळे माझा संकोच उणावला होता. त्यामुळे मी त्यांना ''आपण येथे हिवाळ्यातही कसे राहू शकता?'' असा प्रश्न सरळपणे विचारला. बाबाजीने जे उत्तर दिले - त्यात आपण काही विशेष करतो असे दूरान्वयानेही सुचविले जाईल असे काही नव्हते. ईश्वरीकृपा, दिव्यशक्तीचे सहाय्य, प्राणायाम, समाधी इत्यादी यौगिक साधना यापैकी कशाचाही उल्लेख बाबाजींनी केला नाही.

आमचे संभाषण हिंदीत होते. बाबाजी म्हणाले - मी आवश्यक त्या साधनानिशी येथे राहतो. त्यात अवघड काही नाही. थंडीचे निवारण करू शकणारे लोकरीचे पुरेसे अंथरूण-पांघरूण मी जवळ ठेवतो. तांदूळ, मुगाची डाळ, बटाटे, तूप, थोडे जिरे-मीठ यांचा पुरेसा संग्रह माझ्याजवळ असतो. इंधनासाठी लागतो तेवढा लाकूडफाटा मी साठवून ठेवतो. वरच्या माळ्यावर

दीड-दोन हात लांबी-रुंदीच्या आत दारे उघडणाऱ्या दोन खिडक्या आहेत. कुस्सा, खोरे, पाट्या अशी बर्फ उकरण्याकरिता लागणारी साधने माझ्याजवळ आहेत. हिवाळ्यात प्रतिदिनी किंवा एक दोन दिवसाआड आवश्यकता पडेल त्याप्रमाणे बर्फ उकरून एकीकडे सारून खिडकीतून जाण्या-येण्याची वाट मी मोकळी करून ठेवतो. नुकतेच पडलेले बर्फ अगदी भुसभुशीत असल्याने वाट मोकळी करून घेण्यास काही श्रम होत नाहीत. तेव्हा हिवाळ्यात तेथे राहण्यात अवघडपणा काय आहे? तिबेटमध्ये याहीपेक्षा अधिक उंचीवर वर्षानुवर्ष वस्ती असलेली गावे आहेत. तेथे तान्ह्या मुलासकट कुटुंबेच्या कुटुंबे राहतात. ''ऐसी अवस्थामें आपको यहाँ रहनेमें कठिनाई क्यों लग रही हैं? हाँ! एक बात अवश्य हैं, अकेले रहना पडता है ।'' कुणीही माणूस तर काय पण चिटपाखरूही दृष्टीस पडत नाही, कसला शब्द ऐकू येत नाही. वातावरण अगदी शांत, नि:शब्द असते. काही वेळा हिमवादळे होतात. त्या वेळी मात्र निरनिराळ्या प्रकारचे ध्वनी उमटत असतात. अगदी आरंभी आरंभी त्याचे भय वाटायचे. आता सवयीने तसे काही होत नाही. छान वाटते.

हे सर्व बाबाजींनी मला खाली-वर प्रत्यक्ष हिंडवून सर्व गोष्टी दाखवून नीट समजावून सांगितले. त्यांच्या सांगण्यात पराकाष्ठेचा साधेपणा, सहजपणा होता. आत्मगौरवाचा, आढ्यतेचा, मला काही विशेष सिद्धी प्राप्त झाल्यामुळे मी हे करू शकतो असे म्हणण्याचा थोडाही वास नव्हता. शेवटी ते म्हणाले, ''तुम्हांला नेहमी माणसांच्या संपर्कात राहण्याची सवय असल्यामुळे एकटे राहणे ही कल्पना अवघड वाटते. वास्तविक तसे अवघड काही नाही.'' वेळ कसा घालवता या प्रश्नाच्या उत्तरामध्ये ''देवाचे नाव घेत बसतो'' एवढेच त्यांनी सांगितले. मी साधनेविषयी आणखीन खोल जाऊन प्रश्न विचारण्याचा प्रयत्न केला तेव्हा ते म्हणाले, ''भगवान् के नामस्मरणमें सब कुछ हैं । विश्वास रखो ।'' इतका निरहंकारी साधेपणा माझ्या पाहण्यात मला इतरत्र कोठेही आढळला नाही.

याच्या अगदी उलटही अनुभव सांगण्यासारखा आहे. हिमालयातीलच एका तीर्थक्षेत्री एक अवधूतबाबा राहत असत. वर्षानुवर्षे त्यांनी मौन धारण केलेले होते. महात्मा म्हणून त्यांची बरीच प्रख्याती होती. तो लौकिक ऐकूनच मी त्यांच्या दर्शनास गेलो होतो. एका लहानशा कुटीत हे बाबाजी पूर्णपणे

नग्न राहत असत. मी त्यांच्या भेटीला गेलो. ते कुटीच्या बाहेर ओटीवर अर्धपद्मासन घालून शांतपणे बसले होते. त्यांच्या मौनामुळे विचारण्या-बोलण्याचा काही प्रश्नच नव्हता. दोन चार क्षणांतच त्यांनी दोन-तीन टाळ्या मोठ्याने वाजविल्या. तेव्हा कुटीच्या मागून कोठून तरी भगव्या वेषात असलेली साधारणतः चाळीशीच्या वयातली एक स्त्री पुढे आली. बाबाजींना नमस्कार करून ती उभी राहिली. ती स्त्री त्यांची शिष्या असून सातत्याने त्यांच्या सेवेतच असते असे मागाहून कळले. पुढे आलेल्या आपल्या या शिष्येला बाबाजींनी निरनिराळ्या प्रकारांनी काही खुणा केल्या. खुणांचा अर्थ माझ्या लक्षात आला नाही, पण त्या शिष्येने एका हिंदी साप्ताहिकाचा दोन-तीन वर्षांपूर्वीचा एक जुना अंक आणून बाबाजींपुढे ठेवला. बाबाजींनी तो अंक उघडून, पाने उलगडून माझ्यापुढे सरकविला आणि वाच, मोठ्याने वाच, अशा अर्थाची मला खूण केली. मी तो लेख बाबाजींच्या सूचनेप्रमाणे मोठ्याने वाचला. तो लेख बाबाजींसंबंधीचाच मोठ्या गौरवाने लिहिलेला होता. त्यात बाबाजींनी दीर्घकाळ केलेली तपस्या, त्यांना झालेला साक्षात्कार, त्यांना प्राप्त झालेल्या सिद्धी, त्यांचे वैराग्य, त्यांची निःस्पृहता, त्यांच्या भक्तपरिवारातील थोरा-मोठ्यांची नावे, बाबाजींची निरनिराळ्या प्रकारची तीन-चार चित्रे अशा रीतीने तो लेख सविस्तरपणे नीट सजवलेला होता. तो लेख एरवी कधी मी स्वतंत्रपणे वाचला असता तर माझ्या मनात संबंधित व्यक्तीविषयी केवळ गौरवाचीच भावना निर्माण झाली असती, पण या वेळी तसे झाले नाही. बाबाजींनी तो लेख काहीही पूर्वपरिचय नसतांना किंवा हे सर्व जाणून घेण्याचे कुतूहल मी व्यक्त केले नसतांना स्वतःच स्वतःविषयीच्या वर्णनाचा सांभाळून ठेवलेला अंक मला दिला हे मला खटकल्याशिवाय राहिले नाही.

केदारनाथाच्या फलाहारी बाबांशी झालेल्या संवादाच्या पार्श्वभूमीवर हे खटकणे मला चांगलेच जाणवले.

पहिल्या ठिकाणी मला प्रसन्न-गंभीर पण निर्विकार अशा शांततेचे दर्शन झाले; तर या दुसऱ्या वेळी आत्मगौरवाची भावना आणि औत्सुक्य मुद्रेवर उमटल्याचे स्पष्टपणे जाणवले. वस्तुतः साधना, तपस्या, बाह्यपरिस्थिती यांच्यापुरता विचार करता माझ्यासारख्या सामान्य जिज्ञासूच्या दृष्टीने दोन्हीही व्यक्ती थोरच होत्या. पण अहंकाराचे सूक्ष्म स्वरूप लक्षात आणून देण्याच्या

दृष्टीने मी तीन-चार वर्षांच्या अंतराने आलेले माझे अनुभव आपणांस एकत्र सांगितले इतकेच.

आत्मगौरवाच्या पाठीमागे असणारा हा अहंकारच बलदर्पापासून परिग्रहापर्यंतच्या विकारात तपस्वी साधकालाही गुंतवितो आणि त्यातूनच सांप्रदायिक दुराग्रह, मठादींचे वैभव आणि महंतीचा दंभाचार जन्माला येतो. सांप्रदायिक कर्मकांड आणि मठादींच्या आचारपरंपरा यामुळेच आपल्या हिंदू समाजातील ऐक्य जवळजवळ नाहीसे झाले आहे. तथाकथित बुद्धिवादी जातीयतेला बळीचा बोकड बनवीत असतात. पण खरी फुटीरता सांप्रदायिक दुराग्रहामुळेच जन्माला आली आहे हे कुणीच लक्षात घेत नाही. आपल्या या हिंदुस्थानात सहस्रावधि मठ-महंत आणि त्यांचे संप्रदाय आहेत. पण त्यांतील क्वचितच कोणी उपासना भेदामागील एकतेची जाणीव ठेवणारा असेल. प्रत्येक संप्रदाय स्वत:ला पूर्णपणे स्वतंत्र आणि इतरांपेक्षा श्रेष्ठ मानीत असतो. बहुधा प्रत्येक महंत नाना स्वरूपांनी विविध प्रकारच्या प्रचारसाधनांनी स्वत:च्या अनुयायांचा परिघ वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्नशील असतो. त्यासवेच दुसऱ्या कोणा महंताच्या प्रभावाखाली आपल्या अनुयायाने जाऊ नये या दृष्टीने दक्षही असतो. दोन संप्रदायांचे राहू द्या, पण एका गुरूचे दोन शिष्य जर महंत झाले, तर एका गावात असूनही आपल्या एकाच गुरूची पुण्यतिथी वा गुरुपौर्णिमा वेगवेगळी साजरी करतात. यामुळेच सामाजिक ऐक्याला हिंदू समाज पारखा झाला आहे. श्रेष्ठ प्रतीच्या सत्कार्यात भाग घेतानाही स्वत:ची प्रतिष्ठा वा आत्मगौरव याला बाध येणार नाही हे कटाक्षाने पाहिले जाते. तसा थोडाही संभव निर्माण झाला तर 'मानापमानयोस्तुल्य:' या एकाच गीतावचनावर आठ-आठ दिवस प्रवचन करून सहस्रावधींना प्रभावित करणारे हे महंत व्यापक क्षेत्रातील श्रेष्ठ प्रकारच्या सत्कार्यास सहकार्य देण्याचे नाकारतात. धर्म - तत्त्वज्ञान - इतिहास - परंपरा इत्यादी सर्व काही चांगले असतांना हिंदू समाजाला दैन्य भोगावे लागते. त्याचे स्वयंकेंद्रित सांप्रदायिक अहंकार हे एक महत्त्वाचे कारण आहे. असो. 'अहंकारं विमुच्य' हे किती महत्त्वाचे आहे, तो सूक्ष्मातून स्थूलात कधी नेऊन पोचवितो, हे कसे लक्षातही येत नाही, ते समजावे म्हणून मी हा वर्णनाचा प्रपंच केला. निर्मम व्हावे म्हणण्यात अहंतेचा हा सर्व विस्तार अंगोपांगासह सोडला पाहिजे असे सुचविले आहे, हे

लक्षात घ्यावे. ही ममता सुटली, माझे माझे म्हणून शिरावर उगीचच घेतलेल्या ओझ्याचा त्याग केला, की, गीतेच्या बाराव्या अध्यायात सांगितल्याप्रमाणे ''त्यागात् शान्तिरनन्तरम्'' या विधानाचा प्रत्यय येतो. असा हा शांत झालेला माणूस ब्रह्मप्राप्तीचा अधिकारी होतो. हेच ''ब्रह्मभूयाय कल्पते'' या वचनाने सांगितले आहे.

ब्रह्म होण्याची योग्यता प्राप्त झाली, ब्रह्मपदावर आरूढ झाला म्हणजे काय होते ते पुढील श्लोकात सांगितले आहे.

**ब्रह्मभूत: प्रसन्नात्मा न शोचति न काङ्क्षति ।**
**सम: सर्वेषु भूतेषु मद्भक्तिं लभते पराम् ।।५४।।**

ब्रह्मपदावर आरूढ झाला की तो साधक अंत:करणाने सदैव प्रसन्न राहतो. त्याला कशाचीही अपेक्षा उरत नाही. उलट क्वचित काही आपत्ती ओढवली तरी तो शोक करीत नाही. सर्व भूतमात्राच्या ठिकाणी त्याची समबुद्धी असते. आणि असे झाले म्हणजे मग त्या साधकाला माझी पराभक्ती प्राप्त होते.

ब्रह्मज्ञानी झाला, ब्रह्मपदावर आरूढ झाला, हे कसे ओळखावे हे श्लोकातील पहिल्या तीन चरणांमध्ये सांगितले आहे. वास्तविक ब्रह्मज्ञानी किंवा ब्रह्मपदावर आरूढ झालेली व्यक्ती ही बाह्यलक्षणांवरून ओळखता येणे अत्यंत अवघड आहे. ''योगियाच्या खुणा योगी जाणे'' हेच खरे असते. पण तरीसुद्धा मार्गदर्शन कोणाकडून घ्यावे हे कळण्यासाठी, कोणाच्या बोलण्यावर विश्वास ठेवावा हे समजण्यासाठी, साक्षात्कारी पुरुषाची ओळख जिज्ञासू साधकाला करून द्यावी या दृष्टीने काही वर्णन करणे आवश्यक असते. अन्यथा मुमुक्षूची फसगत होऊ शकते. तो मठमहंतीच्या ऐश्वर्याच्या मापाने किंवा शेकडो लोकांना आकर्षित करणाऱ्या विद्वत्तापूर्ण वक्तृत्वाने भुलून लोकसंग्रहाच्या नावाखाली लोकेषणेत आकंठ बुडलेल्या प्रभावी व्यक्तिमत्वाच्या पुरुषालाच साक्षात्कारी महात्मा समजतो. आणि त्यामुळेच योग्य त्या साधनेचा लाभ न झाल्याने खऱ्या साध्यापासून वंचित होतो. हे होऊ नये म्हणून गीतेने अनेक ठिकाणी ब्रह्मज्ञानी, ब्रह्मपदारूढ महात्मा कसा असतो ते स्थितप्रज्ञ, कर्मयोगी, योगी, प्रियभक्त, ज्ञानी, गुणातीत अशा निरनिराळ्या नावाने वर्णिला आहे. येथेही थोडक्यात त्याच जातीचे वर्णन केले आहे.

ब्रह्मपदारूढ व्यक्तीचे अंत:करण अत्यंत प्रसन्न असे असते. त्याची ही प्रसन्नता कोणत्याही निमित्तावर वा उपाधीवर अवलंबून नसते. कोणत्याही अनुकूल–प्रतिकूल परिस्थितीचा परिणाम या प्रसन्नतेवर होत नाही. ती कशाने वाढत नाही, कशाने घटत नाही. मेघातून होणाऱ्या आणि पृथ्वीचा स्पर्श न झालेल्या पावसाच्या पाण्याप्रमाणे त्याचे अंत:करण अत्यंत स्वच्छ, अत्यंत निर्मल असते. या सहज स्वाभाविक निर्मलतेलाच प्रसन्नता असे म्हणतात. अंत:करणाची निर्मलता वासनेने, अपेक्षेने, निराशेने, अहंकाराने, रागद्वेषाने गढूळ होत असते.

आता मागील श्लोकात सांगितल्याप्रमाणे अहंकारादींचा त्याग करून पूर्णपणे निर्मळ झालेल्या या पुरुषाच्या ठिकाणी वासनादी विकारांचा संभवच राहत नाही. म्हणून अंत:करण गंगोत्रीच्या पलीकडे असलेल्या गोमुखातील गंगाजलाप्रमाणे किंवा शुद्ध स्फटिकाप्रमाणे अगदी स्वच्छ, अत्यंत निर्मळ असे राहते. अंत:करण असे निर्मळ असणे म्हणजेच प्रसन्न असणे होय.

''न शोचति न काङ्‌क्षति'' हा या प्रसन्नपणाचाच परिणाम आहे. या व्यक्तीला आता कशाचे दु:खही नसते किंवा कशाची अभिलाषाही नसते. ''यस्मिन् स्थितो न दु:खेन गुरुणापि विचाल्यते'' अशी त्याची योगारूढ पुरुषाप्रमाणे स्थिती होते. ''न प्रहृष्येत् प्रियं प्राप्य नोद्विजेत् प्राप्यचाप्रियम्'' हा आदेश त्याच्या जीवनात पूर्णपणे मुरलेला असतो. त्यामुळेच ''दु:खेष्वनुद्विग्न मना: सुखेषु विगतस्पृह:'' किंवा ''तत् तत् प्राप्य शुभाशुभम् नाभिनन्दति न द्वेष्टि'' ''नित्यं च समचित्तत्वं इष्टानिष्टोपपत्तिषु'' अशी गीतेनेच इतरत्र सांगितलेली थोर पुरुषाची लक्षणे त्याचे ठिकाणी पूर्णपणे प्रगट झालेली असतात, आणि म्हणून तो ब्रह्मभावारूढ पुरुष 'समदु:खसुख:' झालेला असतो. आणि सुखदु:खाविषयीची असलेली समताच सर्व भूतांच्या संबंधातही समत्वाने व्यक्त होते. असे हे समदर्शित्व, अशी ही समभावना किंवा ही साम्यवृत्ती गीतेने अनेक वेळा अनेक प्रकाराने एक आदर्श स्थिती म्हणून सांगितली आहे. गीतेतीलच एक श्लोक या दृष्टीने सावधपणे विचारात घेण्यासारखा आहे. ''विद्याविनयसंपन्ने ब्राह्मणे गवि हस्तिनी । शुनि चैव श्वपाके च पंडिता: समदर्शिन: ।।'' (गीता ५/१८) यावर आमच्या ती. दादांनी (श्रीदासगणूमहाराज) दिलेली टिपणी फार लक्षणीय आहे. ते म्हणतात – ''ब्राह्मण आणि पशूला । समान मानणे हा

सिद्धांत झाला । म्हणून काय त्या दोघाला । खाया गवत घालावे ।।'' - या वचनावरून समतेचा अर्थ बोजडपणे घेता येणार नाही हे लक्षात येऊ शकेल.

साम्यवादाचे सामाजिक धोरण सांगताना प्रत्येकाकडून त्याच्या शक्तीप्रमाणे घ्यावे आणि प्रत्येकाला त्याच्या आवश्यकतेप्रमाणे पुरवावे, असे म्हटले आहे. येथेही जी समता गृहीत धरली आहे ती निखळ नाही, निरपवाद नाही, तर सापेक्ष संबधावरच आधारित असल्याचे लक्षात घ्यावे लागेल. कारण एक मनुष्य जेवढ्या वेळामध्ये चार पाट्या उचलून टाकील, तेवढ्या वेळात दुसरा तीन किंवा दोनच टाकू शकेल. उलट एखाद्याची भूक भागण्यासाठी एक-दीड भाकरी तर दुसऱ्याला दोन-तीन लागतील. म्हणजे समतेचे स्वरूप येथेही विटाच्या ठोकळ्यासारखे स्थूल राहू शकत नाही. थोर थोर संत कंटकाच्या निर्दालनालाही भूताच्या संगोपनाप्रमाणे दयाच म्हणतात. ''जे जे भेटे भूत । ते ते मानिजे भगवंत ।।'' हा सिद्धांत मान्य असूनही विंचू-सर्प ही नारायणाचीच रूपे असली तरी त्यांना करावयाचे वंदन दुरून करावे असा सावधपणा ठेवण्यास सांगतात.

एकनाथमहाराजांच्या चरित्रात त्यांनी काशीहून रामेश्वरास वाहण्यासाठी आणलेली गंगेची कावड तहानेने तडफडणाऱ्या एका गाढवाला पाजली अशी घटना उल्लेखिली आहे. या कामी कोणीतरी हटकल्यावरून नाथमहाराज म्हणाले - अरे! हे गाढव तरी रामेश्वरापेक्षा निराळे आहे का? रामेश्वर सर्वत्र भरून राहिला आहे ना! माझी गंगेची कावड रामेश्वरापर्यंत निश्चित पोचली आहे.'' जे जे भेटे भूत । ते ते मानिजे भगवंत ।।'' हा सिद्धांत या घटनेच्या रूपाने जणू मूर्तपणे साकारला आहे असे म्हणता येते. पण समजा उन्हाळ्यात चालण्याच्या श्रमाने खांद्यावर कावड घेऊन पायी प्रवास करणारे श्रीएकनाथमहाराज स्वत:च घामाघूम होऊन तहानेने व्याकूळ झाले असते तर कसे वागले असते? समागमे जे कोणी सहप्रवासी असतील त्यांना ते म्हणाले असते - अरे! मी आता पुढे चालू शकेन असे मला वाटत नाही. मी येथेच कोसळणार. तुम्ही माझी ही कावड रामेश्वरी नेऊन भगवंताला अर्पण करा. ''अहं ब्रह्मास्मि'' या महावाक्याची ढाल पुढे करून रामेश्वराप्रमाणे ''मी तरी ब्रह्मच'' असे म्हणून कावडीतील गंगेचे पाणी ते स्वत: प्यायले नसते हे निश्चित. ''समं सर्वेषु भूतेषु'' या वाक्याचा विचार करताना हे सर्व नीटपणे जाणून घेतले

पाहिजे. नाहीतर मनुष्य बावळा तरी ठरेल किंवा त्याला दंभ तरी स्वीकारावा लागेल. व्यवहार तत्त्वावर अवलंबून असावा लागतो हे कितीही खरे असले तरी त्याचे बाह्यस्वरूप कधीही एकसारखे असत नाही हे लक्षात घेऊनच समत्वाचा विचार केला पाहिजे. असो.

ब्रह्मपदारूढ व्यक्ती प्रसन्नचित्त, हर्षशोकाच्या अतीत आणि सर्व भूतांना समभावनेने पाहणारी अशी होते. तेव्हा त्याला पराभक्तीचा, श्रेष्ठ भक्तीचा लाभ होतो असे भगवंतानी म्हटले आहे. या ठिकाणी ब्रह्मारूढता आणि पराभक्ती यांचे स्वरूप नीट जाणून घेणे उपयोगाचे आहे. १४व्या अध्यायात अव्यभिचारी भक्तीनंतर ब्रह्म होण्याची योग्यता प्राप्त होते असे म्हटले आहे. तर येथे ब्रह्म होण्याची योग्यता प्राप्त झाल्यानंतर पराभक्ती लाभते असे भगवान् सांगतात.

भक्ती हा पंचम पुरुषार्थ आहे. तो मोक्षाहून निराळा आणि मोक्षाहून श्रेष्ठ आहे असे काही विद्वान भाविक संत-वचनाच्या आधारेच आग्रहाने मानीत असतात. त्यांना ''ब्रह्मभूतः मद्भक्तिं लभते पराम्'' या अठराव्या अध्यायाच्या ५४व्या श्लोकातील वचनाने मोठाच आधार सापडल्यासारखे वाटते. तत्त्वतः अंतिम दशेत साध्य रूपात ज्ञान आणि भक्ती किंवा मोक्ष आणि भक्ती यांत काहीही अंतर नाही. ते दोन्ही केवळ एकरूपच नव्हे, तर एकच आहेत. केवळ शब्द तेवढे वेगळे आहेत. अद्वैत तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने किंवा अद्वैत सिद्धांत मानणाऱ्या श्रीज्ञानेश्वरतुकारामादी संतांच्या वचनाच्या आधारे ज्ञानापेक्षा किंवा मोक्षापेक्षा भक्ती ही वेगळी नसून ती ज्ञानाशी एकरूपच नसून ज्ञानरूपच आहे. केवळ संप्रदायभेदाने परंपरेच्या वैशिष्ट्याने कुणी ज्ञान म्हणतो, कुणी भक्ती म्हणतो. ज्ञानाला आत्मज्ञान, अन्वयज्ञान असे म्हटले जाते इतकेच. श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी या गोष्टीचा अगदी स्पष्टपणे उल्लेख केला आहे. ''ज्ञानी इयेते स्वसंविति । शैव म्हणती शक्ती । आम्ही परमभक्ती । आपुली म्हणो ।।'' (ज्ञाने १८/११३३) असे महाराज म्हणतात. श्रीमद् शंकराचार्यांनी भक्तीची व्याख्या करताना ''स्वस्वरूपानुसंधानं भक्तिरित्यभिधीयते ।'' असे म्हटले आहे, तर श्रीज्ञानोबाराय एक पाऊल पुढे टाकून ''माझिये सहज स्थिती । भक्ति नाम ।।'' (ज्ञाने १८/१११३) अशी भक्तीची व्याख्या करतात.

उपासना म्हणून वा साधना म्हणून भक्तीचा विचार करताना थोर महात्म्यांनी भक्तीचे श्रवणकीर्तनादी नऊ प्रकार वर्णन केले आहेत. तर काहींनी गौणी

आणि परा असे दोन प्रकार मानले आहेत. गौणी भक्तीचीही गुणभेदाने आणि आर्तादी भेदाने विभागणी केली आहे. ज्ञानलक्षणा भक्ती आणि प्रेमलक्षणा भक्ती असेही प्रकार काही मानतात. कदाचित ते परा भक्तीचे प्रकार असावेत. नीट विचार केला की साधक–दशेत साधनेच्या सोयीसाठी अधिकारभेदाने वा अवस्थाभेदाने भक्तीच्या विविध प्रकारांना काही अर्थ असला, त्या प्रकारांचा अधिकारानुरूप विशेष उपयोग होत असला तरी सिद्धावस्थेत परिपूर्ण स्थितीत ज्ञानभक्तीची भिन्नता तत्त्वतः संभवत नाही. कारण या भक्तीतही मग करणे किंवा न करणे, होणे किंवा न होणे असे अंतर पडत नाही. अंतिम स्थितीत ज्ञानाचेही स्वरूप असेच असते. म्हणून तर ज्ञानेश्वरमहाराजांनी अमृतानुभवाच्या नवव्या प्रकरणात ''भजता भजन व्हावे। न भजता काय नव्हे । ऐसे नव्हे आघवे । शिवूचि असे ।।'' असे अगदी स्पष्टपणे उल्लेखिले आहे. तेव्हा ''चहुपुरुषार्थां शिरी । भक्ती जैसी ।।'' किंवा पंचमपुरुषार्थाची भक्ती इत्यादी भक्तीचा गौरव करणाऱ्या वर्णनावरून किंवा ''मोक्षसुखा हाणू लाथा।।'' अशा मोक्ष–तुच्छतापर उद्गारावरून ज्ञानभक्तीत भेद मानणे योग्य नाही. तत्त्वज्ञान म्हणून जे अद्वैत सिद्धांताचा स्वीकार करतात त्यांना तरी परमोच्च अवस्थेत ज्ञान आणि भक्तीमधे भेद मानता येणार नाही. निरनिराळ्या अंगांनी या विषयाचा खूप विस्तार करणे शक्य आहे. अनेक सज्जनांनी ज्ञानोत्तर भक्तीचे माहात्म्य संत वचनांच्या आधारेच पुष्कळ विस्ताराने प्रतिपादले आहे. त्यासाठी स्वतंत्र ग्रंथाचीही निर्मिती केली आहे. हे सर्व जरी खरे असले तरी या भक्तीचे माहात्म्य गाणाऱ्या विद्वानांच्याविषयी अत्यंत आदर ठेवूनही अंतिम दशेत ज्ञान भक्ती वेगळे राहत नाहीत असेच मला ठामपणे म्हणावेसे वाटते. कारण ज्ञान काय, किंवा भक्ती काय दोन्हीही सहजस्थिती आहे. त्यामुळे उरतो केवळ नामभेद. त्यामध्ये स्वरूपाचा भेद लवमात्रही उरत नाही. असो.

आपल्या प्रस्तुत प्रकरणाच्या दृष्टीने तर ब्रह्मभूत होणे ही अवस्थाच परिपूर्ण नाही. आणि त्यानंतर लाभणारी पराभक्तीही पूर्ण नाही. कारण पुढच्या श्लोकांत ब्रह्मभूत झाल्यानंतर लाभलेल्या पराभक्तीने काय साधते, त्याचे जे वर्णन केले आहे, त्यावरून ब्रह्मभूत होणे आणि त्यानंतर पराभक्ती लाभणे ही दोन्हीही अद्यापि साधनेच आहेत; साध्यावस्था किंवा सहजस्थिती थोडी पुढेच आहे असे दाखविले आहे. तेच समजून घेण्याचा आपण प्रयत्न करू.

**भक्त्या मामभिजानाति यावान्यश्चास्मि तत्त्वतः ।**
**ततो मां तत्त्वतो ज्ञात्वा विशते तदनन्तरम् ।। ५५।।**

(या परा) भक्तीने मी वास्तविक रीतीने कोण आहे, केवढा आहे याचे सर्वांगीण ज्ञान त्याला (ब्रह्मभूताला) होते. आणि मग मला तत्त्वतः जाणून तो माझ्यात प्रविष्ट होतो. (ब्रह्माशी एक होऊन राहतो.)

येथे भगवान् श्रीकृष्णांनी स्वतःचा उल्लेख 'मी' या सर्वनामाने केला असला तरी येथे ''मी'' चा वास्तविक अर्थ ईश्वर, आत्मा, बह्म असा आहे. ''मला – श्रीकृष्णाला मूर्ख लोक केवळ मनुष्यदेहधारी मानव समजतात. त्यांचे असे समजणे माझी अवहेलना करण्यासारखे आहे, कारण त्यांना 'मी' सर्व चराचराचा महान असा ईश्वर आहे ते तत्त्व उमजत नाही'' असे भगवंतांनी स्वतःच गीतेच्या ९व्या अध्यायात सांगितले आहे. १०व्या अध्यायात विभूतियोग सांगताना ''सर्व भूतांच्या हृदयांत राहणारा आत्मा तो मीच'' असेही भगवंतांनी म्हटले आहे. १४व्या अध्यायाच्या शेवटी ''मी ब्रह्माची प्रतिष्ठा आहे'' असे भगवंत सांगतात आणि याचा अर्थ स्पष्ट करताना श्रीज्ञानोबाराय ''तरी ब्रह्म आन नोहे । मी वाचूनि ।।'' असे म्हणतात. या वचनावरून या श्लोकात उल्लेखिलेला 'मी' ईश्वर, आत्मा, ब्रह्म यांचा वाचक आहे हे स्पष्ट होईल. ब्रह्मभूत झाल्यानंतर प्राप्त होणाऱ्या भक्तीने माझे म्हणजे आत्म्याचे, ब्रह्माचे यथावत् ज्ञान होते असे भगवान् म्हणतात. आणि असे ब्रह्माचे वास्तव स्वरूप परिपूर्ण रीतीने उमगल्यानंतर ब्रह्मामध्ये खऱ्या अर्थाने प्रवेश होतो, ब्रह्माशी सायुज्य घडते. त्याचे स्वरूप ''एकपणाहि मिठी पडो सरली'' असे केवळ एकतेचे, निखळ अद्वैताचे असते. आता ''अहं ब्रह्मास्मि'' आणि ''सर्वं खलु इदं ब्रह्म'' या स्थितीत अनुभवाच्या दृष्टीने वा साक्षात्काराच्या पातळीवर यत्किंचितही अंतर उरत नाही. साखर आणि तिची गोडी असे शाब्दिक अंतर केवळ सांगण्यापुरते उरते.

हा सर्व अवस्थाक्रम फारच सूक्ष्म आहे. अर्थात यांतील अंतरही केवळ तात्त्विक भूमिकेवर विचार करताना बौद्धिक पातळीवर कल्पनेच्या साहाय्याने प्रयासाने जाणून घ्यावे लागते. ब्रह्मीभूत होणे, पराभक्ती लाभणे, या पराभक्तीने ब्रह्माचे सर्वांगीण ज्ञान यथावत्पणे होणे आणि अशी परमसत्याची तत्त्वतः

ओळख पटताच त्या सत्यात, त्या आत्म्यात, त्या ब्रह्मात प्रविष्ट होणे असा हा अवस्थाक्रम आहे.

हा अवस्थाक्रम सांगणे हे सुद्धा काही थोडा भेद गृहीत धरल्याविना घडणारे नाही. म्हणून श्रीज्ञानेश्वरमहाराज '' एवं घेऊनि अज्ञानाते । माझी भक्ती जे हे वर्ते । ते दावी मज द्रष्ट्याते । दृष्य करूनी ।।'' (ज्ञाने. १८/११२१) या ओवीत अवस्थाभेद स्पष्ट करण्यासाठी अज्ञानरूप कारणाचा स्वीकार करतात. कारण सर्वांगाने तत्त्वत: जाणतो असे म्हणण्यातही जे जाणायचे ते जाणणारापेक्षा वेगळे उरते. हेही संपावे लागते. म्हणून पुढे ''विशते तदनन्तरम्'' या शब्दाने प्रवेश सांगितला आहे. तेथेही प्रवेश करणारा आणि ज्यात प्रवेश करायचा ते तत्त्व पुन्हा वेगळेपणाने भासतेच. अनुभव शब्दांत आणायचा म्हणजे असे होणारच. ''अद्वैत बोलिजे बोले । तरी द्वैत कीजे ।'' यासाठी शास्त्रकारांनी ''ब्रह्मैव न तु ब्रह्मविद् ।।'' किंवा ''ब्रह्मविद् ब्रह्मैव भवति'' असे आवर्जून म्हटले आहे. समर्थ रामदासस्वामांनीही ''विभक्त नव्हे तो भक्त'' अशी भक्ताची व्याख्या मार्मिकपणे केली आहे. यामुळे प्रयोगातून जाणवणारे गृहीत भेद, कल्पित भेद वास्तवात कसे अयथार्थ आहेत हे नीटपणे उमगू शकते. एकतेचा हा दिव्य अनुभव ज्या महात्म्यांना लाभतो, त्यांच्या आनंदाला पारावार राहत नाही. सगळे दु:ख, सगळे प्रयास दुराव्यामुळे उत्पन्न होतात, द्वैतभावनेमुळे सोसावे लागतात. कबीरांनी ही स्थिती मोठ्या मनोरम शब्दांत व्यक्त केली आहे.

*''जो बिछुडे हैं पियारेसे भटकते दर-ब-दर फिरते ।*
*हमारा यार है हममें हमनको इन्तजारी क्या ।।*
*न पल बिछुडे पिया हमसे न हम बिछुडे पियारेसे ।*
*उन्हींसे नेह लागा है हमनको बेकरारी क्या ।।''*

ज्याला हुडकायचे तो आमच्यातच आहे. तेव्हा तो केव्हा भेटतो याची वाट पाहत बसण्याचे कारणच उरत नाही. आम्ही त्याच्यापासून वा तो आमच्यापासून लवमात्रही वेगळा नसल्याने विरहामुळे उत्पन्न होणारी अस्वस्थता उत्पन्न होईलच कशी?

कबीरांनी वर्णन केलेली ही स्थिती अद्भुत आहे. अलौकिक आहे, दिव्य आहे, परमोदात्त आहे. अधिकारी सत्पुरुषांच्या तो अनुभवाचा विषय

आहे. शास्त्रीय शब्द वापरायचा तर थोर संतमहात्म्यांचा तो अपरोक्ष अनुभव आहे. साक्षात्कार आहे. त्या थोर पुरुषांनी या साक्षात्काराचा अधिकार कसा प्राप्त करून घेतला असावा? ते प्रामाणिकांच्या लक्षात आणून देण्यासाठीच भगवंतानी ''बुद्ध्या विशुद्धया युक्तो'' पासून ''विशते तदनन्तरम्'' येथपर्यंतच्या पाच श्लोकात क्रमाने आणि अत्यंत स्पष्टपणे विवरून सांगितले आहे. श्रीज्ञानेश्वरमाउलीही या प्रकरणाचे वर्णन 'क्रमयोग' या शब्दाने करतात.

केवळ परमार्थाशी संबद्ध असलेली ही असामान्य साधना सांगून झाल्यानंतर भगवान् पुढील श्लोकात यापेक्षा निराळी, सर्वसामान्यांच्या प्रकृतीचा विचार करता अधिक सोपी पण फलाच्या दृष्टीने यत्किंचितही उणी नसलेली अशी साधना सांगत आहेत, असे मला वाटते. माझ्या बुद्धी-शक्तीप्रमाणे मी तो विषय आपणापुढे मांडतो. आपण सर्वांनी चोखंदळपणे हंसक्षीरन्यायाने तो लक्षात घ्यावा अशी विनवणी आहे.

**सर्वकर्माण्यपि सदा कुर्वाणो मद्व्यपाश्रयः ।**
**मत्प्रसादादवाप्नोति शाश्वतं पदमव्ययम् ।।५६।।**

सदैव (आयुष्यभर) सर्वप्रकारची कर्मे माझ्या आश्रयाला राहून करीत असेल तर त्यालाही माझ्या प्रसादाने शाश्वत, अव्यय अशा पदाचा लाभ होतो.

भगवान् श्रीशंकराचार्य, सद्गुरू श्रीज्ञानेश्वरमहाराज यांसारख्या थोर अधिकारी महात्म्यांनी या श्लोकाचा अर्थ जीवन्मुक्ताच्या वर्तनास अनुसरून केला आहे. ''बुद्ध्या विशुद्धया युक्तो'' पासून ''विशते तदनन्तरम्'' पर्यंतची साधना परिपूर्ण होऊन जो अधिकारी पुरुष ब्रह्मपदावर आरूढ झाला, आत्मज्ञानबळावर ब्रह्मच झाला, त्याचे त्यानंतरचे आयुष्य हे जीवन्मुक्ताचे जीवन आहे. या वेळी तो कसा वागतो, आणि करीत असलेल्या कर्माचा कोणताही बाध न लागता तो अंती परमपदाला कसा पोचतो ते या श्लोकात सांगितले आहे, असे पूर्वाचार्यांनी वर्णिले आहे. श्लोकांच्या अनुक्रमाच्या दृष्टीने हे प्रतिपादन यथायोग्य आहे. पूर्वाचार्यांच्या चरणी विनम्रपणे मस्तक ठेवून मला मात्र या श्लोकाचा अर्थ थोड्या वेगळ्या पद्धतीने जाणून घ्यावासा वाटतो.

गीतेच्या पाचव्या अध्यायात भगवंतांनी सांख्ययोग वा संन्यास आणि कर्मयोग असे दोन मार्ग सांगितले आहेत. ते दोन्हीही नि:श्रेयसापर्यंत नेणारे

आहेत. कोणत्याही एका मार्गाने गेले तरी त्याला प्राप्त होणारे फल सारखेच मिळते. त्यामुळे सांख्य आणि कर्मयोग यात वेगळेपण मानणे हे बालबुद्धीचे लक्षण आहे. ''फलप्राप्ती एकच असल्याने सांख्य आणि योग दोन्ही एकच आहेत हे जो जाणतो, त्यालाच खरे कळते'' असे सांगून झाल्यावर भगवान् म्हणतात – संन्यासमार्गाने जाणे हे दु:खदायक आहे, अवघड आहे. कारण त्याला लागणारी साधने प्राप्त करून घेणे, त्यांच्या बळावर स्वत:ची योग्यता वाढविणे हे सोपे नाही (अयोगत:) पण जो कर्मयोगाचा अवलंब करून वाटचाल करतो, त्याला नि:श्रेयसाची, ब्रह्माची प्राप्ती होण्यास फारसा वेळ लागत नाही.

हे जे दोन सांख्ययोग आणि कर्मयोग असे मार्ग, त्यांत संन्यासाला उद्देशून ''दु:खमाप्तुमयोगत:'' असे म्हटले आहे, अर्थात् तुलनेने कर्ममार्ग सोपा आहे, असे आपोआपच सिद्ध होते. तिसऱ्या अध्यायातील सांख्यांचा ज्ञानयोग आणि योग्यांचा कर्मयोग या तिसऱ्या श्लोकातील शब्दांच्या वर भाष्य करताना श्रीज्ञानोबारायांनी म्हटले आहे की ''तैसी दोनी इये मते । सूचिती एका कारणाते । परी उपास्तिते योग्यते । आधीन असे ।। देखे उत्प्लवनासरिसा । पक्षी फळासी झोंबे जैसा । सांगे नरू केवी तैसा । पावे वेगा ।। तो हळूहळू ढाळेढाळे । केउते नि एके वेळे । मार्गाचेनि बळे । निश्चित ठाकी ।। तैसे देख पां विहंगमाते । अधिष्ठूनि ज्ञानाते । सांख्य सद्य मोक्षाते । आकळिती ।। येर योगिये कर्माधारे । विहितेचि निजाचारे । पूर्णता अवसरे । पावते होती ।।'' (ज्ञाने. ३/४०ते४४) येथे सांख्यमार्गाने ''सद्य मोक्ष आकळिती'' असे घडते, तर कर्ममार्गाने ''अवसरे पावते होती'' असे घडते. पक्ष्याप्रमाणे माणसाला एकदम झेप घेऊन फळापर्यंत पोचता येत नाही. त्याला खोडावरून फांद्यावर अशा क्रमानेच जाऊन फळ प्राप्त करून घ्यावे लागते. असे सांगून महाराजांनी या दोन मार्गातील भेद स्पष्ट केला आहे. फलप्राप्ती सारखी असली तरी साधना ही योग्यतेवर अवलंबून आहे असेही त्यांनी म्हटले आहे. या एकूण वर्णनाचा विचार करता सर्वसामान्यांच्या दृष्टीने संन्यासयोगापेक्षा–ज्ञानमार्गापेक्षा कर्मयोग अधिक सोपा आहे. निदान संन्यासाइतका अवघड नाही असे तरी निश्चयाने म्हणता येते.

या छप्पन्नाव्या श्लोकातील विवेचन यामुळेच कर्ममार्गाला उद्देशून असावे

असे मला वाटते. कारण ब्रह्माचे तत्त्वत: ज्ञान झाल्यानंतर तो (ब्रह्मवेत्ता) लगेच (अनन्तरम्) ब्रह्मात प्रविष्ट होतो, असे वर्णन पंचावन्नाव्या श्लोकात आले आहे. आता याहून वेगळ्या अशा शाश्वत, अव्यय पदाची प्राप्ती होते असे काही म्हणता येणार नाही. कारण ब्रह्मवेत्ता ज्याच्याशी एकरूप झाला आहे, एक झाला आहे, ते ब्रह्मही शाश्वत आणि अव्यय असेच आहे. यासाठी छप्पन्नाव्या श्लोकातील विवेचन कर्ममार्गास अनुसरून आहे. आणि तत्पूर्वीचे प्रतिपादन सांख्ययोगास धरून आहे असे म्हणणे आपल्या दृष्टीने सोयीचे आहे आणि ते ''यत्सांख्यै: प्राप्यते स्थानं तद्योगैरपि गम्यते ।'' (गीता ५/५) जे पद ज्ञानयोगाने मिळते तेच पद कर्मयोगानेही मिळते या गीतावचनाशी तंतोतंत जुळणारे आहे.

या श्लोकांतील ''सर्वकर्माणि'' या पदाचे स्पष्टीकरण करताना श्रीमद् शंकराचार्य आणि श्रीज्ञानेश्वरमाउली या दोघांनीही कर्मामध्ये निषिद्ध कर्मे ही गृहीत धरली आहेत. हेही ''न द्वेष्ट्यकुशलं कर्म'' किंवा ''सहजं कर्म कौन्तेय सदोषमपि न त्यजेत्'' या गीतावचनाशी जुळणारे आहे. तसेच या श्लोकातील ''मद्व्यपाश्रय:'' या पदाचे जणू स्पष्टीकरण गीतेच्या पाचव्या अध्यायातील ''ब्रह्मण्याधाय कर्माणि संङ्गं त्यक्त्वा करोति य: । लिप्यते न स पापेन पद्मपत्रमिवाम्भसा ।।'' (गीता ५/१०) या वचनाने लाभते असे म्हणता येते. म्हणजे पाचव्या अध्यायात विवरून सांगितलेला कर्मयोगच अठराव्या अध्यायातील या छपन्नाव्या श्लोकात संक्षेपाने पुन्हा एकदा सांगितला आहे असे दिसून येते. आणि त्यामुळे गीतेमधे इतरत्र आलेले सर्व विषय गीतेच्या अठराव्या अध्यायात पुन्हा एकदा थोडक्यात सांगितले गेले आहेत म्हणून अठरावा अध्याय ही एकाध्यायी गीताच आहे असे म्हटले आहे.

असा एकूण विचार केला असता छपन्नाव्या श्लोकामध्ये मागील पाच श्लोकांत उल्लेखिलेल्या सांख्ययोग किंवा ज्ञानमार्ग यापेक्षा निराळा असा परमपदापर्यंत समर्थपणे पोचविणारा भक्तियुक्त कर्ममार्गच सांगितला आहे असे समजता येते. येथून पुढच्या दहा श्लोकांत या भक्तियुक्त कर्ममार्गाचेच प्रतिपादन आहे असे म्हणण्यास पुष्कळ वाव आहे. कारण श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या वर्गीकरणाप्रमाणे चौथ्या अध्यायापासून अकराव्या अध्यायापर्यंतच्या आठ अध्यायांत उपासना कांडाचे किंवा भक्तिमार्गाचे प्रतिपादन आहे आणि त्यातील

अनेक वर्णनांचे संबंध या ५६ ते ६६ श्लोकातील वर्णनाशी संबद्ध असल्याचे दिसून येते.

छप्पन्नाव्या श्लोकाचा अर्थ थोड्या वेगळ्या रीतीने करणे सोयीचे आहे असे मी का म्हणतो ते येथवर केलेल्या वर्णनावरून आपल्या लक्षात येईल.

ईश्वराचा आश्रय घ्यावा म्हणजे मनबुद्धीचे सर्व भाव आणि प्राणशक्तीच्या द्वारा होणारे देहाचे वा इंद्रियांचे सर्व व्यापार ईश्वराला उद्देशून असावेत, ईश्वरार्पण भावनेचे असावेत किंवा ईश्वराला आवडतील अशा स्वरूपाचे असावेत. ज्या वेळी माणसाच्या हातून घडणारी कर्मे स्वधर्मानुरूप असतात, शास्त्राने विहित म्हणून सांगितलेली, आचरण्यास योग्य म्हणून उल्लेखिलेली अशी असतात, आवश्यक कर्तव्य म्हणून अपरिहार्यपणे करायची असतात, त्यांचे बाह्य स्वरूप क्वचित् सदोष वाटले तरी ती सर्व सत्कर्मेच असतात, अशी ती सत्कर्मे जेव्हा निष्काम भावनेने केली जातात तेव्हा त्यांच्यामुळे अंत:करणाची शुद्धता होते. आणि अशी सत्कर्मे जेव्हा निरहंकार वृत्तीने केली जातात, तेव्हा ती सहजपणे भगवंताला समर्पित होतात. कर्मे भगवदर्पण करण्याची ही युक्तीच नवव्या अध्यायाच्या शेवटच्या ''मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरू । मामेवैष्यसि युक्त्वैवमात्मानं मत्परायण: ।।'' या श्लोकात भगवंतांनी स्वत:च सांगितली आहे. मन ईश्वराच्या ठिकाणी ठेवल्यामुळे आणि यज्ञ म्हणजे स्वकर्म ईश्वराला उद्देशून केल्यामुळे कर्म निष्काम होते. तसेच ईश्वराचे भक्त झाल्यामुळे आणि त्याला नमस्कार करावा अशी नम्र वृत्ती ठेवल्यामुळे अहंकार नाहीसा होतो अर्थात कर्माला निरहंकारिता येते. आणि मग तो साधक भगवत्परायण होतो, भगवंतापर्यंत पोचतो. हेच 'मद्व्यपाश्रय:' होणे आहे; म्हणजे भगवंताच्या आधाराने राहणे आहे. या ईश्वरपरायणतेमुळे ईश्वराचा प्रसाद लाभतो आणि त्या प्रसादाने त्याला ब्रह्माचे यथावत् ज्ञान संपूर्णपणे होते. कारण भगवंताने स्वत:च जो मच्चित्त होतो, मद्गतप्राण होतो, माझ्या भजनात रंगून जातो, त्याला मी बुद्धियोग देतो; त्यामुळे त्याच्या अंत:करणामध्ये आत्मज्ञान प्रकाशित होते, अज्ञानाचा अंधार नाहीसा होतो आणि तो मला येऊन मिळतो असे दहाव्या अध्यायात सांगितले आहे. हे भगवंताला जाऊन मिळणेच येथे ''शाश्वत'' आणि ''अव्यय'' पदांच्या स्वरूपाने वर्णिले आहे.

अशा रीतीने या भक्तियुक्त कर्माने मिळणारे फळ ज्ञानमार्गाने मिळणाऱ्या

फळासारखेच असते. यासाठीच कर्ममार्गाचा निश्चयाने पुरस्कार करणाऱ्या लो. टिळकांसारख्या महापुरुषानेही आपण पुरस्कारीत असलेला कर्मयोग हा ज्ञानाने आणि भक्तीने युक्त आहे असे आवर्जून सांगितले आहे. कारण या भक्तीमुळे आणि ज्ञानामुळेच मनुष्य निष्काम आणि निरहंकारी होऊ शकतो. आणि तसे झाले तरच कोणतेही कर्म हे कर्मयोगाचेच ठरते. भगवंताचा प्रसाद लाभण्याची पात्रता अशा या कर्मयोगाने प्राप्त होते, कारण भगवंताला स्वकर्म-कुसुमांनी केलेली पूजा ही अत्यंत प्रिय आहे असे संत-महात्म्यांनी सांगितले आहे.

प्राप्त होणाऱ्या भगवत्प्रसादाचा महिमा मोठा विलक्षण आहे. आता भगवंताला भक्ताचे वेड लागते. भगवंत आपल्या हातातील कमळाने भक्ताची पूजा करू इच्छितो. भक्त लडिवाळपणे रुसला तर भगवंत त्याची समजूत घालायला जातो. भक्ताच्या भेटीची आतुरता आता भगवंताच्या ठिकाणीच निर्माण होते. भगवंताचे मन हे आता भगवंताचे राहत नाही, ते भक्ताच्या स्वाधीन झालेले असते. भक्त हा माझा आत्मा आहे आणि मी त्याचा देह होतो असे सांगण्यात भगवंताला भूषण वाटते. भक्तीचा हा महिमा मोठा विलक्षण आहे. अशा या ज्ञानभक्तीला अद्वैतापेक्षाही सुंदर म्हणण्याचा मोह थोर थोर संतमहात्म्यांना होतो. तो लोभनीय वाटतो. सामान्यांनाही परमार्थाची ओढ निर्माण व्हावी म्हणून भक्तीचा जो गौरव संतांनी केला आहे, त्याप्रमाणे ईश्वरीप्रसादाने हे सर्व घडते असे सहजपणे मानता येते. कारण थोर भक्तांचा तो स्वानुभव आहे. भक्तांना लाभणाऱ्या परम आनंदाच्या दृष्टीने त्यांना प्राप्त होणाऱ्या स्थितीचे वर्णन शाश्वत आणि अव्यय पदाने करणे थोडे अपुरेच म्हणावे लागते. कारण शाश्वत आणि अव्यय शब्दाने सत् चे आकलन जसे स्पष्टपणे होते तसे चित् आणि आनंदाचे होत नाही. असो.

या श्लोकात सांगितलेली ''मद्व्यपाश्रय:'' ही स्थिती प्राप्त होण्याची थोडी वेगळी पद्धती भगवान् पुढील श्लोकात सांगत आहेत.

**चेतसा सर्व कर्माणि मयि संन्यस्य मत्पर: ।**
**बुद्धियोगमुपाश्रित्य मच्चित्त: सततं भव ।।५७।।**

अर्जुना! मत्पर हो आणि सर्व कर्मे अंत:करणपूर्वक माझ्या ठिकाणी समर्पित कर. बुद्धियोगाचा आश्रय करून तुझे मन सातत्याने माझ्या ठायीच

राहील असा तू मच्चित्त हो.

या आधीच्या श्लोकात माझ्या प्रसादाने, माझ्या कृपेने अव्यय आणि शाश्वत अशा पदाची प्राप्ती तुला होईल असे सांगितल्यावर या श्लोकात पुन्हा मनाने सर्व कर्मे माझ्या ठिकाणी समर्पित कर आणि मत्पर हो असे सांगण्याचा उद्देश नीट जाणून घेतला पाहिजे.

शाश्वत-अव्यय पद प्राप्त झाले आहे, पण देहाची धारणा करावी लागत आहे वा होते आहे तोवर मिळालेले शाश्वत-अव्यय पद टिकून राहण्यासाठी व्यवहाराच्या पातळीवर काही दक्षता घेणे अत्यंत आवश्यक असते. ''न हि कच्चित् क्षणमपि जातु तिष्ठत्यकर्मकृत्'' या न्यायाने शरीर-रक्षणासाठी कोणते तरी कर्म, कोणत्या तरी प्रकारची हालचाल करावीच लागते. अन्न-वस्त्र-निवाऱ्यासाठी भिक्षेपासून कोणता ना कोणता तरी उद्योग करावाच लागतो. असे काही करायचे म्हटले की त्यासाठी इंद्रियाचे सहाय्य घ्यावेच लागते. ''इंद्रियस्येन्द्रियस्यार्थे रागद्वेषौ व्यवस्थितौ'' या गीतेने सांगितलेल्या नियमाप्रमाणेच इंद्रियांच्या ठिकाणी आपापल्या शब्द-स्पर्श-रूप-रस-गंध या विषयांविषयी हवे-नकोची भावनाही स्वाभाविकपणे राहते. सुरेल-मंजुळ शब्द ऐकावेसे वाटतात. स्तुती ऐकावीशी वाटते. कर्कश ध्वनी, निंदा नकोशी वाटते. स्पर्शात कोमलता हवी, स्निग्धता हवी, खरखरीतपणा नको. सुंदरता दिसावी, कुरूपता नको, गोडी असावी, कडूपणा नको. मिळाला तर सुगंध पाहिजे, पण दुर्गंध थोडाही जाणवू नये, असे वाटते आणि असे वाटलेही पाहिजे. त्या त्या इंद्रियांना त्यांची अनुकूल-प्रतिकूलता जाणवत नसेल तर त्यांची कार्यक्षमता नष्ट झाली आहे, उणावली आहे असे म्हणावे लागते. इंद्रिये अशी दुर्बल असणे योग्य नाही. कारण त्यामुळे शरीरधारणाच संकटात पडते.

इंद्रिये आपापली कामे योग्य रीतीने करीत असतानाही त्यांना जाणवणाऱ्या अनुकूल-प्रतिकूलतेच्या पाशात माणसाने गुंतता कामा नये. कारण तसे झाले तर त्यांतून त्याच्या अध:पाताचा आरंभ होऊ शकतो. इंद्रियांची अनुकूल-प्रतिकूलता हिताच्या दृष्टीने उचित असतेच असे नाही. म्हणून त्याविषयीची आसक्ती किंवा तिरस्कार यामुळे माणसाचा घात होऊ शकतो. यासाठीच श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी ''प्राप्तेहि पुरुखे । इंद्रिये लाळिली जरी कौतुके । तरी आक्रमिला जाण दु:खे । संसारिके ।।'' असे स्पष्टपणे सांगितले आहे. इंद्रियांचे

लाड करणारा पुरुष कुणी सामान्य नाही. तो प्राप्त-पुरुष आहे म्हणजे शाश्वत-अव्यय पदावर पोचलेला आहे आणि तरीसुद्धा अगदी सहजपणे, असावधपणे ''आता कशाचे भय'' या भरवंशाने, थोड्या कौतुकाने त्यांनी इंद्रियांना थोडीशी जरी मोकळिक दिली तरी संसारात जन्ममरणाच्या फेऱ्यात आणि त्यातून अपरिहार्यपणे निर्माण होणाऱ्या दु:खात त्याला पडावे लागते. म्हणून इंद्रियांना वाटणाऱ्या हवे-नकोच्या स्वाधीन होऊन चालत नाही.

श्रीमद्भागवतात आलेली जडभरताची कथा या दृष्टीने लक्षात घेण्यासारखी आहे. भरतासारख्या एका थोर ब्रह्मवेत्त्याने संतजनसुलभ केवळ दयाबुद्धीने जन्मत:च आई मेल्यामुळे एका हरिणाच्या पिलाचे संगोपन केले. संगोपन करीत असताना चारा-पाण्याविषयी घ्याव्या लागणाऱ्या दक्षतेने दयाबुद्धीतून वात्सल्य निर्माण झाले. वात्सल्याला आसक्तीचे स्वरूप आले. त्यांना त्या हरिणाचा विरह सहन होईनासा झाला आणि त्यामुळे मृत्यूनंतर भरताला हरिणाचा जन्म घ्यावा लागला. या हरिणाच्या देहातही मागील जन्मी केलेल्या तपस्येच्या प्रभावाने त्यांचे ज्ञान आणि पूर्वजन्माचे स्मरण टिकून होते. पुढे पुन्हा मनुष्यजन्मात आल्यानंतर ते फार सावधपणे राहू लागले. सर्व प्रकारच्या ''हवे-नको'' पासून त्यांनी स्वत:ला दूर ठेवले म्हणून लोक त्यांना वेडा समजू लागले. त्या अत्यंत थोर महात्म्याला जडभरत अशी संज्ञा मिळाली. ते कोणत्याही गोष्टीचा प्रतिकार करीत नाहीत असे पाहून त्यांना भद्रकाली देवीला बळी देण्यासाठी नेण्यात आले. आपला बळी दिला जात आहे हे जाणूनही महात्मा भरत स्वस्थच राहिले. तेव्हा देवी भद्रकाली स्वत:च प्रगट झाली आणि तिने भरताचे रक्षण केले. एका राजाने राजेपणाच्या अहंकारात या महापुरुषाला आपल्या पालखीचा भोई म्हणून जुंपले. असो. दयाबुद्धी ही गोष्ट काही वाईट नाही. पण तिचेही रूपांतर आसक्तीत होताच भरतासारख्या अत्यंत श्रेष्ठ पुरुषालाही जन्ममरण आणि तज्जन्य दुर्दशा भोगावी लागली.

करीत राहाव्या लागणाऱ्या कर्माच्या ठायी अशी लवमात्रही आसक्ती कोणत्याही प्रकाराने उत्पन्न होऊ नये म्हणून ईश्वरपरायण होऊन सर्व कर्मे अंत:करणाने भगवंताच्या ठायी समर्पित करावी लागतात.

सर्व कर्मे भगवदर्पणबुद्धीने करावीत अशा प्रकारचा आदेश गीतेमध्ये वेगवेगळ्या शब्दात अनेक ठिकाणी आला आहे. ''मयि सर्वाणि कर्माणि

संन्यस्याध्यात्मचेतसा। निराशीर्निर्ममो भूत्वा युध्यस्व विगतज्वर: ।। (गीता ३/३०) ब्रह्मण्याधाय कर्माणि सङ्गं त्यक्त्वा करोति य: । लिप्यते न स पापेन पद्मपत्रमिवांभसा ।। (गीता ५/१०) ये तु सर्वाणि कर्माणि मयि संन्यस्य मत्परा:। अनन्येनैव योगेन मां ध्यायन्त उपासते ।। (गीता १२/६)'' मी करतो हा अहंकार सुटला की कर्मे भगवदर्पण होतात हे पूर्वी सांगितलेच आहे. आणि त्यासाठी चित्तवृत्ती भगवत्परायण असावी लागते, भक्तियुक्त असावी लागते तरच हे साधते. ही भगवत्परायणता पूर्ण विवेकाने जीव-जगत्-जगदीश्वर यांच्या संबंधांच्या, यांच्या स्वरूपाच्या यथावत ज्ञानाने प्राप्त होत असते. या ज्ञानासंबंधीचा निश्चय दृढ व्हावा म्हणून क्वचित प्रकृति-पुरुष, क्षेत्रक्षेत्रज्ञ, क्षर-अक्षर, पंचकोश, स्थूलसूक्ष्मादी तीन किंवा चार शरीरे, माया, अविद्या, तिची आवरण-विक्षेपादी लक्षणे यासंबंधीचे सर्व विज्ञानही समजून घ्यावे लागते. कारण अज्ञानाच्या अधिष्ठानावर अनेक प्रकारच्या शंका उत्पन्न होत असतात आणि त्यांचे निराकरणही अनेक प्रकाराने करून घ्यावे लागते. वेदान्तशास्त्रात निर्माण झालेल्या अनेक प्रकारच्या प्रक्रिया, बोधासाठी वेगवेगळ्या दिशेने जिज्ञासूची समजूत घालण्याचा प्रयत्न करीत असल्या तरी त्या विविध विचारसरणींचा उद्देश ब्रह्माची, आत्म्याची निरपवाद एकताच सिद्ध करण्यासाठी असतो. प्रकृतीप्रमाणे निर्माण झालेल्या आवश्यकतेनुसार हे सर्व जाणून घेणे हाच बुद्धियोग. या बुद्धियोगाच्या प्राप्तीसाठी श्रद्धापूर्वक श्रवण-मनन-निदिध्यासनाचा अभ्यास प्रयत्नपूर्वक दीर्घकाल करावा लागतो. गुरूंचे मार्गदर्शन त्यासाठी उपयुक्त ठरते. उत्कट निष्ठेच्यामुळे प्राप्त होणारी ईश्वरीकृपाही या बुद्धियोगाचा लाभ घडवीत असते. अंत:करण भगवंताच्या ठिकाणी सातत्याने स्थिर राहण्यासाठी हा बुद्धियोग म्हणजेच विवेकाधिष्ठित आत्मज्ञान याची आवश्यकता असते. म्हणून भगवान् ''बुद्धियोगमुपाश्रित्य मच्चित्त: सततं भव'' असा आदेश देत आहेत. श्रद्धा, निष्ठा, प्रेम या भक्तिमार्गात अत्यंत आवश्यक असलेल्या भावनांच्या मागे ज्ञानाचे, विवेकाचे, निश्चयाचे अधिष्ठान नसेल तर या भावनाही सातत्याने टिकू शकत नाहीत. त्यांचेही मग जणू काही काळापुरते झटके आल्यासारखे होते. काहीतरी निमित्ताने, काहीतरी प्रसंगाने अंत:करण सात्त्विक भावाने उचंबळून येते आणि ही सात्त्विकता श्रद्धेच्या, प्रेमाच्या रूपानेही व्यक्त होते. ती श्रद्धा, ते प्रेम बुद्धियोगाच्या म्हणजेच

ज्ञाननिष्ठेच्या अभावी सातत्याने टिकू शकत नाही, अव्यभिचारी राहू शकत नाही.

माणसाचे रक्षण या बुद्धियोगामुळेच होत असते. गुराखी जसा हातामध्ये दंडुका घेऊन गुराढोरांना राखतो तसे काही देव माणसाच्या संबंधात वागत नाही. देव माणसाला बुद्धी देतो आणि त्या बुद्धीच्या बळावर मनुष्य योग्यायोग्य जाणून घेऊन जे करणे श्रेयस्कर आहे ते नेमकेपणाने करतो, हिताच्याच मार्गाने चालत राहतो. बुद्धियोगाचे हे असे माहात्म्य आहे. तदभावी चित्ताला स्थिरता येऊ शकत नाही.

चित्ताला स्थिरता येऊन ते भगवंताच्या ठिकाणी सातत्याने जडून राहिले म्हणजे काय घडते आणि तसे झाले नाही तर काय भोगावे लागते त्याचे वर्णन भगवान् पुढील श्लोकात करीत आहेत.

**मच्चित्त: सर्वदुर्गाणि मत्प्रसादात्तरिष्यसि ।**
**अथ चेत्त्वमहंकारान्न श्रोष्यसि विनंक्षसि ।।५८।।**

सातत्याने तुझे चित्त माझ्या ठायी पूर्णपणे स्थिरावले म्हणजे सर्व प्रकारच्या अडचणीतून, संकटातून माझ्या कृपाप्रसादाच्या बळावर तू पार पडशील. आणि जर अहंकाराने माझे म्हणणे ऐकले नाहीस तर तुझा नाश होईल.

चित्त भगवत्परायण होणे म्हणजे आपण जे जे काही करतो ते सर्व भगवंताच्या सामर्थ्यामुळे घडते आहे, त्याची सेवा म्हणून घडते आहे, स्वत:च्या लाभासाठी अवर्जून असे काहीही केले जात नाही, मी करतो, मी केले तरच होते ही अहंकाराची कोणतीही भावना करण्याच्या पाठीमागे नाही. शरीराची धारणा, शरीर हे भगवंताच्या सेवेचे साधन म्हणून होते आहे, जे जे काही घडते आहे ते ते सर्व भगवदिच्छेने माझ्या हितासाठी घडते आहे असे प्रामाणिकपणे वाटत राहते. मनामध्ये भगवंताच्या भक्तीशिवाय अन्य कशाचेही स्फुरण होत नाही. भगवंताचे नाम, भगवंताच्या लीला यांचे सतत स्मरण असते, सर्व काही ऐकणे, बोलणे हे भगवंताविषयीच असते, इतर कोणत्याही गोष्टीची आवड नसते. हे असे असणे म्हणजे अंत:करण भगवत्परायण आहे असे समजावे.

ज्याची मन:स्थिती प्रामाणिकपणे अशी असते, त्याला भगवंताची कृपा

लाभते हे वेगळेपणाने सांगण्याचे खरे म्हणजे कारणच उरत नाही. खरे तर भगवत्कृपा आणि भगवत्परायणता या दोन्ही गोष्टी परस्परावलंबी आहेत. भगवत्परायणता लाभल्यावाचून भगवंताच्या कृपाप्रसादाची जाणीवही होत नाही हे मात्र खरे.

भगवंताच्या कृपाप्रसादाने सर्व संकटांतून भगवद्भक्त तरून जातो हा विषय मात्र नीट समजून घेतला पाहिजे. सामान्यपणे समजला जातो तसा या विधानाचा वरवरचा अर्थ गृहीत धरता येणार नाही. ज्याची वृत्ती पूर्णपणे भगवंताला अर्पण झाली आहे, जो भगवंताशी अनन्य आहे त्याचा भगवंत हा जसा सर्वशक्तिमान् आहे त्याप्रमाणेच सर्वज्ञही आहे असा दृढ विश्वास असतो. त्यामुळे परिस्थिती जशी असेल किंवा निर्माण होईल, ती सामान्यांच्या दृष्टीने, इतरेजनांच्या दृष्टीने कितीही अनुकूल किंवा प्रतिकूल असली तरी तिच्यामुळे या भगवद्भक्ताच्या अंत:करणाचे समाधान ढळत नाही. त्याची मन:स्थिती बाह्य वातावरणात, परिस्थितीत सारखेपणाने स्थिर-शांत प्रसन्न राहते. भगवंताच्या कृपेने अडचणीतून पार होता येते त्याचे स्वरूप वस्तुत: हे असे असते.

अडचणीतून पार पडणे, अडचणीतून तरून जाणे या शब्दाचा खरा अर्थ अडचणी नाहीशा होणे असा होत नाही. नदीतून तरून गेला तरी नदी तशीच राहते. तेव्हा प्रतिकूल परिस्थितीतही ''चित्ती असो द्यावे समाधान'' हे साधणे म्हणजेच आपत्तीतून पार पडणे आहे. अवतारी पुरुष, संतमहात्मे यांच्या जीवनाचा नीटपणे विचार केला म्हणजे हे सहज लक्षात येईल. कित्येक वेळा तर सामान्यांच्या तुलनेने या थोर महात्म्यांच्यावर कोसळलेली संकटे कितीतरी पटीने अधिक उग्र असतात, भीषण असतात असेच आढळून येते. पण त्या सर्व प्रसंगी त्या महात्म्याचा धीर खचला नाही, चारित्र्याला कलंक लागेल असे घडले नाही, ते सन्मार्गापासून विचलित झाले नाहीत वा दु:ख-शोकाने त्यांना हताश केले नाही, गलितगात्र केले नाही, हे असे असणे म्हणजे खऱ्या अर्थाने संकटातून पार जाणे आहे. आपण मात्र आपल्या सोयीने कोणत्याही प्रकारचे संकटच न येणे याला भगवत्कृपा समजत असतो. बालबुद्धी असलेल्याला भक्तीचे प्रलोभन निर्माण करण्याच्या दृष्टीने तसेही काही वेळा म्हटले जाते. त्या दृष्टीची अपवादभूत उदाहरणे उल्लेखिलीही जातात. पण ती यथार्थता नसते हे सुज्ञांनी लक्षात ठेवणे बरे. खऱ्या शूराला जसे युद्धाचे भय नसते, आपत्तीच्या

संदर्भात भक्ताचेही तसेच असते. काही भक्त तर आपत्ती समयी उत्कटतेने भगवंताचे स्मरण होते म्हणून त्या सुखासाठी कुंतीप्रमाणे आपत्ती मागून घेतात. यावरून निदान भक्त संकटाला भीत नाही हे तरी निश्चित होते. अर्थात हे लक्षण श्रेष्ठ भक्ताचे आहे. गौणी भक्तीत आर्तादी भेद असू शकतात आणि योग्यतेप्रमाणे प्रसंगविशेषी त्यांचे कोडकौतुक होते, हट्ट पुरविले जातात, लाड केले जातात असेही आढळते. पण तो विषय सध्या आपल्या विवेचनाचा नाही.

श्लोकाच्या दुसऱ्या ओळीमध्ये भगवंत जे सांगत आहेत, ते अर्जुनाला दिलेल्या धमकीच्या स्वरूपाचे आहे, असे म्हणण्याची चूक मात्र कोणी करू नये. औषध घेतले नाही, पथ्य पाळले नाही, तर मरशील असे वैद्याने सांगणे ही काही धमकी नसते; ती केवळ वस्तुस्थिती असते. तसेच भगवान् येथे केवळ अहंकाराने न ऐकण्याच्या परिणामाचे यथार्थ स्वरूप सांगत आहेत. ही शिक्षाही नाही, धमकीही नाही वा शापही नाही.

कोणाचे सांगितलेले न पटणे, त्यामुळे सांगण्याप्रमाणे न वागणे हे अहंकाराचे आहे. कारण त्यात जो सांगतो त्याच्यापेक्षा आपण अधिक बुद्धिमान आहोत, अधिक ज्ञानी आहोत, आपल्याला अधिक कळते, आपल्या परिस्थितीची आपल्याला अधिक चांगली कल्पना आहे, त्यामुळे परिणामाचे स्वरूप आपल्याला चांगले उमगते, या सांगणारालाच प्रसंगाचे नीट आकलन झाले नाही, त्याने नीट विचार केलेला नाही इत्यादी गोष्टी ठामपणाने गृहीत धरल्या जातात. वस्तुत: जो कळकळीने सांगतो, ज्याला तुम्ही मार्गदर्शन करा अशी विनंती अगतिकपणे केलेली असते; मी तुमचा शिष्य आहे, मला समजावून नीट बोध करा, असे आपण होऊन प्रार्थिलेले असते; ज्याच्या विद्वत्तेविषयी, बुद्धिमत्तेविषयी, आत्मीयतेविषयी पूर्वी कधी शंकाही आलेली नसते, ज्याचा अधिकार अमान्य करता येत नाही, त्याने सांगितलेले आचरणात आणावे असे वाटत नसेल, तर त्या अहंकाराचे स्वरूप किती उर्मट आहे हे निराळे सांगण्याची आवश्यकता नाही.

काम-क्रोधादी सर्व विकार ही अहंकाराचीच संतती आहे. अहंकार त्या सर्व विकारांचा जनकही आहे आणि पोषकही आहे. तो त्यांचे संरक्षणही करीत असतो. त्यामुळे अहंकार कधी एकटा येत नाही, एकटा राहत नाही. अर्थात अशा या अहंकाराचा परिणाम अंततोगत्वा अहंकारी व्यक्तीच्या विनाशात

होतो हे उघड आहे. हीच वस्तुस्थिती अर्जुनाच्या लक्षात आणून देण्याचे काम भगवान् या श्लोकात करीत आहेत.

अर्जुना ! माझे न ऐकणे, मी सांगितल्याप्रमाणे न वागणे हेच तुझ्या अहंकाराचे लक्षण आहे. तुझ्या अनेक शंकांचे समाधान मी आतापर्यंत केले आहे. तुझ्या अनेक प्रश्नांना कधी संक्षेपाने, तर कधी विस्ताराने उत्तरे दिली आहेत. कित्येक गोष्टी तुला नाना प्रकारांनी क्वचित् पुन:पुन: सांगून समजावूनही दिल्या आहेत. तुझे कल्याण कशात आहे, तुझे कर्तव्य कोणते, ते तुझ्या नीट लक्षात आणून दिले आहे. थोर पुरुष कसे वागतात, कसे असतात त्याचा आदर्श तुझ्यापुढे उभा केला आहे. चूक का होते, कशी होते तेही तुला विवरून सांगितले आहे. इतके सर्व केल्यावर तू जर मी सांगतो त्याप्रमाणे वागला नाहीस, तर त्यात तुझाच घात आहे, हे नीट जाणून घे.

कौरवांशी लढणे हे प्राप्त परिस्थितीत तुझे कर्तव्य आहे. या कर्तव्याला विन्मुख करणाऱ्या नाना प्रकारच्या कारणांची मीमांसा करून मी त्यांचे निराकरण केले आहे. आताही जर तू माझे सांगणे न पटून युद्ध करीत नाही म्हणशील तर ते तरी शक्य होणार आहे का? तसेही होणार नाही. ते का याचे उत्तर भगवान् पुढील श्लोकात देत आहेत.

**यदहंकारमाश्रित्य न योत्स्य इति मन्यसे ।**
**मिथ्यैष व्यवसायस्ते प्रकृतिस्त्वां नियोक्ष्यति ।।५९।।**

**स्वभावजेन कौन्तेय निबद्धः स्वेन कर्मणा ।**
**कर्तुं नेच्छसि यन्मोहात्करिष्यस्यवशोऽपि तत् ।।६०।।**

अहंकाराचा आश्रय करून 'मी लढणार नाही' असे तू जे म्हणतोस, तो तुझा निश्चय अगदी व्यर्थ आहे, कारण तुझी प्रकृती तुला हे युद्ध करणे भाग पाडील.

अर्जुना ! तू तुझ्या स्वाभाविक कर्माने बांधला गेलेला आहेस, म्हणून अमुक करण्याची मला इच्छा नाही असे जरी तू मोहाला वश होऊन म्हणालास तरी (तुझ्या स्वभावधर्माप्रमाणे) अगतिकपणे (तू टाळू पाहत असलेले) ते कृत्य तुला करावेच लागेल.

माणूस 'मी हे करीन', 'मी हे करणार नाही' असे ज्या वेळी म्हणतो त्या वेळी ''मी'' हे त्या कर्माचे केवळ साधन राहत नाही. मी करीन किंवा मी करणार नाही यामागे कर्तृत्वाचा अहंकार असतो. आणि असे हे कर्तृत्व अहंकाराने स्वत:कडे ओढून घेणे हे मूर्खपणाचे आहे किंवा स्वत:स कर्ता मानणे हे अहंकाराने उत्पन्न झालेल्या मूर्खपणामुळे घडते. वस्तुत: प्रकृतीच्या आश्रयाने असणारे सत्त्व-रज-तम हे तीन गुण माणसाच्या हातून घडणाऱ्या बऱ्या-वाईट कर्माचे खरे प्रवर्तक असतात. अशा अर्थाचे वचन गीतेच्या तिसऱ्या अध्यायात आलेले आहे. (गीता ३/२७). गीतेच्या तेराव्या अध्यायात प्रकृतीच सगळी काही कर्मे करीत असते हे ज्याला कळते आणि आपण स्वत: (आत्मा) कधीच कर्ता नसतो हे ज्याला उमगते त्यालाच खरे ज्ञान झालेले असते, असे भगवंतांनी म्हटले आहे. (गीता १३/२९).

याचा अर्थ स्पष्टपणे असा आहे की कोणत्याही कर्माचे वास्तविक कर्तृत्व स्वत:कडे घेणे हे अहंकारातून उत्पन्न झालेल्या मूर्खतेचे लक्षण आहे. त्याचप्रमाणे वस्तुत: आपण कोणत्याही कर्माचे कर्ते नसतो असे समजणे हे ज्ञातेपणाचे-बुद्धिमत्तेचे लक्षण आहे. कारण आपण ज्याला आपण वा मी म्हणून समजत असतो त्याला सामान्यत: शरीर-इंद्रिये-मन-बुद्धी-अहंकार यांचे अधिष्ठान असते आणि हे सर्व भाव प्रकृतीचे आहेत. सत्त्व-रज-तम या तीन गुणांनी युक्त असलेल्या प्रकृतीच्या अधिष्ठानावरच अहंकारादी विकार विकसित होत असतात. यात गुणात्मक विभागणी करायची झाली, तर ती माझ्या मताने बुद्धी सात्त्विक, मन नि इंद्रिये राजस आणि अहंकार नि शरीर तामस असते. या विधानात अहंकाराला तामस का म्हटले असा प्रश्न उपस्थित होण्याची शक्यता आहे. न हालणे, जड असणे, ज्ञान झाकून ठेवणे ही जी तमोगुणाची लक्षणे, ती वरील विकारांपैकी अहंकाराच्या अधिष्ठानाने सर्वांत अधिक असतात असे दिसून येते. बुद्धीचा सत्त्वगुण असल्यामुळे बोधाला, उपदेशाला, ज्ञानाला, प्रयत्नाला अर्थ प्राप्त होऊ शकतो आणि मग ती बुद्धी एकीकडे अहंकाराला आणि दुसरीकडे मनाला योग्य त्या विवेकाच्या बळावर इष्ट ते वळण लावू शकते. म्हणूनच भगवंतांनी बुद्धियोगाचा आश्रय करून मच्चित्त हो किंवा मी दिलेल्या बुद्धियोगाच्या बळावर ते मला प्राप्त होतात, किंवा मी तुला आत्तापर्यंत सांख्यबुद्धी सांगितली आता योगबुद्धी सांगतो, असे

म्हणून बुद्धीचे माहात्म्य साधकाच्या निदर्शनास आणून दिले आहे.

पण अहंकार बुद्धीची ही थोरवी मान्य करीत नाही आणि अहंकाराच्या बळापुढे बुद्धीचे सामर्थ्य तोकडे पडून ती अगतिक होते. आणि मग तिला अहंकाराचे समर्थक होणे भाग पडते. बुद्धी आपल्या पूर्ण सामर्थ्यानिशी उभी राहू शकली नाही, तर अहंकाराच्या आश्रयाने असणारे तमोगुणाचे प्रमाद–मोह हे बुद्धीला प्रभावित करतात. अशी बुद्धी मग माणसाला श्रेयापेक्षा प्रेयाकडे, हितापेक्षा सुखाचे जे आकर्षण असते त्याकडेच प्रवृत्त करीत राहते. या सुखलालसेचे तत्त्वज्ञानही बनविते. असे होऊ नये म्हणून तर भगवंतांनी याच अध्यायाच्या एकावन्नाव्या श्लोकात साधनेचा आरंभ करताना आरंभीच विशुद्ध अशा बुद्धीने युक्त होणे साधकाच्या दृष्टीने आवश्यक आहे असे आवर्जून सांगितले आहे.

सात्त्विक बुद्धीचे नियंत्रण शिथिल झाल्यामुळे कर्तृत्वाचा अहंकार माणसाच्या ठिकाणी फुलत असतो. आपल्या वास्तविक योग्यतेचे भान त्याला राहत नाही. आणि त्यामुळेच करीन किंवा करणार नाही हे म्हणणे वरवरचे राहते. आणि प्रकृतीने घडविलेल्या स्वभावाप्रमाणे जे घडायचे ते घडतेच. स्वभावात मुळात चांगुलपणा असला, सत्त्वगुणाचे प्राधान्य असले तर रागद्वेषाने उत्पन्न झालेल्या इच्छेवर मात करून कधीकधी सत्कृत्ये घडतात. उलट स्वभावात मुळात वाईटपणा असेल, तर सत्प्रवृत्तीचा झटका येऊनही थोड्याच वेळात मनुष्य मोहाला बळी पडतो असे आढळते.

बायकोशी भांडण झाल्यामुळे पुन्हा घरचे तोंड पाहणार नाही, असे म्हणून वैतागाने बाहेर पडलेला सामान्य संसारी माणूस रानातून घराकडे येणाऱ्या स्वत:च्या म्हशीचे शेपूट धरून भांडण विसरून घरी परत येतो आणि तोंडाने मात्र ''अग अग म्हशी मला कुठे नेशी'' असे म्हणत असतो.

श्रीसंत तुलसीदासांचे मात्र याच्यापेक्षा उलट घडले. पत्नीच्या ठिकाणी त्यांची अत्यंत आसक्ती होती. तिचा क्षणाचाही विरह त्यांना सहन होत नसे. तुलसीदासाच्या इच्छेविरुद्ध त्यांची पत्नी एकदा माहेरी गेली असताना तुलसीदास तिला भेटण्यासाठी आतुरतेने निघाले. दिवस पावसाचे होते, रात्र अंधारी होती. मधे असलेल्या नदीला महापूर आला होता. त्या कशाचीहि क्षिती न बाळगता तुलसीदास पत्नीच्या भेटीकरिता भानरहित होऊन धावले.

त्यांच्या सज्जनपणाला न शोभणारी त्यांची ती आसक्ती पाहून त्यांची पत्नी म्हणाली – ''हड्डी चमडा मांस रुधिरकी तनु मेरी करो ख्याल । मैं मिट्टीकी पुतली छोडो सखा करो जगपाल ।।'' मांस–मेदाने भरलेल्या माझ्या मातीच्या शरीराची तुम्हांला एवढी ओढ लागली आहे. हीच जर ईश्वराविषयी लागली तर तो तुम्हांला आपला म्हणून हृदयाशी धरणार नाही का? तुलसीदासांना उजाडले. गुरू म्हणून त्यांनी पत्नीलाच नमस्कार केला. संसाराचा त्याग करून रामाच्या भक्तीत त्यांनी आपले जीवन झोकून दिले. रामचंद्राच्या साक्षात्काराने गृहस्थ तुलसीदास गोस्वामी तुलसीदास झाले. त्यांच्या रामचरितमानसाने गेली चारशे वर्षे लक्षावधी भाविकांना रामभक्तीत रंगवून ठेवले.

''प्रकृतिस्त्वां नियोक्ष्यति'' किंवा ''करिष्यस्यवशोऽपि तत्'' हे कसे घडते त्यासाठी ही दोन्ही उदाहरणे उलट–सुलट रीतीने लक्षात घेण्यासारखी आहेत.

पृथ्वीच्या ठिकाणी असलेल्या गुरुत्वाकर्षणाच्या प्रभावाने फळ झाडावरून सुटले की जमिनीवरच पडायचे. मधे कोणी हाताने अडविले तर ते हाताला भारभूत होणार. पाणी उताराकडेच वाहायचे. मधे टेकड्या उंचवटे आले तर ते त्याला वळण घेणार पण वाहण्याचे थांबणार नाही. बांध घातला तर तो ओलांडून उंचीवरून खाली कोसळणार. हे जसे स्वभावाने घडते तसेच अर्जुनाचेही होईल असे भगवान् त्यास सांगत आहेत.

या विषयाचे स्पष्टीकरण करताना श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी अनेक उदाहरणे दिली आहेत. ती काव्यमय आहेत तशीच बोधप्रदही आहेत. ''का साळीचा कणु म्हणे । मी नुगवे साळीपणे । तरी आहे आन करणे । स्वभावासी ।।'' (ज्ञाने. १८/१२८७) पेरलेली साळ काही झाले तरी साळ म्हणूनच उगवणार. तिच्या रोपाला गव्हाच्या ओंब्या किंवा मुगाच्या शेंगा कधी लागणार नाहीत.

अर्जुनाच्या जीवनातील एका घटनेचे उदाहरण श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी यासंदर्भात दिले आहे. ते मोठे मार्मिक आहे.

उत्तर गो–ग्रहणाच्या वेळी मत्स्यदेशाचा युवराज उत्तर अहंकाराने म्हणाला–काय करू! मला सारथी नाही, नाहीतर मी भीष्म–द्रोण–कर्णासह सर्व कौरवांना पराभूत करून स्वपराक्रमाने गायी सोडवून आणल्या असत्या. त्या वेळी बृहन्नडेच्या, नपुंसकाच्या वेषात असलेल्या अर्जुनाने, बृहन्नडेला सारथी म्हणून घेऊन जा, असे सांगावयास उत्तराला सुचविले. उत्तर प्रकृत्या

भिन्ना होता. 'लढेन' ही वल्गना अहंकाराची होती. मोरोपंतांनी त्याचे वर्णन ''बालिश बहु बायकात बडबडला'' अशा खोचक शब्दाने केले आहे. बृहन्नडेला सारथी करून उत्तर रणांगणात आला. कौरवांचे विशाल सैन्य पाहून घाबरला आणि परत फिरण्यास त्याने बृहन्नडेला सांगितले. बृहन्नडा ऐकत नाही असे पाहताच तो रथावरून उतरून पळू लागला. तेव्हा अर्जुनाने त्यास अडविले. उचलून माघारी आणले. बळेबळे सारथ्य करावयास लावले. आणि धैर्याने एकट्याने कौरवांशी युद्ध करून उर्मटपणाने प्रौढी मिरविणाऱ्या कर्णासह सर्व सेनेचा पराभव केला. आपण अज्ञातवासात आहोत, बृहन्नडेच्या वेषात आहोत याचे भान त्याला राहिले नाही. उत्तरासारखा भेकड सारथी आहे याचीही अडचण त्यास वाटली नाही, त्याची क्षात्रवृत्ती स्वाभाविकपणे उसळून आली, ''करिष्यस्यवशोऽपि तत्'' घडते ते असे.

परंतु असे प्रकृतीच्या प्रेरणेने किंवा स्वभावधर्माने अगतिकपणे एखादे कर्म घडणे हे क्वचित् फलदायी ठरले तरी तसे होणे इष्ट नसते. कर्मावर माणसाचे नियंत्रण असले पाहिजे. कर्मामागील प्रेरणा विवेकबुद्धीची असली पाहिजे. मोहातून उत्पन्न झालेल्या इच्छेची वा रजोगुणाच्या प्रभावाखाली असलेल्या आसक्तीची असता कामा नये. तरच ते हिताचे ठरते. हिताकडे नेणारे ठरते.

इंधन वाचविण्याकरिता उताराचा लाभ घेऊन काही वाहनचालक आपल्या गाडीचे यंत्र बंद ठेवतात. पण वाहतुकीच्या नियमाप्रमाणे ते इष्ट नसते. कारण त्यामुळे अपघात होण्याचे भय वाढते. यंत्र चालू ठेवून वेगगती तंत्राधारे नियंत्रित ठेवणेच योग्य असते. गतिरोधकावर विसंबून चालत नाही. स्वभावधर्माने घडणारी कर्मे आणि विवेकपूर्वक केलेली कर्मे यांचेही तसेच समजले पाहिजे.

कर्माला अनिष्ट ठरविणारा हा अहंकार, कर्तृत्व स्वत:कडे ओढवून घेण्याच्या भरात विनाशाला कारणीभूत होऊ शकतो. तसे होऊ नये म्हणून मनुष्याच्या हातून घडणाऱ्या सर्व हालचालींची प्रेरणा मुळात कुठून उत्पन्न होते ते जाणून घेणे आवश्यक असते. ती जाणीव भगवान् पुढील श्लोकातून करून देत आहेत.

**ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति ।**
**भ्रामयन्सर्वभूतानि यंत्रारूढानि मायया ॥६१॥**

अर्जुना ! सर्व भूतमात्रांच्या हृदयामध्ये ईश्वर राहत असतो आणि तोच आपल्या मायाशक्तीने सर्व भूतमात्रांना यंत्रावर चढवून फिरवीत असतो.

सर्व सृष्टीमध्ये ग्रह-नक्षत्रे, आकाशगंगा, तेजोमेघ वा अभ्रिका यांच्यापासून ते थेट पृथ्वीवरील डोंगर-दऱ्याखोरी, दगड-धोंडे, माती, प्रचंड वृक्षापासून शेवाळ्यासारख्या वनस्पती, आंबा-नारळासारख्या जीवनोपयोगी वनस्पतीपासून विषारी काटेरी झुडपांपर्यंत, समुद्रापासून तळी-डबक्यापर्यंत, गंगासिंधूसारख्या महानद्यांपासून ओढेनाल्यापर्यंत, हत्तीपासून कृमिकीटकांपर्यंत, सर्व खंडात पसरलेल्या विविधरूपी माणसांपर्यंत, ईश्वर सर्वांच्या म्हणजे प्रत्येक वस्तुजाताच्या अंतरंगात राहतो. ईश्वर कोठे आहे असा प्रश्न विचारण्यापेक्षा ईश्वर कोठे नाही हा प्रश्न विचारणे ''तो सर्वत्र आहे'' या उत्तराच्या संदर्भामुळे अधिक सुसंगत आहे. तेव्हा सूक्ष्मातल्या सूक्ष्म वस्तुमात्रापासून प्रचंडाहून प्रचंड असलेल्या पदार्थापर्यंत ईश्वर सर्वत्र सारखाच ओतप्रोत व्यापून आहे. पण हा सिद्धांत आकलनाला काहीसा अवघड असल्यामुळे नाना प्रकारे प्रत्ययास येणारी विविधता गृहीत धरून त्या सर्व भूतमात्रांच्या म्हणजे वस्तुजातांच्या हृदयांत म्हणजे आत म्हणजे अंतरंगात ईश्वर निवास करतो असे त्यातल्यात्यात समजावयास सोपे विधान केले गेले आहे.

पदार्थ सचेतन असेल वा अचेतन असेल, स्थूल असेल वा सूक्ष्म असेल, पण त्या वस्तूचे ते ते वस्तूपण ईश्वराच्या अस्तित्वावर अवलंबून आहे. जडाचा जडपणाही ईश्वरामुळेच आणि सजीवाचा जिवंतपणाही ईश्वरामुळेच प्रत्ययास येत असतो. मनुष्य ज्या काही हालचाली करीत असतो, कृती करीत असतो, व्यवसाय करीत असतो वा त्याच्या शरीरात जे श्वासोच्छ्वास, अन्नाचे पचन, हृदयाचे स्पंदन, इंद्रियांच्या द्वारा होणारे विषयाचे ग्रहण इत्यादी व्यापार होत असतात, त्यापाठीमागे जिवंतपणाच्या रूपाने वस्तुत: ईश्वरी चैतन्यच प्रेरणा देण्याचे कार्य करीत असते. त्या त्या सर्व हालचाली वा कृती वा व्यापार होण्यासाठी उपयुक्त असलेली अवयवांची रचनाही ईश्वरानेच म्हणजे ईश्वरी सत्तेनेच घडविलेली असते.

स्पष्टीकरणासाठी वीज ही शक्ती आणि तिच्या बळावर चालणारी नाना प्रकारची यंत्रे यांचे उदाहरण लक्षात घेण्यासारखे आहे. पंखा, शेगडी, शीतक, दूरध्वनी, दूरदर्शन, आगगाडी, नाना प्रकारच्या उद्योगधंद्यांस उपयोगी पडणारी प्रचंड यंत्रे, माणसाच्या मेंदूप्रमाणे कार्य करणारा संगणक इत्यादी इत्यादी यंत्राचा आकार, रचना आणि उपयोग एकमेकांपेक्षा कितीही वेगळे असले तरी त्यांच्याकडून ती ती कामे करून घेणारी वीज मात्र एकच असते. रचना-विशेषाने वा उपयोग-विशेषाने यंत्रे वेगवेगळी वाटली तरी एकच वीज जशी त्यांच्या कार्यक्षमतेला कारण असते, त्याप्रमाणे ईश्वराची मायाशक्ती विविध प्रकाराने दिसणाऱ्या सर्व भूतमात्रांच्या नाना प्रकारच्या हालचाली घडवीत असते.

मात्र ईश्वराची मायाशक्ती ही काही आपल्या महाराष्ट्र विद्युत मंडळाच्या विजेप्रमाणे मधून मधून नाहीशी होणारी अशी बिनभरवशाची नसते. ती सर्वदा, सर्वत्र अखंडपणे कार्यरत असते. म्हणून तर संतांनी ''झाडाचेहि पान हाले त्याची सत्ता ।।'' असे ईश्वरी अधिष्ठानाचे महत्त्व स्पष्टपणे उल्लेखिले आहे.

प्रत्येक हालचाल अशी ईश्वरी प्रेरणेने, ईश्वरी शक्तीने होत असते, तर मग चांगले किंवा वाईट, पाप किंवा पुण्य, सत्कृत्य किंवा दुष्कृत्य याचा भार माणसाच्या डोक्यावर काय म्हणून? असा एक प्रश्न क्वचित् प्रामाणिकपणे, बहुधा कुत्सितपणे विचारला जातो. प्रामाणिकांच्या शंका-निरसनासाठी काही उदाहरणे देऊन स्पष्टीकरण करण्याचा प्रयत्न करतो. माझ्यापुढे हा ध्वनिक्षेपक, ध्वनिवर्धक आहे. माझे शब्द त्यामुळे आपणांस दूरवर चांगल्या रीतीने ऐकू येतात. ध्वनिक्षेपकाच्या सुस्थितीचे ते लक्षण आहे. पण ध्वनिक्षेपक, मधेच किंचाळतो, खरखरतो, शब्दांना अस्पष्टपणा आणतो याचा अर्थ ध्वनिक्षेपकाच्या रचनेत, यंत्रणेच काहीतरी दोष आहे असा होतो. हा दोष विजेचा नसतो. यंत्राचा असतो. गुणही विजेचा नसतो. यंत्राची सुस्थिती असल्यामुळे तो प्रत्ययास येतो. हे गुणदोष विजेला लागत नाहीत. शब्द दूरवर स्पष्टपणे ऐकू येणे किंवा ध्वनिक्षेपक किंचाळपणे, खरखरणे या दोन्ही क्रियांमागे वीज नसेल तर घडणार नाहीत. तरी हा गुण वा हा दोष यंत्राचा आहे असेच आपण मानतो आणि त्या दृष्टीने दोष असल्यास यंत्र पारखून घेतो, ते ठाकठीक करून घेतो. मनुष्याच्या हातून घडणाऱ्या सत्कृत्यांचे वा दुष्कृत्यांचे असेच समजावे. एखादा शासकीय

अधिकारी भ्रष्टाचार करतो. लाच खातो. न दिल्यास काम बिघडवितो, निदान विलंब लावतो. असे तो का करू शकतो? तो सत्ताधीश असतो म्हणूनच हे करू शकतो. सत्ता नसेल तर लाच खाणे शक्यच नाही. कारण मागितली तरी कुणी देणार नाही. पण भ्रष्टाचार उघडकीस आल्यास त्यासाठी दोषी धरली जाते ती अधिकारी व्यक्ती. तसेच ईश्वरी सत्तेने मुनष्याच्या हातून घडणाऱ्या पापाचे समजावे. अधिकारी सज्जन, चांगली कामे करणारा, न्यायाने वागणारा असा असेल तर लोक त्या व्यक्तीचा सन्मानही करतात. मनुष्याच्या हातून घडणाऱ्या पुण्याचेही असेच मानले पाहिजे. जिवंत मनुष्यच रोगी होतो. आणि रोग बरे होतात तेही जिवंत माणसाचेच. पण रोग होतात त्याचे कारण जिवंतपणा असे मात्र आपण म्हणत नाही. हाच विवेक मनुष्याच्या हातून घडणाऱ्या पापपुण्याचा विचार करताना ठेवला पाहिजे.

खरे म्हणजे ईश्वरी सत्तेचा केवळ नैसर्गिकपणे विचार केला, तर माणसाच्या हातून वाईट घडणे, अहिताचे घडणे शक्यच नाही. मनुष्य त्याला त्याच्याच उन्नती-प्रगतीसाठी मिळालेल्या कर्म करण्याच्या स्वातंत्र्याचा यथायोग्य उपयोग करून घेत नाही. खरे तर दुरुपयोग करतो, म्हणून तर त्याच्या हातून जे घडावयास पाहिजे ते न घडता बिघडलेल्या यंत्राप्रमाणे जे घडू नये तेच नेमके घडते.

यंत्र बिघडते, ते योग्य प्रकारे हाताळले जात नाही म्हणून. यंत्राची आदळआपट होते, त्याच्या कळी दाबण्यात वा फिरविण्यात धसमुसळेपणा होतो, यंत्राची देखभाल नीट केली जात नाही, ते नको तितक्या दीर्घकाळ सातत्याने वापरले जाते, अनेक व्यक्ती दक्षता न घेता त्याचा वापर करीत असतात म्हणून. हे सर्व जे घडते, त्यात विजेचा काही संबंध नसतो. हे सर्व यंत्र वापरणाऱ्याच्या अविवेकाचे, अज्ञानाचे वा अकुशलतेचे परिणाम असतात. यंत्र जिथे ठेवलेले असते ते स्थान जर सरळ समतल नसेल, उंचसखल वेडेवाकडे असेल, तर केवळ तेवढ्यामुळेही यंत्राला हादरे बसतात आणि यंत्र बिघडते. यंत्राच्या स्थितीकडे दुर्लक्ष केल्याचाच हा परिणाम असतो. या सर्व दोषांना वीज काही कारण नसते.

यंत्र बिघडते त्याची कारणे जशी विजेच्या अस्तित्वापेक्षा निराळी असतात तसेच माणसाच्या हातून घडणाऱ्या विकृत कृतीचेही असते. अहंकार आणि

तज्जन्य कामक्रोधादी विकार माणसाच्या हातून नको ते घडवीत असतात. हा दोष दूर होण्यासाठी काय करावे ते भगवान् पुढील श्लोकात सांगत आहेत.

**तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत ।**
**तत्प्रसादात्परां शान्तिं स्थानं प्राप्स्यसि शाश्वतम् ।।६२।।**

अर्जुना ! यासाठी तू सर्वभावाने त्या ईश्वरालाच शरण जा. म्हणजे ईश्वरी प्रसादाचा लाभ तुला होईल आणि त्या योगाने तू आत्यंतिक शांतता मिळवून शाश्वत पदाला प्राप्त होशील.

परा शांती आणि शाश्वत स्थान यापेक्षा मोक्ष-मोक्ष म्हणतात तो काही निराळा नाही. आणि जीवन्मुक्ताच्या ठिकाणी जी लक्षणे दिसून येतात त्याचेही अधिष्ठान हेच असते. संतोष, तृप्ती, समाधान, स्वस्थता, प्रसन्नता, निरामयता, आनंद इत्यादी हवेहवेसे वाटणारे जे सर्व भाव ते या परम शांतीचेच निरनिराळे आविष्कार आहेत. याचा लाभ व्हावा म्हणून ईश्वराचा कृपाप्रसाद मिळवावा लागतो. कारण ईश्वर हाच सर्वसमर्थ, सर्वसत्ताधारी, सर्वांचे अधिष्ठान, सर्व प्रेरणांचे उगमस्थान, सर्व चैतन्याचा मूलस्रोत असा आहे. म्हणून चांगले काही घडायचे असेल तर त्याचा-ईश्वराचा प्रसाद लाभणे आवश्यक आहे. प्रसाद शब्दाचे कृपा, अनुग्रह हे जे अर्थ आहेत ते आपण स्पष्टार्थबोधासाठी व्यवहाराच्या दृष्टीने अनुकूलता लक्षात घेऊन लावलेले आहेत. त्याचा मुख्य अर्थ निर्मलता असा आहे. निर्मल म्हणजे जे जसे असावयास हवे ते तसे असणे.

ईश्वराला बाधक होईल असे त्याच्याकडून काहीही संभवनीय नाही. तो सर्व उपाधींच्या, सर्व पातकांच्या, सर्व अनिष्टांच्यापासून अत्यंत वर विराजमान असतो म्हणूनच निर्मल असतो म्हणजेच सदासर्वदा प्रसादयुक्त असतो. स्वच्छ सूर्यप्रकाश पडलेला असला म्हणजे दिवस कसा प्रसन्न वाटतो, पण आकाशात ढग दाटून आले की त्या दिवसाला दुर्दिन म्हणतात. सूर्याचा प्रकाश पृथ्वीपर्यंत पोचत नाही. वातावरण कसे कुंद होते आणि त्यात माणसाला गुदमरल्यासारखे वाटते. ढग दूर होऊन आकाश मोकळे झाले की पुन्हा वातावरण आल्हाददायक होते. सूर्यप्रकाश अडविणारे ढग पृथ्वीपासून उत्पन्न होत असतात आणि पृथ्वीजवळ पृथ्वीच्याच वातावरणात

वावरत असतात. प्रत्यक्ष सूर्य त्यांच्यापासून कोट्यवधी कोस दूर असतो आणि स्वत:च्या ठिकाणी सदैव सारखेपणानेच प्रकाशमान असतो. ईश्वरी प्रसादाचेही तसेच आहे. म्हणजे ईश्वर प्रसन्न नसतो, कृपामय नसतो, असे कधीच नसते. पण तो प्रसाद आपणापर्यंत पोचत नाही याचे कारण आपले अहंकारादी विकार त्याच्या आड येतात.

कर्तृत्व ईश्वराचे आहे, मूलत: सर्व प्रेरणांचा स्रोत ईश्वर आहे, असे जर माणसास प्रामाणिकपणे वाटत असेल, तर तो विनम्र राहील, त्याची कर्मे निष्काम होतील. फलाविषयीच्या आसक्तीचा स्पर्श त्याच्या अंत:करणास चुकूनही होणार नाही. पण थोर संतमहात्मे वगळले तर इतर अनेक चांगली चांगली कृत्ये करून लोकांच्या उपयोगी पडणाऱ्या, दुष्ट किंवा पातकी नसलेल्या, सज्जन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या व्यक्तीच्या अंत:करणातही मी करतो, मी केले तरच होते अशा स्वरूपाची जाणीव स्थूल-सूक्ष्म स्वरूपात तरी नांदत असतेच आणि यामुळेच माझ्या कामाचे महत्त्व लोकांना पटत नाही, इतके करून माझे कौतुक होत नाही, माझ्या कामाची उपेक्षा होते, माझा अपमान होतो, मी केलेल्या कामाचा, माझ्या मोठेपणाचा इतरेजन उपयोग करून घेतात आणि त्याचे श्रेयही तेच लाटतात, माझा उल्लेखही करीत नाहीत, इत्यादी इत्यादी विचार कर्तव्यभावनेने, परोपकारासाठी, ईश्वराची सेवा म्हणून ईश्वरी कार्य या उद्देशाने मी हे काम करीत असतो असे म्हणणाऱ्याच्या मनातही येतात. तोंडाने मात्र आपला विनय दाखविण्यासाठी ''मी कोण, ईश्वर माझ्याकडून हे काम करवून घेत आहे'' असे म्हटले जाते. असे म्हणण्यातही ईश्वराला निमित्त म्हणून मीच आवश्यक ठरलो, इतर सामान्यांना त्याने स्वीकारले नाही असे सुचविण्याचा सुप्त अहंकार असतोच. सर्वांना सहज प्राप्त होणाऱ्या ईश्वरी प्रसादाच्या आड येतो तो हा अहंकार. म्हणूनच सात्त्विक कर्त्यांच्या लक्षणात अहंकार नसलेला-अनहंवादी आणि आसक्ती नसलेला-मुक्तसंग, अशी विशेषणे आली आहेत. कौतुक झाले नाही, अपमान झाला, उपेक्षा झाली हे जे जाणवते ते या आसक्तीमुळे वा अहंकारामुळेच. हा अहंकारच मग कामक्रोध, ईर्ष्या, द्वेष, मद, मत्सर इत्यादी विकारांना जन्म देतो, वाढवितो. अशा स्थितीत ईश्वरी प्रसादाचा लाभ कसा व्हायचा?

ईश्वरी प्रसादाच्या प्राप्तीसाठी म्हणूनच उपाय सांगताना भगवान् 'ईश्वराला

सर्वभावाने शरण जा' असा आदेश देत आहेत. शरण जाणे या क्रियेमध्ये वस्तुत: सर्वभावाने शरण जाणे गृहीतच आहे. पण आपल्या वागणुकीच्या पातळीवर मात्र दोन्ही शब्दांचे महत्त्व स्वतंत्रपणे समजून घ्यावे लागते.

गोकुळातल्या गौळणी या भक्तिमार्गातल्या आदर्श भक्त. नारदासारख्या महान् भगवद्भक्तानेहि भक्ती-प्रेम कोणासारखे असावे तर व्रजवासी गोपींसारखे असे म्हटले आहे. पण अशा या गोपिकांनासुद्धा स्वत: त्यांना आपले अभिन्नहृदय मानणाऱ्या भगवंतानेच एकदा फटकारले आहे. रासक्रीडा रंगात आली असताना इतर गोपींचा त्याग करून भगवान् राधेला घेऊन गुप्त झाले. पण तिच्या अहंकारी दुरात्मतेमुळे (स्त्रीणां चैव दुरात्मतां दर्शयन् - भागवत) तिचाही त्याग करून भगवान् निघून गेले. भगवंताच्या विरहाने गोपी कासावीस झाल्या. त्यांना आपल्या कृतीचा पश्चात्ताप झाला. तेव्हा प्रगट होऊन भगवान् म्हणाले - मी कुठे गेलो नव्हतो ! *''... इथेच होतो तुमच्या जवळी ।। तुम्ही टाकिले मज बघण्याचे । पटल घेऊनी कुवासनेचे । दिसलो नच केवळ या हेतू । धुक्यात जैशा लपती वस्तू ।।''*

कुवासना भगवत्प्रसादाच्या कशा आड येतात ते समजावे म्हणून या प्रसंगाचा उल्लेख केला. वास्तविक गोपींच्या भक्तीच्या असामान्य उत्कटतेमुळे भगवंतानेही वेडे व्हावे अशी वस्तुस्थिती होती. राधेची प्रेमभक्ती तर त्या दृष्टीने अलौकिकच. ती भेटीला आली तर स्वत: श्रीकृष्ण आपण काय करतो आहोत याचे भान विसरत असे, ते कसे त्याचे वर्णन उद्धवाशी बोलताना गोपांनी केले आहे. गोकुळाप्रमाणे मथुरेत कोणी भाग्यवान आहे का? असे पुसताना एका गोपाने उद्धवाला विचारले - *''व्रजात जशी राधिका तशि सभाग्य तेथे कुणी । असे युवति का वदा सुशिल शुद्ध चंद्राननी ।। तिला बघुन दोहण्या भ्रमित होऊनी श्रीपति । अजून तरी अंगणी बसत काय बैलाप्रति ।।''*

राधेला पाहून मोहित झालेला श्रीकृष्ण धार काढताना गायीपुढे बसायच्या ऐवजी ''प्रेमभावे धसाळ गेलो'' या न्यायाने कासंडी घेऊन बैलाखाली बसे. पण अशा राधेलाही, श्रीकृष्ण आपल्याला ''माझी राधा'' असे कधीच म्हणत नाही याचे वैषम्य वाटलेच. तिने एकदा कृष्णाला म्हटले म्हणे - कृष्णा ! तू इतरांचा अनेकदा हा माझा, ही माझी असा उल्लेख करतोस. पण मला मात्र 'माझी राधा' असे कधी म्हणाला नाहीस. भगवान् काही क्षण स्तब्ध राहिले

आणि गंभीरपणे म्हणाले – ''राधे! राधा माझी आहे म्हणण्यात सुद्धा एक दुरावा आहे तो तू कसा लक्षात घेत नाहीस? राधा माझ्यापेक्षा वेगळी आहे असा अर्थ ''माझी'' म्हणण्यात आहे. वस्तुत: कृष्ण हाच राधा आहे किंवा राधा हीच कृष्ण आहे. राधा-कृष्ण एकरूप, नव्हे एकच आहेत अशा स्थितीत माझी राधा कसे म्हणू? तसे म्हणणे हा तुझ्या-माझ्या प्रेमाचा अपमान आहे. शरणागतीला 'सर्वभावाने' हे विशेषण का लावले ते यावरून लक्षात येईल.

आपण शरण जातो, नमस्कार करतो असे म्हणतो व त्यासारख्या वाटणाऱ्या कृतीही करतो. पण अंत:करणातील भाव त्याला अनुसरून असतो असे म्हणता येते का? मंदिरात जाऊन देवाला नमस्कार करतानाही बाहेर ठेवलेली पादत्राणे कोणी चोरून तर नेणार नाही ना इकडे लक्ष असते. देवपूजा करताना देवापुढे बसून *''अन्यथा शरणं नास्ति त्वमेव शरणं मम''* असे तोंडाने म्हणणारा गृहस्थ त्याच वेळी आरशात बघून स्वत:च्या कपाळी गंध लावीत असतो. हा देखाव्याचा नमस्कार लक्षात घेऊन एका हिंदी कवीने म्हटले आहे, *''जाहेदा मसजिद्में जाकर दम-ब-दम शिज्दा करे । दिल तोहि झुकता नही, सर झुका तो क्या हुआ ।''* या दृष्टीने उत्तर हिंदुस्थानात प्रसिद्ध असलेली एक गोष्ट ऐकण्यासारखी आहे.

मुसलमान लोकात पाच वेळा नमाज पढण्याची पद्धती आहे. नमाजाची वेळ होताच ते जिथे असतील तिथे एक फडके अंथरून नमाज पढतात. काही कारणासाठी रानात हिंडणारा एक मुसलमान नमाजाची वेळ झाली म्हणून रानातल्या अरुंद पाऊलवाटेवरच गुडघे टेकून नमाज पढू लागला. त्याच वेळी एक स्त्री ठरलेल्या संकेताप्रमाणे आपल्या प्रियकराला भेटण्यासाठी लगबगीने जात होती. ती त्या नमाज पढणाऱ्याच्या पाठीवर पाय देऊन पुढे निघून गेली. प्रियकराच्या भेटीच्या ओढीत आपण कोणा माणसाच्या पाठीवर पाय दिला हे तिला जाणवलेही नाही. या नमाज पढणाऱ्या मुसलमानाने मात्र ''नमाजात व्यत्यय आणला'' या अपराधाखाली त्या स्त्रीवर खटला भरला. शेख सादी नावाचे मुसलमानातील थोर तत्त्वज्ञ काझी म्हणून होते. त्यांच्या पुढे ते प्रकरण आले. त्या नमाजी मुसलमानाने आपल्या अंगावरील त्या बाईच्या पावलाचा ठसा उमटलेला सदरा पुराव्यासाठी काझीपुढे ठेवला होता. तो ठसा त्या बाईच्या पावलांचाच आहे हेही सिद्ध झाले. नमाज पढणाऱ्या मुसलमानाने

सांगितलेल्या वेळी आपण त्या रानातून गेल्याचे बाईने मान्यही केले. पण कोणा माणसाच्या पाठीवर पाय देऊन आपण गेलो हे मात्र ती बाई मान्य करीना. तिने तो आरोप अगदी कळवळून नाकारला. एखादा लाकडाचा ठोकळा वा दगड वाटेत होता, त्यावर मी पाय दिला. पण कोणी माणूस मी तिथे पाहिला नाही. तसे दिसले असते तर मी थोडे कडेनेच गेले असते असे ती म्हणाली. खोदून खोदून विचारल्यावर ती लाजत लाजत मान खाली घालून तिने त्या रस्त्यावरून त्या वेळी जाण्याचे कारणही सांगितले. ते सर्व ऐकून शेख सादींनी त्या बाईस निर्दोष म्हणून सोडून दिले. आणि नमाज पढत असल्याचा खोटा बहाणा केला म्हणून मुसलमानासच दंड ठोठावला. या अशा न्यायाची मुसलमानांना सवय नसते. त्यांनी निषेधाचे मोर्चे काढले. दंगल केली. दुकाने लुटली. घरे पेटवली. निरपराध्यांची हत्या केली. शेवटी राजाने या प्रकरणात लक्ष घातले. निवाडा पाहून राजासही आश्चर्य वाटले. पण शेखसादीविषयी त्याच्या मनात आदरभाव असल्याने त्याने शेखसादींना दर्शनी पुराव्याविरुद्धचा न्याय कसा दिलात, का दिलात ते सांगा, असे म्हटले. सादी म्हणाले – अहो ! आपल्या प्रियकरावर – एका माणसावर आसक्त होऊन त्याच्या भेटीसाठी धांदलीने जाणाऱ्या या स्त्रीला आपण एका माणसाच्या पाठीवर पाय दिला याचे भान नाही आणि ईश्वराच्या ओढीने नमाज पढणारा हा माणूस मात्र पाठीवर पाय पडताच लगेच उठून या बाईचा शोध काढून तिच्यावर खटला भरतो आणि नमाजात व्यत्यय आणला असा दोष लावतो. याचे देवाकडे लक्षच नव्हते. म्हणजे याचा नमाजच खरा नव्हे, तो याने पुराही केला नाही म्हणून मी बाईला निर्दोष सोडले. आणि याला दंड केला. राजाने शेखसादींचा न्याय मान्य केला. पुढे मुसलमान किती धुसफुसत राहिले आणि त्यांनी किती गुंडगिरी केली ते मला माहीत नाही.

आपण करतो ती ईश्वराची आराधना काय योग्यतेची असते ते यावरून लक्षात घेण्यासारखे आहे. उत्कट कारुण्याने भारावलेले पूजेच्या शेवटचे प्रार्थनेचे श्लोक म्हणत असताना पूजेचे प्रत्यक्ष कृत्य संपलेले असल्यामुळे आपण पूजासाहित्याची आवराआवर करीत असतो. वास्तविक या प्रार्थनेच्या मंत्रांच्या वेळी अंत:करण भरून येऊन मन देवमूर्तीवर एकाग्र व्हावयास हवे. *''नयनं गलदश्रुधारया वदनं गद्‌गद्‌रुद्धया गिरा । पुलकैर्निचितं कदा वपु:*

*तव नामग्रहणे भविष्यति ॥''* असे कधी होते का? निदान असे व्हावे असे तरी वाटते का? असे काही होत नाही. पूजा-अर्चा-प्रार्थना फार तर शरीराच्या पातळीवर घडतात. नमस्कार शद्बार्थाने दंडवत् असतो. दंड म्हणजे काठी. ती निर्जीव असल्याने तिला मन नसते. दंडवत घालणाराला निसर्गनियमाप्रमाणे मन असले तरी ते नमस्कारात नसते. अशा नमस्काराला म्हणूनच दंडवत म्हणतात की काय कोणास ठाऊक? मनुष्याचे असे हे अंत:करण लक्षात घेऊनच भगवंतानी ''सर्वभावेन शरणं गच्छ'' असा आदेश आवर्जून दिला आहे.

शरण जाणे या शब्दामध्ये असलेला अर्थ किती गंभीर आहे ते श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी या शब्दाच्या केलेल्या व्याख्येवरून स्पष्ट होईल. *''आपुलेनि भेदेविण । माझे जाणिजे जे एकपण । तयाचि नाव शरण । मज येणे गा ॥''* (ज्ञाने. १८/१३९८) असे श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात. ''मी'' पणा पूर्णपणे विसरून म्हणजेच ईश्वराशी दुरावा उत्पन्न करणारा अहंकार पार नाहीसा करून मी म्हणजे खरा कुणी नव्हेच. देश-जाति-कुल-नाम यांनी बांधलेला अमुक अमुक म्हणून खरा ओळखला जाणारा ''मी'' तो ''मी'' नव्हे. मी आत्मा आहे. ईश्वर आहे, ब्रह्म आहे. ''मी'' पणाचे स्फुरण हा ईश्वरी चैतन्याचा एक आविष्कार आहे; असे जाणणे म्हणजे असे अनुभवास येणे या स्थितीला ''शरण जाणे'' म्हणतात. श्रीज्ञानेश्वरमहाराजांची ही ओवी म्हणजे उपनिषदात येणाऱ्या *''यस्त्वमसि सोऽहमसि'' (कौषितकी), ''योऽसावसौ पुरुष: सोऽहमस्मि''* (ईशावास्य) या वचनावरील किंवा ''अहं ब्रह्मास्मि'' या महावाक्यावरील अत्यंत उद्बोधक भाष्यच आहे. ते वाचणे-ऐकणे-सांगणे सोपे आहे. अत्यंत कठीण आहे ते त्याचा अर्थ अनुभविणे. म्हणूनच कदाचित् ''सर्वभावाने'' हे विशेषण ''शरण जावे'' या वाक्यास जोडलेले असावे. हात राखून काटकसरीने काही करता कामा नये. श्रद्धेने, पूर्ण निष्ठेने स्वत:स झोकून द्यावे लागते, तरच काही हाती लागते. मोती मिळवायचे तर खोल पाण्यात, अत्यंत खोल पाण्यात, बुडी मारण्याचे धैर्य असावे लागते. घाबरून केवळ काठावरच बसून राहिले तर कवडीचीही किंमत नसलेल्या शिंपाच तेवढ्या हाती लागल्या तर लागायच्या. ईश्वराला शरण जायचे तर श्रद्धा, प्रेम, निरहंकारिता, सद्भाव, ज्ञान, धीर, निश्चलता, निरलसता, उत्कटता इत्यादी सर्व भाव ईश्वरचरणी सातत्याने, अखंडपणे अर्पण झाले पाहिजेत. तसे झाले

म्हणजेच सर्वभावाने ईश्वरशरणता साधली असे म्हणता येईल. अशी शरणागती घडताच भगवत्प्रसाद प्राप्त होतो असे न म्हणता भगवत्प्रसाद प्रगटतो, व्यक्त होतो असे म्हणणे योग्य ठरेल. त्या प्रसादाचे स्वरूप शाश्वत पद आणि परम शांती या रूपाने प्रगट होते. यामुळे जी स्थिती लाभते तिचे सुख, तिचा आनंद अवर्णनीय आहे. नंदनवनातील कल्पवृक्षावरील पुष्पसंभाराच्या सुगंधाने ओथंबलेल्या वातावरणात, शरदऋतूतील पूर्ण चंद्राच्या चंद्रिकेतून वर्षिल्या जाणाऱ्या आह्लादकतेत नहात असताना, प्रसन्नतेने हृदयातील दहराकाशात तेवणाऱ्या आत्मज्योतीने प्रकाशित झालेल्या ॐ काराच्या दिव्य स्फुरणाचे सुखद स्पंदन अनुभवीत, एकाकीपणे आनंदाने विहार करणाऱ्या भाग्यवंताला ज्या नीरव सुखाचा अनुभव आला असेल, त्यालाच शाश्वत पदप्राप्तीनंतर मिळणाऱ्या परम शांतीची कल्पना करता येईल. निर्विकल्प समाधीत निमग्न झालेला महायोगी कदाचित् या शांततेची ओळख पटवून देऊ शकेल. भक्तीने प्रसन्न होऊन मूर्ततेने प्रगट झालेल्या कृपामय भगवंताच्या वत्सल मिठीत देहभाव विरघळून गेलेला भक्तराज, या परमशांतीची दिव्यता समजावून देऊ शकेल. संपूर्णपणे नि:स्वार्थ भावनेने लोककल्याणासाठी, सर्वशक्तिनिशी प्रदीप्त झालेल्या तपश्चर्येच्या यज्ञकुंडात ज्याने आपल्या सर्वस्वाची आहुती समाधानाने दिली आहे तो याज्ञिकच या शांतीचे माहात्म्य जाणू शकेल. आपणाला, भगवंताने अत्यंत आत्मीयतेने अर्जुनाला केलेला बोध, अर्थाची थोडीशी ओळख होत ऐकता आला तर त्यानेही हिमालयाच्या सुखशीतल वातावरणात प्रसन्नसलिला भागिरथीच्या परमपावन तीरावर निवांत बसून राहण्यात जे सुख आहे ते लाभते; तर जे भगवंताच्या आदेशाचे पालन करून शाश्वत पदाला पोचले त्यांना अनुभविता येणाऱ्या दिव्योदात्त, कल्याणमय, परममंगल अशा शांतीच्या लाभाने काय वाटत असेल त्याची कल्पनाही करणे शक्य नाही. मेरू पर्वत मोहरीच्या कितीपट मोठा आहे हे सांगण्यासारखाच तो प्रकार व्हायचा.

या श्लोकाने शास्त्रोपदेशाची परिसीमा झाली आहे. अनुभवाच्या साक्षात्काराने आत्मज्ञानाचे शिखर गाठले गेले आहे. विहित कर्तव्याच्या मार्गांना प्रकाशित करणारा बोधसूर्य आता माध्यान्हीला आला आहे. ज्ञानामृताच्या माधुर्याने सर्व शंकांचा ताप नाहीसा करणारा सिद्धांतरूपी सुधाकर गीताकाशात आपल्या सर्व कलांनिशी विहरतो आहे. स्वाध्याय-प्रवचनांचा

महासागर उल्लंघिला गेला आहे. उपनिषद्रूपी कामधेनूच्या दुग्धाने जिज्ञासूच्या सर्व आशंकांचे निवारण होऊन त्यांस आता तृप्तता लाभली आहे, तो समाधान पावला आहे; असे भगवान् श्रीकृष्णही मानतात आणि याच संतोष देणाऱ्या कृतकृत्यतेने उल्हसून पुढील श्लोकात म्हणतात की –

**इति ते ज्ञानमाख्यातं गुह्याद्गुह्यतरं मया ।**
**विमृश्यैतदशेषेण यथेच्छसि तथा कुरू ।।६३।।**

गुह्याहून गुह्यतर असलेले हे ज्ञान मी (आतापर्यंत) तुला विवरून सांगितले. ते संपूर्णपणे पारखून विचारात घे. आणि मग जशी तुझी इच्छा असेल तसे कर.

भगवंतांनी अर्जुनाला त्याचा मोह नाहीसा होण्यासाठी अत्यंत गूढ–गंभीर–महत्त्वाचे म्हणूनच श्रेष्ठ, असे तत्त्वज्ञान म्हणून जे काही होते, ते सगळे नाना प्रकारांनी, नाना अंगांनी गीतारूपाने उपदेशिले आहे. आता खरे म्हणजे तत्त्वज्ञान म्हणून जे काही आहे, जे काही असू शकते त्यातील काहीही सांगायचे उरले नाही.

गीतेतील तत्त्वज्ञान अत्यंत श्रेष्ठ आहे. सखोल आहे. हे गीतेमध्येच यापूर्वी दोन–तीन वेळा तरी उल्लेखिले आहे. नवव्या अध्यायाच्या आरंभी भगवान् म्हणतात – ''इदं तु ते गुह्यतमं प्रवक्ष्याम्यनसूयवे । ज्ञानं विज्ञानसहितं यज्ज्ञात्वा मोक्ष्यसेऽशुभात् ।। राजविद्या राजगुह्यं पवित्रमिदमुत्तमम् । प्रत्यक्षावगमं धर्म्यं सुसुखं कर्तुमव्ययम् ।।'' दहाव्या अध्यायाच्या आरंभी असेच म्हटले गेले आहे. ''भूय एव महाबाहो श्रृणु मे परमं वचः । यत्तेऽहं प्रीयमाणाय वक्ष्यामि हितकाम्यया ।।'' चौदाव्या अध्यायाच्या आरंभीही ''परं भूयः प्रवक्ष्यामि ज्ञानानां ज्ञानमुत्तमम् । यज्ज्ञात्वा मुनयः सर्वे परां सिद्धिमितो गताः ।।'' असेच गीतेतील विषयाचे महिमान स्वतः श्रीकृष्णानेच अर्जुनाला ऐकविले आहे.

गीतेच्या पठणाला आरंभ करण्यापूर्वी गीतेचे माहात्म्य वाचण्याची आपली परंपरा आहे. त्यात गीतेचे स्वरूप वर्णन करताना ''सर्वोपनिषदोगावो दोग्धा गोपाल–नन्दनः । पार्थो वत्सः सुधीर्भोक्ता दुग्धं गीतामृतं महत् ।।'' असे म्हटले आहे.

उपनिषदे ही आपल्या भारतातील सर्व प्रकारच्या तत्त्वज्ञानाची गंगोत्री

आहे. ती उपनिषदेच येथे गायीच्या रूपात गृहीत धरली आहेत. पूर्णावतार भगवान् श्रीकृष्ण यांनी या गायीची धार काढली आहे. अर्जुन हे पान्हा फोडण्यासाठी उपयोगी पडणारे वासरू आहे. गीता हे त्या उपनिषद्रूपी गायीचे दूध आहे. आणि ज्याची बुद्धी चांगली आहे, तीक्ष्ण आहे, विमल-विपुल आहे तो सुधी या दुधाचे सेवन करण्यास योग्य आहे. अन्नछत्रात किंवा भंडाऱ्यात प्रसाद वाटावा, कुणीही यावे आणि खाऊन जावे असे साधे-सोपे स्वरूप गीतेचे नाही. गीता ही अमृत आहे. अमृत सहजपणाने कोणालाही उपलब्ध होत नाही. अमृताचा उपभोग घेण्यास योग्यता असावी लागते. सुधी असणे म्हणजे बुद्धी चांगली असणे हे येथे जणू गीतारूपी दूध घेण्यासाठी मूल्य आहे असे समजावे.

दूध हे जसे पूर्णान्न आहे तसे गीता हे परिपूर्ण तत्त्वज्ञान आहे. यासाठीच शास्त्र म्हणून मान्यता पावण्याची योग्यता केवळ देवकीनन्दन श्रीकृष्णाने सांगितलेल्या या गीतेलाच आहे; आणि यासाठीच एकट्या गीतेचेच उत्तम प्रकारे अध्ययन करावे; जिज्ञासूला त्याच्या कल्याणासाठी इतर शास्त्राचा फापटपसारा धुंडाळण्याचे काही कारण नाही, असेही या माहात्म्यात अत्यंत गौरवाने सांगितले आहे ते यथार्थ आहे, या संदर्भाच्या पार्श्वभूमीवरच श्रीकृष्ण, मी तुला गुह्यात गुह्यतर असलेले ज्ञान उलगडून सांगितले आहे, असे म्हणतात.

मानवी जीवनाच्या दृष्टीने परिपूर्णतेसाठी, उन्नती-प्रगती-विकासासाठी, ज्ञान म्हणून ज्या ज्या विषयाची आवश्यकता आहे, ते सर्व गीतेमध्ये समाविष्ट आहे. कोठे संक्षेपाने सूत्रमय भाषेत, केवळ सूचकतेने सांगितले आहे, तर कोठे विवेचन काहीशा विस्ताराने केले आहे. कर्म-भक्ती-ज्ञान-योग या चारही प्रकारच्या साधना-मार्गांचे स्वरूप येथे स्पष्ट केले आहे. परमोच्च असे अध्यात्मसुख कसे मिळवावे तेही उपदेशिले आहे आणि इहलोकात जगायचे जीवन, कर्तव्यदक्षतेने, तेजस्वीपणाने, हिताचे साधन होईल अशा दृष्टीने कसे जगावे त्याचेही मार्गदर्शन गीतेने अत्यंत उत्कृष्ट रीतीने केले आहे. वैयक्तिक आणि सामाजिक जीवनाचे आदर्श गीतेने उदात्त स्वरूपात उभे केले आहेत म्हणून गीतेतील हे सर्व ज्ञान ''गुह्यात् गुह्यतर'' आहे. आता यापेक्षा अधिक चांगले, अधिक श्रेष्ठ, अधिक व्यापक, अधिक गंभीर, अधिक उपयुक्त, अधिक हितकर आणि आचरण्यास योग्य असे काही उरलेले नाही.

अर्जुन हे शास्त्र ऐकण्याच्या योग्यतेचा श्रोता आहे. म्हणून तर भगवान् त्याच्याशी अत्यंत मनमोकळेपणाने बोलले आहेत. तो सावधपणे ऐकतो, आवडीने ऐकतो. जे ऐकले ते सर्वच्या सर्व जीवनात उतरावे अशा निष्ठेने ऐकतो आणि म्हणूनच जिथे जिथे अडचण वाटली, शंका आली तेथे तेथे न संकोचता, भीड न धरता स्पष्टपणे प्रश्नही विचारतो. म्हणून भगवंतही अर्जुनावर प्रसन्न आहेत. कारण अर्जुनाची योग्यता ते जाणून आहेत. म्हणून ते अर्जुनाला म्हणत आहेत, ''अर्जुना! श्रेष्ठ असे ज्ञान मी तुला विस्ताराने सांगितले आहे. ते तू नीटपणे विचारात घे. परिपूर्णतेने जाणून घे.''

तत्त्वज्ञानविषयक विवेचन ऐकताना वा ग्रंथरूपाने वाचताना श्रोता किंवा वाचक फार सावध असतो असे आढळत नाही. आपल्या सोयीचे काय तेवढेच लोक लक्षात ठेवतात आणि मग पुष्कळ वेळा स्वत:च्या वर्तनाच्या समर्थनासाठी ऐकलेल्या वचनातील विधानाचा उपयोग केला जातो. आरोपी अपराधी आहे हे चांगले ठाऊक असतानाही त्याला निर्दोष ठरविण्यासाठी वकील जसे निरनिराळ्या निर्बंधाचे निरनिराळ्या न्यायालयाने लावलेले अर्थ कटाक्षाने अभ्यासत असतो, निर्बंधाचा (कायद्याचा) कीसही त्या दृष्टीनेच काढीत असतो, तशीच वृत्ती पुष्कळ वेळा श्रोत्याची असते. थट्टा-विनोद-उपहास त्याच्या लक्षात राहतात. त्यातले एखादे विधान स्वत:ला उद्देशून टोमणा मारण्यासाठी बुद्धिपुरस्सर केले आहे असेही त्याला वाटते. त्यामुळे तो क्वचित् क्रुद्धही होतो, रुष्टही होतो. वक्त्याचा अधिकार लक्षात घेत नाही. असे जसे घडते तसेच निरनिराळ्या ठिकाणी निरनिराळ्या संदर्भात आलेली वचने वरवर ऐकताना परस्परविरोधी आहेत असे वाटते आणि मग त्याच्या विचाराचा गोंधळ उडतो. कित्येक वेळा त्यामुळे अश्रद्धाही निर्माण होते.

वक्ता बहुधा जे सांगतो ते त्याला पटलेले शास्त्रीय विचार सांगत असतो. जीवनात इष्ट दिशेने परिवर्तन होत राहावे हाच उद्देश सांगण्याच्या पाठीमागे असतो. स्वाध्याय आणि प्रवचन यांचा लाभ श्रोता आणि वक्ता या दोघांनाही व्हायचा असतो, होत असतो. पण असे घडण्यासाठी दोघांच्याही ठिकाणी विवेकशक्ती जागृत असावी लागते. तसेच आपल्याला उन्नती-प्रगती साधायची आहे, अशी तळमळही असावी लागते. श्रवणाचा वा प्रवचनाचा लाभ आपणा स्वत:ला किती होतो एवढाच विचार करावा. दुसरा किती सुधारतो याचा

विचार करण्यात फारसा अर्थ नसतो. या संदर्भात एकदा ती. दादांना मी विचारले होते – ''हा कीर्तनादींचा उद्योग आपण का करतो? आपला काही तो व्यवसाय नाही. दहा–पंधरा वर्षे सातत्याने उत्सवादींना येणारे आणि कीर्तने ऐकणारे एरवीच्या वागण्यात जसेच्या तसे असतात. त्यांचे रागद्वेष उणावले आहेत असे दिसत नाही, स्वार्थाच्या मानापमानाच्या कल्पना जशाच्या तशा उग्रच असतात. मग कशाला करायचा हा उद्योग?'' तेव्हा ती. दादा ताडकन् म्हणाले, ''लोकांना उद्धरण्याचे ओझे देवाने तुझ्या डोक्यावर दिले आहे का? कीर्तनाचा मुख्य उपयोग स्वत:ला सुधारण्याकडे आहे. झाला तर इतरांना लाभ होऊ शकतो. तशी इच्छा इतरांना असावी लागते. सगळेच काही गणंग असत नाहीत. काही थोड्या लोकांवर तरी चांगला परिणाम होतो.'' तेव्हापासून श्रोता कसा, हा विषय माझ्या डोक्यातून पार गेला आणि कर्तव्य–भावनेने आपल्याला पटलेले चांगले काय ते सांगावे आणि शक्यतो स्वत: तसे वागण्याचा प्रयत्न करावा एवढीच भावना माझ्या ठिकाणी उरली. मन मोकळे झाले. श्रवणाचा परिणाम होत नाही असे जे घडते ते एकांगी विचार केल्यामुळे घडते. स्वत:च्या पलीकडे काही जाणून घेण्याची आवश्यकता आहे हे न कळल्यामुळे विचार स्वार्थी वा पक्षपाती होतात.

एखादा महत्त्वाचा सिद्धांत सांगत असताना मधेच एखादा विषय असा येतो की त्याचे विवेचन करणे वक्त्याला आवश्यक असते. असे थोडेसे विषयांतर मूळ सिद्धांताच्या व्यापकतेच्या दृष्टीने अधिक वेळा होते. त्या त्या वेळी तो तो विषय वेगवेगळा वाटतो. कारण समजूत पटावी म्हणून क्वचित् पृथक्करणाची पद्धती स्वीकारावी लागते. आणि त्यामुळे हे विषय एकमेकांना आणि मूळ सिद्धांताला पूरक आहेत, सिद्धांताची व्यापकता लक्षात घेण्याच्या दृष्टीने आवश्यक आहेत, हे काही वेळा लक्षात येत नाही आणि त्यामुळेही प्रतिपादनात विसंगती जाणवते.

हे जे सर्व होते त्यापाठीमागे श्रोत्याची योग्यता असावी तेवढी नसते. किंवा सर्व विवेचनाचा तो सर्व दिशांनी सांगोपांग विचार तरी करीत नाही. म्हणून भगवान् आवर्जून सांगत आहेत की, ''अर्जुना! मी हे जे गहन तत्त्वज्ञान तुला विवरून सांगितले आहे, त्याचा तू सर्वांगीणरीत्या (अशेषेण) विचार कर. ते सर्व नीट पारखून घे. उमजून घे.'' (विमृश्य)

विषय समजून घेताना काही वेळा त्यातील एकेक भाग, एकेक अंश वेगवेगळा जाणून घ्यावा लागतो. पण विषय किती कळला, विषयाचे आकलन पूर्ण झाले की नाही हे त्यातील अंशा-अंशाच्या ज्ञानावर अवलंबून ठेवून चालत नाही, एकेक अंशाचे ज्ञान नीट झालेले असले तरी एखाद्या अंशाचे अज्ञान असेल तर त्या विषयाच्या ज्ञानाचे मूल्य शून्य ठरू शकते.

आयुर्वेद महाविद्यालयात काम करीत असताना मी एकदा द्रव्य-गुण-शास्त्र या विषयाची परीक्षा घेत होतो. एका विद्यार्थ्याला सोमलासंबंधी प्रश्न विचारले. सोमल हे द्रव्य काय आहे? त्याचा उपयोग कोणत्या रोगावर होतो? त्याचे शोधन करावे लागते का? का करावे, कसे करावे? इत्यादी प्रश्न विचारले. विद्यार्थ्याने त्याची उत्तरे योग्यपणे दिली. शेवटी त्याला प्रश्न विचारला की, एका बारा वर्षांच्या मुलाला औषध म्हणून सोमल द्यावयाचा असेल तर त्याचे प्रमाण किती असेल? त्या विद्यार्थ्याने उत्तर दिले - एक तोळा. सोमल हे एक भयंकर विष आहे. औषध म्हणून त्याचा उपयोग करताना सूक्ष्म प्रमाणातच ते द्रव्य वापरावे लागते. तेव्हा सोमलासंबंधीची इतर उत्तरे योग्य असली तरी या चुकीच्या एका उत्तराने ती सर्व व्यर्थ ठरतात. यासाठीच पूर्वी उच्च प्रतीच्या परीक्षांच्या प्रश्नपत्रिकांवर तुमची उत्तरे एकत्रितपणे विचारात घेऊन (व्हॅल्यूड ॲज-ए-होल) त्यांचे मूल्यमापन केले जाईल अशी सूचना दिलेली असे. आज परिस्थिती काय आहे मला ठाऊक नाही. पण भगवान् ''विमृश्यैतदशेषेण'' असे का म्हणतात ते लक्षात यावे आणि त्याचे महत्त्व किती आहे ते कळावे म्हणून मी हे सर्व माझ्या बुद्धीप्रमाणे आपणापुढे मांडले.

सांगितलेल्या सर्व गोष्टी नीटपणे पारखून घेऊन मग तुझ्या इच्छेस येईल तसे कर असे भगवान् म्हणतात तेही लक्षणीय आहे. तुझ्या इच्छेस येईल तसे कर असे म्हणण्यामागे अनेक उद्देश असू शकतात. एक उद्देश असा असतो की दुसऱ्यावर कोणतेही दडपण आणू नये. मनात नसताना अमक्या-अमक्याच्या अधिकाराच्या-योग्यतेच्या-थोरवीच्या जाणिवेमुळे मी असे केले, सांगणारा मोठा, त्याला कसे दुखवावे? आपण लहान आहोत, आपणच पडते घेणे बरे, अशी अगतिकतेची भावना स्वीकारून कोणी काही करणे जाणत्या प्रौढ वयात तरी योग्य नाही. म्हणून भला माणूस मोकळिक देण्याच्या उद्देशाने म्हणतो की मला योग्य वाटते ते सांगितले आहे. तू तुझ्या दृष्टीने त्याचा नीट विचार कर.

आणि मगच तुझी इच्छा असेल तसे वाग. मी काही दुराग्रह धरून तू असेच कर असे सांगत नाही.

दुसरा एक उद्देश असा की वक्ता स्वत:ची मर्यादा जाणतो. तसेच ऐकणाराच्या बुद्धिमत्तेविषयी, त्याच्या विवेकशक्तीविषयी वक्त्याला शंका नसते. त्यामुळे माझ्या सांगण्यात एखादी चूक झाली असली तरी श्रोता ती नीट उमगून घेईल आणि वागताना आपल्याकडून काही चूक होऊ नये अशा दक्षतेने वागेल. उगीच भीड धरणार नाही, म्हणून म्हणायचे की तुझ्या इच्छेस येईल ते कर.

कधी कधी वैतागूनही असे उद्गार काढले जातात. आम्ही तुमच्या हितासाठी सांगायचे ते सगळे काही सांगितले आहे. पण दैव बलवत्तर असते म्हणून कितीही सांगितले तरी तुम्हांस ते पटणार नाही. आमचे ऐकायचे नसेल तर नका ऐकू. तुम्हांला वाटेल तसे वागा. तुम्ही आता शहाणे झाले आहात. तुमचे बरेवाईट आता तुम्हांस कळते. खरोखरीच सांगतो – ही तिसरी भूमिका फार चांगली. मात्र वैतागाची नसावी. दुसऱ्याला सुधारण्याचे ओझे आपल्या डोक्यावर घेतले नाही, तर सांगणाराला कधी वैताग येत नाही.

आपण, जे हिताचे, प्रगती–उन्नतीच्या दृष्टीने आवश्यक पात्रता वाढविणारे असे सांगतो आहोत; मित्रभावनेने, वात्सल्याने, ऐकणाराने आपल्याविषयी अनेकदा अनेक प्रकारने आदरभाव व्यक्त केला आहे म्हणून आपलेपणाने सांगत आहोत तरी हा ऐकत नाही. तोंडाने हो हो म्हणतो पण तसा वागत नाही यात त्याचीच हानी आहे तीही तो लक्षात घेत नाही. या जाणिवेचे दु:ख अत्यंत तीव्र असते. कधी कधी ते असह्यही होते. विचारी–विवेकी–संयमी व्यक्तीलाही त्यातून पार पडण्यासाठी फार कष्ट होतात. कोणालाही सुधारण्याचे ओझे वा दायित्व स्वीकारलेले नसले की हा सर्व ताप टळतो. म्हणून ''उद्धरेत् आत्मनात्मानं'' या गीतावाक्यावर विश्वास ठेवून कोणी कितीही जवळचा असला तरी मी सांगावेसे वाटले म्हणून सांगितले आहे, आता तुला योग्य वाटेल ते कर असे मोकळेपणाने म्हणावे. म्हणजे सांगणाराच्या डोक्याला ताप होत नाही, त्याची झोप बिघडत नाही.

माणसे कधी कधी एखाद्याला मोठेपणा देऊन परिस्थिती अशी आहे, तेव्हा काय करू ते विचारावयास येतात. त्यांना करायचे असते त्या दृष्टीने

अनुमोदन दिले म्हणजे त्यांना बरे वाटते; आणि विरुद्ध मत सांगितले की, ''यांना सांगायला काय जाते? आमची परिस्थिती हे लक्षात घेत नाहीत. हे नेहमी अमक्या-तमक्याला संरक्षण देऊनच बोलत असतात. आमची भूमिका जाणूनच घेत नाहीत'' असे उद्गार काढीत असतात. काही वेळा तर अनुमोदन हे स्वसंरक्षणासाठी ढालीसारखेही वापरले जाते. क्वचित त्यातून स्वत:ची नम्रता, आज्ञाधारकताही दाखविण्याचा हेतू असतो.

या सर्वांहून श्रेष्ठ अशी एक चवथी भूमिकाही असू शकते. सांगणारा पूर्णपणे नि:स्पृह आणि निर्मम असतो. अधिकाराने कितीही श्रेष्ठ असला तरी आपल्या व्यक्तित्वाने प्रभावित होऊन संमोहित झाल्यासारखे असावधपणे कुणी वागू नये अशी त्याची इच्छा असते. तसेच ऐकणाराच्या योग्यतेची यथार्थ जाणीवही त्याचे ठिकाणी असते. त्यामुळे तो घेईल तो निर्णय योग्यच असेल, असा विश्वास वक्त्याच्या ठिकाणी असतो. सात्त्विक कर्त्याची सर्व लक्षणे अशा अधिकारी वक्त्याच्या ठिकाणी आदर्शभूत उदात्ततेसह एकवटलेली असतात; आणि मग तो मनमोकळ्या औदार्याने आणि प्रसन्नपणे म्हणतो की, मी हे सर्व सविस्तरपणे सांगितले आहे. आता योग्य तो निर्णय घ्यावयास तुझा तू पूर्णपणे स्वतंत्र आहेस. तू जो निर्णय घेशील तो मी सांगितलेले सर्वच्या सर्व चांगल्या रीतीने विचारात घेऊन घेतलेला असशील यात मला शंका नाही.

इतके सर्व सांगून झाल्यानंतरही भगवान् श्रीकृष्ण अर्जुनाविषयीच्या प्रेमाने उचंबळून आले. आत्मीयतेपोटी त्यांनाच एक शंका आली की अर्जुन कितीही बुद्धिमान, निष्ठावंत, विवेकशील, धैर्यशील, संयमी असा असला तरी विलक्षण गुरुभक्त आहे. तसेच त्याचे ठिकाणी पराकाष्ठेचे सौजन्य आहे. तेव्हा न जाणो भीष्मद्रोणांशी युद्ध न करणेच चांगले अशाही निर्णयाला तो येईल. यासाठी त्याचा माझ्या ठिकाणी जो अतिउत्कट, प्रेमादरयुक्त असा भक्तिभाव आहे, तो अत्यंत प्रामाणिक आहे, उज्ज्वल आहे, त्याचा लाभ घेऊन अगदी ओझरता असलेल्या संभाव्य संशयालाही स्थान उरू देता कामा नये. म्हणून भक्तकामकल्पद्रुम प्रणतवत्सल भगवान् श्रीकृष्ण अत्यंत जिव्हाळ्याने म्हणाले की, -

**सर्वगुह्यतमं भूय: शृणु मे परमं वच: ।**
**इष्टोऽसि मे दृढमिति ततो वक्ष्यामि ते हितम् ।।६४।।**

**मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु ।**
**मामेवैष्यसि सत्यं ते प्रतिजाने प्रियोऽसि मे ।।६५।।**

अर्जुना! आता तुला गुह्यातले गुह्य असे पुन्हा सांगतो. हे माझे बोलणे अत्यंत श्रेष्ठ आहे, महत्त्वाचे आहे. तू माझा अत्यंत आवडता आहेस, निष्ठावंत आहेस म्हणूनच तुझ्या हिताची गोष्ट मी तुला सांगतो आहे. अर्जुना! तू मला अत्यंत प्रिय आहेस म्हणून सांगतो की तुझे अंत:करण माझ्या ठिकाणी राहू दे. तू माझा भक्त हो. तुझी सर्व यज्ञयागादी कर्मे माझ्याच उद्देशाने असू देत. ती मलाच अर्पण कर. तू मलाच नमस्कार कर. असे झाले म्हणजे खरोखरीच प्रतिज्ञेने सांगतो की तू मलाच प्राप्त होशील.

अर्जुनाचे आणि श्रीकृष्णाचे नाते मोठे अद्भुत आहे. श्रीकृष्णांनीच एकदा हे धर्मराज युधिष्ठिराला भारावलेल्या हृदयाने सांगितले आहे.

*'तव भ्राता मम सखा संबंधी शिष्य एव च ।*
*मांसान्युत्कृत्य दास्यामि फाल्गुनार्थे परंतप ।।''*

युधिष्ठिरा! चिंता करू नकोस. अर्जुन तुझा केवळ भाऊ आहे, पण माझा तो बहिश्चर प्राण असा सखा आहे. आम्ही अभिन्नहृदय मित्र आहोत. तो माझा मेहुणा आहे आणि माझा अत्यंत आज्ञाधारक असा प्रिय शिष्य आहे. तेव्हा तसा प्रसंग ओढवलाच तर मी अर्जुनाच्या रक्षणासाठी माझ्या शरीराचे लचके-लचकेही तोडून देईन; पण अर्जुनाच्या केसालाही धक्का लागू देणार नाही.

गीतेमध्येही भगवंतांनी अर्जुनाविषयीचा आपला जिव्हाळा अनेक ठिकाणी प्रगट केला आहे. 'भक्तोऽसि मे सखा चेति' (४/३) 'प्रवक्ष्याम्यनसूयवे' (९/१) 'यत्तेहं प्रीयमाणाय वक्ष्यामि हितकाम्यया' (१०/१) 'मया प्रसन्नेन तवाऽर्जुनेदं रूपं परं दर्शितमात्मयोगात्' (११/४७). पोटातून असा जिव्हाळा असला तरच हित काय ते सांगितले जाते आणि ते तळमळीने सांगितले जाते. क्वचित ऐकणाराची इच्छा नसली तरी आत्मीयतेपोटी, प्रेमाच्या ओढीपायी हिताचे काय ते सांगितल्याविना राहवत नाही. अर्थात अर्जुन त्यातला नाही.

तो खरा जिज्ञासू आहे, पूर्ण निष्ठावंत आहे. कृष्णाविषयी त्याच्या हृदयात पराकोटीचा प्रेमभाव आहे. त्याची बुद्धीही तीक्ष्ण आहे, विमल आहे, विपुल आहे. समज चांगली आहे. धारणाशक्ती उत्कृष्ट आहे. श्रेष्ठ नि:स्पृह वक्त्यानेही नवस करून मागावा असा तो दुर्मिळ श्रोता आहे. म्हणून सर्व साधनांचा विस्तार ज्या एका साधनेत समाविष्ट व्हावा, सर्व मार्गांचे श्रेय ज्या एकाच कृतीत सामावले जावे, क्षितिजापर्यंत पसरलेल्या सृष्टीच्या विविधतेने नटलेले सौंदर्य ज्या एका उंच शिखरावरून सहजपणे दृष्टीपथात यावे, तात्पर्य लक्षात येताच सर्व शास्त्राध्ययनाची फलश्रुती हस्तगत व्हावी, अशी एक विलक्षण गोष्ट, महत्त्वाची साधना, कौशल्याची कृती, कष्टाला संक्षेप देणारी युक्ती भगवान् अर्जुनाला सांगत आहेत. ''अर्जुना! तुझे मन माझ्या ठिकाणी अर्पण कर. तुझ्या मनात नाना प्रकारचे संकल्प-विकल्प उत्पन्न होतील. कारण तो मनाचा स्वभाव आहे. पण ते सर्व मलाच उद्देशून असू देत.'' श्रीनारदांनी आपल्या भक्तिसूत्रात अंत:करणात उत्पन्न झालेले कामक्रोधही भगवंताला अर्पण करावेत. आसक्ती उत्पन्न झाली तरी ती भगवंताविषयीची असावी. क्रोध, द्वेष या भावना उत्पन्न झाल्या तरी त्या शिशुपालाप्रमाणे भगवंतालाच उद्देशून असाव्यात. त्यानेही भगवंताच्या प्राप्तीचा मार्ग त्यामानाने सुलभ होतो, असे भक्तिशास्त्राने सांगितले आहे. श्रीज्ञानदेवांसारख्या थोर महात्म्यांचीही त्याला संमती आहे. 'मन्मन' होणे याचा अर्थ इतका व्यापक आहे. मन असे भगवदर्पण होण्यासाठी शरीराच्या द्वारा होणारी प्रत्येक कृती ही भगवदर्पण भावनेने व्हावी लागते. भगवंताच्या कार्याचा एक भाग म्हणून घडावी लागते. मग ही कृती यज्ञयाग, पूजापाठ, दानधर्म, देशसेवा, परोपकार, समाजप्रबोधन, कर्तव्यपालन यांपैकी कोणतीही असो. ही वा यासारखी सर्व कृत्ये ज्या वेळी नि:स्वार्थपणाने आणि निरहंकारी वृत्तीने घडतात, तेव्हा ती भगवंताला समर्पित होतात; आणि मग ती व्यक्ती भगवंतानी दिलेल्या आदेशाप्रमाणे ''मद्याजी'' म्हणण्यास पात्र ठरते. भगवंताला नमस्कार करणे म्हणजे नम्रतेने वागणे आहे. नम्रता, विनय हा स्वभाव बनला पाहिजे. त्यात लोकेषणेसाठी केलेला देखावा वा प्रसिद्धीसाठी होणारे प्रदर्शन नसावे. या तीनही गोष्टीत जेव्हा भगवद्विषयक प्रेम अनुस्यूत असते, तेव्हाच ती व्यक्ती भगवद्भक्त म्हणून संबोधण्यास पात्र ठरत असते. आता असा हा भगवद्भक्त भगवंताप्रत प्राप्त होईल यात नवल कसले?

तो भगवतस्वरूप होणारच. शपथेवर सांगण्याचा प्रसंग आला तो इतरेजनांचा विश्वास दृढ व्हावा म्हणून. कारण गीताशास्त्र हे अर्जुनाच्या निमित्ताने प्रगट झाले असले तरी ते केवळ एकट्या अर्जुनासाठी नाही. सर्व मनुष्यजातीला मार्गदर्शन करणारे हे शास्त्र आहे. उन्नतीच्या, प्रगतीच्या मार्गावरचा कधीही न मंदावणारा तेजस्वी प्रदीप आहे, आणि याची जाणीव त्रिकालदर्शी, सर्वज्ञ, सर्वशक्तिमान् भगवंताचे ठिकाणी पूर्णतेने असल्याचे त्यांनी गीतेमधेच अनेक ठिकाणी विशेषत: तिसऱ्या अध्यायात आणि पुढे उपसंहारात व फलश्रुतीत स्पष्टपणे निदर्शनास आणून दिले आहे.

मन्मन हो, मद्भक्त हो, मद्याजी हो, मलाच नमस्कार कर, हे जे भगवंतांनी अर्जुनास सांगितले आहे ते त्यांच्या अहंकाराचे द्योतक आहे, असे काही बुद्धिवादी समजतात. ते अत्यंत चुकीचे आहे. योग्यता नसणाराला आपली योग्यता प्रस्थापित करण्यासाठी ज्या भाषेचा अवलंब करावा लागतो ती भाषा अहंकाराची असते. वस्तुस्थिती प्रगट करण्यासाठी वापरलेली भाषा अहंकाराची वाटणे हे बुद्धीच्या कोतेपणाचे लक्षण आहे. श्रीकृष्णाला कोणीच विचारीत नाही म्हणून आज्ञाधारक असलेल्या अर्जुनाला, तू तरी माझी आठवण ठेव, माझी पूजा कर, माझ्याविषयी आदर बाळग असे का भगवंतांना सांगायचे आहे? माझे कुणी ऐकत नाही. मी तुझ्याकरिता पुष्कळ केले आहे. निदान तू तरी मला विसरू नकोस, या भावनेने भगवान् अर्जुनाची मनधरणी करीत नाहीत. ते जे सांगत आहेत ते अर्जुनाच्या हिताचे आहे म्हणून सांगत आहेत.

अर्जुन कितीही श्रेष्ठ असला तरी अजून जीवाच्या भूमिकेत आहे. अत्यंत प्रगत अवस्थेवरचा का होईना, पण साधकच आहे. श्रीकृष्णाची भूमिका मात्र केवळ पूर्णावतार ईश्वराचीच काय ती नसून पूर्ण ब्रह्माची आहे आणि ती त्यांनी गीतेमधे स्वत:च अनेक ठिकाणी प्रगट केली आहे.

*''मया ततमिदं सर्वं जगदव्यक्तमूर्तिना ।* (९/४)
*अहं सर्वस्य प्रभवो मत्त: सर्वं प्रवर्तते ।* (१०/८)
*मयाध्यक्षेण प्रकृति: सूयते सचराचरम् ।* (९/१०)
*बीजं मां सर्वभूतानां विद्धी पार्थ सनातनम् ।* (७/१०)
*पिताऽहमस्य जगतो माता धाता पितामह: ।*
*वेद्यं पवित्रमोंकार ऋक्साम यजुरेव च ।।*

*गतिर्भर्ता प्रभुः साक्षी निवासः शरणं सुहृत् ।*
*प्रभवः प्रलयः स्थानं निधानं बीजमव्ययम् ।। (९/१७-१८)''*

ही सर्व लक्षणे भगवान् ब्रह्मभावावर आरूढ असल्याचे स्पष्ट करतात. शास्त्रदृष्ट्या जीव हा तत्त्वतः ब्रह्मच असतो. आणि यात कोणत्याही कारणाने अगदी थोडे जरी अंतर उरले असले वा राखले असले तरी त्या जीवास भय प्राप्त होते, असे उपनिषदांनी अगदी स्पष्टपणे उद्घोषिले आहे. (उदरमन्तरं कुरुते अथ तस्य भयं भवति ।) उपासक उपास्यापेक्षा वेगळा राहू नये. तो त्याच्याशी एकरूप होऊन जावा असेही उपनिषदांनी सांगितले आहे. कोणत्याही प्रकारची भिन्नता जो कोणी पाहील त्याला जन्ममरणाच्या फेऱ्यात गुंतावे लागेल. ''मृत्यो स मृत्युमाप्नोति य इह नानेव पश्यति ।'' असेही उपनिषदांनी म्हटले आहे.

जीवाला जीवपणा येतो तो मन-बुद्धी-अहंकाराच्या उपाधीमुळेच. अत्यंत प्रारंभीच्या अवस्थेत या सर्व उपाधींना अतिशय शुद्धता असते. पण क्रमाक्रमाने ही शुद्धता मावळत जाऊन जीवाचाही अधःपात होऊ लागतो. मग त्यातूनच नीच, पतित, पामर, जिज्ञासू, मुमूक्षू, साधक, प्रगत साधक, श्रेष्ठ साधक, अशी प्रतवारी तो करीत असलेल्या कृत्यांप्रमाणे निर्माण होते. आपण सर्व यातच कोठेतरी थोडे मागे, थोडे पुढे रेंगाळत असतो. अर्जुन हा मुळातच धीर-वीर निष्ठावंत सज्जन असल्याने, स्वभावतःच भगवद्भक्त असल्याने, भगवंतांनीच त्याच्या भगवद्भक्तीला आणि कृत्ये भगवदर्पण करण्याच्या वृत्तीला, गीतेतच यापूर्वी अनेक वेळा प्रोत्साहन दिले असल्याने, आता साधकदशेच्या परमोच्च पातळीवर पोचलेला आहे. तेव्हा जीव-शिवामध्ये, जीव-ब्रह्मामध्ये, भक्त-भगवंतामध्ये पारमार्थिक सत्तेच्या दृष्टीने उरलेले थोडे अंतर काढून टाकण्यासाठी भगवान् म्हणत आहेत की ''मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरू । मामेवैष्यसि सत्यं ते प्रतिजाने प्रियोऽसि मे ।।''

मळकट झालेले भांडे आधी चिंच-मिठाने, क्षार पदार्थाने, राखेने दोन-चार वेळा चांगले घासून घ्यावे लागते. दोन-चार वेळा चांगले खळबळून विसळावे लागते आणि शेवटी चांगल्या स्वच्छ फडक्याने ते पुसून कोरडे करावे लागते. भगवंताचे हे आता अर्जुनाच्या संदर्भात स्वच्छ फडक्याने पुसून कोरडे करणे चालले आहे. आता या क्षणी अर्जुनाची बुद्धी शुद्ध आहे. अंतःकरण निर्मळ आहे. वृत्ती सात्त्विक आहे. पण ही सात्त्विक वृत्तीच त्याला सुखाच्या

किंवा ज्ञानाच्या संगाने आडकाठी निर्माण करील आणि मग त्याचे सौजन्यच त्याला भीष्मद्रोणांशी लढू देणार नाही. तेव्हा समर्पण भावनेने तो निस्त्रैगुण्य झाला पाहिजे. त्रिगुणातीत झाला पाहिजे. आणि परमशुद्धतेच्या अवस्थेत नित्यसत्त्वस्थ झाला पाहिजे. तरच कर्तव्यकर्म योग्य रीतीने करील. सद्गुणाची कोणतीही विकृती त्याच्या कर्तव्याला बाध आणणार नाही.

अर्जुनाच्या या कर्तव्यनिष्ठेचा प्रत्यय पुढे एका वेगळ्या प्रकाराने प्रगट झालेला आहे. महाभारतीय युद्धानंतर पांडवांनी पुन्हा एकदा अश्वमेध यज्ञ केला. अश्वाच्या संरक्षणासाठी अर्जुन स्वत: शस्त्रसिद्ध होऊन सैन्यासवे पाठराखणी करीत होता. अर्जुनाची पत्नी चित्रांगदा, तिचा मुलगा बभ्रुवाहन याने वीरवृत्तीने तो घोडा पकडला. पण अर्जुन हे आपले वडील आहेत असे कळताच पुत्राने पित्याचे नम्रतेने स्वागत केले. अर्जुनाला ते आवडले नाही. तो म्हणाला– ''तू एका राज्याचा स्वतंत्र राजा आहेस. क्षत्रियाचे कुळ सांगतोस आणि न लढताच शरणागती पत्करतोस? माझा मुलगा म्हणूनच तुला ही गोष्ट न शोभणारी आहे. रणांगणावर सर्व नाती संपलेली असतात. तेथे एकच नाते असते ते प्रतिस्पर्ध्याचे – प्रतिद्वंद्व्याचे. आणि त्याची सोडवणूक व्हायची असते ती पराक्रमाने धारण केलेल्या शस्त्राने.'' हे ऐकताच बभ्रुवाहन ठीक आहे म्हणून युद्धास सिद्ध झाला. त्याने आपल्या पराक्रमाने अर्जुनास जिंकले, मूर्च्छित केले. शेवटी अर्जुनाची आणखी एक पत्नी नागकन्या उलूपी हिने आपल्याजवळील दिव्य मण्याच्या सहाय्याने अर्जुनास सावध केले. अर्जुनाने अत्यंत संतोषाने आपल्या वीर पुत्राचे अभिनंदन केले आणि त्यास आलिंगन दिले. बभ्रुवाहनाच्या अंत:करणात असलेली पित्याविषयीची परमादराची भावना ही श्रेष्ठ खरीच; पण त्याहून श्रेष्ठ असलेल्या कर्तव्याच्या परिपालनासाठी ती पवित्र भावनाही पुसून काढणे आवश्यक होते. गीताशास्त्राच्या अध्ययनाने परिपूर्ण झालेल्या अर्जुनाने ते तिथे प्रसंगोचित शब्दाने केले. भगवान् तेच येथे निराळ्या संदर्भात भक्तीच्या ठिकाणी स्वभावत:च असलेल्या सर्वसमर्पण भावाच्या उत्कटतेने साधीत आहेत.

अर्जुना ! जीव हा ब्रह्म आहे. अर्थात तूही ब्रह्म आहेस. तुझ्या 'मी' पणाला हा जो 'अर्जुनपणा' चिकटला आहे तो काढून टाकलास की उरलेला जो 'मी' आहे तो माझेच स्वरूप आहे. त्यासाठी शरीराच्या पातळीवर 'मद्याजी'

हो. म्हणजे शरीराच्या सर्व हालचाली, सर्व कृती या मला अर्पण कर. त्या केवळ माझ्यासाठीच असू देत. इतर कोणताही हेतू त्या कृतींच्या पाठीमागे उभा राहू देऊ नकोस.

मनाच्या पातळीवर तू 'मन्मन' हो. मनाचे सर्व संकल्प-विकल्प, सगळे हवे-नको याचे उद्दिष्ट केवळ 'मी' असावे. मला उद्देशून नसेल असा कोणताही विकार तुझ्या मनामध्ये येऊ देऊ नकोस. म्हणजे मन आपली चंचलतेची खोड टाकून माझे ठिकाणी लीन होईल, अमन होईल. त्यायोगाने तू स्वाभाविकपणेच मन्मन होशील.

माझा भक्त होण्यासाठी तुझ्या बुद्धीचे सर्व व्यापार हे मलाच समर्पित कर. बुद्धी नाना प्रकारचे तर्क-वितर्क करते. शंका-कुशंका घेते. चांगले काय, वाईट काय याचा निर्णय घेण्याचा प्रयत्न करते. सोयीचे-अडचणीचे, सोपे-अवघड, सुखाचे-हितकर, करावे-करू नये, न केले तरी चालेल-केलेच पाहिजे अशा अनेक प्रकारच्या विचारांचे तरंग बुद्धीमध्ये उसळत असतात. पण उठलेली लाट क्वचित् जागच्याजागी लुप्त झाली तरी बहुधा तटाच्या दिशेने सरकत जाऊन तेथे आदळून फुटते. तसे तुझ्या बुद्धिरूपी मानससरोवराचे तीर 'मी' (ईश्वर) असावे; म्हणजे विचाराचा प्रत्येक तरंग प्रगट झाला तरी माझ्या तटरूपी पावलांना स्पर्श करून त्यांना अभिषेकून तेथेच लीन होईल. असा तू मद्भक्त हो.

''मां नमस्कुरु'' असे जे मी तुला सांगत आहे ते तुझ्या जीवनाच्या आश्रयाने असलेल्या अत्यंत सूक्ष्म अहंकारावरील उतारा आहे. न वाकणे, अत्यंत ताठ असणे, आपले न सोडणे हा अहंकाराचा स्वभाव आहे. अहंकाराचे अहंकारपणही त्यात आहे. प्रामाणिकतेच्या शुद्ध पातळीवर व्यवहाराच्या दृष्टीने जीवन जगणाऱ्या कोणालाही, एवढेच नव्हे, तर आध्यात्मिक प्रगती साधू इच्छिणाऱ्या साधकालाही अहंकाराच्या या नैसर्गिक गुणाचा उपयोग होत असतो. त्यामुळेच कर्मे घडतात. प्रयत्न सुटत नाहीत. पण त्यामुळेच कर्तृत्वाचा अभिमानही पुष्ट होत जातो. आणि तोच पुढच्या भावी अनर्थाचे मूळ ठरतो. यासाठी कर्तृत्वाच्या प्रेरणाशक्तीचा मूलस्रोत कोठून आला आहे, कोणाचा आहे, हे शास्त्रावरून योग्य रीतीने समजून घ्यावे लागते. म्हणजे अहंकाराचा दर्प जाऊन त्याच्या बळाचा अभिमान उणावतो. आणि मग तो ताठा टाकून नम्र

होतो. नमस्कार भावनेत हे सर्व प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे समाविष्ट आहे. म्हणून प्रामाणिकपणाने, आदरभावाने प्रेमपूर्वक केलेला नमस्कार हा अहंकाराचे सर्व दोष नाहीसे करतो. आता त्या अहंकाराची स्थिती बीज भाजून झालेल्या वा केलेल्या लाहीसारखी उपयुक्त पण निरुपद्रवी राहते.

असा हा मद्याजी, मन्मन, मद्भक्त, मन्नत पुरुष भगवंताशी एकरूप होईल, हे समुद्राला मिळालेली नदी समुद्ररूप होण्याइतके स्वाभाविक राहते. प्रवाहाप्रमाणे प्रारब्धाचा ओघ असेल तेवढाच आणि तितकाच दिसला तर वेगळेपणा दिसायचा. याच अर्थाने उपनिषदांनी ''तस्य तावदेव चिरम्'' असे म्हटले आहे.

भगवंत हे असे सांगत आहेत याचे कारण अर्जुन त्या योग्यतेचा झालेला आहे. म्हणून तर ते त्याला प्रिय असे म्हणतात. भगवंतांनी प्रिय म्हणावे हे काही सोपे नाही. कारण भगवान् मुळात तटस्थ आहेत, न्यायी आहेत. त्यांच्या सर्वव्यापकतेचा विचार केला तर कोणत्याही तऱ्हेचा पक्षपात त्यांचे ठिकाणी संभवत नाही. त्यांनी स्वत:च एकदा ''न मे द्वेष्योस्ति न प्रिय:'' (९-२९) असे स्पष्ट शब्दात स्वत:विषयी सांगितले आहे. आणि तरी ते अर्जुनाला तू माझा प्रिय आहेस असे आवर्जून म्हणत आहेत. हे चांगले जाणून घेतले पाहिजे.

भक्ताची योग्यता-पात्रता, त्याने साधनेच्या बळावर प्राप्त करून घेतलेला अधिकार, हा त्या नि:स्पृह, तटस्थ, उदासीन, निरंजन, व्यापक, निर्विकार अनंताला ''तू माझा प्रिय आहेस'' असे म्हणावयास लावीत आहे. हा ''ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम्'' चा स्वाभाविक आविष्कार आहे. भगवंत कोणाला प्रिय म्हणतो? कोण त्याला प्रिय होतो? ते त्यांनी स्वत:च अगदी सविस्तरपणे बाराव्या अध्यायात भक्तांच्या लक्षणात सांगितले आहे. ही सर्व लक्षणे अर्जुनासारख्या महाभागवताच्या ठिकाणी पूर्णपणाने एकवटलेली आहेतच, पण त्यातही धर्मशास्त्राला अत्यंत धरून असलेल्या अमृतासारख्या 'मी'ने - ईश्वराने केलेला उपदेश जो श्रद्धायुक्त अंत:करणाने जसाच्या तसा आचरणात आणतो आणि त्याचे हे आचरणही केवळ ईश्वरार्पण भावनेचे (मत्परमा:) असते, असे भक्त मला अतिशय प्रिय असतात असे जे भगवंतानी शेवटी म्हटले आहे ते जणू अर्जुनाच्या रूपाने पूर्णपणे साकारले असल्याने भगवान् त्याला प्रिय म्हणून संबोधतात याचे आश्चर्य वाटण्याचे कारण नाही.

कुलाच्या संहाराला कारणीभूत व्हावे लागणार असल्याने, खरे तर भीष्मद्रोणांसारख्या परमादरणीय श्रेष्ठ महात्म्यांच्या घातास प्रवृत्त झाल्याने आपणांस घोर पातक लागणार आहे, हे सरळ अंत:करणाच्या सत्त्वशील अर्जुनास वाटणारे सर्वांत मोठे भय आहे. भगवंतांनी तुला हे पाप लागणार नाही असे प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे यापूर्वी अनेक वेळा सांगितलेले आहेच. तरीसुद्धा सज्जनाच्या अंत:करणात असलेल्या नि:स्वार्थी वृत्तीने, दयाबुद्धीने, स्वाभाविक कोमलतेने, कराव्या लागणाऱ्या परोपघाताचे शल्य पापभीरू अर्जुनाच्या अंत:करणात कोठेतरी सलत राहण्याची शक्यता आहे. ती गृहीत धरून भगवान् सर्व प्रकारच्या हितकरतेचे सार ज्यात समाविष्ट आहे, सर्व श्रेयाचे जे साधन आहे, वात्सल्यप्रेमाने भरलेल्या अंत:करणाचा जो सहजोद्गार आहे, ज्याने साधनेची परिसीमा साधली जाणार आहे, ज्याच्यामुळे भगवद्भक्तांचे भाग्य प्रगट होणार आहे, भक्तीचे सौभाग्य तेजाळणार आहे, असा आदेश अर्जुनाला देत आहेत. सद्गुरूंचे अलौकिक माहात्म्य आणि शिष्याची असामान्य श्रेष्ठता त्या आदेशातून प्रगट होणारी आहे. आदेशाच्या दिव्यतेचे शिखर या निमित्ताने जणू गाठले जाणार आहे. भगवान् म्हणतात -

**सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज ।**
**अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः ।।६६।।**

अर्जुना! सर्व धर्म टाकून देऊन मला एकट्याला शरण ये. मी तुला सगळ्या पातकांतून सोडवीन. लवमात्र शोक करू नकोस.

वात्सल्यभावनेने आईला आपले मूल मोठे झाले आहे असे कधी वाटत नाही. तसेच कधीकधी अत्युत्कट प्रेमापोटी भगवंताचेही भक्ताच्या संबंधात घडत असावे. तुझे सगळे मन माझ्या ठिकाणी अर्पण कर. तुझ्या हातून घडणारी यज्ञादी सर्व कृत्ये मला उद्देशून असू देत. माझा भक्त हो, मला नमस्कार कर. म्हणजे खरेच सांगतो की तू मला येऊन प्राप्त होशील. असे एकदा सांगून झाल्यानंतर पुन्हा लगेचच सर्व धर्म टाकून मला शरण ये असे म्हणण्यात खरे तर वेगळेपण काही उरत नाही. पण प्रेमाने राहवत नाही हेच खरे. म्हणून वरील श्लोकात अप्रत्यक्षपणे सांगितला गेलेला भावच भगवान् वेगळ्या शब्दात पुन्हा स्पष्टपणे सांगत आहेत. या श्लोकाचा अर्थ करणे काहीसे कठीण आहे. कारण

''सर्वधर्मान्'' शब्दाने काय घ्यावे हा प्रश्न गूढ आहे. अधिकारी पंडितांनी सांगितलेला एक अर्थ आशयत: असा आहे;

युद्ध करण्याने पाप लागेल असे ज्या नीतिधर्माने सांगितलेले आहे ते ते नीतिधर्म सर्वधर्म शब्दाने घ्यावे. नितीनियम असे – 'वडीलधाऱ्या वृद्धांशी प्रेमादराने वागावे. गुरुद्रोह करू नये. तो कृतघ्नपणा आहे. आप्तांना क्षमाबुद्धीने पहावे. स्वार्थासाठी कोणासही पीडा देऊ नये. क्षमा, तितिक्षा, औदार्य, त्याग हे मोठे सद्गुण आहेत. सज्जनाने त्यांचा अवलंब केला पाहिजे. वर्णसंकराचा संभवही राहू देऊ नये. व्यक्ती वा कुटुंब यापेक्षा समाजाचे रक्षण श्रेष्ठ आहे. अर्जुनाच्या दृष्टीने युद्ध करण्यामुळे हे सर्व नीतिनियम मोडले जातात. अर्थात् त्यापासून पाप लागणारच. अर्जुनाची ही मनोवृत्ती लक्षात घेऊनच भगवंताने वारंवार असे केलेस, असा वागलास तर तुला पाप लागणार नाही असे सांगितले होतेच; आता निकराने भगवान सांगत आहेत की ज्यामुळे तुला पापाचे भय वाटत आहे, ते सर्व सोडून दे. मला शरण ये. मी तुला कोणतेही पाप लागू देणार नाही.

ज्ञानेश्वरीतील शरणागतीचा अर्थ स्वीकारला की त्या भक्ताच्या दृष्टीने 'सर्व' शब्द मर्यादित करण्याचे काही कारण नाही. शरणागती मात्र त्या अर्थाने प्रामाणिक असली पाहिजे. मला शरण ये म्हणण्यात मन्मन हो, मद्भक्त हो, मद्याजी हो हे सगळे आपोआपच येऊन जाते. ''मां नमस्कुरू'' म्हणताना नमस्कार घेणारा आणि नमस्कार करणारा वेगळे वेगळे गृहीत धरावे लागतात. ते वेगळेपणही आता उरत नाही. कारण शरणागतीची जी व्याख्या श्रीज्ञानेश्वर महाराजांनी केली आहे, तिचा उल्लेख मी यापूर्वी केला आहे, (पृ. २४४) त्या व्याख्येप्रमाणे भेदाला–वेगळेपणाला–भिन्नतेला थोडाही वाव राहत नाही. ऐक्य म्हणतानाही आधी दोन गृहीत धरावे लागतात. येथे द्वैत पूर्णपणे मावळते. 'एकपणाहि मिठी पडो सरते.' पण देहभाव संपलेला असला तरी जोपर्यंत देह असतो, तोपर्यंत तरी व्यवहाराच्या पातळीवर अंतरंगातील वस्तुस्थितीच्या बोधासाठी काही काही शब्दांचा वापर करणे अपरिहार्य होते. आणि त्यामुळे भासणारे, वाटणारे द्वैत रसास्वाद घेताना, साल टाकून द्यावी लागते तसे दूर सारावे लागते. 'प्रमेयाला बोलाआधी झोंबावे' लागते. 'शब्दावाचून संवाद साधवा' लागतो. वेगळेपणा म्हणून काही उरतच नसल्याने शरण जावे वा शरण

यावे म्हणताना हीच गोष्ट लक्षात घ्यावी लागते. साधक दशेत द्वैत हे कोणत्या ना कोणत्या तरी स्वरूपात राहत असते वा गृहीत धरावे लागते. त्याविना यज्ञयाग-पूजापाठ-धारणा-ध्यान वा नामस्मरण यातील काहीही करता येत नाही. यातील काही गोष्टी सहज यत्नावाचून घडतात असे म्हटले तरी त्यासाठी अधिष्ठान म्हणून देहाची निदान मन-बुद्धीची तरी आवश्यकता असतेच असते. अशा या द्वैताच्या आश्रयाने द्वैत ज्या स्वरूपात असेल त्या स्वरूपात नाना प्रकारचे धर्म, गुण वा दोष नैसर्गिकरीत्याच राहत असतात. त्यांचे प्रमाण कितीही लहान, सूक्ष्म असले तरी त्याचा ऐक्य होण्याच्या दृष्टीने अडथळाच असतो. तोही नाहीसा व्हावा लागतो. ''सर्वधर्मान् परित्यज्य'' असे सांगून भगवान् ऐक्याच्या आड येणारे, स्थूल-सूक्ष्म द्वैताच्या आधाराने राहणारे जे सर्व धर्म, सर्व प्रकारचे गुण-दोष, त्यांचा त्याग करावयास सांगत आहेत. हे सांगणे -

*''त्यज धर्ममधर्मंच उभे सत्यानृते त्यज ।*
*उभे सत्यानृते त्यक्त्वा येन त्यजसि तत् त्यज ।।''*

या महाभारतातील श्लोकाच्या आदेशासारखे आहे. समजावयास कठीण असले तरी प्रगत अवस्थेतील वस्तुस्थितला धरून आहे.

नाना प्रकारच्या उपाधीचे एवढे मोठे ओझे द्वैत भावनेच्या आश्रयाने आपल्या डोक्यावर राहत असते की त्यामुळे चालणे हेही अत्यंत कष्टाचे होते. मग उन्नतीच्या चढावरून मार्गक्रमण करताना हे ओझे किती पीडाकर होत असेल याची कल्पनाच केलेली बरी. म्हणून संत कबीर आपल्या एका पदामध्ये म्हणतात, ''जो चलना राह नाजुक है हमन सर बोझ भारी क्या ।'' हे ओझे फेकून देणे म्हणजेच ''सर्वधर्मान् परित्यज्य'' आहे. हे ओझे कुठे ना कुठेतरी ''मी-माझे'' या द्वैत भावनेशी चिकटलेले असते. मी आणि माझे ही भावनाच मुळी उपाधीची आहे. त्यावर पुन्हा धर्माधर्माचे ओझे म्हणजे ''गंडस्योपरिपीटिका'' म्हणतात तसे होते. भगवान् अतीव करुणेने, परम वात्सल्याने, अपार आत्मीयतेने आपल्या भक्ताला बंधक होणारे हे पाश टाकून दे, फेकून दे असे सांगत आहेत. कारण तसे केले तरच शरण येणे सर्वार्थाने साधणारे आहे. भगवान् म्हणतात - अर्जुना, तू घट फुटल्यावर घटाकाश जसे आकाशात प्रविष्ट होते किंवा तरंग जसा पाण्याशी एकरूप होतो तसा जीवभाव टाकून माझ्याशी एकरूप हो. शरण येणे म्हणतात ते खऱ्या अर्थाने असे असते.

असे झाले म्हणजे मग सूर्याला अंधार म्हणून जसा कधी दिसतच नाही, जागे झालेल्याला स्वप्नातील कष्ट उरत नाहीत; तसे तुला वाटत असलेल्या पापाचे होईल. तू सर्व प्रकारच्या पातकातून, बंधनातून पूर्णपणे मुक्त होशील. तुझ्या संतोषाकरिता पाहिजे तर असे म्हणतो की मी तुला सर्व प्रकारच्या पापापासून सोडवीन. अत्यंत प्रखर अशा अग्निज्वालेला पाचोळ्याचे भय बाळगण्याचे कारण नसते. तसेच तुला कोणत्याही चिंतेचे वा शोकाचे भय बाळगण्याचे कारण नाही. कारण तू आणि मी आता एक झालेले आहोत. ''तैसे मजसि एकवटलेया । मी सर्व रूप वाचूनिया । आन काहि उरावया । कारण असे ।।'' (ज्ञाने. १८/१४११) श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात - श्रीकृष्ण असे म्हणाले आणि त्यांनी आपले बाहू पसरून अर्जुनाला दृढ आलिंगन दिले. अवतारकृत्य म्हणून धारण केलेल्या देहभावामुळे बोधग्रहणाच्या दृष्टीने काही आडकाठी उरली असेल तर तीही उरू नये म्हणून अतिप्रेमाने अर्जुनाला आपल्या हृदयाशी कवटाळिले आणि या आलिंगनाच्या निमित्ताने ''हृदया हृदय एक जाले । ये हृदयीचे ते हृदयी घातले । द्वैत न उरता केले । आपणा ऐसे अर्जुना ।। दीपे दीप लाविला । तैसा परिष्वंगु तो जाला । द्वैत न मोडिता केला । आपणपे पार्थु ।।'' (ज्ञाने. १८/१४२१-२२) असे या प्रसंगाचे साक्षात्कारी वर्णन श्रीज्ञानोबारायांनी केले आहे. महर्षी व्यासांच्या कृपाप्रसादाने दिव्यदृष्टी प्राप्त झालेल्या संजयाने जे दर्शनसुख अनुभविले असेल ते त्याचे त्याच्यापुरते राहिले, पण श्रीज्ञानोबारायांसारख्या थोर अधिकारी पुरुषाने, साक्षात्कारी महात्म्याने, जगज्जननीचे कृपावात्सल्य जणू साकारले आहे, अशा प्रेमळ माउलीने हा अनुभवामृताचा खाऊ आम्हां सामान्यातील सामान्य लेकरांच्या हाती दिला आहे. हे त्यांचे आम्हां दीनजनांवरील केवढे उपकार आहेत! उपकार आहेत हे म्हणणेही त्यांच्या परमोदार अंत:करणाला, वत्सलतेने ओथंबलेल्या हृदयाला सोसणारे नाही, मानवणारे नाही. त्यांच्या चरणी मस्तक ठेवून कृतज्ञभावाने क्षमा मागणे एवढेच मला-आपल्याला शक्य आहे.

या श्लोकाने गीताशास्त्राची सांगता झाली आहे. गीताप्रासादावर या श्लोकरूपाने अत्यंत तेजस्वी असा रत्नखचित सुवर्णकळस चढला आहे. गीतासागराच्या उपदेशामृतातील हे अवगाहन मोठे अद्भुत आहे, विलक्षण आनंददायी आहे. या बोधाने भगवंत आणि भक्त, गुरू आणि शिष्य, वक्ता

आणि श्रोता यांच्यामधील अंतर संपवून टाकले आहे. फलश्रुती केवळ फलश्रुती राहिलेली नाही. तिचा परिणाम, तिचे फल पदरात पडले आहे. त्यांचे सेवन झाले आहे. आणि ते पचल्यानंतर लाभणारी तुष्टी-पुष्टीही प्रगटली आहे. स्वाध्याय-प्रवचनाची परिणती असामान्य आहे. दिव्य आहे. भव्य आहे, उदात्त आहे. आपण गीताप्रासादाला बाहेरून प्रदक्षिणा घातली. गाभाऱ्याच्या बाहेर दूर उभे राहून बोधरूप झालेल्या नरनारायणाच्या मूर्तीचे ओझरते दर्शन घेण्याचे धनी झालो. हेही नसे थोडके. यापुढे कोणाचे भाग्य किती आहे, किती उजळेल ते कोण, कसे सांगणार? ते ज्याचे त्याच्या स्वाधीन आहे.

पुढील काही श्लोकांतून गीताशास्त्राचे श्रवण करण्याची योग्यता कोणाची आणि गीतेच्या अध्ययनाचे फळ काय तत्संबंधी भगवान् सांगणार आहेत. क्रमाने आपण त्याचा यथाशक्ती विचार करू.

**इदं ते नातपस्काय नाभक्ताय कदाचन ।**
**न चाशुश्रूषवे वाच्यं न च मां योऽभ्यसूयति ।।६७।।**

अर्जुना ! हे गीताशास्त्र, जो तप करीत नाही, जो माझा भक्त नाही, ज्याची ऐकण्याची इच्छा नाही, सेवा करावी असे ज्याला वाटत नाही. किंवा ज्याच्या अंत:करणात माझ्याविषयी मत्सर आहे त्याला मुळीच सांगू नकोस.

गीताश्रवणाचा अधिकार कोणाला नाही हे भगवान् या श्लोकात सांगत आहेत. खरोखरीच हे वर्णन गीतेच्या आरंभी आले असते तर बरे झाले असते. पण तसे झाले नाही. कदाचित् प्रत्यक्ष काही लाभ नसताना गीता ऐकण्याच्या उद्देशाने शेकडो लोक गोळा होतात. त्यात एखाद-दुसरा तरी श्रवणाचा अधिकारी असू शकतो, काही प्रमाणात तरी असू शकतो. त्याच्या उन्नती-प्रगतीला साहाय्य व्हावे म्हणून हे नियम शेवटी उल्लखिलेले असावेत. आधीच सांगितले असते तर हा व्यवसाय नसलेला वक्ता बरे झाले म्हणाला असता, तर खऱ्या जिज्ञासूची निराशा झाली असती.

कृष्णार्जुनसंवादाला शास्त्राचीही योग्यता थोड्या उशिराच आली आहे. आरंभीचे काही श्लोक लौकिक स्वरूपाचे आहेत. लढत नाही म्हणताच कृष्णाने अर्जुनाला फटकारले त्याचे स्वरूपही व्यावहारिक आहे. या संवादाला तत्त्वज्ञानाचा जो स्पर्श झाला तो दुसऱ्या अध्यायातील अकराव्या श्लोकापासून.

मग मात्र तत्त्वज्ञानाची खोली आणि व्यापकता क्रमाक्रमाने वाढतच गेली. त्यातूनच कोणत्याही परिस्थितीतील सर्व मानवजातीच्या उद्धाराचे, सर्व काळी उपयोगी पडणारे तेजस्वी तत्त्वज्ञान प्रगट झाले. गीतेच्या श्रवणाचा अधिकारी कोण, त्याचा विचार आरंभी आला नाही त्याचे हेही एक कारण असावे.

गीतेच्या श्रवणाच्या अधिकार-अनधिकाराची चर्चा पूर्णपणे नसली तरी थोड्या प्रमाणात का होईना गीतेत पुष्कळच आधी आलेली आहे. तिसऱ्या अध्यायाच्या एकतीस आणि बत्तीस या श्लोकांत हा विचार आलेला आहे. येथील विचार त्यामानाने पुष्कळच सविस्तर आहे आणि असा विचार करणे अत्यंत आवश्यकही आहे. समानतेच्या दिखाऊ प्रदर्शनासाठी केलेला सारखेपणाचा व्यवहार अंगलटही येऊ शकतो. आपल्या हिंदू संस्कृतीने हिताकडे दृष्टी ठेवून समतेचे हे प्रदर्शन टाळले आहे. मग त्यापायी बुद्धिवादाचा आव आणून तर्कटीपणाने सर्वांच्या हितामध्ये रत असलेल्या आपल्या परंपरेवर कोणी विषमतेचा आरोप करीत असले तरी उथळपणाने बिचकून जाऊन आपण कोणताही न्यूनगंड बाळगण्याचे कारण नाही. ''साहे ओझे त्यास तेचि द्यावे ।'' असे संतानी म्हटले आहे. श्रीज्ञानेश्वर महाराजांनीसुद्धा ''जे सायासे स्तन्य सेवी । ते पक्वान्ने केवी जेवी । म्हणोनि बालका जैसी नेदावी । धनुर्धरा ।।'' असेच म्हटले आहे. ज्याचा जो अधिकार नाही तो आहे असे गृहीत धरून त्याला वागविणे हे हिताचे नसते. निदान त्यापायी केलेले श्रम वाया तरी जातातच. हे दोन्हीही होऊ नये म्हणून अधिकारभेदाची जाणीव ठेवावी लागते. आपण अधिकारात उणे पडतो हे अहंकारामुळे सहसा कुणी मान्य करीत नाही. आणि कोणी तसे सांगितले तर ते कोणाला रुचतही नाही. अलीकडे तर हे अहंकार नाना कारणांनी बहुतेकांचे पोसले गेले आहेत. परकीयांनी आपल्या स्वार्थासाठी या मूळच्या आगीत द्वेषभावना वाढविणारे प्रचाराचे तेलही ओतले आहे. त्यामुळे आपल्या समाजातील सामंजस्य जवळजवळ नष्ट झाले आहे. त्याचे संघर्षात्मक दुष्परिणामही आपण भोगत आहोत. व्यवहाराच्या दृष्टीने सामाजिक कार्यकर्त्यांनी वा राजकीय पुढाऱ्यांनी याचा जो विचार करणे असेल तो करावा. अध्यात्ममार्गात तरी अहंकाराला आणि तज्जन्य अप्रामाणिकतेला वाव नसावा. म्हणून गीतेचा अनधिकारी कोण, अधिकारी कोण हे जाणून घेणे उपयुक्त आहे.

गीता कोणाला सांगू नये त्याचे वर्णन करताना भगवंत म्हणतात – ''इदं अतपस्काय न वाच्यं'' – ज्याची तप करण्याची सिद्धता नाही, ज्याला केव्हाही कोणतेही श्रम करावयास नको असतात; संयम, त्याग यांचा आवश्यक तो भाग ज्याचेजवळ नाही, त्याला गीता सांगू नकोस. आपण कीर्तने-प्रवचने ऐकतो, पण त्यावर विचार केला पाहिजे, चिंतन-मनन केले पाहिजे याची जाणीव ठेवतो का? नुसते ऐकण्याने फारसे काही साधत नाही. केवळ ऐकण्याने विषय अंत:करणात ठसत नाही. मग तदनुरूप आचरण घडण्याची गोष्ट तर लांबच राहिली. लक्ष लावून दक्षतापूर्वक ऐकणे, ऐकलेल्या विषयाचे आकलन होण्यासाठी त्याचे मनन करणे, त्याप्रमाणे आचरण घडावे म्हणून प्रयत्नशील राहणे ही प्रत्येक गोष्ट उत्तरोत्तर अधिकाधिक कष्ट देणारी आहे. असे श्रम घेण्याची ज्याची सिद्धता नाही, त्याला सांगणे आणि त्याने ऐकणे दोन्ही निरुपयोगी आहे.

न अभक्ताय वाच्यं –जो भक्त नाही, नास्तिक आहे, देवावर – गुरूवर ज्याची श्रद्धा नाही, त्यांना गीता सांगू नकोस असे भगवंत म्हणतात. अलीकडचे तथाकथित बुद्धिवादीही या अभक्तांच्या गटातच येतात. ते बुद्धिवादाच्या संशोधनाच्या नावाखाली गीतेचे अंतरंग-बहिरंग परीक्षण करीत असतात आणि निर्णयाला येतात की गीता ही प्रक्षिप्त आहे. ती मुळी कृष्णाने सांगितलेलीच नाही. युद्धाच्या ऐन प्रसंगी अशी वेदांतचर्चा कुणी करीत नसतो. अर्जुनाच्या मूळ शंकेला वा प्रश्नाला कृष्णाने उत्तरे दिलीच नाहीत. गीता ही निरनिराळ्या काळात निरनिराळ्या व्यक्तींनी लिहिलेली आहे. ती कृती कोण्या एका व्यक्तीची नाही. त्यात सांगितलेले सिद्धांत असंबद्ध आणि परस्परविरोधी आहेत. त्यातील आश्वासनेही विश्वसनीय नाहीत. तुला पाप लागणार नाही असे सांगूनही अर्जुनाला नरकात जावे लागले. असे नाना प्रकारचे स्वैर आरोप तर्कटी दुष्टाव्याने हे तथाकथित बुद्धिवादी करीत असतात. त्यांच्यापुढे गीता वाचून उपयोग काय?

श्रीशंकराचार्यांनी आपल्या भाष्यात ''अभ्यसूयति'' शब्दावर भाष्य करताना या अशा विद्वानांची मनोवृत्ती नेमकेपणाने प्रगट केली आहे. जगद्गुरू आचार्य म्हणतात – ''न च यो मां वासुदेवं प्राकृतं मनुष्यं मत्वा अभ्यसूयति आत्मप्रशंसादिदोषाध्यारोपणे मम ईश्वरत्वं अजानन् न सहते असौ अपि अयोग्य:

तस्मै अपि न वाच्यं ।'' आणि पुढे ते स्पष्टपणे आदेश देतात की, ''भगवति असूयायुक्ताय समस्त गुणवतेऽपि न वाच्यं'' – अहंकारोत्पन्न असूया गुण किती त्याज्य आहे ते यावरून लक्षात येईल. तप–भक्ती–शुश्रूषा इत्यादी गुण असले तरी ते या असूयेमुळे उपेक्षणीय ठरतात. श्रीज्ञानोबारायांनीही श्रीशंकराचार्यांचे हे मत उचलून धरले आहे. श्रीज्ञानोबाराय म्हणतात – पक्वान्ने उत्तम प्रकारची असावीत, पण त्यात विष असावे, मैत्रीच्या पोटात कपट असावे, म्हणजे ते अन्न वा ती मित्रता त्याज्य ठरते, तसेच असूयेमुळे तपादी गुणांचे समजावे. अनेक उपमांनी हा विषय त्यांनी स्पष्ट करून सांगितला आहे. आणि शेवटी तर, फार काय सांगू, अगदी कुणी ब्रह्मदेवाच्या योग्यतेचा असला तरी तो जर ईश्वराची निंदा करीत असेल तर त्याला कौतुकाकरितासुद्धा गीता सांगू नकोस असे माउलींनी लिहिले आहे. (ज्ञाने. १८/१५०३ ते १५०६) भक्ती, प्रेम, श्रद्धा, निष्ठा, श्रेष्ठांविषयीचा आदर इत्यादी काही ज्यांच्या हृदयात नाही, त्यांना काही सांगणे वा त्यांनी काही ऐकणे हा केवळ मनोरंजनाचा विषय होतो. ते एक वेळ घालविण्याचे साधन होते. आगगाडीने प्रवास करीत असताना एकदा एक माणूस टोपले खांद्यावर घेऊन ''टेम–फास, टेम–फास'' असे म्हणत डब्यातून इकडून तिकडे फेऱ्या मारीत होता. प्रथम माझ्या काहीच लक्षात आले नाही. थोडी चौकशी केली तेव्हा समजले की तो फुटाणे आणि खारे शेंगदाणे विकत होता. प्रवासाचा वेळ कंटाळवाणा होऊ नये म्हणून लोक ते दाणे–फुटाणे घेऊन खात होते. त्याचे टेम–फास हे ''टाइम पास'' होते. अध्यात्मशास्त्र श्रवणाचा उपयोग असा होऊ नये. तसे करणे म्हणजे त्या श्रेष्ठ शास्त्राचा घोर अपमान करणे आहे.

न अशुश्रूषवे वाच्यं– ज्याला ऐकण्याची इच्छा नाही म्हणजे ज्याला जाणून घ्यायची इच्छा नाही, ज्याला जिज्ञासा नाही त्यालाही गीता सांगू नये असे भगवान् म्हणतात. ऐकण्याची इच्छा, जाणून घेण्याची इच्छा पोटातून असल्यावाचून ऐकणे हे पालथ्या घड्यावर पडलेल्या पाण्यासारखे व्यर्थ जाते. पुष्कळ वेळा माणसे कोणाच्या तरी भीडेसाठी, कोणाच्या तरी आग्रहासाठी कीर्तन–प्रवचनाला येतात. त्याविषयीची त्यांना मनातून गोडी नसते, आवड नसते, ओढ तर नसतेच नसते. त्यामुळे विषय चांगला चालला असूनही तो डोक्यावरून जातो. किंवा ते सर्व त्यांना कंटाळवाणे वाटते. अशा लोकांना

श्रवणाचा काय उपयोग? शुश्रूषा शब्दाचा दुसरा एक अर्थ आहे. – सेवा करणे. हातपाय दाबणे, कपडे धुणे हा सेवेचा फार फार स्थूल अर्थ झाला. संगतीत राहणे, ग्रहण करणे, सेवन करणे हा सेवा शब्दाचा खरा अर्थ. श्रोत्यांच्या ठिकाणी हा गुण असला पाहिजे. अन्न सेवन केले की पुढचे पचणे–अंगी लागणे–त्यामुळे पुष्टी लाभणे हे जसे सहज घडते तसेच श्रवण प्रामाणिकपणे केले, सातत्याने केले, जाणून घ्यायच्या ओढीने केले म्हणजे हळूहळू का होईना पण ते परिणामकारक होते व त्यातून प्रगती–उन्नती साधू शकते. म्हणून श्रवण करायचे ते सेवाभावाने करावे, आदरभावनेने, पूज्यबुद्धीने करावे. मग शारीरिक कष्टापासून निदिध्यासनापर्यंत सर्व गोष्टीत उत्साह टिकून राहतो. यासाठीच भगवंतांनी ४थ्या अध्यायात सेवा हे ज्ञानप्राप्तीचे एक महत्त्वाचे साधन सांगितले आहे.

न च मां योऽभ्यसूयति – जो ईश्वराविषयी मत्सर बाळगतो, ईश्वर सर्वज्ञ आहे, सर्वशक्ती आहे, हे ज्यांना मान्य नसते त्यांना गीता सांगून काही उपयोग नाही. मत्सर हा अहंकाराचा एक विकृत परिणाम आहे. त्याला कोणाचा मोठेपणा सहन होत नाही. पाहण्याची दृष्टीच दूषित असल्यामुळे वक्त्याच्या ठिकाणी त्याला दोषच दोष आढळून येतात. वक्ता त्याला अहंकारी वाटतो. एका आधुनिक लेखकाने गीतेसंबंधी असे म्हटले आहे की, '''माझ्या मनाला नेहमी एक गोष्ट खटकते ती म्हणजे परमेश्वराचा अहंकार.'' मत्सरी लिखाणाचे याहून दुसरे स्पष्ट उदाहरण सापडेल असे वाटत नाही. या मत्सरी वृत्तीमुळेच ''यांना सांगायला काय होते, आले मोठे उपदेश करणारे, कोणत्या परिस्थितीला आम्हांला तोंड द्यावे लागते ते आमचे आम्हांला माहीत! कोणाला तरी पाठीशी घालण्यासाठी हे असे बोलतात'' इत्यादी इत्यादी आरोप वक्त्यावर केले जातात. वक्त्याविषयी अनादराची भावना जर अंत:करणात असेल तर नुसते पायावर डोके ठेवून नमस्कार करण्याने काय होणार?

श्रवणाची योग्यता नष्ट करणारे हे सर्व दोष मनुष्याने स्वत:च निर्माण केलेले, वाढवलेले, पोसलेले असतात. ती निर्मिती काही ईश्वराची नाही. ही सर्व अहंकारातून उत्पन्न झालेल्या कामक्रोधाची संतती आहे. हे सारे रजोगुण–तमोगुणाचे आविष्कार आहेत. खरोखरीच जगात जे काही चांगले आहे ते ईश्वरनिर्मित आहे. त्याला वाईट वळण लागते ते माणसाच्या अपप्रवृत्तीमुळे.

बाहेर लख्ख सूर्यप्रकाश असतानाही घराची दारे-खिडक्या बंद असतील तर घरातील वातावरण अंधारे आणि कोंदट राहणारच. गव्हाच्या बीजाला अंकुर फुटून त्यातून गहू निर्माण होतो, ही काही माणसाची कृती नाही, पण देवाच्या या देणगीचा लाभ पदरात पाडून घ्यायचा असेल तर शेतीचे सर्व प्रकारचे कष्ट माणसाला करावे लागतात. ते सर्व वेळच्या वेळी दक्षतेने करावे लागतात. अंत:करणाच्या आश्रयाने असलेले दुर्गुण काढून टाकण्यासाठी माणसाला असेच प्रयत्न करावे लागतात. मनुष्य म्हणून जन्माला आला तेव्हाच काही चांगले घेऊन जन्माला आला आहे. हेच चांगले वाढेल आणि वाईट उणावेल या दृष्टीने त्याने प्रयत्नशील असले पाहिजे. पण अहंकार आणि तज्जन्य असूयादी विकार त्याला तसे करू देत नाहीत.

परवाचीच एक घटना सांगतो. एक सद्‌गृहस्थ गाभाऱ्यात दर्शनासाठी शिरण्यापूर्वी पायातल्या चपला काढून पिशवीत घालून गाभाऱ्यात येऊ लागले. ते एका स्वयंसेवकाने पाहिले आणि तो म्हणाला - चपला घातलेली पिशवी आत आणू नका, ती बाहेर ठेवा. तेवढ्यानेही ते गृहस्थ संतापले, आणि म्हणाले - मी इथला भक्त आहे. अनेक वर्षे इथे येतो. तू काल आलास. मला ज्ञान सांगू नकोस. तरी स्वयंसेवकाने त्यांना अडवले. तेव्हा ते गृहस्थ दर्शनही न घेता तणतणत निघून गेले, पण चपलांची पिशवी बाहेर ठेवून काही गाभाऱ्यात आले नाहीत. मग चुकलो, क्षमा करा, माझ्या लक्षात आले नाही, पुन्हा असे होणार नाही इत्यादी बोलून आपले आर्जव प्रगट करणे तर दूरच राहिले. पावित्र्यरक्षणाच्या दृष्टीने स्वयंसेवकाने सांगितले ते अगदी योग्य होते. दर्शनाकरिता म्हणून येणाऱ्या माणसाला त्याची जाणीव असणे आवश्यक होते. पण अहंकारापोटी त्याला ते उमगले नाही. मंदिराचे पावित्र्य सांभाळण्यापेक्षा चपला सांभाळणेच त्या महाभागाला महत्त्वाचे वाटले. सांगणाऱ्या स्वयंसेवकाविषयीच्या तुच्छतेने त्याला देवदर्शनाविषयीही आस्था राहिली नाही.

अनेक वर्षे भजन-पूजन-तीर्थयात्रा-गुरुसेवा करतो आहे असे ज्याच्याविषयी दिसते, त्याची ही अवस्था आहे. निरहंकारी नसले तर काय होते ते यावरून लक्षात येईल. साध्या गोष्टीसुद्धा माणसाला उमगत नाहीत. मग श्रेष्ठ तत्त्वज्ञान कसे कळावे? म्हणून भगवंतांनी गीता कोणाला सांगू नये

ते आवर्जून विस्ताराने सांगितले आहे. त्यातील एकेका भागाचा साधारणत: एकेक गोष्ट सुधारण्यासाठी उपयोग होऊ शकतो. तपामुळे शरीराला चांगले वळण लागते. भक्तीमुळे मनातील सात्त्विकता वाढते. शुश्रूषेमुळे बुद्धी निर्मळ होते. आणि अनसूयतेमुळे, असूया नसल्यामुळे, कोणाविषयी मत्सर वा तुच्छताबुद्धी न बाळगल्याने अहंकार उणावतो. श्रवण चांगले घडावे, श्रवणाचा उपयोग व्हावा यासाठी या सर्व गोष्टींची आवश्यकता असते. म्हणून भगवान् गीताश्रवणाचा अधिकार कोणाला नाही हे सांगताना तप न करणारा इत्यादींचा उल्लेख कटाक्षाने करीत आहेत. आता गीता कोणास सांगावी ते सांगतात.

**य इमं परमं गुह्यं मद्भक्तेष्वभिधास्यति ।**
**भक्तिं मयि परां कृत्वा मामेवैष्यत्यसंशय: ।।६८।।**

**न च तस्मान्मनुष्येषु कश्चिन्मे प्रियकृत्तम: ।**
**भविता न च मे तस्मादन्य: प्रियतरो भुवि ।।६९।।**

अत्यंत गुह्य असे गीताशास्त्र जो कोणी माझ्या भक्ताला शिकवील तो माझी पराभक्ती करून नि:संशयपणे मला प्राप्त होईल. त्याच्याइतका, मला अत्यंत आवडणारा दुसरा कोणी नाही आणि त्यापेक्षा मला अधिक प्रिय असा दुसरा कोणी असणारही नाही.

कृष्णार्जुनांचा संवाद असलेली ही भगवद्गीता उपनिषदांचे सार असे श्रेष्ठ शास्त्र आहे. याचे ज्ञान जो ईश्वराचा भक्त आहे, त्यालाही असणे आवश्यक आहे. पण पुष्कळ वेळा भक्तिप्रेमात गढलेले लोक इकडे लक्ष देत नाहीत. त्यांना भगवंताचे नाव घेणे, मनोभावे पूजा करणे, भगवंताचे गुणानुवाद गाणे, त्याच्या चरित्रातील लीला ऐकणे वा सांगणे यातच सुख वाटते, समाधान लाभते. जगत्कल्याणार्थ अवतीर्ण झालेल्या, भक्तियोगाचा प्रसार करणाऱ्या संतमहात्म्यांनीही भक्तीच्या अशाच स्वरूपावर विशेष भर दिला आहे. क्वचित् शास्त्रज्ञानाविषयी उपेक्षाच नव्हे, तर तुच्छताच व्यक्त केली आहे. प्रेमपूर्वक निष्ठेने भगवंताचे नाम घ्यावे यात सर्वशास्त्राचे तात्पर्य आले असेही त्यांनी प्रतिपादिले आहे. आणि संतांची ही शिकवण सामान्य जनांचा विचार करता अधिक उपयुक्त आहे, आणि पारमार्थिकदृष्ट्या परमसत्य आहे. पण यात

एक अडचण उत्पन्न होते, ती अशी की, नामस्मरण, पूजन, तीर्थयात्रा वा लीलासंकीर्तन हे सर्व बाह्यांगाचे राहते. तेही एक प्रकारे कर्मकांड ठरते. सातत्याने, सवयीने ते सहज होते, पण अंतरंगापर्यंत पोचत नाही. मनबुद्धीचा विकास व उन्नती त्याने साधत नाही. कारण खरी निष्ठा, खरे प्रेम केवळ या कृत्यांमुळे निर्माण होत नाही. श्रीतुकाराममहाराजांचे एक वचन आहे. ''वेद अनंत बोलिला । अर्थ इतुकाचि शोधिला ।। विठोबासी शरण जावे । निजनिष्ठे नाम गावे ।। सकळ शास्त्रांचा विचार । अंती इतुकाचि निर्धार ।। अठरा पुराणी सिद्धांत । तुका म्हणे हाचि हेत।।''

विठोबाला शरण जावे आणि निजनिष्ठेने त्याचे नाव घ्यावे हाच सकल शास्त्रांचा विचार, पुराणांचा सिद्धांत किंवा वेदांचे तात्पर्य आहे असे महाराज म्हणतात. व्यवहारामध्ये याचा अर्थ इतकाच होतो की, पंढरपूरला वारीसाठी जाऊन देवाला दंडवत घालावे आणि तोंडावाटे विठ्ठल-विठ्ठल म्हणत राहावे. या अर्थाला पुष्टी देणारी, ''चाल केलासी मोकळा । बोल विठ्ठल वेळोवेळा ।'', ''पंढरीसी जाई एकवेळ ।'' अशा अर्थाची अनेक संतवचनेही आहेत. काहीच न करणाराला, केवळ संसारातच पूर्णपणे निमग्न असलेल्याला भक्तिमार्गाला लावण्यासाठी या अशा वचनांचा फार फार उपयोग होतो, यात काही शंका नाही. पण सर्व शास्त्रांचे सार म्हणून उद्धृत केलेल्या श्रीतुकोबारायांच्या वचनातील भाव इतका वरवरचा आणि सोपा आहे का? ते वारीला जावे असे म्हणत नाहीत, विठोबासी शरण जावे असे म्हणतात. वाणीने नामाचा उच्चार करावा असे सांगत नाहीत, तर ''निजनिष्ठे नाम गावे'' असे उपदेशितात. विठोबाला शरण जाणे आणि निजनिष्ठे नाम घेणे हे वेदशास्त्र-पुराणांचे तात्पर्य आहे. शरण जाणे हे काही वारी करण्याइतके साधे-सोपे नाही, कारण शरण जाणे म्हणजे काय त्याचा अर्थ श्रीज्ञानोबामाउलींनीच स्पष्ट केला आहे. भेद-द्वैत-भिन्नता, त्यातून उत्पन्न होणारे सर्व संबंध हे नाहीसे व्हावे लागतात. आणि एकरूपताच नव्हे, तर पुरेपूर एकता अनुभवास यावी लागते. असे झाले म्हणजे शरण जाणे यथार्थ होते. तीच गोष्ट निजनिष्ठे नाम गाण्याची. निष्ठा शब्दात श्रद्धा-प्रेम यांची उत्कटता आणि त्याग-संयम-सातत्य-श्रम यांची पराकाष्ठा गृहीत आहे. नाम गावे म्हणण्यात नामाविषयीचा उत्साह आणि उल्हास प्रगट होतो. आता शरण जाणे आणि नाम गाणे या दोन्ही गोष्टी महाराजांनी सांगितल्याप्रमाणे साधायच्या

तर अंत:करणाची स्थिती किती शुद्ध, किती उदात्त असली पाहिजे हे सहज लक्षात येण्यासारखे आहे. शास्त्राध्ययनाची आवश्यकता निर्माण होते ती या कारणासाठी. मी कोण, ईश्वर कोण याचे खरे स्वरूप लक्षात आले नाही, भोवती पसरलेल्या सृष्टीचा असणारा आणि भासणारा संबंध नीट उमगला नाही, तर खऱ्या अर्थाने शरणागती म्हणजे काय, निष्ठा म्हणजे काय, ते कळणारच नाही. शास्त्र या गोष्टी जीवाच्या लक्षात आणून देते. गीता हे तर त्या दृष्टीने आदर्श शास्त्र आहे.

भक्तीच्या भोळ्या-भाबड्या स्वरूपात एक विलक्षण गोडी आहे हे खरे. लहान खेळकर पोर बोबडे बोल बोलते, अडखळत चालते, लाडे लाडे वागते, रुसते, रडते, हट्ट करते त्यामुळे ते वडीलधाऱ्या माणसांना फार आवडते. आई त्याचे कोडकौतुक करते, हट्ट पुरविते. त्यापायी स्वत:ला होणाऱ्या कष्टाची जाणीवही ठेवीत नाही. लेकराला कुरवाळण्यात आईला आणि आईला बिलगण्यात त्या लेकराला जे सुख असते, जे समाधान असते ते अवर्णनीय असते, मोठे लोभनीय असते. पण हे कितीही खरे असले तरी ते लेकरू जन्मभर तसेच, लहान लेकरूच राहावे असे कोण्यातरी आईला कधीतरी वाटते का? रांगणारे मूल वर्षाचे झाले तरी चालू लागले नाही, त्याचे बोबडे बोलणे तीन-पाच वर्षांचे झाले तरी सुधारले नाही, त्याच्या हट्टातला पोरकटपणा आठ-दहा वर्षांनंतरही तसाच टिकून राहिला, त्याच्या रुसण्यातला बालिशपणा मावळला नाही, तर ते काही आईला आवडत नाही. आपले मूल मोठे व्हावे, जाणते व्हावे, स्वत:च्या पायावर उभे राहण्याइतके कर्तृत्ववान निघावे अशीच इच्छा प्रत्येक आईच्या अंत:करणात असते.

माझ्या भक्ताला गीताशास्त्र शिकवावे असे म्हणण्यात भगवंताचाही तोच हेतू आहे. पांडित्य पचवून बालभावाने राहावे हे शोभते, तो आदर्शही आहे, पण बालिशपणा, पोरकटपणा, भाबडेपणा, बावळेपणा हा काही बालभाव नव्हे. भक्तश्रेष्ठ नामदेवरायांना पांडुरंगाने श्रीविसोबा खेचरांकडे उपदेश घेण्याकरिता पाठविले ही गोष्ट या संदर्भात लक्षात घेण्यासारखी आहे. म्हणून तर भगवंतांनी माझ्या भक्ताला जो गीताशास्त्र पढवितो त्याला पराभक्ती केल्याचे फळ मिळते, तो मला येऊन मिळतो असे आवर्जून सांगितले आहे. इतकेच नव्हे, तर माझ्या भक्ताला गीताशास्त्र शिकविणे हे मला सगळ्यात अधिक आवडणारे कृत्य आहे

असेही भगवान् म्हणतात. गीताशास्त्र शिकवून माझ्या भक्ताला जो ज्ञानी करतो त्याच्याइतका प्रिय मला कुणी नाही, आणि पुढे होणारही नाही हे भगवंताचे वचन फार महत्त्वाचे आहे. भक्त म्हटला की त्याने ज्ञानाचा द्वेषच केला पाहिजे असे ज्यांना वाटते किंवा जो भोळाभाबडा, अडाणी नाही, तो भक्तच नाही अशी ज्याची समजूत आहे; त्याने गीतेतील या श्लोकाकडे लक्ष पुरविले तर बरे होईल. भक्ताला ब्रह्मज्ञान देण्याचे माहात्म्य श्रीएकनाथमहाराजांनीही मुक्त कंठाने गायिले आहे. एकनाथी भागवतातील २९व्या अध्यायातील २६व्या श्लोकावरील श्रीएकनाथमहाराजांचे विवरण या दृष्टीने अभ्यासण्यासारखे आहे. त्यातील एक ओवी अशी – ''जो ब्रह्मज्ञान दे माझिया भक्ता । तयाहून आणिक परता । मज आन नाही गा पढियंता । जाण तत्त्वता उद्धवा ।।'' या ओवीवरील गीतावचनाचा प्रभाव सहजपणे लक्षात येण्यासारखा आहे. तात्पर्य, भक्ताच्या ठिकाणीही शास्त्रज्ञान असणे आवश्यक आहे आणि असे ज्ञान भक्तांना देणारा भगवंताला अधिक प्रिय असतो असे स्वत: भगवंतच सांगतात.

जाता जाता एक गोष्ट मात्र येथे लक्षात ठेवली पाहिजे की, शास्त्रज्ञान वा तत्त्वज्ञान म्हणजे प्रक्रियांचे वा परिभाषांचे जंजाळ नव्हे. एक प्रक्रिया मान्य करणाऱ्या सांप्रदायिकांनी दुसरी प्रक्रिया कशी सदोष आहे हे सिद्ध करण्याकरिता केलेला तर्कवाद म्हणजेही शास्त्र नव्हे. सर्व प्रक्रिया आणि त्यात वापरलेल्या परिभाषा या मूळ सिद्धांताच्या ज्ञानासाठी शाखा-चंद्रन्यायाने उपयोगी पडतात. तत्त्वाची ओळख पटवून देण्याच्या दृष्टीने त्यांचा उपयोग फारच थोडा असतो. पण तर्ककुशल अशा विद्वानांनी आपल्या बुद्धिमत्तेचे सर्व कौशल्य प्रक्रियांना श्रेष्ठ वा कनिष्ठ ठरविण्यासाठीच वापरले आहे. आणि त्यासाठी अत्यंत कठीण असलेली न्यायघटित भाषा जी पारिभाषिक शब्दांच्या प्रयोगाने अधिकच अवजड झालेली असते ती हत्यारासारखी वापरली आहे. एकवेळ मूळ भाष्य समजून घेणे सोपे जाते पण त्यावरील टीका-उपटीका समजून घेण्याच्या प्रयत्नास लागले की मधूनमधून काटेरी वृक्षाची विपुलता असलेल्या घनदाट अरण्यात शिरून वाट सापडली नाही म्हणजे होते तसे वाटते. विद्वत्ता-संपादनासाठी, बुद्धीच्या तीक्ष्णतेची कसोटी लागण्यासाठी या सर्वांचा उपयोग होत असेलही पण जिज्ञासू साधकाच्या दृष्टीने या प्रक्रियाच विशेष उपयोगी पडतात असे काही म्हणता येणार नाही. म्हणूनच संतमंडळी

तत्त्वज्ञान सांगतात, वेदांत शास्त्राचाही उपदेशासाठी अवलंब करतात, पण प्रक्रिया आणि परिभाषा यापासून बहुतेक दूर राहतात. साध्या भाषेचा अवलंब करणे त्यांना पुरेसे वाटते. असो.

स्वत:ला अवगत झालेले शास्त्र दुसऱ्याला शिकविताना त्यांतील बारकावे शिकविणाऱ्याच्याही लक्षात येतात आणि त्याच्या ज्ञानाची खोली वाढत जाते. अनुभव घेण्याच्या दृष्टीने, साक्षात्काराच्या दृष्टीने ज्ञानाचा हा सखोलपणा उपयोगी पडतो. यामुळेच भगवंतानी माझ्या भक्ताला जो गीता शिकवितो, त्याला श्रेष्ठ अशा पराभक्तीचा लाभ होतो असे म्हटले आहे. पराभक्ती ही साधनभक्ती नाही, ती साध्य आहे. अर्थातच असा पराभक्तीने संपन्न पुरुष भगवंताला प्रियतम असावा हे स्वाभाविकच आहे.

या वरील दोन श्लोकात गीतेच्या स्वाध्याय-प्रवचनाचे फल सांगितले. त्याआधीच्या सदुसष्टाव्या श्लोकात संप्रदायाची मर्यादाही स्पष्ट केली. आता जो केवळ स्वाध्याय करतो त्याला कोणता लाभ होतो ते भगवान् सांगतात -

**अध्येष्यते च य इमं धर्म्यं संवादमावयो: ।**
**ज्ञानयज्ञेन तेनाहमिष्ट: स्यामिती मे मति: ।।७०।।**

अर्जुना ! आपला हा धर्माला धरून असणारा (धर्माच्या प्रतिष्ठापनेसाठी असणारा) संवाद, याचे जो अध्ययन करतो, त्यानेही ज्ञानरूपी यज्ञाने माझे पूजन केले आहे असे मी समजतो.

दुसऱ्याला शिकविता येण्याचे कौशल्य बुद्धिमत्ता आणि ज्ञान सर्वांच्याच ठिकाणी असते असे नाही. ''आपण तरोनि जन तारी । ही ज्ञानाची अगाध थोरी।।'' हे खरेच आहे. पण लोकांचा उद्धार करता आला नाही तरी ज्ञान संपादून स्वत: उद्धरून जाणे याचेही महत्त्व काही थोडे नाही. गीतेचे अध्ययन हे आत्मोद्धाराच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त असे आहे. कारण गीता हे श्रीकृष्णार्जुनांच्या संवादाच्या रूपाने प्रगट झालेले, ऐहिक आणि पारलौकिक कल्याण साधून देणारे धर्मशास्त्र आहे. भगवान् श्रीशंकराचार्य आपल्या भाष्याच्या आरंभी गीतेचे हे स्वरूप स्पष्ट करून सांगतात.

''द्विविधोहि वेदोक्तो धर्म: प्रवृत्तिलक्षण: निवृत्तिलक्षणश्च—प्राणिनां साक्षात् अभ्युदय निश्रेयस हेतु:—भगवान्—भूतानुजिघृक्षया वैदिकं हि

धर्मद्वयम् अर्जुनाय—उपदिदेश गुणाधिकैर्हि गृहीत: अनुष्ठीयमान: च धर्म: प्रचयन् गमिष्यति इति । तं धर्मं भगवता यथोपदिष्टं वेदव्यास: सर्वज्ञो भगवान् गीताख्यै: सप्तभि: श्लोकशतै: उपनिबबन्ध ।''

वेदांनी सांगितलेला धर्म दोन प्रकारचा आहे. एक प्रवृत्ती स्वरूपाचा आहे, दुसरा निवृत्ती स्वरूपाचा आहे. हा प्राणिमात्रांच्या ऐहिक आणि पारलौकिक कल्याणासाठी प्रत्यक्षपणे कारणीभूत होणारा आहे. हा द्विविध धर्म भगवंतांनी भूतमात्रावर अनुग्रह करण्यासाठी अर्जुनाला उपदेशिला. कारण गुणवान् अशा श्रेष्ठ पुरुषांनी ज्याचा स्वीकार केला आणि जो आचरणात आणला तो धर्म महत्त्व पावतो. अर्थातच लोकांना स्वीकारार्ह वाटतो. अनुकरणीय वाटतो. अर्जुनाला भगवंताने उपदेशिलेला तोच धर्म सर्वज्ञ अशा वेदव्यासांनी सातशे श्लोकांच्या गीतेमध्ये जसाच्या तसा संग्रहित करून लोकांपुढे ठेवला.

भगवान् गीतारूप संवादाला धर्म्य का म्हणतात ते यावरून लक्षात येईल. तसेच या धर्म्य शब्दावरून गीता ही केवळ पारलौकिक कल्याणासाठी, मोक्षसुखासाठी उपयुक्त आहे, ती केवळ संसाराला विटलेल्या निवृत्तिमार्गी लोकांच्या कामाची आहे असा जो अपसमज निष्कारण पसरला आहे तोही दूर होईल. पक्ष्याला जसे दोन पंख असतात, माणसाला जसे दोन पाय असतात, दोन हात असतात, तसा वैदिक धर्मही दोन अंगांचा आहे. एक अंग प्रवृत्तीचे आहे, दुसरे अंग निवृत्तीचे आहे. प्रवृत्तीने अभ्युदय साधतो, म्हणजे इहलोकातील, भौतिक सृष्टीतील कल्याणाचा लाभ होतो, तर निवृत्ती ही नि:श्रेयसासाठी, परलोकासाठी, मोक्षसुखासाठी उपयोगी पडते. पक्षी एका पंखाने उडू शकत नाही. एका हाताचा वा एका पायाचा मनुष्य अपंग ठरतो. कार्यक्षमतेत उणा ठरतो. खरे तर प्रवृत्ती आणि निवृत्ती यांचे स्वरूप जागृती आणि गाढ निद्रा यांच्यासारखे परस्परांना उपकारक आहे. आणि गीतेमधे या दोन्ही अंगांनी युक्त असा धर्म सांगितला आहे. हे ''वैदिकं धर्मद्वयं अर्जुनाय उपदिदेश'' या श्रीमद् आचार्यांच्या वचनावरून स्पष्ट होते. निवृत्तिमार्गी म्हणून बोभाटा असलेले शंकराचार्य हे सांगत आहेत हे महत्त्वाचे आहे.

गीतेचे स्वरूप असे असल्याने ती केवळ म्हाताऱ्या–कोताऱ्यांसाठी आहे असे समजणे अत्यंत चूक आहे. ज्याला परलोकाचा विचार करायचा नाही वा परलोकावर ज्याची श्रद्धा नाही, ज्याला केवळ इहलोकातील कल्याणच

अपेक्षित आहे, त्यानेही गीतेचा अभ्यास करणे आवश्यक आहे. गीता ही मुळातच ज्याला रणांगण जिंकायचे आहे, त्याच्यासाठी सांगितली आहे. जीवनातून निवृत्त झालेल्या वृद्धांसाठी ती सांगितलेलीच नाही. जो तरुण आहे, ज्याच्यापुढे त्याचे संपूर्ण भावी जीवन उभे आहे, जे स्वभावत:च संघर्षमय आहे, त्यासाठी लढावे लागणार आहे, अशा तरुणाच्या पाठीचा कणा ताठ-बळकट असावयास हवा, हृदयात धैर्य हवे, मनगटात बळ हवे, बुद्धी स्थिर हवी, भूतकालाची स्मृती हवी, भविष्याचा वेध घेणारी दृष्टी हवी, कोणत्या वेळी कोठे कसे वागावे याचा नेमका निर्णय घेण्याचा विवेक हवा. असे असेल तरच अभ्युदय म्हणजे इहलोकीचे कल्याण साधता येते. या दृष्टीनेही गीता हे अत्यंत उपयोगी पडणारे शास्त्र आहे. म्हणून तरुणांनी संसारात पडण्यापूर्वी गीतेचे अध्ययन व्यवस्थित रीतीने केलेले असले पाहिजे.

भगवान् इथे अध्येष्यते म्हणतात- गीतेचे अध्ययन करावे, अभ्यास करावा असा आदेश देतात. गीता नुसती वाचावी म्हणत नाहीत. ज्याचे संस्कृत थोडे बरे आहे, त्याला गीता सहज समजू शकेल. गीता जाणून घेण्यास उपयोगी पडणारे अनेक ग्रंथ उपलब्ध आहेत. तरुणांच्या दृष्टीने तर लो. टिळकांच्या गीतारहस्यासारखा उपयुक्त ग्रंथ दुसरा नाही. मात्र गीता काय किंवा गीतारहस्य काय किंवा अत्यंत रसाळ भाषेत लिहिलेला ज्ञानेश्वरीसारखा गीतेवरील अप्रतिम ग्रंथ काय, एकदा वाचून पुरे होणारे हे प्रकरण नाही. त्यांचा प्रयत्नपूर्वक अभ्यासच केला पाहिजे. ज्याचे वाचन उथळ ललित वाङ्मयाच्या पलीकडे कधी जात नाही, त्याला गीतारहस्य क्लिष्ट वाटणारच. गीता-ज्ञानेश्वरी त्याच्या डोक्यावरून जाणार. म्हणून भगवान् 'अध्येष्यते' म्हणतात. समजेपर्यंत पुन: पुन्हा वाचणे म्हणजे अभ्यास करणे. आरंभी आरंभी कंटाळा येणे शक्य आहे. पण त्यावर प्रयत्नाने मात केली पाहिजे. विशी-पंचविशीत बुद्धीची समज चांगली असते. अशा स्थितीत विषय समजत नसेल तर अभ्यासात, प्रयत्नात, सातत्यात, साक्षेपात उणीव पडते असे समजले पाहिजे. गीतेचा अभ्यास हा ज्ञानयज्ञ आहे असे भगवंत म्हणतात ते त्यासाठी करावे लागणारे परिश्रम लक्षात घेऊनच म्हणतात, हे जाणून घेतले पाहिजे. या यज्ञाला बाह्य साधनसामग्री लागत नाही किंवा पुष्कळ धनही वेचावे लागत नाही. इतर अनेकांच्या नाना प्रकारच्या सहाय्याचीही येथे अपेक्षा नसते, पण अभ्यासरूपी परिश्रम तर करावे

लागतातच. असे परिश्रम जो घेतो, गीतेचे अध्ययन जो करतो त्याला केवळ तेवढ्यानेही भगवंताचे यथासांग पूजन केल्याचे श्रेय लाभते.

भगवान् दयाळू आहेत. अधिकारातही प्रतवारी असते. त्यातील कोणाचीही वंचना होऊ नये असे वाटणारी करुणा त्यांच्या अंत:करणात आहे. तेव्हा ज्याला गीतेचे अध्ययन करणे शक्य नाही, त्याची सोय काय ते भगवान् पुढील श्लोकात सांगत आहेत.

**श्रद्धावाननसूयश्च श्रृणुयादपि यो नरः ।**
**सोऽपि मुक्तः शुभाँल्लोकान्प्राप्नुयात्पुण्यकर्मणाम् ।।७१।।**

जो श्रद्धायुक्त आहे, ज्याच्या अंत:करणात असूया नाही असा मनुष्य जरी गीतेचे केवळ श्रवण करील तरी त्यामुळे तो (पापातून) मुक्त होईल. आणि त्याला पुण्यकृत्ये करणाऱ्या व्यक्तींचे शुभ लोक प्राप्त होतील.

भगवान् वात्सल्याने, दयाबुद्धीने केवळ श्रवणाचेही माहात्म्य सांगत आहेत. पण हे श्रवणही अगदी सामान्याचे नाही, अगदी साधे नाही. ज्याच्या अंत:करणात असूया नाही म्हणजे जो निरहंकारी आहे, विनयी आहे, नम्र आहे, ज्याच्या अंत:करणात ईश्वराविषयी, गीतेविषयी आदर आहे, निंदा करण्याची ज्याची प्रवृत्ती नाही तो अनसूय आणि श्रद्धावान म्हणजे गीतेच्या थोरवीविषयी ज्याला शंका नाही, गीतेच्या पावित्र्यावर ज्याचा विश्वास आहे, भगवंताच्या मुखातून निघालेले गीतेचे शब्द आपणांस उद्धरून नेण्यास समर्थ आहेत, असा भरवसा ज्याला वाटतो, गीता ही कल्याणमय आहे अशा निर्णयाला जो आला आहे, तो. अशा व्यक्तीचे ऐकणे हे नुसते ऐकणे राहतच नाही. चिखलातून वर येऊन कमळाच्या कळीने सूर्याचे दर्शन घ्यावे तशी त्याची स्थिती होते. सूर्यकिरणांचा स्पर्श होताच कळी उमलते. पाकळ्या विकसित होतात. अबोध कोशाचे रूपांतर प्रफुल्ल कमलात होते. पाकळी-पाकळीतून सौंदर्य ओसंडते, सुगंध दरवळतो. आतले पराग मधाने ओथंबतात. निरहंकारी श्रद्धावंत जेव्हा गीतेसारख्या पवित्र ग्रंथाचे श्रवण करतो तेव्हा त्याचेही अंत:करण सद्वासना-सन्नीतीने युक्त होते. आणि त्याचा परिणाम सदाचाराच्या रूपाने त्याच्या वर्तनातून व्यक्त होत राहतो. अर्थात् अशा व्यक्तींची पापातून सुटका होईल आणि तिला पुण्यलोक मिळतील हे म्हणण्यात आश्चर्यकारक काहीच नाही.

कळीचे कमळ होईल म्हणण्यासारखेच हे आहे.

गीता ही भगवंताची वाङ्मयमूर्ती आहे, असे श्रीज्ञानोबाराय म्हणतात. तेव्हा कोणत्याहि रूपाने त्या मूर्तीचे सान्निध्य लाभणे, तिच्याशी संपर्क साधणे हे कल्याणप्रदच असणार. देवाचे जसे दर्शन तसे गीतेचे श्रवण. त्याने पुण्याचा लाभ होणारच. गाभाऱ्यात प्रवेश करून, देवतेच्या चरणावर मस्तक ठेवून मिठी मारण्याचे भाग्य लाभले तर उत्तमच, पण शिखराचे दर्शन घेऊन मंदिराभोवती प्रदक्षिणा करता आली तरी तेही लाभदायक असते, असे शास्त्र सांगते.

मला कधीकधी वाटते-भगवान् उदार आहेत, कनवाळू आहेत, मग त्यांनी ही श्रद्धावंत असण्याची, असूयारहित असण्याची अट घातली नसती, तर अधिक बरे झाले असते. आमच्यासारख्या अधिक लोकांची सोय त्यामुळे झाली असती.

संत भगवंतापेक्षा उदार असतात याचा प्रत्यय ज्ञानेश्वरीत येतो. ज्ञानेश्वरीत पाच श्रोते आहेत. पहिला अर्जुन, दुसरा संजय, तिसरे निवृत्तिनाथ, चौथे सज्जन-भाविक-अधिकारी श्रोते आणि पाचवा धृतराष्ट्र. यात धृतराष्ट्राला गीताश्रवणाविषयी काहीहि श्रद्धा नाही. संजय थोडे विस्ताराने सांगू लागताच तो त्याला तुला हे कुणी विचारले आहे असे म्हणून झिडकारतो. संजयासारखा त्याचा सेवकही त्याला ''हा वरून जसा आंधळा तसा आतूनही आंधळाच'' असे मनातल्या मनात म्हणतो. पाण्यात बसलेला रेडा जसा मख्खपणे बसून राहिलेला असतो तसा गीता ऐकताना धृतराष्ट्रही मख्ख असतो. पण श्रीज्ञानोबारायांना धृतराष्ट्रासारख्या अनधिकारी श्रोत्याचीही दया आली. आणि ते केवळ मातेच्याच ह्रदयात असणाऱ्या वात्सल्यभरित औदार्याने म्हणाले - ''तैसी हरिवक्त्रीची अक्षरे । संजये सांगितली आदरे । तीहि अंधु तोहि अवसरे । सुखिया जाला ।।'' (ज्ञाने. १५/५९२) आपण या वचनाच्या आधारे मिळालेल्या पडत्या फळाची आज्ञा घेऊन श्रद्धा असो वा नसो संधी मिळेल तेव्हा गीतेचे श्रवण-पठण यथाशक्ती करीत जाऊ. ''स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ।'' (गीता २/४०) आणि ''न हि कल्याणकृत् कश्चित् दुर्गतिं तात गच्छति ।।'' (गीता ६/४०) या गीतावचनांप्रमाणे काही ना काही पदरात पडेलच. भगवान् सदुसष्टाव्या श्लोकात फारच कठोरपणे नियम सांगत आहेत. तो आदर्श आहे, आपणांस परवडणारा नाही. ७१व्या श्लोकात

भगवान् बरेच सौम्यपणाने बोलत आहेत. तेही तसे अवघडच आहे. पण त्या दृष्टीने थोडाबहुत तरी प्रयत्न करणे आपल्याला शक्य आहे. या पाच श्लोकांत भगवंतांनी एक प्रकारे गीताध्ययनाचा संप्रदाय सांगून गीताशास्त्राचा समारोप केला आहे. आणि एवढ्या या उपदेशाची अपेक्षित परिणती सर्वांच्या दृष्टीने प्रगट व्हावी म्हणून अर्जुनाला आता निक्षून विचारीत आहेत. भगवान् श्रीकृष्ण म्हणतात –

**कच्चिदेतच्छ्रुतं पार्थ त्वयैकाग्रेण चेतसा ।**
**कच्चिदज्ञानसंमोहः प्रनष्टस्ते धनंजय ।।७२।।**

अर्जुना ! हे सगळे तू मन एकाग्र करून ऐकलेस ना? अज्ञानामुळे उत्पन्न झालेला तुझा संमोह पूर्णपणे नाहीसा झाला ना?

ऐकण्याचा उपयोग, ते श्रवण एकाग्र मनाने आणि सावधपणाने केले तरच होण्यासारखा असतो. अर्जुनाच्या ठिकाणी निर्माण झालेला संभ्रम हा फार गंभीर होता आणि त्यासाठीच भगवंताला अनेक रीतीने तो दूर करण्याचा प्रयत्न करावा लागला. ही सर्व चर्चा कारणी लागायची तर त्या सर्व वेळी अर्जुनाचे मन शांत, सावध आणि एकचित्त असणे आवश्यक होते. तसे ते होते की नाही आणि त्याचा योग्य तो परिणाम होऊन मोह दूर झाला की नाही ते भगवान् स्पष्टपणे प्रश्न करून जाणून घेऊ इच्छित आहेत.

अनेक महत्त्वाच्या गोष्टी इतक्या गंभीर स्वरूपाच्या असतात की केले असेल, झाले असेल अशा गृहीत कृत्यावर अवलंबून ठेवता येत नाहीत. त्या नीट तावून– सुलाखून स्पष्ट करून घ्याव्या लागतात. एवढा विश्वास ठेवलाच पाहिजे असे विचारणाराने म्हणू नये आणि ज्याला विचारले त्याने एवढाही विश्वास नसावा का असे वाटू देऊ नये. व्यवहारातही जितके मोकळे आणि स्पष्ट असेल तितके वागणे–बोलणे परिणामी हितकरच ठरते.

श्रीज्ञानेश्वरमहाराजांसारख्या महापुरुषाने मात्र या प्रश्नाच्या हेतूला एक सुंदर कलाटणी दिली आहे. ती त्यांच्या अलौकिक दिव्य अशा प्रतिभेची निदर्शकहि आहे. पारमार्थिक व्यवहार प्रगट करण्याच्या दृष्टीने चांगली आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात – आपल्या सांगण्याचा परिणाम काय झाला असेल हे त्या सर्वज्ञाला कळले नसेल असे होणे शक्यच नाही. कृष्णाने प्रश्न

विचारला, 'पार्था', 'धनंजया' असे अर्जुनाला उद्देशून दोनदा संबोधिले, यात अर्जुनाला पुन्हा देहभावावर आणावे हा उद्देश होता. कारण अर्जुन ब्रह्मभावात विरघळून गेला होता. त्याचे ठिकाणी आपलेपणाची स्वतंत्र जाणीव मुळीच उरली नव्हती. अशी ही एकरूपता पुढील कार्याच्या दृष्टीने सोयीची नव्हती. ती अडचणीत आणणारीच ठरली असती. म्हणून ब्रह्मभावात विलीन होत असलेला अर्जुनाचा अर्जुनपणा भगवंताने त्याला हाक मारून जागा केला. त्याला अर्जुनपणाने पुन्हा उभे केले. ''पूर्ण ब्रह्म जाला पार्थु । तरी पुढील साधावया कार्यार्थु । मर्यादा श्रीकृष्णनाथु । उल्लंघो नेदी ।।'' (ज्ञाने. १८/१५४७) पुढे घनघोर युद्ध करायचे होते. त्यासाठी तेजस्वी क्षात्रपणानिशी, धैर्याने, ठामपणे उभे राहणे अत्यंत आवश्यक होते. त्याच्या मीपणाचा लोप या वेळी परवडणारा नव्हता. यामुळे प्रश्न विचारण्याच्या मिषाने श्रीकृष्णाने अर्जुनाला अद्वैतातून द्वैत भावनेवर आणून उभे केले.

जोवर देह धारण केलेला असतो तोवर अद्वैत हे कृतीत उतरणे शक्यही नसते आणि इष्टही नसते. यासाठीच भगवान् शंकराचार्यांनी ''भावाद्वैतं सदा कुर्यात् क्रियाद्वैतं न कर्हिचित् । अद्वैतं त्रिषु लोकेषु नाद्वैतं गुरुणा सह ।।'' असे म्हटले आहे. अद्वैत भावनेत असावे. क्रियेमध्ये कधी अद्वैत येत नाही. क्रिया म्हटले की तेथे द्वैत असतेच, असावेच लागते. तसे शिष्याने स्वत:ची योग्यता कितीही वाढली असली तरी गुरूसवे अद्वैताचे समान नाते कृतीत तर नाहीच, पण भावनेतही कल्पू नये, इतर सर्वत्र अद्वैताची भावना असावी. श्रीज्ञानेश्वरमहाराज ''पुढील कार्यार्थु साधावया'' अर्जुनाला द्वैतभावावर आणले म्हणतात, ते या दृष्टीनेही महत्त्वाचे आहे.

भगवंतांनी असे विचारताच अर्जुन अत्यंत नम्रपणाने पण चटकन् म्हणाला की –

**अर्जुन उवाच**

**नष्टो मोहः स्मृतिर्लब्धा त्वप्रसादान्मयाच्युत ।**
**स्थितोऽस्मि गतसन्देहः करिष्ये वचनं तव ।।७३।।**

माझा मोह नष्ट झाला आहे. मला स्मृती लाभली आहे. श्रीकृष्णा ! हे जे घडले ते तुझ्या कृपाप्रसादाने घडले याची मला जाणीव आहे. मी पूर्ण नि:संदेह

झालो आहे. आता तुझ्या आज्ञेप्रमाणे मी वागणार आहे.

आपला मोह गेला असे अर्जुनाने गीतेमध्ये दोनदा म्हटले आहे. प्रथम म्हटले आहे ते अकराव्या अध्यायाच्या आरंभी. तेथे तो म्हणतो – ''मदनुग्रहाय परमं गुह्यमध्यात्मसंज्ञितम् । यत्त्वयोक्तं वचस्तेन मोहोऽयं विगतो मम ।।'' माझ्यावर अनुग्रह करण्याकरिता तू जे गहन, श्रेष्ठ असे अध्यात्मतत्त्व उपदेशिलेस त्याने माझा मोह गेला आहे.

मोह गेला असे दोन ठिकाणी म्हटले आहे. तेव्हा त्याच्या अर्थात काहीतरी अंतर असले पाहिजे असे गृहीत धरावे लागते. दोन्ही ठिकाणच्या वाक्यरचनेतही भिन्नता आहे. अकराव्या अध्यायातील श्लोकात अनुग्रहाचा उल्लेख आहे. अनुग्रह म्हणजेही कृपाप्रसादच. पण तेथे जो अनुग्रह आहे, तो तत्त्वज्ञान सांगण्याचा आहे. अठराव्या अध्यायातील कृपाप्रसादाचा उल्लेख मोह नष्ट होण्याच्या संदर्भातील आहे. यावरून पहिला संदर्भ स्थूल-सूक्ष्म देहाला उद्देशून असावा आणि दुसरा संदर्भ कारणदेहाला उद्देशून असावा असे वाटते. हा विषय फार किचकट आहे आणि तेवढ्या खोल जाण्याचे आपणांस कारण नाही. तरीपण समजून घेण्याच्या दृष्टीने अहंकाराचे दोन थर असतात हे आपण लक्षात घेतले पाहिजे. याचा काहीसा विचार आपण पूर्वी केला आहे. एक अहंकार अपरा प्रकृतीशी संबद्ध असतो, दुसरा परा प्रकृतीशी जोडलेला राहतो. पहिला स्थूल-सूक्ष्म आहे. दुसरा सूक्ष्म-सूक्ष्मतर आहे. एका उदाहरणाने आपण हे समजून घेण्याचा प्रयत्न करू या.

आपण जे अन्न खातो ते एकदा धुऊन, निवडून, स्वच्छ करून, शिजवून घेतलेले असते. ही क्रिया बाह्य आहे आणि तिच्यावर आपले नियंत्रण राहू शकते. धान्य निवडून, पाखडून, खडे-कचरा काढून धुऊन घ्यावे लागते, तर भाज्यांच्या साली, शिरा, देठ यांना वेगळे करून टाकावे लागते. मग शिजवण्याची क्रिया योग्य रीतीने करावी लागते. खाद्यपदार्थ असे निवडून, स्वच्छ करून घेणे ही सुद्धा एक साधनाच आहे. त्यात चुका झाल्या म्हणजे घासागणिक खडे लागतात किंवा कितीही चावले तरी चोथा तोंडात राहतो. हे असे न होणे पुष्कळसे आपल्या स्वाधीनचे आहे. त्यासाठीही ज्ञान, कौशल्य असावेच लागते. दक्षता घ्यावी लागते. पण ही गोष्ट आपल्या स्वाधीनची आहे.

शिजवलेल्या अन्नाचे सेवन केले म्हणजे अन्नाच्या निवडीची दुसरी

प्रक्रिया सुरू होते. ही दुसरी निवड पचनशक्तीवर अवलंबून आहे आणि यासाठी आरोग्य चांगले असावे लागते. तसे नसेल तर मनुष्य हतबल होतो. व्याधींनी पीडिला जातो. दुसऱ्या थरातील सूक्ष्म अहंकार काढून टाकणे असेच आपल्या शक्तीबाहेरचे काम असते. या अहंकाराच्या आणि तज्जन्य विकाराच्या नाशासाठी परमेश्वराची प्रार्थना करणे आणि त्याची कृपा संपादन करणे एवढा एकच मार्ग उपलब्ध आहे. अगदी उपनिषद्कालीन प्राचीन ऋषींनीही असेच म्हटले आहे. आत्मा ज्याच्यावर कृपा करतो त्यालाच आत्मज्ञान होते असे त्यांनी म्हटले आहे. तसेच सत्य सोन्याच्या झाकणाने झाकलेले राहते. भगवन् ते झाकण दूर करा आणि आम्हांला सत्याचे दर्शन घडवा, अशी प्रार्थना द्रष्टे ऋषिही करतात. याच पद्धतीने अर्जुनही म्हणतो की, तुमच्या प्रसादाने माझा मोह गेला आहे. तुमचा प्रसाद लाभला नसता तर एरवी तो सुखासुखी गेला नसता. म्हणून या मोहाचे स्वरूप अकराव्या अध्यायात आलेल्या मोहापेक्षा सूक्ष्म आहे असे मला वाटते ते मी आपणांस सांगितले.

अर्जुन म्हणतो – भगवान् ! तुझ्या प्रसादाने माझा मोह नाहीसा झाला आहे. माझी स्मृती पूर्ण जागृत झाली आहे. मी कोण आहे, कसा आहे, का आहे, ते आता मला पूर्णपणे उमजले आहे. त्यामुळे मी अगदी नि:संदेह झालो आहे. कोणतीही शंका, कसलाही संशय, कुठलीही चंचलता आता माझ्या अंत:करणात नाही. ज्याच्यामुळे कर्तव्याकर्तव्याचा निर्णय घेणे कठीण झाले होते, असा संभ्रम माझ्या चित्तातून अगदी नि:शेषपणे नाहीसा झाला आहे. चांगले किंवा वाईट हे हिताहिताच्या कसोटीवर घासून ठरवायचे असते, कर्तव्याची योग्यायोग्यता साध्य, उद्दिष्ट वा हेतू यांच्या स्वरूपावरूनच ठरते, हे मला आता नीटपणे उजाडले आहे. वरून जो धर्म वाटतो तो तसा नसून तो अधर्म असतो; तर वरवर पाहता जो अधर्म आहे असे वाटते, त्यानेच खरे धर्माचरण घडत असते; हे कळण्याचे सामर्थ्य आता माझ्या बुद्धीला प्राप्त झाले आहे. आणि हे सर्व ज्ञान आता मला केवळ कळलेले नसून वळलेले आहे हे मी कृतीवरून सिद्ध करून दाखवीन. जे ऐकले, जे समजले ते आचरणात आणीन. म्हणून प्रतिज्ञेने सांगतो की, ''करिष्ये वचनं तव'' तू जसे सांगितलेस तसा मी वागेन. तुझ्या आज्ञेचे पालन पूर्णपणे करीन.

श्रवणाचे फल काय असावे, जे ऐकले त्याचा परिणाम कसा घडावा हे

अर्जुनाच्या या श्लोकातील उद्गारातून उत्तम रीतीने प्रगट झाले आहे. ''नळी फुंकिली सोनारे । इकडून तिकडे गेले वारे ।।'' तसे हे झालेले नाही. चांगला पदार्थ सांडीविखुरी गेला नाही. चांगली सुपीक जमीन आहे, योग्य ते परिश्रम घेतले आहेत, पाऊस अनुकूल तसा पडलेला आहे, काळाने साथ दिली आहे, मग पीक सोळा आणे यावे तसे येथे घडलेले आहे. श्रेष्ठ रत्नाला कौशल्याने पैलू पाडावेत म्हणजे ते जसे तेजस्वीपणाने उठून दिसते तसे येथे घडले आहे. वक्ता अत्यंत श्रेष्ठ आहे. श्रोता उत्तम अधिकारी आहे. आता त्या संवादाची परिणती दिव्योदात्तपणे प्रगट होणारच. तेच येथे घडले आहे. त्यामुळेच भाग्याने गीतेच्या श्रवणाचा अनायासे लाभ झालेला संजय आनंदाने उचंबळून आला आहे. आणि तो मोठ्या उल्हासाने धृतराष्ट्राला म्हणतो –

**संजय उवाच**

**इत्यहं वासुदेवस्य पार्थस्य च महात्मनः ।**
**संवादमिममश्रौषमद्भुतं रोमहर्षणम् ।।७४।।**
**व्यासप्रसादाच्छ्रुतवानेतद्गुह्यमहं परम् ।**
**योगं योगेश्वरात्कृष्णात्साक्षात्कथयतः स्वयम् ।।७५।।**

संजय म्हणाला – अशा रीतीने भगवान् श्रीकृष्ण आणि महात्मा अर्जुन यांचा, अंगावर आनंदाने रोमांच उभे करणारा अद्भुत संवाद मी ऐकला. व्यासमहर्षींच्या कृपेमुळे प्रत्यक्ष योगेश्वर श्रीकृष्ण सांगत असतानाच अत्यंत गहन, श्रेष्ठ असे हे गीतारूप योगशास्त्र मला ऐकावयास मिळाले.

संजय हा धृतराष्ट्राचा सारथी. व्यासमहर्षींनी धृतराष्ट्राच्या सोयीसाठी आपला शिष्य असलेल्या या संजयाला दिव्यदृष्टी दिली. या दिव्यदृष्टीच्या प्रभावानेच त्याला हस्तिनापुरातील बसल्या स्थानावरून कुरूक्षेत्राच्या रणभूमीवर घडणाऱ्या सर्व घटना प्रत्यक्ष पाहता आणि ऐकता येत होत्या.

गीतेसारखे परमश्रेष्ठ तत्त्वज्ञान भगवान् श्रीकृष्ण स्वतः सांगत असताना त्यांच्या मुखातून अर्जुनाप्रमाणेच ते संजयलाही ऐकण्याचे भाग्य लाभले. त्यामुळे तो आनंदाने भारावून गेला आणि त्याने कृतज्ञतापूर्वक, व्यासमहर्षींनी केलेल्या कृपाप्रसादाचा अत्यादराने उल्लेख केला.

गीतेला योगशास्त्र म्हणण्याची पद्धती आहे. ते ब्रह्मविद्यांतर्गत योगशास्त्र आहे असे म्हटले जाते. कारण स्वत: संजयच गीतेला परमगुह्य, साक्षात् योगेश्वराने सांगितलेला योग अशी विशेषणे देतो. त्यामुळेच अर्जुनाप्रमाणे तोही गीता ऐकताना भारावून जातो आणि गीता संपताच आनंदाने उचंबळून येऊन सांगतो की राजा, श्रीकृष्ण आणि अर्जुन यांच्यासारख्या अत्यंत थोर पुरुषांच्यामध्ये झालेला संवाद मी त्यांच्याच मुखातून ऐकला. अगदी प्रत्यक्ष ऐकला. हे माझे केवढे भाग्य! अनेक विषयांना स्पर्श करणारे त्या संवादाचे स्वरूप मोठे अद्भुत होते. मानवाच्या हितासाठी जाणीवपूर्वक समजावून सांगितलेला कर्म, भक्ती, ज्ञान, योग या चारही साधनांचा समन्वय मोठा अपूर्व होता. मानवी जीवनाच्या ऐहिक आणि पारलौकिक प्रगतीसाठी, उन्नतीसाठी उपयोगी पडणारे असे दुसरे एखादे शास्त्र या पृथ्वीतलावर असेल असे मला वाटत नाही. श्रीकृष्णार्जुनांच्या संवादाची, गीतेची थोरवी ही असामान्य आहे. ते सर्व ऐकत असताना मला काय वाटत होते ते कसे सांगू? तत्त्वज्ञानाच्या थोरवीने ठासून भरलेल्या आणि तरीही अत्यंत प्रासादिक असलेल्या भगवंताच्या वाक्यावाक्यागणिक माझ्या अंत:करणात आनंद, समाधान, प्रसन्नता दाटून येत होती. उचंबळणाऱ्या या भावांच्या उत्कटतेने माझे अंग-अंग रोमांचित होत होते.

संजय पुढे म्हणतो -

**राजन् संस्मृत्य संस्मृत्य संवादमिममद्भुतम् ।**
**केशवार्जुनयो: पुण्यं हृष्यामि च मुहुर्मुहु: ।।७६।।**

धृतराष्ट्र महाराज ! कृष्ण आणि अर्जुन यांचा हा पुण्यमय अद्भुत संवाद मला वरचेवर आठवतो. पुन्हा पुन्हा आठवतो; आणि मी वरचेवर आनंदाने उचंबळून येतो.

गीतेच्या माहात्म्याने, ती सांगणाराच्या मुखातून प्रत्यक्ष ऐकावयास मिळाली या भाग्याने संजय विलक्षण भारावला आहे; आणि त्यामुळे त्या संवादाला तो पुन्हा पुन्हा अद्भुत हे विशेषण देऊन गौरवितो आहे. तसे तीन-तीनदा उच्चारूनही त्याचे समाधान होत नाही.

संजय हा मोठा चांगला श्रोता आहे. श्रीकृष्णार्जुनांचा संवाद ऐकत असताना तो किती रंगून जातो हे श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी अनेक ठिकाणी मनोवेधकपणाने

वर्णिले आहे. संजयाच्या ठिकाणी कसे अष्टसात्त्विक भाव दाटून येत असत, तो कसा प्रफुल्लित होत असे ते श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी रसाळपणे सांगितले आहे. ते सर्व वर्णन जणू श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी केलेले या श्लोकाचे स्पष्टीकरण आहे. तत्त्वज्ञान ऐकण्याची इच्छा असणारा श्रोता कसा असावा हे जणू त्या निमित्ताने श्रीज्ञानेश्वरमहाराज अप्रत्यक्षपणे व्यक्त करीत आहेत असे वाटते.

संजयाने जे तत्त्वज्ञान ऐकले आहे ते त्याला जड वाटले नाही, त्याच्या डोक्यावरूनही गेले नाही. ते त्याच्या मनात ठसले आहे. त्याला त्याची गोडी उत्पन्न झाली आहे. त्यामुळे तो ते एकदा ऐकून सोडून देत नाही; तर जे ऐकले त्याचे पुन्हा पुन्हा स्मरण करीत आहे, मनन करीत आहे, चिंतन करीत आहे.

प्रत्येक वेळी त्यातून त्याला नवीन नवीन अर्थाचा बोध होतो आहे. त्याच्याही अंत:करणात अनेक प्रश्न असतील, त्याचा उलगडा श्रीमद्भगवद्गीतेच्या श्रवणाच्या निमित्ताने आणि चिंतनाच्या माध्यमाने सहजपणे होत असेल. आणि त्यामुळे तो त्या प्रत्येक वेळी आनंदाने उचंबळून येत असेल. त्याचाच उल्लेख तो ''हृष्यामि च मुहुर्मुहु:'' या शब्दाने करतो आहे.

भगवान् श्रीकृष्ण यांच्या ईश्वरी स्वरूपाविषयी त्याला शंका नाही. म्हणून त्यांच्या मुखावाटे निघालेले शब्द हे अत्यंत पवित्र आहेत, अशी त्याची सार्थ धारणा आहे. त्यामुळे भागिरथी गंगेच्या प्रवाहात किंवा मानस सरोवराच्या पवित्र जलात परमश्रद्धेने अवगाहन करणाराला जसे वाटते तसेच गीता ऐकताना संजयालाही समाधान लाभत आहे. म्हणून तो गीतेला ''पुण्य'' असे विशेषण देतो.

प्रेमादराची अशी उत्कट भावना संजयाच्या अंत:करणात आहे. म्हणून पुन: पुन: होणाऱ्या स्मरणाचा त्याला आनंद आहे. सामान्य श्रोत्याप्रमाणे तेच तेच ऐकण्याचा त्याला उबग येत नाही, कंटाळा येत नाही. व्यासांसारख्या थोर महर्षींचे शिष्यत्व त्याने खरोखरीच सार्थकी लावले आहे.

गीतेच्या तत्त्वज्ञानाला संजय अद्भुत म्हणतो याचे एक कारण आहे. विशाल-व्यापक-गहन असे तत्त्वज्ञान एकत्रितपणे आणि इतक्या साध्या सरळ भाषेत पूर्वी कधी सांगितले गेले नव्हते. श्रेष्ठ तत्त्वज्ञानाचा हा प्रासादिक अवतार खरोखरीच अपूर्व आहे. म्हणूनच अद्भुत आहे. आधीच सोने मूल्यवान, ते चोख असावे, आणि त्यात त्याचा सुंदर अलंकार घडावा म्हणजे जसे होते

तसे गीतेचे स्वरूप आहे. गीतेची ही अद्भुतता खरोखरीच आश्चर्यकारक आहे. श्रद्धावंत, प्रामाणिक जिज्ञासूला त्यामुळेच गीता वाचताना, अवधानपूर्वक वाचताना पदोपदी सिद्धान्त रत्नांचा लाभ होत असतो. गीतेचे हे वैभव अद्भुत आहे.

संजय गीतेच्या श्रवणाने जसा प्रसन्न झाला आहे, तसा विश्वरूपाच्या दर्शनानेही अत्यंत भारावला आहे. म्हणून अकराव्या अध्यायात घडलेली घटना त्याला तितक्याच उत्कटतेने पुन्हा पुन्हा आठवते आहे. म्हणून तो म्हणतो की,

**तच्च संस्मृत्य संस्मृत्य रूपमत्यद्भुतं हरेः ।**
**विस्मयो मे महान् राजन् हृष्यामि च पुनः पुनः ।।७७।।**

महाराज ! श्रीहरीचे ते अत्यंत अद्भुत असे जे विश्वरूप मी पाहिले त्याचे मला पुन्हा पुन्हा स्मरण होते आहे. मला अत्यंत आश्चर्य वाटते आणि मी पुनः पुनः हर्षित होतो.

झालेल्या आनंदाचे पुन्हा पुन्हा त्याच त्याच शब्दात संजय मोठ्या उत्साहाने वर्णन करतो आहे. गीतेच्या अलौकिक तत्त्वज्ञानाने तो जसा प्रभावित झाला आहे, तसाच अत्यंत असामान्य असलेल्या विश्वरूपाच्या अति अद्भुत दर्शनाने झालेल्या आनंदाने तो फार फार भारावूनही गेला आहे. आवडती गोष्ट पुन्हा पुन्हा करावीशी वाटते. झालेल्या आनंदाचे पुन्हा पुन्हा स्मरण होते. ते स्मरण प्रत्येक वेळी अधिकाधिक प्रफुल्लित करते. आपल्या सामान्य संसारातही हा अनुभव अनेक वेळा येतो. संजयाला झालेले दर्शन तर अत्यंत दुर्मिळ होते. देवादिकांनाही ते दर्शन दुर्लभ होते. अत्युग्र तपश्चर्येच्या बळावर विश्वरूपाचे दर्शन होण्याची शक्यता नव्हती. श्रीकृष्णाचे अर्जुनावरचे प्रेम अलौकिक. अर्जुनाची निष्ठा असामान्य. तो परम भाग्यवंत, म्हणून श्रीकृष्णाने प्रसन्न होऊन त्याला आपले, इतरांना दुर्लभ असलेले, विश्वरूप दाखविले. ते पाहण्याची दिव्यदृष्टीही दिली. त्या दिव्य दर्शनाने अर्जुन आनंदला, तसा भयचकितही झाला. विश्वरूपाच्या सर्वंकष व्यापकतेचे तेज धैर्यवंतांचा मुकुटमणी असलेल्या त्या वीराग्रणीलाही सोसले नाही. दिव्यता, भव्यता, उदात्तता यांसाठी वापरली जाणारी सारी विशेषणे थिटी पडावीत. कल्पना आणून देण्यासाठी उच्चारलेले

सर्व शब्द तोटके ठरावेत असे त्या विश्वरूपाचे स्वरूप अद्भुत होते. परम अद्भुत होते. आश्चर्यानेही आश्चर्यचकित व्हावे, उन्नततेनेही नम्र व्हावे, विशालतेने संकोचावे, भव्यतेने वाकावे, भास्कराच्या प्रखरतेने निरांजनातील ज्योतीची सौम्यता स्वीकारावी, असे विश्वरूप आठवून भाग्यवंताहून भाग्यवंत ठरलेला संजय आनंदाने उचंबळून येत आहे. हे ऐकून, वाचून सुद्धा अंत:करण भरून येते. डोळ्यांमध्ये आनंदाश्रू दाटतात. अंगावर रोमांच फुलतात. नुसत्या ऐकणाराचे असे होते, तर ज्यांना त्या विश्वरूपाचा साक्षात्कार झाला आहे त्यांचे काय होत असेल ते कसे सांगणार? श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी गीतेवर भाष्य लिहीत असताना कृष्णार्जुनांच्या संवादातील रसरसता जिवंतपणा सामान्य वाचकाच्याही प्रत्ययास आणून दिला आहे. त्यातही त्यांचे अकराव्या अध्यायातील विश्वरूप दर्शनाचे वर्णन अधिकच प्रत्ययकारी आहे. मला तर असे निश्चयाने वाटते की अर्जुनासाठी झालेले विश्वरूप दर्शन श्रीसद्‌गुरू श्रीज्ञानोबारायांच्या पुढे पुन्हा जसेच्या तसे साकारले असले पाहिजे. या अपरोक्षानुभूतिमुळेच अकराव्या अध्यायातील त्यांच्या ओव्यांना विलक्षण उदात्तता आणि प्रत्ययकारिता आलेली आहे. विश्वरूपाच्या रूपाने अद्भुत त्यांच्यापुढे मूर्तिमंत प्रगट झालेले आहे. आणि त्याचा परिणाम म्हणून अध्यात्मज्ञानाचा शांतरस त्यांच्या हृदयात कोंदून राहिला आहे. आणि म्हणूनच, श्रीज्ञानेश्वर महाराज, शांत आणि अद्भुत हे रस येथे एकवटले आहेत असे म्हणू शकतात. एरवी अद्भुताची शांताशी हातमिळवणी होईलच कशी? अद्भुत एकतर भयचकित करील किंवा हर्षोत्फुल्ल बनवील. शांतरसामध्ये निरामयता आहे, प्रसन्नता आहे, आल्हादकता आहे, लीनता आहे. कोणत्याही भावाने उचंबळणे तेथे संभवत नाही. असे असताना, सहस्रावधि सूर्यांचा भास्वर असा दैदीप्यमान प्रकाश समोर अवतीर्ण झाला असताना लक्षावधी शरदऋतूतील पौर्णिमांची आह्लाददायक कौमुदी श्रीज्ञानेश्वरांच्या अंत:करणात भरून राहिली आहे. म्हणूनच ते शांत आणि अद्भुत रसांच्या संगमाचे वर्णन करतात. आणि आपल्या हृदयातील हा कोमल शांतरस त्या अद्भुत विश्वरूपाच्या चरणी प्रेमादराने समर्पित करतात. आणि म्हणतात – ‘भरोनि सद्भावाची अंजुली । मिया ओविया फुले मोकळी । अर्पिली अंघ्रियुगुली । विश्वरूपाच्या ।।’ (ज्ञाने. ११/७०८) स्थितप्रज्ञता, गुणातीतता, भूताठायी आत्मौपम्यता यांनीच जणू ज्यांचे शरीर घडले आहे

अशा श्रीज्ञानोबारायांसारख्या योगीश्वराच्या अंत:करणातील प्रेमादर ज्या विश्वरूपदर्शनाने आकर्षित केला त्याच्या दर्शनाच्या स्मरणाने संजय हर्षसुखाने उचंबळून येत असेल तर काहीच नवलाचे नाही.

नवलाचे आहे ते एकच की इतके सर्व घडत असताना, संजय आपल्या आनंदाचे वर्णन उल्हासाने करत असताना, धृतराष्ट्र हे सर्व मख्खपणाने ऐकत आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात – धृतराष्ट्र असा गाळीव श्रोता आहे, की त्याला संजयाच्या उल्हासाचा अर्थच कळत नाही. हे सर्व ऐकताना तो जणू उबगला आहे. आजच्या भाषेत सांगायचे तर बोअर झाला आहे. म्हणून तो धृतराष्ट्र संजयाला म्हणतो – ''संजया ! युद्धामध्ये कोणत्या कोणत्या घटना कशा कशा घडतील ते मला नीट स्पष्ट करून सांगावेस, यासाठी व्यासांनी तुला माझ्याजवळ बसविले आहे, तेव्हा ते सोडून तू हा आगाऊ उद्योग काय मांडला आहेस? अप्रासंगिकपणे का बोलतोस? या युद्धाचा परिणाम काय होणार आहे ते सांग. पांडवांपेक्षा आमचे सैन्य दीडपटीहून मोठे आहे. दुर्योधन, कर्ण यांच्यासारखे पराक्रमी पुरुष या युद्धात आपला प्रताप गाजविणार आहेत. तेव्हा सरशी आमचीच होणार असा मला विश्वास वाटतो. तुझे भविष्य काय? ते सांग.'' धृतराष्ट्राच्या या प्रश्नावर संजय म्हणाला –

**यत्र योगेश्वर: कृष्णो यत्र पार्थो धनुर्धर: ।**
**तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ।।७८।।**

जिकडे योगांचा ईश्वर असलेला श्रीकृष्ण आणि धनुष्य धारण करणारा अर्जुन आहे, तिकडे संपत्ती, विजय, वैभव आणि शाश्वत अशी नीती हे सर्व राहील असे माझे मत आहे.

या श्लोकाने गीतेची सांगता होत आहे. या श्लोकाचे महत्त्व श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी अत्यंत आदराने गायिले आहे. ते म्हणतात –

*''तैसे शब्दब्रह्म अनंत । जाले सवालक्ष भारत । भारताचे शते सात । सर्वस्व गीता ।। तयाहि साताशतांचा । इत्यर्थु हा श्लोक शेषीचा । व्यासशिष्य संजयाचा । पूर्णोद्गारू जो ।। येणे एकेचि श्लोके । राहे तेणे असके । विद्याजाताचे निके । चिंतिले होय ।।''* (ज्ञाने. १८/१६६२ ते १६६४) वेदाचा अनंत विस्तार सव्वालक्ष श्लोकांच्या भारतामध्ये सामावला

आहे. आणि भारताचे सर्वस्व गीतेच्या सातशे श्लोकांत आलेले आहे. गीतेच्या या सातशे श्लोकांतील इत्यर्थ, व्यासांचा शिष्य असलेल्या संजयाचा पूर्णोद्गार असा जो हा शेवटचा श्लोक, त्यात आला आहे. सर्व गीतेचे सार जणू या श्लोकात एकवटले आहे. जो या एकाच श्लोकावर विश्वास ठेवून त्याप्रमाणे राहील त्याने संपूर्ण विद्यांचे यथार्थ स्वरूप स्वाधीन करून घेतले असे होईल. या श्लोकाचे श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी केलेले हे वर्णन अगदी यथार्थ आहे. यापेक्षा अधिक समर्थपणे या श्लोकांची समर्पक अशी महती सांगणे अशक्य आहे. श्रीज्ञानोबाराय या श्लोकाचे इतके महत्त्व का प्रतिपादितात ते थोडे समजून घेतले पाहिजे.

संपत्ती, विजय, वैभव यांची अपेक्षा तर बहुतेक सर्वांच्याच अंत:करणात असते. व्यक्ती-व्यक्तीला वा त्यांच्या लहान-मोठ्या गटाला, समाजाला वा राष्ट्राला हे सर्व पाहिजे असतेच. माणसे त्या दृष्टीने आपापल्या शक्तीप्रमाणे प्रयत्न करीत असतात. हेच साधण्यासाठी साहस करण्यासही प्रवृत्त होतात. मात्र या सर्वांचे अधिष्ठान म्हणून वा संपत्ती, विजय, ऐश्वर्य यांची सहकारिणी म्हणून शाश्वत अशा नीतिमत्तेला, न्यायाला तितकेच महत्त्व आहे; इकडे मात्र कोणाचे लक्ष असत नाही. आपण काही शिष्टाचारांना नीती आणि शासनाने निर्माण केलेल्या निर्बंधांना न्याय असे सोयीसाठी समजत असतो. त्यांना कितपत मान द्यावा किंवा त्यातून पळवाटा कशा काढाव्यात आणि शासकीय कचाट्यात न सापडता प्रतिष्ठितपणे कसे मिरवावे याचे तंत्र अनेकांना चांगले अवगत झालेले असते. आणि समाजामध्ये ते मोठेपणाने वावरत असतात असेही दिसते. त्यांच्याकडे पाहून काही सज्जन माणसे ''आमच्या चांगुलपणाचे आम्हांला काय फळ मिळाले? प्रपंचात ओढाताणच सोसावी लागते आहे ना?'' असे म्हणून कुरकुरत असतात. हे जे असे दिसते वा घडते, त्यात शाश्वत नीतीचे स्वरूप लक्षात घेतलेले नसते.

योगेश्वर असा श्रीकृष्ण आणि धनुर्धारी असा अर्जुन यांच्या सहयोगातून संपत्ती, विजय, वैभव मिळायचे असते. आणि त्यांना शाश्वत अशा नीतीचे, न्यायाचे अधिष्ठानही असते. तसे असले तरच त्या संपतीला, विजयाला किंवा ऐश्वर्याला खरी शोभा प्राप्त होते. त्यांना स्थिरता लाभते आणि त्यातून निरामय प्रसन्नतेचा लाभ होतो. नीतिमत्तेचे अधिष्ठान असेल तरच संपत्ती ही श्री ठरते,

लक्ष्मी ठरते. वरचढपणा हा विजय ठरतो, यशस्वी ठरतो. आणि वैभव किंवा ऐश्वर्य भूषणभूत होते, सन्मानाला प्राप्त होते. असे असले तरच त्यात संतोष, समाधान, उल्हास, आनंद यांचा वास राहतो, नाहीतर तो केवळ देखावा होतो. वरून त्या व्यक्ती कितीही मिरवत असल्या तरी आतून धास्तावलेल्या असतात. आणि त्यांचा तो वरवरचा डौलही फार काळ टिकत नाही. उलट अप्रतिष्ठा वाट्याला येते, छी:थू सहन करावी लागते. म्हणून संपत्ती, विजय आणि ऐश्वर्य यांना, चिरंतन मूल्य असलेल्या नीतिमत्तेचे अधिष्ठान असावे लागते. त्यासाठीच योगेश्वर कृष्णाचे आणि धनुर्धर पार्थाचे महत्त्व आहे.

श्रीकृष्णाला येथे योगेश्वर असे म्हटले आहे. योगांचा ईश्वर तो योगेश्वर. योग अनेक प्रकारचे आहेत. आणि योग या शब्दाच्या व्याख्याही निरनिराळ्या रीतीने केलेल्या आहेत.

कर्मयोग, भक्तियोग, पातंजलयोग, ज्ञानयोग असे योगाचे चार महत्त्वाचे प्रकार आपणा सर्वांना ठाऊक आहेतच. याव्यतिरिक्त राजयोग, हठयोग, आत्मसंयमयोग, ब्रह्मयोग, अमनस्वयोग, अस्पर्शयोग, ध्यानयोग, बुद्धीयोग, संन्यासयोग इत्यादी इत्यादी अनेक योग त्या त्या संप्रदायाचे पुरस्कर्ते मानीत असतात.

योग शब्दाचा व्युत्पत्तिदृष्ट्या अर्थ, जोडले जाणे असा आहे. त्यातून मग एकरूप होणे, प्राप्त होणे, पोहोचणे असे अर्थही निर्माण होतात. गीतेमध्ये योग शब्दाची व्याख्या अनेक प्रकारांनी केली आहे. *''योग: कर्मसु कौशलम्''* (गीता २/५०) कर्मामध्ये, कृतीमध्ये कुशलता व्यक्त होणे, कौशल्य असणे म्हणजे योग. *''तं विद्याद्दु:खसंयोगवियोगं योगसंज्ञितम्।''* (गीता ६/२३) दु:खाच्या संयोगाचा वियोग म्हणजे दु:ख असले तरी त्याचा स्पर्श न होणे म्हणजे योग. *''समत्वं योग उच्यते''* (गीता २/४८) अशीही एक व्याख्या गीतेने केली आहे.

आध्यात्मिक जीवन आणि व्यावहारिक जीवन सर्वांगाने परिपुष्ट करण्यासाठी, क्वचित् प्रकृतिभेदाने, अधिकारभेदाने तर क्वचित् अवस्थाभेदाने योगाचे सर्व प्रकार आणि निरनिराळ्या व्याख्यांतून प्रगट होणारे योगाचे सर्व विशेष उपयोगी पडत असतात. भगवान् श्रीकृष्ण हे या योगाच्या विविध प्रकारांचे ईश्वर आहेत, स्वामी आहेत. हे सर्व योग जणू त्यांचे सेवक आहेत.

त्यांच्याशी एकनिष्ठ आहेत, त्यांचे आज्ञांकित आहेत. त्यामुळे कोणालाही, कोणत्याही परिस्थितीत उत्कृष्टपणे मार्गदर्शन करण्याचे सामर्थ्य श्रीकृष्णाचे ठिकाणी सहजपणे आहे. आणि ते या गीतेच्या माध्यमातून अनेक रीतीने प्रगटही झालेले आहे. अशा ईश्वर-स्वरूप असलेल्या, सर्वसमर्थ, सर्वज्ञ श्रीकृष्णाने अर्जुनाला तत्त्वज्ञानपूर्वक कर्तव्य काय ते नीटपणे समजावून दिले आहे. आणि अर्जुनानेही सर्व नद्यांचे पाणलोट समुद्राने आत्मसात करावते त्याप्रमाणे श्रीकृष्णाचा सर्वच्या सर्व उपदेश आपल्या ठिकाणी साठवला आहे. तो इतका की बोधाच्या दृष्टीने अर्जुन श्रीकृष्णापेक्षाही सरस ठरावा, आणि या वस्तुस्थितीचा श्रीकृष्णाला अभिमान वाटावा अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात - *''आणि पुत्रे मी सर्वगुणी । जिणावा हे बापा शिराणी । तरी ते शार्ङ्गपाणि । फळा आली ।।''* (ज्ञाने. १८/१६५२) पुत्राने सर्वप्रकारच्या सद्गुणांत माझ्यापेक्षा वरचढ ठरून मला जिंकावे अशी उत्कट इच्छा बापाच्या ठिकाणी असते. ती श्रीकृष्णाच्या दृष्टीने पूर्णपणे फलद्रूप झालेली आहे. कारण गुरूही, ''शिष्यादिच्छेत् पराजयम्'' शिष्याने मला मागे टाकून अधिक लौकिकवान व्हावे अशीच आकांक्षा बाळगीत असतो. अर्जुनाने आपल्या योग्यतेने, बुद्धिमत्तेने, दक्षतेने हे समाधान आपल्या गुरूला-श्रीकृष्णाला दिले आहे. असा ज्ञानयुक्त झालेला अर्जुन धनुर्धारी आहे. पराक्रमी आहे. म्हणजे कर्तव्यतत्पर आहे. प्रयत्नशील आहे. ऐकलेले आचरणात आणणारा आहे. त्यासाठी येईल त्या प्रसंगाला धैर्याने तोंड देण्यासाठी शस्त्रसज्ज होऊन उभा आहे.

योग शब्दाने जे जे काही भव्य, दिव्य, उदात्त आहे ते ते सर्व मिळवून देण्याची साधना गृहीत धरली जाते, तर धनुर्धारी शब्दाने सर्व प्रकारची कार्यक्षमता आणि प्रयत्नशीलता सुचविली जाते. या ठिकाणी योगांच्या व्याख्येप्रमाणे कौशल्य, तितिक्षा, स्थिरता या भावांचाही सहयोग असल्याचे दिसून येते. अशा सहसा एकत्र न आढळणाऱ्या अनेक दुर्मिळ सद्गुणांचा संगम झालेला आहे. तेव्हा तो कोणत्याही परिस्थितीत संपत्ती, विजय आणि ऐश्वर्य प्राप्त करून घेणारच. आणि हे सर्व अध्यात्म ज्ञानपूरित बोधाच्या माध्यमातून घडणारे असल्याने तेथे जिची मूल्ये शाश्वत आहेत, सदैव टिकून राहणारी आहेत अशा नीतिमत्तेची उदात्तता सिंहासनासारखी अधिष्ठान होऊन राहणारच.

ते अगदी स्वाभाविक आहे.

मानवी जीवन सर्व दृष्टीने, सर्वांगाने परिपूर्ण व्हायचे तर ते या श्लोकातील आशयातून प्रगट होणाऱ्या विचाराचा अवलंब केला, तो आदर्श मानला, तसे आचरण केले तरच होणार आहे. आज परकीयांच्या वैज्ञानिक प्रगतीच्या झगझगाटाने आपण दिपून गेलो आहोत. आपल्या राज्यकर्त्यांच्या दोषामुळे जे दारिद्र्य आपणांस भोगावे लागत आहे, त्यामुळे ऐश्वर्याचा देखावा आपणांस अधिकच आकर्षक वाटू लागला आहे. विज्ञानाने साधून दिलेली प्रगती ही एका दृष्टीने सोयीची वाटली, तरी दुसऱ्या दृष्टीने अधिकाधिक धोक्याची ठरत आहे. तिकडे द्यावे तितके लक्ष दिले जात नाही. कारण आपल्याला संपत्तीची आणि वैभवाची विलक्षण ओढ लागलेली आहे. सहज ओघाने आले म्हणून सांगतो. संपत्ती आणि वैभव हे दोन शब्द समानार्थक नाहीत. कृपणाजवळ संपत्ती असते, पण वैभव नसते. उधळ्या माणसाजवळ वैभव दिसते पण संपत्ती नसते. सन्मार्गाने मिळविलेल्या संपत्तीच्या आधारावर वैभव प्रगट होणे म्हणजे अभ्युदय. पण जीवनाचा हा सर्वांगीण विचार केवळ हिंदू संस्कृतीने केला आहे हे मी अभिमानाने सांगतो; मग ते कोणास पटो वा न पटो. एकांगी विचारसरणी झगझगीत आणि आकर्षक वाटते. पण एकांगी विचाराने केवळ मानवी जीवनाचाच नव्हे, तर निसर्गाचा समतोल बिघडतो. आजच्या तथाकथित वैज्ञानिक प्रगतीने ही गोष्ट उघड केली आहे. आणि काही विचारवंत तरी त्यावर गंभीरपणे विचार करीत आहेत.

एका आधुनिक कवीने म्हटले आहे,

*''मार्क्सचा मज अर्थ हवा । फ्राइडचा मज काम हवा ।*
*या दोघांचे करू नियंत्रण । गांधीचा मज राम हवा ।।''*

हिंदू संस्कृतीतील विचारधारा लक्षात घेतली असती तर अशी उसनवारी करण्याचे कारण पडले नसते. मार्क्सच्या अर्थशास्त्राने संघर्ष नि अस्वास्थ्य यांना जन्म दिला, तर फ्राइडच्या लैंगिक संबंधावर आधारलेल्या कामशास्त्राने स्वैराचाराला समर्थन पुरविले. त्यांना आवरण्याच्या दृष्टीने गांधीजींचा राम अगदीच मवाळ ठरला. इतका की त्यांच्या मानसपुत्राच्या स्त्रैणपणाने आणि साम्यवादाच्या आकर्षणाने हिंदुस्थानचे तुकडे पडले. आणि हिंदुस्थानचे अर्थशास्त्र परकीयांच्या दास्याला बांधले गेले. स्वराज्यप्राप्तीच्या ३०-३२

वर्षांनंतर आता हे आपल्याला थोडेथोडेसे उमगू लागले आहे पण अजूनही आपले नेते भ्रामक विचारसरणीचा पूर्णपणे त्याग करू शकत नाहीत आणि अनुयायी असावे तितके कर्तव्यतत्पर राहत नाहीत. म्हणून गीतेचे तत्त्वज्ञान पुन्हा एकदा अत्यंत प्रभावीपणे समाजापुढे मांडले गेले पाहिजे. नेतृत्व कृष्णासारखे असले पाहिजे, जे पूर्ण नि:स्वार्थी, ज्ञानविज्ञानसंपन्न, अत्यंत चतुर, लोकसंग्रही पण अत्यंत निग्रही, दृढनिश्चयी असे आहे. आणि अनुयायीवर्ग पराक्रमी, निष्ठावंत, आज्ञाधारक, सामर्थ्यसंपन्न, कुशल आणि प्रयत्नशील असा असावा. म्हणजे श्री, यश, वैभव दुसरीकडे कोठे जाणार?

कर्णासारख्या कौरवपक्षपात्यालासुद्धा या सिद्धांताचे आकलन चांगल्या रीतीने झाले होते. कृष्णाने कर्णाची समजूत घालून तू पांडव-पक्षात ये असा आग्रह केल्यानंतर कृष्णाचे म्हणणे अमान्य करताना कर्ण म्हणतो – *''स एव राजा धर्मात्मा शाश्वतोऽस्तु युधिष्ठिरः । नेता यस्य हृषीकेशो योद्धा यस्य धनंजयः ॥''*

कर्णाने उच्चारलेल्या या श्लोकात राजकारणाची सर्व उदात्तता एकवटली आहे, असे म्हटले तरी चालेल. राजा म्हणण्यात श्री, विजय आणि वैभव यांचा समावेश होतो. धर्मात्मा म्हणण्याने नीती उल्लेखिली जाते आणि तिच्यामुळेच राजेपणाला शाश्वतता येते हेही लक्षात येते. कृष्णासाठी वापरलेल्या हृषीकेश या पदाने योगेश्वरत्व सुचविले जाते आणि अर्जुनाला योद्धा म्हणण्यात त्याचे धनुर्धारीत्व आणि श्रेष्ठ प्रतीचे शौर्य उल्लेखिले जाते.

कृष्णासारखा योगेश्वर नेता असला तरच न्याय आणि अन्याय यांच्यावरचा न्याय, धर्म आणि अधर्म यांच्या पलीकडचा धर्म, असत्याशी सापेक्ष असलेल्या सत्यापेक्षा श्रेष्ठ असलेले परमसत्य त्याच्या बुद्धीला दिसते. अंत:करणात स्फुरते. आणि मग व्यवहार, वरवर दिसणाऱ्या योग्य-अयोग्याच्या शाब्दिक प्रक्रियेत न गुंतता केवळ श्रेयाच्या दृष्टीने, हिताच्या दृष्टीने कार्यवाहीत येतो. अशा असामान्य नेत्याचा अनुयायीही तसाच असामान्य असणे आवश्यक आहे. त्या अनुयायाच्या ठिकाणी निष्ठा, सामर्थ्य, पर्वतासारखे धैर्य, आकाशाला गवसणी घालू शकणारा उद्यम, मनाला कधीही चंचलता येणार नाही अशी श्रद्धा, नेत्याच्या थोरवीवर विश्वास, कार्यामधले कौशल्य हे सद्गुण असावे लागतात. त्याचे जीवन पूर्णपणे समर्पित असावे लागते. ध्येयवादी असावे लागते.

व्यासशिष्य संजयाच्या या पूर्णोद्गारात हा सर्व विचार बीजवृक्षन्यायाने सामावलेला आहे. म्हणून तर श्रीज्ञानेश्वरमहाराज या श्लोकाला गीतेच्या सातशे श्लोकांचा इत्यर्थ असे म्हणतात.

गीतेतील अनेक श्लोकांप्रमाणे हा श्लोकही मंत्रमय आहे. त्याचा जप भाविकांच्या दृष्टीने चिंतामणी ठरू शकतो, असा तज्ज्ञांचा अभिप्राय आहे. असो.

अर्थदृष्टीने या श्लोकाचे चिंतन–मनन केले तर मनुष्याच्या स्वभावातील निष्क्रियता निश्चयाने दूर होईल. गीतेच्या रूपाने प्रत्यक्ष योगेश्वर कृष्ण आपुल्यापुढे उभा आहे. आपण मात्र अर्जुनासारखे धनुर्धर झाले पाहिजे. हे कलियुग आहे. येथे कोणाच्या आशीर्वादाने काही मिळत नाही व कोणाच्या शापाने काही बिघडत नाही. अंत:करणात आदर–श्रद्धा–प्रेम हे भाव असावेत. पण सज्जनता–सात्त्विकता म्हणजे निष्क्रियता असे समजू नये. ध्येयसिद्धीसाठी आपल्या सर्व सामर्थ्यानिशी ताठपणे उभे राहिले पाहिजे आणि कौशल्याने प्रयत्नशील झाले पाहिजे. सातत्याचा कंटाळा करता कामा नये. सगळे चांगले असताना यशश्री आपणावर रुसली आहे ती प्रयत्नांच्या अभावामुळे, 'जाऊ द्या की' या वृत्तीमुळे.

आपण गेला एक मास–ज्याला पुरुषोत्तम मास म्हणतात–गीतेचे चिंतन करीत आहोत. पुरुषोत्तम मासाच्या निमित्ताने पुरुषोत्तम श्रीकृष्णाच्या वाङ्मयरूपाचे दर्शन आपण यथाशक्ती घेतले. सद्गुरूंच्या कृपेने हे भाग्य लाभले आहे. आपण त्याचा यथाशक्ती उपयोग करून घेऊ या.

मी माझ्या बुद्धीप्रमाणे जसे बोलता येईल तसे बोललो. श्रोत्यांनी उदार अंत:करणाने क्षमाशील व्हावे. श्रीज्ञानोबामाउलींच्या शब्दात *''तरी न्यून ते पुरते । अधिक ते सरते । करून घेयावे हे तुमते । विनवितु असे ।।''* अशी प्रार्थना करून ही वाङ्मयसेवा श्रीचरणी समर्पितो.

**– ॐ शांति:पुष्टि: तुष्टिश्चास्तु –**

# विषय सूची


अर्जुन प्रियतम २५९
अप्रबुद्ध (पाळेकर वि. के.) १४८
अहंकार बुद्धिहून सूक्ष्म २०३
अहंकाराची संतती २३०
अहंकाराचे दोन स्तर २८१
अध्यात्म मानवतेचे आरोग्य २४
आइन्स्टीन ३५
आत्मौपम्यता २८७
आपण तरोनि जन तारी २७४
आसक्ति; फलाकांक्षेचे
-रागद्वेषाचे मूळ १८, ८८
आसन-जय १९७
आश्रमसंन्यास १८६
इतिहास-लेखन:एक दृष्टिकोन १४४
इष्ट-अनिष्ट-मिश्र कर्मे ५०
इंग्रजीचे पारतंत्र्य १४२
'इंतजार में मजा' २९
ईश्वराची मायाशक्ति २३७
उत्कट शिष्यभाव ४
औरंगजेब १५९
ऐक्याला हिंदू समाज पारखा २१२
अंत:करणमन-बुद्धि-अहंकार २०५
कर्मयोग (टिळक) २२४
करिष्ये वचनं तव ५, २८२
काम्य कर्मे ६
कार्यकारणभाव जिज्ञासा ४८
कीर्तनाचा उपयोग २४९
केदारनाथ २०९
क्रमयोग २२०
गांधींचा राम २१, २९२
गीता-दुग्ध - बुद्धी-मूल्य २४७
गीता-रहस्य (टिळक) २७६
गीता श्रवणाधिकार २६४
गुणातीतता २८७
गौणीभक्ति २३०
चातुवर्ण्यव्यवस्था अल्पदोषी १४५
चिंतामणराव वैद्य १६२
चंचलतेने धीर सुटतो १९३
छत्रपति शिवाजी ३९
छत्रपति संभाजी १७४
जे. कृष्णमूर्ति १७७
डिसिजन : क्विक, फर्म, राईट ३८
तामसत्याग २४
धर्मसत्ता १०२
धीर पुरुष २८
ध्यानाचे कवच वैराग्य २०१
नाद्वैतं गुरुणा सह २८०
नित्यनैमित्तिक कर्मे ५-६
नेतृत्व कृष्णासारखे हवे २९३
नैष्कृतिक १०१
नैष्कर्म्य निवांतपणा १८६
परमेश्वराचा अहंकार? ६९
परमार्थाचा पाया त्याग-संन्यास ४
पालटाचे तत्त्वज्ञान ११९
प्रतापराव गुजर १५८
पंचकोश २२७
पंचम पुरुषार्थ (भक्ति) २१७
प्रकृति-संस्कृति-विकृति ४१
प्रक्रिया-परिभाषा २७३
प्रगतीचे अधिष्ठान (ज्ञान) ५
प्रयत्न व दैव ५५, ५६
प्रामाणिक-उत्कटता १९१
प्रेम भक्ति (राधा) २४१
फलाकांक्षा आसक्ती वाढविते १८
फलहारी बाबा २०९
फलाविषयी निरिच्छ ४१

फॅशन-रजोगुण ८०
फ्राईडच्या कामशास्त्राचा परिणाम २९२
बाजीप्रभु देशपांडे ९५
ब्रह्मपदारूढ व्यक्ति २१४
बंदा बैरागी १७४
बुद्धीचे अलौकिक सामर्थ्य ६४
भक्ति : ज्ञानलक्षणा-प्रेमलक्षणा २१७
भगवद्‌पूजेचे श्रेय २७७
भर्तृहरी ९२
भामती व वाचस्पती मिश्र ९४
भोगात परतंत्रता; कर्मात स्वतंत्रता ४८
भोळा, निर्बुद्ध नसतो ३५
मार्क्सच्या अर्थशास्त्राचा परिणाम २९२
मागणी-पुरवठा तत्त्व १६४
मोरोपंत २३५
यज्ञ संकल्पना १०
ये हृदयीचे ते हृदयी २६३
येन त्यजसि तत् त्यज २६२
रविंद्रनाथ टागोर १४४
रस-शांत आणि अद्भुत एकत्र २८७
रहिमन १५६
राजस कर्ता ९७
राजस त्याग २४
रामदास, तुकाराम १५७
लोकमान्य टिळक ३८, १६२
वर्णधर्म-आजचे स्वरूप १९
वृकयुद्ध-नीति १५९
विभक्त नव्हे तो भक्त २१९
विषकुंभ पयोमुखी १३५
विविधतेतील एकता ८०
विज्ञान प्रगति धोक्याची २९२
वेदान्त घरी समजतो ४२
वैचारिक आक्रमणाने आघात ६४
वैराग्य १९८
शब्दावाचून संवाद २६१
शमदमादि लक्षणे १५४
शेखसादी (तत्त्वज्ञ) २४३
शंकराचार्य (भक्तिव्याख्या) २१६
शंकराची आठ रूपे ४४
शंबुकवध १४८
श्रीकृष्ण पूर्णावतार २५५
श्रीमद्भागवत (जडभरत कथा) २२६
श्रेयाची सांगड हिताशी १७४
सत्य अहिंसा भोंगळ? ६८
समताप्रलय ७७
सर्वेऽत्र सुखिनः सन्तु ३३
स्वकर्मकुसुम पूजा १६९
स्ववर्तन समालोचन १३३
स्पोर्टस्मन स्पिरिट २९
साईबाबा १२२
सात्विक कर्ता ९३
सात्विक बुद्धीचे माहात्म्य १०८
साम्यवाद्यांनी हिंसा केली ७७
साहसे श्रीः प्रतिवसति १०६
संस्कार आणि साम्यवाद ६४, ६५
संचित-क्रियमाण-प्रारब्ध ६२
संत नामदेव १७०
संत रोहिदास १४३
संन्यास २-७
संपत्ति, वैभव समान नव्हे २९२
हरिपाद सेवनं व्यसनं ८६
'हवे-नको' मुळे चंचलता १९५
हिंदुस्थानचे तुकडे २९२
ज्ञान : पृथक्करणात्मक-संकलनात्मक १०४
ज्ञाननिष्ठा १८७
ज्ञानेश्वरांची अलौकिक प्रतिभा २७९

■ ■ ■